डिलक्स आवृत्ती

दिवाळी विशेषांक

समतावादी

# मुक्त संवाद

एक समृद्ध वाचन यात्रा

पत्रिका

नोव्हेंबर–डिसेंबर २०२५ वर्ष तिसरे : अंक ४






Follow us at : /JNPORT /JNPort /JNPAPort /JNPA - Jawaharlal Nehru Port Authority

For Information, Call JNPA Helpline No. **1800 228 282** www.jnport.gov.in

# कालनिर्णय®

## नवे वर्ष; नवे कालनिर्णय!

७ भाषा
३९ आवृत्त्या




फ्री ॲप ॲन्ड्रॉईड आणि ॲपलवर

www.kalnirnay.com |

समतावादी
# मुक्त संवाद
एक समृद्ध वाचन यात्रा पत्रिका
दिवाळी २०२५


**प्रकाशक-संपादक**
डॉ. विवेक कोरडे

**कार्यकारी संपादक**
शेखर देशमुख

**सल्लागार संपादक मंडळ**
विजय प्र. दिवाण, सुलक्षणा महाजन
डॉ. शैलजा बरुरे, लोकेश शेवडे, सुजय शास्त्री

**संपादकीय साहाय्य**
सुमेधा कुवळेकर

**मुद्रित शोधन**
माधवी विचारे

**व्यवस्थापन सल्लागार**
विकास नाईक

**शीर्षनाम आरेखन**
विजय नार्वेकर

**मुखपृष्ठ**
गुस्ताव क्लिम्ट– द ॲपल ट्री–वन (१९१२)

**अंतरंग पान (केदारकंठ, सांकरी, उत्तराखंड)**
छायाचित्र सौजन्य : डॉ. अविनाश मयेकर

**अंक मांडणी, सजावट**
सागर शिंदे
(मोबाइल नं. ७०३० ९९००८१)

**व्यवस्थापन, वितरण**
चंद्रकांत माळगवे – ९३२२३ ९१७२०
वैभव केसरकर – ८५५१८ ५०४६२



## संपादकीय ४

## शोधयात्रा

रखमत उझबेकिस्तान!
**– रेखा देशपांडे** ६

शून्य शिखर पर झालर झलके...
**– स्वप्निल गणेश कुलकर्णी** १६

## शोध– संशोधन– जतन–संवर्धन

चित्रपट संस्कृतीचे जतन आणि संवर्धन ही एक कलाच
**– शिवेंद्रसिंग डुंगरपूर**
**– मुलाखतकार : प्रा. संतोष पाठारे** १५८

पर्दा है पर्दा...
**– हृषिकेश आर्वीकर, अनुवाद : सोनाली नवांगुळ** १६६

## नियमित सदरे

रामाने वालीची शिकार केली; सुग्रीव किश्किंधेचा राजा झाला
**– राजा पटवर्धन** १७५

वैदिक आणि चार्वाक विचारसरणीतील द्वंद्व
**– जगदीश काबरे** १८३

गिग अर्थव्यवस्थेचे राजकीय अर्थशास्त्र
**– हितेश पोतदार** १९१

ग्रंथ संसार... संसार
**– गणेश मनोहर कुलकर्णी** १९८

मेंदूची घडण आणि निर्मितीची जडण
**– डॉ. आनंद जोशी** २२०



**विनामूल्य वितरणासाठी**
'समतावादी मुक्त–संवाद पत्रिका' हे मासिक मालक विवेक दत्तात्रय कोरडे यांच्या करिता, प्रकाशक विवेक दत्तात्रय कोरडे यांनी जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई ४००००४ येथे छापून रूम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई ४०००१३ येथून प्रसिद्ध केले. संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे

'Samatawadi MuktSanvad Patrika' Monthly Publication owned by Vivek Dattatrey Korde Printed at Jagruti Printers,Trimurti 91, Gharpure Path, Giragaon Mumbai 400004 and Published at Room No. 46, First Floor, SakharamBalaji Pawar Marg, Currey Road Naka, Delisle Road, Mumbai 400013 Editor : Vivek Dattatrey Korde



(या अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी, प्रतिक्रियांशी अथवा विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग

## ज्ञानवंतांचा गोतावळा


ज्ञानसमृद्ध आयुष्याचे आख्यान
**– डॉ. तारा भवाळकर** २५

जन्म आणि मृत्यु दोन्ही टोकं एकटेपणाशी बांधलेली असतात तरीही...
**– रेखा शहाणे** ३२

ज्ञानवंतांची सत्संगती
**– विजय प्र. दिवाण** ४४

माझे ज्ञान-दर्शक
**– सुलक्षणा महाजन** ५०

विज्ञाननिष्ठ ज्ञानयात्री
**– डॉ. अनुराधा सोवनी** ५८

ज्ञानियांचे ऋण
**– डॉ. मंगेश कुलकर्णी** ६२

खणखणीत ज्ञानस्तंभ!
**– डॉ. शैलेन भंडारे** ६८

अँथनी द ग्रेट!
**– जीवन तळेगावकर** ७४

पारंगतता शिकवणारे ज्ञानमार्गी
**– ॲड. निशा शिवूरकर** ७९

निसर्गाते वाट पुसत... प्रवास आकलनाचा!
**– वसुधा सरदार** ८५

माझे ज्ञानप्रकाशी मित्रजगत
**– हेरंब कुलकर्णी** ९२

माझा ज्ञान-मंच
**– डॅनियल मस्करणीस** ९७

पैस विस्तारणारी त्रयी
**– संजय आर्वीकर** १०२

माझे मौल्यवान ग्रंथवंत
**– टेकट्टे जगत, शब्दांकन : विकास नाईक** ११०

गोफ दुहेरी विणलासे
**– प्रल्हाद जाधव** ११५

माझी रेषा, माझा गोतावळा
**– प्रदीप म्हापसेकर** १२२

मी एक दुवा
**– सुनील सुकथनकर** १३०

**उपोद्घात** १४०


## कर्तृत्वशोध


सर्वज्ञानसंपन्न अवलिया!
**– डॉ. मोहन द्रविड** १४१

डॉ. पूर्णानंद अवस्थीः एक क्रांतिकारक जीवन-सर्जन
**– डॉ. विवेक कोरडे** १४८


## कला/काव्य/नाट्यमंच


गाझाच्या कविता
**– लक्ष्मी यादव, भरत यादव, गीताश्री मगर, प्रशांत बर्गे** २०५

नसिमी म्हणतो, अहम् ब्रह्मास्मि!
**– शेखर देशमुख** २१०

सिद्धी
**– मूळ कथाः शतदल मित्र, भावानुवादः सुमती जोशी** २१५

युद्धविरोधी कलाः एक कलात्मक प्रतिरोध
**– मंगेश नारायणराव काळे** २२७

मॅड (सखारामचे) दिवस!
**– मंगेश सातपुते** २३७


**आमचे पाठीराखेः**
कुमार केतकर, हुसेन दलवाई, रवींद्र टी. प्रधान, जयराज साळगावकर, दत्ता नायक, टी. जगत, विनोद शिरसाठ, डॉ. आनंद जोशी-सुमती जोशी, आशिष पाटकर, डॉ. दिलीप खताळ, डॉ. प्रदीप कर्णिक, प्रसाद केरकर, अतुल देऊळगावकर, डॉ. अजित जगताप, डॉ. रेखा शेळके, प्रशांत पवार, डॉ. मंदार काळे, सुशीलकुमार शिंदे, विकास महाडिक, दत्ता बाळसराफ, चिन्मय दामले, प्रशांत खुंटे, प्रा. राजेंद्र भोईवार, सचिन परब, पांडुरंग शिवलकर, सोहन भांगले, प्रभाकर कुंभार.



# ज्ञानवंत येती घरा...

पोटाची भूक आणि अस्तित्वाचे भय. अवघ्या सजीवसृष्टीच्या घडण्या-बघडण्याला गती देणाऱ्या या भावना. भूक आणि भयातून उद्भवणारा संघर्ष हा साडेचारशे कोटींहून अधिकचे वयोमान असलेल्या या पृथ्वीवरच्या विश्वाचा स्थायीभाव जणू. काही लाख वर्षांपूर्वी माणूस नावाच्या प्राण्याच्या जन्माआधीपासून सुरु असलेला हा संघर्ष माणसाच्या अस्तानंतरही बहुदा सुरु राहील असा. पोटाची भूक भागवण्याचे आणि अस्तित्वाचे भय घालवण्यासाठीचे आवश्यक ज्ञानही प्रत्येक सजिवाकडे निसर्गदत्त आलेले. एका अर्थाने, असे हे ज्ञानाचे असणे, ज्ञान होत राहणे सजिवाला आधार देत आले आहे.

पण म्हणून समुद्रात वस्ती करून असलेल्या माशांना, त्यातही व्हेल किंवा मँटा रेजसारख्या बुद्धिवान गणल्या गेलेल्या माशांना अवकाशाचा शोध नाही, घेता आला कधी. किंवा आकाशात विहरणाऱ्या पक्ष्यांना, त्यातही सैबेरियापासून लाखो मैल दूर  महाराष्ट्र, गुजरात, ओडिशा, तामिळनाडू आदी राज्यातल्या तळ्याकाठांपर्यंत झेप घेणाऱ्या अमर्याद क्षमतेच्या फ्लेमिंगो पक्ष्यांना समुद्रतळाशी असलेल्या जलचरसृष्टीचा शोध नाही घेता आला कधी. कारण निसर्गनियमांचे त्यांच्यावर असलेले बंधन. हे बंधन झुगारून दिले, मानव प्राण्याने. कालक्रमाने उत्क्रांत होत गेलेल्या मेंदूच्या बळावर या मानवाने निसर्ग नियमांना आव्हान देत प्रतिसृष्टी उभारण्याचे भलतेच भारी कसब अंगी बाणवले. स्वतःबद्दलची वृद्धिंगत होत गेलेली जाण आणि दृष्टिगोचर जगाचे टप्प्याटप्प्याने येत गेलेले भान यातून त्याच्या ठायी ज्ञान साचत गेले. विचारांना कृतीची जोड मिळत गेली. प्रत्येक नवा विचार, त्याच्या जगण्याला नवे वळण देत गेला. युगेयुगे, पिढीदरपिढी माणसामध्ये भिनलेले ज्ञानाधारित कसब अभिसरित होत राहिले. अज्ञाताबद्दलची जिज्ञासा आणि नव्याचे कुतूहल यातून माणसाने निसर्गाला समांतर स्वतःचे असे एक भौतिक जग आकारास आणले. ते उत्तरोत्तर आधुनिक करत नेले.

आजचा टप्पा उत्तर आधुनिक काळाचा. मानवाचे जगणे सुखी आणि समृद्ध करत जाणारे माहिती आणि ज्ञान हा या उत्तर आधुनिक जगाचा पाया, तर ज्ञानाचा संचय करून उदारहस्ते ते इतरांमध्ये वाटणारे देशोदेशीचे ज्ञानवंत हे या जगाचे कर्ते धर्ते. ज्यांना आपल्या आयुष्यात अशा प्रज्ञा आणि प्रतिभेची देणगी मिळालेल्या ज्ञानवंतांचा गोतावळा लाभला, त्या गोतावळ्यामुळे आपल्यातले माणूसपण जोपासता नि वृद्धिंगत करता आले, ते खरे भाग्यवंत. समाजजीवनावर प्रभाव राखून असलेल्या विविध क्षेत्रांतल्या अशा मान्यवर भाग्यवंतांच्या समावेशाने 'समतावादी मुक्त संवाद पत्रिका' मासिकाचा हा दिवाळी अंक सजला आहे.

तसे पाहता, प्रकाशित होणाऱ्या सर्वच दिवाळी अंकांमधून अशा भाग्यवंतांचे आणि त्यांनी अनुभवलेल्या ज्ञानवंतांच्या

गोतावळ्याचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दर्शन घडत असते. या निमित्ताने दरवर्षी वाचकांच्या ज्ञानकोशात थोडीथोडी भर पडतच असते. यंदाच्या वर्षी आम्ही हा प्रयत्न जाणीवपूर्वक केलेला आहे. या अंकातले वैविध्यपूर्ण साहित्य महाराष्ट्राच्या विचारविश्वाला, भावविश्वाला आकार देणाऱ्या ज्ञानवंतांच्या बहुरंगी-बहुढंगी गोतावळ्यांचे दर्शन घडवणारे आहे.

ज्ञान-विज्ञान, शोध-संशोधन, जतन-संवर्धन असा आंतरविद्याशाखीय मेळ साधत मनाला समाधान देणारे, मन शांतावणारे, मनात रुतून बसणारे, मन व्यापणारे मुख्य म्हणजे, आपले विचार आणि भावविश्व उन्नत करणारे बरेच काही यातून गवसावे, हा आमचा मानस आहे.

नैसर्गिक स्रोतांवर ताबा मिळवण्यासाठी वर्चस्ववादी राष्ट्रांनी घडवून आणलेले युद्धसंघर्ष, सततचे दुष्काळ, गावे-शहरे वाहून नेणारे महापूर, असहमतीदारांची आंदोलने, निदर्शने, ती चिरडण्यासाठी हिंसक होत चाललेल्या शासनसत्ता इत्यादी जग अस्थिर नि अस्वस्थ करणाऱ्या घटना कमीअधिक प्रमाणात आधीच्याही काळात घडत होत्या, वर्तमानही त्याला अपवाद नाही. प्रसंग कितीही बिकट असो, ज्ञानवंतांच्या गोतावळ्याने सदासर्वदा हे जग तोलून धरले आहे, माणसाला उमेद आणि ऊर्जा पुरवली आहे, अशी आमची प्रामाणिक भावना राहिली आहे. आपल्याकडचे, 'साधू संत येती घरा, तोचि दिवाळी-दसरा' हे वचन त्याचेच भावरुप राहिले आहे. म्हणूनही एकमेकांना समजून घेण्याचा, एकमेकांकडे असलेल्या ज्ञानाचे आदानप्रदान घडवून आणण्याचा आणि स्वतःमध्ये डोकावत आत्मसंवादास प्रवृत्त करण्याचा हा प्रयत्न आपल्याकडे असलेल्या ज्ञानवंतांच्या श्रीमंतीचे दर्शन घडवील, ही आशा आहे. अर्थात, हे साधताना, हा प्रयत्न परिपूर्ण नाही, आमचा परीघ मर्यादित आहे, याचीदेखील आम्हाला पुरेपूर जाणीव आहे.

आपण हे जाणताच, की 'समतावादी मुक्त संवाद पत्रिका' हे विनानफा, विनामूल्य स्वरुपाने प्रकाशित होणारे नियतकालिक आहे. समोर अनंत अडथळे, आव्हाने आहेत. असे असताना गेल्या पाच वर्षांपासून आमच्या पाठीशी उभी प्रत्येक व्यक्ती, संस्था, सहृदयी जाहिरातदार, देणगीदार आणि या प्रयत्नांना सातत्याने दाद देणाऱ्या तमाम हितचिंतकांचे आभार. या सगळ्यांचे ऋण फेडावे, तेवढे थोडे आहे.


ही दिवाळी आणि येणारे नवे वर्ष प्रत्येकामधल्या माणूसपणाला झळाळी देणारे ठरो, ज्ञानाच्या प्रकाशात प्रत्येकाचे आयुष्य उजळत राहो, या मनःपूर्वक शुभेच्छा!

सर्वांना शुभ दीपावली!!!

**– डॉ. विवेक कोरडे (संपादक, प्रकाशक)**
**शेखर देशमुख (कार्यकारी संपादक)**



# रखमत उझबेकिस्तान!



रेखा देशपांडे





लापिझ लाझुलीतून उगवलेले निळे वैभव...

मनाने मी कधी बसरा, तर कधी मध्य आशियातील बुखारा–समरकंद शहरांच्या गल्ल्यांतून, शोभिवंत नक्षीकामाने सजलेल्या घरा–महालांतून, सरायांतून, बाजारांतून वावरत असे. कल्पनेने ती शहरं उभी करून ठेवली होती. वय वाढलं तरी ती कायम मनात वस्तीला होती. पुढे सिल्क रूट, त्यावरून अगदी चीन ते इस्तंबूलपर्यंत जाणारे व्यापारी तांडे, त्या तांड्यांच्या सोबतीने दूरदूरच्या, अनेकदा हिंदुस्थानपर्यंतच्या, प्रवासाला निघालेले ह्युएन त्संगसारखे धाडसी प्रवासी, हिंदुस्थानात येऊन हिंदुस्थानविषयी ग्रंथ लिहिणारा, विविध विषयांतला विद्वान जाणकार अल बेरुनी असं बरंच काही वाचताना समरकंद–बुखारा–खिवा या शहरांविषयी उत्सुकता निर्माण झाली होती, वाढत चालली होती...
अजून त्या सुरस आणि चमत्कारिक कथांमधला अरबस्तान–बगदाद, बसरा पाहिलेला नाही. काळाबरोबर ह्या प्रदेशांची रूपं बदलली आहेत. पण अलीकडेच उझबेकिस्तानची सफर घडली आणि खिवा, बुखारा, समरकंदमध्ये कल्पनेत जगलेलं ते वातावरण प्रत्यक्षात अनुभवलं.

लहानपणी अरेबियन नाइट्सची पारायणं केली होती. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी रिचर्ड बर्टनचा केलेला मराठी अनुवाद आमच्याकडे होता. मोठ्या आकारातला कापडी बांधणीचा तो ग्रंथ बायबलसाठी वापरण्यात येणाऱ्या शुभ्र, पातळ कागदावर छापलेला होता. कथा दोन रकान्यांमध्ये एकापाठोपाठ एक असत. प्रत्येक कथेसाठी वेगळं नवं पान नसे. त्यामुळे १००१ रात्री ज्याचं कथन चालू होतं त्या या कथांचा निरंतर ओघ दृश्य स्वरूपातही जाणवे. शीर्षकंही मोठी वैशिष्ट्यपूर्ण. कोणत्याही अलंकरणाशिवाय थेट. उदा. 'एक झोपी गेलेला जागा झाला त्याची गोष्ट'. भाषाही जुनी मराठी. तिचा डौल काही वेगळाच असे. तिची मजा वाटे. ह्या कथा कितीही वेळा वाचल्या तरी कंटाळा येत नसे. त्यातलं वातावरण, शहरांच्या गल्ल्यांतून वावरणारी पात्रं, बाजारात भाजून मिळणारे नान, कुठून कुठून येणारे, विशेषतः सिल्क रूटवरून येणारे, आपल्याबरोबर सुरस आणि चमत्कारिक अनुभवांची पोतडी आणणारे व्यापारी असत. मग वजीरकन्या आणि सुलतानाची नवी बेगम शहराझाद हिची ती सुरस आणि चमत्कारिक दास्तानगोई चालूच राही. १००१ रात्री त्या कथारसात न्हाऊन निघत. सगळं भान हरपायला लावणारं असे. त्याला रेखाचित्रांची जोड असे. त्यामुळे ते वातावरण डोळ्यांसमोर उभं राही. मनाने मी कधी बगदाद, कधी बसरा, तर कधी मध्य आशियातील बुखारा-समरकंद शहरांच्या गल्ल्यांतून, शोभिवंत नक्षीकामाने सजलेल्या घरा-महालांतून, सरायांतून, बाजारांतून वावरत असे. कल्पनेने ती शहरं उभी करून ठेवली होती. वय वाढलं तरी ती कायम मनात वस्तीला होती. पुढे सिल्क रूट, त्यावरून अगदी चीन ते इस्तंबूलपर्यंत जाणारे व्यापारी तांडे, त्या तांड्यांच्या सोबतीने दूरदूरच्या, अनेकदा हिंदुस्थानपर्यंतच्या, प्रवासाला निघालेले ह्युएन त्संगसारखे धाडसी प्रवासी, हिंदुस्थानात येऊन हिंदुस्थानविषयी ग्रंथ लिहिणारा, विविध विषयांतला विद्वान जाणकार अल बेरुनी असं बरंच काही वाचताना समरकंद-बुखारा-खिवा या शहरांविषयी उत्सुकता निर्माण झाली होती, वाढत चालली होती... अलीकडेच अरुण खोपकरांच्या 'प्राक्-सिनेमा' या पुस्तकाचा अनुवाद करताना समरकंदमधला रेगिस्तान स्केअर, मदरसे आणि मशिदी, लापिझ लाझुलीच्या निळ्या रंगाने रेखलेल्या टाइल्सनी सजलेल्या त्यांच्या भिंती, गुंबज आणि मिनार यांची निळी नक्षीदार दुनिया, मिनिएचर पेंटिंग्ज, त्यांचे बारकावे अशी सगळी चित्रं डोळ्यांसमोर येत होती... आणि...

अजून त्या सुरस आणि चमत्कारिक कथांमधला अरबस्तान-बगदाद, बसरा पाहिलेला नाही. काळाबरोबर ह्या प्रदेशांची रूपं बदलली आहेत. पण अलीकडेच उझबेकिस्तानची सफर घडली आणि खिवा, बुखारा, समरकंदमध्ये कल्पनेत जगलेलं ते वातावरण प्रत्यक्षात अनुभवलं.

**मशीद-मदरसा-महल-मकबरा**

वेळोवेळी झोरोस्ट्रियन, अरब, मंगोल आणि शेवटी रशिया अशा विविध राजवटी, सततची युद्धे असं असूनही आधीच्या राजवटीने उभी केलेली भव्य धर्मस्थळं पुढच्या राजवटीने जमीनदोस्त न करता त्या वास्तूंचे आपल्या धर्मस्थळांमध्ये रूपांतर करून, वास्तूचं जतन करून आणि आपल्या संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचे अलंकार त्यांना चढवून ह्या वास्तू त्यांच्या सौंदर्यासकट आजही जपलेल्या पाहायला मिळतात. युनेस्कोने हेरिटेज साइट म्हणून घोषित केल्याने हा परिसर स्वच्छ, सुंदर राखला जात आहे. जणू इतिहासाची अपत्यं असलेल्या या वास्तू आजही रसरशीत, जिवंत श्वासोच्छ्वास करत आहेत. रशियन राजवटीने धर्माला मज्जाव केला. मशिदी, मदरसे बंद पाडले, पण वास्तूंना धक्का लावला नाही. आज स्वतंत्र सेक्युलर राष्ट्र म्हणून जगताना उझबेकिस्तानच्या नव्या पिढ्या आधुनिक शिक्षण घेत आहेत. मदरसे बंद झाले आहेत, पण तो सांस्कृतिक ऐतिहासिक ठेवा जपला जातो आहेच, शिवाय पर्यटन व्यवसायाचा विचार करून त्यांचा व्यावसायिक वापरही केला जात आहे. काही मदरशांचं रूपांतर हॉटेल्समध्ये केलेलंही पाहिलं, तर अनेक मदरसे कलाकौशल्याच्या पर्यटकप्रिय वस्तूंच्या दुकानांनी सजले आहेत.

ताश्कंद हे राजधानीचं आधुनिक शहर. तरी इथे खास्त-इमाम कॉम्प्लेक्सचा देखणा परिसर, नीट राखलेली बुटकी झाडं, त्यातून जाणाऱ्या रेखीव वाटा आणि इमाम बुखारी यांची इन्स्टिट्यूट ऑफ इस्लामिक स्टडीज, तसंच सरकारी इमारती. इथेच ऑटोमन साम्राज्याचा पाया घालणारा खलिफा उस्मान उर्फ उत्थमानने नकलून काढलेली कुराणाची प्राचीन प्रत जपलेली आहे. ती तत्कालीन कुफीक लिपीत लिहिलेली आहे. कुफीक ही अरबी भाषेची लिपी. अरबी आणि फारसी-

उजबेकी माणसाच्या ताकदीचे प्रतीक : भूकंपाला रोखणारे दांपत्य... आणि मन शांतावणारे आरस्पानी तळे

उर्दूतली मुळाक्षरं काही मुळाक्षरांचा फरक सोडला तर समान आहेत. त्यामुळे आज अरबीसाठी वापरण्यात येणारी कुफीक ही उर्दू-फारसीच्या नस्तालिक लिपी वाचणाऱ्यांना परिचयाची वाटते. पण उत्थ्मानच्या काळातली ही कुफीक केवळ अनाकलनीय.

ज्या मशिदी मशीद म्हणून वापरात नाहीत, त्यांचं पावित्र्य जपलं जातंय; त्यांचं ऐतिहासिक अस्तित्व अभिमानाने कथन केलं जातंय ते सांस्कृतिक ठेवा जतन करण्याच्या सार्वत्रिक वृत्तीने. (आधुनिक शिक्षणातून हे शहाणपण मिळवू न शकलेल्या आपल्या देशात मात्र ऐतिहासिक स्थळांची दैना आठवून आणि त्या वास्तू पाडण्याची लगबग आठवून लाज वाटू लागली.) मुख्यतः लोकसंख्या मुस्लीम, काही थोडे ज्यू आणि नेस्टोरियन म्हणजे पौर्वात्य ख्रिश्चन. परंतु इथे सांप्रदायिक दंगे झालेले नाहीत असं ताश्कंदमधला गाइड जाकिद, खिवामधला मुराद, बुखारामधली दिलफ़ुज़ा यांनी अभिमानाने सांगितलं.

दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएत रशियाच्या राजवटीत साम्यवादी नास्तिक विचारसरणीच्या बोल्शेविकांनी आणि नंतर स्टॅलिनने उझबेकिस्तानच्या ऐतिहासिक अस्मितेला उद्ध्वस्त करून टाकलं होतं. इथला त्या वेळचा मुख्य धर्म इस्लाम. पण साम्यवादी राजवटीने धर्मावर बंदी आणली, बुरख्यावर बंदी घातली. देशाचं रशियनीकरण करताना तिथला नेता करीम याचं नाव करीमोव असं केलं. तशीच अनेक इस्लामी नावं रशियन धर्तीची करण्यात आली. सध्याच्या प्रेसिडेंटचं नाव आहे शौकत मिरझियेयोव. नाव इस्लामी आणि आडनावात रेंगाळलेला रशियन प्रभाव. रशियन राजवटीपायी उझबेक भाषा रशियन भाषेप्रमाणे सिरिलिक लिपीत लिहिली जाऊ लागली. पुढे १९८९ साली रशियाचे तुकडे पडून १९९१ साली उझबेकिस्तानची स्वतंत्र लोकशाही रिपब्लिक म्हणून स्थापना झाल्यानंतर पुन्हा धर्माचरण खुलेआम करता येऊ लागलं. पण स्त्रियांचा बुरखा, हिजाब गेला तो गेलाच. आज उझबेकिस्तानात स्त्रिया तिथले पारंपरिक कलाकौशल्याचे व्यवसाय सांभाळत आहेत; विद्यापीठांतून अध्यापन करत आहेत; अनेक आधुनिक व्यवसाय त्या करत आहेत. मुरादची आई शिक्षिका म्हणून निवृत्त झाली आहे आणि त्याची पत्नी इंग्रजीची प्राध्यापिका आहे. उझबेक अस्मिता जपण्यासाठी आताशा उझबेकांनी सिरिलिक लिपीचा वापर थांबवून रोमन लिपी अंगीकारली आहे. पण रशियन पर्वाचे फायदेही झाले. उझबेकिस्तान नव्या जगात प्रविष्ट झाला. शहरं आधुनिक झाली. युरोपप्रमाणेच स्वच्छ, सुंदर आखीव रस्ते, वाहनांसाठी स्वतंत्र प्रशस्त रस्ते, त्यांच्या दुतर्फा हिरवळीचे, फुलांच्या ताटव्यांनी सजलेले पट्टे आणि त्यापुढे मुख्य रस्त्याला समांतर जाणारे पादचाऱ्यांसाठीचे रुंद रस्ते. त्यानंतरच दुकानांच्या रांगा. मोठ्या शहरांत दोन-तीन किंवा फाइव्ह स्टार हॉटेल्सच्या सहा-सात मजली इमारती सोडल्या तर बैठी टुमदार घरंच अधिक. ताश्कंदमधल्या टीव्ही टॉवरवरून ताश्कंदचं विहंगम दर्शन घेताना हे फारच जाणवलं. त्या दृश्यात आकाशाला भोसकणारे आणि टीव्ही टॉवरला खुजे करून टाकणारे हायराइझ नव्हते. प्राचीन असोत की आधुनिक शहरांत स्वच्छता, नीटनेटकेपणा आणि तो जपण्याची मानसिकता अशी शिस्त

जनतेच्या आणि व्यवस्थेच्या अंगी बाणली. कलाकौशल्यांच्या वस्तूंचे बाजार हा पर्यटकांना आकर्षित करणारा इथला मोठा घटक. विशिष्ट प्रकारची भरतकामं केलेले कपडे, चादरी, पर्सेस, पिशव्या, कलाक नावाचे उझबेकिस्तानची ओळख सांगणारे स्त्रियांचे विशिष्ट गाऊन (हे गाऊन त्या आपल्या आधनिक पाश्चात्त्य पेहरावावर घालून तोऱ्यात फिरतात.), अक्रोडाच्या लाकडावर कोरीव काम केलेल्या वस्तू, नक्षीदार रंगवलेली चिनीमातीची भांडी, मिनिएचर पेंटिंग्ज अशा वस्तूंचे बाजार हे खिवा, बुखाराचं वैशिष्ट्य. ते अर्थात समरकंद, ताश्कंदमध्येही आढळतंच. पण हा बाजार बघून प्राचीन काळात फिरल्याचं समाधान मिळवायचं तर खिवा-बुखाराच्या बाजारातच गेलं पाहिजे.

ताश्कंदहून खिवाचं अंतर खूप आहे. फ्लाइट सोयीची नव्हती. त्यामुळे फ्लाइटने रात्री नुकुसला पोहोचून मुक्काम आणि मग तिथून खुष्कीच्या मार्गाने खिवाला पोहोचायचं होतं. नुकुस ही कराकल्पकस्तानची राजधानी. कराकल्पकस्तान हा उझबेकिस्तानचाच वायव्येकडचा भाग असला तरी ते उझबेक रिपब्लिकमधलं एक स्वायत्त रिपब्लिक आहे. म्हणजे ३७० कलम लागू होण्यापूर्वीचं काश्मीर आहे, तसंच काहीसं. कराकल्पक लोकांची संस्कृती उझबेक संस्कृतीहून अलग, भाषा अलग. एकेकाळी शेती आणि पशुपालनाचा मुख्य व्यवसाय असलेला कराकल्पकस्तान पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे आता वैराण होत चालला आहे. उत्तरेकडेच्या अरल समुद्रात आता पाण्याचा साठा जेमतेम एकचतुर्थांश उरला आहे. ती काळजी म्यूझियममधून दर्शवलेल्या नकाशांमधून स्पष्ट जाणवते आणि भिडते. तिथलं कराकल्पकस्तान म्यूझियम, सावित्स्की म्यूझियममधली रशियन अवाँ गार्द पेंटिंग्ज पाहून खिवाकडे कूच केलं. नुकुस ते खिवा आणि पुढे खिवा ते बुखारा हा

**एकेकाळी शेती आणि पशुपालनाचा मुख्य व्यवसाय असलेला कराकल्पकस्तान पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे आता वैराण होत चालला आहे. उत्तरेकडेच्या अरल समुद्रात आता पाण्याचा साठा जेमतेम एकचतुर्थांश उरला आहे. ती काळजी म्यूझियममधून दर्शवलेल्या नकाशांमधून स्पष्ट जाणवते आणि भिडते.**

सगळा प्रवास जवळ जवळ वाळवंटातल्या हायवेनेच होतो. वस्ती विरळ, वाटेत लागणाऱ्या गावांत बैठी घरं, काही घरांच्या अंगणात इग्लूच्या आकाराचे तंदूर. एखाददुसरं जरदाळूचं किंवा सफरचंदाचं झाड. एप्रिल महिना असल्यामुळे गुलाबी आणि पांढऱ्या फुलोऱ्याने वैराणात दिलासा देणारं. जिथे जिथे ओॲसिस आहे, थोडं पाणी आहे तिथे जरदाळू किंवा सफरचंदाच्या छोटेखानी बागाही होत्या. पण एकूण माहौल वैराण. अगदी खुरटी झुडपं म्हणजे हद्द. बहुतेक भागांत जमिनीलगत फक्त खुरटं गवत, तेही विरळ विरळ. झुडपांवरची पानं इतकी बारीक की निष्पर्ण काटक्याच दिसाव्यात. या वाटेवरच मधेच उंचवटे लागले. ती होती आर्किओलॉजिकल स्थळं. झोरोस्ट्रियन राजवटीतली, पारशी धर्माची दाखमा म्हणजे टॉवर ऑफ सायलेन्स! हायवेवर मधूनच एखादी टपरी, प्रवाशांच्या गरजेच्या वस्तू - पाण्याच्या, कोकाकोलाच्या बाटल्या, लेज वगैरेंची पाकिटं, सम्से विकणारी. पण हायवे असला तरी शहरातल्या टॉयलेटसारख्या आधुनिक सोयींपासून अजून जरा दूरच. ऐतिहासिक ख्वारिझ्म हा प्रांत कराकल्पकस्तानाचाच भाग. एकेकाळच्या अल्पकाळ टिकलेल्या ख्वारिझ्म राजवटीची खिवा ही राजधानी. त्यामुळे राजधानीचा डौल हे शहर वागवत आहे. वाळवंटी प्रदेश असला तरी इथेच अलजिब्राचा (बीजगणित) जन्मदाता अल ख्वारिझ्मीचा जन्म झाला आहे. इब्न सिना उर्फ अविसेना हा सुरुवातीच्या आधुनिक वैद्यकशस्त्राचा जनक; साहित्य, विज्ञान, गणित, तत्त्वज्ञान, विविध भाषांवर प्रभुत्व गाजवणारा, भारतावरच्या त्याच्या ग्रंथामुळे जगप्रसिद्ध असलेला अल बेरुनी जन्मलाय! अल बेरुनीचं तर जन्मस्थानच खिवा.

खिवाला पोहोचेतो संध्याकाळचं ऊन मवाळ झालं होतं. वाळवंटी रंगाची माती आणि गवत यांचा लेप असलेली पण आतून आधुनिक रुपडं आणि सोयी असलेली घरं, हॉटेल्स. फरसबंद अरुंद गल्ल्या, पण स्वच्छ. कुठे ना प्लास्टिक, ना कागदाचे बोळे. 'कला' अर्थात किला-किल्ला-प्राचीन किल्ल्यांच्या आत वसलेलं हे जिवंत, रसरसतं ऐतिहासिक शहर. युनेस्कोची साइट असल्याने ही ऐतिहासिक नगररचना जशीच्या तशी राखण्यात येते. तटबंदीच्या बाहेर आधुनिक खिवा आहेच. पण खिवा अनुभवायचं ते ह्या प्राचीन शहरात.

'वाळवंटात सफर करणाऱ्या अरबांच्या तांड्यांना जेव्हा अखेर एके ठिकाणी विहीर दिसली, तेव्हा "wow" अशा

अर्थाचा ''हेऽ वा'' असा आनंदोद्‌गार त्यांच्या तोंडून निघाला. तोच आनंदोद्‌गार तिथे वसलेल्या शहराला 'खिवा' हे नाव बहाल करता झाला' अशी सुरस आणि चमत्कारिक कथा सांगणारा मुराद खिवाच्या भटकंतीतला गाइड होता.

खिवामधलं वास्तुवैभव आहेच wow म्हणायला लावणारं. हे तटबंदीच्या आतलं शहर म्हणजे 'इचन कला'. (किल्ल्याचा आतला भाग.) बाहेरचा भाग म्हणजे 'दिशम कला'. निळ्या नक्षीने अंतर्बाह्य नटलेले मुहम्मद अमीनखान मदरसा, मुहम्मद रहीमखान मदरसा, कलता मिनार, जुमा मशीद, पखलवान (पहलवान) मखमूद (महमूद) मकबरा, इस्लाम खोजा मिनार हा खूप उंच मिनार. असं बरंच काही पाचएक तास सलग पायी फिरताना डोळ्यांनी आणि मनाने किती गोळा करायचं असं होऊन जातं.

थकल्यावर चायखान्यात वेगवेगळ्या फुला-फळा-पानांनी सिद्ध केलेला पारदर्शी किटलीतला चहा नक्षीदार बोलमध्ये पीत बसणं हा विलक्षण निवांत विसावा.

बुखारामध्ये लापिझ लाझुली ह्या निळ्या रत्नातून उगवलेलं हे निळं वैभव आणखी वेडावणारं होतं. बुखारा सिल्क रूटवरचं मोठं शहर. खिवा काय आणि बुखारा काय, प्राचीन काळची व्यापाराची केंद्रं, तशीच शिक्षणाचीही मोठी केंद्रं. त्यामुळे मदरशांची संख्या खूप. मदरशांतून मुख्यतः धार्मिक इस्लामी शिक्षण होत असे, त्याबरोबरच विज्ञान, गणित, तत्त्वज्ञान ह्या विषयांचंही अध्ययन-अध्यापन होत असे. पण विशेषतः धार्मिक शिक्षणामुळे मशीद आणि मदरसा ही जणू जुळी भावंडं असल्यासारख्या ह्या निळ्या नक्षीदार, भव्य तरी कमनीय इमारती हे या शहरांचं सर्वात मोठं वैशिष्ट्य ठरतं. वृत्तीतला मोकळेपणा असा की कुणीही मशिदीत ज्या मेहराबसमोर नमाज अदा केली जाते तिथपर्यंत पोहोचावं; तिथल्या आध्यात्मिक निळ्या शांतीचा अनुभव घ्यावा. भोवताली भिंतींवर निळ्या रंगातल्या नक्षीच्या जडवलेल्या टाइल्सच्या बरोबरीने कुराणातल्या आयत रेखलेल्या. चारी बाजूंनी ह्या कुफीक आणि नस्तालिक लिपीतही रेखलेल्या आयत ह्या आध्यात्मिक अनुभवाला आणखी गहिरं करतात. कारण इथे तुम्हाला कुणी तुमचा धर्म विचारत नाही. बाहेर बूट काढून आदरपूर्वक आत जा. हवे तिथले, हवे तेवढे फोटो काढा. समरकंदमध्ये ज्या दिवशी फिरत होतो तो दिवस नेमका शुक्रवार होता. शाखी (शाही) ज़िंदा नेक्रोपोलिसच्या प्रवेशद्वाराआतच मोठा लांब-रुंद ओटा. अर्थातच निळ्या टाइल्सनी सजलेला. तिथे अनेक जण खांबाला टेकून विसावले होते. दरीची बिछायत होतीच. समोरच्या बाकांवर आधीच काही पर्यटक स्त्रिया बसलेल्या होत्या. मी ओट्यावर बसलेल्या गृहस्थांची परवानगी घेऊन ओट्यावर टेकले. दुपारी एकच्या नमाज़ाची वेळ झाली. तसे नमाज़ी ओट्यावर जमू लागले. ओट्याच्या कडेवर बसावं की नाही या संभ्रमात मी. पण माझ्या शेजारीच ओट्यावर बसलेल्या नमाज़ीने हरकत घेतली नाही की इतर कुणी हरकत घेतली नाही. सगळे नमाज़मध्ये एकाग्र झालेले.

समरकंदमध्ये फक्त एकाच ठिकाणी मशिदीत प्रवेश करताना डोकं झाकायला स्कार्फ देण्यात आला आणि उत्थमानच्या कुराणाची प्रत पाहण्यासाठी गेलो असताना एकतर बूट काढून जाता आलं किंवा बुटांवरूनच घालायला प्लास्टिकच्या निळ्या पिशव्यांची सोय होती, ज्यायोगे आतल्या परिसराचं पावित्र्य अबाधित राहावं आणि पर्यटकांचीही गैरसोय होऊ नये.

भव्य मदरसे हेही असेच नटलेले. आत विद्यार्थ्यांसाठी चारही बाजूंनी मधल्या मोकळ्या चौकात उघडणाऱ्या खोल्या. समरकंदमधल्या रेगिस्तान स्क्वेअरचं वर्णन अरुण खोपकरांच्या 'प्राक्-सिनेमा' या पुस्तकाचा अनुवाद करताना मनात जे रुतलं होतं ते तिथून बाहेर पडायला तयारच नव्हतं. प्रत्यक्षात ह्या प्रशस्त मोकळ्या परिसरात पोहोचताच ते सारं अलीबाबाची गुहा उघडावी तसं सामोरं आलं. तीन भव्य मदरसे समोरासमोर. त्यांच्या घुमटांमधली वेगळी वैशिष्ट्यं, बुखारातला

हॉटेल समरकंद पुढचा अमीर तिमूरचा अश्वारुढ पुतळा...



प्रसिद्ध मिनार, हे सारं उभं करणारे स्थापत्यविशारद आणि त्यांना साथ देणारे असंख्य कारागीर, त्यांच्या कारागिरीतला नेमकेपणा, सौंदर्यदृष्टी, खोलवर दडलेला अर्थ केवढं तरी गूढ, तरीही खुलं भांडार ह्या तीन शहरांमधून समोर पसरलं होतं.

समरकंदमध्ये व्हॅलेंटिना ही आमची गाइड बीबीजानच्या मकबऱ्यासमोर घेऊन गेली. बीबीजान ही समरकंदच्या अखेरच्या अमिराची पहिली आणि लाडकी बेगम. तरीही एकदा अमीर तिला म्हणाला, 'मी तुला ह्या मनोऱ्यावरून ढकलून देईन. तू जिवंत राहिलीस तर त्याचा अर्थ तू माझ्याशी एकनिष्ठ आहेस. मेलीस तर...' ही कथा ऐकवून व्हॅलेंटिना पुढे तत्काळ म्हणाली, 'आय डोंट लाइक धिस स्टोरी. धिस इज इन्सल्ट टू वूमनहूड.' मी मनातल्या मनात तिला सलाम केला. तेवढ्यात ती पुढे म्हणाली, 'पण अमिराची आवडती बेगम म्हणून तिचं स्मारक महत्त्वाचं नाही. तिने तिच्या काळात सामान्य स्त्रियांच्या शिक्षणासाठी मदरसा स्थापन केला यासाठी तिचं महत्त्व आहे.' व्हॅलेंटिनाला आणखी एक सलाम!

त्याआधी बुखारामध्ये अमिराचा जनानखाना दाखवताना जनानखान्याच्या सुरस, धक्कादायक कथा दिलफुझाने ऐकवल्या होत्याच. इतक्या रंगारंग प्राचीन वास्तुवैभवाला सुरस कथांनी नटवलं नसतं तरच आश्चर्य.

एका मिनारापाशी व्हॅलेंटिनाने आमची चक्क विकेट घेतली होती. त्या मिनारचं वर्णन करता करताच तिने विचारलं, 'जगातला सर्वात पहिला उंच टॉवर कोणता?' आम्ही मनातल्या मनात जगातल्या टॉवर्सचा धांडोळा घेत राहिलो. आम्हाला निरुत्तर झालेलं पाहून ती म्हणाली, 'शेम ऑन यू. इट इज कुतुबमिनार!' खरंच खजील होण्याशिवाय आमच्यापुढे काही पर्याय नव्हता.

बुखारात उलूगबेग, अब्दुल अजीज खान यांनी उभारलेले मदरसे, ह्या नक्षीदार भव्य इमारतींच्या सान्निध्यातच लाबी हौज सरोवर, त्याच्या काठाकाठाने मांडलेल्या टेबलांवर खात-पीत बसलेले पर्यटक, रात्री सरोवरात उडणारी कारंजी आणि पोहणारे हंस आणि अशा वातावरणात आणखीनच रंगत जाणारं रेस्टॉरंट. बुखारात इमारतीच्या भिंतींच्या रचनेतही वैविध्य पाहायला मिळतं. कुराणातल्या आयतांच्या कॅलीग्राफीने, निळ्या पाना-फुलांच्या नक्षीने सजलेल्या भिंती तर सर्वत्र आहेत. भौमितिक आकार हा आणखी एका शैलीचा आविष्कार. अनलंकृत पण विटांची उभी-आडवी, तिरकी-गोलाकार रचना करून बांधलेली इमारत हे वास्तुकल्पकतेचं उदाहरण म्हणून लक्षात राहावं. झोरोस्ट्रियन, यहुदी, मुस्लीम धर्माच्या शैलींचं संमेलन भरावं तशाही काही इमारती भासतात. वेळोवेळी डागडुजी करून आजही व्यवस्थित राखलेल्या ह्या इमारती आपल्या अंगावर काळाचेही विविध टप्पे अभिमानाने आणि सर्वसमावेशक भावनेने मिरवताना दिसतात. त्याचं श्रेय विसाव्या शतकातल्या रशियन राजवटीलाही द्यावंच लागेल. चश्म अयूब मकबरा हे ह्याचं एक महत्त्वाचं उदाहरण.

बुखाराच्या अखेरच्या अमिराच्या समर हाऊसमध्ये पौर्वात्य आणि रशियन वास्तुकलेचा संगमही पाहायला मिळतो. सिटाडेल ह्या किल्ल्याची माती आणि गवताच्या मिश्रणातून केलेली उतरती तटबंदी, आतून दूरवर दिसणारे जुने अवशेष आणि नवं आधुनिक शहरही.

**रेगिस्तान**

बुखाराहून समरकंदच्या दिशेने निघताना वाटेत एक रात्र वाळवंटातल्या 'युर्ट'मधल्या वास्तव्याचा अनुभव घेतला. ह्या युर्ट कँपमध्ये मात्र आधुनिक सोयी होत्या. रात्री इतर युरोपियन-अमेरिकन पर्यटकांबरोबर कँप फायर, उझबेकी गाण्यावर धुंद होऊन ज्याने त्याने हवं तसं शेकोटीभोवती नाचावं. अनोळखी माणसांच्या समूहात आपल्या आतले संकोचही कसे गळून पडतात, नाही? नाही म्हणायला उंटाची सवारी हा एक अनुभव. पाठीवर दोन मदारी असलेले स्थितप्रज्ञ मुद्रेचे उंट आणि वाळवंटातही फुललेली लाल आणि क्वचित कुठे जांभळी गवतफुलं. बाकी सगळी खुरटी झुडपं. ह्या रखरखाटातही जेवण, नाष्टा, चहा वगैरेंचा थाटमाट उझबेकी आतिथ्याची साक्ष देत होता. त्यामुळेच वाळवंटातल्या तंबूतलं जीवन अनुभवताना वाळवंटातलं खडतर जगणं नव्हे, तर पिकनिकचाच फील आला.

नुराता शहराजवळचं आयदार सरोवर हे वाळवंटातलं नवल - ओॲसिस. अमूदर्या नदीचं पाणी ह्या विशाल सरोवरात येतं. पिकनिक स्पॉट आहे हा.

**अमीर तिमूर... मुल्ला नसरुद्दीन... लालबहादूर शास्त्री...**

ताश्कंदमध्ये अमीर तिमूर चौक आहे. चौक कसला, भलंमोठं सर्कल आहे ते. पण उझबेक लोक त्याला तिमूर







खिवा, युर्ट आणि मदरसे...

स्केअरच म्हणतात. वाहत्या शहराच्या मधोमध सुंदर राखलेला बगीचा, त्यातून आरपार जाणाऱ्या फरसबंद वाटांनी जाणारे-येणारे रहिवासी, रेंगाळणारे विद्यापीठातले विद्यार्थी असं प्रसन्न दृश्य आणि मधोमध अमीर तिमूरचा दिमाखदार, अश्वारूढ पुतळा. अमीर तिमूर म्हणजे तैमूरलंग - तैमूर द लेम - हा योद्धा, सेनानी, उझबेकिस्तानचा इतिहासपुरुष, राष्ट्रीय पुरुष म्हणून अभिमानाने मिरवला जातो. पुतळे उझबेकिस्तानात मोजकेच आहेत; भव्यही आहेत, पण हव्यास व्यक्त होईल एवढे भव्य नाहीत. सौंदर्यदृष्टी आणि जनजीवनाचं भान राखून उभारलेले. उदाहरणार्थ, १९६६ साली झालेल्या विनाशकारी भूकंपाची आठवण जागवणारं ब्राँझमधलं शिल्प. भूकंपाचं नेमकं एपिसेंटर दाखवणारा तडा गेलेला चौथरा आहे, तिथून जमिनीला दूरवर गेलेला तडा दगडात कोरलेला आहे. तो तडा ज्या दिशेला जातो, तिथे ब्राँझमधलं एका सामान्य जोडप्याचं भव्य शिल्प उभारलंय. धरणीला दुभंगण्यापासून रोखू पाहणाऱ्या तरुण जोडप्याचं शिल्प आहे ते. पतीच्या मागे उभी राहून त्याच्याबरोबरीने दुभंगाला रोखू पाहणाऱ्या पत्नीच्या कडेवर निवांत झोपलेलं बाळही आहे. भूकंपाच्या संकटावर मात करून पुन्हा शहर नव्याने उभ्या करणाऱ्या सामान्य जनतेचं ते प्रतीक आहे. भोवताली सामान्य जनतेने शहराची पुन:उभारणी करण्यासाठी घेतलेल्या कष्टांची भित्तिशिल्पं आहेत. राखलेली बाग आहे आणि भोवताली शहरातले वाहते रस्ते, शिस्तीत चालणाऱ्या तुरळक रहदारीचे.

खिवामधले मोजकेच पुतळे तर सामान्य जीवनाचा उत्सव करणारेच आहेत. संध्याकाळी बाजारातून फिरता फिरता थोडं विसावायला चौकातल्या मोकळ्या प्रशस्त ओट्यावर छोट्या झाडाखाली येऊन बसता येतं. झाडं इथे छोटीच होती. कारण परिसर वाळवंटाचा. खिवा आणि बुखारात मोठे वृक्ष नाहीत. झाडांची पानंही अगदी इटुकली पिटुकली. रुंद पानं कुठे बघायला मिळत नाहीत. ओट्यावर समोरच एक सुंदर तरुणी नृत्य करत होती. तिच्या समोर तिला साथ करणारा वादक आणि त्या वादकाचा गाल फुगवून ताल धरणारा किशोरवयीन साथीदार. संध्याकाळच्या उतरत्या उन्हाने नृत्यांगनेच्या नृत्यमुद्रेला छानशी सोनेरी कडा रेखली होती. हळूहळू उन्हं उतरू लागली, अंधारलं आणि मऊ प्रकाशाचे दिवे लागू लागले. तिच्या मागच्याच बाजूकडे लागलेल्या दिव्याने पुन्हा एक नवं रूप तिच्या कमनीय नृत्यमुद्रेला दिलं. मला उगीचच चाळीस चोरांच्या सरदाराला रिझवणाऱ्या मर्जिनाची आठवण झाली. येणारे-जाणारे पर्यटक, त्यातली मुलं, स्त्रिया ओट्यावरचं हे दृश्य बघून ओट्यावर चढत होती; मर्जिनाचीच पोझ घेऊन तिच्या शेजारी उभं राहून फोटो काढत होती. कारण नृत्य करणारी मर्जिना ब्राँझमध्ये कोरलेली होती. प्रकाशाचा खेळ तिच्या नृत्याला गती देत होता.

दुसऱ्या एका चौकात झाडाच्या आडव्या फांदीवर दोन मित्र बसले होते. दोघांच्या हातात टरबुजाची एकेक फाक. गप्पा मारत खात होते. त्यातल्या एकाच्या डोक्यावर फरची भलीमोठी गोल रशियन टोपी आणि तोंडात टरबुजाचा रस भरल्याने गाल फुगलेले. असा तो फारच गोलमटोल चेहऱ्याचा

मित्र आणि त्याचं समाधान पाहत समाधानी होत त्याच्याशी बोलण्यात गर्क असल्यामुळे टरबूज खायचं विसरलेला त्याचा मित्र. आणखी एके ठिकाणी आढळले ते हास्यविनोदाचा अड्डा जमवून चहापान करणारे दोन वृद्ध मित्र.

सामान्यांच्या जगण्याचं मोल हे पुतळे टिपत होते. शतकानुशतकांच्या राजकीय उलथापालथीतही इथे सामान्यांच्या जगण्यातला रंग, त्यातलं हास्य जपलेलं जाणवतं. बुखारामधला ख्वाजा नसरुद्दीनचा गर्दभारूढ हसरा पुतळा ह्याचं उत्तम उदाहरण. ख्वाजा किंवा मुल्ला नसरुद्दीनच्या कथा अनेकांनी वाचलेल्या असतील. मुल्ला नसरुद्दीन हा रॉबिनहूडचाच अवतार, रॉबिनहूडने माजोर्ड्या श्रीमंतांना हिंसेने धडा शिकवला. मुल्ला नसरुद्दीन ते काम विनोदाने साधायचा. त्याचं गाढव हा त्याचा साथीदार. गाढवाशिवाय मुल्ला नसरुद्दीनची कल्पनाच करता येणार नाही.

ताश्कंदमध्ये ज़ाकिदने लालबहादूर शास्त्रींची भावुक आठवण काढली होती. १९६६ साली ज्या ताश्कंद हॉटेलमध्ये त्यांचं दुर्दैवी निधन झालं ते हॉटेल दाखवलं. त्याचं नाव आता हॉटेल लोटे असं झालंय. जाकिदच्या स्वरातून उझबेकिस्तानला शास्त्रीजींच्या निधनाबद्दल वाटत असलेली हळहळ जाणवली होती. खिवा-बुखारा-समरकंदहून ताश्कंदला परतल्यावर आमच्या साधारण चाळिशीच्या ड्रायव्हरने आणखी चकित करणाऱ्या दोन गोष्टी दाखवल्या. लालबहादूर शास्त्रींचा अर्धपुतळा आणि शास्त्रींच्या नावे असलेला शास्त्री स्ट्रीट. शास्त्रीजींच्या नावाची शाळादेखील तिथे चालते आणि तिथे हिंदी विषय शिकवला जातो. सेंटर फॉर इंडियन स्टडीज ही संस्था म्हणजे शास्त्रीजींचं ताश्कंदमधलं आणखी एक जिवंत स्मारक. १९६६ साली रशियाचा भाग असलेल्या आणि आज स्वतंत्र असलेल्या उझबेकिस्तानातल्या आजच्या तरुण पिढीच्या लेखीही शास्त्रीजी भूतकाळात गेलेले नाहीत.

उझबेकिस्तानात मोजकेच पुतळे आहेत आणि ते शहराचं सौंदर्यच वाढवतात असं नाही तर देशाच्या, देशवासीयांच्या आस्थेचा पुरावाही देतात. एकाही पुतळ्यावर पक्ष्यांनी आपलं नक्षीकाम केलेलं नाही आणि व्यवस्थेने ते स्वच्छ, सुस्थितीत राखण्याचं आपलं काम चोख केलेलं दिसतं.

**बाजार**

उझबेकिस्तानातली खिवा, बुखारा, समरकंद इत्यादी प्राचीन शहरं ही सिल्क रूटवरची शहरं. व्यापार हे प्राचीन काळापासूनच इथलं प्रमुख घटित. व्यापाऱ्यांचे तांडे वाळवंटातला आव्हानात्मक प्रवास करत सतत पार चीनपासून ते इस्तंबूलपर्यंत या मार्गांनी फिरत आले. त्यामुळे बाजार हा घटक ह्या सर्व शहरांचा आत्माच आहे असं म्हटलं तरी हरकत नाही. वैशिष्ट्यपूर्ण बाजाराची ती परंपरा आजही खिवा-बुखाराच्या ऐतिहासिक शहरांमध्ये अनुभवता येते. अक्रोडाच्या लाकडावरचं कोरीव काम केलेल्या वापराच्या आणि शोभेच्याही वस्तू, कापडावरचे भरतकामाचे वैशिष्ट्यपूर्ण नमुने, त्यांनी सजलेल्या चादरी, अभ्रे, पिशव्या, पर्सेस, लापिझ लाझुलीसारख्या रंगीत खड्यांना चांदीत बसवून तयार केलेले दागिने, पश्मिन्याचे स्कार्फ, शाली, कलाक नावाचे खास उझबेकिस्तानची ओळख सांगणाऱ्या बोल्ड प्रिंटचे स्त्रियांनी आपल्या पोशाखावरून नुसते घालण्याचे गाऊन, कडाक्याच्या हिवाळ्याला तोंड देण्यासाठी असलेल्या फरच्या भल्यामोठ्या, माणसाचा चेहराच बदलून टाकणाऱ्या गोल रशियन टोप्या, निळ्या, काळ्या, सोनेरी, हिरव्या रंगांच्या विशिष्ट शैलीतल्या नक्षीने नटलेली चिनीमातीची भांडी, मिनिएचर पेंटिंग्ज असा सगळा उझबेकिस्तानचं व्यक्तिमत्त्वच ठसवणारा ऐवज ह्या ऐतिहासिक शहराच्या फरसबंद, स्वच्छ सुंदर रस्त्यांच्या कडेला, चौकातल्या मोक्याच्या ओट्यांवर आणि अर्थातच खास बाजारासाठीच बांधलेल्या घुमटाखाली बाजाराचं रूप रंगीबेरंगी, शोभिवंत करून सोडतो. घुमट आणि छत असलेला खास बाजाराचा परिसर ही मध्ययुगीन मुस्लीम राजवटींमधील बाजाराची परंपरादेखील इथे अनुभवायला मिळते. मुगल राजवटीत लाल किल्ल्यात 'मीना बाजार' भरायचा. त्याचे उल्लेख अनेकदा वाचनात आलेले आहेत, त्यांची आठवण होते. विक्रेत्यांची मोठी संख्या स्त्रियांची. आता सक्रिय नसलेले, पण पर्यटन स्थळं म्हणून राखलेले मदरसेदेखील ह्या बाजाराचा भाग बनतात. एकेकाळच्या विद्यार्थ्यांना राहण्यासाठी असलेल्या पण आता रिकाम्या असलेल्या खोल्याखोल्यांतून अशी कलाकुसरीच्या वस्तूंची दुकानं सजलेली आहेतच. ह्या दुकानांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्वतः कारागीरच हे दुकानदार असतात. दुकान चालवता चालवता कारागिरीची कामंही चालू असतात. पर्यटक डोकावला, चौकसपणे त्याने ती कारागिरी पाहायची इच्छा दर्शवली की हे कारागीर उत्साहाने आणि अगत्याने त्याला संपूर्ण प्रक्रिया समजावून, प्रात्यक्षिक




अवाढव्य नि अद्‌भुत चोरसु बझार

करून दाखवतात. त्यानंतर भले पर्यटक वस्तू विकत घेवो की न घेवो. त्यांच्या उत्साहात, अगत्यात फरक पडत नाही. पर्यटकांनी यावं, कारागिरी पाहावी, वस्तू घ्यायची असेल तर घासाघीस करावी, सौदा पटला तर घ्यावी. दुकानासमोरून विंडो शॉपिंग करत चाललेल्या पर्यटक-गिऱ्हाइकाला खेचून, पकडून आपल्याच दुकानाकडे वळवण्याच्या अवाजवी स्पर्धा इथे कोणीच करताना दिसले नाहीत. त्यामुळे बाजारात एकूण चहलपहल असली तरी ध्वनिप्रदूषण नाही. गर्दीची धक्काबुक्की नाही. थुंकी, पानाची पिंक इत्यादी घाण आणि कचरा ओलांडत, उड्या मारत, धक्के चुकवत फिरायची गरज नाही. कारण असलं काही इथे नाही. शहराच्या आधुनिक भागातले बाजारही आधुनिक युगाची साक्ष देणारे. तरीही ह्या शिस्तीचं प्रत्यंतर देणारे.


ताश्कंदमधला चोरसु बाजार हा भला मोठा सर्ववस्तुसमावेशक बाजार हे ताश्कंदचं भूषण आहे. घुमट आणि छताखालच्या ह्या बाजारात वेगवेगळ्या मालाचे वेगवेगळे असंख्य विभाग आहेत. नान-ब्रेड-कन्फेक्शनरीचा खरपूस खमंग विभाग, मसाल्यांचा विभाग, त्यात चहाच्या मसाल्यांचेच उपविभाग, चिकन, अंडी, मटण, बीफ विभाग, मिठाया, धान्य-पिठं, कपडे, पादत्राणं, भाज्या-फळं, सुका मेवा, पॉटरी - थोडक्यात, रोजच्या वापरातल्या सर्व जीवनावश्यक वस्तू एका छताखाली मिळणाऱ्या ह्या बाजारात आठवड्याभराची खरेदी करायला अख्खं ताश्कंद लोटतं. मसाल्यांच्या दुकानांत पोत्यात धान्य मांडून ठेवतात, तशा वाळवलेल्या फुलांच्या राशी होत्या. त्यात मोगऱ्याच्या कळ्या होत्या, बटण शेवंती होती, सुपारीची फुलं होती आणि अनेक प्रकारच्या आल्यासारख्या जडीबुटी, पानं - हा चहाचा मसाला. एप्रिलमध्ये फळांच्या दुकानांत हिरव्या-कच्च्या जरदाळूंचा हंगाम होता. पण गर्दी-गोंधळ म्हणून आढळला नाही. भाज्या-फळांच्या, मांसाहाराच्या विभागात सतत स्वच्छता राखली जात असणार. ती राखली जातानाही दिसत होती. सडलेल्या भाज्यांचे अवशेष आणि त्यांची दुर्गंधी नसलेला भाजी बाजार हे नवलच होतं. समरकंदमध्ये फिरताना गाइड व्हॅलेंटिना मधेच म्हणाली, 'आता आपण सियॉब बाजारातून लवकर लवकर पुढे जाऊ. कारण आता सहानंतर तिथे प्रचंड गर्दी होईल.' तरी सहा वाजलेच. सियॉब बाजार ताश्कंदच्या चोरसु बाजारासारखाच. त्यामुळे तिथे फार रेंगाळणारही नव्हतो. पण व्हॅलेंटिनाने सांगितली तेवढी गर्दी काही भासली नाही. आरामात बाजाराबाहेर पडता आलं. मनात आलं, हिला दादर मार्केटमध्ये सोडायला हवं. सहाच काय कोणत्याही वेळेला शिरून, फिरून आणि बाहेर येऊन दाखव. असो.

ताश्कंदच्या चोरसु बाजारात रेंगाळण्याचं आणखी एक कारण म्हणजे तंदूरमध्ये नान भाजण्याची ती सारी प्रक्रिया पाहणं खूप मनोरंजक होतं. नानच्या दुकानांच्या विभागाला लागूनच तंदूरमध्ये नान भाजण्याचा 'कारखाना'ही चालू होता. टेबलावर लाटलेले भलेमोठे नान भल्यामोठ्या तंदूरमध्ये भराभर चिकटवण्याचं आणि भाजलेले नान काढून घेण्याचं काम पुरुषांचं. ते विकण्याचं काम स्त्रिया करतात. स्त्रियांना तंदूरच्या आगीपासून सुरक्षित ठेवलं जातं! त्यामुळे स्त्रिया फक्त 'चूल (मूल)' यात अडकत नसाव्यात!

**(पुढील मजकूर पृष्ठ क्र. २४४ वर)**


अंतरिचा ज्ञानदीप वाचनाने पेटवूया ।
सारा आसमंत ज्ञानप्रकाशाने उजळूया ।।
मनोविकास प्रकाशन
मागोवा बदलत्या राष्ट्रवादाचा, सांस्कृतिक संघर्षाचा आणि भारतीयतेचा
बदलता भारत
संपादक - दत्ता देसाई
द इंडियन्स
संपादन : गणेश देवी, टोनी जोसेफ व रवी कोरीसेट्टर
तुरुंगवास भोगलेल्या एका भूतपूर्व IPS अधिकाऱ्याची डायरी
तुरुंगरंग
ॲड.रवींद्रनाथ पाटील
शोध प्राचीन हेरगिरीचा
वरुण ते बहिर्जी
रवि आमले
समास
संपादन- डॉ. गणेश देवी, डॉ. प्रमोद मनुघाटे
मराठीतील विवेकनिष्ठ साहित्याचे प्रातिनिधीक कवडसे
दूरदर्शी आंबेडकर
अनुराग भास्कर
अनुवाद - सविता दामले
भारतीय राज्यघटनाविषयक चर्चेला आकार देणाऱ्या संकल्पनांचा अभ्यासपूर्ण वेध
सत्तेकडून सत्याकडे
सुरेश द्वादशीवार
धर्मसत्ता । राजसत्ता
अर्थसत्ता । लोकसत्ता
मान्सून:जन-गण-मन
सुनील तांबे
समाजशास्त्रीय अंगाने मान्सूनचा घेतलेला वेध
चाहूर
समीर गायकवाड
हुरहुर लावणाऱ्या आणि काहूर माजवणाऱ्या आभाळमायेच्या काळीज खुणा
राजे फिरस्ते आणि व्यापाऱ्यांचे तांडे यांनी घडवलेली
भारतीय भाषांची अनोखी कहाणी
अनुवाद- मेघना भुस्कुटे
सर्व वाचक, विक्रेते आणि हितचिंतकांना दीपावलीच्या मन:पूर्वक शुभेच्छा !!
30% सवलत
DHAMAKA 30
सवलतीसाठी कोड वापरा
www.manovikashrakashan.com
किंवा 8888550837 वरून पुस्तके खरेदी करा!
(किमान खरेदी १००० रुपये.। योजना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत)

# शून्य शिखर पर झालर झलके...



स्वप्निल गणेश कुलकर्णी

संवादोत्सव २०२५





**निसर्गात भटकंती करणारे असंख्य असतात. पर्वतारोहणाचा नादही असंख्यांना असतो. पण फारच थोड्यांपर्यंत निसर्गाची नेमकी हाक पोहोचते. संत कबीर ज्याचा उल्लेख शून्यशिखर असा करतात, त्या उंचीपर्यंतच्या चढाईतले मर्म आकळते. अशाच फार थोड्यांना रोजचे पाश तोडून निसर्गाशी आत्मीय संवाद साधायचा असतो. निसर्गाशी एकरूप होता होता आत्मशोधाचीही वाट चालून पाहायची असते. नवतरुण साहसवीराने भटकंतीतून, गिर्यारोहणातून आत्मबळाची परीक्षा घेत, निसर्गाची वाट चालताना आलेल्या समृद्ध अनुभवांना दिलेले हे शब्दरूप...**

ही हू डज नॉट ट्रॅव्हल, हू डज नॉट रिड,
हू डज नॉट फाइंड ग्रेस इन हिमसेल्फ, डाइज स्लोली

इंडियन फॉरेस्ट सर्विसच्या परीक्षेचा अभ्यास करता करता ६००० मीटर उंचीचे शिखर सर करण्याचे स्वप्न मनाला साद घालत होते. त्यामुळे वेळ मिळेल तेव्हा अभ्यासापेक्षाही अधिक आत्मीयतेने शोध सुरू केला. अल्पायिन स्टाइलमध्ये स्वबळावर मोहीम कशी हाती घेता येईल, यावर अधिक भर होता. त्यातही कमीतकमी खर्चात सगळे जुळवून आणायचे होते. याआधी बरेच ट्रेक स्वतःहून पूर्ण केले होते, मात्र सेमी-टेक्निकल श्रेणीचा आणि इतक्या उंचीचा हा पहिलाच अनुभव असणार होता. परीक्षा संपताच मुंबईहून रेल्वेने चंदीगड, पुढे बसने मनाली, तिथून शेअर टॅक्सीने लेह असा २५०० कि.मी.चा प्रवास पार पडला. लेहमध्ये साधनसामग्रीची जमवाजमाव केली. शरीराने वातावरणाशी जुळवून घेतले आणि बेस कँपच्या दिशेने रवाना झालो.

मार्खा व्हॅलीच्या दिशेने ३० किलोच्या बॅगा डोलवत मोहिमेला सुरुवात झाली. तेव्हा लेह हे उंचीवर असलेले एक अद्‌भुत वाळवंट आहे, याचा प्रत्यय पदोपदी येत होता. नजर जाईल तिथवर दिलखेचक डोंगररांगा वेड लावत होत्या. त्या भव्यतेच्या पार्श्वभूमीवर आपल्या अस्तित्वाची सूक्ष्मता अधिक ठळकपणे अधोरेखित होत होती.

हिरवीगार शेती, दगडी घरे, रंगीबेरंगी फडफडणाऱ्या ध्वजपताका, एका आवेगाने खळखळत वाहणारी नदी यांनी नटलेला मार्खा गाव १२,००० फुटांवर आपली वेगळीच छबी टिकवून जगाच्या नजरेआड शांततेत नांदत होता. त्या वेळी हाडे गोठवणाऱ्या थंडीत हान्ले येथे पाहिलेली आकाशगंगा आजही मनावर कोरली आहे. तो क्षण एखाद्या टीपकागदासारखा जितके काही टिपता येईल तितके टिपून, साठवून घेत होतो. दुसऱ्या दिवशी हान्लेवरून कारू लेक असा प्लॅन होता. टीममध्ये दोन लोकांच्या भरतीमुळे मोहिमेला नकळत वेग आला होता. हा वेग नकोसा वाटत होता. मात्र परमिट त्यांच्या नावावर असल्यामुळे त्या डेडलाइनला धरून चालणे अनिवार्य होते.

**आव्हान कोसळे धबाधबा**

जागतिक सरासरीपेक्षा हिमालयीन प्रदेशांत तापमान वाढ अधिक प्रकर्षाने होत आहे. म्हणूनच ३५ डिग्री तापमानात चालणे जिवावर येत होते. पाठीवर विचित्रसे वजन जाणवत होते. त्यात माझ्या दोन्ही पायांना मोठे मोठे फोड आलेले. अशा अवस्थेत दुपारी १ वाजता कारू लेक गाठले. कँप इथे सेटअप करायचा असे आधी ठरले होते. मात्र थोडी रेकी केल्यावर जाणवले की इथल्या तलावाचे पाणी पिण्यायोग्य नाही. पाण्यामध्ये हिमपर्वतावरून वाहून आलेली बारीक वाळू दिसत होती. मग काय? वेगवेगळ्या पद्धतीने पाणी शुद्ध कसे करता येईल, यावर विचारमंथन सुरू झाले. टीशर्टने फिल्टर करायचा प्रयत्न केला. बाटलीमध्ये फर्न, छोटे दगड, मोठे दगड टाकून गाळण तयार केले. मात्र काहीच यशस्वी होत नव्हते. येताना रस्त्यात विश्रांती घेत असताना जड बॅगेसोबत कुठेतरी बसलो, तेव्हा माझी दीड लिटरची बाटली वाटेत कधी पडली, हे कळलेच नाही. कोणाकडेच पाणी शिल्लक नव्हते. पु. ल. देशपांडेंच्या 'असा मी असामी' मधला नायक रणरणत्या उन्हात हवा असलेला पत्ता शोधताना म्हणतो, तशी रामराया जन्मल्याची तळतळत्या उन्हाची ही वेळ, उंची १४,५०० फूट, त्यात ऑक्सिजनचा कमालीचा विरळपणा आणि याचमुळे सोबत असलेल्या सगळ्यांचा पारा चढलेला. मी जराही चालण्याच्या अवस्थेत नव्हतो. आधीच फोडांमुळे ठणकणारे दोन्ही पाय गर्मीमुळे वेदनेत अधिकच भर घालत होते. काय करायचं, यावर बोलणं चाललेलं असतानाच अचानक एक जण बॅग उचलून चालू लागला. म्हणाला, ''पुढच्या कँप साइटला जाण्याशिवाय काहीच पर्याय नाही.'' मला त्या क्षणी चालणे खरेच शक्य नव्हते. बाकी दोघेही त्याच्यामागे चालू लागले. मी शांतपणे त्यांना इशारा केला की ऊन कमी होताच, मीही येईन तुमच्यापर्यंत.

अशा खडतर मोहिमेत एखाद्या साथीदाराला एकटे मागे सोडून जाणे किती योग्य, हा वेगळ्या चर्चेचा विषय असू शकतो. मात्र गिर्यारोहण हे मुळातच स्वार्थी आव्हान. आयुष्यासारखेच. स्वार्थ आणि निःस्वार्थ यातला समतोल ज्याला राखता आला, तो खऱ्या अर्थाने समृद्ध. त्यामुळे कोण योग्य आणि कोण चुकीचे हा सारा दृष्टिकोणाचा खेळ.

उन्हापासून बचाव करण्यासाठी एका छोट्या झोपडीत मी निवान्त बसलो होतो, तेवढ्यात काही इस्रायली ट्रेकर्स तिथे विश्रांती घ्यायला आले. ते वेगळ्या दिशेला जात होते. काळजीने म्हणू लागले, ''आमच्या सोबत चल आमच्याकडे



अनंताची ओढ लावणारी हिमशिखरे

पाणी आहे. आम्ही शेअर करू.'' आतापर्यंत तहानेने घशाला कोरड पडलेली. बाहेर डोकावून पाहिले, तर उन्हाची तीव्रता तशी कमी झालेली. जवळपास दीड-दोन तास उलटून गेले असावेत. मी नम्रपणे नकार दिला. कारण मित्रांना मी सांगितले होते, 'मी पोहोचेन तुमच्यापर्यंत.' संकोचूनच पुढे केलेल्या बाटलीतून एक घोट पाणी प्यायलो आणि चालू लागलो.

**आनंदाचे रंग, आनंद तरंग...**

प्रत्येक पावलात वेदना आणि आजूबाजूला पसरलेल्या मृत प्राण्यांचे सापळे पाहून मनात नकारात्मक विचार घर करू लागलेले. त्या अवस्थेत एक व्हिडिओही रेकॉर्ड केला; ज्यात मी सुखरूप पुढच्या कँपपर्यंत पोहोचेन की नाही याची शाश्वती वाटत नव्हती. विरोधाभास असा की बाजूने खळखळते झरे वाहत होते. मात्र त्यातले पाणी पिण्यायोग्य नव्हते. मन शांत ठेवून निमूटपणे रस्ता शोधू लागलो. अल्बर्ट काम्यूचे वाक्य "there is pleasure in suffering" आत घुमत होते. जवळपास तास-दीड तास चालल्यावर एक पिका (सशाच्या जातीतला एक लहान प्राणी) दिसला. तो उड्या मारत मारत डावीकडे पळाला. कोणास ठाऊक का? मला वाटले की त्याच्यामागे जाऊन फोटो काढावा. काही क्षणातच पिका दिसेनासा झाला. मात्र मला एक कापलेल्या बाटलीचे तोंड बारीकशा धारेमध्ये खोचलेले दिसले. मी धावत तिथे गेलो. पाणी दिसायला अगदी स्वच्छ आणि निर्मळ. मुख्य झऱ्यातून एक छोटीशी धार गवतातून, दगडातून वाहताना नैसर्गिक पद्धतीने गाळण होत होती. सुटकेचा निःश्वास टाकत मी सगळ्या बाटल्या आणि वॉटर ब्लाडर भरून घेतले. याआधी पाणी पिण्यासारखी साधी गोष्ट इतकी आनंददायी असू शकते, याची कल्पनाच केली नव्हती.

आता पाणी सापडल्यावर सारा दृष्टिकोणच बदलून गेलेला. मनात विचार येऊन गेला की पाणी इथे असताना इथेच का नाही थांबले सगळे? पुढचा विचार हा होता की माझ्याकडे टेंट आहे, जेवण आहे, स्टोव्ह आहे आणि पाणीही आहे, मग मी का थांबू नये? पण पुन्हा तेच दिलेले वचन आठवले, की ''पोहोचेन तुमच्यापर्यंत.'' एकमेकाशी संकेत साधण्याचे

जवळ काही साधन नव्हते आणि त्यांना चिंतेत टाकण्याचा माझा हेतूही नव्हता.

आता मी अगदी खोलवर शांत झालो. कुठेच पोहोचायची घाई नव्हती. डाव्या बाजूला सोबत असलेली माझी सावली आणि चहूबाजूंना पसरलेला एकांत प्रवासाला अक्षरशः एका उंचीवर नेत होता. त्या संध्याकाळी झालेला सूर्यास्त अद्‌भुत होता. कांगयात्से पर्वताच्या मागे एखाद्या रेनेसान्स पेंटिंगसारखी रंगाची उधळण झालेली. त्या संधिप्रकाशात किशोरीताईंचा यमन ऐकण्याची तीव्र इच्छा झालेली आठवते. 'तोसे नेहा लागे' या बंदिशीच्या गुंगीत अंधार कधी दाटून आला जाणवलेच नाही. मी निमूटपणे हेड टॉर्च लावून चालत राहिलो. बाजूने वाहणाऱ्या नदीचा खळखळाट भयावह वाटत होता. रात्रीच्या त्या गडद अंधारात नदीच्या पलीकडे मला काही हेड टॉर्च लुकलुकताना दिसले. मी फोनवर नकाशा पाहिला तर जाणवले की कँपसाइट तर पलीकडच्या बाजूला आहे. मात्र नकाशात नदीचा कुठेही उल्लेख नाही. घोंगावत्या प्रवाहाच्या आवाजात त्या बाजूने मित्र काय सांगतोय, हे स्पष्ट ऐकू येत नव्हते. त्यामुळे मी त्यांना सांगायचा प्रयत्न करून पाहिला की मी पुढे पूल शोधून क्रॉस करेन. मात्र त्यांच्या इशाऱ्यातून इतकेच कळले की पुढे कोणताही पूल नाही. नदी इथूनच पार करावी लागेल.

कोसळता प्रवाह, हाडे गोठवणारे गार पाणी आणि कभिन्न अंधार यांचे एक घातक रसायन माझ्यासमोर आकार धारण करून उभे होते. मी बूट काढून गळ्यात अडकवले. बॅग पाठीला लावली आणि मन घट्ट करून पाहिले. पाऊल पाण्यात टाकले. क्षणभरातच संपूर्ण शरीर कोल्ड शॉकमध्ये गेले. कुणीतरी एकाच वेळी शेकडो सुया पायात खुपसल्याची जाणीव होत राहिली. क्षणार्धात नदीच्या पाण्याचा प्रवाह इतका वाढला की पुढच्या दोन पावलांतच माझा तोल गेला. काठीच्या आधाराने कसेबसे स्वतःला सावरले आणि माघार घेतली. मनाचा हिय्या करून पुन्हा एकदा पाण्यात शिरलो. दीर्घ श्वास घेत स्वतःला शांत केले आणि हेड टॉर्चच्या मिणमिणत्या दिव्यात नदी ओलांडली.

"No man ever steps in the same river twice, for it's not the same river and he's not the same man..." उबदार स्लीपिंग बॅगमध्ये डोळे मिटताना हेरेक्लिटसचे हे वाक्य आठवत राहिले.

> **आता मी अगदी खोलवर शांत झालो. कुठेच पोचायची घाई नव्हती. डाव्या बाजूला सोबत असलेली माझी सावली आणि चहूबाजूला पसरलेला एकांत प्रवासाला अक्षरशः एका उंचीवर नेत होता. त्या संध्याकाळी झालेला सूर्यास्त अद्‌भुत होता.**

**दोन हात निसर्गाशी...**

मित्रांशी हितगुज साधताना कळले की त्यांना रस्त्यात पाणी सापडलेच नाही. तडफडत ते इथवर पोहोचले. इथे पोहोचल्यावरही दिलासा नव्हता. पाण्याचे स्रोत अजून एक कि.मी. पुढे होते. एकाने पर्याय नाही म्हणून झऱ्यातले अशुद्ध पाणी प्यायला आणि त्यामुळे त्याला भयानक पोटदुखीला सामोरे जावे लागले. त्या उंचीवर शरीराला पाणी न मिळाल्यामुळे माझ्या मित्राला एएमएस (Acute Mountain Sickness) झालेला. तो पूर्ण रस्ता भ्रमिष्ट अवस्थेत चालत आला. एएमएस म्हणजे मेंदूपर्यंत योग्य प्रमाणात ऑक्सिजन न पोहोचल्यामुळे उद्‌भवणारा आजार. ज्यात डोकेदुखी, उलट्या, थकवा, घाम येणे, मतिभ्रम (hallucinations) यांसारखी लक्षणे दिसू लागतात. मित्राचे ऑक्सिजनचे प्रमाण ५८ टक्क्यांपर्यंत खालावलेले. एक रात्र वाट पाहून बघूया, असे आम्ही ठरवले. कारण एएमएसवर एकच उपाय. तो म्हणजे खाली उतरणे. मला रस्त्यात पाणी मिळाल्याने मी अगदी नॉर्मल होतो. माझे ऑक्सिजनचे प्रमाण ८५ टक्क्यांवर वर होते, जे ५१०० मी. (१६,७०२ फूट) उंचीवर अपेक्षित प्रमाणात होते.

दुसऱ्या दिवशी आम्ही तिघेच वातावरणाला सरावण्यासाठी हाइकवर निघालो. चढण कठीण होतीच, मात्र वातावरणात ऑक्सिजनची कमतरता असल्याने छोटी गोष्ट करायलाही मेहनत लागत होती. गार वारा, जांभळी फुले, नजर जाईल तिथवर हिमशिखरे! एका अद्‌भुत दुनियेत आल्यासारखे वाटत होते. ध्येय आता अगदी साफ दिसत होते. कोणत्या मार्गाने शिखरापर्यंत पोहोचायचे याचीही एक साधारण कल्पना आली होती. 'क्लाइंब हाय, अँड स्लीप लो'च्या मूलभूत नियमानुसार

आम्ही जवळपास ५४०० मी पर्यंतची खडी चढाई करून पुन्हा खाली बेसवर आलो.

**साद शिखराची**

शिखर पादाक्रांत करण्याचा दिवस उगवला, पण टीममध्ये उत्साहाऐवजी एक विचित्र निःस्तब्धता दाटून आली होती. आणखी एकाने समिट न करण्याचे ठरवले. तो इथवर येण्यातच खूश होता. ज्याच्या नावावर परमिट होते, तो खरेतर मोहिमेचा कणा होता. मात्र त्याचाही मूड खालावला. त्यानेही पुढे न जाण्याचा निर्णय घेतला. त्या क्षणी शिखर जणू हाताच्या अंतरावर असूनही दूरवर निसटल्यासारखे वाटले. मी इतक्या लांब येऊन प्रयत्न न करताच माघारी जाण्याच्या कुठल्याच मनःस्थितीत नव्हतो आणि मला एकटे सोडायला ते तयार नव्हते. या संघर्षात माझी बरीच मानसिक ऊर्जा खर्च झाली. शेवटी बऱ्याच चढाओढीनंतर रात्री १०च्या सुमारास मी हेड टॉर्चच्या प्रकाशात अंधाराला भेदत 'एकला चालो रे' म्हणत पर्वतशिखराच्या दिशेने सरसावलो.

तिकडच्या लोकल ग्रूपना मी विचारायचा प्रयत्न केला. मला त्यांच्यासोबत रोपअप होता येईल का? मात्र लेहमध्ये गाइड लोकांची एकाधिकारशाही आहे. आमच्याकडे लोकल गाइड नाही म्हणून त्यांनी सहकार्य करण्यास नकार दिला. कुठल्याही मोहिमेत रोपअप होणे महत्त्वाचे मानले जाते. कारण कोणी जर क्रेवासमध्ये (ढिसूळ बर्फाळ भाग) पडले, तर बाकी मंडळी त्याला खेचून बाहेर काढू शकतात. इथे तर मी एकटाच माझी वाट शोधायला लागलो. तापमान शून्याच्या खाली तरंगत होते. वाढत्या उंचीसोबत माझ्याच श्वासोच्छ्वासाचा आवाज शांतता भेदत घुमत होता. मी हे सगळं का करतोय? का चढतोय? का उगाच जीवाची वणवण? या सगळ्या शंका आणि प्रश्नांवर मात करत मी बर्फाच्या पांढऱ्या चादरीवर हळूहळू पुढे सरकत राहिलो. पायात दीड किलोचे स्नो बूट, त्यावर क्रॅम्पॉन (मेटलचे दातेरी खिळे) आणि हातात आइसअॅक्स (बर्फ फोडण्याची कुऱ्हाड) घेऊन मी ५८०० मी. (१९०२८ फूट) उंची गाठलेली.

आता मी अक्षरशः शिखराच्या खांद्यावर उभा होतो. पुढे फक्त ३०० मी. शिल्लक होते. मात्र यापुढे जाणे मला सुरक्षित वाटत नव्हते. बरेचसे दृश्य नि अदृश्य बर्फखड्डे शिखरवाटेवर आढळत होते आणि रोपअप करायला सोबत कोणी नसल्याने एक छोटीशी चूक जीवघेणी ठरू शकत होती. अशा स्थितीत

अंबर भी गहरी खाई...



अथांगाचा थांग...



मनावर दगड ठेवून मी मागे फिरायचे ठरवले.

डोळ्यांतले अश्रू थांबत नव्हते. पार हरल्यासारखे वाटत होते. हवालदिल अवस्थेत सकाळी ५ वाजता पुन्हा बेस कॅम्प गाठले. साडेसहाला तडक चोखदोच्या दिशेने उतरणीला लागलो; जिथे आम्हाला लेहपर्यंत न्यायला गाडी येणार होती. एक दिवस थांबून पुन्हा एकदा प्रयत्न करायचा मोह होत होता. मात्र मित्राचे ऑक्सिमीटर प्रमाण अजूनही सुधारले नसल्याने खाली जाण्याशिवाय पर्याय नव्हता. परतीच्या मार्गावर कांगयात्से पर्वताची शेवटची झलक दिसेपर्यंत मी ढसाढसा रडत राहिलो. याआधी मी आयुष्यात कुठल्याच गोष्टीसाठी इतके रडलो नसेन. कोंगमारूला पास (५२६० मी.) पार करून ग्रँड कॅन्यनसारख्याच रंगीबेरंगी दगडांच्या व्हॅलीमधून पुढे सरकत चोगदो गाव (३९०० मी.) आणि मग गाडीने लेह गाठले. शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही पातळींवर थकवा जाणवत होता.

दुसऱ्या दिवशी लेह मार्केटमध्ये फिरत असतानाच माझ्या मित्राचे अजून दोन मित्र विजित आणि श्यामा भेटले. ते कर्जोक म्हणजेच सोमोरिरी (Tsomoriri) इथे दोन महिने राहून आसपास असलेली, जमेल तितकी ६००० मी. शिखरे चढणार होते. माझ्यासाठी हे काहीतरी भन्नाटच होते. हे असे पण शक्य असते? नोकरीधंदा, अभ्यास न करता आयुष्यातले दोन महिने एखाद्या छोट्याशा गावात राहून स्वतःच्या आवडीची गोष्ट म्हणजेच गिर्यारोहण करायचे. मी भलताच इंप्रेस झालो. माझ्याकडे अजून सहा दिवस होते आणि लेह-लडाख मी आधीच फिरलो असल्याने मला पर्यटनी उथळ स्वरुपाच्या गोष्टी करण्यात काहीच रस नव्हता. माझी त्यांच्याशी तशी ओळख नव्हती. मात्र निर्लज्जपणेच मी त्यांना विचारायचे ठरवले, 'एखाद्या मोहिमेसाठी मीही तुमच्यात सामील झालो तर चालेल का?' सुरुवातीला 'आम्ही ओळख नसलेल्या लोकांसोबत चढाई करत नाही', असे म्हणून त्याने टाळले. मात्र माझी जिद्द आणि इच्छाशक्ती पाहून शेवटी होकार दिला.

**अधिक देखणे तरी...**

पुढच्याच दिवशी सकाळी पाचच्या ठोक्यावर आम्ही तिघं कर्झोकच्या दिशेने रवाना झालो. तिथे पोहोचताच एका स्थानिक घरात मुक्काम शोधला. आपल्या मुलांसारखेच त्यांनी



एकेक पाऊल शिखराकडे...

आम्हाला आपलेसे म्हटले. प्रेमाने दावा, नामग्याल आणि अंग्याल अशी तिबेटी नावेदेखील दिली. त्यांच्या खिडकीतून दिसणाऱ्या सोमोरिरी तलावाच्या गडद निळ्या रंगाच्या मी बघताच क्षणी प्रेमात पडलो. तळ्याच्या काठावर एक वेगळाच शांत-निवांतपणा होता. संध्याकाळी आकाशाचे तलावात पडलेले प्रतिबिंब इतके एकरूप झाले होते की खरेच पाणी कोणते आणि आभाळ कोणते असा प्रश्न पडावा.

'मसान' चित्रपटातल्या गाण्यात वरुण ग्रोवर म्हणतो, तसे 'उल्टा करके देख सके तो अंबर भी है गहरी खाई' असेच काहीसे दृश्य होते. सोबत असलेले दोघेही ज्ञानी आणि रसिक होते. गिर्यारोहण, अल्पायनिझम, चित्रपट, फिलॉसॉफी अशा बऱ्याच विषयांवर आमची चर्चा रंगली. मागच्या अनुभवापेक्षा एक वेगळीच ऊब इथे जाणवली. 'The Alpinist' ही मार्क-अँड्रे ले क्लेर्क याच्या आयुष्यावर आधारित एक सुंदर डॉक्युमेंट्री त्यांनी मला आवर्जून बघायला लावली. म्हणाले, ''जगात जर कोणी Pure Alpinist असेल तर तो हा आहे.''

पुढचा टप्पा होता, मेनटॉक कांग्री चढण्याचा. याचा प्लान अगदी सोपा होता. मधे एक कँप सेटअप करायचा आणि मग तिथून शिखर गाठायचे. चालता चालता मी विजितला सहजच

विचारले, ''alpinism म्हणजे तुझ्यासाठी नक्की काय?'' त्याने दिलेलं उत्तर आजही मनात घर करून आहे. ''Meiky-Shisui.'' जपानी भाषेत त्याचा अर्थ स्वच्छ आरसा किंवा स्थिर पाणी असा होतो. अशी अवस्था जिथे मन निसर्गाशी पूर्णपणे एकरूप होऊन जाते. त्यांच्यासोबत चालताना मी नकळतच एका नवीन दृष्टिकोणातून जगाकडे पाहायला शिकत होतो. अगदी हसत-खेळत आम्ही पहिला टप्पा पार पाडला नि १८,५०० फुटांवर बेस बनवला.

इतक्या मोठ्या हिमपर्वतावर फक्त आम्हीच होतो. ही अनुभूतीच काहीतरी अद्‌भुत होती. रात्री झोपताना पं. मिलिंद रायकर यांचा व्हायोलिनवरचा शुद्ध नट ऐकून आम्ही तिघेही भारावून गेलेलो. त्या लाइव्ह रेकॉर्डिंगमध्ये बाबांची सतत येणारी दाद ऐकून काही क्षणासाठी घरी असल्याचा भास झाला. मात्र 'Home is where you are' यावर माझा ठाम विश्वास आहे.

**शिखर चढाईच्या नव्हे, आत्मज्ञानाच्या दिशेकडे...**

रात्री एक वाजता गजर झाला. समिट पुशची तयारी सुरू झाली. समोर दिसणाऱ्या नालीतून आम्ही सरळ वर चढायचे ठरवले होते. सुरुवातीला मार्ग तुलनेने सुसह्य वाटत होता, पण बघता बघता चढाई खडी होत गेली. आइसअ‍ॅक्स आणि क्रॅम्पोनच्या साह्याने थ्री-पॉइंट तंत्र वापरून आम्ही मुंगीसारखे हळूहळू वर चढत होतो. घड्याळात पाहिले, तर ६००० मी.ची उंची आम्ही पार केलेली. मी आतापर्यंत सर केलेली ही सर्वात उंच जागा होती. चेहऱ्यावर एक स्मित उमटले. मात्र पुढच्या १०० मीटरमध्येच समोर एक मोठा क्रेवास आमच्या आणि शिखराच्या मधोमध अडथळा बनून ठाकलेला दिसला. आम्ही कदाचित याआधी कधीच न चढलेला असा अनवट मार्ग निवडलेला होता. पहाटे साडेचारच्या अंधारात हलका बर्फ पडायला सुरुवात झाली होती. क्रेवास इतका खोल आणि रुंद होता की मी त्याच्याकडे एकटक पाहतच राहिलो. 'And if you gaze long into an abyss, the abyss also gazes into you.' नित्शेचे हे वाक्य मनात विजेसारखे चमकून गेले.

वातावरण बिघडत चाललेले. आमच्याकडे असलेल्या मर्यादित उपकरणांसोबत त्या क्षणी क्रेवास पार करणे धोक्याचे होते. अवघ्या १०० मीटर्सनी समिट हुकले होते. मात्र या वेळी कसलेच दुःख नव्हते. माझ्या पोत्यात बरेच अमूल्य अनुभव, ज्ञान व दृष्टिकोण घेऊन मी खाली उतरत होतो. "Summit is optional, but coming back is mandatory."



परस्परांना निरखणे...

एकंदरीतच या दोन मोहिमेतून इतके जाणवले की गिर्यारोहण जितके शारीरिक आहे, त्याहूनही अधिक मानसिक आहे. घरी परतलो मात्र काही गोष्टी खोलवर बदलून गेलेल्या. इतक्या ताकदीचा अनुभवातून गेल्यानंतर पुन्हा तसेच जगणे शक्य नव्हते. महिनाभरातच मी यूपीएससी सोडण्याचा निर्णय घेतला. पूर्णवेळ आउटडोअर्समध्ये काम करायचे ठरवले. आई थोडी नाराज झालेली. कुठे फॉरेस्ट ऑफिसर आणि कुठे हे आउटडोअरचे फॅड! एक आठवडाभर तरी तिने सायलेंट ट्रीटमेंट देत तिची नाराजी स्पष्टपणे व्यक्त केली. अभ्यासात तसा बरा असल्याने घरच्यांच्याही काही अपेक्षा होत्या; ज्या साहजिक आणि योग्यही होत्या. बाबांनी लहानपणी निसर्गाची आवड लावली. झाडे, फुले, पक्षी, फुलपाखरे बघायला शिकवली. तरीही ट्रेकिंग हे काही आयुष्य नाही, ही त्यांची भूमिका असायची. या वेळी मात्र त्यांनी पाठीशी उभे राहून मला पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. या क्षेत्राबद्दल इतकी

अनिश्चितता असूनसुद्धा दोघांनीही मला माझे निर्णय घेण्याची मोकळीक दिली.

मी वर्षभर काश्मीर, हिमाचल, उत्तराखंड अशा हिमालयीन पट्ट्यात बरेच ट्रेक लीड केले. अरुणाचल, मेघालय, स्पिती यांसारख्या दुर्गम ठिकाणी रोडट्रिप केल्या. स्नो लेपर्ड पहिला, NOLS (नंदादेवी आऊटडोअर लीडरशिप स्कूल) सोबत काही कोर्सेस केले आणि गेले वर्षभर यूएई आणि अमेरिकेमध्ये आऊटडोअर इन्स्ट्रक्टर, ॲडव्हेंचर ट्रिप गाइड व घोडस्वारी तज्ज्ञ अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडल्या.

हे सगळे करताना इतकेच जाणवले की अजून बरेच काही अनुभवायचे बाकी आहे. आता कुठेतरी कसे जगायचे याचा अंदाज यायला लागलाय...

Why climb a mountain?
*Look! A mountain there.*
*I don't climb mountain.*
*Mountain climbs me.*
*Mountain is myself.*
*I climb on myself.*
*There is no mountain,*
*nor myself.*
*Something*
*moves up and down*
*in the air.*

*- Nanao Sakaki*

❋ ❋ ❋

**प्रस्तुत लेख लिहिला तेव्हा स्वप्निल गणेश कुलकर्णी यांचा पत्ता यूएसए/यूएई असा होता.**

**संपर्क:** swapnakool20@gmail.com


सर्वत्र उपलब्ध

एका खेळियाने...


दिलीप प्रभावळकर

'दशावतार' गाजवणाऱ्या दिलीप प्रभावळकर यांचं हे पुस्तक तुमच्या संग्रही हवंच...



'एका खेळियाने...'ची ही सुधारित नववी आवृत्ती, नवीन भूमिकांवरील नवीन लेखांसह...

किंमत : ५००/– रुपये
सवलत किंमत : ४००/–रुपये
पोस्टेज : ४२/– रुपये




अक्षर प्रकाशन ऑर्चिड रोड मॉल, रॉयल पाम, 'बी' विंग, युनिट नं. २३५, सर्वे नं. १६९, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई–६५ फोन : ९३२२३९१७२० email : aksharprakashan@gmail.com

# ज्ञानवंतांचा गोतावळा

या विश्वाची सर्वार्थाने गगनचुंबी (अवकाश केंद्र आणि चंद्रापर्यंतचा मजला बांधलेली!) असलेली इमारत ज्ञानाच्या भरभक्कम पायावर (पायासुद्धा समुद्रतळाइतका खोलवर.) उभी आहे, असे निरीक्षण नोंदवल्यास वावगे ठरू नये. या ज्ञानाच्या आणि त्यातून स्फुरलेल्या नवतेच्या (इनोव्हेशन) बळावरच हे विश्व उत्क्रांत नि प्रगत होत गेले आहे.

अर्थातच ज्ञान म्हणजे जाणिवांची रुजुवात, आकलनाचा विस्तार नि संवेदनांचा अभिसार. या विश्वात ज्ञान सामावले आहे, त्या ज्ञानाचा शोध घेण्याची, त्यापर्यंत पोहोचण्याची, ते वृद्धिंगत करण्याची, त्यातून नवतेकडे झेप घेण्याची प्रज्ञा अंगी हवी, असा हा मामला. ज्याच्या अंगी अशी लालसा नि प्रज्ञा तो ज्ञानवंत.

हाच ज्ञानवंत पुढे आपल्याला झालेल्या ज्ञानाचे विविध मार्गांनी अभिसरण घडवून आणतो. त्या अभिसरणातून पिढी दरपिढी माणूस घडत जातो. घडत राहण्याची ही प्रक्रिया अविरत सुरू राहते आणि विश्वाची इमारत अधिकाधिक मजबूत होत जाते.

प्रत्येकाच्या आयुष्यात कळत-नकळत एक वा अनेक असे ज्ञानवंत येतात. साद-प्रतिसादातून ज्ञानदानाची प्रक्रिया घडत जाते. यातून बंध-अनुबंध आकारास येत जातात.

हा अनुबंध उलगडत विविध क्षेत्रांतल्या मान्यवरांनी खास दिवाळी अंकानिमित्त आपले आयुष्य समृद्ध करणाऱ्या ज्ञानवंतांच्या गोतावळ्याची घडवून आणलेली ही भेट...



# ज्ञानसमृद्ध आयुष्याचे आख्यान



तारा भवाळकर

शब्दांकन : प्राजक्ता थोरात




लक्ष्मणशास्त्री जोशी



कुसुमाग्रज



डॉ.अशोक केळकर



रा. चिं. ढेरे



सिद्धेश्वरशास्त्री चित्राव



नरहर कुरुंदकर

**पुण्यात आमचं बिऱ्हाड होतं. विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या वाड्यात आम्ही राहत होतो. सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांचं घर कसं, तर दोन शंकराची मंदिरं, अमृतेश्वर आणि सिद्धेश्वर आणि त्याचे पुजारी म्हणून पेशव्यांनी चित्रावांची नेमणूक केली होती. चित्रावांनी चारही वेदांचे सर्वात आधी भाषांतर केले. त्यांचे हे भाषांतराचे काम चालू असायचे. ग्रंथसमृद्धी म्हणजे काय, हे मी त्या वाड्यात अनुभवले. त्या वाड्यात चित्रावांची एक स्वतंत्र अभ्यासिका होती. तेथे निरनिराळे मोठमोठाले जड ग्रंथ असायचे. चित्राव तेथे मांडीवर ते ग्रंथ घेऊन वाचत बसलेले दिसायचे. या वातावरणाचा नकळत प्रभाव माझ्यावर पडला, पुढच्या आयुष्यात एकाहून एक थोर ज्ञानवंतांनी माझे आयुष्य समृद्ध केले...**

बालपणातील जडणघडणीवर कोणत्या ज्ञानवंतांचा प्रभाव पडला याचा विचार केला तर लोकसंस्कृतीच्या अभ्यासाच्या दृष्टीने लहानपणी फार काही कळत नव्हते. मात्र ज्याला आपण अनुभव म्हणतो तो गोळा करत गेले. मग जेव्हा सैद्धांतिक अभ्यास सुरू केला तेव्हा त्याचे विश्लेषण या अनुभवाच्या आणि अनुभव देणाऱ्या ज्ञानवंतांच्या आधारे जमत गेले.

माझे एक आजोबा होते, ते नाशिकला राहायचे. त्यावेळी हल्लीच्या सारखे नातेसंबंध बंदिस्त नव्हते, त्यामुळे सर्व चुलते, मामा, काका आत्या सर्वांचे एकमेकांकडे जाणे येणे असायचे. मी नाशिकला माझ्या पहिल्या नोकरीसाठी गेले, त्याअगोदर नाशिकला माझ्या आईचे काका रावसाहेब पिंगळे असल्यामुळे आमचे जाणे होई. ते काका त्या काळात खूप शिकलेले आणि एज्युकेशन इन्स्पेक्टर होते. त्यांचे मूळ नाव नारायणराव पिंगळे, रावसाहेब हा किताब त्यांना इंग्रजांच्या काळात मिळाला होता. नारायणराव हे प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व होते. ते एकीकडे डेक्कन कॉलेजचे पदवीधर होते, एज्युकेशन इन्स्पेक्टर होते, सोबतच त्यांना अनेकविध छंदही होते.

**भवतालच्या ज्ञानाचे धडे**


माझी पहिली नोकरी नाशिकला लागली ती वयाच्या अठराव्या वर्षी. एका शाळेत शिक्षिका म्हणून ती नोकरी होती. आजोबा त्यावेळी नोकरीतून निवृत्त झाले होते, मात्र अनेकविध कामांमध्ये ते व्यग्र असायचे. श्रीधर व्यंकटेश केतकरांचा ज्ञानकोश मी पहिल्यांदा त्या घरात बराचसा वाचू काढला. आजोबा बागेत काम करायचे. म्हणजे झाडांना पाणी घालताना, झाडांवर जंतुनाशकांचा फवारा मारताना त्यांनी वैज्ञानिक पद्धतीने हे शिकवले, की जंतुनाशकांचा फवारा पानांच्या मागील बाजूने मारायचा, वरच्या बाजूने कधीही फवारा घालायचा नाही. त्यांचे घर नाशिकला गावाच्या बाहेर होते, बाजूने एक ओढा वाहात होता. त्या ओढ्यामध्ये केतकीची झाडे होती. ज्याला आपण केवडा म्हणतो, ते केवड्याचे झाड कसे दिसते, कुठे उगवते व त्या केवड्याचे कणीस कसे उगवते, त्या केवड्याच्या कणसाभोवती नाग कसा वेटोळा घालतो, हे आजोबांनी मला प्रत्यक्ष तेथे नेऊन दाखवले. तेथे खाली नागरमोथा नावाची वनस्पती होती. त्याची मुळं असायची खाली, त्या मुळाच्या खाली गाठी येतात व त्या गाठींच्या आत सुगंध येतो ज्याला आपण 'खस' म्हणतो, म्हणजे खसची निर्मिती या वनस्पतीपासून होते. आजोबा ती मुळं उपटून आणून ती ठेचून आम्हाला त्याचा कसा सुगंध येतो, हे दाखवत असत. म्हणजे जगण्यातल्या या मूलभूत गोष्टी ज्याला तुम्ही आताच्या काळात पर्यावरण म्हणा किंवा वनस्पतीशास्त्र म्हणा, ते मला त्या आजोबांनी शिकवले.

भाजीबाजारातून भाजी निवडून कशी आणायची, हे मला आजोबांनी शिकवले. नाशिकला खूप मोठा भाजीबाजार भरतो. अनेक विविध प्रकारच्या भाज्या तेथे असत. चांगली भाजी कशी समजायची, फळ पक्व कसे होते, हे मला आजोबांनी शिकवले. आयुर्वेदाचा त्यांचा प्रचंड अभ्यास होता. उच्चार कसे करायचे, त्यामधील बारकावे काय हे ते शिकवायचे. मोडाची उसळ कशी शिजवायची यामागचे शास्त्रीय कारण ते सांगायचे. म्हणजे ती उसळ फोडणीला टाकल्यानंतर पूर्ण तडतडू द्यायची, ज्यामुळे त्यामधील स्टार्च फुटतो व कडधान्यांमधील स्टार्च फुटल्याशिवाय ते कडधान्य पूर्णपणे शिजत नाही, हे यामागचे शास्त्रीय कारण, जे आजकाल होम सायन्समध्ये देखील कितपत सांगितले जाते, मला याची कल्पना नाही. जगण्यातील अशा अनेक बारीकसारीक गोष्टी मी या आजोबांकडून शिकले.

माझे हे आजोबा पाली भाषेचे अभ्यासकही होते. गौतम बुद्धांचे जे ग्रंथ मूळ पाली भाषेत लिहिले आहेत, ते त्यांनी वाचले होते. गौतम बुद्धांचा अभ्यास करणारे मोठे अभ्यासक धर्मानंद कोसंबी जे फर्गसन महाविद्यालयात इंडॉलॉजीचे प्राध्यापक होते, ते आणि हे आजोबा मित्र होते. श्रीलंकेत (आधीचे सिलोन) बौद्ध धर्माचे मोठमोठे मठ (पॅगोडा) आहेत. जेथे बौद्ध धर्माविषयीची प्राचीन हस्तलिखिते आहेत, त्यांचा अभ्यास करायला माझे आजोबा आणि धर्मानंद कोसंबी गेले होते. त्या काळात तो प्रवास लांबचा, दीर्घ आणि खूप बिकट होता. त्या अनुभवांवर त्यांनी पुस्तकही लिहिले आहे. त्यांच्या त्या आठवणी पुढे मला खूप उपयोगी ठरल्या.

त्या पुस्तकात हिंसा म्हणजे काय, मांसाहार करावा का याविषयीची तत्त्व नेमकी काय आहेत, ते मला सापडले. आज आपण शहरी लोक या सगळ्या तत्त्वांना खूप ढोबळमानाने घेतो. पण बौद्ध धर्माची शिकवण काय आहे, त्या तत्त्वांमधील बारकावे काय आहेत, हे मला त्या अनुभवांमधून कळले. बौद्ध धर्मात हिंसा चालत नाही, मात्र मांसाहार केला तर चालतो.

म्हणजे, दुसऱ्या कुणीतरी हिंसा केली आणि मी मांसाहार केला तर चालतो. कारण तो प्राणी कधी मारला गेला आहे, कुणी मारला आहे हे आम्हाला माहीत नाही. त्यामुळे आम्ही स्वतः हिंसा केली नाही, म्हणजे बुद्धांच्या आदेशाचे पालन केले आहे. स्वत: हिंसा न करता दुसऱ्या कुणीतरी मारलेल्या जनावरांचे मांस आम्ही खाऊ शकतो, असे अनेक मजेशीर युक्तिवाद बौद्ध भिक्षुंनी केले आहेत. आजही जर आपण पाहिले तर ज्या ज्या देशांमध्ये बौद्ध धर्माचा स्वीकार केला गेला आहे तेथील लोक प्रामुख्याने मांसाहारी आहेत, पण 'अहिंसक'. मुळामध्ये लोकसंस्कृती समजून घ्यायची म्हणजे, ती अशा वेगवेगळ्या अंगांनी समजून घ्यावी लागते. म्हणजे त्यामध्ये मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, धर्माच्या चालीरीती हे सर्व काही येते. या अनुषंगाने आजोबांचा असा खूप प्रभाव माझ्यावर पडला.




**उपजत शहाणिवेतून ज्ञान**

माझी आई इयत्ता दुसरी शिकलेली बाई. मात्र तिची विचार करण्याची क्षमता जबरदस्त होती. हे मला आता जाणवते. आजकालच्या तथाकथित उच्चशिक्षित बायका कर्मकांड, पूजा अर्चा, व्रतवैकल्य यामध्ये इतक्या गुंतलेल्या आहेत. माझ्या आईच्या भोवताली तर हाच सगळा गोतावळा होता खेड्यातही आणि शहरात सुद्धा. म्हणजे आम्ही पुण्यात आलो तेव्हाही. मी लहानपणापासून खूप वाचन करायचे म्हणजे अगदी सहावी-सातवीत असताना मी सावरकरांची 'माझी जन्मठेप' आणि 'विज्ञाननिष्ठ निबंध' ही पुस्तके वाचली होती. तेव्हा माझ्या वाचनात श्री. म. माट्यांचे एक पुस्तक आले. ज्यामध्ये त्यांनी शंकराच्या मंदिरात जे शिवलिंग असते, त्याची आदिम काळात कशी निर्मिती झाली व पूजेला सुरुवात कशी झाली याचे वर्णन केले होते. माझ्या आईने त्यावेळी माझ्याकडे असलेले ते पुस्तक वाचले आणि ती म्हणाली, अरेच्चा, यासाठी करतात ही पूजा, मग आता ही पूजा मी करणार नाही आणि तिने त्यानंतर हरतालिका आणि शिवलिंग पूजा करणे सोडून दिले.

आपण आज स्त्रीमुक्तीच्या गोष्टी करतो. स्त्रियांना अमुक सवलत आणि पुरूषांना तमुक सवलत असे सगळे आपण म्हणतो, पण त्या काळात माझे वडील सेवानिवृत्त झाल्यावर माझ्या आईने मला एक प्रश्न विचारला, की बायकांना कधीच सेवानिवृत्त होता येत नाही का? आता 'आई रिटायर होते आहे' अशी नाटके येतात. मात्र दुसरी इयत्ता शिकलेल्या एका खेड्यातील बाईला त्या काळात हा प्रश्न पडला होता आणि तिने तो विचारला होता.

केवळ शिक्षणाने शहाणपण येत नाही, हे मी लोकसंस्कृतीत मुरलेल्या बायकांकडून शिकले. जात्यावर दळणाऱ्या बायकांनी मला खूप शिकवले. जात्यावरची ओवी माझा खूप प्रिय विषय आहे. माझे असे म्हणणे आहे, की मला पुस्तकांनी बरेच शिकवले, जगाने बरेच शिकवले, पण माझी जी सुरुवात केली ती आमच्या जात्यावर दळण दळणाऱ्या स्त्रियांनी आणि संत स्त्रियांनी. दिसायला या सगळ्या तुमच्या भाषेत 'अडाणी' होत्या, म्हणजे त्यांना लिहिता वाचता येत नव्हतं. मात्र लिहिता वाचता येणारे लोक प्रत्यक्षात किती अडाणी आहेत, हे माझ्या 'अडाणी' बहिणाबाईने सांगितले.

''अरे माणसापरी माणूस राहतो रे येडाजाना
आणि छापिसनी होतो कोरा कागद शहाना''

कोऱ्या कागदावर छापले तर कोरा कागदही शहाणा होतो. मात्र छापलेले हे कागद वाचणारा माणूस शहाणा होईलच. याची खात्री नाही म्हणजे माणूस हा येडाजाणाच राहणार.

मी शेतकऱ्याच्या घरात जन्माला आले. पुण्यापासून वीस पंचवीस किलोमीटर अंतरावर आमचं गाव, शेतीचं गाव आमचं त्यामुळे दळण, कांडण व्रतवैकल्य हे सर्व काही यथासांग चालत असे. अठरापगड जातीची माणसं घरी असायची.

हादग्याची गाणी, भोंडल्याची गाणी, कीर्तन, प्रवचन हे सगळे कानावर पडायचे. अंधश्रद्धा निर्मूलनच्या बाबतीत छोट्या छोट्या गोष्टींमधून मी शिकत गेले. मला एका कीर्तनकार बुवांचे कीर्तन आठवते, लहानपणी ऐकलेले. ते कीर्तनकार बुवा त्यांच्या कीर्तनात एक वाक्य म्हटले होते, ते माझ्या आजही लक्षात आहे. ते म्हणाले होते की, ''देव कुणालाही स्वतःच्या पदरचे काहीही देत नाही, तर एकाचे काढून दुसऱ्याला देतो.'' आपल्या आजच्या व्यापारी अर्थव्यवस्थेत हे विधान किती तंतोतंत लागू होते.

**लिहिता वाचता येणारे लोक प्रत्यक्षात किती अडाणी आहेत, हे माझ्या 'अडाणी' बहिणाबाईने सांगितले. ''अरे माणसापरी माणूस राहतो रे येडाजाना आणि छापिसनी होतो कोरा कागद शहाना'' कोऱ्या कागदावर छापले तर कोरा कागदही शहाणा होतो. मात्र छापलेले हे कागद वाचणारा माणूस शहाणा होईलच. याची खात्री नाही म्हणजे माणूस हा येडाजाणाच राहणार.**

### ज्ञानस्रोतांचा अधिवास

या सगळ्या वातावरणात मी लहानाची मोठी झाले. पुण्यात आमचं बिऱ्हाड होतं. विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या वाड्यात आम्ही राहत होतो. सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांचं घर कसं, तर दोन शंकराची मंदिरं, अमृतेश्वर आणि सिद्धेश्वर आणि त्याचे पुजारी म्हणून पेशव्यांनी चित्रावांची नेमणूक केली होती. त्यांची पूर्ण पदवी होती महामहोपाध्याय सिद्धेश्वरशास्त्री चित्राव अशी होती. ज्यांनी काशीला जाऊन सर्व दशग्रंथांचे भाषांतर केले आहे,  वेदाध्ययन केले आहे त्यांना ही पदवी दिली जाते. चित्रावांनी चारही वेदांचे सर्वात आधी भाषांतर केले. त्यांचे हे भाषांतराचे काम चालू असायचे. ग्रंथसमृद्धी म्हणजे काय, हे मी त्या वाड्यात अनुभवले. त्या वाड्यात चित्रावांची एक स्वतंत्र अभ्यासिका होती. तेथे निरनिराळे मोठमोठाले जड ग्रंथ असायचे. चित्राव तेथे मांडीवर ते ग्रंथ घेऊन वाचत बसलेले दिसायचे. या वातावरणाचा नकळत प्रभाव माझ्यावर पडला, असे मला वाटते. त्या चारही वेदांचे भाषांतर आजही माझ्याकडे आहे.

त्या वाड्यात दरवर्षी एक यज्ञ होत असे. शंकराचार्य स्वतः त्या वाड्यात येत असत तेव्हा त्यांची पालखी कशी असते, यज्ञ कसा करतात, हे सर्व मी जवळून पाहिले.

एका बाजूस अमृतेश्वर, एका बाजूस सिद्धेश्वर एका बाजूला लक्ष्मी आणि विष्णूचे मंदिर तर दुसऱ्या बाजूला प्रभू रामचंद्र आणि सीतामाईचे मंदिर दारात पहाऱ्याला मारूती आणि मधे आम्ही काही माणसं या देवांच्या गराड्यात राहत होतो. तेथे मोठेमोठे मंडप होते. या ठिकाणी सण, व्रतवैकल्य, पूजा, प्रवचन, कीर्तन, बायकांची गाणी हे सर्व अखंड चालू असे. घरी गावाकडे गणपतीचे देऊळ होते. तिथे आजोबांची पूजाअर्चा, गणपतीचा उत्सव हे सर्व चालू असे. विष्णूच्या मंदिरात काकड आरती चालत असे. या ठिकाणी विविध जाती, स्तरांतील लग्न होत असत. आम्ही सर्व लहान मुले एक जागा पकडून हे लग्नसोहळे पाहत असू. पुढे लोकसंस्कृतीच्या अभ्यासातील केवळ आपल्याच जाती किंवा स्तरातील नव्हे तर अन्य जाती आणि स्तरांतील लग्नाच्या पद्धती, चालीरीती प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी लहानपणीच या निमित्ताने मिळाली. त्यावेळी तेथे काकड आरती होत असे. या काकड आरतीची सर्व विधिविधाने चित्रावांच्या पत्नी सौ. यमुताई करत असत.

### थोरामोठ्यांचे विचार दर्शन

पुण्यात सर्वच पेठांमध्ये आमचे नातेवाईक राहत असत, त्यामुळे सर्वत्र पायी संचार असे. त्यावेळी सदाशिव, कसबा, नारायण आणि शनिवार या चार पेठांना पुण्यातील वैचारिक आणि सांस्कृतिक केंद्रबिंदू म्हटले जाई. या सर्व पेठांमध्ये आमचा वावर असे. चित्रावांकडे तेव्हा साने गुरुजी येत असत. साने गुरूजी नेमके कोण हे मला नंतर कळले, पण नकळत या सर्व ज्ञानवंतांना मी त्या ठिकाणी पाहत होते. चित्रावांच्या वाड्याच्या जवळच 'साधना' साप्ताहिकाचे कार्यालय होते. साने गुरुजी तिथेच राहत असत. पुण्यात मी अनेक व्याख्याने भाषणे ऐकली. महात्मा गांधी, पंडित नेहरुंना पाहिले. स्वातंत्र्यानंतरचा पहिला स्वातंत्र्यदिन मी शनिवारवाड्यासमोर साजरा केला. तेव्हा मी तिसरी-चौथीत असेन, पण त्या आठवणी आजही मनात खूप पक्क्या आहेत. इंग्लंडचा युनियन

जॅक खाली उतरवून भारताचा तिरंगा ध्वज शनिवारवाड्यावर फडकवला गेला, हे मी पहिल्या स्वातंत्र्यदिनाला तेथे पाहिले. पुण्यात असताना आचार्य अत्र्यांच्या सभा, त्यांची भाषणे ऐकली. त्यांची उभे राहण्याची, बोलण्याची शैली मी प्रत्यक्ष पाहिली व पुण्यात असताना या सर्व ज्ञानवंतांच्या गोतावळ्यात मी नकळत समृद्ध होत गेले.

माझे अनेक नातेवाईक त्यावेळी राजकारणात सक्रिय होते. माझे एक मामा ग. प्र. प्रधानांचे सचिव होते. माझी एक मावशी स्वातंत्र्य चळवळीत कॉंग्रेसमध्ये होती. अजून एका मावशीचे कुटुंबातील सदस्य हिंदुत्त्ववादी विचारधारेच्या पक्षात होते तर माझा एक मावस भाऊ कम्युनिस्ट पक्षात होता. या इतक्या वेगवेगळ्या विचारसरणीच्या माणसांसोबत मी वाढत होते. मात्र हे सगळे लोक गुण्यागोविंदाने एकमेकांसोबत मिसळत, समारंभात एकत्र येत, जे आजकाल घडत नाही. सर्वसामावेशक उदारता मला या लोकांकडून खूप कमी वयात शिकायला मिळाली. त्यामुळे सध्याची परिस्थिती पाहिली की मला विमनस्क वाटते, की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केवळ सत्तर पंचाहत्तर वर्षांतच या देशातील माणसे अशी काय वागायला लागली.

**नामवंत ज्ञानवंत**

नाशिकला मुलींच्या एका प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झाल्यावर माझ्या भोवतालचा ज्ञानवंतांचा गोतवळा अधिकच वाढला. मी त्यावेळी नोकरी करत बहिस्थ पद्धतीने शिक्षणही चालू ठेवले होते. आमच्या शाळेचे मुख्याध्यापक होते कृ. द. बेदरकर. विनोबाजींच्या भूदान चळवळीत काम केलेले बेदरकर हे सुद्धा उदारमनस्क होते. बेदरकरांमुळे माझा कुसुमाग्रजांशी परिचय झाला. त्यांचा सहवास मिळाला कारण कुसुमाग्रज हे बेदरकरांचे शेजारी होते. मी बहिस्थ शिक्षण घेत असताना अजूनही काही तीन चारजणी नोकरी सांभाळत धडपड करत शिक्षण घेत होत्या. हे जेव्हा नाशिकच्या एचपीटी महाविद्यालयात कळले, तेव्हा मी नोकरी करत असलेल्या शाळेत दर शनिवार-रविवार मार्गदर्शन वर्ग खास आमच्यासाठी सुरू करण्यात आले. हे वर्ग सुरू करण्यात पुढाकार ज्यांनी घेतला त्यांचे नाव होते, मामा पाटणकर. पाटणकर हे प्रसिद्ध नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे जावई होते. नाशिकला असताना माझ्या एज्युकेशन इन्स्पेक्टर आजोबांचे मित्र असलेल्या रेव्हरंड टिळक व लक्ष्मीबाई टिळक यांच्या कुटुंबाशी संपर्क आला. त्यावेळी निर्माण झालेले घरगुती संबंध आजतागायत पुढच्या पिढीसोबतही म्हणजे, लक्ष्मीबाई टिळकांची पणती दिवंगत मुक्ता टिळक यांच्यासोबत आहेत.

त्याच दरम्यान, कुसुमाग्रजांच्या कुटुंबासोबतही असेच संबंध निर्माण झाले. जे आजही कायम आहेत. कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या सुरुवातीच्या स्थापनेच्या वेळच्या काही संस्थापकांपैकी मी एक आहे. या कामात पुढाकार घेतलेले डॉ. बाळासाहेब दातार हे माझे पीएच.डी.चे गाइड होते. अशा प्रकारे नाशिकमध्ये मला ज्ञानवंतांचा गोतावळा लाभला.

**साहित्यातली प्रभावळ**

एम.ए. झाल्यानंतर मी सांगलीच्या महाविद्यालयात रुजू झाले. सांगलीत आल्यानंतरही माझ्या भोवतालच्या ज्ञानवंतांच्या गोतावळ्यात वाढच होत गेली. कारण सतत वेगवेगळ्या क्षेत्रांत लुडबुड करण्याचा माझा स्वभाव आहे. नाशिकला प्राथमिक शाळेत मी सुरूवातीला क्रीडा शिक्षक होते, तेव्हा विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे किंवा नृत्य बसवणे यामध्ये मी सक्रिय असायचे. अनेकजण मला म्हणतात की लोकसंस्कृती हा माझा विषय आहे, मात्र मी म्हणेन की नाटक हा माझा पहिला प्राधान्य विषय आहे. माझ्या संशोधनाचा विषयही त्यामुळे नाटक हाच होता. सांगलीत आल्यावर नाटक व अभिनय क्षेत्रात रुची असलेल्या काही प्राध्यापक मंडळींनी मिळून आम्ही अमॅच्युअर ड्रामाटिक असोसिएशनची(ADA) स्थापना केली. याद्वारे आम्ही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी नाट्यस्पर्धा आयोजित करत असू. मला स्वतःला दरवर्षी उत्कृष्ट अभिनयाचे राज्य शासनाचे पारितोषिक मिळत असे. सांगलीला विलिंग्डन महाविद्यालयात प्रसिद्ध समीक्षक म. द. हतकणंगलेकर, किर्लोस्कर कुटुंबातील व स्त्री सुधारणांच्या पुरस्कर्त्या मालतीबाई किर्लोस्कर व प्रसिद्ध नाटककार वसंत कानिटकर यांचे वडील कवी गिरीश यांचा मला त्या काळी सहवास लाभला. स्वातंत्र्यपूर्व काळातील रवीकिरण मंडळातील प्रसिद्ध तीन कवींना मी या ठिकाणी प्रत्यक्ष अनुभवले.

सांगलीमध्ये रंगभूमीवरील प्रयोगशील नाटकांमुळे ज्ञानवंतांचे वर्तुळ विस्तारत गेले. दिलीप प्रभावळकर, रत्नाकर मतकरी, दामु केंकरे, विद्याधर गोखले, जब्बार पटेल, विजय तेंडुलकर, अतुल पेठे या सर्जनशील व्यक्तींसोबत संपर्क आला. रीमा




नवी दिल्लीतल्या ९८ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनातले अध्यक्षीय खडे बोल...

लागू, सुलभा देशपांडे या तर माझ्या खूप चांगल्या मैत्रिणी होत्या. सांगली रंगभूमीची पंढरी मानले जाते. विष्णुदास भावेंनी पहिले नाटक रंगभूमीवर आणले व म्हणूनच माझ्या संशोधनाचा विषय अर्थातच नाट्यशास्त्र होता. त्यात विष्णुदास भावे यांचे नाटक नक्की कुठून आले, याचा शोध घेत खूप वेगवेगळ्या ठिकाणी फिरत फिल्ड वर्क (क्षेत्रीय कार्य) केले. मग ते कोकणातील दशावतार असो की केरळ, कर्नाटकातील यक्षगान असो. यक्षगानवरील पहिले पुस्तक हे माझे प्रकाशित झाले आहे. मला शासनाचा पहिला पुरस्कार हा नाटकावरील पुस्तकासाठी मिळाला आहे. लोकनाट्याचा अभ्यास करत असताना मी लोकसंस्कृतीकडे वळले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कथकलीचा अभ्यास करायला मी केरळमध्ये जाऊन आले. तंजावुरला सरस्वती महाल ग्रंथालयात शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू व्यंकोजीराजे भोसले यांच्या वंशातील राजांच्या नाटकांचा अभ्यास केला. भोसले कुळातील अनेक राजे लेखक व कलावंत होते. त्या सर्व नाटकांची मी अधिकृत सूची तयार केली.

**लोकसंस्कृतीचे ज्ञानवंत**

संशोधनाच्या क्षेत्रात नरहर कुरुंदकर आणि रामचंद्र चिंतामण ढेरे हे ज्ञानवंत मला भेटले. लोकसंस्कृतीच्या अभ्यासातील व संशोधनातील अनेक बारकावे मी रामचंद्र चिंतामण ढेरे यांच्याकडून शिकले. स्त्रीमुक्ती चळवळीतील छाया दातार, पुष्पा भावे, कमल देसाई, विद्या बाळ, निर्मलाताई पुरंदरे यांसारख्या मैत्रिणी मला लाभल्या. लोकसंस्कृतीतून स्त्रीमुक्तीचा धांडोळा घेण्याचे काम माझ्या हातून घडले. पुढे स्त्रीमुक्तीचे कार्य करत असताना नारायण सुर्वेंशी संपर्क आला. सुर्वेंनी आग्रह करून माझी सुरूवातीची पुस्तके प्रकाशित केली. (लोकपरंपरा आणि स्त्रीप्रतिभा).

जागतिक दर्जाचे भाषाशास्त्रज्ञ डॉ. अशोक केळकर यांची मी विद्यार्थिनी. याठिकाणी मी हे शिकले, की भाषेमध्ये शुद्ध व अशुद्ध असे काही नसते. भाषेचे मुख्य काम म्हणजे प्रक्षेपण करणे. विचार, भावना यांची आदानप्रदान करणे. ते आदान आणि प्रदान यांची क्रिया जेथे पूर्ण होते म्हणजे येथे संदेश गेला, तो समोरच्याने ग्रहण केला हे मला समजले, म्हणजे भाषेचे काम पूर्ण झाले. याठिकाणी संवाद घडतो म्हणून ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ''ये हृदयीचे त्या हृदयी घातले.''

प्रशासकीय क्षेत्रातील लक्ष्मीकांत देशमुख, शेखर गायकवाड यांच्यासारख्या ज्ञानवंत अधिकाऱ्यांसोबतही स्नेहाचे संबंध आहेत. अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य करत असताना नरेंद्र दाभोळकरांसोबत काम केले. नरेंद्र दाभोळकर हयात असताना काही वर्षे मी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे महाराष्ट्र राज्याची प्रदेशाध्यक्ष म्हणून कामही केले आहे.

बालपणात पुण्यात विद्यानिधी सिद्धेश्वर चित्रावांचा सहवास मला लाभला, तर आयुष्याच्या उत्तरार्धात अशाच एक आंतरराष्ट्रीय किर्तीच्या ज्ञानवंतासोबत प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळाली. वाई येथील प्राज्ञ पाठशाळेतील व संस्कृतचे मोठे विद्वान आदरणीय लक्ष्मणशास्त्री जोशी

यांचे विश्वकोशाच्या प्रकल्पाचे काम चालू होते. त्यांचे अठरा-एकोणीस खंडांचे काम पूर्ण झाले. त्यानंतर त्यांना लोकसंस्कृती या विषयावर काम करायचे होते. त्यासाठी मला त्या विभागाची अतिथी संपादक म्हणून धुरा सांभाळण्याची विचारणा करणारे लक्ष्मणशास्त्री जोशींच्या स्वाक्षरीचे पत्र मला आले. हा माझ्यासाठी मोठा सन्मान व जबाबदारीही होती. हे काम करताना मी महिन्यातील पाच ते सहा दिवस लक्ष्मणशास्त्री जोशींच्या वाईच्या वाड्यात अभ्यासकांसाठी असलेल्या खोलीत राहत असे. यामुळे त्यांच्याकडून केवळ अभ्यासाशी निगडित नव्हे, तर घरगुती, वैयक्तिक आयुष्यातही अनेक गोष्टी शिकता आल्या. ज्ञानवंतांसोबत विरंगुळा म्हणून मारलेल्या गप्पांमधूनही अनेक बारीकसारीक गोष्टींचा प्रत्यय येत गेला. विशेष म्हणजे, ही दोन्ही शास्त्री मंडळी सनातनी नव्हती तर पुरोगामी होती. या अनुभवांचा उपयोग मला पुढे धर्माचा सखोल अभ्यास सुरू केल्यावर झाला. केवळ जुनं आहे म्हणून ते उच्च व उदात्त असे नसते, हे मी चित्रावांच्या वेदांवरील पुस्तकांतून शिकले. प्रत्येक काळात चांगले, वाईट, भले, बुरे हे असते. ते सारे एकाच वेळी असते. पण तो एक प्रवाह असतो. तो पुढे सरकत असतो. हा प्रगत विचार व भान या दोन्ही शास्त्रींनी मला दिले.

अशा रीतीने अनेक ज्ञानवंत माझ्या आयुष्यात आले, मी त्यांच्या सहवासात आले. त्यांनी माझे आयुष्य समृद्ध केले. आयुष्यात पैसा भरपूर कमावला नाही, मात्र या ज्ञानवंतांच्या सहवासात येण्याने मी खऱ्या अर्थाने श्रीमंत झाले.

❋ ❋ ❋

**लोकसंस्कृतीच्या नामवंत अभ्यासक, संशोधिका आणि ज्येष्ठ लेखिका असलेल्या डॉ. तारा भवाळकर यांनी नवी दिल्ली येथे पार पडलेल्या ९८ व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे.**






रेखा शहाणे

# जन्म आणि मृत्यू दोन्ही टोकं एकटेपणाशी बांधलेली असतात तरीही...



दुर्गा भागवत



अशोक शहाणे



अरुण कोलटकर

**एका वळणावर मला कॅन्सर निघाला. माझे आई-वडील सगळेच आजाराच्या नावानीच अर्धे खचून गेले होते. व्हिजिटर्स यायचे. त्यात नातेवाईक, माझे मित्र मैत्रिणी, सहकारी सतत कोणी ना कोणी येतच असत. अशोक शहाणे, दुर्गा भागवत, अरुण कोलटकर, रघु दंडवते, वसंत गुर्जर, राजा ढाले, सतीश काळसेकर, नंदू मित्तल, धरमसीभाई हे सगळे यायचे. बाकी त्यांना माहीत नसलेली ही मंडळीही यायची. खूप भरून आलं वडिलांना. आईला म्हणाले, फार मोठ्या ज्ञानवंतांच्या गोतावळ्यात सामील झालीय, ती. नि हा तर तिचा आप कमाईचा गोतावळा आहे...**

ज्ञानेश्वर म्हणतात,

कवणाचे मायबाप कवणाचे गणगोत...

नि आणखीही काही आठवतंय तसं...

'जळी जळें न लिंपे सूर्यु जैसा...

तैसा आत्मा देहीं... साचें तरी नेहीं

तो जेथिंचा तेथें...'

(जळात सूर्य भिजत नाही, तसा आत्मा देहात असला तरी तो अलिप्त असतो.)

'तैसा सर्वत्र देही आत्मा असतुचि असे पाहीं - संगदोषें एकेंही लिप्त नोहे'

(आत्मा देहात असतो पण त्याला देह धर्म लागत नाही. नातेसंबंध, देहधर्मानी तो बांधला जात नाही.)

धम्मपद म्हणते, 'अत्ता हि अत्तनो नाथो'

(तूच तुझा, स्वतःच स्वतःचा आधार आहेस.)

खरंतर जन्म, मृत्यू आणि अंतिम सत्याचा शोध ही माणसाची एकट्याची यात्रा आहे.

पण ते तितकंच असत नाही. जन्म-मृत्यूच्या मधली वाटचाल, नाती, प्रेम, कर्तव्य आणि संसार यामध्ये भावविभोर होत रंगलेली असते. पण अंतिम प्रवास आणि सुरुवातीचा प्रवास तो मात्र एकट्यानेच करायचा असतो, हे ही खरंच.

आता संस्कृतमध्ये, प्रथम पुरुष एकवचन, याला संस्कृतमध्ये उत्तम पुरुष म्हटलेलं आहे. अहम्-मी. कारण तोच खरा. असं आम्ही वगैरे खरं नाही. काल्पनिक आहे ते. माझ्यासारखे अनेक, अशी समजूत करून घेऊन म्हटलेलं आहे ते. त्यामुळे अनेकवचन खरं नाही. एक माणूस खरा. त्याच्यापुरता. मधल्या मध्ये त्यामधून एक वाट निघते. आम्ही.

**एक सजीव आरसा**

समाज भरपूर असतात आपल्याकडे. एकटं असण्याची भीती वाटते, ते गोतावळा जमा करतात. जिथे गर्दी असते तिथे जातात. आपल्या सारखे अनेक आहेत असं समजून जातात. समज आहे ना. गोतावळ्यामध्ये समजुतीचा भाग भरपूर आहे. त्यामुळे ती पंचाईत आहे. त्यांना बाजूला करावे.

ज्याचा त्याचाही गोतावळा असतोच की.

पण गोतावळा म्हणजे फक्त माणसांची यादी नाही, तो गोतावळा म्हणजे तुमचं संपूर्ण वैयक्तिक, सामाजिक आयुष्य, म्हणजे तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा जणू एक सजीव आरसाच. तो ही जन्मापासूनचा नि मृत्यूपर्यंत सोबत चालणारा.

'ये साते आलिया ओळंगा सारंगधरु...

कवणाचे मायबाप कवणाचे गणगोत'

हे शिवरामबुवा वरळीकरांच्या तोंडून ऐकलं. साथीला बळवंतबुवा नि पखवाजावर अर्जुन शेजवळ. संध्याकाळी उशीरा पर्यंत ज्ञानोबा ऐकत होतो. अरुण कोलटकरही बरोबर होते.

तेंव्हा वाटलं ज्ञानोबाराय काय करतात, तर सगळ्यांना एका तागडीत टाकून समोर सारंगधराला उभं करतात. तो खरां, बाकी कोणी त्यांना आपले वाटत नाहीत.

तरी ज्ञानेश्वरांना आपण मराठीतच लिहिणार म्हणताना स्वतःसाठी एक केस उभी करावी लागली. 'माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृताते हि पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन'

ज्ञानोबारायांनी संस्कृत भाषेशी फारकत घेत प्राकृत भाषेला आपलीशी केली.

आणि ज्ञानदेवांनी नि या गोतावळ्यानी सोवळ्यातल्या देवालाही ओवाळ्यात ओढलं. ज्ञानदेव समाधिस्त झाले. तरी त्यांच्या भोवती गोळा झालेला गोतावळा आजही ग्यानबा-तुकाराम म्हणत विठ्ठलाला उराउरी भेटण्यासाठी वारीबरोबर पंढरपूरला लोटत असतो. आणि या ग्यानबा-तुकारामाच्याच खांद्यावर मराठी भाषा उभी आहे.

पण मग वाटतं गोतावळ्याला एक सापेक्ष खरेपण आहे. त्याचा खरेपणा स्वप्नाइतकाच. ते परम सत्य नाही. तो मिथ्या आहे. असो. पण गोतावळा असतो.

गोतावळा म्हटल्यावर मला माझ्या वडिलांची आठवण येतेय.

एका वळणावर मला कॅन्सर निघाला. व्हिजिटर्स यायचे. त्यात नातेवाईक, माझे मित्र मैत्रिणी, सहकारी सतत कोणी ना कोणी येतच असत. आणि दुर्गाताई तर रोज यायच्या. येताना स्वतः बनवलेला काही खाऊ घेऊन यायच्या. निघताना, स्वतःच्या हातानी लिहिलेलं काही देऊन जायच्या. जेमतेम पानभर असायचा मजकूर. पण पुरेसं खाद्य असायचं ते. मग दुसऱ्या दिवशी त्यावर बोलायचो.

माझे आई-वडील सगळेच आजाराच्या नावानीच अर्धे खचून गेले होते. अशोक शहाणे, दुर्गा भागवत, अरुण कोलटकर, रघु दंडवते, वसंत गुर्जर, राजा ढाले, सतीश



बटरफ्लाय मॅन ऑफ इंडियाः आयझॅक केहीमकर
आणि रेखा शहाणे

काळसेकर, नंदू मित्तल, धरमसीभाई हे सगळे यायचे. बाकी त्यांना माहीत नसलेलीही मंडळीही यायची. खूप भरून आलं वडिलांना. आईला म्हणाले, फार मोठ्या ज्ञानवंतांच्या गोतावळ्यात सामील झालीय ती. नि हा तर तिचा आप-कमाईचा गोतावळा आहे. माझा काही संबध नाही त्याच्याशी.

त्यात गोतावळा जर ज्ञानवंतांचा असेल तर गोतावळ्यातला, जो-तो, त्याच्या कुवतीनुसार ज्ञानकण वेचतो. त्यापेक्षा अधिक नाही.

मला दुर्गाताईची आठवण येतेय. त्यांचा स्नेह, प्रेम मला शेवटपर्यंत भरपूर मिळालं. अशोक आणि मी, दोघेही, त्यांनी घालून दिलेल्या गोधडींची उब आजही पांघरतो. आता गेल्याएत मात्र त्या.

महाभारतावर चर्चा करताना त्या एकदा म्हणाल्या, उडणाऱ्या पाखराची पावलं जशी आकाशावर उमटत नाहीत, तशी ज्ञानी माणसाची पावलं जमिनीवर उमटत नाहीत. त्यांचा मार्ग बाकी कोणाला दिसतं नाही. त्यामुळे त्याच्या मागे कोणी जात नाही. तो मार्ग वाट न दाखवणारा असला तरीही प्रेरणा देणारा मात्र आहे. आणि हा मार्ग प्रत्येकाने स्वतःचा स्वतः अनुभवायचा आहे. धम्मपदात हे येतं. महाभारतात तसं धर्मराजाचं होतं.

त्या काळात मी महाभारतानी झपाटून गेले होते. तेंव्हा जमेल तसं एशियाटिकमध्ये बसून महाभारतावर काम करत होते. भरपूर नोट्स आणि निरीक्षणे टिपून ठेवत होते. दुर्गाताई, आणि अशोक शहाणे बरोबर होते. अशोकमुळे महाभारतावरची बंगाली पुस्तकंही हाती यायची आणि ते त्याच्याकडून सहज समजून घेता यायचं. तब्येतीमुळे मग ते ही सगळंच राहून गेलं.

माझ्या आजारपणाच्या काळात अशोक आणि दुर्गाताई दोघेही माझी खूप काळजी घेत. आणि हे नंतर ही तसंच चालू राहिलं.

त्या काळात गायीच्या दुधाखेरीज, इतर सगळे प्रोटिन्स डॉक्टर्सनी बंद केले होते. अशोक, रोज, तबेल्यातलं गायीचं दूध ऑफिसमध्ये सकाळी अकरा वाजता आणून द्यायचे. संध्याकाळी सहावाजेपर्यंत ते सगळं पाऊण लिटर दूध संपलेलं असावं लागायचं. डॉक्टर वाक्यं प्रमाणम्. अशोकचा तो कटाक्ष होता. माझी त्यातून सुटका नव्हतीच.

नि थंडीपावासाच्या दिवसात जर चुकून माझा स्वेटर-शाल ऑफिसमध्ये राहिली तर दुर्गाताई स्वतःच्या हातांनी त्यांचा स्वेटर मला घालत. वर म्हणायच्या, अग, घरी माझा डॉक्टर भाऊ आहे. माझी काळजी नको करूस. चल.

दुर्गाताई आणि अशोक दोघेही अगदी डॉक्टरांकडेही येत असत. लिहावं तितकं थोडंच. पण या सगळ्यातून मी घडत होते.

**गुरुचं असणं...**

दोन वर्षांपेक्षा अधिक काळ मी दुखणं सहन करत होते. वेदना प्रचंड तीव्र असत. इतक्या की ऑपरेशन झाल्यावर मी शुद्धीवर आले तेंव्हा पहिला प्रश्न मी विचारला. 'हे काय... माझं दुखणं कुठे गेलं... मला इकडे कुठे आणलंय तुम्ही? मी कुठे आहे?...' यावरून मुळच्या वेदनेची कल्पना येते, इतकंच

पण हे दोघेही माझी अपार काळजी का घेत होते, हे मला तेंव्हा कळलं, जेंव्हा, आजारापेक्षा इलाजच भयंकर निघाला.

माझा उजवा पाय अर्ध्या कमरेसकट (पेल्व्हीस बोन) कापून टाकायचा. युएसएमधल्या स्लोन्सकडेही या कॉंड्रोसारकोमावर हाच इलाज होता. कारण हा आजार, केमो, रेडिओ थेरपीला दाद देत नाही. आता हे मला सांगायचं कसं? हा मोठाच प्रश्न होता. असो.

तसं धम्मपदातलं,
'एकचरं चरिस्सामि,
अलोनं वनगोचरं।

नत्थि मे साथी समस्सु,

एकाकी चरितं शिवं।।'

म्हणजे, मी एकटाच भटकत जाईन, जणू एखादा हत्ती जंगलात एकटा फिरतो.

माझा साथी नाही, माझं सुखी जीवन हे एकाकी आहे.

मला स्वतःला हे खूप खरं आणि जवळचं वाटतं.

माझ्या नादिष्टपणात रानावनात एकटीही हिंडताना, मी हे अनेकदा अनुभवते. ते एक माझं दुसरं स्वतःचं विश्व आहे. त्यात मी पुरती गुंतून पडलेली असते. ते असो.

मनात येतं की इंग्रजीमध्ये to learn आणि to teach अशी दोन वेगळी क्रियापदे आहेत. आपल्याकडे क्रियापद एकच आहे. शिकणे. त्याचं प्रायोजक रूप म्हणजे शिकवणे. म्हणजे 'शिकवणे' ही स्वतंत्र क्रिया नव्हे. तर शिकणं खरं. आणि हे मी लहानपणापासूनच आत्मसात करत गेलेय.

आजी दत्ताची उपासक. तिच्याकडून मी शिकले की ज्ञान सर्वत्र आहे. 'मी शिष्य आहे' ही भावना असेपर्यंत, गुरु मिळतच राहतो. न बोलणाऱ्या सर्वांकडून दत्तगुरु शिकले. हे मला खूप माझंमाझं वाटतं.

समुद्र, नदी, डोंगर, प्राणी, झाडं, फुलं, पक्षी, फुलपाखरं-पतंग-त्यांच्या अळ्या, मुंग्या, प्रेइंग मँटीस, अगदी पायवाटांकडूनही नि न जाणे कितीकांकडून मी काय शिकले, पण हे सगळे माझे गुरु आहेत.

निसर्ग बोलत असतो तुमच्याशी. त्याला ऐकता यायला हवं. त्याची भाषा आपल्याला कळायला हवी. नि ती तशी कळतेही. निरीक्षणा-अभ्यासाबरोबर ती वाढत जाते.

मुंबईत आल्यावर पार उशिराच मग बीएनएचएसबरोबर मी रीतसर ऑर्निथॉलॉजी, बॉटनी, एन्टोमोलॉजी (पक्षीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, कीटकशास्त्र) इ. शिकले.

अलीकडे आणखी एक वर्च्युअल गोतावळाही असतो. यामुळेच एन्टो शिकताना मी (मॉथ मॅन) रॉजर केंड्रीक आणि डग्लस यानेगा या दिग्गजांच्या संपर्कात आले. खूप शिकले मी यांच्याकडूनही.

फुलपाखरांचा अभ्यास खूप नंतर मी एन्टोमोलॉजीमध्ये केला. आणि या अभ्यासात आयझॅक केहीमकर मला गुरुस्थानी आहेत. सगळे मेंबर्स पक्षी निरीक्षणात अडकलेले असताना, १९८४च्या आगेमागे आयझॅक स्वतंत्रपणे फुलपाखरांचा अभ्यास करत असत. आता 'बटरफ्लाय मॅन ऑफ इंडिया' ही त्यांची ओळख आहे.

मुंबईच्या इतिहासात कधीही न आढळलेलं 'ब्लॅक प्रिन्स' हे फुलपाखरू मला मालाड, मुंबई येथे सापडलं. आणि हा एकमेव रेकॉर्ड आजपर्यंतही तसाच आहे. डॉ. अल्मेडांबरोबर 'त्याच्या लार्व्हल होस्ट प्लांट संदर्भातलं पुढचं', हे एक आणि 'दीपकाडी कोकनेन्सीवरचं दुसरं', अशी दोन्ही कामं नंतर तब्येतीमुळे राहूनच गेली. नि आता बटरफ्लाय गार्डनसाठी विचारलं तर विनामूल्य मार्गदर्शन मी जरूर करते. अशा बागा फुलपाखरांनी आपल्याशा केल्या की ते पाहताना मन हरखून जातं.

**वेदनेचं गाणं**

एकूणातच मी मुळची कवयित्री. साहित्य, नाटक, सिनेमा, चित्रकला, लोककला, लोकसाहित्य, फोटोग्राफी, इको सिस्टिम पर्यावरण काही का असेना, कोणतीही क्रीएटिव्ह आर्ट मला आकर्षित करते.

अभ्यास होतो. वाचनही खूप होतं. वाचतावाचता आजही नोट्स काढतेच. तब्येत आपली मनमानी चालू ठेवते. पण मग पुढचं सगळं जागच्या जागी राहून जातं ते जातंच.

तब्येतीमुळे कोणत्या शारीरिक मर्यादांना कधी सामोरं जावं लागेल, याचा अंदाज येत नाही. पण असा प्रत्येक नवा पाडाव माझ्यात लपलेल्या वेगवेगळ्या कलांना संधी देत गेला. तरी कोणत्याही एकाच क्षेत्रात काम करत राहायची ऐश मला कधीही करता येत नाही, ह्याचं माझ्याबरोबर अनेकांना वाईट वाटतंच.

पण माझा दिवस मी आनंदात जगत असते. कोणत्या तरी क्रीएटिव्ह आर्टमध्ये मी गुंतलेली असते. मला वाटतं, त्या माध्यमाच्या भाषांतून मी व्यक्त होत असते. ती उर्जा, वेदनेपासून एका वेगळ्याच विश्वात घेऊन जाते. जीवनाचं नवं गाणं गात जगायला शिकवते. वेदना खूप काही शिकवते.

रवींद्रनाथांकडून मी एक शिकले.

'बिपदे मोर रख्खा कोरो ए नेह मोर प्रार्थना… बिपदे आमी जानो ना कोरी भय…'

('संकटात तू माझं रक्षण कर ही माझी प्रार्थना नाही तर संकटात मला भय वाटू देऊ नकोस')

जे मनात येईल, ते मी त्यावेळी झपाटून आनंदात करत असते. आणि कैकदा सुरु केलेलं काम हातावेगळं करण्यापूर्वीच

मी थांबून गेलेली असते. काही करताना मी जीव ओतलेला असतो त्यात...नि तो विषय कधीही बंद करावा लागेल याचं भान मला नसतं. पण एकाच विषयावर फोकस करता येत नाही, याचं मला मनापासून वाईट वाटतंच.

काय होतं, नंतर पुन्हा त्या कागदांना हात लावणं, पुन्हा त्या मूडमध्ये जाणं, ते सगळं आठवणं, लिहिणं अगदी नको वाटतं. तेवढं बळ आलेलं नसतं माझ्यात. त्यात लिहिण्याचा मला जन्मजात कंटाळा आणि आळस...!

त्यात माझी स्पर्धा फक्त स्वतःशीच असते. मी त्या कसोटीवर उतरते. तेंव्हा तो आनंद माझामाझा असतो. ते बळ टिकवून ठेवायचा प्रयत्न मी आजवर करत आले आहे. ते तसंच राहो. तर असो. पण या ना त्या निमित्ताने, वेगवेगळ्या जाणकार व्यक्तींच्या संपर्कात मी येते. हा खूप जमेचा भाग आहे. मी नादिष्ट आहेच, पण अशोक, दुर्गाताई, अरुण यांच्याकडून, काही करत राहण्यामधली शिस्त नि सातत्य मी शिकत गेले.

खूप लहान असल्यापासून माझं एक जोरदार म्हणणं असायचं, कुठे बाहेर गेलो नि कोणी तिकडे जाऊ नको म्हटलं की माझं सुरु... ओ तात्या, पण मी जगातला पहिला माणूस असते तर...? तर... मी गेले असते ना ? मी नाही ज्जा. आत्ताही मी तेच करणार...

बरं. मग काय करायचंय तुला, बाबा हात धरून तिकडे घेऊन जाताना वेगळीच गोष्ट सांगायचे. सगळं विसरून मी गोष्टीत रमून जायचे. नि वेताळाच्या भलत्याच प्रश्नानी भंडावून न जाता बाबा पक्ष्यांफुलांकडे लक्ष वेधायचे. आता वाटतं, न कळतच, पण हे गोतावळ्याबद्दलचंच माझं म्हणणं होतं असेल, बहुदा...

पण गोतावळ्याशिवाय कोण असतोय? म्हणताना, प्रश्नही पडतो.

**प्रेमळ सखे असूनही...**

'शेकडो प्रेमळ सखे असूनही मला एकटे वाटते व माझे डोळे भरून येतात.' साने गुरुजी म्हणाले होते. का?

पंढरपूरच्या मंदिरात दलितांना प्रवेश मिळावा म्हणून आमरण उपोषण त्यांनी केले. आणि दलितांना प्रवेश मिळालाही. पुरुष असूनही नको तितके संवेदनशील होते ते. 'तुमच्यासारख्या लोकांच्यात जगायची आता मला इच्छा



भिजकी वहीचे... सुखद क्षण

नाही' असंही एकदा म्हणाले होते ते. आणि ११ जून १९५० मध्ये गुरुजी या जगात राहिले नाहीत. ते स्वेच्छेनी गेले.

गुरुजींचा मृत्यू ही त्यांच्या जीवनातील मंगल घटना होती. गुरुजींच्या जीवनाची ती उदात्त अखेर होती. हे काहीही असलं तरी गुरुजी गेले, ही गोष्ट मनातून आजही वजा करता येत नाही.

'प्रेमळ सखे असूनही मला एकटे वाटते...' ते म्हणतात. हे आठवलं की आपल्यालाही वाईट वाटतं नि आपले डोळे आजही भरून येतात.

असं काय शोधत असतं मन, स्वतःपासूनही इतकं दूर जातं, दुसऱ्या कोणाजवळ जावं, बोलावं, असा दिलासा दूरवरही दिसतं नाही त्याला... स्वतःला स्वतःचाही आधार वाटत नाही. इतकं निराधार होणं, नेमकं काय होतं? पुढे असं निराधार होणं म्हणजे काय हे माहीत झालं. पण गुरुजींनाही असं वाटलं हे समजून घेणं आजही अवघड वाटतंच.

पण मग वाटतं, चिरीमिरीतल्या एका कवितेत, 'भले त्याच्यापेक्षा नाहीच मी मरत' म्हणणाऱ्या बुळवंतबुवांमध्ये हे येतं कोठून? तर हे एक त्या बळवंतबुवानाच माहीत, नाहीतर अरुण कोलटकरला माहीत.

पण बुवा म्हणायचे, तं काय, तो यम आला की त्याला तेव्हढी ती हरिनामाची चिरीमिरी द्यायची की झालं. पण कसलं काय, यम काही बधला नाही तो... ते आधीच गेले.

**निव्वळ आत्ता**

कवितेत न मरणाऱ्या या दोघांपैकी, अरुणचं मरण मी अगदी जवळून पाहिलं. आज, आत्ता, या क्षणाला जे त्याला होतंय, तेवढंच खरं. त्याबद्दल तो बोलायचा. काल, उद्या, परवा, नंतर, अशी कल्पना करून तो कधीही काही बोलला नाही. निव्वळ, आत्ता, या क्षणाचं असणं त्याच्यासाठी खरं होतं. इतकं 'क्षणात' जगणं-असणं आणि प्रत्यक्षात शेवटच्या क्षणापर्यंत तसं जगता येणं हे म्हणजे अशोक शहाणे यांनी त्याला 'तथागत' म्हणेपर्यंत, हा शब्द माझ्या डोक्यात कुठे हजरही नव्हता.

गौतम बुद्धानंतर दुसरा तथागत नाही.

ज्ञानवंतांचा गोतावळा म्हणताना मला एकदम हे सगळं आठवलं...

शेवटच्या दिवसांत अरुण-सुनु पुण्याला अरुणच्या भावाकडे होते. तर जन्माबरोबर आलेला गोतावळा शेवटी त्याच्या बरोबर होता. नि त्याचा आप-कमाईचा गोतावळाही त्याच्याबरोबर तो जाईपर्यंत होताच.

म्हणजे 'वे साइड इन'मध्ये भेटायचा वार गुरुवार झाला. कारण त्यावेळी अशोकला गुरुवारी सुट्टी असायची. त्यालाही कारण होतं, त्या काळात मुंबईत विभागवार लोडशेडिंग व्हायचं. आणि शिवडीला गुरुवारी वीज नसायची. मग प्रेसला सुट्टी. अशोक मोकळा असायचा. म्हणून ते गुरुवारी भेटायचे.

या आजारपणात अरुणनं मुंबई सोडली. पुण्याला गेला, पण दर गुरुवारी अशोक पुण्यात अरुण बरोबर असायचा. वाटलं, तर कमी अधिक दिवस राहिलाही.

तेंव्हां रघु दंडवते नगरला होता.

अशोक रघुला म्हणाला, रघ्या, बघ, जमलं तर तू पुण्यात ये. आलास तर रोज भेट तरी त्याला. मग रघु मध्येमध्ये त्याच्याकडे जायचा.

अरुण गेल्यानंतरही बाकी मित्रांचं गुरुवारचं हे भेटणं चालूच होतं. चहा प्यायला, हे असं नेमानं गुरुवारी कैक वर्ष भेटत राहाणं ही एक खूप अपवादात्मक, अविश्वसनीय, पण फार गोड गोष्ट आहे. करोनाबरोबर सगळंच बदललं.

अरुण आजारी पडला तेंव्हा मात्र मीही शक्य असेल तसं गुरुवारी, मंगळवारी भेटायला जात असे. दर रविवारी अशोक कैक वर्षांपासून त्याच्या घरी जायचा. बरोबर रघुदादा असायचा. आता जमेल तसं रविवारी मीही बरोबर जात असे. हॉटेल रामदेवमध्ये मंगळवारी धरमसीभाईही असत.

दरम्यान, अरुणचं वजन झपाट्याने कमी कमी होत होतं. मग आणखी कोणी नाही, पण अशोक-रघूदादा गुरुवारी अरुणच्या घरी जायचे. नेहमीच्याच उत्साहात ते एकमेकांना भेटायचे.

आता अरुणनी कविता हातावेगळ्या केल्यावर, केवळ काही महिन्यांत, भिजकी वही, द्रोण ही मराठी आणि काळा घोडा पोएम्स, सर्पसत्र ही इंग्रजी अशी एकूण चार नवी देखणी पुस्तकं, 'प्रास'नी तो असतानाच प्रकाशित केली. नि चिरीमिरी, अरुण कोलटकरच्या कविता यांच्या पुढल्या आवृत्याही.

हे सगळं करताना अशोकवर येणारा ताण मी प्रत्यक्ष पाहात होते. तो दाखवत नसे. पण तो दिसायचा.

त्यात 'प्रास' हा सगळा हौशीचा मामला आहे. कमर्शिअल प्रपोझिशन कधीच नव्हतं ते आणि नाहीही. तर पुस्तकं प्रेसमध्ये मार्गी लागत होती. सुजित पटवर्धन स्वतः जातीनं लक्ष घालून होता.

पुस्तकं प्रेसवरती आणि इकडे अशोकच्या डोक्यात दुसरंच काही घोळत होतं.

त्यांनी प्रेसमध्ये काम चालू असलेल्या, अरुणच्या सगळ्या पुस्तकांच्या रॉयल्टीचा हिशेब आधीच केला नि म्हणाला, अजून काही पैसे लागतील. या पुस्तकांची ॲडव्हान्स रॉयल्टी अरुणला देऊया. औषधपाण्यासाठी लागले तर पैसे असू देत त्याच्याजवळ.

'अरे, तुला प्रेसची बिल येतील. ठेव तुझ्याकडेच. नंतर बघू.'

'नाही. त्याचा विचार तू करू नकोस, पैसे तुझेच आहेत. ठेव. लागतात कधीही' अरुणनी पैसे सुनुकडे दिले. म्हणाला,

**असं काय शोधत असतं मन, स्वतःपासूनही इतकं दूर जातं, दुसऱ्या कोणाजवळ जावं, बोलावं, असा दिलासा दूरवरही दिसतं नाही त्याला... स्वतःला स्वतःचाही आधार वाटत नाही. इतकं निराधार होणं, नेमकं काय होतं?**

हे असू देत. बाजूला ठेव.

अरुण गेल्यावर सगळी उस्तवार करताना ते पैसेही त्यात होते. सुनुनी अशोकला फोन करून बोलावून घेतलं. म्हणाली, अशोक, हे पैसे नाही लागले. पैसे घेऊन जा. तुझे आहेत ते. लागतील तुला... अशोक म्हणाला, अग अरुणचेच आहेत. माझे नाहीत ते. तुझ्या खात्यात भर.

पैशाबाबत इतका निःस्पृह, निःस्वार्थ, निरिच्छ नितळ विचार खचितच कुठं होत असावा... आणि तो ही मराठी पुस्तकं विश्वातल्या रॉयल्टीच्या संदर्भात... सोन्यासारखी माणसं ही सगळी.

''बळवंतबुवा'' प्रसिद्ध करायचा तर काय काय करावं लागेल याबद्दल, अरुण स्वतः काही वर्षांपासून विचार करत होता. त्यातली नावं बदलावीत का? बदलली तर काय असावीत? काही नावांचा विचार झाला.

पण वकिली दृष्टिकोनातून ते तेवढं पुरेसं आहे/नाही म्हणताना तो विचार पुढे गेला नाही. एकूणात अरुणच्या पद्धतीने अरुण त्यावर काय करता येईल, याचा शोध घेत होतां नि खात्रीशीर काही हाती लागत नव्हतं. यावर ते सगळं तिथेच थांबलं.

अशोक या सगळ्याचा आपसूकच अविभाज्य भाग होता. साक्षीदार होता. तरी हे सगळं, मुंबई सोडायच्या आदल्या दिवशी अशोकला आणि मला मुद्दाम बोलावून, अशोकशी पुन्हा बोलून, चर्चा करून सांगितलं, की बळवंतबुवा काढायला अजून तीसेक वर्ष तरी थांबायला हवं असं मला आज वाटतंय. आणि सगळं तुझ्यावरच येऊन पडेल. मी असणार नाही. तर आता पुण्याला पोहोचल्यावर जमेल तसं अरविंदबरोबर 'बोटराइड'चं काम उरकून घ्यावं म्हणतोय. तर पुण्यात ये.

पुस्तकं काय प्रेसमधे दिली की तयार होतात, अशी समजूत असते अनेकांची पण इतकं सोपं असत नाही ते. असो. हा एक छान शब्द आहे मराठीतला.

त्याचा कॅन्सर शेवटचा स्टेजचा होता. वेदना होत होत्या. औषधोपचार चालू होते. कशाचाही उपयोग होत नव्हता. नि एका क्षणी सगळी धुगधुगी त्याला सोडून कायमची निघून गेली. त्याचे डोळे बंद झाले.

कोणाचही मरणं दुःखदच, पण मरणाचं हे रूप पाहाणंही आश्वस्थ करणार आहे. जगण्यातून स्वतःला सोडवून घेणं, देह सोडून निघून जाणं हे सहज झालंही. हा अरुण कोलटकर होता.

'तथागत'. अशोकनी आपल्या जाणाऱ्या मित्राला एक फार सुरेख शब्द दिला!

असं इतकं सहजपणे असणं-नसणं नुसतं स्वीकारता नाही, तर जगता यायला हवं. जातां जाताही 'कवीचं असणं-नसणं' त्याच्या कवितांइतकंच देखणं करून अरुण नाहीसा झाला.

असं म्हणावं, तर 'पण मेला भात करपतो' म्हणताना तो आपल्या आजूबाजूला कुठे तरी अवतीभोवतीच असतो.

या सर्वांपेक्षा मी खूप लहान. पण या सगळ्या ज्ञानवंतांच्या गोतावाळ्याचाच एक भाग मी कधी होऊन गेले, हे मलाही कळलं नाही. आणि कोणाकडून मी काय शिकले..?

एकाकडून असेल तर गोष्ट वेगळी, पण हे म्हणजे मोठं अवघडच आहे! कारण ते सगळे माझ्या जगण्याचाच भाग होऊन गेलेत!!

आणि अशोक म्हणजे, तर या एवढ्या मोठ्या जातिवंत जिवंत काळाचा स्वतःच एक मोहरा आणि चालतांबोलतां इन्सायक्लोपेडीयाच बरोबर असल्यामुळे आजही बोलतांबोलतां ते दिवस अधिक जिवंत होऊन जातात.

**योग ज्ञानवंताच्या भेटीचा...**

अगदी योगायोगानेच, अरुणची आणि माझी पहिली भेट 'वे साइड इन' मधेच झाली. म्हणजे, त्या दिवशी, गावाहून निघालेली एसटी, सुसाट मुंबईत येऊन पोहोचली होती. साडे नऊही वाजले नव्हते. मी चर्चगेटला होते. पाहते तर समोर अशोक. म्हणाला, अग, आज एवढ्या लवकरशी? ऑफिसला जायला भरपूर वेळ आहे अजून. चल.

आम्ही गेलो. टेबलावर, अरुण, रॉयन आणि कुणी एक बसलेले होते. ही रेखा. अशोकनी माझी ओळख करून दिली. बरं मग तू काय खाणार? म्हटलं नाही. खायला नको. मग चहा घेणार की..? कॉफी बरोबर सँडवीचही होतं.

मी तर त्या हॉटेलातही पहिल्यांदीच जात होते. जेमतेम विशीतली मी. ना कोणाला ओळखत होते... ना मुंबईला... तर अरुणचा शिरस्ता मला माहीत असणं शक्यच नव्हतं.

पण ब्रेकफास्ट झाला की लगेच अरुण त्याच्या ठरलेल्या पानवाल्याकडे जाऊन पान खाऊन येत असे. मग बिल देऊन सगळे आपापल्या वाटेला लागायचे.

नि त्या दिवशी नेहमीप्रमाणे तो पान खायला गेला. इकडे वेटरनी बिल आणून ठेवलं. भरगच्च बिल होतं. पर्समध्ये पैसे होते. मी बिल दिलं. दरम्यान अरुण आला. पाहिलं नि म्हणाला,

'अर्रेऽऽऽ... पण आता तुम्हांला पैसे घ्यावे लागतील, नाहीतर मला वाईट वाटेल.'

'... .. आणि घेतले तर मलाही वाईट वाटेल.'

अरुण: 'पण मला तुमच्यापेक्षा जरा थोडं जास्त वाईट वाटेल... म्हणजे समजा, तुम्हाला जर तीन मिनिटं वाईट वाटलं तर... तर मला पाच मिनिटं वाईट वाटेल...'

'हं... म्हणजे प्रश्न जर किती वेळ वाईट वाटेल हाच असेल, तर मग तुम्हांला पाच मिनिटं वाईट वाटू दे...'

अरुण म्हणाला, तुम्ही म्हणजे एकदम न्यायाधीशांप्रमाणे... नि सगळेच एकदम हसायला लागले आणि आम्ही बरोबरच बाहेर पडलो.

ही अरुणची नि माझी पहिली भेट.

तेंव्हापासून नंतर कधीही बरोबर असलो की माझी कॉफी अरुणच तयार करून मला द्यायचा. म्हणजे, आमच्या घरी आला तरीही. तो ही त्याचा एक शिरस्ताच होऊन गेला.

दुर्गाताईंसारखंच अरुणचं आणि माझं नातं खूप गोड होतं. येताना मला तो वेगवेगळी चॉकलेट्स घेऊन यायचा किंवा बरोबर आणखी काही. त्यानी दिलेलं एक जॅकेट आजही माझ्याकडे आहे. तोपर्यंत जपून ठेवलेल्या गोष्टींचा एक डबा त्याने मला दिला आहे. अशा अनेक गोष्टी.

मी त्याच्याकडे कधी म्हटलं तर हट्टही करत असे.

दर रविवारी अशोक आणि रघु त्याच्या घरी गेले, तरी

साहित्यातल्या बंडाचे पाठीराखे



तब्येतीमुळे मी जाऊ शकत नसे. पण या दिवसात माझ्या काही टेस्ट बॉम्बे नाही तर जसलोक हॉस्पिटलला व्हायच्या. मग त्या दिवशी भेटायचा वार नसला तरीही अरुण येत असे.

या ऑपरेशनमध्ये मला कॉन्ड्रोसारकोमा (रिकरन्स) निघाला. हाडं सोडून रोग मांसात आला. सगळेच काळजीत होते. याची मला काहीही कल्पना येऊ दिली नव्हती. मी वाचत भरपूर होते. पण कवितेत रमत होते. कारण चटकनी वाचून व्हायची. पण संपायची नाही. मनात पुन्हा सुरु व्हायची. रुंजी घालत राहायची.

अशाच एका टेस्टच्या वेळी अरुण आला. आम्ही वेसाइड इन मध्ये गेलो. नि मी त्याच्याशी भांडण काढलं. कृतक पण थोड्या रागानंच मी म्हटलं, मला तुमच्या कविता वाचायच्या आहेत... 'बरं, मग असं करुया. आत्ता तुला त्रास होईल येण्याजाण्याचा. या रविवारी मी तुमच्याकडे येतो. कविता वाचूया. आहा!' मी एकदम खूश. अर्रेऽऽ... पण म्हणजे आता मला भांडायची संधी नाही तर... तू पायांवर छान धावायला लाग मग मारामारीही करायची... कबूल?...

मग दोन बैठकीत 'भिजकी वही' वाचून झाली. नि संदर्भाच्या अंगानी चर्चाही. मझा आया. अगदी 'त्रिमेरी' पासून 'सर्पसत्र' सकट एक मोठ्ठी मेजवानीच होती ती. अरुण, सुनु, मी, अशोक आणि रघुदादा. अरुण कविताही सुरेख वाचत असे.

पुढे कित्येक दिवस मी कोणत्याही कविताना हात लावला नव्हता. इतकी मी अरुणच्या कवितांमध्ये गुंतून पडले होते.

**अरुण म्हणे**

एक आठवण आली. मुंबई दूरदर्शनवर एकदा दिलीप चित्रेनी अरुणची मुलाखत घ्यायची असं ठरलं. अरुण, तू कविता कशा काय लिहायला लागलास? दिलीपनी पहिला प्रश्न विचारला.

अरुण म्हणाला,

'मला जन्माला घालताना देवानी सांगितलं, अरुण पृथ्वीतलावर जा आणि कविता लिही म्हणून मी कविता लिहायला लागलो!' असा अरुण बेभरवशी.

पंचाईत ना? मुलाखतकार करणार काय..?

आणि अरुणचं एरवीही म्हणणं होतंच की, मला जे म्हणायचं आहे ते मी कवितेत म्हटलेलं आहे. त्यापेक्षा

आणखीन काही मला म्हणायचं नाही.

नंतर कवींच्या मुलाखती ऐकताना अनेकदा मला हटकून याची आठवण येते.

अरुण दोन्ही भाषेत कविता लिहायचा. कविता मनात उतरली की, एक तर ती मराठीत येते, किंवा आली तर ती इंग्रजीत येते. त्यात ती एकाच विषयवस्तू संबंधित असेल तर ते एक्झॅक्टली एका कवितेचं दुसऱ्या भाषेत भाषांतर असत नाही. अशा कवितांचं भाषांतर होऊ शकत नाही. त्या कविता त्या त्या भाषेचा बाज बरोबर घेऊनच येतात.

आणि कविता येते ती स्वतःच्या अंगाने येते. तसं तुम्हाला दोन मुलं असली तर दुसरा मुलगा हे पहिल्या मुलाचं भाषांतर असू शकत नाही. ते मूल स्वतंत्र असतं. तशी इंग्रजी कविता आणि मराठी कविता या दोन स्वतंत्र कविता असतात. त्या स्वतंत्र कविता म्हणूनच पाहिल्या पाहिजेत असं त्याचं म्हणणं होतं. जाणकारांनी इंग्रजी जेजुरी आणि मराठी जेजुरी संग्रह पाहावेत.

एखाद्या कवितेचं भाषांतर करायचं म्हटलं तर, म्हणजे तीच कविता, दुसऱ्या भाषेत लिहायची म्हटली आणि पहिल्या कवितेवरनं लिहायची म्हटली, तर ते म्हणजे परत एकदा ती कविता लिहिण्याचा जो मूड होतां, त्याच्यात परत जा आणि भाषा मात्र डोक्यात वेगळी ठेवा आणि मग काय ओळी येतात ते पाहा. असं करणं म्हणजे महा कष्टाचं काम. म्हणजे डोक्याला कष्ट होतात आणि एरवी तरीसुद्धा भाषांतर करायचं म्हणून बसलं, तर ते म्हणजे आपण आपल्या मुलीबरोबर झोपल्यासारखा प्रकार होतो. असं एक त्याचं म्हणणं होतं.

त्यामुळे अरुणची इंग्रजी कविता ही इंग्रजी कविता आहे आणि मराठी कविता ही मराठी कविता आहे आणि त्या आपापल्या जागी ठीक आहेत. प्रत्येक कविता स्वतःच्या भाषेबरोबरच येते. त्यामुळे ती कविता दुसऱ्या भाषेत करणं ही अशक्य कोटीतली गोष्ट असते. कारण दुसऱ्या भाषेत केली तर ती दुसरी कविता होईल. ती, ती कविता असणार नाही. त्यामुळे कवितेचं भाषांतर एकप्रकारे संभवत नाही. असंही त्याचं म्हणणं होतं

दोन्ही भाषेत कविता लिहिण्याबद्दल त्याला एकदा कुणी विचारलं. तो म्हणाला, माझ्याकडे एक पेन्सिल आहे, जिला दोन्ही बाजूनी टोकं आहेत. एका टोकांनी लिहिलं तर मराठी कविता येते. दुसऱ्या टोकांनी लिहिलं तर इंग्रजी कविता येते.

कविता सुचते कशी याबद्दल अरुण एकदा म्हणाला, ‘की ओसाड माळावर आपण उभं असावं आणि पाऊस पडत असावा. विजा चमकत असाव्यात. एक वीज आपल्या अंगावर पडते आणि एक कविता होते.’

आणि एकदा मी विचारलं होतं. तेंव्हा म्हणाला, ‘समज, आपण एका ओसाड उंच डोंगरावर अगदी एकदम उंचावर उभे आहोत. चारी बाजूनी ढग एकदम दाटून आलेले आहेत. जोरदार वारा सुटलाय. ढगातून एकदम पाऊस कोसळतोय. आपण अगदी चिंब होऊन उभं आहोत आणि मधेच आरपार एकदम सणकन वीज चमकते. ते वीज चमकणं म्हणजे कविता असते. पण वीज अंगावर कोसळणं खरं. तेंव्हा एक कविता होते.’

आज पर्यंत कोणाला ना कवितेची व्याख्या करता आलीये. ना कवी असणं म्हणजे काय याचीही व्याख्या करता आलीय.

काही कवी असतात पण ते कविता लिहितील असं काही नसतं. त्यांचं कवी असणं महत्त्वाचं. त्याने कविताच लिहायला हव्यात असं नाही.

एकदा मनमोहन नातू अशोकना म्हणाले, ‘नाही कविता नाही करत. सध्या पतंग उडवतोय. चला. पाहा तरी मी कसा पतंग उडवतोय ते..’ हे म्हणजे कवी असणंच जणू.

जीवनानंद दास तर म्हणाले होते. ‘शकलेइ कोबी नोय केवू केवू कोबी!’ सगळेच कवी नसतात. कुणी कुणीच कवी असतात.

कविता वाचताना, लिहिताना ‘शकलेई कोबी नोय..’ ही गोष्ट कोणाच्याही मनात उतरावी.

मग मात्र कदाचित लिहिणाऱ्यांची फौजच, उत्तम वाचकांचीच फौज होईलही, कदाचित.

पण कविता लिहिली म्हणून जीवावर बेतेल अशा कविता लिहिणारे तसे कोणी आता आहेत का नेमकं माहीत नाही. अर्थात अलीकडच्या काळात म्हटलं, तर लेखनामुळे तस्लिमा नसरिन यांना मात्र देश सोडावा लागला. आजही ती तिच्या देशात जाऊ शकत नाही. असं क्वचित उदाहरण दिसतं खरं. यातला बाकी राजकारणापासूनचा आणि इतर भाग सोडून देवू. (इथे वेगळ्या अर्थाने पण हत्या झाली म्हणून दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी आणि गौरी लंकेश आठवू शकतात)

अरुण तसा स्वतःचा खाजगीपणा जपणारा माणूस होता. म्हणूनच त्याच्याकडे फोन कधीही नव्हता. त्याला वाटलं तर

आणि एरवी कामाच्या अंगानं, गरज असेल त्याप्रमाणे, तो स्वतः रोज सकाळी उठला की दूध, ब्रेड इत्यादी आणायला बाहेर पडला की पब्लिक बूथवरून स्वतः फोन करायचा. पण दुसऱ्या कोणाला त्याच्याशी संपर्क करायची संधी तो देत नसे.

आता उठसूट मोबाइलमध्ये डोळे खुपसून बसायच्या जमान्यात कोणाला आश्चर्य वाटेल, पण अरुणने स्वतः कधीही फोन घेतला नाही. त्याच्या शेवटच्या दिवसात त्याच्या बायकोकडे एक मोबाइल फोन होता. तो ती वापरात असे. आणि फार जवळच्या मंडळींना तो दिलेला होता. कोणाचा फोन आला तर कधी अरुण फोनवर बोलत असे. इतकंच.

अरुण तसा स्वतःच्या टर्म्सवर जगणारा. त्याचं एक क्लासिक उदाहरण म्हणजे, त्यानी चक्क पेंग्विन पब्लिकेशनला क्लासिक सिरीजमध्ये इंग्रजी 'जेजुरी' छापायला दिलेला नकार.

कारण होतं, त्या सिरीजमध्ये त्यांचा आकार ठरलेला होता. पुस्तक, त्या प्रमाणेच छापलं जाणार होतं. थोडक्यात, हातात आलेली कविता घ्यायची नि त्या ठरलेल्या आकारात कोंबायची. ओळी मागे ओळ, नि ओळी संपल्या की लगेच दुसरी कविता सुरु.

आता होणार काय होतं तर कवीने लिहिलेली एक ओळ ही मोठी असेल, तर तोडून तोडून छापणार ही लोकं. कवींनी लिहिलेली एक ओळ न मोडता एक ओळ म्हणूनच वाचता यायला हवी, असं अरुणचं साधं सरळ म्हणणं. ते जमणार नाही तर तुम्ही पुस्तक छापू नका. मी परवानगी देत नाही, हे अरुण थेट सांगू शकत होता. आणि पेंग्विनला नकार देऊन त्याचं कुठे काय बिघडलं? कसला आत्मविश्वास होता. कोणाच्याही नजरेतून हा वेडेपणाच होता. त्या काळातही नि आजही!

अरुण गेल्यावर एकदा सुनु-अरुणची बायको, अशोक शहाण्यांना म्हणाली, 'अशोक, अरुण फार कटकट्या होता. कोणाशी त्याचं जमायचं नाही. पण तुझ्याबरोबर कधी त्याचं काहीच बिनसलं नाही, याचं मला आश्चर्य वाटतं. एकदा पण, कधी काय झालं नाही तुमच्यात. असं आणखी कोणी मला आठवत नाही.'

आणि मी पाहिलंय, अशोक आणि अरुण यांना एकमेकांचं म्हणणं तत्क्षणी कळायचं. हां, ठीक आहे. दोन चार ओळीत एकमेंकांचं एकमेंकांना कळलेलं असायचं.



क्षण एक गोतावळा...

**गोतावळा सरे**

स्वतंत्रपणे माझं आणि सुनुचं नातं छान होतं. ती पारशी आणि प्रीस्टच्या घराण्यातली. आम्ही दुपारहून जायचो. ती चहा खूप छान करायची. पण प्लेन चहा नाही. आलं, पुदिना, तुळशीची पानं, गवती चहा असा कशाचा ना कशाचा छान नैसर्गिक स्वाद असायचा.

तेंव्हा माझा बॉयकट होता. मुळचेच माझे केस लांब, सरळ आणि दाट. ते वाढायचे भराभर. मोकळेच असायचे. अरुणकडून निघेपर्यंत साडेसात, पावणेआठ सहज वाजायचे. आम्ही निघायचो. तर सुनु आधी माझे केस वळायची. हेअरबँड लावायची नि म्हणायची, संध्याकाळी केस मोकळे ठेऊन नको जाऊस. कोणाची वाईट छाया पडली नाय पाहिजे. ती म्हणायची, 'तू येत नाही ती. तू आली की कशी पोझिटिव्ह वेव्ह येते. सगळ्याचं असं नाय होत. तू ये.' अरुण गेल्या नंतरही तिचे आमच्याशी असलेले संबध शेवटपर्यंत तसेच गोड होते.

तर असे अकस्मात सगळे पुढे पुढे जात राहातात.

दिवसागणिक, एकेक करत, इतिहासाची पानं चघळत, काळ गिळत राहातो दिवसांना.

त्याच्या पोटात गडप करत राहातो सरत्या क्षणांना. गोतावळा हळूहळू सरतो. धूसर होतो. विरतो...

आता करोना आणि नंतरच्या काळात न जाणे कितीजण कोणाकोणाला मुकले. सगळं असूनही, जिवंत असूनही कोणी कोणासाठी काही करू शकलं नाही. कोणाचे गणगोत नि कसला गोतावळा... अत्यंत एकाकी अवस्थेत, आपले

प्रियजन कोणीही कोणाच्या आजूबाजूलाही फिरकूही शकत नव्हते. अशा अवस्थेतून जग गेलंय. हे अंगावर येणारं होतं आणि आहेही.

मला इलियटची आठवण येतेय, तो म्हणतो,

'...... I had not thought
death had undone so many...'

कुणी म्हटलंय,

'गोतावळा पुढे जाई, आपले म्हणोनी कोणी नं सोडी'

किंवा

'आप्त म्हणोनी कोणाचे न होऊ
संसार मृगजळा सारखे आहे...'

तर नाकारावा म्हटला, तरी सहज बरोबर असतोच गोतावळा. तो कोणालाही चुकला नाही. तुमच्या जन्माच्या आधीपासूनच तो असतो. पुढे वाढत राहातो.

आणखी एक वाचनात आलेलं आठवतंय,

'गावगोत आला, गडबड झाली,
पाहता पाहतां धूसर झाली...'

तसं स्टॉईसिझममध्येही येतं की

You must depart alone. Your companions, possessions, relations are not truly yours.

(तुला एकट्यालाच जायचं आहे. तुझे सगेसोयरे, तुझी मालमत्ता, तुझे नातेवाईक कोणीही खरोखरचे तुझे नाहीत.)

तरी गोतावळा असतो. वाढत जातो, धूसर होतो, विरतो. आणि मधल्या मध्ये आयुष्याच्या प्रवासात, हसत खेळत, रडत भांडत, चुकतमाकत, शिकत, इच्छा आकांक्षा साकार करत, हरत, जिंकत ओठावर हसू ठेवत, प्रेमाचे, स्नेहाचे, प्रणयाचे हात एकमेकात गुंफून, सगळे सुखी संसाराची आस धरतात, घरं वसवतात. घरातल्यांना आणि स्वतःलाही सुखी करण्याचे स्वप्न पाहातात. आपल्या माणसांच्या चेहऱ्यावरचं हसू पाहताना ते अगदी आनंदी होतात. सारे कष्ट, श्रम, मान-अपमान सारं विसरून जातात. आपल्या गरजा नजरेआड करून ते सुखी झालेले असतात. याचा आनंद मानावा की दुःख... काहीही माना पण सुखदुःखांबरोबर जीवनाचा प्रवास एकमेकांच्या साथीने सुसह्य होतो.

आपल्या जन्माच्या आधीच गोतावळा आपल्या भोवती गोळा झालेला असतो. दुःखात ते आपल्या बरोबर असतात. आपल्याला एकटं वाटत नाही. आपलं बळ दहा हत्तींचं

**मला वाटतं, हे ब्रह्म, जे कोणत्याही जिवंत प्राणीमात्रात असतं. पण बुद्धीच्या देणगीमुळे मानवाचं तंत्रच वेगळं झालं आहे. त्याला या अंतिम सत्यापर्यंत पोहोचायचं असतं.आणि मार्गाचा मागमूसही दूरपर्यंत दिसतं नाहीच. हा सामान्य संसारी माणूस, अर्धवट काही समजतो. त्यासाठी धडपडतोय असंही त्याला वाटतं.**

होतं. आणि तेंव्हा तो गोतावळा तुमच्या भवती असतो. जीवाभावाची नाती, निखळ मैत्री, ही तुमची ताकद असते. त्यांच्याबरोबर आयुष्य अनेक रंगानी उजळून निघतं. सारे मोलाचे क्षण त्यांच्याबरोबर साजरे करताना ते क्षण इंद्रधनुष्यासारखे अनमोल होऊन मन रिझवतात. तेंव्हा तुम्ही गोतावळ्यात असता. गोतावळा असतो. असायला हवाच. नाहीतर आयुष्य वाळवंटावरच्या पाण्यासारखं कधीच नाहीसं होऊन गेलं असतं. पण तसं होत नाही. प्रेम ही जगण्याची असीम ताकद आहे. तेव्हा गोतावळा जमताना त्यात जे घडतं ते म्हणजे 'भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे' तर गोतावळ्यातला हा भाग खरा.

जो जे वांछील तो ते लाहो... ही ज्ञानेश्वरांची प्रार्थना सर्वांना सुखी करो.

गोतावळा स्मशानापर्यंतच येतो. करोनाने हेही आपल्या आयुष्यातच खोटं पाडलं. स्मशानापर्यंत जाणंही अशक्य होतं.. पुन्हा मनात येतं...कवणाचे मायबाप...

नित्शे सांगतोय,

"The individual has always had to struggle not to be overwhelmed by the tribe

(व्यक्तीला नेहमीच जमावात हरवू नये म्हणून झगडावं लागतं.)

आणि आदी शंकराचार्य सांगून गेलेत, 'ब्रह्म सत्यम्, जगत् मिथ्य' आणि हे ब्रह्म, सर्व अस्तित्वाला आधार देणाऱ्या अनंत, शाश्वत, अपरिवर्तनीय अशा वास्तवाचे प्रतिनिधित्व करते.

मला वाटतं, हे ब्रह्म, जे कोणत्याही जिवंत प्राणीमात्रात असतं. पण बुद्धीच्या देणगीमुळे मानवाचं तंत्रच वेगळं झालं आहे. त्याला या अंतिम सत्यापर्यंत पोहोचायचं असतं. आणि

मार्गाचा मागमूसही दूरपर्यंत दिसत नाहीच. हा सामान्य संसारी माणूस, अर्धवट काही समजतो. त्यासाठी धडपडतोय असंही त्याला वाटतं. पण त्याच्या पायात, मोले त्यांनीच बांधून ठेवलेला धोपट मार्ग त्याला त्याच वर्तुळात फिरवत राहातो. मनापासून तो कोणा गरजूला मदत करतो, कोणाचा जीव वाचवतो. आयुष्यात समोर येणाऱ्या कोणासाठीही भल्याची इच्छा करतो, जमेल ती मदत करत राहतो पण त्यामुळे काही तो अंतिम सत्यापर्यंत पोहोचत नाही.

कबीराचं सोडा.. त्याला तिथपर्यंत, त्या अंतिम सत्यापर्यंत पोहोचता आलं.

तो म्हणतो,

'जब मै था तब हरि नाही, अब हरि है मै नाही
सब अंधियारा मिट गया, दीपक देखा माही'

आणि संसारात राहून किंवा न राहून, अंतिम सत्यापर्यंत पोहोचलेलं उदाहरण मला तरी दिसत नाही.

जन्माबरोबरच कोणताही सजीव या पृथ्वीच्या सहअस्तित्वाचा भाग होऊन गेलेला असतो. माणूस त्याला अपवाद असू शकत नाही.

गोतावळा ही अनेक कारणांनी सहअस्तित्वाची देणगी आहे. ती अनमोल आहे.

बरोब्बर दोन वर्षांपूर्वी माझ्या पायाखाली जमीन होतीच कुठे?

निमित्त तापाचं नि अशोक अठरा दिवस आयसीयूमधेच होते. तेंव्हा हे सारं मी अनुभवलं. डॉ. अरुण बाळ सतत संपर्कात होते आणि माझी मैत्रीण डॉ. गीता सामंत आणि टीम यांच्या हातात अशोक सुखरूप आहेत हा माझा गीतावरचा सार्थ विश्वास होता. त्या काळात आपले गणगोत, गोतावळा आपले जीवाभावाचे मित्र मैत्रिणी नातेवाईक शेजारी-तुमची केवढी मोलाची ताकद बनून जाते, आपण एकटे नाही म्हणजे काय हे मी प्रत्यक्ष अनुभवलं. नावं नाही घेत. कोणाकोणाची आणि कितीजणांची घेणार? पण आमच्या या सर्व जीवाभावाच्या आप्तांची मी आजन्म ऋणी आहे. सगळ्या ज्ञानवंतांचं येणं-जाणं, भेटणं-बोलणं हा अशोकसाठी तर मोठ्या प्रसन्नतेचा म्हणूनच जणू ट्रीटमेंटचा भागच होऊन गेला होता. एरवीही अशोक आणि अंबरीशचं नातंच असं आहे की अगदी मोतीबिंदुच्या ऑपरेशनच्या वेळी नि आत्ता तर एकही दिवस असा नव्हता, की तो आणि त्याचे मित्र आले नाहीत. आणि मित्राही आली की ही तेच, कोणताही ताण एकदम हलका होऊन जायचा.

आमचा छोटा मित्र अक्षय, राजू, अशोक, राजन-चेतना, अतुल आणि त्याचे मित्र, एकता आणि तिच्या घरचे, सगळे फॉलोअप्सलाही कोणी बरोबर असत. या सगळ्यांबरोबर आमचा दोघांचा परिवार एकदम मोठ्ठा होऊन गेलाय. आधीही होताच पण आता वेगळेपणानी लक्षात आला. आमची जानू तर, अशोक काकांवर फार जीव आहे तिचाही. लहान आहे. हॉस्पिटल मध्ये बाबांनी नव्हती आणली. पण काकांसाठी स्वतःच्या हातांनी बनवलेलं ग्रीटिंग घेऊन काका घरी यायची वाट पाहात होती. या सगळ्यांबरोबर आमचं बळ कैक पटीनी दुणावतं.

"The society of wise is the greatest school of virtue"

'विद्वानांचा समाज हा सद्गुणांचे सर्वोत्तम विद्यालय आहे.'


त्यांचा सहवास आयुष्य उजळवून टाकणारा प्रकाश आहे. ती वाट असते. दिसावी मात्र लागते. ती ज्याची त्याला सापडो!!

इत्यलम्.

❋❋❋

**रेखा शहाणे या जगणे आसुसून अनुभवणाऱ्या ज्येष्ठ कला आस्वादक, लेखिका, कवयित्री, छायाचित्रकार आणि निसर्ग अभ्यासक आहेत. फुलपाखरांसंदर्भातील त्यांचे काम वाखाणले गेले आहे. संपर्क : ९०२९० ०४७७०**


# ज्ञानवंतांची सत्संगती



विजय प्र. दिवाण



सरहद्द गांधी आणि म. गांधी



विनोबा भावे

माझा जन्म गांधीजींचा प्रत्यक्ष सहवास लाभलेल्या कुटुंबात झाला. आद्य भारतीय कुष्ठसेवक व गांधीजींनी ज्यांना महात्मा संबोधले ते मनोहर दिवाण आमचे काका. आमचे वडील प्रभाकर दिवाण गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमात होते. त्यांनी 'गांधीजींच्या सानिध्यात' हे पुस्तक लिहिले. एक दिवंगत काका मधुकर दिवाण यांचे 'गुप्त स्मरण' सांगणारे विनोबांचे 'मधुकर' पुस्तक प्रसिद्ध आहे. अजून एक काका कुंदर दिवाण यांना विनोबा 'कुंदरशास्त्री' म्हणत. कुंदरजींच्या नावावर अनेक पुस्तके आहेत. आमचे मामा, दत्ता महा हे मलकापूर येथील घर व शेतीवाडी सोडून गांधीजींकडे साबरमती आश्रमात गेले. आमचे सर्व काका, वडील, मामा, आई यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊन तुरुंगवास सोसला होता. अशा कुटुंबात असल्याने स्वाभाविकच आमच्या घरी गांधीजींचा सहवास लाभलेले अनेक लोक येत होते. गांधीजीचे नातू कांतिलाल गांधी, आचार्य धर्माधिकारी, विनोबांचे बंधू शिवाजी भावे इत्यादी आमच्या मुंबईच्या घरी आल्याचे स्पष्ट आठवते. गांधीजी, काकासाहेब कालेलकर, विनोबा, बाळकोबा, मीराबहन, सुशीला नैय्यर इत्यादींचे उल्लेख आई-वडिलांच्या तोंडून सहज कानी पडत होते. ही सगळी मंडळी आपल्या परिवारातील आहेत, हेच आमच्यावर ठसत राहिले. पुढे मी सर्वोदयाचा पूर्ण वेळ कार्यकर्ता झालो आणि अनेक ज्ञानवंतांच्या भेटीचा योग आला. आज अशाच काही व्यक्तींच्या भेटीविषयी लिहीन म्हणतो...

एकोणीसशे सत्त्याऐंशी साली भारत सरकारने खान अब्दुल गफार खान अर्थात सरहद्द गांधी यांना औषधोपचारासाठी भारतात आणले होते. त्यांना मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आल्याची बातमी मी वर्तमानपत्रात वाचली. याच दरम्यान मी त्यांचे हरिभाऊ जोशीलिखित चरित्र वाचले होते. त्यामुळे मला वाटले की महात्मा गांधींना जरी पाहिले नसले तरी आपण सरहद्द गांधींची भेट घ्यावी.

**सरहद्द गांधीनामे पर्वताची भेट**

मी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये गेलो. खाली रिसेप्शनिस्टला सरहद्द गांधींना कुठे ठेवले आहे असे विचारले. तिने समोरचे रजिस्टर उघडून पाहिले व सांगितले की येथे कोणी सरहद्द गांधी नाहीत. मी तिला म्हणालो, ''एवढे मोठे नेते येथे दाखल झाले आहेत व ही बातमी वर्तमानपत्रात आली आहे, तर तुम्ही जरा नीट पाहा.'' तिने पुन्हा पाहिले पण ते नाव काही रजिस्टरमध्ये आढळले नाही. मग मी म्हणालो, ''खान अब्दुल गफार खान पाहा.'' अर्थात ते नाव सापडले आणि तिने वॉर्ड नंबर व मजला सांगितला.

सरहद्द गांधींच्या खोलीसमोर मोठी सिक्युरिटी होती. मी अधिकाऱ्यांना म्हणालो, ''मला सरहद्द गांधींना भेटायचे आहे.'' पण त्यांनी मला निक्षून सांगितले, ''त्यांना भेटता येणार नाही. तशी परवानगी कोणालाही देण्यात आलेली नाही.'' तरी मी तिथे बसून राहिलो. दोन-चार वेळा त्या अधिकाऱ्यासमोर अजिजी केली. शेवटी तो म्हणाला, ''डॉक्टर आले की त्यांना विचारा.'' मी डॉक्टरांची वाट पाहत तिथे बसून राहिलो. तीन-चार तासांनी एक डॉक्टर त्यांच्या खोलीत शिरले. डॉक्टर तासाभराने बाहेर आल्यावर मी त्यांच्यासमोर गेलो व त्यांना म्हणालो, ''मला फक्त सरहद्द गांधींचे दर्शन घ्यायचे आहे.'' प्रथम तर त्यांनी नकार दिला. पण कोण जाणे, त्यांना काय वाटले ते! डॉक्टर मला म्हणाले,

''दारासमोर उभे राहून फक्त दर्शन घ्या आणि निघा.''

मी दारात उभा राहून त्यांना नमस्कार केला. सरहद्द गांधींनी हाताने मला आत बोलावले. मी डॉक्टरांकडे पाहिले. डॉक्टरांनी जा म्हटल्यावर मी आत गेलो. सरहद्द गांधींना म्हणालो, ''मी विनोबाजींचा कार्यकर्ता आहे.'' त्याबरोबर त्यांनी माझा हात दोन्ही हातांत घेतला व बराच वेळ धरून ठेवला. माझ्याकडे पाहून प्रसन्नपणे हसले. बस, एवढीच काय ती दोन-तीन मिनिटांची माझी भेट!

नजरेत भरली ती त्यांची उंची! आजही जाणवतो तो त्या वयोवृद्ध नेत्याच्या हातांचा स्पर्श!

***

**ध्येयनिष्ठ गजाननकाका नाईक**

निरा या पेयाचे आद्य प्रणेते गजाननराव नाईक हे आमच्याकडे सहा महिने राहिले. वडिलांना त्यांनी सांगितले, ''मी तुमच्याकडे फक्त सहा महिने राहणार.'' त्याप्रमाणे एका पावसाच्या दिवसात ते आमच्याकडे राहायला आले. या सहा महिन्यांत ते क्वचितच आमच्याकडे जेवले असतील. आमच्या घरचे फक्त पाणी पीत असत. आल्या आल्या त्यांनी आईच्या हातात एक पुरचंडी दिली व आईला म्हणाले, ''जर यदाकदाचित अचानक मृत्यू झाला, तर हे पैसे अंत्यविधीसाठी ठेवा.'' त्यांच्याकडे फक्त दोन जोड्या कपडे होते. एक मांडीवर आणि एक दांडीवर! ते आमच्याकडे आले ते पावसाचे दिवस होते. खादीचे कपडे वाळत नसत. पण तसेच ओले कपडे घालून ते बाहेर पडत.

गजाननराव नाईक हे मूळचे कोल्हापूरचे. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला व गांधीजींकडे सेवाग्रामला आले. या भागात शिंदीची झाडे खूप होती. मधेच एक आठवण सांगतो. जंगल सत्याग्रहाच्या काळात विनोबांच्या नेतृत्वाखाली शिंदीची झाडे तोडण्याचा कार्यक्रम घेण्यात आला होता. शिंदीची दारू बनवली जाई हादेखील वृक्षतोडीला एक पदर होता. वडील एकदा मला म्हणाले, ''कुऱ्हाड घेऊन मी झाडे तोडीत असे, पण ही वृक्षतोड मनाला काही पटत नव्हती.''

तर सांगत होतो की, गजाननराव नाईक यांनी या शिंदीच्या झाडापासून निरा काढण्याचे पारंपरिक तंत्र प्रयोगाद्वारे विकसित केले. यासाठी ते उंच शिंदीचा झाडावर चढायलाही शिकले.

निरेच्या बाबतीत ते अनेक प्रयोग करत होते. एकदा सेवाग्रामला काकासाहेब कालेलकर आपल्या आश्रमवासीयांना शिकवत असताना ही निरा गजाननराव नाईकांनी सर्वांना पाजली. पण तिने विषबाधा झाली. काकासाहेब कालेलकरांसह सर्व वाचले, पण एकाचा त्यात मृत्यू झाला. आज आपण सहज दहा रुपये देऊन निरा घेतो, पण ही निरा निर्माण करण्याच्या प्रयोगात अनेकांना किंमत द्यावी लागली. अनेकांनी कष्ट उपसले. गजाननराव नाईक यांचे

नाव फारसे कुणाला माहीत नसेल.

आमच्या आईला एकदा त्यांनी ताडगूळ आणून दिला आणि म्हणाले, ''यापासून नानकटाई, बिस्किटे वा चॉकलेट बनवून पाहा.'' आरे रोडला एक बेकरी होती. आईने तिथे जाऊन गुळापासून नानकटाई बनवून आणली व त्यांना दिली.

गजाननराव नाईक यांना राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्त केले होते. एकदा मी त्यांना सहज विचारले, ''काका, तुम्ही इतकी वर्षं दिल्लीत राहिलात, तर कुतुबमिनार वगैरे तुम्ही पाहिला की नाही?'' यावर ते मला म्हणाले, ''मी हा हिरवा झब्बा घालतो तो ताडाच्या पानांचा हिरवा रंग म्हणून. ताडाच्या झाडाशिवाय मी काही पाहत नाही.''

ते आमच्या घरी राहायला आले, त्या दरम्यान आमच्या शेजारी एकाचा मृत्यू झाला. आईने मला अंत्यविधीला जायला सांगितले, पण मी कोणाच्याही अंत्यविधीला जाणार नाही हे ठरविल्याने मी स्पष्ट नकार दिला. शेजारीच बसलेल्या गजाननकाकांना मी म्हणालो, ''शेजारी अशी घटना घडली आहे तर तुम्ही जाल का?'' त्यावर ते म्हणाले,

''मीदेखील अंत्यविधीला जात नसतो.'' मी कारण विचारताच ते मला म्हणाले, ''माझी एकुलती एक बहीण कोल्हापूरला गंभीररीत्या आजारी असल्याची तार आली. त्या वेळेस मी सेवाग्रामला गांधीजींच्या आश्रमात होतो. गांधीजींना ती तार दाखवली आणि म्हणाला, 'मी कोल्हापूरला जाऊ इच्छितो.' गांधीजी म्हणाले, 'काम सोडून जायचे असेल तर जरूर जा, पण तू गेल्याने तुझी बहीण वाचणार आहे का?' त्यानंतर मी कर्तव्य सोडून इतर कामाला जायचे नाही असे ठरविले.'' हे सांगून ते मला म्हणाले, ''खांदा द्यायला चौथा मनुष्य नसेल तर मी जरूर जाईन.'' यावर हसत हसत मी त्यांना म्हणालो, ''भारतात तरी अजून अशी वेळ येईल असे वाटत नाही.''

पुढे जातिव्यवस्थेचे स्वरूप मला कळू लागले तेव्हा माझ्या असे लक्षात आले की जातिव्यवस्थेची बीजे बारसे, लग्न आणि अंत्यविधी या ठिकाणी पेरली जातात. त्यानंतर मी कधीही कोणाच्याही बारशाला, लग्नाला अथवा अंत्यविधीला उपस्थित राहिलो नाही.

गजाननराव नाईक यांचा वेष म्हणजे गुडघ्यापर्यंत आखूड धोतर व हिरवा झब्बा. उंची पाचएक फूट, टक्कल होते. त्यांचा एक ओठ जन्मतः दुभागला असल्याने तिथून दात पुढे आलेला दिसत असे. गबाळा वेष व अनाकर्षक व्यक्तिमत्त्व. तसेच खाली रस्त्याकडे पाहत ते स्वतःच्या तालात चालत असत. अनेकदा मी पाहत असे की ते आपल्या विचारात दारासमोरून पुढे निघून जात. हाक मारल्यावरदेखील त्यांचे लक्ष जात नसे. मग पुढे गेल्यावर बऱ्याच वेळाने मागे परतून घरी येत. वडिलांना सांगितल्याप्रमाणे ते सहा महिने आमच्याकडे राहिले आणि सहा महिने होताच आले तसे बोचके बांधून निघून गेले.

**कॅप्टन भाऊराव खडताळे आमच्या शेजारी राहात असत. ते बौद्ध समाजातील पहिले वैमानिक तर होतेच, पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पार्थिव ज्या विमानाने मुंबईत आणले गेले, त्या विमानाचे ते पायलटही होते!**

गजाननराव नाईक गेल्याचे जेव्हा मला कळले, तेव्हा त्यांचे सहकारी बाबूकाका कामत यांच्याकडून मी त्यांची माहिती, फोटो इत्यादी मिळवले. गांधीजींनी गजाननकाकांना लिहिलेली पत्रेही मी मिळवली. गजाननराव नाईक यांच्यावर काही लिहावे असे मला त्या वेळेस वाटत होते. पण नंतर मी विनोबांच्या जन्मगावी आलो आणि गजाननराव नाईक यांच्या विषयीची कागदपत्रेही कुठेतरी गहाळ झाली. तो विषय मागे पडला तो पडला! पण त्यांच्या ध्येयनिष्ठेची छाप माझ्या मनावर कायम कोरली गेली.

***

**अवलिया गोपाळराव दांडेकर**

गोपाळराव दांडेकर हे त्यांचे खरे नाव नाही.

स्वातंत्रलढ्यामध्ये त्यांनी हे नाव धारण केले होते आणि त्याच नावाने ते ओळखले गेले. गोपाळराव मूळचे आंध्रप्रदेशातील होते. मंचेरिया येथे त्यांनी एक आश्रमदेखील काढला होता. त्यांच्या एका मुलाचा खून आंध्रातील कम्युनिस्टांनी केला होता. ते आणि त्यांची पत्नी कुसुमताई दोघेही अवलिया होते. आयुष्यभर फकिरी जीवन जगले.

गोपाळराव दांडेकर यांचा वेष म्हणजे गुडघ्यापर्यंत खादीची अर्धी चड्डी, अंगात अर्धा बाह्यांचा सदरा. दाढी आणि केस वाढलेले. गोपाळराव अनेकदा आमच्या घरी येत असत. त्या काळात दूध आरेच्या दूध केंद्रावर मिळत असे. त्यासाठी भल्या पहाटे रांगेत उभे राहावे लागे. असाच एकदा पहाटेच्या अंधारात मी दुधाच्या रांगेत उभा होतो. पाऊस कोसळत होता. अचानक गोपाळराव तिथे आले आणि मला म्हणाले, ''केव्हापासून तुमचे घर शोधतो आहे, पण सापडत नाही. बरे झाले तू अचानक भेटलास ते!'' डोक्यावर कपड्याचे गाठोडे आणि पावसाने भिजलेले अशा स्थितीत ते घरी आले आणि ओल्या कपड्यानेच स्टुलावर बसले आणि म्हणाले, ''माझ्या जवळ बस. तुझ्याशी काही बोलायचे आहे. त्यांनी मला एक भन्नाट कल्पना सांगितली. दोन गुंठे जमीन घ्यायची. त्यात एक तलाव खणायचा. जी माती निघेल त्यातून राहण्यासाठी झोपडी बांधायची. आणि उर्वरित जागेत आपल्याला लागेल तेवढी भाजी पिकवायची. तलावात मासे सोडले तर त्यातूनही काही उत्पन्न मिळेल.

हे सारे त्यांनी गणिताच्या आधारे मला समजावले व विचारले, ''या प्रयोगात तू सहभागी होशील का?'' माझ्या ''नाही'' या उत्तराने ते फार निराश झाले! मग मला म्हणाले, ''माझ्याबरोबर कश्मीरला चल.'' अर्थात तेही मला शक्य नव्हते.

गोपाळरावांच्या गबाळ्या वेषामुळे त्यांच्यावर एक आफत आली. तिकीट असतानाही वर्धा स्टेशनवर टीसीने त्यांना बेदम मारहाण केली. इतके मारले की त्यांना सेवाग्रामला दवाखान्यात हलवावे लागले. विनोबांना हे कळताच त्यांनी आपल्या कार्यकर्त्याला गोपाळरावांच्या चौकशीसाठी दवाखान्यात पाठवले. विनोबांच्या एका कार्यकर्त्याला मारझोड करण्यात आली हे कळताच प्रशासन जागे झाले. त्या तिकीटचेकरची तडकाफडकी बदली करण्यात आली. या प्रसंगानंतर ते मला भेटले तेव्हा मी त्यांना म्हणालो, ''काका, तुमच्या वेषामुळे हे सगळे घडले.'' त्यावर ते मोठ्याने हसले आणि तो विषय त्यांनी टाळला.

गोपाळरावांप्रमाणेच त्यांच्या पत्नीदेखील अवलिया होत्या. ठेंगणा, स्थूल बांधा. नऊवारी जाडीभरडी खादीची साडी. कपाळावर चांगले ठसठशीत मोठ्ठे कुंकू. एकदा त्या डोक्यावर मोठे बोचके घेऊन आमच्या घरी आल्या. ताडगूळ व ताडाच्या पानापासून बनविलेल्या काही वस्तू इत्यादी घेऊन त्या आल्या होत्या. आमची आई महिला मंडळाची अध्यक्ष असल्यामुळे महिला मंडळात काही वस्तू खपतील, या कल्पनेने त्या आल्या होत्या. अर्थात आईने त्यांच्या वस्तूंची विक्री करून दिली. तरीही बरेच काही उरले होते. सकाळी उठून उरलेल्या वस्तू बोचक्यात बांधून डोक्यावर घेऊन त्या सरळ गोरेगाव स्टेशनावर गेल्या आणि तिथे बसून त्यांनी ते सगळे विकले.

मी विनोबांच्या जन्मगावी राहायला गेल्यानंतर १९९५ साली विनोबा जयंतीला त्या गागोद्यात आल्या. त्यांना औषधी वनस्पतींची चांगली माहिती होती. गावातील महिलांना बोलावून त्यांनी औषधे कशी बनवायची हे शिकवले. गोपाळरावांची व कुसुमताईंची शेवटची भेट झाली ती विनोबांच्या पवनार आश्रमात. विनोबांच्या ब्रह्मनिर्वाणाच्या वेळी!

गोपाळराव व कुसुमताई दांडेकर यांनी आयुष्यभर फकिरी जीवन जगत विनोबांचे विचार समाजापर्यंत पोहोचवले.

***

**कॅप्टन भाऊराव खडताळे**

कॅप्टन भाऊराव खडताळे यांचे १५ एप्रिल २०२३ रोजी वयाच्या ९० वर्षी निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीला माननीय मंत्री रामदासजी आठवले यांच्यासह अनेक दलित नेते उपस्थित होते. कॅप्टन भाऊराव खडताळे आमच्या शेजारी राहत असत. ते बौद्ध समाजातील पहिले वैमानिक तर होतेच, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पार्थिव ज्या विमानाने मुंबईत आणले गेले, त्या विमानाचे ते पायलटही होते!

आम्ही मुंबईत गोरेगाव येथे ज्या यशवंत नगर वसाहतीत राहत होतो (१९६२ साली) तिथे अनेक मान्यवर व्यक्ती राहत होत्या. कॅप्टन भाऊराव खडताळे, आरे दुग्ध प्रकल्प उभारणारे गोडबोले, अमरावती येथील शाळेचे संस्थापक दादासाहेब इनामदार (पुढे त्यांचे चिरंजीव भारताचे ॲडमिरल झाले.), संगीत व नाट्य क्षेत्रातील दत्ता मारूळकर, काही काळ राहिलेले कवी वा. रा. कांत, दैनिक 'लोकसत्ता'चे उपसंपादक श्रीपाद डोंगरे, 'धर्मयुग'चे सहसंपादक व लेखक कन्हैयालाल नंदन, हिंदीचे साहित्यिक व व्यंगकार शरद जोशी, सी.आय.डी. खात्यातील मोठ्या अधिकारी पदावर असणारे माधवराव आघारकर, मुंबई विद्यापीठाच्या कलर टेक्नॉलॉजी

ज्ञानशाखेचे विभाग प्रमुख मनोहर गुप्ते, मुंबईचे आयुक्त व पुढे राजीव गांधीच्या कॅबिनेटचे सेक्रेटरी भालचंद्र देशमुख यांचे बंधू ही सगळी मंडळी आमच्या कॉलनीत राहत होती.

आम्ही गांधीवादी तर कॅप्टन भाऊराव खडताळे हे आंबेडकरवादी होते. जवळ राहणारे आमदार कॉम्रेड सत्येंद्र मोरे व त्यांचे वडील आर. बी. मोरे, जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी होते. ते कम्युनिस्ट होते. पलीकडे राहणारे, मृणालताई गोरे यांचे सहकारी व नगरसेवक नेवरेकर हे समाजवादी आणि समोर राहणारे कपूर हे जनसंघाचे होते. गांधीवादी, आंबेडकरवादी, कम्युनिस्ट, जनसंघी असे हे सगळे वेगवेगळ्या विचारधारांचे सक्रिय कार्यकर्ते होते, पण कॉलनीतील गणपती उत्सव इत्यादी कार्यक्रमात ही सगळी मंडळी एकदिलाने काम करीत असे.

कॅप्टन भाऊराव खडताळे यांच्या घरात पहिल्याच खोलीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एक मोठे तैलचित्र होते. आमच्या कॉलनीशेजारीच असलेल्या तीन डोंगरी व सिद्धार्थनगर येथे मोठ्या प्रमाणात दलित वस्ती होती. आंबेडकर जयंतीला गाडीवर आंबेडकरांचे मोठे तैलचित्र ठेवून कॅप्टन भाऊराव खडताळे मिरवणूक काढीत. त्यांचे पुतणे चंद्रकांतदादा व उल्हास, मुलगा संजय, मुलगी रश्मी हे सारे पायलट तर झालेच, पण आज यांच्या नातीही पायलट आहेत. कॅप्टन भाऊराव खडताळे यांनी एअर इंडियातील एस.सी.-एस.टी. कर्मचाऱ्यांची संघटना बांधून आपल्या समाजातील अनेकांना नोकऱ्या मिळवून दिल्या.

दादासाहेब गायकवाडांचा यथोचित सन्मान करणारे कॅप्टन भाऊराव खडताळे



कवी व गीतकार शांताराम नांदगावकर हे एअर इंडियात असल्याने कॅप्टन भाऊराव खडताळे यांचे सहकारी-मित्र होते. त्या वेळेस शांताराम नांदगावकर यांचे 'ससा तो ससा की कापूस जसा' आणि 'रामप्रहरी रामगाथा' हे भक्तिगीत रेडिओवर सतत लागत असल्याने ते प्रसिद्धीत होते. कॅप्टन भाऊराव खडताळे यांनी त्यांना आपल्या घरी बोलवून त्यांचा कार्यक्रम ठेवल्याचे स्मरते. पुढे मी 'सर्वोदय'चा पूर्ण वेळ कार्यकर्ता झाल्यावर काही निमित्ताने खार येथे कवी नांदगावकर यांच्या घरी गेलो असता त्यांना माझी ओळख कॅप्टन भाऊराव खडताळे यांच्या शेजारी मी राहतो अशी सांगितली होती व त्यामुळे कवी नांदगावकर माझ्याशी फार प्रेमाने व जिव्हाळ्याने बोलले.

कॅप्टन भाऊराव खडताळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणेच दादासाहेब गायकवाड यांचाही सहवास लाभला होता. कॅप्टन भाऊराव खडताळे हे नाशिकजवळील निफाडचे. बहुतेक त्याचमुळे दादासाहेब गायकवाड यांच्याशी त्यांचा संबंध आला असावा. 'कसेल त्याची जमीन' हा कायदा सरकारने आणल्यावर दादासाहेब गायकवाड यांनी सरकारला प्रश्न केला होता, ''कसेल त्याची जमीन पण नसेल त्याला काय?'' पण दादासाहेब गायकवाड यांच्या या भूमिहीनांच्या लढ्याकडे सगळ्यांनीच दुर्लक्ष केले. त्यांच्या समाजातील नेत्यांनीही दादासाहेब गायकवाड यांना वर्गसंघर्ष करणारे अर्थात कम्युनिस्ट ठरवून बाजूला सारले. एका अर्थाने दादासाहेब गायकवाड उपेक्षित राहिले. पण कॅप्टन भाऊराव खडताळे यांनी 'दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्रा'ची उभारणी करून दादासाहेब गायकवाड यांचे कार्य व स्मृती जागती ठेवली.

***

**'आत्मज्ञ पुरुष' विनोबा**

दर उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही आमचे काका, (आद्य भारतीय कुष्ठसेवक मनोहर दिवाण) व आजीकडे जात असू. काका व आजी विनोबांच्या आश्रमात राहत असल्याने स्वाभाविकच विनोबांना लहानपणापासून आम्ही पाहत आलो होतो. एक दिवस आश्रमात असताना कमलनयन बजाज गेल्याची बातमी आली. कमलनयन म्हणजे गांधीजींनी ज्यांना आपला पुत्र मानले, त्या जमनालाल व जानकी बजाज यांचे

सुपुत्र. कमलनयन गेल्याची बातमी आली, त्या दिवशी जानकी बजाज विनोबांच्या पवनार आश्रमातच होत्या. जानकी बजाज यांना विनोबांच्या खोलीत आणण्यात आले. विनोबांनी का बरे बोलावले, याची काहीही कल्पना त्या माउलीला नव्हती. विनोबांनी अगदी शांतपणे कमलनयन गेल्याचे जानकीबेनला सांगितले. थोडेही विचलित न होता, ज्या शांतचित्ताने ही बातमी विनोबांनी सांगितली, ते पाहून मी थक्क झालो.

आश्रमातील पहाटेच्या प्रार्थनेत ईशावास्योपनिषदाचा पाठ होत असतो. त्यात आत्मज्ञ पुरुषाची लक्षणे सांगितली आहेत.

यस्मिन् सर्वाणि भूतानि

आत्मा एवं अभूत् विजानत: ।

तत्र क: मोह: क: शोक: एकत्वम् अनुपश्यत: ।।

(ज्याच्या दृष्टीने आत्माच सर्व भुते झाला, त्या निरंतर एकत्व पाहणाऱ्या विज्ञानी पुरुषाला मोह कुठला आणि शोक कुठला?)

आज कमलनयन बजाज यांच्या मृत्यूच्या बातमीचा प्रसंग व विनोबांचा विचार करतो, तेव्हा मला विनोबा आत्मज्ञ अर्थात विज्ञानी पुरुषासारखे वाटतात.

त्या दिवशी विनोबांच्या कुटीसमोर काळ्या फळ्यावर लिहिले होते :

कमलनयनम् योगभिरज्ञानगम्यम् (रामरक्षा )

असाच अजून एक प्रसंग. सकाळी विष्णुसहस्रनाम झाल्यानंतर कुठल्यातरी विद्यापीठाच्या कुलगुरूंनी विनोबांना डी.लिट. पदवी प्रदान केली. त्या वेळी विनोबांना दाढी होती. सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळी पाहिले, तर विनोबांची गायब. कुणीतरी विनोबांना सकाळच्या डी.लिट.पदवी विषयी विचारले. त्यावर हनुवटीवर हात फिरवत विनोबा हसत हसत म्हणाले, ''दाढी बरोबर डी.लिट.ही (D.Litt) डिलिट (delete) झाली.''

मनुष्य किती नि:संग व पद्मपत्रवत अलिप्त असू शकतो याचे मला त्या दिवशी ज्ञान झाले.

ज्ञानवंतांचा गोतावळा या दिवाळी विशेष संकल्पनेच्या निमित्ताने हे सारे आठवत आणि कागदावर उतरवत असताना आज या सर्वांच्या स्मरणाने गंगास्नानाचे पुण्य अनुभवत आहे. जी काही थोडीबहुत चित्तशुद्धी झाली असेल, ती या ज्ञानवंत, प्रज्ञावंतांच्या सत्संगतीमुळे.

सत्संगतीनेच ज्ञान प्राप्त होते. विनोबांचे गुरू स्वामी केवलानंदांनी लिहिले, 'ज्ञानाने शील बनले, तर ते ज्ञान पवित्र आहे.' ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. आत्मज्ञानाच्या योगानेच शीलाचे सामर्थ्य निर्माण होते. शील हेच या जगातील वैभव आणि परमार्थ मिळवून देणारे माणसाचे साधन होय. हेच एक साधन सर्व सामर्थ्यसंपन्न आहे.'


अशी सत्संगती मिळाली तर बेड़ा पार आहे!

अशीच साथ-संगती आणि ज्ञान तुम्हा-मला लाभो, एवढीच प्रार्थना!


❋ ❋ ❋

**लेखक सर्वोदयाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते, लेखक तसेच समतावादी मुक्त संवाद पत्रिका मासिकाच्या संपादकीय सल्लागार मंडळाचे सदस्य आहेत.**


**संपर्क :** ९०२८३ २१०६३



# माझे ज्ञान-दर्शक



सुलक्षणा महाजन



जोनाथन लेव्हिन



स्कॉट कॅम्पबेल



डॉर्सेता टेलर



रेमंड डी. यंग



हेमलता दांडेकर

**माझी मैत्रीण डॉ. हेमा दांडेकर हिच्या आमंत्रणावरून १९९२ साली 'स्त्रिया, घरे आणि विकास' आणि नंतर १९९८ साली 'जागतिकीककरण आणि नगरविकास' अशा दोन कॉन्फरन्समध्ये शोधनिबंध वाचले होते. मिशिगन विद्यापीठाचा सुंदर, हरित परिसर बघून तेथे राहून शिकण्याची इच्छा पूर्ण झाली. दुसऱ्या वर्षाची तिसरी टर्म सुरू झाली. पाठोपाठ दहशतवाद्यांनी ९/११च्या न्यूयॉर्कमधील जागतिक व्यापार केंद्राच्या इमारती पाडल्या आणि अमेरिकेतील उदार वातावरण बदलून गेले. राष्ट्राध्यक्ष बुश ह्यांची युद्धखोरीची भाषा सुरू झाली. अभ्यासावरून माझे मन उडाले आणि मी भारतामध्ये परत आले. मात्र तेथील वास्तव्यात तिथली शिक्षणाची मोकळीढाकळी पद्धत मला फारच भावली. ज्ञानवंत मार्गदर्शकांकडून खूप नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. ह्या लेखाच्या निमित्ताने त्या प्रत्येकाचे विषय, त्यांची व्यक्तिमत्त्वे आठवली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या ज्ञानाने मला किती समृद्ध केले आहे, हे जाणवले...**

सन २०००मध्ये ॲन आर्बर ह्या शहरातील 'युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगन' येथे अर्बन प्लानिंग विषयात डॉक्टरेट करण्यासाठी मी प्रवेश घेतला. त्याआधी तेथे प्रोफेसर असलेली माझी मैत्रीण डॉ. हेमा दांडेकर हिच्या आमंत्रणावरून १९९२ साली 'स्त्रिया, घरे आणि विकास' आणि नंतर १९९८ साली 'जागतिकीककरण आणि नगरविकास' अशा दोन कॉन्फरन्समध्ये शोधनिबंध वाचले होते. विद्यापीठाचा सुंदर, हरित परिसर बघून तेथे राहून शिकण्याची इच्छा पूर्ण झाली. दुसऱ्या वर्षाची तिसरी टर्म सुरू झाली. पाठोपाठ दहशतवाद्यांनी ९/११च्या न्यूयॉर्कमधील जागतिक व्यापार केंद्राच्या इमारती पाडल्या आणि अमेरिकेतील उदार वातावरण बदलून गेले. राष्ट्राध्यक्ष बुश ह्यांची युद्धखोरीची भाषा सुरू झाली. अभ्यासावरून माझे मन उडाले आणि मी भारतामध्ये परत आले. मात्र तेथील वास्तव्यात तिथली शिक्षणाची मोकळीढाकळी पद्धत मला फारच भावली. ज्ञानवंत मार्गदर्शकांकडून खूप नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. नवीन दृष्टी मिळाली. मनसोक्त वाचन केले. पन्नासाव्या वर्षी तरुण मुलामुलींच्या बरोबरीने अभ्यास करता आला.

ह्या लेखाच्या निमित्ताने त्या आठवणी जागवत मी पंचवीस वर्षे मागे गेले. गेल्या पंचवीस वर्षांतील माझ्या आवडत्या शिक्षकांच्या ज्ञानसाधनेचा शोध घेतला. त्यांनी लिहिलेली पुस्तके, शोधनिबंध आणि त्यांच्या सुरू असलेल्या अध्यापनाच्या, संशोधनाच्या कामाचा धांडोळा घेतला तेव्हा ज्ञानयज्ञाचा आवाका बघून थक्क व्हायला झाले. ह्या लेखाच्या निमित्ताने त्या प्रत्येकाचे विषय, त्यांची व्यक्तिमत्त्वे आठवली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या ज्ञानाने मला किती समृद्ध केले आहे, हे जाणवले. त्यांनी दिलेल्या दृष्टिकोनाचा लाभ घेत मुंबई आणि महाराष्ट्रातील शहरांचा अभ्यास मला करता आला, ह्याचे समाधान वाटले. त्यांच्यामुळेच अध्यापन, संशोधन, लेखन करायला ऊर्जा मिळाली होती हेदेखील जाणवले. ज्ञानमार्गावरील वाटचाल कष्टाची असते; परीक्षा बघणारी असते; तशीच ती एक आनंदयात्रा असते याची जाणीव झाली. अर्थातच ह्या आनंदयात्रेची सुरुवात डॉ. हेमलता दांडेकरमुळे झाली होती.

डॉ. हेमलता दांडेकर जे. जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमधून गोल्ड मेडल घेऊन पदवी घेणारी माझी ज्येष्ठ मैत्रीण आधी नावाने माहीत होती. १९७० च्या दशकात मुंबई विद्यापीठातून पदवी घेतल्यावर ती अमेरिकेच्या बर्कले विद्यापीठात डॉक्टरेट करण्यासाठी दाखल झाली होती. त्या वेळी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी अमेरिकेच्या व्हिएतनाम युद्धाच्या विरोधात मोठी चळवळ सुरू होती. स्त्रीवादी चळवळीचा मोठा प्रभाव होता. त्या प्रभावाखालीच हेमाने शहरांच्या अभ्यासासाठी समाजशास्त्र हा विषय निवडला. प्रबंधासाठी तिने मुंबईतील सातारा जिल्ह्यातील सुगावमधील गिरणी कामगार कुटुंबांचा तेथे राहून अभ्यास केला. तिच्या संशोधनावर आधारित 'मेन इन बॉम्बे, वुमन ॲट होम' हे पुस्तक प्रकाशित झाले होते.

१९७५ सालच्या जागतिक महिला वर्षाच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांच्या चळवळीला चालना मिळाली होती. 'मुलगी झाली हो' ह्या नाटकाच्या प्रयोगाच्या निमित्ताने तिची मुंबईतच गाठ पडली. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये तिच्या पुस्तकाचा परिचय करून देणारा लेख मी लिहिला. आमची मैत्री दृढ होत गेली. आर्किटेक्चर, शहरे ह्या बरोबरच स्त्री मुक्तीचा विषय आम्हा दोघींना जवळचा होता. १९९२ साली तिने मला मिशिगन विद्यापीठामध्ये शोधनिबंध वाचण्याचे आमंत्रण दिले होते. तेव्हापासून मलाही संशोधन, लिखाण करण्यातला आनंद समजू लागला. आव्हाने लक्षात आली.

विद्यापीठात दाखल झाल्यावर पहिल्या सत्रामध्ये मला डॉ. हेमाच्या मार्गदर्शनाखाली ॲकॅडेमिक पद्धतीने शोधनिबंध लिहिण्याचा मोलाचा अनुभव मिळाला. १९९८ साली पूर्ण झालेला 'मुंबई-पुणे महामार्ग' हा आमच्या शोधनिबंधाचा विषय होता. त्यासंबंधीच्या माध्यमातील चर्चा, तांत्रिक माहिती, अडचणी, नावीन्यपूर्ण साहित्य, वित्त व्यवस्था, व्यवस्थापन, नियोजन तसेच त्या विरोधी झालेल्या चळवळी ह्याबद्दल मी माहिती जमा केली. त्या प्रकल्पात सहभागी असलेल्या इंजिनिअर्सच्या मुलाखती घेतल्या. त्या माहितीचे विश्लेषण कसे करायचे, त्याचबरोबर खाजगीकरण म्हणजे काय, त्याचे विविध आयाम, सिद्धान्त आणि प्रत्यक्ष निबंधाचे लिखाण ह्याबद्दल मार्गदर्शन डॉ. हेमाने केले. दोन सत्रांच्या मधल्या सुट्टीच्या काळात निबंध पूर्ण झाला. २००१ साली 'इकॉनॉमिक ॲंड पोलिटिकल विकली'च्या अंकात 'MSRDC and Mumbai-Pune Expressway : A Sustainable Model for Privatising Construction of Physical Infrastructure' या शीर्षकासह तो प्रकाशित झाला.

गेली तीन दशके डॉ. हेमाने लिहिलेले ‘The Planners Use of Information’ हे पुस्तक अमेरिकेतील अनेक विद्यापीठांमध्ये पाठ्यपुस्तक म्हणून प्रसिद्ध आहे. तिचे अनेक शोधनिबंध विविध ठिकाणी प्रकाशित झाले आहेत. तिने ‘Michigan Family Farms and Farm Buildings’ आणि ‘A house with a Garden’ ही पुस्तके लिहिली आहेत.

पहिल्या सत्रामध्ये ती शिकवत असलेला अभ्यासक्रम मी निवडला नव्हता, तरी एक दिवस तिच्या वर्गामध्ये मला भारतामधील स्त्री चळवळीसंबंधात चर्चा करायला बोलावले होते. सुरुवातीला पंधरा मिनिटे मी मुंबईमधील कचरावेचक स्त्रियांबद्दल बोलले आणि नंतर ४५ मिनिटे विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले, चर्चा केली. त्यातून अमेरिकेतील मुक्त शिक्षण पद्धतीची ओळख झाली.

***

डॉ. जोनाथन लेव्हिन हे डॉक्टरल प्रोग्रॅमचे प्रमुख होते. त्या वर्षी चार जणींनी प्रवेश घेतला होता. दोघी जणी कोरियामधील तर एक अमेरिकेतील होती. तिने अमेरिकेत पुरातत्त्वशास्त्राचा अभ्यास केला होता आणि तिला प्राचीन शहरांच्या उत्खनात भाग घेण्यासाठी नगररचना विषयाचा अभ्यास करायचा होता. दर आठवड्यात सलग तीन तास नगर नियोजनाच्या सैद्धान्तिक अभ्यासाला दिलेले होते. आर्किटेक्चर कॉलेजमध्ये टाऊन प्लानिंग ह्या विषयाची तोंडओळख मला झालेली होती. परंतु विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ह्या विषयावर झालेल्या संशोधनामुळे जुने नियोजन सिद्धान्त, उदा. चंडिगढ शहराच्या नियोजनामागील सिद्धान्त पूर्णपणे बाद झाले होते. हा माझ्यासाठी मोठा धक्का होता. ह्या मूलभूत विषयामध्ये झालेले संशोधन, बदल हे माझ्यासाठी सर्वस्वी नवीन दृष्टी देणारे ठरले. जोनाथन ह्याच्या वर्गात मोकळेपणाने शंका विचारता येत. देशोदेशींच्या शहरांची माहिती, अनुभव वाचायला मिळाले. जगाचे वेगवान नागरीकरण आणि त्यामागील कारणांचा शोध घेता आला.

हे तीन तास म्हणजे हसत-खेळत शिक्षण म्हणजे काय ह्याचा वस्तुपाठ होता. वर्गामध्ये दरवेळी एकीने जेवण तयार करून आणायचे असे. एकदा जोनाथन ह्यानेही घरून आमच्यासाठी जेवण आणले होते. तर एकदा त्याच्या घरी डॉक्टरेटसाठी अभ्यास करणाऱ्या वीस-पंचवीस मुलामुलींना जेवायला आणि गप्पा मारायला बोलावले होते. असे प्रसंग म्हणजे शिक्षक-विद्यार्थी ह्यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न होता. त्यातून अनेकांच्या ओळखी झाल्या. त्यांच्या संशोधनाचे विषय समजून घेता आले.

अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये शिक्षक शिकवतात आणि विद्यार्थी ऐकतात असे चित्र काही विषयांच्या संदर्भात – उदाहरणार्थ गणित, सायन्स अशा विषयांच्या संदर्भात – दिसते. नगरनियोजन हा विषय मुळातच अनेक ज्ञानशाखांशी निगडित असल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्या दिवशीच्या विषयासंबंधी चर्चा करण्याची अपेक्षा असते. विषय अगोदरच दिलेला असतो. वाचनासाठी संदर्भ साहित्य, पुस्तकातील एखादे प्रकरण, संशोधन निबंध दिलेले असतात. दररोज किमान ४० ते १०० पानांचे वाचन करणे; त्यातील मुद्दे समजून घेणे; आपल्याला पडलेले प्रश्न विचारणे हे काम विद्यार्थ्यांचे. वर्गातील चर्चेमधील सहभागाला मार्कांच्या किंवा ग्रेडच्या दृष्टीने महत्त्व असते.

वर्गात एका टेबलाच्या भोवती आम्ही चौघी आणि जोनाथन अशी योजना असे. दरवेळी वाचलेल्या साहित्यावर आधारित एकीचे प्रेझेंटेशन असे. नंतर त्यावर टीकाटिप्पणी, आक्षेप आणि जोनाथनचे भाष्य असे. ह्या विषयासाठी प्रत्येकीने संशोधन निबंध लिहिण्यासाठी तीन प्रश्न तयार करायचे होते. त्यातील एक प्रश्न जोनाथन निवडत असे. आपल्याला पडलेले प्रश्न नेमकेपणाने लिहून विचारता येणे, हे काम किती कठीण असते, याचा तेव्हा अनुभव आला. त्यासाठी वाचनालयातून मागील वर्षात अर्बन प्लानिंगसंबंधित विषयावर प्रकाशित झालेली तीन पुस्तके प्रत्येकीने निवडली होती. त्यातील एका पुस्तकाची निवड Journal of American Planners Association (JAPA)कडून होत असे. पुस्तकाची ७५० आणि ३५० शब्दांमध्ये दोन परीक्षणे लिहिणे ही दुसरी परीक्षा होती. आम्ही लिहिलेली परीक्षणे तपासून जोनाथन मार्गदर्शन करीत असे. दोन्ही परीक्षणे JAPAकडे पाठवली गेली. दोनपैकी एक परीक्षण छापले जाणे म्हणजे परीक्षेत उत्तीर्ण होणे! हा अनुभव माझ्यासाठी खूप मोलाचा ठरला.

वाहतूक नियोजन हा जोनाथन ह्यांचा अध्यापनाचा मुख्य विषय होता. त्यांच्या वर्गामध्ये लेक्चर ऐकायला मी जात असे. त्याची परीक्षा देणार नसले तरी विषयाचे वाचन मी करीत असे. चर्चेमध्ये भाग घेत असे. अमेरिकेत हा विषय खूप महत्त्वाचा होता. त्यासंबंधात शिष्यवृत्त्या आणि नोकऱ्या जास्त संख्येने उपलब्ध असत. जोनाथनच्या हाताखाली अनेक



मिशिगन विद्यापीठाचे ज्ञानरम्य आवार

विद्यार्थी सहायक, संशोधक म्हणून काम करीत होते. ह्या शिवाय ॲन आर्बरच्या वाहतूक नियोजनासाठी जोनाथन महत्त्वाचे धोरणात्मक सल्लागार होते. कालांतराने जोनाथन ह्यांचे पर्यावरण स्नेही वाहतूक धोरण पालिकेने स्वीकारले. विद्यापीठातील आणि शहरातील वाहनतळ कमी करण्यात आले. Ann Arbor Transport Authority (AATA) बससेवा मजबूत करण्यासाठी विद्यापीठाची फी वाढवून ती AATA कंपनीकडे दिली जाऊ लागली. विद्यार्थी, कर्मचारी आणि शिक्षक यांच्यासाठी बस वाहतूक मोफत झाली. शिवाय शहरातील कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी कंपन्यांकडून आगाऊ पैसे घेऊन कर्मचाऱ्यांना मोफत सेवा मिळू लागली. बससेवा कंपनी आणि नागरिकांचा आर्थिक फायदा वाढला. वाहनतळाच्या जागी वृक्ष लागवड करण्यात येऊन पर्यावरणाला हातभार लागला. जोनाथनचे 'Zoned Out : Regulation, Markets and Choices in Transfortation and land use planning' हे पुस्तक गाजले आहे. 'From Mobility to Accessibility : Transforming Urban Transportation and Land-Use Planning' हे दुसऱ्या विद्यापीठातील दोन प्राध्यापकांसह लिहिलेले जोनाथन ह्यांचे पुस्तक अलीकडे प्रसिद्ध झाले आहे.

***

डॉ. स्कॉट कॅम्पबेल शिकवीत असलेला शहरांचा आर्थिक विकास (Economic Development of Cities) हा विषय मी अभ्यासासाठी निवडला होता. काही शहरे काहीकाळ आर्थिक दृष्टीने भरभराटीला का, कशामुळे येतात, नंतर त्यांचा ऱ्हास का होतो, तर काही शहरे मात्र सातत्याने आपल्या अर्थव्यवस्था बदलतात आणि यशस्वी कशा राहतात, हा नियोजनकारांसाठी महत्त्वाचा कूट प्रश्न असतो. विद्यापीठाजवळचे डेट्रॉइट हे शहर एकेकाळी फोर्ड आणि इतर मोटारींच्या कारखानदारीमुळे मोटार सिटी म्हणून भरभराटीला आले होते. पुढे जपानमधील मोटारींच्या स्पर्धेमुळे हे उद्योग आणि त्यातील रोजगार कमी झाले. शहराची अर्थव्यवस्था आणि पाठोपाठ लोकवस्ती आक्रसली. लहान लहान उद्योग, दुकाने, निवासी विभाग उजाड होत गेले. ह्या वर्गात पंचवीस-तीस विद्यार्थी होते. एकदा एक मुलगी वर्गात उशिरा आली, येताना हातात सॅन्डविच, कॉफी घेऊन आली आणि धडपडली. वर्गात कॉफी सांडली. वर्ग काही क्षण स्तब्ध झाला. झालेल्या प्रकाराकडे दुर्लक्ष करून चर्चा सुरळीतपणे सुरू राहिली. डॉ. स्कॉट हसत हसत शांतपणे हे सर्व बघत होते.

एक दिवस डेट्रॉइट शहराची वाताहत बघायला आम्ही सर्व विद्यार्थी गेलो होतो. पुढे महानगराची अर्थव्यवस्था वाचविण्याचे प्रयत्न का फसले, ह्याबदल वाचायला मिळाले. अमेरिकेतील उत्तरेकडील मॅसॅच्युसेट्स, डेट्राइट, ओहायो, न्यूयॉर्क अशा राज्यांमधील शहरे, तेथील उद्योग, रहिवासी मोठ्या संख्येने दक्षिणेकडील कॅलिफोर्निया, ॲरिझोना, फ्लोरिडा राज्यांकडे स्थलांतर करीत होते. त्याची कारणे समजून घेतली. माझ्या मनात आपल्या शहरांशी आपोआपच तुलना सुरू झाली. इजिप्तमधील मैत्रिणीबरोबर कैरो-मुंबई शहरांचा तुलनात्मक अभ्यास आम्ही वर्गात सादर केला. दोन विद्यार्थ्यांनी डेट्रॉइट आणि क्युबामधील हवाना ह्या दोन शहरांचा तुलनात्मक अभ्यास मांडला. आधुनिक काळातील गेल्या पाचशे वर्षांतील औद्योगिकीकरण, शहरीकरणीय माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगांमुळे उदयाला आलेली सिलिकॉन व्हॅली अशा अनेक विषयांच्या पुस्तकांचे वाचन, चर्चा, सादरीकरण असे भरगच्च ज्ञान असलेले हे सत्र मला खूपच आवडले.

एका उजाड झालेल्या काल्पनिक शहराच्या नगरपालिकेला आर्थिक विकासासाठी काय करता येईल, ह्याबद्दल आम्हाला निबंध लिहायचा होता. त्यासाठी मोठे विद्यापीठ, क्रीडा संकुल आणि स्टेडियम, पर्यटन, पर्यायी कारखाने, इतकेच नाही तर केंद्रशासित तुरुंग असे पर्याय दिले होते. मला तुरुंग ह्या पर्यायाबद्दल आश्चर्य वाटले होते. डॉ. स्कॉट ह्यांच्याशी

ऑफिसच्या वेळेत भेट घेतली. केंद्र शासनाचे भरपूर पैसे गुंतवले गेले की तुरुंगाच्या भोवती उभ्या राहणाऱ्या उद्योगांमुळे शहराच्या अर्थव्यवस्थेवर कसे परिणाम होऊ शकतात, हे समजावून सांगितले. अलीकडेच त्यांनी लिहिलेले काही शोधनिबंध मला वाचायला मिळाले.

डॉ. स्कॉट ह्यांचे 'The Rise of the Gunbelt : The Military Remapping of Industrial America' (Oxford University Press) and 'Readings in Planning Theory' / 'Readings in Urban Theory' ही त्यांनी लिहिलेली पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांच्या सस्टेनेबल विकासाच्या निबंधाला अमेरिकन प्लानिंग असोसिएशनचे बक्षीस मिळाले आहे.

***

डॉ. रेमंड डी. यंग : शहरनियोजनाशी संबंधित वरील काही विषयांच्या बरोबरच मी School of Natural Resources and Environment (SNRE) ह्या डिपार्टमेंटचे तीन अभ्यासक्रम निवडले होते. आमची इमारत विद्यापीठाच्या उत्तर संकुलात तर ही इमारत विद्यापीठाच्या मध्य संकुलात होती. जवळच आठ मजली मुख्य वाचनालय होते. त्यांचा 'पर्यावरण आणि मानवी वर्तुणूक' हा विषय मला अभिनव आणि नवीन वाटला म्हणून निवडला होता. प्राथमिक आणि प्रगत अशा दोन सत्रांमध्ये ते हा विषय शिकवीत. वर्गात वेगवेगळे विषय शिकणारे पन्नास-साठ पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी असत. वर्गातील चर्चा सामाईक असली तरी परीक्षेचे पेपर वेगळे असत. डॉ. यंग हे मेकॅनिकल इंजिनिअर होते. पुढे त्यांनी मानसशास्त्र विषयात अभ्यास करून डॉक्टरेट मिळविली होती.

पहिल्या सत्रामध्ये वेगवेगळ्या पर्यावरणातून मानवजातीच्या झालेल्या प्रवासात कोणते महत्त्वाचे टप्पे होते; त्यात मानवाचे शरीर आणि मेंदू ह्यांचा परस्परपूरक विकास कसा होत गेला, हे शिकायला मिळाले. आफ्रिकेच्या जंगलातील उंच झाडांवरच वास्तव्याला असणारा माकडसदृश आदिमानव, त्यासाठी विकसित झालेले शरीर, हाताचा अंगठा, दूरवर बघण्यासाठी आवश्यक असलेली त्रिमिती, रंगीत चित्र बघू शकणारे डोळे, स्वरयंत्र कसे विकसित झाले; पुढे जंगले नष्ट झाल्यावर गवताळ प्रदेशात त्याचे झालेले स्थलांतर, त्यानंतर  दोन पायांवर उभे राहून धावणारा माणूस, त्याचा मेंदू आणि आकलनशक्ती, भाषेची कला कशी घडली; मेंदूची माहिती, संकलन आणि साठवणूक क्षमता आणि संवादक्षमता कशी विकसित झाली; भटक्या मानवाची, स्थिरावलेल्या शेतीक्रांतीपर्यंत आणि गेल्या पाचशे वर्षांमध्ये आधुनिक शहरी मानवापर्यंतचा दीर्घ प्रवास हा विषयाचा पसारा होता. त्यासाठी 'ह्युमनस्केप' हे पुस्तक अभ्यासाला होते, ज्यात अनेक संशोधन निबंधांचा समावेश होता.  ह्याशिवाय इतर अनेक संदर्भ पुस्तके होती. शिवाय रोज संगणकांवर आधारित प्रश्नावली सोडविण्याचा खेळ होता. त्यासाठी पाच दिवस केवळ निसर्गात, तर पाच दिवस शहरातील मुख्य दुकानांच्या रस्त्यावर तासभर चालून मग ती सोडवायची असे. त्याचे एकत्रित विश्लेषण डॉ. यंग ह्यांनी वर्गात सादर केले. ह्या दोन परिसरांतील भटकंतीमुळे मेंदूक्षमता कशी बदलते ह्याचे प्रत्यक्ष आकलन झाले.

वापरायला सोपी, श्रम कमी करून झटपट काम करणारी आधुनिक यंत्रे-तंत्रे आपण सहजपणे आत्मसात करतो. उदाहरणार्थ, इमारतीमध्ये जिन्याच्या ऐवजी लिफ्टचा वापर, वापरा आणि फेका वस्तू, गरज नसतानाही दिव्या-पंख्यांची बटणे बंद न करणे, वाटेल तिथे कचरा टाकणे, थुंकणे असे आधुनिक काळातील गैरवर्तणूक प्रकार सर्वत्र दिसतात. त्याचे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असतात. सार्वजनिक ठिकाणी आढळणारी अशी गैरवर्तणूक बदलण्यासाठी काय करता येईल, ह्याचे प्रयोग डॉ. यंग करीत असत. उदाहरणार्थ, 'बटण बंद करा' ऐवजी 'बटण बंद केल्याबद्दल धन्यवाद' अशा प्रकारच्या सूचनांना मिळणारा प्रतिसाद असे प्रयोग त्यांनी केले होते. साद आणि प्रतिसाद हा त्यांचा अभ्यासाचा विषय. त्यासंबंधात अनेक गमतीजमती सांगून ते विद्यार्थ्यांना हसवत.

ह्याशिवाय  प्रत्येक पानावर दहा चित्रे असलेला दहा पानी चित्रांचा संच आम्हाला देण्यात आला होता. दहा लोकांना दाखवून त्यांनी सर्वात आकर्षक चित्राची निवड नोंद करायची हे काम होते. सर्व विद्यार्थ्यांनी जमवलेल्या शेकडो लोकांच्या माहितीचे विश्लेषण वर्गात सादर झाले. डॉ. यंग ह्यांनी लिहिलेले शोधनिबंध अनेक पुस्तकांत वाचायला मिळतात. हा विषय मला इतका आवडला होता की पुढे भारतात परत आल्यावर मी त्यावर मराठीत पुस्तक लिहायला घेतले होते. ५० पाने लिहून काढली पण नंतर ते मागे पडले. हा विषय मी आर्किटेक्चरच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात समाविष्ट करून घेतला आणि शिकविलाही होता.

***

डॉ. डॉर्सेता टेलर ह्यांचा 'Women and Environment'

हा विषय मी अभ्यासातही निवडला होता. उंच, धिप्पाड, आफ्रिकन अमेरिकन प्रोफेसरबाई, त्यांचा खोल, धीरगंभीर आवाज आणि शिकविण्याची पद्धत ह्यांच्या तर मी प्रेमातच पडले. समवयस्क असल्याने आमची ओळख वाढली, मैत्री झाली. शिकार करण्यासाठी, अन्नसंकलनासाठी रानोमाळ भटकणारे स्त्री-पुरुष तर लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठी वस्तीमध्ये राहणाऱ्या स्त्रिया अशी आद्य मानवजातीची विभागणी सुरू झाली. ह्यामुळे स्त्री आणि पुरुषांचे पर्यावरणीय अनुभव वेगळे होत गेले. त्यांचे परिणाम वेगवेगळे होत गेले. त्यांच्या वर्तणुकीमध्येही वेगळेपण आले. भावविश्व, स्वभावविश्व ह्यातही फरक पडला. त्यांची पर्यावरणीय निरीक्षणे, त्यांची जीवशास्त्रीय जडणघडण, अन्नप्रक्रियेशी, बालसंगोपनाशी असलेले जवळचे नाते आणि त्याबद्दलचे अनुभव वेगवगेळे असल्याने त्यांचे आकलन, ज्ञानग्रहण क्षमता ह्यांच्यातही वेगळेपण आलेले होते. त्यातूनच स्त्रियांना शेतीचा शोध लागला. अन्नसाठवणूक, त्यावरच्या प्रक्रिया ह्यांचा शोध लागला. त्यांची शब्द, भाषा घडविण्याची कला, संवादक्षमता पुरुषांपेक्षा अधिक वेगाने वाढली. सर्वसाधारणपणे स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त बोलतात हा आपला अनुभव असतो. हे उत्क्रांतीतत्त्व आहे. वेगवेगळ्या पर्यावरणाच्या संदर्भात मानवी भाषा, खाद्यपदार्थ, निवारे, घरांच्या आणि वस्त्यांच्या रचनांमधील विविधता घडत गेल्या आहेत. हस्तकला, विकसित झाल्या आहेत. मानववंशशास्त्राशी संबंधित असे अनेक विषय ह्या सत्रामध्ये शिकायला मिळाले. तसेच समाजात रूढी, समज-गैरसमज कसे घडतात ह्याचे आकलन होऊ लागले. सामाजिक भेदभाव, गुलामगिरी आणि स्त्रियांचे संघर्ष, लोकस्थलांतर, तसेच निसर्गसंवर्धनाच्या विविध चळवळी ह्यांचा पर्यावरणाच्या संदर्भात घेतलेला आढावा अशा अनेक विषयांवरील त्यांची व्याख्याने खूप प्रभावी होती.

स्त्रियांनी विविध काळांत पर्यावरणविषयात केलेल्या कामगिरींचा, डॉ. रेचेल कार्सन आणि त्यांचे प्रसिद्ध पुस्तक 'सायलेंट स्प्रिंग' ह्यांची ओळख त्यांनी करून दिली. त्यांच्यावरची एक डॉक्युमेंट्री वर्गात दाखवून त्यावर चर्चा झाली. ह्याशिवाय अमेरिकेत नायगाराजवळ आलेल्या लव्ह कॅनॉल प्रकरणात स्त्रियांनी उभ्या केलेल्या चळवळीचा सिनेमाही बघितला. १९६०-७०च्या दशकात स्त्रियांनी पर्यावरणाचा प्रश्न कसा ऐरणीवर आणला, त्याबद्दलचे शोधनिबंध

**रोज संगणकांवर आधारित प्रश्नावली सोडविण्याचा खेळ होता. त्यासाठी पाच दिवस केवळ निसर्गात, तर पाच दिवस शहरातील मुख्य दुकानांच्या रस्त्यावर तासभर चालून मग ती सोडवायची असे. त्याचे एकत्रित विश्लेषण डॉ. यंग ह्यांनी वर्गात सादर केले. ह्या दोन परिसरांतील भटकंतीमुळे मेंदूक्षमता कशी बदलते ह्याचे प्रत्यक्ष आकलन झाले.**

वाचायला मिळाले. त्याआधीच्या काळात अमेरिकेत प्राणी-पक्ष्यांच्या बेलगाम शिकारीमुळे नष्ट झालेल्या परिसंस्थांचे शोधनिबंध वाचायला मिळाले. तसेच आफ्रिकन-अमेरिकन स्त्रियांनी त्यांच्या स्वातंत्र्यलढाईत केलेल्या अनेक कर्तृत्ववान स्त्रियांची ओळख झाली. भारतामधील चिपको आंदोलनही त्यांनी विशेष आस्थेने शिकविले होते. त्यांच्यामुळेच डॉ. माधव गाडगीळ आणि डॉ. रामचंद्र गुहा ह्यांचे 'इकॉलॉजी अँड इक्विटी' हे पुस्तक मी वाचले. तेव्हा विद्यापीठामध्ये त्यांनी डॉ. गुहा ह्यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

आमच्या वर्गात तर जवळ जवळ १०० विद्यार्थी असत. मिशिगन विद्यापीठ आणि SNRE विभाग खूप विद्यार्थिप्रिय होता. सत्राच्या शेवटी पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी संशोधन निबंध लिहायचा होता. त्यासाठी विषय निवडून मान्यता घ्यायची होती. 'कोकणातील पर्यावरण आणि स्त्रिया' ह्या माझ्या २५ पानी शोधनिबंधाचे डॉर्सेता ह्यांनी विशेष कौतुक केले.

'The Environment and the People in American Cities', '1600s-1900s: Disorder, Inequality, and Social Change', 'The Rise of the American Conservation Movement: Power, Privilege, and Environmental Protection, Toxic Communities' and 'Environmental Racism, Industrial Pollution, and Residential Mobility' ही त्यांची पुस्तके आजवर प्रकाशित झाली आहेत.

### ज्ञानवंतांचा पोषणकर्ता देश

ह्या लेखाच्या निमित्ताने मला मशिगन विद्यापीठातल्या वास्तव्यादरम्यान संपर्कात आलेल्या ज्ञानवंतांच्या आठवणी

जागवता आल्या. गेल्या पंचवीस वर्षांतील त्यांच्या लिखाणाचा, कामाचा शोध घ्यायला निमित्त मिळाले. अमेरिकेतील नगरनियोजनाच्या अभ्यासाच्या काळात खूप नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या होत्या. वेगवेगळे दृष्टिकोन, संशोधन म्हणजे काय, संशोधन पद्धती समजल्या. शोधनिबंध लिहिण्याचे काम किती कष्टाचे आणि जबाबदारीचे असते हे लक्षात आले. माहिती जमा करणे, त्याचे विश्लेषण करणे आणि त्यातून पुढे काही निष्कर्ष काढून शोधनिबंध लिहिणे, हा डॉक्टरेटसाठी अभ्यास करण्याचा मुख्य उद्देश असतो. हे काम विद्यार्थी आणि प्राध्यापक एकत्रितपणे करतात. विद्यापीठातील ज्ञानवंतांनी देशोदेशींचे नवीन ज्ञानवंत निर्माण करणे हा त्याचा उद्देश असतो. त्याचबरोबर ते स्वतःही सतत अभ्यास करीत असतात; विचार करीत असतात आणि ज्ञाननिर्मिती करून त्याबद्दल लिहीत असतात. त्यामुळेच अमेरिकेतील विद्यापीठांकडे जगभरातून विद्यार्थ्यांचा ओघ सुरू असतो.

ज्ञाननिर्मिती, संवर्धन आणि देवाणघेवाण ही सातत्याने चालत आलेली मूलभूत मानवी प्रवृत्ती आहे. त्यातूनच संकर होत होत आधुनिक ज्ञानक्षेत्र विस्तारले आहे, तसेच ते खोल आणि बहुविध झाले आहे. कुतूहल ही ज्ञानप्रक्रियेची मानसिक ऊर्जा असल्यामुळे ज्ञाननिर्मिती अव्याहतपणे चालू आहे आणि चालूच राहणार आहे. ज्ञानप्रक्रियेत अनुभव, माहिती, विविध विषयांची तसेच संकल्पनांची देवाणघेवाण होते. त्यासाठी संवादकला महत्त्वाची. त्या गरजेमधून बोलण्याच्या, लिहिण्याच्या, अनुवाद करण्याच्या कला विकसित झाल्या आहेत. आधुनिक काळात तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे ज्ञाननिर्मिती, देवाणघेवाण आणि संवर्धनप्रक्रिया वेगवान झाल्या आहेत. दृक-श्राव्य कला विकसित झाल्या आहेत. ज्ञानयज्ञामध्ये अमेरिकेतील विद्यापीठे आघाडीवर आहेत. गेली दोन दशके ज्ञानवंतांच्या निर्मितीला अमेरिकेतील विद्यापीठांनी पद्धतशीरपणे मदत केली आहे. त्यांचे अनुकरण करीत चीनने त्यात आघाडी घेतली आहे. परंतु दुर्दैवाने आज अमेरिकेतच नाही तर जगभरात आणि भारतामध्येही ज्ञानवंतांची पद्धतशीर उपेक्षा केली जात आहे. संकुचित राजकीय, धार्मिक, आर्थिक विद्वेषाच्या तापलेल्या वातावरणात ज्ञानवंतांची, ज्ञान-विज्ञानाची आणि मानवतावादाची होत असलेली गळचेपी हे मानवजातीवरचे मोठे संकट आहे, हे मात्र नक्की.

❋ ❋ ❋

**सुलक्षणा महाजन ज्येष्ठ नगरनियोजनकार व पुरस्कारप्राप्त लेखिका तसेच मुक्त-संवादच्या सल्लागार संपादक मंडळाच्या सदस्य आहेत.**

**ई मेल :** sulakshana.mahajan@gmail.com

## हलकं-फुलकं



शेखचिल्ली म्हणाला, मी एक जोक सांगतो. एक होता मुल्ला... त्याला मध्येच तोडत फजलू म्हणाला, नको सांगूस? तू नेहमी मुल्ला मौलवींचेच जोक सांगतोस. आपल्यावरच विनोद करून काय समाधान मिळतं तुला? हिंमत असेल तर कधी पंडित, शास्त्रींवरचे पण जोक सांग की.

शेखचिल्ली म्हणाला, ठीकाय. मी काय घाबरत नाही कोणाला. एक पंडित होता. तो एकदा नमाज पढून मशिदीतून बाहेर आला...

- मामुमियां

# अक्षर

दिवाळी २०२५

## या वर्षीच्या अंकात काय वाचाल?





## विशेष विभाग

### युद्धकांड

संपादन : निळू दामले

- युद्ध माणसाच्या मेंदूत आहे काय? : सुबोध जावडेकर
- आम्ही डॉक्टर्स विदाउट बॉर्डर्स : डॉ. भरत केळकर
- युद्ध कव्हर करणाऱ्या बायका : निळू दामले
- युद्धाचं अर्थशास्त्र : अजित जोशी
- युद्ध आणि प्रसार माध्यमं : रवी आमले
- युद्धाचं बदललेलं तंत्र : पंकज फणसे
- न घडलेल्या युद्धाची हकिकत : लोकेश शेवडे

## लेख :

- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शंभरी : सुरेश सावंत
- मीम्सचं जग : गजू तायडे
- श्याम बेनेगलांच्या नायिका : रेखा देशपांडे
- कुर्द आणि पश्तुन जमातींचं जग : जतीन देसाई
- विश्व हिंदू परिषद करत असलेलं धर्मांतर : पार्थ एमएन
- महाराष्ट्राची आर्थिक घसरगुंडी : नीरज हातेकर
- हातभट्टी, डुकराचं मटण आणि माझा 'अर्काट' बाप : राम जगताप
- दिवाळी फराळातली भाषिक उसनवारी : हारून शेख

## कथा :

सतीश तांबे, ज्युनिअर ब्रह्मे, हिनाकौसर खान, संजय भास्कर जोशी,
अमिताभ शंकर राय चौधरी, विवेक गोविलकर आणि
बुकर पारितोषिक विजेत्या बानू मुश्ताक

आणि कविता

किंमत : ४०० रुपये

- मुखपृष्ठ सतीश भावसार


दरवर्षीप्रमाणेच अक्षरचा हा अंकही तुमच्या संग्रही असायलाच हवा.

---

अक्षर

ऑर्चिड रोड मॉल, 'बी' विंग, युनिट नं. २३५, सर्वे नं. १६९, आरे कॉलनी,
गोरेगाव (पूर्व), मुंबई–४०० ०६५, फोन : ९३२२३९१७२०/९६१९८२३६७२
Email : akshardiwali@gmail.com

# विज्ञाननिष्ठ ज्ञानयात्री



डॉ. अनुराधा सोवनी



या माणसाचा प्रवास थक्क करणारा होता. दहा मुलातलं नववं मूल. पितृछत्र लहानपणीच हरपल्यानं कुटुंबाची वाताहत झालेली. तल्लख बुध्दी नि स्मरणशक्ती असूनही परिस्थितीमुळे सुरळीत शिक्षण शक्य नव्हतं. नोकरी करत बाबा जिद्दीअने पोस्ट-ग्रॅज्युएट झाले, विद्यापीठात अव्वल आले, फुलब्राइट शिष्यवृत्ती मिळवून उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. तिथे नोकरीचा प्रस्ताव मिळूनही दिलेला शब्द पाळायला टिळक-आगरकरांच्या ध्येयवादी शिक्षणसंस्थेत परत आले. लहान वयात भूशास्त्र विभागप्रमुख झाले. डी. ई. सोसायटीचे सेक्रेटरी नि फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य झाले. शिवाय वेळात वेळ काढून विज्ञानप्रसार चालूच होता...

प्राध्यापक प्रभाकर विष्णू सोवनी.

माझे बाबा.

२०२५ हे त्यांच्या जन्मशताब्दीचं वर्ष. त्यांना जाऊनही आता दहा वर्षं झाली, पण रोज त्यांची आठवण येतेच. दुःखाने नव्हे, तर आनंदाने, कृतज्ञतेने. 'सर्वत्र खुणा मजला, त्यांच्याच दिसताहेत' असं घडतं. कारण माझ्या घरी ठायी ठायी त्यांचं अस्तित्व जाणवतं. माझी सर्व प्रगतिपुस्तकं, बक्षिसं, फोटो, लेख, पत्रं त्यांनीच निगुतीने जपलेली असतात. पुस्तकांना त्यांनी घातलेली सुबक वेष्टणं, त्यावर त्यांच्या मोत्यासारख्या अक्षरात पुस्तकाचं नि लेखकाचं नाव असतं. माझ्या घरी शोभेसाठी मांडून ठेवलेल्या शंख-शिंपल्यांच्या प्रकारांविषयी आमचं बोलणं झालेलं असतं नि त्यांनी प्रत्येक प्रकाराचं शास्त्रीय नाव मला सांगितलेलं असतं.

ही त्यांची सहजप्रवृत्ती होती. मराठीतून ज्ञान-विज्ञान प्रसार हे त्यांनी हौसेने, स्वयंस्फूर्तीने नि तळमळीने अंगावर ओढवून घेतलेलं काम होतं, जे ते शेवटपर्यंत करत राहिले. पदराला खार लावून, भरपूर वेळ नि कष्ट करून त्यांनी ज्ञानविज्ञानाच्या भाकऱ्या भाजल्या.

भूशास्त्र (जिऑलॉजी) हा त्यांचा विषय, पण त्यांच्या चौफेर जिज्ञासेला, कुतूहलाला नि अभ्यासाला कोणताच विषय वर्ज नव्हता. सतत लेख लिहून, शाळा-कॉलेजेसमध्ये भाषणं देऊन त्यांनी माहिती घराघरांत पोहोचवली.

कोयनानगरच्या भूकंपानंतर त्या विषयातला तज्ज्ञ म्हणून आकाशवाणीने त्यांना भाषणाला बोलावलं. त्यांचं सुस्पष्ट वाणीतलं मुद्देसूद, ओघवतं भाषण आणि सोप्या मराठीत किचकट तांत्रिक विषय समजावून सांगण्याची हातोटी बघून पुढे अनेक भाषणांसाठी आकाशवाणी त्यांना बोलावत राहिली.

मराठी विज्ञान परिषद, वसंत व्याख्यानमाला, संग्रहालयांनी चालवलेल्या शास्त्रीय व्याख्यानमाला अशा अनेक ठिकाणी त्यांनी त्यासाठी अनेक व्याख्यानं दिली. अनेक छोट्या पुस्तकांतून, पुस्तिकांतून रंजक भाषेतून, रोजची उदाहरणं देऊन त्यांनी मुलामुलींना विज्ञानाची गोडी लावली. मुलांना जगाविषयीच्या ज्ञानाचा आनंद समजावा, आपणहून प्रश्न विचारण्याची आणि उत्तरं शोधण्याची गंमत कळावी म्हणून बाबा मुलांसाठी शब्दकोडी, गणिती कोडी, सामान्यज्ञान कोडी तयार करत राहिले.

मातृभाषेतून शिक्षण दिलं, तर खूप लहानपणापासून जगाची चांगली ओळख करून देता येते, यावर त्यांचा विश्वास होता. ओळखीची, रोजच्या अनुभवातली उदाहरणं दिल्याने ऐकणाऱ्याला, वाचणाऱ्याला विषय पटकन समजायचा, कायम लक्षात राहायचा.

याच गुणामुळे ते विद्यार्थिप्रिय शिक्षक होते. भूशास्त्राचं शिक्षण घेताना 'ॲमिग्डेलॉइड बेसाल्ट' ही संज्ञा वाटेत भेटते. फार पूर्वी भूगर्भातून लाव्हा उसळला नि तो पृष्ठभागावर येऊन थंड झाल्यावर डोंगर, जमीन बनले. सह्याद्री 'बेसाल्ट' या प्रकारात मोडतो. त्यात कुठे कुठे 'अमिग्डेलॉइड बेसाल्ट' सापडतो. लाव्हारसाबरोबर वायूही बाहेर येतात. थंड होताना अशा वायूंचे बुडबुडे दगडात राहतात. कालांतराने त्यात इतर खनिजे जाऊन बसतात. अशा दगडाचा छेद दाखवून बाबा सांगायचे, 'शेंगदाण्याची चिक्की डोळ्यांसमोर आणा. गुळाचा थिजलेला पाक म्हणजे हा बेसाल्ट. शेंगदाणे म्हणजे त्यात विखुरलेले खनिजांचे गुंडगुळे.'

बाबा निवृत्त झाल्यावर त्यांचे विद्यार्थी निरंजन घाटे यांनी एक लेख लिहिला होता. त्यात भूशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या 'फील्ड ट्रिप्स'च्या आठवणी होत्या. दिवसभर काम केल्यानंतर संध्याकाळी विद्यार्थी-शिक्षक सिनेमाला जायचे. पडद्यावर रोमँटिक गाणं चालू असताना बाबा सांगायचे, 'पाहिलंत का, गेल्या कडव्यात हिरो बेसाल्टवर नाचत होता, तो आता सँडस्टोनवर आलाय!'

त्यांचे समानधर्मा, समवयस्क मित्र आणि त्यांचे विद्यार्थी, पुढच्या पिढीतले वैज्ञानिक दृष्टिकोन जगणारे लेखक, शिक्षक, संपादक यांच्याबरोबर बाबांनी 'सृष्टिज्ञान', 'उद्यम'सारखी मासिकं चालवायला मदत केली. त्यांचे बॉटनिस्ट मित्र डॉ. वा. द. वर्तक आणि आघारकर संशोधन संस्थेचे डॉ. श्री. ह. गोडबोले असं त्रिकूट आसपासच्या गावांच्या शाळांत जाऊन मुलांना हसत-खेळत वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवायचा प्रयत्न करीत. दिवसा मनोरंजक शास्त्रीय प्रयोग, झाडाझुडपांची ओळख नि रात्री बाबांचं आकाशदर्शन असे.

मराठी विज्ञान परिषद, वाईचा मराठी पारिभाषिक विश्वकोश अशा अनेक ठिकाणी बाबांचा कृतिशील सहभाग होता. आ. मा. लेले, निरंजन घाटे, प्र. के. घाणेकर, डॉ. अरविंद गुप्ता, शास्त्रीय खेळणी विकणारे टुमणे पतीपत्नी ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अशा सर्वांशी त्यांचे कामाचे नि मैत्रीचे संबंध होते.

या माणसाचा प्रवास थक्क करणारा होता. दहा मुलातलं नववं मूल. पितृछत्र लहानपणीच हरपल्याने कुटुंबाची वाताहत झालेली. तल्लख बुद्धी नि स्मरणशक्ती असूनही परिस्थितीमुळे सुरळीत शिक्षण शक्य नव्हतं. नोकरी करत बाबा जिद्दीने पोस्ट-ग्रॅज्युएट झाले. विद्यापीठात अव्वल आले. फुलब्राइट शिष्यवृत्ती मिळवून उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. तिथे नोकरीचा प्रस्ताव मिळूनही दिलेला शब्द पाळायला टिळक-आगरकरांच्या ध्येयवादी शिक्षणसंस्थेत परत आले. लहान वयात भूशास्त्र विभाग प्रमुख झाले. डी. ई. सोसायटीचे सेक्रेटरी नि फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य झाले. शिवाय वेळात वेळ काढून विज्ञानप्रसार चालूच होता.

'सांगे वडिलांची कीर्ती, तो एक मूर्ख' असं समर्थांनी बजावून ठेवलेलं आहे, पण मी कीर्ती सांगतच नाहीये. कीर्ती, प्रतिष्ठा, उच्च स्तरात ऊठबस, संपत्ती, झकपक पोशाख, दिखाऊ उधळमाधळ या बाबांच्या लेखी बिनमहत्त्वाच्या गोष्टी होत्या.

ते रसिक होते. हातात उत्कृष्ट चित्रकला होती. संगीताची आवड नि कान होता. सुरेल गळा होता. बाजा, पेटी, तबला, बासरी ही वाद्यं अवगत होती. पैसे नसतानाही सर्व विषयांवरची पुस्तकं, कोश यांचा भिंती भरून संग्रह होता.

जेवणाच्या टेबलावर काव्यशास्त्रविनोद चालायचे. रोजच्या घटनांवर चिं. वि. जोशी यांच्या साहित्यातली चपखल अवतरणं ऐकायला मिळायची. सर्व गोष्टींचं, म्हणींचं इंग्रजीतून मराठीत भाषांतर व्हायचं. त्यामुळे 'प्रत्येक वस्तूस आपापली जागा, त्या जागी ती वस्तू सदैव ठेवा' असं ऐकवलं जायचं.

अमेरिकेहून परतताना त्यांनी आपल्या दोन लहान मुलांसाठी गोष्टींची, रंगीत चित्रांची पुस्तकं आणली होती. आम्ही तेव्हा इंग्रजी वाचणं शक्यच नव्हतं. म्हणून पुस्तकांवर त्यांनी मराठी भाषांतरे लिहिली होती. उदा. 'रुडॉल्फ द रेड नोज्ड रेनडिअर' या गाण्याशेजारी बाबांनी 'लालनाकी, लालनाकी, किती गमतीदार! मुसुंब्याहून मोठे, अन् फारच चमकदार!' असं लिहिलं होतं.

बाबा हा घरातला बागुलबुवा नव्हते. प्रेम नि आदर असला तरी वचक, जरब, दहशत, भीती नव्हती. आम्ही एकत्र आकाशकंदील बनवायचो. दिवाळीचा किल्ला नि त्यापुढेच गाव बनवायचो. रात्री डार्करूममध्ये बाबांनी काढलेले फोटो डेव्हलप करायला मदत करायचो. रात्री आकाशवाणीवर शास्त्रीय संगीताचे राष्ट्रीय कार्यक्रम ऐकायचो.



प्रा. प्रभाकर सोवनींची कुटुंब-चौकट

केव्हा केव्हा ते रात्री आम्हाला झोपेतून उठवून जवळच्या टेकडीवर घेऊन जायचे नि आकाशातल्या नवलाच्या गोष्टी दुर्बिणीतून दाखवायचे. पिधान, युती, ग्रहण, धूमकेतू, आकाशगंगा, सर्व नक्षत्रं आणि ठळक तारे पाहिलेले आठवतात.

खडतर आयुष्याबद्दल खंत, कटुता त्यांच्या बोलण्यात कधीच नव्हती. आम्हाला त्यांनी निवांत, आनंदी, सुरक्षित बालपण दिलं. आमच्या शहाणपणावर विश्वास टाकून आमचे निर्णय आम्हाला घेऊ दिले, पण सतत भक्कम पाठिंबा दिला. विचारविनिमय करायची जागा हा भरवसा दिला.

टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये कॅन्सरवर उपचारांचं शिक्षण घेऊन मी उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले. मी एकटीच होते नि भोवती असंख्य पर्याय होते. भांबावून जायला व्हायचं. मोबाइल, व्हिडियो कॉल वगैरेच्या आधीचा काळ. तेव्हा मी लांबलचक पत्रं लिहून माझे संभ्रम, गोंधळ घरी कळवायची. काय नि का करावंसं वाटतंय ते लिहायची. उलट टपाली बाबांचं पत्र यायचं. त्यातल्या 'तुझा विचार सर्वथैव योग्य आहे' या एका वाक्याने धीर यायचा; पुढे जायला बळ यायचं.

ते काळाच्या पुढे होते. सर्व वस्तूंचा जपून सांभाळा, दुरुस्ती, पुनर्वापर अशी त्यांची पर्यावरणपूरक जीवनशैली होती. अंधश्रद्धांना स्थान नव्हतं. सर्व गोष्टींची परखड चिकित्सा करून मगच स्वीकार व्हायचा.

बाबांची आई (ताई) आमच्याकडे राहायच्या. त्या होत्या तोवर घरात देवघर होते, देवपूजा होती, लोणी-खडीसाखरेचा

मस्त नैवेद्य होता. बाबा त्याआड कधी आले नाहीत. पण ताई गेल्यावर देव गुंडाळून ठेवले गेले. माणुसकी हा एकच धर्म बाबांना मान्य होता. विवेकवादी, विज्ञानाच्या पायावर बेतलेली समतोल जीवननिष्ठा होती.

पुढे त्यांनी 'दगडातला देव आणि देवातले दगड' असा एक छान लेख लिहिला. आमच्या देवांमध्ये एक गणपतीचा लाल दगड होता. हा गंडकी नदीच्या प्रवाहात घासून गुळगुळीत झालेला असतो; शंकराची स्फटिकाची पिंड कुठून येते; दत्ताच्या पादुका कुठल्या; नरम दगडावर कोरीव काम करून बनवलेल्या असतात वगैरे माहिती लेखात होती.

'अंतर्नाद' मासिकात त्यांचा 'आमचा इंपोर्टेड उपास' हा असाच एक स्वच्छ नजरेने परंपरांकडे बघणारा गमतीदार लेख होता. उपासाच्या दिवशी काय खायचं; काय वर्ज हे नियम हजारो वर्षांपूर्वी ऋषिमुनींनी घालून दिलेले आहेत, अशी समजूत असते. प्रत्यक्षात ही पोटाला नि पचनसंस्थेला विश्रांती द्यायची योजना होती. पण हुशार माणसांनी 'जे जे निषिद्ध म्हटलेलं नाही, ते चालेल' असा तर्क लढवला. पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज अशांबरोबर भारतात आलेले बटाटे, शेंगदाणे, साबुदाणा, मिरची चालेल असं ठरवलं आणि 'एकादशी दुप्पट खाशी' असं स्वरूप बनलं!

कुठेही अंधश्रद्धा, अवैज्ञानिक भोंगळपणा दिसला की बाबा त्याची परखड चिकित्सा करायचे. 'किर्लोस्कर' मासिकात गो. नी. दांडेकरांचा 'बहुरत्ना वसुंधरा' हा लेख आला. सुरेख वर्णनं, हातखंडा शैली असा अत्यंत वाचनीय लेख. पण त्यात सह्याद्रीतल्या भटकंतीत सापडलेल्या गोमेद, वैडुर्य,

**ते काळाच्या पुढे होते. सर्व वस्तूंचा जपून सांभाळा, दुरुस्ती, पुनर्वापर अशी त्यांची पर्यावरणपूरक जीवनशैली होती. अंधश्रद्धांना स्थान नव्हतं. सर्व गोष्टींची परखड चिकित्सा करून मगच स्वीकार व्हायचा.**

पुष्कराज, मार्जारनेत्री वगैरे रत्नांचा उल्लेख होता. भूशास्त्रीय दृष्टीने त्यातली काही सह्याद्रीच्या जडणघडणीत बनणं, असणं अशक्य होतं. तसं टिपण बाबांनी पाठवलं, ते छापून आलं. त्यावर गोनीदांची प्रतिक्रिया आली, 'सोवन्यांनी वाट्टेल ते म्हणावं. निसर्ग हा चमत्कार करणारा जादूगार आहे!' इथे भावनिक नि वैज्ञानिक हा फरक स्पष्ट झाला!

परंपरावादी, पुनरुज्जीवनवादी विचारांच्या लाटेत 'वास्तू', 'ज्योतिष' यापुढे 'शास्त्र' चिकटवून वैज्ञानिक पायाचा आभास निर्माण केला जातो. आमच्या ऋषींकडे दिव्य दृष्टी होती, संजीवनी होती, पुष्पक विमान होतं, गणपती म्हणजे ऑर्गन ट्रान्स्प्लांट वगैरे घोषणा उच्चरवात ठासून सांगितल्या जातात तेव्हा बाबांसारख्या तत्त्वनिष्ठ, विज्ञाननिष्ठ, धैर्यवान माणसांचं महत्त्व अधोरेखित होतं!

❋❋❋

**डॉ. अनुराधा सोवनी**
**संपर्क:** sowani.a@gmail.com


# ज्ञानियांचे ऋण



डॉ. मंगेश कुलकर्णी



प्रा. पुष्पा भावे, अनंत भावे आणि वीणा जामकर



प्रा. जयंत लेले



प्रा. राम बापट



कविवर्य सदानंद रेगे

**वाचन, निरीक्षण, प्रयोग ही अखंड ज्ञानप्राप्तीची प्रमुख साधने आहेत हे खरे; पण ज्ञानवंतांकडून थेट प्राप्त होणारे विचारधन अमूल्य म्हणावे लागेल. अस्सल ज्ञानसाधने कशी ओळखावीत आणि पारखावीत; त्यांचा शोध आणि त्यांपासून बोध कसा घ्यावा; त्याआधारे नवी ज्ञाननिर्मिती साधून त्याचा योग्य प्रसार कसा करावा हे सहृदय ज्ञानवंतांच्या सहवासातूनच आकळते. माझ्या संपर्कात आलेल्या अशा काही ज्ञानी व्यक्तींविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न...**

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इयें। दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।।

**– संत ज्ञानेश्वर**

मुंबईतील अरविंद गंडभीर शाळेत सत्तरीच्या दशकात माझे दहावीपर्यंतचे शिक्षण झाले. जोगेश्वरी या उपनगरातील ही मराठी माध्यमाची शाळा पार्ले टिळक किंवा बालमोहन यांसारखी बोर्डात झळकत नसे. इथला विद्यार्थीवर्ग मुख्यत्वे निम्नवर्गीय असून त्यात माझ्यासारखे मोजकेच सुशिक्षित मध्यमवर्गीय कौटुंबिक पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी होते. बहुतेक देशी शाळांप्रमाणेच येथेही भाषा, इतिहास यांसारख्या विषयांना दुय्यम लेखले जायचे आणि एखाददुसरा अपवाद वगळता परीक्षाकेंद्री अभ्यासावर कटाक्ष असे. कार्यानुभव हा विषयसुद्धा सहसा पुस्तकी पद्धतीने उपचार म्हणून शिकवला जाई. सुमार बुद्धीच्या, मारकुट्या मास्तरमंडळीचा काच तर होताच.

**कवितेची लय**

अशा काहीशा निराशाजनक वातावरणात सौ. शैलजा जोशी ह्या मृदू स्वभावाच्या, कळकळीने मराठी शिकवणाऱ्या, कविमनाच्या शिक्षिका आम्हाला लाभल्या. पौगंडावस्थेतला तो माझा पहिला टप्पा होता आणि वाङ्मय, तत्त्वज्ञान, निसर्ग यांविषयी मला जिज्ञासा वाटत होती. जोशीबाईंनी कोरड्या भाषा शिक्षणापलीकडे जाऊन ललित साहित्याचा पोत उलगडला. माझ्या उमलत्या काव्यवृत्तीची त्यांनी कदर केली आणि कवितेतील विचारगर्भतेचे महत्त्व समजावून सांगितले. शिवाय आरे कॉलनीतील 'छोटा काश्मीर' या निसर्गरम्य परिसराचा परिचय त्यांनी घडवला. नंतरदेखील बरीच वर्षे पत्रव्यवहारातून आमचा संवाद कायम राहिला.

माटुंग्यातील रुईया महाविद्यालयात १९७८ साली प्रवेश घेतल्यानंतर पुढची पाच वर्षे तेथील समृद्ध ग्रंथालय, काही नामवंत प्राध्यापक आणि (अत्यल्प) समविचारी सहाध्यायी असे विविध ज्ञानस्रोत उपलब्ध झाले. कनिष्ठ महाविद्यालयात आमचे इंग्रजीचे प्राध्यापक होते, प्रख्यात मराठी कथाकार आणि कविवर्य सदानंद रेगे! बहुतेक विद्यार्थ्यांना त्यांची अध्यापनशैली तऱ्हेवाईक वाटत असे. पण मी नियमितपणे त्यांच्या वर्गात हजेरी लावे व इतरत्र त्यांच्याशी बोलण्याची संधी सोडत नसे. त्या वेळी त्यांची सापडतील ती पुस्तके मी वाचून काढली. त्यांतून आणि त्यांच्या संभाषणातून मला साहित्याच्या अद्भुत, जीवनदर्शी शक्तीचा साक्षात्कार झाला. लेखन ही एक साधना असल्याचे भान आले. कवितेच्या घटनातत्त्वांचा परिचय करून देणारे पुस्तक रेगे सरांनी मला वाचायला दिले आणि माझ्या काही कविता दिवाळी अंकांमध्ये प्रसिद्ध केल्या. माझ्या वृत्तपत्रीय लेखनाचे त्यांनी कौतुक केले. रेगे सरांना आधुनिक चित्रकला व अभिजात संगीत यांची उत्तम जाण होती आणि त्यांविषयी मलाही आस्था वाटू लागली.

ग्रंथालयातील केवळ प्राध्यापकवर्गासाठी राखीव असलेले विभाग त्यांनी आणि प्रा. श्रीकुमार ह्यांनी माझ्यासाठी खुले केले. रेगे सरांनी तेथील चित्रकलाविषयक उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ मला दाखवले. त्यांतील चित्रांचे रसग्रहण करण्याविषयी मार्मिक सूचना दिल्या. साहित्य आणि इतर कला यांचा वैश्विक पातळीवर विचार करण्यास त्यांनी उद्युक्त केले. त्यांच्या संग्रहातली बोदलेर, लोर्का, नेरुदा, आमिचाई अशा देशोदेशींच्या कवींची अनुवादित पुस्तके वाचण्याची संधी मिळाली. सोफोक्लीस, मायकोव्स्की, लिन युटांग, राजगोपालाचारी ह्यांसारख्या विख्यात लेखकांच्या साहित्यकृती त्यांनी मराठी वाचकाला उपलब्ध करून दिल्या व भाषांतराचा वस्तुपाठ घातला. *'ब्रांकुशीचा पक्षी'* (१९८०) हा त्यांचा नव्याने प्रसिद्ध झालेला कवितासंग्रह त्यांनी मला स्वाक्षरीसह भेट दिला तेव्हा झालेला आनंद आजही ताजा आहे. निवृत्तीला काही महिने राहिलेले असताना १९८२ साली त्यांचा मृत्यू झाला. दिलीप चित्रे, अमोल पालेकर, प्रभुराम जोशी ह्यांच्या भावस्पर्शी श्रद्धांजलीपर भाषणांतून रेगे सरांच्या व्यक्तिमत्वाचे नवे पैलू दृग्गोचर झाले.

**बहुपेडी बौद्धिक पर्वणी**

रुईयाचा मराठी विभाग उत्तम होता. त्यातील प्रा. नीलिमा वैद्य, प्रा. वसंत पाटणकर व प्रा. अशोक बागवे ह्या तेव्हा तरुण असलेल्या शिक्षकांच्या अध्यापनाचा लाभ झाला. न्यायासाठी निर्भयपणे झगडणाऱ्या आणि साहित्याचा (विशेषेकरून नाट्यसृष्टीविषयीचा) सखोल व्यासंग जोपासणाऱ्या प्रा. पुष्पा भावे ह्यांच्याकडून मराठी शिकण्याची संधी बी.ए.च्या प्रथम वर्षात मिळाली. त्यांचे विचारघन वाक्पटुत्व, भारदस्त पण

संवादी व्यक्तिमत्व आणि समाजाभिमुख साहित्यविवेचन ह्यांनी मी प्रभावित झालो. महाविद्यालयापासून हाकेच्या अंतरावर त्या राहत असत आणि मिलिंद पारखी ह्या माझ्या काव्यप्रेमी मित्रासोबत अधूनमधून मी त्यांच्या घरी जात असे. तेथे त्यांच्यासोबत होणारी संभाषणे म्हणजे एक बौद्धिक पर्वणीच होती. त्यांनी बनवलेले चविष्ट खाद्यपदार्थ आणि प्रा. अनंत भावे ह्यांचा नर्मविनोद यांची साथ असली की या भेटीगाठींना आणखीच खुमारी येई.

राज्यशास्त्र हा माझा प्रमुख अभ्यासविषय होता. प्राचार्य वळसंगकर ह्यांचाही तोच विषय असल्याने आणि माझ्या विविध उपक्रमांतील सहभागामुळे मला ते प्रोत्साहन देत. प्रा. रामचन्द्रं, प्रा. कैसरे व प्रा. बसरूर नेटकेपणे शिकवत. प्रा. अशोक मोडक हे सोविएत–तज्ज्ञ असून त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही पदवी संपादन केली होती. त्यामुळे सोविएत राज्यव्यवस्थेसंबंधीचा अभ्यासक्रम ते चोखपणे हाताळत. वैचारिक नियतकालिकांचे संपादन आणि प्रकाशन व्यवसाय या क्षेत्रांतील अनुभव गाठीशी असलेले प्रा. व्ही. के. सिन्हा राजकीय विचार व सिद्धांत या बहुतेक विद्यार्थ्यांना क्लिष्ट वाटणाऱ्या विषयांवर तन्मयतेने आणि रसाळपणे व्याख्याने देत तेव्हा त्यांच्या विस्तृत वाचनाचा तसेच इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाचा प्रत्यय येत असे. ‘साहित्य सहवास’ येथील त्यांच्या सदनिकेतील अफाट ग्रंथसंग्रह वाखाणण्याजोगा होता. आंतरविद्याशाखीय आलोकाची अनिवार्यता त्यांनी मला सहजगत्या समजावून दिली.

प्रा. सिन्हा उदारमतवादाचे अध्वर्यू होते; तर इतर प्राध्यापकांची साम्यवाद, समाजवाद, हिंदुत्ववाद अशा विविध विचारसरणींशी जवळीक होती. पण कोणीही विद्यार्थ्यांवर आपला पंथ लादण्याचा प्रयत्न केला नाही. अशा खुल्या वैचारिक वातावरणात बहुपेडी बौद्धिक बैठक स्वीकारणे सुकर झाले.

पदव्युत्तर शिक्षणासाठी मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात प्रवेश घेतला आणि इमानेइतबारे अध्ययन केले. नंतर तेथेच औपचारिक संशोधनप्रक्रियाही पार पाडली. प्रा. श्रीनिवासन हे बहुश्रुत बहुभाषाकोविद एका टप्प्यावर माझे मार्गदर्शक होते, पण ते निवृत्तीच्या जवळ येऊन ठेपल्याने त्यांच्या विद्वत्तेचा फारसा लाभ झाला नाही. पर्यायाने या सर्वांतून जे हाती लागले, त्याचे श्रेय बहुशः स्वाध्यायाला आणि प्रा. अरविंद टिकेकर ह्यांच्या दक्ष नेतृत्वामुळे सुरळीतपणे चाललेल्या समृद्ध जवाहरलाल नेहरू ग्रंथालयाला द्यावे लागेल.

१९८०च्या दशकाअखेरीस माझ्यावर प्रभाव पडला तो दिल्लीस्थित प्रा. शुदिप्तो कविराज ह्यांच्या भारतीय राजकारणावरील विवेचक, पांडित्यपूर्ण, शैलीदार लेखनाचा. मात्र त्यांच्या प्रत्यक्ष भेटीचा योग तेव्हा आला नाही. सर्वश्री प्रफुल्ल बिडवई, अचीन वनायक, अरविंद दास, कुमार केतकर ह्यांच्या वृत्तपत्रीय लेखनातूनही काही अंतर्दृष्टी प्राप्त झाल्या.

### अभ्यासगटांतील विचारमंथन

१९९०च्या दशकाच्या प्रारंभी चर्चगेट स्टेशन जवळल्या थीऑसॉफी हॉल मध्ये पी.ई.एन. ह्या संस्थेच्या कार्यालयात प्रख्यात साहित्यिक आणि इंग्रजीचे निवृत्त प्राध्यापक निस्सीम एझेकियल ह्यांना भेटायला मी जात असे. तेथे रणजीत होस्कोटे ह्या उदयोन्मुख कवीची आणि कलासमीक्षकाची भेट झाली. एझेकियल ह्यांच्या प्रोत्साहनाने आम्ही दोघे प्रा. वसंत आबाजी डहाके ह्यांच्या कवितांचा त्यांच्या संमतीने इंग्रजी अनुवाद करू लागलो. हार्पर कॉलिन्स करवी १९९२ साली या अनुवादित कविता पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाल्या आणि त्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला. ह्या प्रकल्पातून वाङ्मयीन अनुवादातले बारकावे समजले; तसेच पी.ई.एन.मध्ये नियमितपणे जमून साहित्यविषयक चर्चा करणाऱ्या तरुणांच्या गटात सहभाग घेता आला. आज कीर्तिवंत झालेले कादंबरीकार जेरी पिंटो, कवयित्री अरुंधती सुब्रमणियम (आणि अर्थात रणजीत) हे या गटाचे सदस्य होते.

डॉ. जयरस बनाजी आणि साथी रोहिणी हेन्समन ह्या परिवर्तनवादी कार्याला व्यासंगाची जोड देणाऱ्या दाम्पत्याशी १९९५ साली गाठ पडली व पुढली पाच वर्षे त्यांच्यासोबत एका अनौपचारिक अभ्यासगटाचा सदस्य झालो. ऑक्सफर्ड विद्यापीठात शिकलेल्या ह्या दोघांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या गटात सर्वश्री मिहीर देसाई (वकील), सुजित भट (अनुवादक), उल्हास जोगळेकर (सनदी लेखापाल), जतीन वागळे (प्राध्यापक) यांसारख्या व्यासंगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील घडामोडींमध्ये स्वारस्य असलेल्या व्यक्तींचा सहभाग होता. शिवाय अनेकदा प्रा. नलिनी पंडित, साथी आनंद

पटवर्धन (त्यांच्या चिकित्सक माहितीपटांनी माझ्यावर गारूड केले होते.), डॉ. रुस्तम भरुचा, डॉ. दिलीप सीमिअन इत्यादी नामवंतांना चर्चेसाठी विशेष आमंत्रण दिले जाई. मार्क्सवाद, जागतिकीकरण, जनआंदोलने, जमातवाद, अण्वस्त्रप्रसार अशा कित्येक कळीच्या विषयांवर वाद झडत आणि त्यातून तत्त्वबोध होत असे.

श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठाशी संबंधित प्रा. मैत्रेयी कृष्णराज, प्रा. उषा ठक्कर, प्रा. सुजाता पटेल ह्यांच्या संपर्कात आल्यानंतर स्त्रीवादी, लिंगभावविषयक चर्चाविश्वाचा अधिक गांभीर्याने वेध घेण्याची निकड भासली. स्वयंअध्ययनातून 'पुरुषत्वाचा चिकित्सक अभ्यास' हे क्षेत्र दृष्टिक्षेपात आले आणि १९९०च्या उत्तरार्धापासून त्यामध्ये विविध मार्गांनी योगदान देण्याचा प्रयत्न जारी आहे. अभिनव उपक्रमांद्वारे या अभ्यासविषयास चालना देणारे माहितीपट-निर्माता राहुल रॉय आणि त्यात लक्षणीय भर घालणारे प्रख्यात समाजशात्रज्ञ प्रा. संजय श्रीवास्तव ह्यांचे या वैचारिक प्रवासात २०००च्या दशकामध्ये अनमोल सहकार्य लाभले.

**ज्ञानसाधकांचा संग**

वीस वर्षांपूर्वी पुण्यात स्थलांतर केल्यावर डॉ. मीरा कोसंबी ह्यांच्याशी अधिक चांगला परिचय झाला. त्यांचे वडील प्रा. दामोदर कोसंबी ह्यांच्या जन्मशताब्दीप्रीत्यर्थ २००७ साली आयोजित केलेल्या व्याख्यानमालेच्या निमित्ताने आणि त्यानंतर मीराताईंशी भेटीगाठी झाल्या. या काळात त्यांचे मोठ्या प्रमाणात संशोधनपर लेखन चालू होते व त्यातून प्राथमिक स्रोतांवर आधारलेली, महाराष्ट्रातील स्त्रियांच्या इतिहासावर मौलिक भाष्य करणारी, तसेच दामोदर आणि धर्मानंद कोसंबी यांचा वैचारिक वारसा जतन करणारी पुस्तके प्रसिद्ध झाली. उतारवयातील अडचणींचा सामना करत, व्रतस्थपणे व शिस्तबद्ध, काटेकोर रीतीने त्यांनी केलेली ही एकांडी ज्ञानसाधना मला बरेच काही शिकवून गेली.

प्रा. राम बापट ह्या अवलिया विचारवंताची १९८९ साली मी सहआयोजित केलेल्या मुंबईतील महाराष्ट्रविषयक चर्चासत्रात प्रथम भेट झाली व त्यानंतरही संपर्क चालू राहिला. पण २००५ पासून त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या सात वर्षांमध्ये मी त्यांना जवळून पाहिले. मोजकेच लेखन करूनही चार पिढ्यांतील कित्येक विद्यार्थी, सहकारी, कार्यकर्ते आणि लेखक यांना प्रभावित करणाऱ्या ह्या विलक्षण व्यक्तिमत्त्वाविषयी काहीसे विस्ताराने लिहिणे योग्य ठरेल.

बापटांचा लोकसंग्रह आणि संपर्क एवढा प्रचंड होता की खाजगीपण (प्रायव्हसी) नावाची गोष्ट त्यांच्या आयुष्यात होती की नाही असा प्रश्न पडे. या प्रश्नाचे उत्तर ठामपणे नाही असे देण्याचा मोह होतो. पण ते अर्धसत्य ठरेल. त्यातला सत्यांश हा की कठोर कौटुंबिक पाश, मुजोर व्यावसायिक महत्त्वाकांक्षा, किंवा मालमत्ता आणि सत्ता यांच्या हव्यासातून उद्‌भवणाऱ्या स्वार्थलोलुपतेपासून ते मुक्त होते. अखंड चाललेला विचारविमर्श आणि श्रेयसवेध हाच त्यांचा प्रपंच होता. जिज्ञासूंसाठी त्यांच्या घराची आणि मनाची कवाडे नेहमी खुली असत.

हे सर्व खरे असले तरी त्यांच्या जीवनवस्त्राला एकाकीपणाची गडद किनार होती असे दिसते. परिसंवादात सतत सक्रिय सहभाग घेणारे बापट अनेकदा चर्चेच्या ऐन धुमश्चक्रीत अलिप्त, अंतर्मुख झाल्याचे जाणवे. दऱ्याखोऱ्यांमध्ये भ्रमण करण्याची त्यांना हौस होती. मात्र त्यासाठी कोणी सोबत असलेच पाहिजे, असा त्यांचा आग्रह नसे. तात्त्विक पातळीवर त्यांचा कल समन्वयाकडे असला तरी कित्येक कळीच्या मुद्द्यांवर त्यांची भूमिका 'एकला चालो रे' अशी असे. त्यांचे खाजगी विश्व अशा एकाकीपणात सामावलेले होते व 'निरात्म आत्ममग्नता' हा त्याचा गाभा होता.

उक्ती आणि कृती यांच्या अद्वैतावर बापटांचा कटाक्ष असे. म्हणूनच १९७५ साली लादलेल्या राष्ट्रीय आणीबाणीच्या विरोधात आवाज उठवण्याचे धैर्य त्यांनी दाखवले. परंतु त्यांची मौखिक अभिव्यक्ती व त्यांचे लेखन यांमध्ये एक ठळक विसंगती दिसून येते. चर्चा, व्याख्याने या माध्यमांतून ते मुक्तपणे संवाद साधत. अशा प्रसंगी बोलताना त्यांची भाषा


> **लोकसंग्रह व एकांत, परिवर्तनप्रवण क्रियाशीलता व निखळ तत्त्वचिंतन, परंपरा आणि नवता, तसेच वास्तववाद व स्वप्नदर्शित्व अशा ध्रुवांना स्पर्शण्याची पास्कालप्रणीत किमया प्रा. राम बापट ह्यांनी साधली होती असे दिसते!**

बहुरंगी, प्रवाही असे व त्यांची आंतरविद्याशाखीय विद्वत्ता, विनोदबुद्धी, तसेच कल्पकता यांची पूर्ण प्रचिती श्रोत्यांना येई. लेखनाविषयी मात्र ते अत्यंत अनुत्साही असत. सुहृदांच्या आग्रहाखातर त्यांच्या पुस्तकांसाठी लिहिलेल्या प्रस्तावना हा त्यांच्या लेखनप्रपंचाचा एक महत्त्वाचा घटक म्हणावा लागेल. हे लेखन बहुशः स्तुतीपर आणि सारांशवजा असून त्यातील वैचारिक अभिव्यक्ती सावध व काहीशी जडशीळ, पंडिती वळणाची असल्याचे भासते. अनेक दिशांनी संचार करू पाहणाऱ्या त्यांच्या प्रतिभेला लेखन ही बाबच मुळात जाचक वाटत असावी.

असे असूनही वर उल्लेखिलेल्या संग्रहाशिवाय बापटांचे विचार त्यांच्या मृत्युपश्चात आणखी दोन खंडांमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. *'राज्यसंस्था, भांडवलशाही आणि पर्यावरणवाद' (लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१३)* व *'भारतीय राजकारण: मर्म आणि वर्म' (लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०१५)*. साधारणतः १९६९ ते २००८ या चार दशकांतील व्याख्याने, मुलाखती, टिपणे, नियतकालिकांतील लेख असे संकीर्ण साहित्य त्यांमध्ये समाविष्ट केले आहे. शिवाय इंग्रजीतही त्यांचे काही लेखन उपलब्ध आहे.

बापटांच्या विचारविश्वात एक लक्षणीय द्वंद्वात्मकता जाणवते. समाजव्यवस्थेतील लिंगभाव, जात आणि वर्ग यांवर आधारित अंतर्विरोधांचे त्यांना तीव्र भान होते. राजकीय, आर्थिक घडामोडी, तसेच तुलनेने स्वायत्त असलेली साहित्य, कला इत्यादी क्षेत्रे यांची चिकित्सा करतानाही हे भान सुटणार नाही याची ते खबरदारी घेत. 'विजय तेंडुलकरांच्या नाट्यसृष्टीतून हिंसेविषयी काहीएक चिरंतन सत्य व्यक्त होते' यासारख्या साचेबंद भूमिकांचाही ते समाजसापेक्ष दृष्टिकोणातून हिरिरीने प्रतिवाद करीत; पण त्याचबरोबर आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर ह्यांच्या जडवादाचे अवगुंठन असलेल्या चिद्वादप्रवण विचारसरणीचे त्यांना जबरदस्त आकर्षण होते.

समकालीन वास्तवावर भाष्य करतानादेखील बापट भूतकाळाचे भान राखत आणि भविष्याचा वेध घेत. पर्यावरणीय अरिष्ट व जागतिकीकरण यांसारख्या नव्या आव्हानाविषयी त्यांनी मौलिक भाष्य केले होते. उदारमतवाद, मार्क्सवाद, राष्ट्रवाद, समाजवाद, गांधीविचार, हरित विचारप्रणाली, स्त्रीवाद, उत्तरआधुनिकतावाद यांचे सूक्ष्म विश्लेषण करून बापटांनी त्यांच्यातील विधायक सूत्रांची सांगड घालण्याचा



प्रा. वसंत आबाजी डहाके सोबत लेखक डॉ. कुलकर्णी

प्रयत्न केला. त्यांनी आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत राजकीय प्रक्रियांची दूरदृष्टीने चिकित्सा केली. शिवाय अर्धवटरावांनी केलेला प्रतिगामित्वाचा आरोप झेलून ते व्यापक हिंदू संचितातील मुक्तिदायी शक्यतांचा शोध घेत राहिले. बापट सर शीघ्रकोपी असल्याची वदंता होती; पण २००८च्या सुमारास विद्यापीठातील एका परिसंवादात भारतीय राजकारणावर बोलण्याचा त्यांना अधिकार नसल्याचा कांगावा करण्याऱ्या उर्मट व्यक्तीला केवळ स्मितहास्य करून त्यांनी चीत केल्याचा अनुभव तिथे हजर असलेल्या अनेक जणांना अजून आठवतो.

कोणत्याही एका ध्रुवावर अढळ न राहता दोन्ही ध्रुवांना स्पर्श करण्यातच खरी थोरवी आहे या अर्थाचे फ्रेंच तत्त्वज्ञ ब्लेज पास्काल ह्यांचे एक प्रसिद्ध वचन आहे. लोकसंग्रह व एकांत, परिवर्तनप्रवण क्रियाशीलता व निखळ तत्त्वचिंतन, परंपरा आणि नवता, तसेच वास्तववाद व स्वप्नदर्शित्व अशा ध्रुवांना स्पर्शण्याची पास्कालप्रणीत किमया प्रा. राम बापट ह्यांनी साधली होती असे दिसते!

बापट सरांशी ज्यांची काही प्रमाणात तुलना करता येईल असे आणि पुण्यात वावर असलेले, त्याच वयोगटातले एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे नुकतेच दिवंगत झालेले समाजशास्त्रज्ञ प्रा. जयंत लेले. अमेरिकेत उच्च शिक्षण घेऊन कॅनडामध्ये स्थायिक झालेल्या लेले सरांची विद्याक्षेत्रीय कारकीर्द नेत्रोद्दीपक होती. १९८९ पासून त्यांना भेटण्याचा अनेकदा योग आला आणि २०११ मध्ये राजकीय तत्त्वचिंतनावरील माझ्या संपादित पुस्तकासाठी त्यांनी एक विस्तृत लेखही लिहिला.

फ्रँकफर्ट स्कूल, भाषाशास्त्र, विचारांचा इतिहास, भगवद्गीता, संतसाहित्य, भारतातील आणि महाराष्ट्रातील अर्थराजकारण अशा विविध विषयांना गवसणी घालणाऱ्या त्यांच्या मौलिक लेखनातून आणि संभाषणातून अनेक अंतर्दृष्टी प्राप्त झाल्या आणि काटेकोर, संयत लेखनाचा वस्तुपाठ उपलब्ध झाला.

गेल्या पन्नास वर्षांमध्ये ज्यांच्याकडून खऱ्या अर्थाने ज्ञान – केवळ माहिती किंवा कौशल्ये नव्हेत, तर अभ्यासविषयाचा समग्रलक्ष्यी, सखोल ठाव घेण्याची क्षमता, तसेच त्यासाठी आवश्यक असलेली वैचारिक सामग्री कमी-अधिक प्रमाणात लाभले अशा ज्ञानवंतांशी झालेल्या देवाणघेवाणीचा हा एक धावता आढावा. एखादी पदवी आणि उपयुक्त बौद्धिक संपदा पदरी पडेल आणि लौकिक यशाचा मार्ग खुला होईल अशी मर्यादित व्यावहारिक अपेक्षा बाळगणारा विद्यार्थी म्हणून नव्हे तर सत्यशोधनाची आस असलेला जिज्ञासू ज्ञानार्थी ह्या भूमिकेतून मी त्यांच्याशी संवाद साधला. परिणामी माझी क्षितिजे रुंदावली; माझ्या जाणिवेच्या कक्षा वाढल्या आणि भावनेला शास्त्रकाट्याची कसोटी येण्याची शक्यता निर्माण झाली.

❋ ❋ ❋

**डॉ. मंगेश कुलकर्णी राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत. त्यांनी भारत, मलावी, जर्मनी आणि ऑस्ट्रिया या देशांतील विद्यापीठांत अध्यापन केले आहे. ते 'न्यू क्रेस्ट' या वैचारिक नियतकालिकाचे सहसंपादक होते. सेज, राउटलेज इत्यादी प्रकाशकांनी त्यांची पाच पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत.**

**संपर्क:** mangshra@yahoo.co.in

## हलकं-फुलकं



ओशो अर्थात आचार्य रजनीश शाळा-कॉलेजांतही अतिशय बंडखोर वृत्तीचे होते. चंद्रमोहन जैन हे त्यांचं जन्मनाव. रजनीश हे घरी हाक मारण्याचं संबोधन. शाळेत टोपी घालण्याचं सयुक्तिक कारण कळेपर्यंत ती घालणार नाही, असं सांगून रजनीश तीन महिने वर्गाबाहेर उभा राहिला होता आणि खिडकीतून शिक्षकांचं बोलणं ऐकून त्याने अभ्यास केला होता. अखेर शाळेनेच त्याला टोपी न घालता वर्गात बसायची परवानगी दिली.

कॉलेजात असताना एका वादविवाद स्पर्धेत रजनीशचे युक्तिवाद ऐकून सागर युनिव्हर्सिटीचे तत्त्वज्ञानाचे प्रपाठक एस. एस. राय प्रभावित झाले. हा विद्यार्थी आपल्या विद्यापीठात यायला हवा, त्याला स्कॉलरशिप द्या, असं साकडं त्यांनी कुलगुरूंना घातलं. कुलगुरूंनी रजनीशला बोलावलं. पायात खडावा आणि कमरेला लुंगी अशा वेषात युवक रजनीश त्यांना भेटायला गेला. कुलगुरूंनी विचारलं, हा काय वेष? राय म्हणाले की याने नैसर्गिक जीवनशैलीचा अंगिकार केला आहे, म्हणून हा वेष परिधान केला आहे. कुलगुरूंनी नैसर्गिक जीवनशैलीची खिल्ली उडवायला सुरुवात केली. रजनीशबरोबर त्यांचा वाद सुरू झाला, तो टिपेला पोहोचला. राय यांची पंचाईत झाली. ते रजनीशचे कपडे खेचू लागले. रजनीश कुलगुरूंना म्हणाला, मी तुमच्याशी वाद घातला तर तुम्ही मला प्रवेश देणार नाही आणि स्कॉलरशिप तर विसरावीच लागेल म्हणून राय माझे कपडे ओढतायत मला गप्प करायला.


कुलगुरूंनी कागदपेन खेचून प्रवेशपत्र लिहिलं आणि स्कॉलरशिपचीही व्यवस्था केली. ते रजनीशला म्हणाले, तू माझ्याकडे तुझ्या कामासाठी आला होतास. तुला माझ्याकडून स्कॉलरशिप हवी होती, प्रवेश हवा होता. पण, याने तुझे मुद्दे प्रभावित झाले नाहीत, तुझ्या युक्तिवादाची धार गेली नाही, तुझी भाषा मवाळ झाली नाही; माझ्याकडे तुझं काही काम नसल्यासारखाच तू वादविवाद केलास, म्हणून तुला मी प्रवेश देतो आहे. रजनीशने त्या विद्यापीठातून तत्त्वज्ञानात एम.ए. केलं.

- मामुमियां

# खणखणीत ज्ञानस्तंभ!




डॉ. शैलेन भंडारे



डॉ. परमेश्वरीलाल गुप्त

प्रा. जो क्रिब



पूर्वसुकृताची जोडी म्हणून जो विषय 'छंद' असतो, त्याच विषयात 'करिअर' करण्याचे भाग्य ज्या थोड्या लोकांना लाभते, अशा भाग्यवंतांत मी माझी गणना करतो. ही व्यावसायिक संधी मला कुठे मिळाली, तर ऑक्सफर्डसारख्या ज्ञानवंतांच्या 'तीर्थक्षेत्रा'त. म्हणजे तर सोन्याहूनही पिवळेच म्हणायला हवे. पण मी इथल्या ज्ञानवंतांबद्दल बोलणे टाळणार आहे आणि माझ्या व्यावसायिक आणि अकादमिक वाटचालीत ज्या व्यक्तींचा माझ्याबरोबर थेट परिचय आहे (किंवा होता) आणि ज्यांच्या सहवासाचा माझ्या शास्त्रीय 'वर्तणुकी'वर प्रभाव पडला, अशा दोन 'ज्ञानवंतां'बद्दल हे चार शब्द...

पहिल्याप्रथम स्पष्ट करतो. ते म्हणजे मी ज्या दोन ज्ञानवंतांबद्दल लिहीत आहे, रूढार्थाने या व्यक्ती 'ज्ञानवंत' म्हणून विशेष परिचितही नसतील. याचे एक कारण म्हणजे आमचा विषयाचा आवाकाच तसा लहान आहे. 'नाणकशास्त्र' हा तो विषय. पण आटोपशीर असला तरी या विषयाचे लागेबांधे इतिहास, पुरातत्त्व, अर्थशास्त्र अशा विषयांसोबतच मानववंशशास्त्र, संग्रहालयशास्त्र, समाजशास्त्र, धार्मिक इतिहास, कला-इतिहास, तंत्रज्ञान/धातुविज्ञान आणि त्याचा इतिहास अशा अनेकानेक वेगवेगळ्या ज्ञानशाखांना कवेत घेत जातात. त्यामुळे साहजिकच वेगवेगळ्या ज्ञानशाखांत विहरण्याची संधी अशा विषयाच्या अभ्यासातून मिळते. या शाखांतल्या दिग्गजांना अशा विषयाची सर्वंकश माहिती असेलच असे नाही. सबब, त्यांना या विषयाचे महत्त्व जाणवून देण्याचा काहीसा 'उलटी गंगा' उद्योगही आमच्यासारख्या तज्ज्ञांना काही वेळा करावा लागतो. त्यातून त्यांचे आणि आमचे ताणेबाणे, त्यांचा मोठेपणा अथवा कद्रूपणा, एक माणूस म्हणून त्यांच्यातल्या गुणदोषांचे समग्र दर्शन अशा विविध अंगांनी या 'गोतावळ्या'शी आमचा संबंध येत जातो. लेखाच्या पुढील भागात कदाचित अशा काही कटू-गोड पडसादांचेही चित्रण येईल. कारण केवळ स्तुतिसुमनेच उधळावीत असा माझा हेतू नाही.

**गुप्ताजी : नाणकशास्त्रातले भीष्माचार्य**

भारतीय विद्वानांत आमच्या विषयाचे 'भीष्माचार्य' म्हणून ओळखले जातात, ते डॉ. परमेश्वरी लाल गुप्त. 'गुप्ताजी' म्हणजे कट्टर काँग्रेसवादी, स्वातंत्र्य चळवळीत थेट भाग घेतलेले, उत्तर प्रदेशातल्या आझमगढ या त्यांच्या मूळ गावाचे 'नेहरू' म्हणून ओळखले जाणारे व्यक्तिमत्त्व. तरुणपणीच वाराणसीला प्रोफेसर अनंत सदाशिव आळतेकरांशी परिचय झाल्यापासून त्यांनी नाणकशास्त्र या विषयाकडे होरा वळवला. चळवळीत पडल्यामुळे अर्धवट राहिलेले शिक्षण त्यांनी स्वातंत्र्यानंतर पूर्ण केले आणि ते वाराणसीच्या 'भारत कलाभवन' संग्रहालयात अभिरक्षक म्हणून रुजू झाले. या काळात वासुदेव शरण अग्रवाल यांच्यासारख्या महान विद्वानाच्या मार्गदर्शनाने 'वाचस्पती' उर्फ डॉक्टरेट पदवी मिळवली. त्यांच्या पीएच. डी.साठी भारतातल्या अतिप्राचीन अशा 'आहत' (punch marked) नाण्यांचा अभ्यास करून या नाण्यांचा बुद्धकाळ आणि त्याच्या आगे-मागे झालेल्या राजकीय घडामोडींशी संबंध लावत त्यांनी या नाण्यांना 'ऐतिहासिकत्वा'च्या कक्षेत आणले. त्यानंतर त्यांनी मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियममध्ये (आताचे छत्रपती शिवाजीमहाराज वस्तुसंग्रहालय) नाणकशास्त्रज्ञ म्हणून कार्यभार सांभाळला. १९६३ साली पटना इथल्या संग्रहालयाचे अधीक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९७२ साली तिथून निवृत्त झाल्यावर ते वाराणसीला राहू लागले. पण १९८० साली त्यांचे एक शिष्य आणि उद्योगपती कमलेश कुमार माहेश्वरी यांनी स्थापन केलेल्या 'नाणे संशोधन केंद्रा'चे अधीक्षक म्हणून ते नाशिकजवळच्या अंजनेरीला आले आणि त्यांचे उर्वरित आयुष्य त्यांनी तिथेच व्यतीत केले. २००१ साली मुंबईला त्यांच्या ज्येष्ठ चिरंजिवांच्या घरी वृद्धापकाळाने गुप्ताजींचे निधन झाले.

माझा गुप्ताजींशी संपर्क आला तेव्हा ते ऐंशी वर्षांकडे झुकत होते. उण्यापुऱ्या दहा-बारा वर्षांपुरताच आमचा संबंध. पण या दहाएक वर्षांत गुप्ताजींकडून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या मला खूप काही शिकायला मिळाले. वयोमानानुसार त्यांची प्रकृती यथातथाच असायची, पण त्यांची बुद्धी तीक्ष्ण होती आणि जिव्हा तर त्याहूनही तीक्ष्ण! संशोधक आणि विद्वान म्हणून गुप्ताजींचे आयुष्य नाण्यांच्या माध्यमातून भारतीय इतिहासातल्या बऱ्याच तथ्यांचा आणि कूटांचा मागोवा घेण्यात गेले. कुठलाही काळ त्यांना वर्ज नव्हता. अतिप्राचीन काळ, गुप्त-कुशाण-सातवाहन घराण्यांचा काळ, मुघल काळ अशा सगळ्या प्रवाहांबाबत त्यांनी संशोधनपर लेखन केले. त्यांच्या अभ्यासाला एक 'गांधीवादी' शिस्त होती. ते विषयाला अगदी वाहून घेत आणि अभ्यास-लिखाण करत.

अंजनेरीच्या संस्थेत आज उत्तम ग्रंथालय आहे, त्याचे बीज गुप्ताजींच्या खाजगी ग्रंथसंग्रहात आहे. नाण्यांकडे एक ऐतिहासिक पुरावा म्हणून पाहताना समग्र पुरातत्त्वीय अवलोकनाचा आणि भौतिक तसेच साहित्यिक पुराव्यांच्या विस्तृत पटाचा नाणी हा एक भाग आहेत, हे तथ्य त्यांनी नजरेआड केले नाही. नाण्यांचा अभ्यास करत त्यांनी गुप्त घराण्याचा द्विखंडात्मक इतिहास लिहिला तो या पद्धतीचे अवलंबन करूनच. आजमितीला त्यांचे सर्वोत्कृष्ट योगदान म्हणून याच ग्रंथांचा उल्लेख करावा लागेल.

नाण्यांबद्दलच्या सखोल ज्ञानामुळे गुप्ताजी देशोदेशींच्या संग्रहालयांत गेले. तिथल्या भारतीय नाण्यांच्या संग्रहांवर त्यांनी वेगवेगळ्या प्रकारे संशोधनपर सोपस्कार केले. 'परिश्रम' हा शब्द पुरेसा पडणार नाही, अशी त्यांची ज्ञानसाधना होती. पीएच.डी. करतेवेळी त्यांचा जवळपास पूर्ण होत आलेला प्रबंध आगगाडीच्या प्रवासात हरवला. ज्या काळी एक एक अक्षर टाइपरायटरवर लिहीत; तालिका, छायाचित्रे लक्षात ठेवून पानांची मांडणी करत, प्रसंगानुरूप अक्षरांचा रंग बदलत पीएच.डी.चा प्रबंध तयार करावा लागे. त्या काळी असा अपघात म्हणजे थेट आकाश कोसळणेच. पण गुप्ताजींनी खचून न जाता 'पुनःश्च हरीॐ' केले. आपली जुनी टिपणे आणि नोंदी शोधून काढून, विवक्षित संग्रहालयांना पुन्हा भेटी दिल्या आणि प्रबंधाचा मसुदा पुन्हा एकदा लिहून काढला.

स्वातंत्र्यलढ्यात थेट भाग घेतलेल्या गुप्ताजींचे देशप्रेमही जाज्वल्य होते, यात शंकाच नको! पण या देशप्रेमामुळे कधी कधी त्यांच्या लेखनात अति'राष्ट्रवादी' सूर आळवला जात असे. नाण्यांचा 'शोध' कुठे आणि कधी लागला, या कूट प्रश्नाचे उत्तर अर्थातच ते भारतकेंद्री दृष्टीने देत. त्यांच्या म्हणण्यानुसार मानवी इतिहासाला कलाटणी देणारा हा शोध भारतभूमीतच लागला होता आणि तोही ग्रीकांच्या आधी, सुमारे ख्रि.पू. आठव्या शतकात. ग्रीक आणि रोमन या युरोपियन अभिजात संस्कृतीच्या अभ्यासकांनी भारतविद्येच्या सुरुवातीच्या काळात भारताची जी एका प्रकारे अवहेलना केली होती, ती गुप्ताजींना सतत सलत असे. त्यांचा पाश्चात्त्य संशोधकांकडे बघण्याचा दृष्टिकोण अगदीच वस्तुनिष्ठ होता, असेही म्हणता येणार नाही. पण अर्थातच 'अतिथी देवो भव' वृत्तीने त्यांनी अंजनेरीला येणाऱ्या पाश्चात्त्य संशोधकांचा यथोचित सत्कारही केला. त्यातल्या डेव्हिड मॅकडोवॉल यांच्यासारख्या काही विद्वानांशी तर त्यांचे संबंध अतिशय मैत्रीपूर्ण राहिले.

नाण्यांच्या संग्राहकांशी आणि व्यापाऱ्यांशी मात्र गुप्ताजी अंमळ फटकूनच वागत. नाणी ही आपल्या राष्ट्रीय इतिहासाचा वारसा आहेत आणि त्यांची खरेदी-विक्री करून त्यांना यःकश्चित क्रयवस्तू बनवणे योग्य नाही, असे बहुधा त्यांना त्यांच्या राष्ट्रवादी आणि देशप्रेमी विचारसरणीमुळे वाटत असावे. दुसरे म्हणजे त्यांची संशोधक वृत्ती ही कठोर, पारंपरिक आणि 'ना मूलं लिख्यते किञ्चित' या तत्त्वाला सतत अनुसरणारी होती. एरवी संग्राहक वर्गापैकी कोणी जेव्हा संशोधनपर लिखाणात हात घाले, तेव्हा अर्थातच पुराव्याच्या पलीकडचे काही निष्कर्ष काढणे, निव्वळ कल्पनेच्या भराऱ्या मारणे असे काही प्रमाद या संशोधकांकडून होत. कारण संशोधक असूनही व्यावसायिक 'शास्त्रकाट्याच्या कसोटी'पेक्षा भावनिक बाजूंकडे या संग्राहकांचा कल अधिक झुके. गुप्ताजींना अशी ढिलाई सहन होत नसे. मग आधी वाणी आणि नंतर लेखणी अशा दोन्ही आयुधांनी ते अशा लेखकांना फोडून काढत. 'कहीं की ईट कहीं का रोड़ा और भानुमती ने कुनबा जोड़ा' ही त्यांची आवडती म्हण होती!

संग्राहक वर्गापैकीच काहींनी मुंबईला 'न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ बॉम्बे' स्थापन केली आणि 'न्यूमिस्मॅटिक डायजेस्ट' नावाचे नियतकालिक सुरू केले. गुप्ताजी त्याचे संपादक झाले. (पुढे या मंडळींत फाटाफूट झाली आणि माहेश्वरींनी अंजनेरीची संस्था स्थापन केली तेव्हा या नियतकालिकाचे प्रकाशन तिथून होऊ लागले.) त्या नियतकालिकाच्या सुरुवातीच्या काही अंकांत एक पान लेख आणि त्याला दोन पाने गुप्ताजींची संपादकीय टिपण्णी असा प्रकार पुष्कळ वेळा झालेला दिसतो.

माझी आणि त्यांची भेट झाली तेव्हा मीही एक नाणी संग्राहकच होतो. अर्थातच त्यामुळे आमची पहिली सलामी तितकीशी 'प्रेमळ' झाली नाही. माझे पीएच.डी.चे संशोधन चालू असतानाच मी गुप्ताजींनी लिहिलेल्या कागदी चलनावरच्या पुस्तकाचे पुनरावलोकन करून त्याला नीट आकार देण्याचे काम करत होतो. (ते अमेरिकेत गेले असताना त्यांना एका ठिकाणी कागदी चलनाबद्दल कोणीतरी प्रश्न विचारले आणि त्यांची नीट उत्तरे ते देऊ शकले नाहीत. या प्रसंगानंतर इरेस पडून त्यांनी हे पुस्तक लिहिले होते.) मुंबईचे एक संग्राहक किशोर झुनझुनवाला यांनी त्यांचा संग्रह या कामासाठी उपलब्ध करून दिला होता. संपादकीय संस्कार करण्यासाठी माझी नेमणूकही त्यांनीच केली होती. या कामामुळे गुप्ताजींशी माझा अधिक संबंध येऊ लागला. अंजनेरीच्या संस्थेत कर्मचाऱ्यांकरता असलेल्या रो हाऊस सदृश बंगल्यांच्या ओळीतल्या सुरुवातीच्या एका वास्तूत ते आणि त्यांच्या पत्नी अन्नपूर्णादेवी राहत. त्यांना तिथे सगळे जण माँजी म्हणत. माँजींचा स्वभाव गुप्ताजींच्या जमदग्नी अवतारापेक्षा अगदी उलट म्हणजे प्रेमळ आणि वाणी गोड. अंजनेरीची संस्था तशी आडवळणी जागी होती.

तेव्हा तिथे वर्दळ अशी काही नसे. संध्याकाळी संस्थेची कामे आटोपली की तिथले कर्मचारी घरी परतत. दोन-तीन जण आपल्या कुटुंबांसोबत त्या रो हाऊसच्याच मालिकेत राहत.

सकाळ-संध्याकाळचे तिथले वातावरण एखाद्या आश्रमासारखे असे. आजूबाजूला माळरान आणि शेते, मागच्या बाजूला एक ओढा आणि पार्श्वभूमीला अंजनेरीचा शिंगधारी पर्वत. सूर्य त्याच्याआड मावळे. मग गुप्ताजी खुर्ची टाकून अंगणात बसत आणि वार्तालाप होई. क्वचित प्रसंगी चर्चाही झडे. पण मुख्य संभाषण इतिहास आणि नाणी यांच्याबद्दलच असे. गुप्ताजी त्यांच्या थरथरत्या आणि काहीशा कर्कश आवाजात अनेक गोष्टी सांगत. पुढे ऑक्सफर्डला आल्यावर 'ट्यूटोरियल' पद्धतीच्या शिकवण्याशी संबंध आला, तेव्हा मला जाणवले की अंजनेरीला गुप्ताजी ट्यूटोरियलच घेत होते.

या संबंधांत कधी कधी थोडासा कडूपणाही येई. पण तो मुख्यतः गुप्ताजींच्या वाढत्या वयामुळे होणाऱ्या विस्मरण आणि गैरसमजांमुळे. मी माझ्या संशोधनाकरता १९९६ साली लंडनच्या ब्रिटिश म्यूझियमला भेट दिली, तेव्हा तिथे भारतीय कागदी चलनासंबंधी काही महत्त्वाची माहिती माझ्या हाती लागली, जी गुप्ताजींच्या पुस्तकात नव्हती. मी परत आलो तेव्हा ही माहिती मी त्यांच्याकडे पाठवली. पण मध्यंतरीच्या काळात मी त्यांना न सांगता लंडनला गेलो, असा त्यांचा गैरसमज झाला असावा. कदाचित त्यामुळे असेल, पण त्यांनी झुनझुनवालांना एक पत्र लिहून या कामासाठी मी अयोग्य आणि बेभरवशाचा आहे, असे त्यांचे मत असल्याचे सांगितले. परत आल्यावर माझ्या कानावर हे आले तेव्हा मी त्यांना एक नम्र, पण स्पष्ट असे पत्र लिहिले. त्यातून त्यांच्या पुस्तकासाठी मी नवीन माहिती मिळवून आणली असतानाही त्यांनी माझ्यावर असले आरोप करावेत हे दुःखदायक आहे, असे त्यांना कळवले. त्यानंतर लगेच त्यांचे उत्तर आले आणि त्यांनी माझी क्षमा मागितली. आरोप करणारे गुप्ताजी आणि आपल्यापेक्षा चतुर्थांश वयाच्या माणसाची क्षमा मागणारे गुप्ताजी ही एकाच गुप्ताजींची दोन रूपे. हे पुस्तक आम्ही २००० साली प्रसिद्ध केले आणि ते त्यांचे अखेरचे पुस्तक ठरले. त्यांच्याशी माझा असा थेट संबंध यावा, हे मी माझे भाग्यच समजतो.

**जो क्रिब : माझा अकादमिक बाप**

ज्या लंडनवारीचा उल्लेख मी लेखाच्या उपरोक्त भागात केला त्याच वारीत या लेखाचा वर्ण्यविषय असलेल्या दुसऱ्या 'ज्ञानवंता'शी माझा थेट परिचय झाला. हा ज्ञानवंत ब्रिटिश आहे आणि त्याचे आमच्या विषयातले स्थान खूपच महत्त्वाचे असले तरी मराठीत तरी त्याला 'अहोजाहो' करायला मला अंमळ अवघडच वाटते, असे आमचे संबंध आहेत. अकादमिकदृष्ट्या त्याचा माझ्यावर इतका प्रभाव आहे की तो माझा 'अकादमिक बाप' आहे, असे मी अनेकदा म्हणतो. पण माझ्यासारखेच त्याचे इतरही अनेक मानसपुत्र/कन्या आहेत. कारण आयुष्यभर त्याने केवळ निरपेक्ष वृत्तीने कित्येक होतकरूंना हेरून व्यावसायिक जडणघडणीच्या संधी दिल्या आहेत. या व्यक्तीचे नाव जोसेफ उर्फ जो क्रिब. (Joe Cribb) माझी भेट झाली तेव्हा जो ब्रिटिश म्यूझियममधल्या पौर्वात्य नाणीसंग्रहाचा अभिरक्षक होता. 'नाणी आणि पदके' (Coins and Medals) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विभागात एक सामान्य सहायक म्हणून काम करायला सुरुवात करून त्याला वीस-बावीस वर्षे झाली होती आणि पुढच्या दहा वर्षांत या संपूर्ण विभागाचा अधीक्षक होण्याचा मानही त्याला मिळणार होता.



ऑक्सफर्डचे ॲश्मोलियन म्यूझियम

गुप्ताजी आणि जो यांच्यातले मुख्य साम्य म्हणजे दोघेही या विषयात एक प्रकारे 'स्वयंप्रज्ञ'. गुप्ताजींची ज्ञानसाधना स्वतः चोखाळलेल्या मार्गाने झाली, तशीच जो याचीसुद्धा. दोघांच्या व्यक्तिगत जडणघडणीतही काही साम्ये होती. गुप्ताजी वासाहतिक काळातल्या 'शोषित' भारतीय समाजाचे प्रतिनिधी, तर जो हाही एक प्रकारे ब्रिटिश समाजातल्या

‘शोषित’ वर्गातून म्हणजेच ‘वर्किंग क्लास’मधून आलेला. त्याचमुळे कदाचित त्याची राजकीयता डावेपणाकडे झुकणारी होती. (पहिल्या भेटीतच त्याच्या टेबलावर लेनिनचा पुतळा आहे, याची मी मनोमन नोंद केली होती.)

ब्रिटिश म्यूझियममधले पारंपरिक वातावरण ब्रिटनच्या ‘क्लास सिस्टिम’चे प्रतिबिंब होते. जोचे सहकारी ऑक्सब्रिजमधले अभिजात विद्याविभूषित, उच्च मध्यमवर्गीय आणि पुष्कळसे ‘उजव्या’ बाजूकडे झुकणारे. विभागातले एकंदरीत वातावरणही ग्रीक, रोमन आणि युरोपियन विषयांना झुकते माप देणारे. अशा परिस्थितीत बी.ए.पलीकडे (तेही लॅटिनसारख्या ‘मृत’ भाषेत!) फारसे औपचारिक शिक्षण नसतानाही पौर्वात्य नाण्यांचा स्वतंत्र अभ्यास करून त्या विषयात विशेष स्थान मिळवणारा जो हा – बहुधा सगळ्या युरोपातला – एकमेव ज्ञानवंत आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

जोचा विषयप्रवेश झाला, तो त्याचा भाऊ स्टीव्ह याच्याद्वारे. स्टीव्ह जन्मतःच अपंग होता आणि त्याचे आयुष्य व्हीलचेअरशी बांधलेले होते, पण बुद्धी अतिशय तीव्र–तीक्ष्ण होती. मुख्य म्हणजे तो हाडाचा ‘संग्राहक’ होता. नाणी, नोटा, स्टँप, पौर्वात्य वस्तू, पुस्तके, चित्रे, धार्मिक पदके अशा अनेक वस्तू तो जमवे. (संग्राहकांची ही संग्रहणवृत्ती ‘जनुकीय’च असते, असे म्हणायला वाव आहे.) स्टीव्हच्या या छांदिष्ट वृत्तीमुळे जोला सर्वप्रथम चिनी नाण्यांत रस निर्माण झाला. त्याकरता तो चिनी चित्रलिपी शिकला. पुढेही ब्राह्मी–खरोष्ठीसारख्या प्राचीन लिपी किंवा फारसी–चिनीसारख्या आधुनिक लिपी त्याने स्वतः कष्ट करून शिकून घेतल्या. इतकेच नव्हे, तर नाण्यांवरचे या लिपींतले लेख वाचण्यात त्याने प्रावीण्य मिळवले.

**अंजनेरीच्या संस्थेत आज उत्तम ग्रंथालय आहे, त्याचे बीज गुप्ताजींच्या खाजगी ग्रंथसंग्रहात आहे. नाण्यांकडे एक ऐतिहासिक पुरावा म्हणून पाहताना समग्र पुरातत्त्वीय अवलोकनाचा आणि भौतिक तसेच साहित्यिक पुराव्यांच्या विस्तृत पटाचा नाणी हा एक भाग आहेत, हे तथ्य त्यांनी नजरेआड केले नाही.**

चिनी नाण्यांचा आणि अनुषंगाने इतिहासाचा अभ्यास करण्यातून जो याला मध्य आशियातल्या भटक्या जमातींच्या प्राचीन इतिहासात विशेष गोडी निर्माण झाली. शक, कुशाण, हूण या लोकांनी प्राचीन काळात मध्य आशियापासून पश्चिमेला युरोपपर्यंत आणि दक्षिणेला हिंदुकुश पर्वतातल्या खिंडी ओलांडत भारतापर्यंत आपली साम्राज्ये स्थापन केली होती. या लोकांच्या इतिहासाबद्दल इतर पुरावे बरेचसे मूक आहेत, पण त्यांची नाणी मोठ्या संख्येने उपलब्ध असल्यामुळे तीच त्यांचा इतिहास ‘बोलका’ करतात. गांधार कलाशैली, बौद्ध धर्मातले चढ–उतार, भारतीय उपखंडातल्या सामाजिक आणि धार्मिक घडामोडी, रोमन साम्राज्याशी भारतीयांचा आलेला व्यापारी संपर्क इत्यादी महत्त्वाच्या ऐतिहासिक घडामोडींची कालसंगती लावण्यास या नाण्यांचा अभ्यास अगदी कळीचा ठरतो. जो याने या विषयाला जे योगदान दिले आहे, ते केवळ अभूतपूर्व आहे. कुशाणांच्या नाण्यांवरील धार्मिक चित्रांकने, इतिहासाला पूर्णपणे अज्ञात असलेल्या राजांचा शोध, अफगाणिस्तान – उजबेकिस्तान – ताजिकिस्तान अशा दुर्गम भागांत आढळलेले शिलालेखांसारखे महत्त्वाचे दस्तावेज अशा कित्येक कळीच्या मुद्द्यांवर लेखन करून जो याने दस्तावेजांना नाण्यांच्या अभ्यासाची जोड दिली आहे.

कुशाणांची नाणी हा त्याचा आवडता विषय. या विषयावर प्रमाणभूत ठरेल असा जो लिखित ‘महाग्रंथराज’ सरलेल्या ऑक्टोबर महिन्यात प्रसिद्ध झाला आहे. पण जो याची संशोधक दृष्टी, वृत्ती आणि कारकीर्द केवळ अशा भारतीय/मध्य आशियाई विषयांपुरतीच मर्यादित नाही. हाँगकाँगची नाणी, मलेशियातली ‘जादूई’ नाणी उर्फ मॅजिक टोकन्स, चीनमधले धातुपिंडात्मक चलन, चीन आणि जपानमधले नाणकशास्त्रीय आणि चलनव्यवहारात्मक लिखाण, मंगोल राज्यकर्त्यांची नाणी अशा कित्येक विषयांवर जो याने विपुल लिखाण केले आहे.

नाणी अभ्यासताना ‘नाण्याकडे बघा!’ – “Look at the coin!” हा जो याचा आवडता आदेश (त्याच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त काही ‘चेल्यां’नी त्याला अर्पण केलेल्या गौरव ग्रंथाचे नावही हेच आहे.) त्याच्या मते, सर्वप्रथम नाण्याकडे पाहा; तोच सर्वोत्तम प्राथमिक पुरावा म्हणून ग्राह्य धरा. त्याच्या विवक्षित अंगप्रत्यंगांचा विशिष्ट संशोधन पद्धतींचा अवलंब करून अभ्यास करा. मग दुय्यम पुराव्यांकडे

वळा. दुय्यम पुराव्यांच्या चौकटीत नाण्यांना बसवायची घाई करू नका. कारण नाण्यांमध्ये या चौकटी मोडण्याचे सामर्थ्य असते. सातवाहनांच्या नाण्यांवरून दिसणाऱ्या इतिहासावर मी संशोधन करत होतो तेव्हा पहिल्याच भेटीत त्याने मला सांगितले, 'सगळे दुय्यम पुरावे तूर्तास खिडकीतून खाली फेकून दे. सर्वप्रथम नाण्यांकडे बघ. अगदी नीट बघ. त्यांना बोलके कर आणि मग फेकून दिलेल्या पुराव्यांकडे वळ. त्यांची छाननी त्या अभ्यासातून गवसलेल्या तथ्यांच्या आधारे कर. मग तुला विश्लेषणात्मक मांडणी करायला नाणी कशी उपयोगी पडतात, ते नीट उमजेल.' त्याने दिलेली ही दिशा अक्षरशः खरी होती हे मला पुढच्या आठ-दहा महिन्यांत नीट उमगले.

संशोधनपर लिखाण करण्यासोबतच एक संग्रहालय अभिरक्षक म्हणून जो याची कारकीर्द उल्लेखनीय राहिलेली आहे. विभागाचा प्रमुख/अधीक्षक होण्याच्या आधी जो ब्रिटिश म्यूझियममधल्या 'Money' वीथिकेच्या निर्माणकार्याचा संकल्पक-व्यवस्थापक होता. या वीथिकेचे संकल्पनात्मक केंद्र म्हणजे Money अथवा 'वित्त' हा विषय होता. नाणी हे अर्थातच वित्ताचे एक रूप आहे, पण वित्त म्हणजे केवळ नाणी नाही. धातुपिंड, कागदी चलन, भांडवल, उधार-उसनवारी, तारणव्यवहार, मूल्यसाठवणी आणि आजच्या युगात इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल वापरसरणी अशी वित्ताची अनेकानेक रूपे आणि कार्ये आहेत. मूलतः वित्त ही एक मानवी संकल्पना असल्याने वित्ताचा अनेकांगी इतिहास हा समग्र मानवी इतिहासाचे एक महत्त्वाचे, पण काहीसे उपेक्षित असे अंग आहे. या वीथिकेसाठी ही संकल्पना केंद्रिभूत मानण्याचे पूर्ण श्रेय जो याचे आणि प्रायोजक म्हणून एचएसबीसी बँकेचा पाठिंबा मिळवण्याचेही.

या वीथिकेत सुमारे चार हजार लहान-मोठ्या वस्तू - ज्यांपैकी नाणी ही अर्थातच सर्वात ठळक - प्रदर्शनार्थ ठेवल्या जाणार होत्या. त्यांची निवड, विषयानुरूप गुंफण, माहिती फलकांचा मजकूर आणि मुख्य म्हणजे प्रदर्शनशास्त्रीय सोयी या विषयांमध्ये जोने केलेले प्रयोग आणि घेतलेले निर्णय हे आज कुठल्याही संग्रहालयातील नाणी अथवा मुद्रा/वित्त वीथिकांसाठी मार्गदर्शक ठरले आहेत.

नाणी हा प्रदर्शनासाठी अत्यंत गुंतागुंतीचा वस्तुविषय आहे. एकतर ती फार लहान असतात. दुसरे म्हणजे त्यांना दोन बाजू असतात. ज्यांपैकी एक बाजू नाणे प्रदर्शनार्थ ठेवले की नेहमीच झाकली जाते. आरसे किंवा भिंगांसारख्या उपकरणांचा वापर प्रेक्षकवर्गासाठी बहुतेकदा किचकट आणि रसभंगकारकच ठरतो, असे या विषयावरचे सर्वेक्षण दर्शवते. अशा विवक्षित अडचणींचा सामना करत, सर्वार्थाने 'प्रेक्षणीय' आणि 'मननीय' तसेच शैक्षणिक दृष्टीने परिपूर्ण असे नाण्यांचे प्रदर्शन कसे करावे, याबद्दल जो याने या वीथिकेद्वारे उभे केलेले उदाहरण क्रांतिदर्शी होते. २००९ साली माझ्या संग्रहालयातील वित्त वीथिका तयार करताना या पथदर्शनाचा मला खूपच उपयोग झाला. अंजनेरीच्या संस्थेतील वीथिका तसेच मुंबईच्या छ.शि.म. वस्तुसंग्रहालयातली वीथिका यांनीही जोच्या प्रदर्शनसूत्रांचा मार्ग चोखाळला आहे.

तर अशी ही या दोन ज्ञानवंतांची हकिगत. तसे रूढार्थाने हे ज्ञानवंत म्हणून परिचित आणि प्रसिद्ध नसतीलही, पण यांच्या सहवासाचा, थेट आणि अप्रत्यक्ष मार्गदर्शनाचा आणि वेळप्रसंगी टीका आणि रागाचाही माझ्या व्यावसायिक वाटचालीवर मोठा परिणाम झाला. 'मी दूरवर पाहू शकतो, कारण मी उत्तुंगांच्या खांद्यावर उभा आहे' असे आयझॅक न्यूटन म्हणाला होता. (जगासाठी न्यूटन हा गणिती आणि भौतिकशास्त्रवेत्ता असेलही, पण आमच्यासाठी लंडनच्या टांकसाळीचा मुख्याधिकारी आणि नाणकपद्धतीत सुधारणा घडवणारा प्रज्ञावान या नात्याने तो अधिक जवळचा आहे.) गुप्ताजी आणि जो हे असे 'उत्तुंग' आहेत. त्यांनी दाखवलेल्या वाटेने जाणाऱ्या आणि त्यांच्या खांद्यांवर उभे राहून दूरचा पल्ला नजरेच्या टप्प्यांत आणणाऱ्या मोजक्या भाग्यवंतात मी आहे, ही प्रचंड समाधानाची गोष्ट!

❋ ❋ ❋


**लेखक ऑक्सफर्डस्थित नाणकशास्त्र संशोधक असून इतिहास, तत्त्वज्ञान, कला, साहित्य, खाद्यसंस्कृती आदी विषयांतला त्यांचा व्यासंग दांडगा आहे.**

**संपर्क :** shailen10@hotmail.com

# अँथनी द ग्रेट!



जीवन तळेगावकर




कोव्हिडची महासाथ सुरू झाली. सिंगापूरमध्ये एक कॉर्पोरेट एक्झेक्युटिव्ह विकेंडला घरोघरी 'उबर इट्स'ची सेवा सायकलवर जाऊन पुरवतो, अशी मोठी बातमी झळकली. या माणसाबद्दल सिंगापोरियनांच्या मनात आदरभाव निर्माण झाला होता. कारण तो यातून मिळालेले धन तिथल्या एका 'कँसर सेवा ट्रस्ट'ला डोनेट करत असे. तो कित्येक वर्षांपासून हे काम करत होता आणि कोव्हिड काळात पण त्याने आपल्या सेवेत खंड पडू दिला नव्हता. त्या बातमीतला अँथनी आमचाच टीममेट होता, हे त्याचा झळकलेला फोटो पाहिला तेव्हाच कळले. मागील दोन वर्षे सोबत काम करूनदेखील आपल्या या सेवेबद्दल त्याने एक 'च'कार काढला नव्हता, याचे खरेच नवल वाटले.

अँथनी आमच्या कंपनीतला ब्रिटिश सहकारी. (अ)सहकारीच म्हणा ना! आम्ही भारतात तर तो सिंगापूरमध्ये असायचा. काही वर्षांपूर्वी यूके सोडून तो सिंगापूरला कामानिमित्त स्थायिक झाला होता.

कोणत्याही मीटिंगमध्ये वेळेवर यायचा नाही. आला तरी शांत बसायचा, पण जेव्हा कोणी त्याला बोलायला सांगायचे, तेव्हा जे काही बोलायचा त्यावरून एवढेच कळायचे की, 'याला या चर्चेत काहीही रस नाही.' किंबहुना तो जे बोलायचा त्याचा प्रस्तुत विषयाशी काही संबंध असायचाच असे नाही. तो त्याचे काम करत नव्हता असे नाही, पण अगदी जेवढे सांगितले तेवढेच. स्वतःहून काम शोधणे वा उकरून काढणे त्याला मानवत नव्हते.

आमच्या टीममध्ये पंधरा जण होते. त्यातले दहा भारतीय, दिल्लीस्थित. डेव्हिड आमच्या डिव्हिजनचा हेड होता. मूळ स्वीडिश, पण सेकेंडमेंटवर दोन वर्षांसाठी दिल्लीत आला होता. डेव्हिड मात्र एकदम हुशार, हजरजबाबी, चतुर आणि कष्टाळू होता. त्याच्यासोबत काम करणे सगळ्यांना आवडायचे.

अँथनीने एखादा प्रोजेक्ट डिलिव्हर केला, तर तो फक्त स्वतः भूमिका मांडण्यापुरता यायचा, पण मूळ प्रोजेक्ट डिटेल्स त्याच्या टीमची मुले सादर करायची. त्यांना एक्सपोजर मिळायचे आणि अँथनी एखाद्या फिलॉसॉफरसारखा त्यांना फक्त गाइड करायचा. भारतीय मॅनेजर्सचे तसे नसायचे. ते स्वतः प्रझेंट करायचे आणि टीम मेंबर्स बसून राहायचे. ते पडद्यामागेच असायचे आणि मॅनेजर लाइमलाइटमध्ये. कामाच्या बाबतीत अँथनी असा अलिप्त होता.

त्याच्या टीमवर तो कधीही डाफरत नसे. त्यांना तो काय अपेक्षित आहे हे एकदाच समजावून सांगत असे. बस्स! त्यानंतर 'रिप्ले' नाही, क्वचित एखादा रिव्ह्यू. विषय संपला. मग प्रत्येक टीम मेंबरने आपापल्या कामाची जबाबदारी घेणे त्याला अपेक्षित असे. तो तसे म्हणतही असे, 'मी तुम्हाला सांगितलं होतं की नाही? इथे कोणी लहान आहे का? आपापलं काम तुम्हाला करता यायला हवं. तुम्हाला ते येतं म्हणूनच तुम्ही इथे आहात.'

त्याला एक भारतीय तरुणी आणि थाई तरुण-तरुणी रिपोर्ट करायचे. तिघेही हुशार. नुकतेच टॉप बी-स्कूलमधून एमबीए झालेले. ते तिघे त्याच्या अशा विचित्र वागण्यामुळे त्रस्त दिसायचे. थाई तरुणी तर पहिल्याच महिन्यात कंपनी सोडून गेली होती. 'याने तिच्यासोबत नक्की काय केले?' हा आमचा चघळायचा विषय झाला होता.

पण बहुराष्ट्रीय कंपनीत कोणी कोणाविरुद्ध सहसा तोंडावर काहीच बोलत नाही, तसेच इथे व्हायचे. आमच्या टीममध्ये एकूण छोट्या भारतीय समूहात मात्र अँथनीबद्दल काहीबाही बोलले जायचे अर्थात सगळे अनऑफिशिअल.

**आत्ममग्न तरीही**

अँथनीसोबत एखादे काम करायचे झाले, तर भारतीय लोक काढता पाय घेत असत. बरं, उघड बोलायची सोयही नव्हती. बँकॉकला, सिंगापूरला किंवा हनोईला टीम मीटिंग्जमध्ये आम्ही कायम डेव्हिड आणि अँथनीला सोबत दारू पीत असताना अगदी मित्रांसारखे गप्पा मारताना पाहिलेलं. त्यावरून आपण अँथनीबद्दल काही तक्रार करून उपयोग होणार नाही, अशी आम्हीच आमची समजूत करून घेतली होती.

अँथनीला व्यायामाचा छंद होता. एकदा भारतातील 'आऊट-बाऊंड टीम बिल्डिंग' (ओबीटी) दरम्यान अँथनी मीटिंगमध्ये आला तो लंगडतच. डेव्हिडने विचारलं, 'काय झालं? असं काय केलं रात्री की पायाला इजा झाली?' (हशा) तो म्हणाला, 'रात्री नाही. सकाळी जिममध्ये दुखापत झाली.' त्याने थोड्या वेळाने मीटिंगमधून बाहेर जाऊन होटेलच्या स्टाफला काहीतरी सांगितलं आणि पुन्हा आत आला. थोड्या वेळाने एक मुलगा त्याच्यासाठी 'आइस पॅक' घेऊन आला. त्याला धन्यवाद देऊन झाल्यावर अँथनी मागच्या खुर्चीत आपल्या दुखऱ्या पायाला मालीश करत बसला. त्याने अजून एक खुर्ची ओढून घेत त्यावर आपला दुखरा पाय ठेवला होता. पुढचे तीन दिवस त्याने कोणत्याही चर्चेत भाग घेतला नव्हता. तो आपल्या मांडीवर बर्फाची बॅग घेऊन स्वतःच्या दुखऱ्या मांडीची व्यवस्थित काळजी घेत होता. त्यासाठी तो ड्रेस कोड मोडून शॉर्ट्स घालूनच बसून राहायचा. त्याचे त्याला काहीही वाटत नव्हते. कारण त्याच्यासाठी फक्त त्याची तब्येत महत्त्वाची होती.

सहज मला वाटून गेले, याच्या जागी आपण असतो तर काय केले असते? एक, काहीही झाले तरी मीटिंगला उशीर केला नसता. दुखरा पाय घेऊन तसेच बसलो असतो आणि दुसरे म्हणजे संध्याकाळी परत गेल्यावर रूममध्ये कदाचित



आइस पॅक लावला असता. तो आठवडा तसाच काढला असता कदाचित. आपण अँथनीकडून स्वतःच्या तब्येतीची काळजी घ्यायला नक्कीच शिकले पाहिजे, असे अगदी मनापासून वाटले. आपण भारतीय नको तिथे पड खातो. आपण मीटिंगमध्ये असे काही केले तर आपली नोकरीच जाते की काय असे वाटते. या बाबतीत तरुण पिढी, आता चाळिशीत असलेल्या भारतीय पिढीपेक्षा नक्कीच अधिक जागरूक आहे.

**खास भारतीय मानसिकता**

मला सहज एक किस्सा आठवला. मुंबईतल्या बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये एक मोठे टेलिकॉम एक्झिबिशन होते. त्या वेळी मी 'हच' या टेलिकॉम कंपनीच्या सेल्स डिपार्टमेंटमध्ये होतो. मला सकाळी तिथे पोहोचणे अनिवार्य होते. त्या दिवशी नेहमीपेक्षा लवकर तयार होऊन, कोट वगैरे चढवून रिक्षाने ठाणे स्टेशनला पोहोचलो. लोकलमध्ये चढताना धावपळीत लोकलची जाडसर लोखंडी घोटीव पट्टी उजव्या पायाच्या शिन बोनवर लागली आणि प्राणांतिक वेदना झाल्या, पण सांगणार कोणाला? दैवयोगाने सीट मिळाली. पँट थोडी वर फोल्ड करून पाहतो तर सॉक्स थांबतो तिथे जखम झाली होती. त्याला माझ्या शुभ्र रुमालाने दाबून धरले. रुमाल रक्ताळला. पण त्या दुखण्याला तोवर मी बऱ्यापैकी सहन करू लागलो होतो. एकदा वाटून गेले आपण लगेच उतरून डॉक्टरना दाखवून परत घरी जावे. पण क्षणातच मनाने ठरवले, 'आजची मीटिंग टाळून चालणार नाही. आपल्यावर जबाबदारी दिली आहे, ती पार पडलीच पाहिजे.' तासभर प्रवास करून इच्छित स्थळी पोहोचलो. आता जखम ठणकत होती अन् तिथे पण काही वैद्यकीय सोय नव्हती. शेवटी तसाच दिवसभर उभा राहिलो. कस्टमर्सशी हसून बोलत राहिलो. सायंकाळी काम संपताच आधी ठाण्याला परतून माझ्या घराजवळच्या डॉक्टरांना जखम दाखवली. त्यांनी एक इंजेक्शन दिले. काही गोळ्या दिल्या. सुमारे बारा तासांनी घरी पोहोचलो.

या अशा घटना आता आठवल्या आणि दूरस्थपणे विचार केला तर वाटते, भारतात संघर्ष फार आहे. कित्येक विकसित देशांमधील नागरिकांना करावा लागतो त्यापेक्षा कैक पटींनी अधिक आहे; कॉम्पिटिशन अधिक आहे. त्यामुळे त्यातून येणारी नोकरीची असुरक्षितताही अधिक आहे. म्हणून आपण अधिक सहनशील आहोत.

एक भारतीय सहकारी अमित, त्याला पण व्यायामाची प्रचंड आवड होती. तो रोज तीन तास व्यायाम करायचा आणि मीटिंग सुरू झाल्यावर अर्ध्या तासाने मीटिंगरूममध्ये शिरायचा. डेव्हिडसकट आम्ही सगळे टीम मेंबर्स प्रत्येक वेळी दिलेल्या वेळेवर हजर असायचो. अपवाद होते अँथनी आणि अमित. शिस्तप्रिय डेव्हिड मात्र अमितवर डाफरायचा, पण अँथनीला काहीही बोलायचा नाही, हे सगळ्यांनाच लक्षात येत होते.

एकदा तर ऑफसाइटला जाताना आम्ही सगळे बसमध्ये बसलो होतो आणि अमितची वाट पाहत होतो. नेहमीप्रमाणे तो ब्रेकफास्ट करायला उशिरा पोहोचला होता. डेव्हिडने ते नोटिस केले होते. त्या दिवशी नेमका अँथनी वेळेवर आला होता. आम्ही अनोळख्या हनोई शहरात होतो. बस सुटायची वेळ झाली तरी अमितचा पत्ता नव्हता. डेव्हिडचा पारा चढला आणि त्याने अमितला मागे ठेवून बस पुढे काढायला लावली. त्या दिवशी संध्याकाळी जेवण करताना अमित डेव्हिडला हसत हसत म्हणाला, 'अँथनी ईज युवर फ्रेंड. यू आर सॉफ्ट विथ हिम.' डेव्हिड पण हसून म्हणाला, 'यू निड अ पेग मोअर टू ओपन युअरसेल्फ.'

एकदा भारतीय सहकारी आमच्या कंपूत बोलला, 'अरे, या अँथनीला आपल्या बॉसने, डेव्हिडनेच, आणले आहे. ते

दोघे आधी कुठल्याशा देशात सोबत काम करायचे. अँथनीला नक्कीच डेव्हिडची अशी काही सिक्रेट्स ठाऊक आहेत. ती त्याने जाहीर करू नयेत, म्हणून डेव्हिड त्याला सांभाळून घेत असतो.'

पुढे एकदा आमची बँकॉकमध्ये एका मोठ्या टेलिकॉम ऑपरेटरसोबत मीटिंग होती. मी दिल्लीहून पोहोचलो होतो. अँथनी सिंगापूरहून पोहोचला होता. मी आधी अँथनीला माझे प्रेझेंटेशन पाठवले होते. त्यात त्याला त्याच्या स्लाइड्स ॲड करायच्या होत्या. हे काम माझ्यासाठी नवे नव्हते आणि त्याच्यासाठीही नव्हते. एखादी कस्टमर मीटिंग असली की उशिरात उशीर म्हणजे एक दिवस आधी तरी व्यवस्थित 'ड्राय रन' करायची माझी सवय आहे. त्यामुळे मी त्याच्या नेहमीच्या स्लाइड्स ॲड करून अजून एक प्रेझेंटेशनची कॉपी तयार ठेवली होती. आम्हाला सकाळी १० वाजता भेटायचे होते. आमची स्थानिक थाई टीम आणि मी पंधरा मिनिटे आधी पोहोचलो होतो आणि तिथे आम्ही खाली कॉफी घेत उभे होतो. अजून अँथनी पोहोचला नव्हता. आता तो काही येत नाही, आपणच त्याचा पार्ट मॅनेज करू, असे आमचे बोलणे चालूच होते, इतक्यात १०च्या ठोक्याला अँथनी आला. त्याच्या घामेजलेल्या चेहऱ्याकडे आणि हातातल्या बॅगकडे पाहून असे वाटले की तो मीटिंग आहे हे चक्क विसरला असावा. त्याला मी विचारले, 'तू लेट झालास कसा?' म्हणाला, 'जिममध्ये गेलो होतो. ओह शिट, मी ऑफिस बॅग विसरलोच की. जिमची किटच चुकून घेऊन आलो.' आम्हालाही याचे काही राहिले असावे असे वाटत होतेच. त्यानेच खुलासा केला. म्हणाला, 'आता माझ्या प्रेझेंटेशनचं काय करायचं?' मी म्हणालो, 'तुझ्या नेहमीच्या स्लाइड्स माझ्याकडे आहेत. तू फक्त बोल. मी प्रेझेंट करतो.' तो म्हणाला, 'थँक्स मॅन, यू सेव्हड मी, नाऊ आय निड अ कॉफी.' आमचा थाई अकाऊंट मॅनेजर त्याला म्हणालादेखील, 'आता उशीर होतोय. आपण आधी वर मीटिंग रूममध्ये जाऊ.' पण त्याचे कोवळे शब्द कानावर पडून परिणाम व्हायला तो काही मी नव्हतो, अँथनी होता, 'जस्ट वन मिनिट' म्हणत तो गेला आणि अजून दोन मिनिटांनी हातात कॉफी घेऊन आला व घाईने म्हणाला, 'नाऊ आय ॲम रेडी, लेट्स क्रॅक इट!'

**समाजशील अँथनी**

दरम्यान कोव्हिडची महासाथ सुरू झाली. सिंगापूरमध्ये एक कॉर्पोरेट एक्झेक्युटिव्ह विकेंडला घरोघरी 'उबर इट्स'ची सेवा सायकलवर जाऊन पुरवतो, अशी मोठी बातमी झळकली. या माणसाबद्दल सिंगापोरियनांच्या मनात आदरभाव निर्माण झाला होता. कारण तो यातून मिळालेले धन तिथल्या एका 'कॅंसर सेवा ट्रस्ट'ला डोनेट करत असे. तो कित्येक वर्षांपासून हे काम करत होता आणि कोव्हिड काळात पण त्याने आपल्या सेवेत खंड पडू दिला नव्हता.

त्या बातमीतला अँथनी आमचाच टीममेट होता, हे त्याचा झळकलेला फोटो पाहिला तेव्हाच कळले. मागील दोन वर्षे सोबत काम करूनदेखील आपल्या या सेवेबद्दल त्याने एक 'च'कार काढला नव्हता, याचे खरेच नवल वाटले.

सिंगापूरमध्ये सायकल चालवणे आणि घाम गाळणे समानार्थीच आहे. याअर्थी थंड प्रदेशातून आलेला अँथनी काही वर्षे तरी लोकांसाठी त्याला स्वतःला गरज नसताना घाम गाळत होता. स्वतः सुटीच्या दिवशी पैसे कमावत होता आणि ते तेथील धर्मादाय संस्थेला देत होता. 'ज्यांना हवंय त्यांना द्या,' असे म्हणून सधन लोकांना अधिक देण्यासाठी प्रोत्साहित करत होता.

प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाला वेगवेगळे कंगोरे असतात. ते सगळेच आपल्याला दिसतात असे नाही. पुढच्या मीटिंगमध्ये आम्ही त्याचे अभिनंदन केले आणि त्याच्या संस्थेसाठी छोटी देणगीही दिली.

अँथनीने कधी कार्यालयात उद्धटपणा केला नाही. कुणाशी तुसडेपणाने वागला नाही. त्याचे मत विचारले तर मांडायचा, पण लादायचा नाही. एरवी तो शांत असायचा, इतकेच.

त्याची टीम आम्हाला कधी कधी सांगायची, 'आमचा मॅनेजर अजिबात कामात लक्ष घालत नाही. जेवढं त्याला सांगितलं आहे तेवढंच करायचा प्रयत्न करतो आणि टीमकडून पण तशीच अपेक्षा ठेवतो. त्याच्या या स्वभावामुळे आम्हाला अधिक काम करायची ऊर्जा असूनही तसे काम मिळत नाही. त्यामुळे आमची 'वाढ' (ग्रोथ) खुंटत चालली

**भारतात संघर्ष फार आहे. कित्येक विकसित देशांमधील नागरिकांना करावा लागतो त्यापेक्षा कैक पटींनी अधिक आहे; कॉम्पिटिशन अधिक आहे. त्यामुळे त्यातून येणारी नोकरीची असुरक्षितताही अधिक आहे. म्हणून आपण अधिक सहनशील आहोत.**

आहे. आव्हानात्मक कामं आमच्या टीमला मिळत नाहीत. नवं शिकायला मिळत नाही.' त्यांचे हे म्हणणे बरोबर होते.


मी अनुभवलेल्या तीन वर्षांत स्वतः पुढाकार घेऊन अँथनीने कधीच कोणते काम अंगावर घेतले नाही. 'आपल्याला काम नाही' याचे त्याला वाईट वाटायचे नाही. तो आत्ममग्न असायचा.

एखादी टीम मीटिंग चालू असताना त्याला जेव्हा त्याचे मत विचारले जायचे, तेव्हाच तो मोजके बोलायचा. त्याने त्याच्या मताचा कधीही आग्रह धरला नाही. कधी कोणाला पटत नाही म्हणून वाद घातला नाही. कधी एखाद्या भारतीय मॅनेजरने, 'आय डोंट ॲग्री विथ यू अँथनी,' म्हटले तरी, 'या, ओके, आय हर्ड यू,' म्हणून सोडून द्यायचा.

पहिल्यांदा त्याचे असे वागणे अनुभवले, तेव्हा एक कुठेतरी वाचलेली गोष्ट आठवली. एक पत्रकार एकदा एका वयोवृद्ध व्यक्तीची मुलाखत घ्यायला गेला. ती व्यक्ती नव्वदीच्या पार असून शरीराने व मनाने सुदृढ होती, 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' या कालिदासोक्तीप्रमाणे वागणारी होती. म्हणूनच हे पत्रकार महाशय भेटायला गेले होते. त्यांनी त्या वृद्धाला विचारले, 'आपण या वयातही निरोगी आहात. अजून आपल्या बुद्धीचं तेजही कमी झालेलं नाही. हे कसं शक्य झालं? हे कमावण्यासाठी आपण नेमकं काय केलं ते सांगाल का?' ते म्हणाले, 'मी एकच तत्त्व आयुष्यभर पाळलं. कधी कोणाशी वाद घातला नाही.' 'व्वा!' पत्रकार म्हणाला, 'पण हे एवढं सोप्पं नक्कीच असणार नाही. यापेक्षा तुम्ही काहीतरी अधिक केलं असणार. सांगा ना!' वृद्ध व्यक्ती उद्गारली, 'हो, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे.' आणि ती तिथून पुढे चालायला लागली.

मागे जेव्हा आम्ही थायलंडला एक डोंगर चढून जायचे ठरवले. म्हणजे तो पळत जाऊन लांघायचा असे ठरले होते. प्रथम जो शिखरावर पोहोचेल तो जिंकणार होता. आम्हा दहा भारतीयांमधून एकच रोज तीन तास व्यायाम करणारा तिथे पोहोचला होता. दुसरा होता डेव्हिड. ज्याला हरणं आवडायचंच नाही. अगदी गमतीतही तो कधी कोणासोबत हरणे पसंत करत नसे आणि पहिला आला होता अँथनी! अँथनीला काही फार आनंद झाला नव्हता, पण डेव्हिडला हरल्याचे दुःख झाले होते.

पुढे काही दिवसांनी अँथनीचा 'बाय' मेल आला. व्यवस्थित काम करत नाही म्हणून डेव्हिडने त्याला 'पिंक स्लिप' दिली होती. त्याची बायको काही वर्षांपूर्वी बळावलेल्या कॅन्सरमुळे हे जग सोडून गेली होती, तेव्हापासून तो सैरभर झाला होता. त्याच्या कॉंट्रॅक्टप्रमाणे त्याचा कामाचा कालावधी संपला तेव्हा 'नॉन-परफॉर्मर' म्हणून कंपनीने त्याला कामावरून कमी केले, पण तो त्याच्या वैयक्तिक पातळीवर केलेल्या समाजसेवेतून कित्येक लोकांसाठी परक्या देशात 'हिरो' ठरला होता.




आम्ही काही त्याचे मित्र नव्हतो. तो एखाद्या पार्टीत आला म्हणजे आम्हाला क्वचित गमतीत विचारत असे, 'ऑफिसात गोंगाट करणे भारतात कॉमन आहे का? आम्ही ज्या ऑफिसात काम करतो तिथे आवाज होत नाही. शांतता असते. सगळे आपापल्या कामात मग्न असतात. तुम्ही लोक काम करता, खूप करता, पण बडबडही खूप जास्त करता. प्रसंगी तुमच्या टीम मेंबर्सवर चिडता, रागावता. मी जर माझ्या देशात असे वागलो, तर कोर्ट केस होईल माझ्यावर. तुम्हाला एखाद्याचे काम पसंत नाही. हरकत नाही, त्याला एक-दोनदा समज द्या. नाही ऐकले तर 'पिंक-स्लिप' द्या पण ओरडू नका, रागावू नका. ते त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घातल्यासारखं होईल.' डेव्हिडने नेमके अँथनीच्या बाबतीत तेच केले होते. त्याला व्यक्तिस्वातंत्र्य दिले होते.

❋❋❋


**लेखक जीवन तळेगावकर यांचे गुरुग्राम येथे वास्तव्य असून ते दूरसंचार क्षेत्रातील व्यवस्थापन तज्ज्ञ, लेखक आणि आस्वादक आहेत. संपर्कः ९९७१६ ९९०२७**


**सर्व रेखाचित्रे : सागर शिंदे**

# पारंगतता शिकवणारे ज्ञानमार्गी



ॲड. निशा शिवूरकर





महमद खडस



प्रज्ञावंत विनायक कुलकर्णी

**सर्वे गुणा : काञ्चनमाश्रयन्ति अशी आजूबाजूला परिस्थिती असताना मुक्त संवादच्या संपादकांना ज्ञानी माणसांचा गोतावळा शोधावासा वाटला, ही तशी मोठीच गोष्ट आहे. सध्या ऑक्सफर्ड, केंब्रिज, जेएनयू, मुंबई, पुणे विद्यापीठांपेक्षा व्हॉट्स ॲप विद्यापीठ तेजीत आहे. चहूबाजूने ज्ञान–विज्ञानविरोधी लाटा उसळलेल्या आहेत. अशा काळात ज्ञानी माणसांचा शोध घेणे हे एकदम भारी काम आहे. या कामात माझा हा खारीचा वाटा...**

असं म्हणतात की आईची मांडी हे जगातील पहिले विद्यापीठ आहे. आपले पोट भरण्याच्या आणि भाषेच्या ओळखीची सुरुवात तेथेच होते. आई-वडील, घर, कुटुंब काही ना काही ज्ञान आपल्याला देतच असतात. कुटुंब ज्ञानाचा पाया आहे. परंतु कुटुंबातच अडकले तर मात्र ज्ञानाची समाप्ती व्हायला वेळ लागत नाही. पुढची इमारत उभी राहत नाही.

ज्ञान म्हणजे काय, याची व्याख्या करणे अवघड आहे. गेली काही वर्षे ज्ञानाचा संबंध लिहिता-वाचता येणे, पदव्या मिळवणे याच्याशी जोडला आहे. गावोगावी शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणमहर्षी, ज्ञानतपस्वी तयार झाले आहेत. त्यांचे कौतुक सोहळे सुरू आहेत.

महर्षी म्हटले, की आठवतात स्त्रियांच्या शिक्षणासाठी आयुष्य दिलेले धोंडो केशव कर्वे, अस्पृश्यता निर्मूलनाच्या लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले विठ्ठल रामजी शिंदे आणि स्वातंत्र्याच्या चळवळीत योगदान असलेले आणि आयुष्याचा मोठा काळ भारतीय तत्त्वज्ञानाचा शोध घेणारे पाँडिचेरीचे योगी अरविंद. या सर्व महर्षींनी मानवाच्या कल्याणाचा विचार केला. आपल्या कार्यातून मानवमुक्तीचे तत्त्वज्ञान मांडले. त्यांच्या दृष्टीने ज्ञानाचा शोध म्हणजे माणसाच्या अस्तित्वाचा, त्याच्या दुःखनिर्मूलनाचा शोध. आयुष्याच्या अंतापर्यंत या महर्षींची ज्ञानाची ओढ कायम होती. या मंडळींकडे कोणत्या पदव्या होत्या, असे विचारले तर सांगता येणार नाही. इतके ते सगळे पदव्यांमधून बाहेर आले होते. खऱ्या ज्ञानाची वाट शोधत प्रज्ञावंत झाले.

भारतीय परंपरेत ज्ञान केवळ विद्यापीठात बसून, पुस्तके वाचून, लिहून मिळत नव्हते. भटकंती हा ज्ञानाचा प्रमुख मार्ग होता. वर्धमान महावीर, तथागत गौतम बुद्ध, शंकराचार्य, गुरू नानक, संत नामदेव यांनी ज्ञानासाठी आयुष्यभर भटकंती केली. महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, राहुल सांकृत्यायान, धर्मानंद कोसंबी, पंडिता रमाबाई अशी कितीतरी नावे भटक्या ज्ञानवंतांविषयी घेता येतील.

दक्षिण आफ्रिकेतील लढा यशस्वी करून गांधीजी भारतात आले. आपले गुरू गोपाळ कृष्ण गोखले यांना भेटले. स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या गांधीजींना देश जाणून घेण्यासाठी गोखलेंनी देशात प्रवास करण्याच्या सल्ला दिला. गांधीजींनी कस्तुरबांसह देशभर एक वर्ष रेल्वेच्या तिसऱ्या डब्याने प्रवास केला. या प्रवासात भारतातील दारिद्र्य, अज्ञान, ब्रिटिश साम्राज्यात भारतीय जनतेचे हरवलेले चैतन्य याचे ज्ञान गांधीजींना झाले. त्यातूनच पुढे देशाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेतृत्व त्यांनी केले. ते महात्मा आणि राष्ट्रपिता झाले.

ज्ञान म्हणजे काय? ते कसे मिळवायचे? याचा शोध भारतीय परंपरेत आणि जगातील विविध ज्ञानशाखांमध्ये सतत सुरू आहे. केवळ लिहिता-वाचता येणे किंवा पदव्या असणे म्हणजे ज्ञान नाही. ज्ञान म्हणजे जाणून घेणे; समजणे, बोध घेणे; एखाद्या विषयाचे आकलन करून घेणे. ज्ञानाचा संबंध जगण्याच्या निसर्गदत्त शहाणपणाशी आहे. दुसरा ज्ञानेश्वर म्हणून ज्यांना ओळखले जाते त्या आचार्य विनोबांच्या मते केवळ पुस्तकातून मिळालेले ज्ञान म्हणजे माहिती असते. जीवन जगण्याची कला म्हणजे खरे ज्ञान. विनोबा ज्ञानाची व्याख्या आत्मज्ञानाशी, जीवनाच्या एकरूपतेशी जोडतात. त्यांच्या मते, ज्ञान केवळ बुद्धीशी नाही तर कर्माशी जोडलेले असते. अशा ज्ञानाचा अधिकार सर्व जातीधर्मीयांना आणि स्त्री-पुरुषांना आहे. अहिंसा, सत्य, अपरिग्रह, सेवा आणि ब्रह्मचर्य म्हणजे संयम हा ज्ञानाचा आधार आहे. अशा ज्ञानाचा पाया नैतिकता आहे. ही नैतिकता सत्याशी जोडलेली आहे.

विनोबांनी ज्ञानाच्या एक मार्ग सांगितला. 'चालत राहा, शिकत राहा. भूदान चळवळीत विनोबा तेरा वर्षे चालले. पासष्ट हजार किलोमीटरच्या या पदयात्रेत आपल्याला मिळालेल्या ज्ञानाविषयी त्यांनी सविस्तर लिहून ठेवले आहे. 'मला जमीन तर मिळालीच पण त्याचबरोबर या देशातला माणूस, निसर्ग, मानवी संबंध यांचे मला अधिक ज्ञान झाले.' विनोबांना अनेक भाषा येत होत्या. गीता, कुराण, उपनिषदे, संत साहित्य, बायबल, बौद्ध साहित्य अशा विविध विषयांवर विनोबांनी लिहिले. अनेक पुस्तकांचे अनुवाद केले. विनोबांनी स्त्रियांना ज्ञानवान व्हा, हा संदेश दिला. म्हणजे ज्यांना ज्ञान नाकारले त्यांनी ज्ञानाची कास धरायची.

एका ज्ञानवान स्त्रीने अशीच भटकंती एकोणिसाव्या शतकात केली. ज्ञानाचा ध्यास घेतलेल्या पंडिता रमाबाईंनी वडील आणि भावासह देशभर हजारो किलोमीटर प्रवास केला. काशीचे विद्वान या मुलीची विद्वत्ता पाहून चकित झाले. त्यांनी रमाबाईंना पंडिता आणि सरस्वती पदवी दिली. स्त्रियांच्या विद्वतेची ही पहिली ऐतिहासिक नोंद. रमाबाईंनी आपल्या

ज्ञानाचा उपयोग समाजसेवा आणि स्त्रीशिक्षणासाठी केला.

महापंडित राहुल सांकृत्यायन यांना प्रवासी संत आणि भारतीय मार्क पोलो म्हणून ओळखले जाते. चार वेळा तिबेटला जाऊन त्यांनी बौद्ध साहित्य भारतात आणले. प्रवासाविषयी 'धुमक्कड' हे पुस्तक लिहिले. वीसपेक्षा अधिक भाषा त्यांना येत. दीडशे ग्रंथ लिहिले. ते म्हणत, 'एक ग्रंथ वाचणारा शहाणा होतो. शंभर गावे फिरणारा खरा ज्ञानी होतो.' असाच प्रवास धर्मानंद कोसंबी यांनी केला. दोघांचे प्रवास अतिशय खडतर होते. त्यांच्यामुळे भारतात बुद्ध धर्माचे पुनरुज्जीवन झाले. या सगळ्याच महामानवांनी ज्ञान करुणेशी जोडले. वाचनातून मी त्यांच्याशी जोडले.

### आदर्श कार्यकर्ता स्त्री

काही व्यक्तींनी माझ्या जीवनावर परिणाम केला. मला जीवनशिक्षण दिले. माझे वडील ॲड. द. भा. शिवूरकर हैदराबाद मुक्तिसंग्रामातले स्वातंत्र्यसैनिक होते. डॉ. राममनोहर लोहियांच्या संयुक्त समाजवादी पक्षात होते. आम्ही लहान असताना दरवर्षी एक बाई घरी पाहुण्या म्हणून येत. आजूबाजूच्या इतर स्त्रियांपेक्षा त्या वेगळ्या होत्या. अंगावर खादीची साडी, कोणतेच दागिने नाहीत. खांद्यावर एक मोठी खादीची झोळी आणि हातात कपड्यांची बॅग. खादीची झोळी पुस्तकांनी भरलेली असे. आवाज कणखर होता. घर वरच्या मजल्यावर होते. बाई आल्या की खालून हाक देत, 'आहे का दत्ता घरात?' वडिलांना अरेतुरे म्हणणाऱ्या, नावाने बोलणाऱ्या या वेगळ्याच दिसणाऱ्या बाई कोण? असे आम्ही आईला विचारले तर आई गमतीने म्हणाली, 'तुमच्या काकांची, वडिलांची, मैत्रीण आहे.' आमचे आश्चर्य ओसरण्यापूर्वी तिने सांगितले, 'या इंदूताई केळकर, समाजवादी कार्यकर्त्या आहेत. स्वातंत्र्यासाठी तुरुंगात गेल्या आहेत. अनेक पुस्तकं लिहिली आहेत त्यांनी.' साथी इंदूताई केळकर आणि त्यांच्या पुस्तकांनी भरलेल्या खादीच्या झोळीची अशी ओळख झाली. सगळी डॉ. लोहियांची पुस्तके असायची. इंदूताई आणि त्यांचे पती आचार्य केळकरांनी लोहियांच्या साहित्याचा मराठीत अनुवाद केला. ही पुस्तके आमच्या घरातील कपाटात ओळीने ठेवलेली असत. इंदूताई आल्या की पुस्तकांचा गठ्ठा ठेवून जात. वडील ती पुस्तके विकत. कार्यकर्ती स्त्री कशी असते, याचे ज्ञान इंदूताईंच्या व्यक्तित्वातून मला झाले. त्यांच्या वागण्या-बोलण्याचे आकर्षण वाटू लागले. आईवडिलांना इंदूताईंविषयी आदर होता. आई त्यांचा पाहुणचार करत असे. त्याही आईशी जवळ बसून गप्पा मारत. या गप्पा घर, कुटुंब, नवरा, मुले या पलीकडच्या असत.

इंदूताई केळकर यांच्या आई यशोदाबाई भट महात्मा गांधींच्या विचाराने प्रभावित झालेल्या होत्या. १९३२च्या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. १९४२ साली गांधीजींनी चले जाव आंदोलनाची घोषणा केली तेव्हा यशोदाबाई आजारी होत्या. अंथरुणावर पडून होत्या. लढ्यात जाण्यासाठी त्यांचा जीव तळमळत होता. 'घरटी एक माणूस या संग्रामात गेलाच पाहिजे. खरंतर मीच जायला पाहिजे. पण माझी प्रकृती ही अशी.' हे आईचे बोलणे ऐकून तरुण इंदूताई शिक्षण सोडून आंदोलनात सहभागी झाल्या. त्यानंतर अनेक वेळा तुरुंगात गेल्या.

१९४२च्या चले जाव आंदोलनात समाजवादी नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. इंदूताई डॉ. लोहियांच्या विचाराकडे आकर्षित झाल्या. आयुष्यभर लोहियावादी म्हणून जगल्या. लोहियावादी विचारांच्या आचार्य श्रीपाद केळकरांशी विवाह केला. इंदूताईंनी लोहियांचे संपूर्ण चरित्र मराठी आणि इंग्रजीत लिहिले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाबाई, रझिया सुलतान यांची चरित्रे लिहिली. किशोरवयीन मुलांसाठी स्वातंत्र्य आंदोलनावरील पुस्तके लिहिली. जिजाबाईंवर त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे नाव, 'हे राज्य व्हावे अशी एका स्त्रीची इच्छा होती' असे आहे. इंदूताईंमुळे माझी लोहियांच्या विचारांशी ओळख झाली. मी डॉ. लोहियांशी जोडले गेले. स्त्रीवादी विचारांशी माझा परिचय इंदूताईंमुळे झाला. हे जग स्त्रियांच्या नजरेने बघण्याचे शिक्षण त्यांनी मला कळत-नकळत दिले. पुढे मी पक्की स्त्रीवादी झाले.

डॉ. लोहियांच्या पुस्तकांच्या वाचनातून मला व्यवस्थेकडे पाहण्याची, इतिहास निरपेक्षपणे समजून घेण्याची दृष्टी मिळाली. जातिसंस्थेमुळे आपल्या देशात तरुण-तरुणींना जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य नाही, हे मी लोहियांच्या इंदूताईंनी अनुवाद केलेल्या 'जातिप्रथा आणि स्त्रियांची गुलामगिरी' या पुस्तकात वाचले. मी आंतरजातीय लग्नाचा निर्णय घेतला. १९८० साली शिवाजी गायकवाडशी लग्न केले. लग्नानंतर इंदूताईंच्या पुण्यातील शनिवार पेठेतील घरी आम्ही गेलो. दोन खोल्यांचे छोटे घर होते. त्यात पुस्तके अधिक होती.

बाहेरच्या खोलीत भिंतीवर इंदूताईंनी काढलेली दोन चित्रे होती. मी शिवाजीशी लग्न केल्याचे त्यांना सांगितले. इंदूताई आणि आचार्य केळकरांनी म्हणजे अप्पांनी आमचे कौतुक केले. आमच्यासाठी विशेष जेवण तयार केले. निघताना त्यांच्या त्या अतिशय कमी वस्तू असलेल्या संसारातील काही वस्तू माझ्या नव्या संसारासाठी दिल्या. मी त्या जाणीवपूर्वक तिथेच विसरले. आजही ते सामान माझ्या आठवणीत आहे. आपल्याकडे कितीही कमी असले तरी दुसऱ्याला द्यावे, हे ज्ञान इंदूताईंनी मला दिले.

मग आम्ही कायमच भेटत राहिलो. मीही झोळीत पुस्तके घेऊन विकू लागले. १० मार्च १९९१ रोजी समता आंदोलनाच्या वतीने आयोजित केलेल्या परित्यक्ता मुक्ती यात्रेचे उद्घाटन इंदूताईंनी परित्यक्तांच्या मागण्यांचा फलक उलगडून केले. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या, 'या मागण्या नव्हेत, तर जनतेच्या वतीने दिलेले आज्ञापत्र आहे. कायद्याने समाजपरिवर्तन होत नाही, पण चळवळीला बळ मिळते. म्हणून आम्हाला कायदा हवा.' विचारांची अशी स्पष्टता इंदूताईंनी मला दिली.

पहिल्यांदा इंदूताईंकडे गेले तेव्हा साथी विनायकराव कुलकर्णींची भेट झाली. विनायकराव दिसायला देखणे होते. आयुष्य समाजवादी विचार आणि चळवळीसाठी देणाऱ्या विनायकरावांनी विवाह केला नव्हता. पुण्यात शिवाजीनगरमध्ये मंगला टॉकीजजवळ एका चाळीसारख्या घरात पहिल्या मजल्यावर ते राहत. पहिल्या भेटीतच आमचे सूर जुळले. विनायकराव म्हणजे ज्ञानाचा वाहता प्रवाह होता. त्यांच्या त्या दोन खोल्यांच्या घराला आम्ही कार्यकर्ते मठी म्हणत असू. या घरात जिथे जागा असेल तिथे पुस्तके ठेवलेली होती. ते पुस्तकांचेच घर होते.

**उत्तुंग विनायकराव**

पुण्याला गेलो की विनायकरावांच्या घरी जाणे हा नित्यक्रम असे. राष्ट्रसेवादल, समता आंदोलन, सोशलिस्ट फ्रंट, समाजवादी जन परिषद या सगळ्या प्रवासात विनायकराव सोबत होते. पुण्यातील मीटिंग संपली की आमचा दहा-बारा कार्यकर्त्यांचा जत्था विनायकरावांच्या घरी जाऊन धडकायचा. 'या... या...' असे जोरदार स्वागत व्हायचे. आमच्या डोक्यात अनेक शंका असायच्या. विनायकरावांकडून काही विषयांची उकल करून घ्यायची असायची. पुस्तकांच्या त्या पसाऱ्यात आम्ही जागा मिळेल तेथे ठाण मारून बसायचो. तोवर विनायकराव आमच्यासाठी चहा तयार करून आणत.

**महापंडित राहुल सांकृत्यायन यांना प्रवासी संत आणि भारतीय मार्क पोलो म्हणून ओळखले जाते. चार वेळा तिबेटला जाऊन त्यांनी बौद्ध साहित्य भारतात आणले. प्रवासाविषयी 'धुमक्कड' हे पुस्तक लिहिले. वीसपेक्षा अधिक भाषा त्यांना येत. दीडशे ग्रंथ लिहिले. ते म्हणत, 'एक ग्रंथ वाचणारा शहाणा होतो. शंभर गावे फिरणारा खरा ज्ञानी होतो.'**

हा ज्ञानवंत फार झक्कास चहा तयार करत असे. चहा पिऊन झाल्यानंतर आमच्यापैकी कोणी कप धुवायला लागला तर 'अरे, माझे पाणी संपवाल' म्हणत विनायकराव अडवत. चोवीस तास नळाला पाणी असताना केवळ सहा बादल्या पाणी वापरण्याचा त्यांचा नियम होता. त्यांनी आयुष्यभर तो पाळला. धो धो पाणी वाहतेय तर वापरा, असे सर्वत्र असताना हा म्हातारा मात्र सहज ज्ञान देत होता, 'जपून वापरा, नाश करू नका.' आजही कुठे नळाचे पाणी घेताना ज्ञानाचा हा धडा आठवतो.

चहा घेतल्यानंतर आमचा अभ्यासवर्ग सुरू व्हायचा. साथी मधू लिमये, एस. एम. जोशी, जॉर्ज फर्नांडिस, मृणाल गोरे, मधू दंडवते, प्रमिला दंडवते, बाबा आढाव, भाई वैद्य, अनिल अवचट, लक्ष्मण माने अशी अनेक मंडळी आपल्या शंका विचारण्यासाठी विनायकरावांकडे येत असत. ते आमच्या सगळ्यांचेच गुरू होते. गांधी, लोहिया, आचार्य नरेंद्र देव, आचार्य जावडेकर, आंबेडकर अशा अनेकांचे लिखाण त्यांना तोंडपाठ होते. काहीही विचारा. संदर्भासह माहिती मिळायची. विनायकराव चालताबोलता ज्ञानकोश होते. बोलता बोलता सहज त्या पुस्तकांच्या ढिगाऱ्यातून संदर्भासाठी हवे ते पुस्तक काढत. पान उघडत. वाचून दाखवत. कधी कुठले पुस्तक सापडले नाही, असे झाले नाही. स्वातंत्र्य चळवळ, लोकशाही समाजवाद, साम्यवाद, धर्मनिरपेक्षता, गांधी-आंबेडकर संबंध, जागतिक राजकारणातील विविध प्रवाह असे कितीतरी विषय आम्ही या अभ्यासवर्गात शिकलो. या चर्चेत कोणत्याही विषयाचे वावडे नव्हते. आमची राजकीय

समज परिपक्व होण्यासाठी, हे जग समजून घेण्यासाठी हे ज्ञान कायम साथ देते.

रोज दुपारी ब्रिटिश लायब्ररीत जाऊन वाचन करणे हा विनायकरावांच्या दिनक्रमाचा भाग होता. समता आंदोलनाच्या अनेक शिबिरांमध्ये विनायकराव येत. तरुण कार्यकर्त्यांशी चर्चा करत. हा ज्ञानवंत अतिशय लाघवी होता. त्यांची भाषणे कधी कंटाळवाणी व्हायची नाहीत. नर्म विनोद, किस्से असे सहज सांगत.

बालगंधर्व हा विनायकरावांचा वीक पॉईंट होता. त्यांना ते नारायणराव राजहंस म्हणत. आम्ही आग्रह केला की बालगंधर्वांची मस्त नक्कल करत. माझ्यावर त्यांनी वडिलांप्रमाणे माया केली. शिवाजी गायकवाड त्यांची सहज चेष्टा करे. वर्षातून त्यांना एकदा खादीचे धोतर आणि झब्बा देत असे. आमचा मुलगा नदीमचेही ते लाड करत. त्याला 'बच्चा इ साकू' म्हणत.

विनायकरावांनी स्वातंत्र्य आंदोलनात अनेक वेळा कारावास भोगला. साथी एस. एम. जोशी यांच्याबरोबर संरक्षण कामगारांची संघटना बांधली. आणीबाणीत सत्याग्रह करून तुरुंगात गेले. समाजवादी पक्षाचे जनता पक्षात विलीनीकरण करण्यास त्यांचा विरोध होता. त्यांच्या मते ती ऐतिहासिक चूक होती. त्यांनी तसे स्पष्ट सांगितले होते. लोकशाही समाजवादी विचारांचा राजकीय पक्ष अस्तित्वात नसल्याने आमच्या पिढीची झालेली राजकीय ससेहोलपट त्यांना जाणवत होती. ते म्हणत, 'आज, आत्ता, या क्षणी समाजवादी पक्ष स्थापन करा.' समाजवादी जन परिषद या पक्षाची आम्ही स्थापना केली, तेव्हा भूमिका ठरवण्याच्या सर्व बैठकांना ते हजर राहिले. कुठेही हस्तक्षेप न करता आमचे ऐकले.

विनायकरावांनी लिखाण करावे असा आग्रह आम्ही सतत करायचो. त्यांनी फारसे लिहिले नाही. मानवी संबंधातील नैतिकता हा विनायकरावांच्या चिंतनाचा विषय होता. नैतिकता सत्याशी, समानतेच्या मूल्यांशी जोडलेली असावी असा त्यांचा आग्रह होता. समतेच्या विचारांची महत्त्वाची कसोटी स्त्री-पुरुष समानतेच्या विचारात आहे असे ते आग्रहाने मांडत. आम्ही अनेकदा या विषयावर बोलत असू. स्त्रीवादाचे माझे आकलन वाढण्यास या चर्चा आजही मला मदत करतात.

३० जानेवारी १९९४ ला सोशलिस्ट फ्रंटच्या वतीने आम्ही औरंगाबादला राज्यव्यापी परित्यक्ता हक्क परिषद घेतली होती. संयोजक म्हणून मी प्रास्ताविक केले. बोलताना 'स्त्रियांवरील जुलूम अनीती आहे. नीतीसाठी स्त्री-पुरुष समतेचा विचार स्वीकारायला हवा' असे बोलले. समोर पन्नास हजार स्त्री-पुरुषांच्या समूहात बसून विनायकराव सगळ्यांची भाषणे ऐकत होते. परिषद संपल्यावर माझ्या जवळ आले. माझ्या पाठीवर थोपटत म्हणाले, 'तू शहाणी आहेस. तुला या प्रश्नाची नैतिक बाजू समजली आहे.' ती शाबासकी माझ्यासाठी फार मोठा ठेवा आहे.

विनायकराव म्हणत, 'सामर्थ्याविना सत्य दुबळे असते, तर सत्याविना सामर्थ्य क्रूर बनते.' या सध्या कटू वास्तवाचा आपण रोज अनुभव घेत आहोत. २००० साली विनायकरावांचा मृत्यू झाला. आम्ही एका ज्ञानवंताच्या प्रेमळ सहवासाला मुकलो.

**गांधीजींचा माणूस**

१९८० साली येवल्याच्या एका शिबिरात साथी महमद खडस पहिल्यांदा भेटले. स्वच्छ पांढऱ्या रंगाच्या खादीचे कपडे घातलेल्या महमदभाईंचे प्रसन्न व्यक्तित्व त्या क्षणी मनात ठसले. आयुष्यभर समाजवादी राजकारणात असलेले महमद खडस तरुण कार्यकर्त्यांमध्ये सहज मिसळत असत. कोकणातून आलेल्या महमदभाईंचा मुंबईत दाणा बंदरमध्ये धान्याचा व्यापार होता. कर्तृत्ववान असलेल्या महमदभाईंनी स्वतःला घडवले होते. पंधराव्या वर्षी फाटक्या अवस्थेत उपजीविकेसाठी मुंबईत आल्यावर बोटीवर खलाशाच्या हाताखाली त्यांनी काम सुरू केले. शिक्षण कधीच सुटले होते.

औपचारिक शिक्षण मिळू न शकलेले महमदभाई प्रतिभावान होते. त्यांची ज्ञानाची ओढ तीव्र होती. सतत विविध विषयांवरची पुस्तके वाचत. घरात पुस्तकांनी भरलेले मोठे कपाट होते. गांधी, लोहिया, मार्क्स, फुले, आंबेडकर यांची तसेच प्रेमचंद, अमृतलाल नागर यांची पुस्तके होती. कोणत्याच विषयाचे वावडे नव्हते. गरज असेल तेव्हा प्रयत्नपूर्वक इंग्रजी वाचत. वाचलेले लक्षात ठेवण्याची क्षमता अफाट होती. एखाद्या विषयाचा नाद घेतला की त्या विषयावरचे साहित्य मिळवून वाचत. आमच्याशी वाचलेल्या विषयांवर बोलत. त्यांच्यामुळे अनेक पुस्तके वाचली. ज्ञानाची कास कशी धरायची हे महमदभाईंनी शिकवले.

महात्मा फुलेंचे अखंड वाचल्यानंतर महमदभाई त्यात इतके गुंतले की अनेक अखंड त्यांना पाठ झाले होते.

प्रवासात, मीटिंगपूर्वी, गप्पा मारताना सतत अखंड म्हणत. 'ख्रिस्त महमद मांग ब्राह्मणासी धरावे पोटाशी बंधुपरी आणि सत्याविना नाही धर्म तो रोकडा,' हे त्यांचे आवडते अखंड होते. त्यांच्यामुळे माझेही बरेच अखंड पाठ झाले.

महमदभाई आणि अरुण ठाकूरने महाराष्ट्रातील सफाई कामगारांची पाहणी करून 'नरक सफाईची गोष्ट' हे पुस्तक लिहिले. मी कधीतरी पाहणीत सोबत असे. सफाई कामगारांशी बोलताना, त्यांच्या घरात वावरताना महमदभाई तेथील वडीलधारा माणूस वाटत. इतक्या प्रेमाने आणि विश्वासाने ते बोलत. आपल्या कामात, विचारात, समाजात वावरताना करुणेचा धागा सुटता कामा नये, हे मी महमदभाईंच्या सहवासात शिकले. डोक्यावर मैला वाहण्याची पद्धत बंद झाली पाहिजे, अशी मागणी आम्ही समता आंदोलनाच्या वतीने केली. मुंबईत कार्यकर्त्यांनी आपल्या डोक्यावर मैल्याची टोपली घेऊन मोर्चा काढला. हे जोडून घेणे महमदभाईंनी आमच्यात रुजवले.

हा देश सर्व धर्मीयांचा आहे. स्वातंत्र्य आंदोलनात सगळ्या धर्मांचे लोक, स्त्रिया सहभागी होते. हे पोहचवत राहिले पाहिजे, याचे तीव्र भान महमदभाईंना होते. त्यांच्या आग्रहामुळे समता आंदोलनाच्या वतीने स्वातंत्र्य आंदोलनातील मुसलमान, स्वातंत्र्य आंदोलनातील शीख, स्वातंत्र्य आंदोलनातील स्त्रिया या विषयांवर डॉ. य. दि. फडके सरांची व्याख्याने आम्ही घेतली. या व्याख्यानांची 'स्वातंत्र्य आंदोलनातील मुसलमान' आणि 'स्वातंत्र्य आंदोलनातील शीख' ही पुस्तके प्रकाशित केली. स्त्रियांच्या सहभागावर 'नाही चिरा नाही पणती' हे पुस्तक विद्या प्रकाशनाने प्रसिद्ध केले.

सामाजिक-राजकीय कामासाठी लागणारा निधी जनतेतून गोळा केला पाहिजे. परदेशी निधी घेता कामा नये. आपल्या उत्पन्नातून वाटा उचलत राहायला हवा, हे महमदभाईंनी त्यांच्या आचरणातून आम्हाला शिकवले. आम्हाला कधी निधी कमी पडणार नाही, याची त्यांनी सतत काळजी घेतली. ती वाट आम्ही पुढे नेत आहोत.

महमदभाई आणि फातिमा खडस यांचे घर कार्यकर्त्यांचे माहेरघर होते. फातिमा आमची सगळ्यांची जणू आईच. कार्यकर्त्यांना आपल्या घरात आनंदाने कसे सामावून घ्यायचे ते या दाम्पत्याकडून मी शिकले. महमदभाईंच्या हातची दाल फ्राय, शिरा, चिकनची चव कायमची लक्षात आहे. त्यांनी स्वतः कापून दिलेल्या हापूस आंब्याच्या चवीची तृप्ती आंब्याच्या मोसमात आठवत राहते.

कबीरा खडा बाजार में, सबकी मांगे खैर
ना काहू दोस्ती, ना काहू से बैर

हा कबीराचा दोहा सतत गुणगुणणाऱ्या खडसांनी माणसावर प्रेम करायचे शिकवले. 'ढाई आखर प्रेम का, पढे सो पंडित होय', हे ज्ञान सहजतेने दिले.

महमदभाईंच्या आग्रहामुळे माझे 'लढा 'टाकलेल्या' स्त्रियांचा' हे पुस्तक लिहून झाले. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवांवर त्यांनी लिहावे असा आग्रह आम्ही सतत करत असू. प्रांजळ व्यक्तित्वाच्या महमदभाईंनी लिहिण्याचे टाळले. १९९२ साली हिंदुत्ववाद्यांनी नियोजनपूर्वक बाबरी मशीद पाडली. त्यानंतर मुंबईत बॉम्बस्फोट झाले. पहाडासारखे महमदभाई आतून हलले. फाळणी काळात गांधीजींच्या वाट्याला आलेली वेदना महमदभाईंसारख्या अनेकांच्या वाट्याला आली. सेक्युलर भारताचे भयावह भविष्य द्रष्ट्या महमदभाईंना दिसत होते. देशाचा हिंदुत्ववादी केंद्रीय सत्तेकडे होणारा प्रवास त्यांना सहन झाला नाही. ते अस्वस्थ झाले. काहीसे गप्प झाले.

कधी शिवाजीला फोन करत तेव्हा मनातले बोलत असत. त्यांच्या अस्वस्थेतून त्यांना आपण बाहेर काढू शकत नाही, हे फार दुःखदायक होते. अशा काळात फातिमाने त्यांना सोबत केली. समजून घेतले. त्यांची काळजी घेतली. नोव्हेंबर २०२१ मध्ये महमदभाईंचे निधन झाले. महमदभाई आतून-बाहेरून गांधीजींचा माणूस होते. त्यांच्या मृत्यूने खूप काही गमावले.

तथागत बुद्धांनी माणसासाठी प्रज्ञा, शील, करुणा, सत्य, मैत्री, उदारता, उपेक्षा, परिश्रम, दृढ निश्चय, वैराग्य या दहा परिमिता म्हणजे पारंगतता सांगितल्या. मला भेटलेल्या या ज्ञानवंतानी या परिमितांपर्यंत पोचण्याचा मार्ग मला दाखवला. माझे आयुष्य समृद्ध केले.

❋ ❋ ❋

**निशा शिवूरकर या परिवर्तनवादी चळवळीतल्या सामाजिक कार्यकर्त्या आणि वकील आहेत.**

**संपर्क: ९४२३७ ४९७१५**

# निसर्गाते वाट पुसत... प्रवास आकलनाचा!




वसुधा सरदार



बीजमाता पद्मश्री राहीबाईंसोबत





पद्मश्री सुभाष पाळेकर

**शेती ही मुळात पंचमहाभूतांच्या कोंदणात, निसर्गाच्या कुशीत घडणारी गोष्ट. सर्व सजीवांचं अन्न बनवण्याची जबाबदारी वनस्पतींकडे आहे. निसर्गरचनेत या अन्नाचे लाभार्थी कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्याच्या उत्पादनात सहयोग देतात. मधमाशा परागीभवन करतात. पक्षी कीडनियंत्रण करतात. गांडुळं जमीन भुसभुशीत करतात. सर्वच पशुपक्ष्यांची, सजीवांची विष्ठा आणि कलेवरं हे अन्नद्रव्यांचे स्रोत असतात. वनस्पतींची मुळं, मायकोरायझा बुरशी आणि असंख्य जीवजिवाणू यांचं साहचर्य तर केवळ अद्भुत आहे. मुळांद्वारे झाडांनी बनवलेली साखर मिळण्याच्या बदल्यात पिकांना आवश्यक असणारे घटक त्यांना उचलता येणाऱ्या रूपात मुळांजवळ पुरवण्याचं काम हे निसर्गदूत हजारो वर्षं इमानेइतबारे करत आले आहेत. अक्षरश: 'अनंत हस्ते कमलावराने...' देऊ केलेलं हे संचित आपल्या बुद्धिकौशल्याने सांभाळून पुढे नेण्याऐवजी शहाण्या माणसाने काय केलं? हा प्रश्न मनात येतो तेव्हा प्रयोगशील वाटांवर भेटलेले ज्ञानवंत मला आठवतात...**

गोरेगाव हे मुंबईचं तेव्हाचं एक छोटं उपनगर. त्यातला आदिवासी पाडा दिंडोशी. तिथे आमची शेती आणि डेअरी होती. दहा-बारा कर्मचाऱ्यांचं मिळून एक कुटुंबच होतं. आम्हा सर्व मुलांना आई-आबांनी लहानपणापासून शेतीत काम करायची सवय लावली होती. त्यातून आपलं अन्न कसं पिकतं; त्यासाठी काय कष्ट घ्यावे लागतात, याची ओळख होत होती. शेतांतून फिरताना जेवढं दिसतंय, त्यापलीकडे बघायला आणि पिकं, माती, काय सांगताहेत ते ऐकायला आबांनी म्हणजेच माझे वडील रघुनाथ गोपाळ उर्फ आबा करमरकर यांनी शिकवलं.

**आबा आणि अण्णा : मौलिक ज्ञानस्रोत**


आबांचा स्वातंत्र्य चळवळीशी संबंध आला होता. १९४२च्या चले जाव आंदोलनात राष्ट्रीय पातळीवरचे अनेक भूमिगत नेते गोरेगावातील आमच्या घरी राहत होते. इथून आबांच्या जीवनाला वेगळी दिशा मिळाली. व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधाबद्दल विचार सुरू झाला. सर्वांना माणसासारखं जगता यायला पाहिजे. यासाठी स्त्री-पुरुष विषमता, जातिभेद हे आधी आपल्या मनातून पूर्ण काढून टाकले पाहिजेत. बोलण्यात आणि वागण्यात अंतर असता कामा नये, असे त्यांचे विचार आकार घ्यायला लागले.

१९६२ साली दौंड तालुक्यातल्या पारगाव सालूमालू इथे आबांनी जमीन घेतली होती. त्यापुढचं त्यांचं जीवन शेती आणि डेअरी हे उपजीविकेचं साधन आणि सामाजिक कामांत विविध क्षेत्रांत वरील विचारांचे प्रयोग या समांतर रुळांवरून चाललं. या दोहोंत द्वंद्व नव्हतं. दोन्हींच्या मागे समान उद्दिष्ट आणि एकच मूल्यव्यवस्था होती. प्रामाणिकपणे, 'उत्तम वेव्हारे'च धन जोडायचं, हे अगदी पक्कं होतं. त्याचबरोबर हे सामर्थ्य आणि स्वातंत्र्य सामान्यांतल्या सामान्य माणसालाही मिळावं, यासाठी काम करायचं होतं. आदिवासी, दलित, कोरडवाहू लहान शेतकरी आणि या सर्वांमधल्या रूढी-परंपरांनी जखडलेल्या बाया अशा तळागाळांतल्या अनेक घटकांत आबांनी काम केलं. लोकांना शिकवलं, संघटित केलं. अधिक उत्पादन, कर्जमुक्ती, धान्यबँक, युवकांबरोबर कार्यक्रम, दुष्काळाचा सामना यातील प्रत्येक काम हे परिवर्तनाचं साधन होतं. मारुतीला प्रत्येक मोत्यात राम दिसण्याची, तशी आबांना प्रत्येक कामात परिवर्तनाचा आशय असण्याची अपेक्षा होती.


आबांना काही व्यासंगी, विद्वान म्हणता आलं नसतं. पण एखादा प्रश्न समोर आला की तो मुळापासून समजून घेण्यासाठी ते अपार कष्ट घेत. पुस्तकं मिळवून वाचत. अनेकांशी चर्चा करत. स्वतःचे मुद्दे तपासून घेत. यातून अनेक किचकट प्रश्नांवर लोकांनी शोधत येऊन त्यांचा सल्ला घ्यावा, इतकं प्रभुत्व त्यांनी मिळवलं होतं. शाळेत केव्हातरी निबंध स्पर्धेत 'जगातला सर्वात सुखी माणूस' असा विषय आला होता. हा सर्वात सुखी माणूस म्हणजे मीच, असं मी त्यात लिहिलं होतं. स्पर्धेत मला पहिलं बक्षीस मिळालं होतं. ही ठाम सकारात्मक, आनंदी जीवनदृष्टी आबांनी दिली होती. मुंबई-पारगाव प्रवासात आबा वृत्तपत्रांचे अग्रलेख वाचून घेत. 'आधी वरचा सुविचार वाच.' 'आपल्या कामावर निष्ठा आणि विनोद बुद्धी ज्यांच्याकडे आहे तो सर्वात आनंदी माणूस असतो.' 'अग तायडे, म्हणजे आपणच जगातली आनंदी माणसं आहोत.'

हा सगळाच आनंदाचा भाग होता. शिकणं हा आनंददायक अनुभव असतो, हाही संस्कार त्याच वेळी होत असावा. सामाजिक कार्याचं बाळकडू घरातून होतंच. पुढे हेच काम करायचं, हेही ठरलं होतं. सामाजिक प्रश्न सोडवताना त्यात कायदेशीर बाबींची दृष्टी राहावी, यासाठी बी.ए.नंतर एल.एल.बी. पूर्ण केलं होतं.

पुढे युवक क्रांती दलाचे पूर्णवेळ कार्यकर्ते अजित सरदार यांच्याशी विवाह होऊन १९७६ साली मी पुण्यात आले. महाराष्ट्रातील प्रबोधनाचं विद्यापीठ म्हणता येईल, अशा प्रा. गं. बा. सरदार उर्फ अण्णा यांच्या घरात येणं, हे माझं भाग्य होतं. अण्णांच्या भूमिका प्रखर आणि ठाम असायच्या. पण स्वभाव आणि भाषा अगदी मृदू. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांतील कुलगुरू नेमणुकीच्या निवड समित्यांत बऱ्याचदा अण्णांचा समावेश असायचा. कुणाच्या तरी नावाच्या शिफारसीसाठी येणारे आग्रही फोन, भेटायला येणारी वजनदार माणसं यांना अण्णा नम्रपणे कसे परतवायचे, हे मी अनेकदा पाहिलं आहे. बार्शीच्या साहित्य संमेलनाचे अण्णा अध्यक्ष होते. त्याच्या पुढच्या संमेलनात अध्यक्षीय सूत्रे सुपूर्द करताना अण्णांनी साहित्यक्षेत्राची स्वायत्तता जपण्याची शासनाची जबाबदारी ठामपणे प्रतिपादित केली. ते छोटेखानी भाषण अत्यंत गाजलं. संमेलनाला जाऊन आलेल्या कोणीतरी नंतर सांगितलं, 'शब्दांना मंत्राचं सामर्थ्य प्राप्त होतं म्हणजे काय हे त्या दिवशी



आबा करमरकर



अजित सरदार



गं. बा. सरदार

साक्षात अनुभवलं.'

अण्णांनी विपुल लेखन केलं. पहिला मसुदा ते पेन्सिलने लिहायचे. मग प्रकाशकांना देण्याची पक्की प्रत शाईच्या पेनाने व्हायची. माझं अक्षर बरं असल्यामुळे नंतरचं सर्व 'शाईकाम' मी केलं. त्यातून अनायासे त्यांच्या मौलिक विचारांचा अभ्यास व्हायचाच; पण लेखनकलेचे अनेक बारकावे शिकायला मिळायचे. 'तुमच्या कामाचं क्षेत्र मर्यादित असेल तर हरकत नाही, पण त्यामागचा विचार व्यापक हवा' असं त्यांचं सांगणं असे. समोर येणाऱ्या प्रश्नाचा संबंधित सर्वांच्या बाजूने साधकबाधक विचार करून ते आपली भूमिका मांडत. स्वातंत्र्यलढ्यातील म. गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्या काही भूमिकांचे पडसाद वर्तमानकाळातही पुरोगामी कार्यकर्त्यांमध्ये दुरावा निर्माण करत होते. यामुळे अण्णा व्यथित होते. या दोन्ही महान नेत्यांच्या वरकरणी विरोधी वाटणाऱ्या भूमिका व्यापक संदर्भात परस्परपूरक कशा होत्या आणि तोच धागा बळकट कसा केला पाहिजे, याचं साधार विवेचन करणारी 'गांधी आणि आंबेडकर' ही पुस्तिका त्यांनी लिहिली. 'आपल्याला वास्तवातून आदर्शाप्रत जायचे आहे, तेही वास्तवाच्याच मदतीने' हे मा. गोपाळ कृष्ण गोखले यांचे वचन ते अनेकदा उद्धृत करत. त्यांची स्वत:ची वागणूकही त्याबरहुकूमच असे. अण्णांना आधुनिक महाराष्ट्राचे वैचारिक शिल्पकारच म्हटले पाहिजे.

आता दिवसेंदिवस जीवनसंघर्ष प्रखर होत असताना, समाजातील दुबळे घटक अधिकाधिक असुरक्षित होत असताना सामाजिक जाणिवेचे अस्तर मजबूत करणाऱ्या अण्णांसारख्या प्रबोधनकारांची नितांत गरज आहे, असं वारंवार वाटत राहतं.

तर एका टप्प्यावर माझं मुंबईहून पुणे, पुण्यातून युक्रांद व इतर कामांच्या जोडीला पारगावला जाणं-येणं सोपं झालं होतं. शेतीशी संपर्क कायम राहिला होता व आहे. न कळत्या वयात रासायनिक शेतीपासून सुरू झालेला प्रवास आज घडीला सेंद्रिय शेतीच्याही पलीकडच्या संजीवन शेतीच्या अभ्यास व प्रयोगांपर्यंत सुरू आहे. सामाजिक काम हा माझ्या जीवनाचा मुख्य भाग असला तरी शेती त्यात सातत्याने गुंफलेली होती.

**सांगे मातीचे मार्दव**

आधी उल्लेख केला त्याप्रमाणे पारगावची शेती मुख्यत: आबा बघायचे. ती पूर्णत: रासायनिकच होती. भारतदादाची मुंबईहून मदत होतीच. २००२ साली आबा गेल्यानंतर मी शेतीत जास्त लक्ष घातलं. तेव्हा ती कसदार, सुपीक समजली जाणारी जमीन मला वेगळंच काही सांगू पाहत होती. तिचे अनेक प्रश्न होते. पूर्वीपेक्षा जास्त खर्च करूनही उत्पादन कमी होत चाललं होतं. रोगराई वाढली होती. जागोजागी जमिनी घट्ट, चिबड झाल्या होत्या. समविचारी शेतकरी मित्रमंडळींचा हाच अनुभव होता. अशातच एकदा पद्मश्री सुभाष पाळेकर यांचं विवेचन ऐकलं. पाळेकर हे नैसर्गिक शेतीचे प्रणेते. शेती पदवीधर. अनेक वर्षे प्रयोग करून निसर्गानुसारी शेतीच्या तत्त्वांचं चिंतन. अनेक पुस्तकं, शेकडो व्याख्यानं यांच्या माध्यमातून देशभर व परदेशांतही नैसर्गिक शेतीचा व्यापक प्रचार-प्रसार त्यांनी केला. तेव्हा त्यांच्या विवेचनाने आमच्या शेतीतल्या बऱ्याचशा प्रश्नाचं मूळ रासायनिक शेती पद्धतीत आहे, असं जाणवलं. लक्षात आलं त्यानुसार एकेक पीक घेऊन सेंद्रिय शेतीला सुरुवात केली. रासायनिक खतं बंद किंवा कमी करून शेणखत, कंपोस्ट इत्यादी सेंद्रिय खतांचा वापर सुरू केला. यांचे परिणाम लगेच दिसले. मातीचा पोत लक्षात येण्याएवढा सुधारला. 'कोंभाची लवलव सांगे मातीचे मार्दव' हे प्रत्यक्षात दिसू लागलं. पानांच्या रुंदीत वाढ झाली. एखाद्या कारखान्याच्या क्षमतेत वाढ केल्याप्रमाणे उत्पादन वाढलं.

एकदा चार-पाच शेतकरी आमच्या शेतावरून पुढे चालले होते. शेतात मला पाहून ते भेटायला आले. मिश्र भाजीपाला होता. 'ताई, हे सेंद्रिय आहे?' मला ओळखणाऱ्या एका भाऊंनी विचारलं. 'अर्थात. संपूर्ण सेंद्रिय.' 'फवारण्या करून पण आमचा फ्लॉवर किडींनी माखलेलाच आहे. पंचक्रोशीत असं पीक नाही भेटायचं,' असं म्हणून ते पुढे गेले. या

अनुभवांमुळे अधिकाधिक क्षेत्र सेंद्रिय पद्धतीखाली आणायला सुरुवात केली. 'सेंद्रिय सेतू' उपक्रमाद्वारे आमच्या शेतीतील सकस, विषमुक्त अन्न गेली सोळा-सतरा वर्षं आम्ही पुणे व मुंबईतील ग्राहकांना थेट पुरवत आहोत.

**रसायनांचा हल्ला आणि बाजारपेठेचा डल्ला**

शेतीची निरीक्षणं आणि आनुषंगिक अभ्यास यातून बरंच काही शिकायला मिळालं. मुख्य म्हणजे जगभर रासायनिक शेतीचा आमच्यासारखाच अनुभव होता. १८४०च्या सुमाराला जस्टस लायबिग या जर्मन शास्त्रज्ञाने वनस्पतींचं पृथक्करण करून त्यातली नत्र, स्फुरद, पालाश व इतर काही सूक्ष्म अन्नद्रव्यं शोधली. त्यांचा पुरवठा केला तर पीक जोमाने वाढेल, हा सिद्धान्त मांडला. तो प्रत्यक्षात खरा ठरला आणि शेतीत रासायनिक युग (१९६०च्या सुमाराला आपल्याकडे 'हरितक्रांती' अवतरली.) सुरू झालं. पुढच्या पन्नास-साठ वर्षांतच त्याचे परिणाम तिथे लक्षात येऊ लागले. १९२०-२५च्या सुमारालाच अल्बर्ट हॉवर्ड यांच्यासारखे कित्येक तज्ज्ञ शेतीतील रसायनांच्या वापराबद्दल प्रश्नचिन्ह उठवू लागले होते. मात्र प्रचंड नफ्याचं वारं कानांत शिरलेला हा वारू आता थांबणार नव्हता. महायुद्धांनंतर रासायनिक अस्त्रनिर्मितीसाठी उभा झालेला मोठा उद्योग डोलारा रासायनिक खतांकडे वळवला गेला. शत्रूचे प्रदेश बेचिराख करणारं 'एजंट ऑरेंज' २-४ डी नावाने शेतीत तणनियंत्रणासाठी रुजू झालं. यांचे दुष्परिणाम सामान्य लोकांपासून लपवले गेले.

डीडीटी हे जहाल कीटकनाशक शेतीत असंख्य किडींपासून पिकांना आणि महायुद्धात मलेरियापासून सैनिकांना वाचवणारं, जगाचं तारणहार म्हणून गाजलं. त्याच्या या गुणांचा शोध लावणारे पॉल म्युलर यांना १९४८ साली नोबेल पुरस्कार मिळाला. त्यानंतर उण्यापुऱ्या पंधरा वर्षांतच रचेल कार्सन यांनी त्यांच्या 'सायलंट स्प्रिंग' या पुस्तकातून डीडीटी व अन्य रसायनं यांनी जगभर माजवलेला हाहाकार पुराव्यानिशी मांडला. मित्रकीटक, मधमाशा, पक्षी नष्ट होत होते. ध्रुवप्रदेशातील अस्वलांच्या रक्तापासून ते जगभर मातेच्या दुधापर्यंत सर्वत्र डीडीटीचा विषाक्त संचार फैलावला होता. या पुस्तकानंतर अमेरिकेत डीडीटीच्या वापरावर बंदी आली. उत्पादनावर नाही बरं का. तिसऱ्या जगात पाठवण्यासाठी उत्पादन चालूच आहे. रासायनिक आदानं हा आवळा देऊन कोहळा काढण्यासारखा



प्रकार आहे. 'रासायनिक शेतीचं उत्पादन वाढवणारं विज्ञान' आणि त्यातले शक्तिमान आक्रमक हितसंबंध यांची बेमालूम सरमिसळ सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतसुद्धा नाही.

'शेवटच्या मधमाशीनंतर मानवजात आणखी फारतर चार वर्षं जगेल' हे आइनस्टाइन यांचे उद्विग्न उद्‌गार प्रसिद्ध आहेत. लुप्त होणाऱ्या प्रजातींमध्ये मधमाशी दाखल झालेली आहे. अमेरिकेचा राष्ट्रीय पक्षी गरूड या यादीत समाविष्ट झाला तेव्हा तिथे मोठी खळबळ उडाली. पण नष्ट होणाऱ्या प्रत्येक छोट्याशासुद्धा जीवात मानवजातीचा जीव अडकलेला आहे, याचा आपल्याला विसर पडला आहे.

**गाभ्याच्या नात्याकडे...**

शेती ही मुळात पंचमहाभूतांच्या कोंदणात, निसर्गाच्या कुशीत घडणारी गोष्ट. सर्व सजीवांचं अन्न बनवण्याची जबाबदारी वनस्पतींकडे आहे. निसर्गरचनेत या अन्नाचे लाभार्थी कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्याच्या उत्पादनात सहयोग देतात.

मधमाश्या परागीभवन करतात. पक्षी कीडनियंत्रण करतात. गांडुळं जमीन भुसभुशीत करतात. सर्वच पशुपक्ष्यांची, सजीवांची विष्ठा आणि कलेवरं हे अन्नद्रव्यांचे स्रोत असतात. वनस्पतींची मुळं, मायकोरायझा बुरशी आणि असंख्य जीवजिवाणू यांचं सहचर्य तर केवळ अद्‌भुत आहे. मुळांद्वारे झाडांनी बनवलेली साखर मिळण्याच्या बदल्यात पिकांना आवश्यक घटक त्यांना उचलता येणाऱ्या रूपात मुळांजवळ पुरवण्याचं काम हे निसर्गदूत हजारो वर्षं इमानेइतबारे करत आले आहेत. अक्षरश: 'अनंत हस्ते कमलावराने...' देऊ केलेलं हे संचित आपल्या बुद्धिकौशल्याने सांभाळून पुढे

नेण्याऐवजी शहाण्या माणसाने काय केलं?

या साऱ्यांना बाजूला सारून शेती पिकवण्याचा सगळा मक्ता त्याने स्वत:कडे घेतला. निदान सुरुवातीची त्याची लुडबूड पृथ्वीला सुसह्य होती. तांत्रिक प्रगतीच्या काळात मात्र यात गुणात्मक फरक झाला. प्रचलित शेतीत वनस्पतीवाढीच्या नैसर्गिक जैव यंत्रणा समजून घेऊन त्यांचं जतन केलं नाही. कायम बाहेरूनच, तीही कृत्रिम, घातक रसायनं घालून त्यांचा नाश केला आहे. पुनर्भरणाची सोय नाही. निसर्गरचनेचा आदर नाही. त्यावर मात करण्याचा अट्टाहास आहे. काही थोड्या महाकाय कंपन्यांच्या नफ्यासाठी शेतकऱ्यांचं अर्थकारण, तसंच पृथ्वीचं आणि संपूर्ण मानवजातीचं आरोग्य वेठीला धरलं जात आहे. रासायनिक खतांमुळे जमिनीतील अन्नद्रव्यांचा समतोल बिघडतो. लाखों वर्षांचं वनस्पती, सूक्ष्मजीवसृष्टी हे अत्यंत मौल्यवान, गाभ्याचं नातं उद्ध्वस्त होतं. काळाची क्रूर विडंबना पाहा. जस्टस लायबिग यांचाच Law of minimum इथे लागू होतो. पिकांना हवी ती द्रव्यं हवी तेव्हा मिळाली नाहीत की निकस अन्न हाती येतं. कमतरताजन्य आजारांचा फैलाव वाढतो.

अन्नातून मिळणाऱ्या प्रत्येक पोषक द्रव्याचं शरीरात विशेष कार्य आहे. उदाहरणार्थ, शरीरातील साखरेचं नियंत्रण करणाऱ्या इन्शुलिनच्या सुरळीत कार्यासाठी सूक्ष्म प्रमाणात लागणारं क्रोमियम मुख्यत: गांडूळविष्ठा व स्राव यातून मिळतं. रासायनिक शेतीत गांडुळं हद्दपार झाल्यामुळे अन्नात क्रोमियमची कमतरता निर्माण होऊन मधुमेह (आणि अशा अनेक घटकांच्या अभावी विविध कमतरताजन्य आजार) निर्माण झाले तर त्यात नवल काय? शहरी जीवनशैलीचा आजार समजला जाणारा मधुमेह ग्रामीण भागातही वेगाने हातपाय पसरत आहे, यामागील इंगित हेच आहे. याच असंतुलनामुळे निर्माण झालेल्या रोगांवर फवारलेली विषारी रसायनं अन्नात उतरून आणखी आजारांना जन्म देतात. १७०५ मध्ये लंडनमध्ये झालेल्या मृत्यूची कारणं या अभ्यासात हृदयरोग, कॅन्सर, अल्झायमर ही आजची आघाडीची मंडळी चक्क गैरहजर आहेत. आजचे बरेचसे आजार कुपोषणाशी संबंधित आहेत. Indian Council of Agricultural Research (ICAR) आणि Indian Council of Medical Research (ICMR) या भारतातल्या शेती आणि वैद्यकीय क्षेत्रांतल्या दोन अग्रगण्य संस्था. अन्न या समान विषयाशी संबंधित त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष चिंताजनक आहेत. ICAR च्या एका अभ्यासानुसार 'भारतीयांच्या अन्नात ५० टक्के हिस्सा असलेल्या भात व गहू या पिकांतील पोषणाचं प्रमाण गेल्या पन्नास वर्षांत ४५ टक्क्यांनी कमी झालं आहे.' 'जस्त या अत्यंत उपयुक्त सूक्ष्मद्रव्याचं प्रमाण तांदळात ३३ व गव्हात ३० टक्के कमी झालं आहे; लोह हे तितकंच महत्त्वाचं सूक्ष्मद्रव्य तांदळात २७ व गव्हात १९ टक्के कमी प्रमाणात आढळत आहे.' तर ICMRच्या एका संशोधनानुसार 'गेल्या २५ वर्षांत 'साथीचे रोग' सोडून इतर आजारांचं प्रमाण २५ टक्क्यांनी वाढलं आहे.' हा मुख्यत: रासायनिक शेतीतून आलेल्या अन्नद्रव्यांच्या कम तरतेचा आणि अन्नात उतरलेल्या विषारी अंशांचा परिपाक आहे.

**सत्त्वहीनतेच्या मुळांशी...**

आज सुशिक्षितांमध्ये आरोग्य-सजगता वाढत आहे. जंक फूड, गोठवलेलं, साठवलेलं, अतिप्रक्रिया केलेलं अन्न, मैद्याचे पदार्थ, शीतपेयं इत्यादी आरोग्याला घातक आहेत, हे लोकांना कळून चुकलं आहे. पण घरगुती, ताजं अन्नसुद्धा त्याचं सत्त्व गमावून बसलं आहे, तसंच विषमय झालं आहे. हार्मोन्ससदृश कीडनाशकांच्या फवारण्यातून ती रसायनं मानवी शरीरातील प्रजननसंस्था, मज्जासंस्था, प्रतिकारशक्ती अशा मूलभूत यंत्रणांवर आघात करत आहेत, हे त्यांच्या रडारवर आलेलं नाही. बालकांतील व्यंग, मतिमंदत्व, ऑटिझम, कॅन्सर असे दुर्धर आजार चिंताजनक प्रमाणात वाढत आहेत.

आम्ही जमिनीच्या आरोग्यासाठी सेंद्रिय शेतीला सुरुवात केली तेव्हा मातीचं आरोग्य आणि मनुष्य, पशुपक्षी यांचं आरोग्य एकमेकांशी अतूटपणे जोडलेलं आहे, हे लक्षात आलं. सततच्या रसायनांच्या वापराने आमची माती आजारी, मृतवत झाली होती. पोटातील असंख्य जिवाणू-बुरश्या-गांडुळं इत्यादींमुळे तिला जिवंतपणा येतो, हे तेव्हाच समजत होतं.

सेंद्रिय शेतीत उत्पादन कमी येतं असा सरसकट गैरसमज आहे. सुयोग्य व्यवस्थापनाने उत्पादन जास्त, निरोगी, सकस येतं, हा आमचा वर्षानुवर्षांचा अनुभव आहे. एका दाण्याचे हजारो दाणे करण्याचं सामर्थ्य मातीत आहे आणि पृथ्वीतलावर मानवप्राण्याचा मागमूससुद्धा नव्हता तेव्हापासून माती हे सामर्थ्य राखून आहे. पण औद्योगिक क्रांतीनंतरच्या विज्ञान-

तंत्रज्ञानाच्या घोडदौडीत, मानवी बुद्धिमत्तेच्या अहंकारात निसर्गाच्या परिपूर्ण यंत्रणांच्या सामर्थ्याचं अवमूल्यन झालं. वनस्पती पोषण आणि संरक्षणाच्या हजारो वर्षं विकसित होत आलेल्या ज्या नैसर्गिक यंत्रणा रासायनिक शेतीत उद्ध्वस्त झाल्या आहेत, त्या पुनर्स्थापित केल्याशिवाय पर्याय नाही. 'पोपट मेला आहे' हे सांगणारा बिरबल पुढे येण्याची गरज आहे. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' अशी बीजाची महती संतश्रेष्ठ तुकाराममहाराज सांगून गेले. या 'बीजा'वर आणि जागतिक अन्नपुरवठ्यावर निरंकुश ताबा मिळवण्याचे काही कंपन्यांचे प्रयत्न चालू आहेत. वंशवृद्धी हे 'बीजा'चं मुख्य कार्य. त्याची पुढची पिढी उगवणारच नाही, अशी 'निरंकुर' (Terminator) बियाणी बनवली गेली आहेत. स्वत:च्या शेतीतील बी वापरलं तरी तो गुन्हा ठरवा, असे जुलमी एकाधिकार पेटंट कायद्यान्वये निर्माण केले जात आहेत. संकर हा निसर्गाचा स्थायिभाव आहे. त्यातूनच एवढी जैवविविधता निर्माण झाली आहे. हवामानाच्या अनेक चढउतारांतून तावूनसुलाखून टिकून राहिलेली बियाणी निवड पद्धतीने विकसित केल्यास प्रचंड उत्पादन देतात. पण जमिनीची आणि पिकांची प्रतिकारशक्ती आपणच क्षीण करून त्यावर उपाय म्हणून बियाणात अनैसर्गिक संकर घडवून आणून ज्यांचे दीर्घकालीन चांगले-वाईट परिणाम पूर्ण माहीतही नाहीत, अशी जनुकपरिवर्तित बियाणी बनवून स्वत:ची पाठ थोपटून घेण्यात आपण धन्यता मानत आहोत.

**संजीवन शेतीकडे**

अलीकडे शेतीउत्पादन आणि औद्योगिक उत्पादन या दोन उत्पादनपद्धतींतील मूलभूत फरक विसरला जात आहे. औद्योगिक उत्पादन हे संपूर्णत: मानवनिर्मित आहे. काहीतरी घातल्याशिवाय तिथे काही तयार होऊच शकत नाही. घातलेल्यापेक्षा जास्त तर नाहीच नाही. हेच झापड लावून पीक-जीवसृष्टी संबंधावर आधारलेली निसर्गाची उत्पादनाची आणि कदाचित त्यापेक्षाही महत्त्वाची पुनर्भरणाची व्यवस्था समजून न घेता कृत्रिम, विषमय बाह्य आदानांवर भर वाढवला गेला. यातूनच प्रचलित रासायनिक शेतीत १. प्रचंड वाढलेला उत्पादन खर्च २. आटोक्यात न येणारे कीडरोग, ३. मातीची धूप, ४. सेंद्रिय कर्बाचे क्षीण होणारे प्रमाण ५. घटणारे उत्पादन आणि उत्पादकता यातून एकीकडे शेतकऱ्यांचा बळी

**प्रगतीमुळे उपलब्ध झालेलं, सिझेरियन तंत्र हे अनेकींना वरदानच ठरलं आहे. पण आता काही काळाने, 'सिझेरियन हीच प्रसूतीची काळाच्या कसोटीवर उतरलेली एकमेव खरी, शास्त्रीय पद्धत आहे' असं लोक मानायला लागले, तर आश्चर्य वाटायला नको. सन्माननीय अपवाद वगळून हे मानायला लावण्याचा सुप्त आटापिटा आपण नाकारू शकतो?**

आणि दुसरीकडे व्यापक पातळीवर माती-पाणी-पर्यावरण यांच्या प्रदूषणाला सज्जड हातभार अशी अनर्थमालिका निर्माण झाली. उत्पादनखर्च आणि आजारांवरील उपचार या दोन्हींतील वाढीचा मोठा बोजा गरिबांवर, महिला-बालकांवर पडतो, हा वेगळाच विषय आहे.

बियाणं, खतं, औषधं, पाणी सगळंच बाहेरून पुरवण्याच्या या उत्पादनपद्धतीत शेतकरी पूर्णत: परावलंबी झाला आहे. तणनाशकांनी लादलेल्या एकपिकी पद्धतीमुळे जमिनीच्या सुपीकतेचा बळी देऊन उत्पन्न घटत आहे. तिसऱ्या जगातील कोरडवाहू, लहान शेतकरी सर्वात जास्त भरडला जात आहे. बागायती शेती त्याच रांगेत उभी आहे. पहिल्या जगातली परिस्थिती फार वेगळी नाही. १९८५ ते २०१६ या ३२ वर्षांत कॅनडातील शेतकऱ्यांनी शेतीतून जेवढं उत्पन्न कमावलं, त्यातलं ९८ टक्के शेती आदानं पुरवणाऱ्या कंपन्यांच्या खिशात गेलं. या शोषणासाठी रासायनिक आदानांची जेवढी गरज आहे, तेवढी उत्पादनवाढीसाठी निश्चितच नाही.

सेंद्रिय शेतीत हौशी, भावुक, स्वप्नाळू असं काहीही नाही. दोनशे वर्षांपूर्वी जगभर शेती सेंद्रियच असताना ब्रिटिश सत्तेच्या आरंभकाळात तंजावर परिसरात भाताचं एकरी ४८ पोती (क्विंटल) उत्पादन होत असल्याचे अहवाल उपलब्ध आहेत. बिहारच्या सुमंतकुमार यांनी SIR पद्धतीने सेंद्रिय शेतीत विक्रमी ८९ क्विंटल उत्पादन काढलं आहे. विसाव्या शतकात UNEP-United Nations Environment Programme मार्फत आफ्रिकेतल्या अनेक देशांत दीर्घकाळ चालवलेल्या प्रकल्पाचा अहवाल सांगतो, 'जगाची भूक भागवण्यासाठी आता सेंद्रिय व तत्सम (Organic and near-organic) पद्धतीकडे वळणं गरजेचं आहे.' हे साध्य होण्यासाठी अनुकूल

धोरणात्मक पर्यावरण आवश्यक आहे. यंदाच्या केंद्रीय बजेटमध्ये रासायनिक खतांवरील अनुदानासाठी १,८६,००० कोटी रुपयांची तरतूद आहे. तर अलीकडे जाहीर झालेल्या 'राष्ट्रीय प्राकृतिक शेती मिशन'साठी जमिनीचं आरोग्य, जैवविविधता, हवामानबदल अनुकूलन, गटबांधणी, शेतकऱ्यांना आर्थिक मदत, प्रशिक्षण, बाजारपेठ संधी इत्यादी सर्व मिळून १५८४ कोटी रुपयांची तरतूद आहे. याचे स्वागत आहे. पण रासायनिक खतांच्या अनुदानाच्या तुलनेत प्राकृतिक शेती मिशनची तरतूद ०.०१३१३ टक्के इतकी कुपोषित आहे. इतकं भरभक्कम पाठबळ असूनही रासायनिक शेतीची ही अवस्था आहे, हे विशेष.

रासायनिक शेतीतील अपरिहार्य धोके व तोटे लक्षात आल्यामुळे किंवा झाकणं कठीण झाल्यामुळे म्हणा घडणारे दोन महत्त्वपूर्ण घटनाक्रम लक्षात घेतले पाहिजेत.

१. सर्व मोठमोठ्या कंपन्यांनी आपापल्या Bio Divisions सुरू केल्या आहेत. तितक्याच आक्रमकतेने जैविक/सेंद्रिय उत्पादनांचा प्रचार-प्रसार सुरू आहे. शेतकऱ्याला जरा जवळचे वाटणारे, पण महागडे, बाजार-अवलंबी असे हे नवे सापळेच आहेत.

२. अवशेषमुक्त शेती - Residue-free farming चा अवलंब वाढत आहे. एका दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न एक टप्पा म्हणून स्वागतार्ह आहे. पण इथून पुढे जायचं आहे, हे भान निसटता कामा नये. 'वस्तुनिर्मितीसाठी बाह्य आदानांची अपरिहार्यता (जी औद्योगिक उत्पादनात शंभर टक्के खरी आवश्यक आहे.) या औद्योगिक दृष्टिकोनातून शेतीमाल उत्पादन ही मूलभूत गफलत त्यात कायम आहे. भट-ब्राह्मणांनी व विलायती सरकारने किती विविध प्रकारे शेतकऱ्यांची नाडणूक आणि पिळवणूक केली, याचं सविस्तर वर्णन महात्मा फुल्यांनी 'शेतकऱ्यांचा असूड'मध्ये केलं आहे, त्याची इथे आठवण होते.

महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपली फसवणूक आणि शोषण करायला वाव आपण आवर्जून ठेवत आहोत. शोषक बाजारव्यवस्थेने पोसलेल्या या मानसिकतेतून आधी मुक्त होण्याची गरज आहे. थोडा अतिशयोक्तीचा दोष पत्करून म्हणेन, अवघड प्रसूतीच्या वेळी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे उपलब्ध झालेलं, सिझेरियन तंत्र हे अनेकींना वरदानच ठरलं आहे. पण आता काही काळाने, 'सिझेरियन हीच प्रसूतीची काळाच्या कसोटीवर उतरलेली एकमेव खरी, शास्त्रीय पद्धत आहे' असं लोक मानायला लागले, तर आश्चर्य वाटायला नको. सन्माननीय अपवाद वगळून हे मानायला लावण्याचा सुप्त आटापिटा आपण नाकारू शकतो?


'उत्पादनासाठी पीक मातीतून फक्त तीन ते पाच टक्के (चूकभूल माफ असावी) आणि हवेतून उरलेलं ९५-९७ टक्के घेतं' हे सर्वमान्य आहे. जेमतेम दहा-बारा हजार वर्षांपूर्वी सुरू केलेली शेती ही निसर्गाची मानवी आवृत्ती आहे. आपल्याला काही गोष्टी जास्त हव्या आहेत, काही नको आहेत. त्यानुसार थोडाफार बाह्य आधार, हस्तक्षेप निश्चितच लागेल; पण निसर्गाला त्याचं ९५-९७ टक्के करू द्या. त्याला अनुकूलता निर्माण करण्याकडे आपला भर असू द्या.

अवजड यंत्रांनी सतत मशागत हीसुद्धा रसायनांइतकीच घातक बाब आहे. त्यामुळे जमिनीतल्या जीवसाखळ्या उद्ध्वस्त होतात. जमिनीत साठणारा कर्ब आपण हाताने हवेत घालवतो. हे बराच काळ वाचत-ऐकत असूनही अमलात आणण्याची आमचीही हिंमत होत नव्हती. पाण्यासह, सेंद्रियसुद्धा निविष्ठा कमी कमी करत नैसर्गिक यंत्रणांना योग्य वाव निर्माण करायचा, या अर्थाने सेंद्रिय शेतीपलीकडच्या निसर्गानुसारी संजीवन शेतीकडे (Regenerative Farming) वाटचाल आम्ही सुरू केली आहे. मी शेतकरी आहे, तज्ज्ञ नाही. अर्थव्यवस्थेत शेती आणि शेतीत माती कायम उपेक्षित आहे. या दुर्लक्षित विषयावर माझे अनुभवाधारित, ज्ञानाधारित विचार मांडण्याची संधी मिळाली. तिचा वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीप्रमाणे मुक्त वापर मी केला आहे. माझ्यासारखे अनेक तृणमूल शेतकरी असा नवा विचार करत आहेत. आमचे प्रयोग पाहण्यासाठी आपणा सर्वांना हार्दिक आमंत्रण!


❋❋❋

**प्रयोगशील शेतकरी अशी ओळख असलेल्या वसुधा सरदार या सेंद्रिय कृषिभूषण पुरस्काराने सन्मानित आहेत. समाज, संस्कृती आणि अर्थातच शेती हे त्यांचे चिंतनाचे विषय आहेत. पारगाव सालूमालू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०३.**
**संपर्क** : ९०११० ३४९५०
**इ मेल :** ajitvasudha@gmail.com

# माझे ज्ञानप्रकाशी मित्रजगत


हेरंब कुलकर्णी


चंद्रभान भोत


सुगन बरंठ


वसंत मनकर


पद्मभूषण देशपांडे


प्रा. मिलिंद कसबे


नरेंद्र दाभोळकर

**तो त्या दरीत उतरला. दोन्ही बाजूंना खडकावर त्याने पाय रोवले आणि मला म्हणाला, ''माझ्या पाठीवर पाय देऊन आता पलीकडे जा.'' मी त्याच्या पाठीवर पाय दिला आणि पलीकडे गेलो. लहान मुलांनी टाळ्या वाजवल्या. तो दरीतून वर आला, पण आपण काही उपकार केले आहेत किंवा काही विशेष केले आहे याचा कोणताही भाव त्याच्या चेहऱ्यावर नव्हता. मी त्याला इतके टाकून बोललो होतो, पण तरीसुद्धा 'मी तुम्हाला मदत केली,' असा भावही चेहऱ्यावर नव्हता. येताना प्रश्न पडला, शेवटी ज्ञान म्हणायचे कशाला? मी त्याला ज्याच्यावरून रागावलो, त्या वाचन–लेखन येण्याला ज्ञान म्हणायचे की त्याच्यात जी शारीरिक लवचीकता, धाडस, झोकून देण्याची वृत्ती होती, त्याला ज्ञान म्हणायचे?**

एकनाथी भागवतात श्री दत्तगुरू चोवीस वेगवेगळे गुरू करतात असा उल्लेख आहे. प्रत्येकाकडून काहीतरी शिकायला मिळते, असा त्याचा आशय आहे. मलाही असाच अनुभव अनेक व्यक्तींकडून येत राहतो. पूर्वी वस्ती शाळांची योजना होती. ज्या वस्तीमध्ये शाळा नाही त्या ठिकाणचा स्थानिक बारावी पास तरुण नेमून तिथे शाळा सुरू करायची, अशी ती योजना होती. नगर जिल्ह्यातल्या आदिवासी भागात अशा खूप शाळा होत्या. शाळा दूर टेकडीवर जंगलात. मी अशा शाळांना नेहमी भेट द्यायचो. आमच्या तालुक्यातील दूर एका जंगलात अशा शाळेला भेट द्यायला गेलो. इथला शिक्षक बारावी झालेला होता. मी त्याला शिकवायला लावले, पण त्याला नीट शिकवता येईना. मी विद्यार्थ्यांचे वाचन आणि लेखन तपासले. विद्यार्थ्यांना वाचन आणि लेखन करता येईना. गणितही आले नाही की इंग्रजीतील ए-बी-सी-डी-ही ओळखता आली नाही. मग मात्र मी संतापलो. खूप रागावून त्याला बोललो. कसे शिकवायला हवे याबाबत खूप उपदेश केला. तो खाली मान घालून ऐकत होता. जंगलातून एक तास चालत चालत मी आलो होतो. त्यामुळे अधिकच वैतागलो होतो.

शाळा सुटायची वेळ झाली. त्या जंगलात काहीसे अंधारून आले. पुन्हा एक तास पायी चालायचे आणि मग गाडीने गावाकडे जायचे. तेव्हा ''जवळचा रस्ता आहे का?'' असे त्याला विचारले तर म्हणाला, ''इथून दहा मिनिटांवर दोन खडकात छोटी दरी आहे. त्याच्यावरून उडी मारून पलीकडे गेले की लगेच तुम्ही शेजारच्या गावात जाल. जंगलातून चालण्याची गरज नाही.'' मी तयार झालो. आम्ही बोलत बोलत त्या दरीजवळ आलो. चालतानाही माझ्या तोंडाचा पट्टा चालूच होता. तो किती वाईट शिक्षक आहे; त्याला कसे काहीच येत नाही. हेच मी त्याला सारखे सांगत होतो. त्या दरीजवळ येताच माझी बडबड थांबली. कारण त्या छोट्या दरीतून प्रचंड वेगाने पाणी वाहत होते आणि ते खूप खोल होते. त्याने पटकन त्या छोट्या दरीतून उडी मारून दाखवली आणि मला म्हणाला, ''आता अशीच उडी तुम्ही मारा पलीकडे.'' मी खोल दरीत वाकून बघितले. दरीची खोली बघून आणि पाण्याचा मोठा आवाज ऐकून मला धाडस होईना. जर पाय अलीकडे पडला तर मोडेल आणि आपण दरीत पडू, अशी भीती तयार झाली. जसजसा तो आग्रह करू लागला, तसतसा जास्तच घाबरलो. तिथे आजूबाजूची लहान मुले आली. तीही मला उडी मारून दाखवायची व किती सोपे आहे म्हणायची. मी तर पूर्ण घाबरून गेलो होतो. अंधार पडू लागला. पुन्हा मागे जाणे शक्य नव्हते. शेवटी त्या शिक्षकाला माझी दया आली. तो त्या दरीत उतरला. दोन्ही बाजूंना खडकावर त्याने पाय रोवले आणि मला म्हणाला, ''माझ्या पाठीवर पाय देऊन आता पलीकडे जा.'' मी त्याच्या पाठीवर पाय दिला आणि पलीकडे गेलो. लहान मुलांनी टाळ्या वाजवल्या. तो दरीतून वर आला, पण आपण काही उपकार केले आहेत किंवा काही विशेष केले आहे याचा कोणताही भाव त्याच्या चेहऱ्यावर नव्हता. मी त्याला इतके टाकून बोललो होतो, पण तरीसुद्धा 'मी तुम्हाला मदत केली,' असा भावही चेहऱ्यावर नव्हता. येताना प्रश्न पडला, शेवटी ज्ञान म्हणायचे कशाला? मी त्याला ज्याच्यावरून रागावलो, त्या वाचन-लेखन येण्याला याला ज्ञान म्हणायचे की त्याच्यात जी शारीरिक लवचिकता, धाडस, झोकून देण्याची वृत्ती होती, त्याला ज्ञान म्हणायचे?

मला शिक्षणातला तज्ज्ञ म्हटले जाते पण ही शारीरिक लवचिकता, जोखीम घेण्याची वृत्ती याला मात्र आम्ही शिक्षण म्हणत नाही. हा धडा मला त्या दिवशी मिळाला. मला जे येते त्याला प्रतिष्ठा आहे आणि त्याला जे येत नाही, त्याला मात्र प्रतिष्ठा नाही. शिक्षण आणि ज्ञानाची व्याख्या काय करायची हा प्रश्न घेऊन मी विचारात पडलो. तो माझ्या दृष्टीने अज्ञानी असलेला शिक्षक माझ्यासाठी शिकलेला होता.

***

**ज्ञानाची मध्यमवर्गीय कक्षा**

आमच्या गावाच्या बाहेर भटक्यांची कुटुंबे उतरतात आणि काही दिवस थांबतात. जाता-येता मी थांबतो आणि त्यांच्याशी बोलतो. एकदा एप्रिल महिन्यात अशीच कुटुंबे तिथे उतरली होती. त्यांची दोन लहान मुले खेळत होती. ''या मुलांना शाळेत का टाकत नाही'' असे विचारले व हळूहळू त्यांना मुलांना शाळेत टाकायला प्रवृत्त केले. ते तयार झाले. आमच्या तालुक्यातील भटक्या विमुक्तांची आश्रमशाळा आहे. त्यांना तिथूनच फोन केला. ते म्हणाले, 'दोन जागा ठेवतो.' मी खूश झालो. नंतर आठ दिवसांनी फॉर्म घेऊन गेलो. तिथे गेल्यावर ते माझ्याकडे बघेचनात. मला काहीच प्रतिसाद मिळाला नाही. मी वैतागून त्यांना म्हणालो, ''तुम्हीच मला

हो म्हणाला म्हणून तर मी आलो ना? मग असे का करता? मुलांना शाळेत पाठवायला हवे.'' शेवटी तो माणूस वैतागला. चिडून मला म्हणाला, ''अरे, बारा वर्षांपूर्वी असाच एक शहाणा मला सांगायला आला होता, मुलाला शाळेत घाला. मी त्याचे ऐकले व शाळेत घातले. आमचा व्यवसाय टोपल्या विणण्याचा. आम्ही गावोगाव टोपल्या विकत भटकत राहिलो. त्याच्या शिक्षणाची आबाळ होऊ नये म्हणून गावाकडे आई-वडिलांकडे त्याला ठेवले. त्याला शिकवले. आता तो बारावीला नापास झाला आहे आणि घरीच थांबला आहे. आता त्याला आमच्यासोबत फिरायची लाज वाटते आणि आमचा व्यवसायही त्याला करता येत नाही. टोपलीही विणता येत नाही आणि नापास झाल्याने शिक्षणातही पुढे जात नाही. तो तुमच्याकडूनही हुकला आणि आमच्याकडूनही हुकला.''

तो साधे वाक्य बोलून गेला पण माझ्यासाठी तो एक धडा होता. पारंपरिक कुटुंबातील विद्यार्थ्यांना आपण आपल्या मध्यमवर्गीय कक्षेत आणण्याचा प्रयत्न करतो आणि ते त्रिशंकू होतात. धड तिकडचेही राहत नाहीत आणि इकडचेही राहत नाहीत आणि आम्ही शिका, शिका, शिका इतकेच फक्त म्हणत राहतो. महात्मा गांधींची हाताने काम करून शिक्षण घेण्याची कल्पना मला त्या दिवशी समजली. अशा प्रकारे आपल्याला पारंपरिक कौशल्य आणि आमचे तथाकथित शिक्षण याची सांगड घातली तरच आपल्याला वंचितांचे क्षण गतिमान करता येतील. शिक्षणातून गळती का होते याचे उत्तर मला त्या दिवशी मिळाले.

***

**आम्ही सारे सालिम अली**

माझ्या गावात एक वस्तिगृह आहे. त्या वस्तिगृहातले विद्यार्थी आमच्या शाळेत येतात. रविवारी त्या विद्यार्थ्यांना शिकवायला किंवा त्यांच्याशी बोलायला अधूनमधून मी जायचो. एकदा मी डॉ. सालिम अली यांचे चरित्र सोबत नेले होते. ती सारी मुले आदिवासी भागातली होती. मी त्यांना सालिम अली यांची गोष्ट सांगायला लागलो. त्यांना किती पक्षी माहीत होते? पक्ष्यांबद्दल त्यांना किती माहिती होती? हे सांगत होतो पण त्या मुलांचे अजिबात लक्ष नव्हते किंवा त्यांना त्याबद्दल कोणतीही उत्सुकता वाटत नव्हती. शेवटी मी वैतागून म्हणालो, ''अरे, तुम्ही स्वतःला सालिम अलीपेक्षा ग्रेट समजता का? तुम्हाला किती पक्षी माहीत आहेत?'' आणि त्यानंतर मला धक्का बसला. कारण पटापट हात वर करून त्या मुलांनी मला खूप पक्ष्यांची नावे सांगितली. मी वही घेतली आणि नावे लिहू लागलो. एकूण ५५ पक्ष्यांची नावे त्या विद्यार्थ्यांनी सांगितली. मग मी त्या मुलांना त्या पक्ष्यांचे तपशील विचारले. ते तपशीलसुद्धा विद्यार्थ्यांनी मला सांगितले. त्याची मादी कशी असते? अंडी कशी घालतात? घरटे कसे असते? पक्षी काय खातो? अशी सर्व माहिती त्या विद्यार्थ्यांनी मला सांगितली. मग आम्ही तो एक प्रकल्प केला.

एका कागदावर पक्ष्यांचे चित्र व कडेला त्या पक्ष्यांची माहिती, त्यात पक्षाचे नाव, शास्त्रीय नाव, पक्षी अंडे कसे घालतात? घरटे कसे बांधतात? पक्षी काय खातो? अशी सर्व माहिती तिथे लिहिली व त्या संकलनाचे आम्ही प्रकाशन केले. ही सर्व मुले इंग्रजी, गणित विषयात मागे पडलेली होती. पण एखाद्या पक्षितज्ज्ञा पेक्षा सुद्धा त्यांना पक्ष्यांबाबतचे जास्त तपशीलवार ज्ञान होते. मी त्यावर लेख लिहिला. त्या लेखाचे शीर्षक होते, 'या प्रतिभेचे काय करायचे?'

***

व्यक्तिगत आयुष्यातसुद्धा आपल्याला दिशा देणारे मित्र असतात. माझे काही जवळचे मित्र माझ्या विरुद्ध आक्रमक झाले. मला मिळणारी प्रसिद्धी, माझे काम याने एकेकाळी जवळ असणारे लोक मला त्रास देऊ लागले. बदनामी करू लागले. माझ्याविरुद्ध तक्रारी करू लागले. माझ्याविरुद्ध पत्र काढून आंदोलनापर्यंत मजल केली. तेव्हा मी भांबावून गेलो आणि मीसुद्धा त्या मित्रांच्या विरोधात तक्रारी करणे किंवा तशाच प्रकारच्या काही गोष्टी सुरू केल्या. तेव्हा माझा एक जवळचा मित्र मला म्हणाला, ''गल्लीतल्या दारुड्याशी वाद कधीच घालायचा नसतो. कारण त्याने तुम्हाला शिवी दिली म्हणून तुम्ही जर प्रतिकार केला, तर तो रात्रभर शिव्या देईल. कारण त्याला फक्त तितकेच काम आहे.'' मी त्यातून खूप शिकलो. त्यानंतर माझ्या विरोधात अनेक उद्योग करणाऱ्या व्यक्तींकडे दुर्लक्ष करायला शिकलो. अन्यथा मीसुद्धा सुडाच्या चक्रात सापडला असतो, पण मित्राने दिलेल्या ज्ञानवजा सल्ल्याने मी त्याही परिस्थितीतून बाहेर येऊ शकलो.

पत्रकार पद्मभूषण देशपांडे या ज्येष्ठ मित्राला मी मला होणारा त्रास सांगितला तेव्हा तो पटकन म्हणाला, ''तू त्यांच्या

पातळीवर जाऊ नकोस. कारण ते त्या पातळीचे एक्सपर्ट असतात.'' त्यामुळे ठरवले की आपल्याकडून कोणती चूक होता कामा नये आणि खरेच त्यानंतर हळूहळू त्रास संपत गेला. त्यातील अनेक जण पुन्हा मित्र झाले. तेव्हा अशा घसरण्याच्या क्षणी सावरणारे लोकसुद्धा आवश्यक असतात. त्यांचे अनुभवाचे, ज्ञानाचे बोल मोलाचे असतात. कारण आपण तो अनुभव कधी घेतलेला नसतो.

***

**ज्ञानप्रकाशी वर्तुळ**

चंद्रभान भोत नावाचे माझे ज्येष्ठ मित्र आहेत. त्यांचे वाचन उत्तम आहे व विचार करण्याची पद्धत अतिशय वेगळी आहे. ते काही वेगळ्या गोष्टी मला सांगतात. त्या निमित्त मी तालुक्यात दारूबंदी, बालविवाह, एकल महिला अशी छोटी छोटी कामे करत राहतो. तेव्हा ते मला एकदा म्हणाले,

''तुमची क्षमता जनरेटरची आहे. तुम्ही ऊर्जा निर्माण करण्याचे काम करायचे आहे पण तुम्ही मात्र विजेच्या तारा आणि खांब टाकण्याचे काम करत आहात. ते काम कोणीही करू शकते. ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता खूप कमी जणांमध्ये असते. तेव्हा तुम्ही विचार देण्याचे काम करा. त्या विचाराच्या प्रकाशात कार्यकर्ते निर्माण होत राहतात.'' खरंतर मी अजूनही मला त्या क्षमतेचा मानत नाही. त्यांनी सांगितलेल्या मुद्द्यावर सारखा विचार करत राहतो की विचारनिर्मिती व पर्यायी विचारांची मांडणी सातत्याने करण्याची क्षमता आपल्या अंगात यावी.

***

डॉक्टर सुगन बरंठ हे माझे ज्येष्ठ मित्र. एकदा प्रवासात काही वेळासाठी मालेगावला त्यांच्याकडे थांबलो आणि जाण्याची घाई करू लागलो तेव्हा ते मला म्हणाले, ''आपण म्हणजे यंत्र आहोत का? आपण फक्त काम काम करताना मानवी नातेसंबंध विसरून जातो. त्यांचा वापर फक्त कामासाठी करतो. विनाकारण एकमेकांना भेटणे हा आपल्याला वेळ घालवण्याचा प्रकार वाटतो, पण त्यातूनच नाते दृढ होऊन काम पुढे जात असते. तेव्हा शांतपणे जवळच्या व्यक्तींना भेटणे व जिव्हाळ्याने विचारपूस करून एकमेकांसोबत वेळ घालवणेसुद्धा महत्त्वाचे आहे. अन्यथा केवळ राजकीय लोकांना जशी सत्तेची महत्त्वाकांक्षा असते, तशी आपल्याला सामाजिक महत्त्वाकांक्षा असते इतकाच त्याचा अर्थ होईल.'' यातूनसुद्धा मला खूप शिकायला मिळाले आणि माझ्यातील यंत्राचा वेग मी थोडा कमी केला.

> **''गल्लीतल्या दारुड्याशी वाद कधीच घालायचा नसतो. कारण त्याने तुम्हाला शिवी दिली म्हणून तुम्ही जर प्रतिकार केला, तर तो रात्रभर शिव्या देईल. कारण त्याला फक्त तितकेच काम आहे.'' मी त्यातून खूप शिकलो. त्यानंतर माझ्या विरोधात अनेक उद्योग करणाऱ्या व्यक्तींकडे दुर्लक्ष करायला शिकलो. अन्यथा मीसुद्धा सुडाच्या चक्रात सापडला असतो...**

***

सर्वात दिशा देणारे एक वाक्य मला डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी शिकवले. सातारा येथे एकदा एका कार्यक्रमाला गेलो होतो. त्या कार्यक्रमात जेवताना दाभोलकरांनी विचारले, ''महात्मा गांधींचे सर्वात मोठे सामर्थ्य तुला काय वाटते?'' मी वेगवेगळी उत्तरे दिली. तेव्हा ते म्हणाले, ''स्वातंत्र्य मिळवणे हे गांधीजींचे स्वप्न होते, पण त्या स्वप्नाचे भागीदार त्यांनी सर्वांना बनवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या ज्या ज्या कल्पना होत्या, त्या त्या कल्पना आपल्याच आहेत असे देशातल्या अनेकांना वाटले व ते त्या स्वप्नांचा पाठलाग करू लागले. आपण जे स्वप्न पाहतो ते स्वप्न इतरांना आपले वाटावे यासाठी प्रयत्न करणे म्हणजे खऱ्या अर्थाने काम करणे आहे...'' मला हा विचार इतका ज्ञानवर्धक वाटला की जेव्हा जेव्हा माझे काम मागे पडते आहे, असे मला वाटते, तेव्हा तेव्हा मी लोकांना दोष देण्यापेक्षा त्या कामाचे महत्त्व पटवून देण्यात कमी पडतो आहे, असा विचार करतो आणि पुन्हा एकदा नव्याने कामाला सुरुवात करतो. लहान-थोर अशा सगळ्यांचीच छोटी छोटी वाक्येसुद्धा दिशा देऊन जातात. आपल्या ज्ञानात भर घालून आपल्याला गतिमान करतात.

***

कृती आणि अभिव्यक्ती हे माझे स्वभावधर्म आहेत. कृती


केल्याशिवाय मनाला स्वस्थता लाभत नाही; अभिव्यक्त झाल्याशिवाय स्वस्थ बसवत नाही. त्यात लेखनाचा सूर तर मला कधीचाच सापडला, पण  लेखन करताना माझ्यापेक्षा वयाने लहान असलेल्या प्रा. मिलिंद कसबे या माझ्या मित्राचे एक सूत्र खूप उपयोगी पडले. मी वंचितांसाठी सतत लेखन करायचो तेव्हा माझा हा मित्र म्हणाला, ''मध्यमवर्गाला संवेदनशील करणे हे एक महत्त्वाचे काम आहे. त्यामुळे काही विषय आवर्जून मध्यमवर्गासाठी लिहायचे, तर काही विषय वंचितांविषयी लिहायचे हे साधले पाहिजे. अन्यथा तुम्ही फक्त वंचितांसाठी लिहीत राहिलात, तर बोलका वर्ग तुम्हाला बाजूला टाकतो व तुमचे लेखनही अव्हेरतो.'' त्याने हा मुद्दा पटवून देताना माझ्या जे. कृष्णमूर्ती यांच्यावर लिहिलेल्या 'जे. कृष्णमूर्ती आणि कृष्णमूर्ती स्कूल्स' या पुस्तकाचा तसेच 'परीक्षेला पर्याय काय?' या पुस्तकाचा संदर्भ दिला. म्हणाला, 'या दोन पुस्तकांमुळे मध्यमवर्ग, विचारी वर्ग तुझ्याकडे उत्सुकतेने पाहील व त्यानंतर वंचितांविषयी जे लिहिशील तेही तो वाचेल.' घडलेही तसेच.

समीक्षक नजरेच्या मिलिंद कसबे यांनी सांगितलेला हा मुद्दा मला खूप महत्त्वाचा वाटला. त्यामुळे मी दोन्ही समूह समोर ठेवून लिहीत राहतो. त्यामुळे एकारलेपण येत नाही. विचारी वर्ग, मध्यमवर्ग हा आपल्याशी जोडून त्याची मदत वंचितांच्या कामात होऊ शकते, याचाच परिणाम म्हणून एकल महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मी मदतीचे आवाहन करताच मला एक महिन्यात सोळा लाख रुपयांची मदत मध्यमवर्गीयांकडून मिळाली.

❋ ❋ ❋

**अकोले जिल्हा अहमदनगर येथे कार्यरत असलेले हेरंब कुलकर्णी हे प्रयोगशील शिक्षक, संशोधक, समाजअभ्यासक, लेखक, कार्यकर्ता अशा विविध भूमिकांतून आपला ठसा उमटवत आले आहेत.**

**संपर्क :** herambkulkarni1971@gmail.com



# माझा ज्ञान-मंच




डॅनिअल मस्करणीस



लुजान डिसूजा मॅडम



फादर कोरिया



फ्रान्सिस अल्मेडा सर

**'ज्ञानी लोकांचा गोतावळा' हा विषय ऐकताच मनात प्रश्न उभा राहतो, 'ज्ञानी म्हणजे नेमकं कोण?' ज्ञान, विवेक आणि अनुभव यांचा संगम असलेली व्यक्ती म्हणजे ज्ञानी, असं जरी आपण मान्य केलं तरी खऱ्या ज्ञानीपणाचे निकष मात्र प्रत्येकाच्या दृष्टीने वेगवेगळेच ठरतात. आपले आईवडील, आपल्याभोवतीचे सान-थोर लोक, शिक्षक, मित्र-मैत्रिणी, वरिष्ठ-कनिष्ठ सहकारी हे सगळेच आपल्याला रोज काही ना काही शिकवत असतात. त्यातूनच आपलं व्यक्तिमत्त्व घडत जातं. पण म्हणून काही आपण त्यांना ज्ञानी म्हणत नाही. ज्ञानी माणसाच्या सहवासात राहिलं की केवळ बोललेल्या एखाद्या साध्या वाक्यातून, प्रसंगातूनही त्यांची वर्षानुवर्षांची साधना आपल्यापर्यंत पोहोचते आणि आपल्यात कुतूहल जागं होतं; प्रेरणा मिळते; आपल्या विचारांना नवी दिशा मिळते.**

मराठी माध्यमाच्या चर्चच्या शाळेतील आठवीचा वर्ग. मराठी शिकवणाऱ्या लुजान (डिसूजा) मॅडम 'निबंधलेखन कसं करावं?' याविषयी आमच्याशी बोलत होत्या. त्यांच्या एका माजी विद्यार्थ्याने लिहिलेल्या निबंधाचं उदाहरण आम्हासमोर ठेवत होत्या.

'मुलांनो, 'रविवारच्या बाजारातील एक दिवस' असा त्या विद्यार्थ्याच्या निबंधाचा विषय होता. त्या मुलाने निबंधाची सुरुवात अशी केली : 'रविवारचा बाजार भरलेला होता. भाजीपाला, फळे, कपडेलत्ते व इतर वस्तू विकणारे विक्रेते आणि खरेदीसाठी आलेले ग्राहक यामुळे बाजारात गजबजाट होता. आईने मला बाजारात मासळी आणण्यास पाठवले होते. त्यामुळे कोपऱ्यात बसलेल्या एका कोळिणीकडे जाऊन मी ताजी मासळी विकत घेतली. बाजारातील वर्दळ वाढतच चालली होती, पण इच्छा असूनही मी तेथे जास्त वेळ रेंगाळलो नाही. ते परवडणारेही नव्हते. नुकतीच विकत घेतलेली ताजी मासळी खराब नसती झाली?' अशी काही सुरुवातीची वाक्यं लिहून त्या पठ्ठ्याने तो निबंध एका परिच्छेदातच आटोपला होता.'

मग मॅडमनी प्रश्न विचारला, 'मुलांनो, तुम्ही शिक्षक असता तर या निबंधाला किती गुण दिले असते?'

सगळ्यांनी आपापली मतं मांडली. काहींच्या मते तो निबंध अपूर्ण होता. त्या विद्यार्थ्याने शब्दसंख्येचे निकष पूर्ण केले नव्हते. काहींच्या मते, त्या विद्यार्थ्याला मार्क द्यायला हवे पण ते फक्त एका परिच्छेदाचेच... वगैरे वगैरे. ती सर्व मतं ऐकून घेतल्यावर मॅडम म्हणाल्या, 'निबंधासाठी किमान दोन पानं लिहिणं अपेक्षित असताना या मुलाने एका परिच्छेदातच निबंध संपवला हे खरंच! पण त्याने त्या निबंधात दाखवलेलं व्यवहारचातुर्य आणि प्रामाणिकपणामुळे मी त्याला सढळ गुण दिले.'

साहित्य, त्याचं आयुष्यातील प्रयोजन, त्याचं मूल्यमापन वगैरे काही कळण्याचं ते वय नव्हतं. तरीही 'लेखनात केवळ धुंद करणारा कल्पनाशक्तीचा वेडेपणा नको, पण त्याचबरोबर भानावर आणणारं, व्यवहारकौशल्याच्या चौकटीत बसवलेलं लिखाणही हवं,' हे लुजान मॅडम आमच्या मनावर सहज बिंबवून गेल्या होत्या...

**जग विस्तारणाऱ्या ज्ञानगुरु**

लुजान मॅडमनी कधीच मराठी विषय फक्त गुण मिळवण्यासाठी शिकवला नाही. फक्त धडा एके धडा असं न करता धडा ज्या लेखकाचा आहे, त्या लेखकाचं इतर साहित्य, त्याची लेखनशैली, साहित्यातील सौंदर्यस्थळं याची कितीतरी उदाहरणं आम्ही त्यांच्या रसाळ वाणीतून ऐकली आहेत. त्यांचा मराठीचा तास म्हणजे एक साहित्यिक गप्पांसारखा असे.

त्यांनी आमच्यात भाषेची आणि साहित्याची खरी आवड निर्माण केली. स्पष्टवक्त्या, कडक शिस्तीच्या असल्या तरीही त्या विद्यार्थ्यांत लोकप्रिय होत्या. कारण त्यांचं मराठी साहित्यावर असलेलं (आणि मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांना जाणवणारं) निखळ प्रेम!

वैयक्तिक आयुष्यातही मॅडम ठाम भूमिका घेत.

वीस-बावीस वर्षं निघून गेली. माझं पहिलं पुस्तक छापायला जाणार होतं. प्रकाशकांकडून संपूर्ण प्रूफरीडिंग झालं होतं, पण तरीही 'हे पुस्तक माझ्या मराठीच्या शिक्षिकेच्या डोळ्यांखालून जावं. चांगली चार लाल शाईची वर्तुळं मिळावीत,' असं माझ्या मनात होतं. मी ते बाड मॅडमकडे सुपूर्द केलं. मॅडमनी पुस्तक वाचून प्रूफरीडिंगच्या काही सूचना दिल्या. पुस्तकाचा विषय होता, 'विवेकवाद आणि ख्रिस्ती धर्माची चिकित्सा'. मॅडम तशा स्वभावाने देवभोळ्या! निघताना 'पुस्तक कसं वाटलं?' असं मी दबकतच विचारलं. त्यांच्या प्रतिक्रियेची उत्सुकता होती. त्या म्हणाल्या, 'तू तुझे अनुभव मांडले आहेस. आपल्याला आलेले सर्वच अनुभव सुखद कसे असू शकतील? काही कटूही असतात. तेही अनुभव लिखाणात तसेच मांडले गेले पाहिजेत. तू ते प्रामाणिकपणे केले आहेस.' त्यांचे हे उद्‌गार म्हणजे पुस्तकाच्या प्रकाशनाआधी मला मिळालेलं अमूल्य असं बळ होतं.

'गुरू', 'ज्ञानी' हे शब्द तसे पुलिंगी असले, तरी माझ्यासाठी मराठी शिकवणाऱ्या लुजान मॅडम या खऱ्या अर्थाने गुरूच आहेत. संस्कारक्षम शालेय वयात मराठीतील प्रज्ञावंतांची ओळख करून देणाऱ्या एक ज्ञानवंत!

**जग पेलणारा गिरधर**

२००५च्या सुमारास इंजिनिअरिंग संपवून आयटी क्षेत्रात येण्याची धडपड चालू होती. तीन वर्षं मुंबईतील एका छोट्या कंपनीत काम केल्यानंतर बंगलोरहून आयबीएमची ऑफर आली. तीही त्यांच्या Research and development - आर

अँड डी – या एलिट ग्रूपमध्ये काम करण्यासाठी. भारतामध्ये आयटीमधील बहुतांश काम हे सर्व्हिस सेक्टरमध्ये असतं. फक्त १०–२० टक्के काम हे मूळ प्रॉडक्ट बनवण्याचं असतं. त्यापैकीच हे काम होतं. त्या वेळी भारताची गोष्ट खूपच आश्वासक वाटत असल्याने नव्वदच्या दशकात सिलिकॉन व्हॅलीतून परत आलेले बरेच जण बंगलोर येथे स्थिरावत होते. २००८चं आयटी म्हणजे शाळेतील अ वर्ग! सगळे आपापल्या शाळा वा कॉलेजमधून उत्तम मार्कांनी पास झालेले! थोडक्यात आई–वडिलांच्या देखरेखीखाली राहून अभ्यास केलेले. त्या आज्ञाधारकपणामुळेच असेल आई–वडिलांच्या परंपरांचं ओझंही निगुतीने वाहणारे! कर्नाटकी शास्त्रीय संगीत आणि सॉफ्ट रॉक आवडीने ऐकणारी, केसांत गजरा माळलेली वा कपाळावर चंदनाचा टिळा लावलेली, पण उत्तम इंग्रजी बोलणारी!

पंधरा वर्षांपूर्वीचं बंगलोर आणि तिथले रांची, शिमला, जयपूर, कोची, चेन्नई, धारवाड, मुंबई अशा वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या सहकाऱ्यांकडून बरंच काही शिकता आलं. सर्वच जण एक कठीण प्रवास करत तिथपर्यंत पोहोचले होते. बंगलोरमधील आयबीएममध्ये तेव्हा एक वेगळंच सांस्कृतिक अभिसरण अनुभवायला मिळालं. पाश्चात्त्य संगीत, हॉलिवुड चित्रपट आणि इंग्रजी साहित्य या त्रयींशी संबंध येथील लोकांच्या संगतीत आला.

आयटीने माहितीचं लोकशाहीकरण करण्यास सुरुवात केली होती. ज्ञानी माणसाची जी प्रमुख लक्षणं सांगता येतील, त्यांपैकी एक म्हणजे 'माहिती ज्ञात असणारा'. ती जागतिक भूमिका एव्हाना गूगलने पटकावली होती. 'Information provider' म्हणजेच माहिती पुरवठादाराची ही गरज संपली असं जरी वाटू लागलं असलं तरी माहितीच्या ह्या धबधब्यातून ज्ञानाचे कण वेचण्यासाठी Information navigator (माहिती मार्गदर्शक) ही दुसरी बाजू मात्र अजूनही ज्ञानी माणसाची गरज दर्शवणारी.

फेसबुक–ॲपल–ॲमेझॉनची हवा होण्याआधी म्हणजे २००८–२०१० साली 'आयबीएम म्हणजे शंभर वर्षं जुनी, हंड्रेड बिलियन डॉलर्सचा व्यवसाय करणारी कंपनी' अशी एक भव्यदिव्य प्रतिमा जगभरात होती. अशा या बलाढ्य कंपनीत संगणक, माहितीक्षेत्रात उत्तुंग काम केलेल्या बऱ्याच दिग्गज व्यक्ती असणं हे ओघाने आलंच. या प्रतिभावंत लोकांसमवेत कंपनीतील इतर सर्व सहकाऱ्यांना चार क्षण घालवता यावेत, कल्पनांचं आदानप्रदान व्हावं ह्या हेतूने आयबीएममध्ये वर्षातून एक कार्यक्रम राबवला जायचा. जिथे वेगवेगळ्या देशांतील आयटीमध्ये उत्तुंग कामगिरी केलेले आयबीएममधले तंत्रज्ञानातले ज्ञानी लोक एकत्र यायचे आणि कर्मचाऱ्यांसोबत वेळ घालवायचे.

एके वर्षी आयबीएमच्या बंगलोर शाखेमध्ये पाचही दिवशी असाच एक भरगच्च कार्यक्रम ठेवला गेला होता. आम्हीही खूप उत्साहाने त्या कार्यक्रमात सहभागी झालो. सोमवारी अमेरिकेतून बोलावलेला कोणी एक, दुसऱ्या दिवशी लंडनमधला दुसरा कोणी अमुक, तिसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियातील कोणी तमुक असे निरनिराळ्या देशांतील रथी–महारथींसोबत आमचे दिवस जात होते आणि मग आठवड्याचा शेवटचा दिवस म्हणजे शुक्रवार आला. सतत चार दिवस ज्ञानाचे डोस घेऊन आता थोडा कंटाळा आला होता. त्यात शुक्रवार! विकेंडची घाई! ज्या अभियंत्याचा त्या दिवशी संवाद होता, तो कॅलिफोर्नियाच्या शाखेत काम करत होता. त्याचं नाव बोर्डवर लिहिलेलं आम्ही वाचलं, 'गिरीधर बोपोडी'. 'इकडून तिकडे गेलेला हा अजून काय वेगळं सांगणार?' म्हणून सर्व टीम मेंबर्सनी त्या दिवशी कार्यक्रमास जाण्यास नाकं मुरडली. पण मॅनेजरलाही आमची मानसिकता लक्षात आल्याने 'नाही, आज शेवटचा दिवस आहे, आज हजेरी लावाच' म्हणून त्याने दम भरला आणि आम्हा सर्वांचा नाइलाज झाला.

गिरीधर आमच्यासमोर आला. बलाढ्य आयटी–कॉर्पोरेट कंपनीमध्ये लीडर म्हणजे 'सहा फूट उंच, गौरवर्णीय' अशीच एक प्रतिमा असते. या साचेबद्ध प्रतिमेला छेद देणारं गिरीधर यांचं बाह्य व्यक्तिमत्त्व. पाच–साडेपाच फूट उंचीचा, काळासावळा गिरीधर बोपोडी पाहून मला तर आपल्यासारखाच वाटला. मग तरीही गोऱ्यांच्या देशात त्यांच्या बलाढ्य कंपनीत इतकी सन्मानाची जागा मिळिवणारा म्हणून पाहता क्षणीच त्यांच्याविषयी एक वेगळाच आदर दाटून आला. पण आश्चर्याचे अजून धक्के बसायचे बाकी होते. त्या दिवशी त्यांनी जे अनुभवकथन केलं त्याने आम्ही थक्क झालो.

त्यांच्या तजेलदार व्यक्तिमत्त्वाचा विलक्षण असा प्रभाव आमच्यावर पडला! त्यांचे बाबा आंध्रमधील एका नक्षलग्रस्त भागाचे डीजीपी होते. गिरीधर तेव्हा दहा वर्षांचा असेल. त्याचं

नक्षलवाद्यांनी अपहरण केलं होतं आणि चक्क एक महिना तो अपहरणकर्त्यांच्या ताब्यात होता. पुढे त्याच्या बाबांनी सरकारी यंत्रणा वापरून त्याला सोडवलं. ह्या घटनेमुळे छोट्या गिरिधरच्या मनावरही परिणाम झाला. त्याला काही महिने समुपदेशन करण्यात आलं. मग तो त्यातून हळूहळू बाहेर पडला. त्याची शाळा पूर्ववत झाली. शाळेत तो चमकदार प्रगती करत गेला. इंजिनिअरिंग करून पुढे तो ९०च्या दशकात अमेरिकेत पोहोचला. पंधरा वर्षांच्या आत त्याने तब्बल दहा पेटंट फाइल केली. पण फक्त ऑफिसमधील कामात तो अडकून पडला नाही. त्याने त्याचे इतरही छंद जोपासले. त्याच्याकडे पायलटचं लायसन्स आहे. दरवर्षी जगातील सर्व प्रमुख शहरांत फुल मॅरॅथॉनही (४२ किलोमीटर) तो धावतो. बायकोही चक्क प्रेमात पडून केलेली. मेक्सिकन! म्हणजे परत परकीय स्पॅनिश भाषा शिकणं हे आलंच. उत्तम नियोजन केलं तर माणसाला एकाच आयुष्यात किती किती करणं शक्य आहे असं वाटून आम्ही चाट पडलो. कार्यक्रम संपल्यावर त्याच्या बाजूलाच आम्ही रेंगाळत राहिलो. 'वेळेचं नियोजन ठीकच, पण स्वतःच्या ऊर्जेचंही नियोजन करा. मग तुम्हालाही आयुष्यात बरंच काही करणं शक्य होईल. उगाचच भाषा-प्रांत-अस्मिता यांचं ओझं वाहून आपल्या ऊर्जेचा अपव्यय करू नका,' असं म्हणून त्याने आमचा निरोप घेतला खरा, पण काहीतरी अमूल्य असं पदरात देऊनच. गिरीधर बोपोडीची ती एकच भेट. पण अजूनही मनात रेंगाळणारी, हुरूप देणारी!

मूळचा युक्रेनचा असलेला, पण अमेरिकेत राहणारा एडवर्डही असाच एक अवलिया. ३५ वर्षांपासून आयटीमधील सॉफ्टवेअर क्वालिटी या एकाच विषयाला वाहून घेतलेला. टीम मेंबर-टीम लीडर-प्रोजेक्ट मॅनेजर-डायरेक्टर अशा शिड्या भरभर चढण्याची स्पर्धा असलेल्या आजूबाजूच्या आयटी इंजिनिर्समध्ये त्याचं वेगळेपण उठून दिसायचं. पांढरेशुभ्र केस व दाढी असलेला, गुबगुबीत गुलाबी गालाचा साठीतील एडवर्ड म्हणजे एखाद्या ऋषिमुनीसारखाच भासे. एडवर्डने डिझाइन केलेली सॉफ्टवेअर प्रणाली म्हणजे उत्कृष्टतेचा एक नमुना असायची.

### मनाची मशागत करणारे फादर कोरिया

...असं माझं सारं नेहमीच्या आयटी इंजिनिअरसारखं सुखनैव चालू होतं. एव्हाना मी आयबीएम, बेंगळुरूहून पुण्याला आलो होतो. वसईला विकेंडला येऊन जाणं असायचंच. हळूहळू मराठीतून लघुकथा लिहिण्यास सुरुवात केली होती. तेव्हा 'सुवार्ते'चे तत्कालीन संपादक फादर फ्रान्सिस कोरिया यांनी माझ्या लिखाणाला खूप प्रोत्साहन दिलं. प्रत्येक लेखानंतर त्यांची कौतुकाची थाप खूप हुरूप द्यायची. त्यामुळेच असेल एका पाठोपाठ १५-१६ कथा आणि ललित लेख त्या दोन-तीन वर्षांत प्रसिद्ध झाले. सुरुवातीच्या काळात लेखकाला वाचकांच्या मान्यतेची जास्तच गरज असते. वसईतील वाचकांकडून ती गरज पुरेपूर भागली गेली. 'मंच'सारखं गंभीर लिखाण हातून पूर्ण होण्याआधी लेखक म्हणून जी प्राथमिक मशागत होणं गरजेची होती, ती 'सुवार्ता'मधून फादर कोरियांमुळे झाली. वसईतील समाजाचा, संस्कृतीचा त्यांनी खूपच गाढा अभ्यास केला होता, पण त्याचा त्यांनी कधी दिखावा नाही केला. प्रत्येक मासिकामागे घेतलेल्या मेहनतीची कोणी दखल घेतंय की नाही, याची पर्वा न करता गेली कित्येक वर्षं त्यांनी एका साधकाप्रमाणे आपली लेखणी झिजवली. धार्मिक विचारांवर त्यांचा विश्वास असला तरी नवीन विचारांनी ते कधी अस्वस्थ झाले नाहीत. त्यामुळेच असेल कदोचत ख्रिस्ती धर्मगुरूंची चिकित्सा असलेलं माझं 'मंच' हे पुस्तक प्रथम त्यांना वाचयला देताना मलाही कसला संकोच वाटला नाही. पुस्तक वाचल्यानंतर नेहमीप्रमाणे 'लिहिणं थांबवू नकोस' असं सांगायला ते विसरले नाहीत. आजही शांत समईप्रमाणे त्यांचं लिखाण चालू आहे.

**'संपूर्ण समाज शंभर टक्के विवेकवादी होईल न होईल, पण पंचवीस टक्के लोकांत जरी विवेक जागृत झाला तरी त्याचा मोठा फायदा समाजाला होईल,' असं त्यांचं नेहमीचं म्हणणं.**

हे पुस्तक लिहिण्याच्या चार-पाच वर्षे आधी म्हणजे २०१३ साली डॉ. नरेंद्र दाभोलकरांची हत्या झाली आणि मी अपघातानेच परिसरातील विवेकमंचाच्या उपक्रमात खेचला गेलो होतो. ज्ञानाचं जणू महाद्वारच माझ्यासाठी खुलं झालं होतं.

### ज्ञानसंपन्न अल्मेडा सर

फ्रान्सिस अल्मेडा हे तसे माझे शाळेतील विज्ञान शिक्षक.

पण त्यांची खरी जवळून ओळख विवेकमंचामुळे झाली. ज्ञानी माणसाच्या ज्या ज्या व्याख्या असतील, जे जे निकष असतील, त्याच्या सगळ्यात जवळ पोहोचणारं व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे अल्मेडा सर. आपण काही वाचलं, ऐकलं की त्याविषयी मोकळेपणे बोलायची एक सहज प्रेरणा आपल्यात असते. पण आपल्या आजूबाजूला विविध विषयांचा व्यासंग असलेल्या व्यक्ती असतीलच असं नाही. ती उणीव अल्मेडा सरांनी भरून काढली. त्यांना कधीही फोन करा, त्यांच्या घरी जा. It's never a dull moment! एकदा संवादाला सुरुवात झाली की मग एक मैफलच रंगते. त्यातून ज्ञानाचे, अनुभवाचे, विवेकाचे तुषार अंगावर घेत आपण चिंब होत राहायचं. धर्म, राजकारण, समाजकारण, विज्ञान, साहित्य असा कोणताही विषय त्यांना परका नसे.

'संपूर्ण समाज शंभर टक्के विवेकवादी होईल न होईल, पण पंचवीस टक्के लोकांत जरी विवेक जागृत झाला तरी त्याचा मोठा फायदा समाजाला होईल,' असं त्यांचं नेहमीचं म्हणणं. दैनंदिन जीवनात एआयचा वापर करणारे, ७७ वर्षे वयातही नवनवीन तंत्रज्ञानाविषयी अद्ययावत असणाऱ्या अल्मेडा सरांना पाहून आयटी इंजिनिअर म्हणून मलाच ओशाळल्यागत होतं. विज्ञान, मग ते वैद्यकीय असो वा मूलभूत, त्यातील घडामोडींकडेही त्यांचं बारीक लक्ष असतं.

एकदा मी माझ्या मुलाला सोबत घेऊन त्यांच्या घरी गेलो होतो. अनौपचारिक गप्पांना सुरुवात झाली. मुलाने अचानक त्यात सहभागी होत त्याच्या मनातील एक वेगळाच प्रश्न विचारला, 'सर, प्रकाशाला वेग आहे हे आपल्याला कसं कळलं? आणि तो वेग मानवाने मोजलाच कसा?' मुलांचे प्रश्न म्हणजे अनपेक्षित असतात आणि तेही अनपेक्षित वेळी! पण सर पुढची ३० मिनिटं गुरू ग्रह, त्याचा उपग्रह आयो आणि त्यावरील चंद्रग्रहण यांचा संदर्भ देऊन इतकं सुंदर विवेचन करत राहिले की मी त्यांच्या ज्ञानग्रहणाचा आवाका पाहून थक्क झालो. त्यांचा तो संवाद ऐकून मलाही माझ्या चाळिशीत खगोलशास्त्राविषयी कुतूहल निर्माण झालं. काही पुस्तकं आणून मी वाचायला सुरुवात केली.

त्यांचं बोलणं केवळ पुस्तकी शहाणपणापुरतं मर्यादित नसतं. त्यांच्या आयुष्यातील कठीण प्रसंगांमध्येही त्यांच्यातील संयमितपणा मी जवळून अनुभवलाय. परिस्थिती कशीही असो, भावनांवर नियंत्रण ठेवून विवेकाच्या हातात स्टियरिंग दिलं की गाडी योग्य मार्गाने जाते. हे ते अक्षरशः जगून दाखवतायत. त्यांनी बऱ्याच सामाजिक-राजकीय कामांतही सक्रिय योगदान दिलेलं आहे. त्यामुळे त्यांच्या अनुभवकथनात एक वेगळीच खोली असते आणि ती त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्यांवर एक विलक्षण सकारात्मक परिणाम साधते. वसईसारख्या छोट्या गावात का होईना, पण सातत्याने झालेलं रचनात्मक कार्य प्रभाव सोडून जातंच. हा अनुभव आम्ही विवेकमंचात त्यांच्यासमवेत काम करताना घेतला आहे. पूर्णतः नास्तिक असल्याने कर्मकांडे, धर्मकेंद्री सामाजिक कार्यक्रम यांपासून अलिप्त असणं हे आलंच. त्यामुळे वाचलेला वेळ त्यांनी जीवनातील प्रत्येक क्षेत्रातील ज्ञानसंपादनासाठी करून घेतलाय. आजही आम्ही दर रविवारी भेटतो, तेव्हा नवनवीन विषयांवर त्यांची नवी मतं ऐकायला मिळतात. 'किती घेऊ आणि किती नको' अशीच अवस्था होते.


तर अशी ही ज्ञानवंतांच्या गोतावळ्यातील काही ठळक उदाहरणं. शब्दसंख्येच्या मर्यादेत बसणारी. आपल्या अवतीभोवती असणाऱ्या कितीतरी जिज्ञासू व्यक्ती नवीन प्रश्न मांडून किंवा नवीन उत्तरं शोधण्यासाठी नवीन दृष्टिकोण देऊन समस्त मानवजातीचं आयुष्य समृद्ध करत असतात. या प्रक्रियेत कदाचित कालचं ज्ञान उद्याचं छद्मविज्ञान ठरेल किंवा आजची कल्पना उद्याचं वास्तव. ज्ञानसाधनेची ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या सगळ्यात एक गोष्ट मात्र कायम स्थिर असणार आहे आणि ती म्हणजे अज्ञान मान्य करण्याची नम्रता आणि सतत शिकत राहण्याची तयारी !

❋ ❋ ❋

**लेखक आयटी क्षेत्रात कार्यरत असून त्यांची 'मंच' (साधना प्रकाशन), 'मेरी लास्कर' (मनोविकास प्रकाशन) आदी वाचकप्रिय पुस्तके आहेत.**

**संपर्क** : danifm2001@gmail.com

# पैस विस्तारणारी त्रयी




संजय आर्वीकर



विलास सारंग



कमल देसाई



प्रा. महेश एलकुंचवार

**जिज्ञासेच्या आसेतून मन ज्ञानाकडे झेपावते. ज्ञानग्रहणाचा मार्ग खडतर खरा, परंतु तीव्र ज्ञानलालसेतून कळत नकळत ज्ञानवंतांचा सहवास घडतो. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर ज्ञानवंत भेटल्याच्या घटना घडत गेल्या की, नव्या दिशा उजळतात, नव्या क्षितिजरेषा खुणावू लागतात. आपली दृष्टी आणि जग विस्तारत जाते. जगण्याचा अर्थ–अन्वयार्थ उलगडतो. आयुष्याला समृद्धी देणाऱ्या ज्ञानवंतांमध्ये सृजनसख्य असेल, कला आणि साहित्यविचार एकमेकांना पूरक असतील, तर सहवासाचा आनंद द्विगुणीत होतो...**

**प्र**संग १ : १९८०,

स्थळ : ४, दंडिगे ले-आऊट, शंकरनगर, नागपूर.

१९८०च्या आसपास नाटककार, ललित लेखक प्रा. महेश एलकुंचवार यांच्याशी माझी ओळख झाली. एकदा त्यांच्या घरी गेलो. आत हॉलमध्ये गेल्यावर घराच्या भिंतींवर अनोखी चित्रं, एका भिंतीवर, बैठ्या डायनिंग टेबलच्या मागच्या भिंतीवर गच्च भरलेली पुस्तकं, अवतीभवती, आतल्या खोल्यांमधल्या रॅकवर, टिपॉयवर, जागा असेल तिथे पुस्तकंच पुस्तकं, पण अस्ताव्यस्त पसरलेली नाहीत, नीटनेटकी ठेवलेली. आपल्याला वाचण्याचं आमंत्रण देणारी. पुढे आमची ओळख वाढत गेली. मी त्यांच्याकडे 'मौज', 'सत्यकथा', 'युगवाणी' वगैरे अंक वाचायला मागायचो. एक दिवस ते मला म्हणाले, ''हे सगळे अंक तू घेऊन जा. तुझ्याकडे ठेव. तू, तुझे मित्र वाचा आणि नंतर मला परत करा.'' मग ते अंक थोड्या काळासाठी माझ्या घरी आले. पुढे काही वर्षांनंतर १९९२ साली मी औरंगाबादला बदलून गेल्यानंतर या सर्व अंकांशिवाय 'इनॅक्ट', 'थिएटर आर्ट्स' या नियतकालिकांसह अनेक पुस्तके माझ्या घरी नेहमीकरता वसतीला आली. माझ्या घरात आधीच असलेल्या पुस्तकांशी, हे नवे पाहुणे गप्पा मारताहेत, एकमेकांशेजारी बसलेत की गळ्यात पडताहेत, असंही मनात येऊन गेलं.

माझ्या मनातलं मोठेपणाचं स्वप्न मी एलकुंचवारांच्या रूपात किशोरावस्थेत बघितलेलं असल्यानेच आपला वैयक्तिक मोठा पुस्तकसंग्रह असण्याची भावना माझ्यात खोलवर रुजली असावी. पुढे बी.ए.ला असताना साहित्याबरोबरच मानसशास्त्र, तत्त्वज्ञान या विषयांची गोडी लागली. कथा-कवितांबरोबर मला इतरांच्या लेखनाबद्दल काय वाटलं, हेही लिहिलं. काही जण त्याला समीक्षा म्हणाले. समीक्षा म्हटल्यावर जबाबदारी वाढल्यासारखं वाटलं. मग समीक्षेच्या पुस्तकांव्यतिरिक्त संस्कृती-अभ्यास, दैवतशास्त्र, सौंदर्यशास्त्र, संप्रेषणशास्त्र, चित्रपटकला, संगीत, चित्रकला आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासासाठी निगडित पुस्तकं घेण्याकडे कल झुकू लागला. यात जोहान हुईझुंगाचं 'होमो लुडन्स', जे. ए. हॅडफिल्डचं 'ड्रीम्स अँड नाइटमेअर्स', आंद्रे तारकोव्हस्कीचं 'स्कल्प्टिंग इन टाइम', जॉन आयझोडचं 'मिथ, माइंड अँड स्क्रिन', मार्शिया एलिआदचं 'मिथ्स, ड्रिम्स अँड मिस्ट्रिज', जे. जी. फ्रेझरचं 'गोल्डन बो', लेव्ही स्त्रोसचं 'मिथ अँड मिनिंग', जोसेफ कॅम्बेलचं 'प्रिमिटिव्ह मायथॉलॉजी', 'क्रिएटिव्ह मायथॉलॉजी', लॉरेन्सचं कुपेचं 'मिथ', युंगचं 'मॉडर्न मॅन इन सर्च ऑफ अ सोल', 'मॅन अँड हिज सिम्बॉल्स', पॉल लेव्हिटचं 'ए स्ट्रक्चरल ॲप्रोच टू द ॲनॅलिसिस ऑफ ड्रामा', रूडाल्फ अर्नहाइमचं 'फिल्म ॲज आर्ट', आयझेनस्टाइनचं 'फिल्म सेन्स', ॲफलन केनेडीचं 'प्रोटियन सेल्फ', नोम चॉम्स्कीचं 'ऑन लँग्वेज', तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचं 'डेव्हलपमेंट ऑफ इंडियन कल्चर - वेदाज् टु गांधी' अशी बरीच पुस्तकं जमली.

यातल्या तारकोव्हस्कीचं नाव एलकुंचवार सरांच्या बोलण्यात बऱ्याचदा येत असे. नागपुरात 'सिने मोंटाज' या फिल्म क्लबने तारकोव्हस्कीच्या चित्रपटांचा महोत्सव केला होता. मी आवर्जून हा महोत्सव बघितला होता. १९८७ साली अचानक 'द जर्नल ऑफ आर्ट अँड आयडियाज'चा जानेवारी-जुलै १९८७ चा अंक मिळाला. यात तारकोव्हस्कीची प्रदीर्घ मुलाखत होती. या मुलाखतीने माझ्यावर खोलवर संस्कार केला. माझा चित्रपटकलेकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला. पुढे ही मुलाखत मी मराठीत अनुवादित केली. आता तारकोव्हस्की हा माझा आयुष्यभर पुरेल, असा आंतरिक जीवनाचा भाग झाला. 'स्कल्प्टिंग इन टाइम' हे त्याचं एक प्रकारचं बौद्धिक आत्मचरित्र म्हणावं असं पुस्तक चित्रपटमाध्यमाचा मूलभूत विचार मांडतानाच सर्जनाचे पेच चितारतं-उलगडतं, त्याबद्दल मर्मदृष्टी देतं. पुढे १९९९ साली मी एलकुंचवार सरांची दुसरी प्रदीर्घ मुलाखत घेतली. त्यात त्यांच्या नाटकांमधील काव्यात्म कथेच्या अनुषंगाने मी त्यांना प्रश्न विचारला :

संजय : तारकोव्हस्की स्वतःला पडद्यावरचा कवी समजायचा. तसं तुम्हाला 'मराठी रंगभूमीवरचा कवी' म्हटलं तर चालेल का?

एलकुंचवार : फारच आवडेल. जरूर सुरुवात करा. कोण कोण म्हणणार आहेत तुझ्याबरोबर आणखीन? जितेन मर्चंट (नाट्यसमीक्षक, नट, ध्वनी आरेखनकार) म्हणतात असं मला कळलं. पण जितेन मर्चंटना मराठी कळत नाही, एवढं लक्षात ठेव.

हा छोटासा संवाद वाचल्यावर तो गमतीचा वाटू शकतो, पण तो तसा नव्हता. पुढे रंगभूमी आणि चित्रपटांचे भारतातील अग्रगण्य समीक्षक आशिष राजाध्यक्ष आणि समिक बंडोपाध्याय यांनी घेतलेल्या एलकुंचवारांच्या मुलाखती आणि

मी घेतलेल्या एलकुंचवारांच्या दोन मुलाखतींचे एकत्रीकरण करून 'बातचीत महेश एलकुंचवारांशी' या नावाने पुस्तक प्रकाशित झालं. यातील हा अंश पाहा :

एलकुंचवार : तारकोव्हस्कीच्या चित्रपटात प्रतिमांचं जे काव्य दिसतं, ते मला नाटकात निर्माण करता येईल की नाही शंकाच आहे. मला ते जमलं तर खूप आनंद होईल. पुढे कधी जमलं भविष्यकाळात तसं, तर मी नक्की म्हणेन हो, तारकोव्हस्कीचा संस्कार आहे माझ्यावर. हा सगळाच प्रवास आधीच्या अतिशब्दप्रधान नाटकांपासून ते तारकोव्हस्कीयन थिएटर निर्माण करण्याची आकांक्षा असलेला. (हा संवाद नोव्हेंबर २००२ मध्ये झालेला आहे.)

यात तारकोव्हस्कीबद्दलच नाही तर स्वतःच्या आजवरच्या प्रवासाबद्दल आणि भविष्यातील संभाव्य प्रवासाबद्दलही एलकुंचवार सूचित करतात. तारकोव्हस्कीविषयी माझं समजून घेणं अजून सुरूच आहे. त्याचे चित्रपट, मुलाखती, त्यांची दैनंदिनी, त्याच्या चित्रपट संहिता, त्याच्यावरचं चरित्रात्मक पुस्तक, त्याच्या चित्रपटांवर भाष्य करणारी पुस्तकं यांची मोहिनी अजून उतरलेली नाही. पुढे 'काळावर मानवी अस्तित्व कोरणाऱ्या प्रज्ञावंताचं आत्मकथन' असा प्रदीर्घ लेख मी लिहिला; जो माझ्या 'आत्मप्रकाश' या नव्या पुस्तकात समाविष्ट केला आहे. हे पुस्तक एलकुंचवार सरांनाच अर्पण केलं आहे. 'कलासर्जनात दडलेल्या आत्मप्रकाशाची ओळख करून देणाऱ्या महेश एलकुंचवार नावाच्या गुरुकुलास!' या अर्पणपत्रिकेसह... तारकोव्हस्कीसह जागतिक पातळीवरच्या विविध क्षेत्रांतील कलावंतांविषयी, त्यांच्याकडून ऐकलेलं काही मनात रुजलं आणि पुढे या कलावंतांसोबतचा माझा स्वतंत्र प्रवास सुरू झाला.

तारकोव्हस्की तर परदेशी - रशियाचा - होता. पण अगदी सुरुवातीच्या काळात आपल्या भाषेतील खरे मोठे लेखक/कलावंतही आपल्याला नीटसे माहीत नसतात आणि तेही आपल्याला नंतर कळतं. एकदा सरांकडे गेलो असताना त्यांनी सहज विचारलं, ''तू कमल देसाईंचं काही वाचलं आहेस का?'' माझा चेहरा पाहून त्यांना माझं उत्तर कळलं. म्हणाले, ''वाच. वाच. विशेषतः 'काळा सूर्य...' शिखर आहे शिखर!''

याच काळात दुर्गा भागवतांच्या 'पैस' या पुस्तकाचा सरांच्या बोलण्यात अनेकदा उल्लेख होत असे. आपल्या सांस्कृतिक अवकाशातील दुर्गाबाईंची थोरवी सर समजावून सांगत.

माझ्याशी झालेल्या दुसऱ्या प्रदीर्घ संवादाच्या वेळी ते मला सांगतात : आपल्याकडचं दुर्गाबाईंचं उदाहरण नेहमी मला आठवतं. परंपरेचं आणि ज्ञानाचं, भारतीय ज्ञानपरंपरेचं सगळं बळ त्यांच्याकडे आहेच. त्याच वेळेला नावीन्य आणि प्रायोगिकता यासाठी लागणारं जे अत्यंत खुलं, संवेदनशील आणि सतर्क मन पाहिजे, तेही त्यांच्याजवळ आहे. त्यामुळे दुर्गाबाई या परंपरेचं सगळं बळ पचवून अत्यंत आधुनिक असलेल्या लेखिका आहेत.

'पैसचा खांब'मध्ये दुर्गाबाईंनी ज्ञानेश्वरांच्या सहनसिद्धी या शब्दाबद्दल विवेचन केलंय. या शब्दाच्या अनेक पैलूंविषयी सर सांगत असत.

पुढे २०१८ मध्ये 'एलकुंचवारांचे ललित लेखन : त्रिमितीतून अपाराकडे' हा तोपर्यंतच्या त्यांच्या ललित लेखांचा वेध घेणारा लेख मी लिहिला. दुर्गा भागवत आणि महेश एलकुंचवार यांच्या ललित लेखनाचा तुलनात्मक अभ्यास मला त्या निमित्ताने करता आला. दुर्गा भागवत आणि महेश एलकुंचवार यांच्या ललित लेखनामध्ये त्यातलं नातं स्पष्ट करणारी अनेक साधर्म्यस्थळे आहेत. मृत्यूविषयक चिंतन, मृत्यू-जीवनाचा एकत्रित विचार करून समतोल साधणे; कालभान, विश्वरचनेच्या संदर्भात काल व अवकाशाचा विचार, संस्कृतीविषयक चिंतन, जाणीव-नेणिवेचा खेळ, मानवी जीवनातील व्रत-संकल्पना, पार्थिव-अपार्थिवाची सांगड, शिल्पकला-चित्रकलेच्या अनुषंगाने संस्कृती-वेध, स्वप्न आणि मनोव्यवहार, पौर्वात्य-पाश्चात्त्य संस्कृतीचा एकत्रित विचार, आत्मप्रत्ययाचे महत्त्व, बुद्धकथा आणि बुद्धतत्त्वज्ञानाचे पुनरावृत्त होणारे संदर्भ, लोकसंस्कृतीच्या संदर्भात नद्यांचे पुनरावृत्त होणारे संदर्भ ही दुर्गा भागवत आणि एलकुंचवार यांच्या लेखनातील ठळक साधर्म्यस्थळं आहेत.

**१९८७ साली अचानक 'द जर्नल ऑफ आर्ट अँड आयडियाज'चा जानेवारी-जुलै १९८७चा अंक मिळाला. यात तारकोव्हस्कीची प्रदीर्घ मुलाखत होती. या मुलाखतीने माझ्यावर खोलवर संस्कार केला. माझा चित्रपटकलेकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला...**

याशिवाय करुणेची वैश्विक जाणीव, माणसाचे आस्तिक-नास्तिकपण, नारीचे स्थलकालातीत लावण्य, ‘मी आणि विश्व’ यातील संबंधांची विश्लेषक जाणीव, निसर्गाची नानाविध रूपं, भारतीय मिश्र संस्कृती या अनुषंगाने हा तुलनात्मक विचार आणखी पुढे नेता येईल.

एकूण विश्वसंस्कृतीच्या अवकाशात भारतीय संस्कृतीचा वेध हे दोघांच्याही लेखनातील समान सूत्र असून दुर्गाबाईंचा शोध प्रामुख्याने धर्म, लोकजीवन आणि लोकसंस्कृतीच्या अंगाने जातो, तर एलकुंचवार कलाविष्कार, कलासंस्कृती आणि सर्जनप्रेरणाच्या साहाय्याने ही वाट प्रशस्त करतात.

कमलताईंचं आणि दुर्गाबाईंचंही अत्यंत हृद्य नातं होतं. ‘एक सदेह फँटसी : कमल देसाई’ हा विलक्षण लेख दुर्गाबाईंनी लिहिला आहे.

पुढे मी एलकुंचवार सरांच्या ललित लेखांच्या दोन पुस्तकांचे ‘ब्लर्ब’ लिहिले. ते लिहिताना मी जणू शिखरावर होतो.

***

प्रसंग २ : २००७,

स्थळ : ‘त्रिवेणी’, उद्योग विनायक अपार्टमेंट्स, खिंवसरा पार्क, औरंगाबाद.

ज्येष्ठ मराठी कथा-कादंबरीकार कमल देसाई माझ्याकडे प्रदीर्घ संवादासाठी आल्या होत्या. त्या वेळी झालेला हा संवाद पाहा.

संजय : कमलताई, मागच्या वेळी तुम्ही आणखी एक गोष्ट मला सांगितली होती. कुठल्याही माध्यमाशी खेळणं कलावंताला आवडत असतं. माध्यमाचं आणि कलावंताचं जे नातं असतं, ते सजीवत्वाचं असतं. आणि तुम्ही विशिष्ट शब्द वापरून ते सूचित केलं होतं. ‘दोन सजीवांमधला ‘शक्तिनिविष्ट’ संवाद असतो तो,’ असं तुम्ही म्हणाला होता. हे थोडं अधिक उलगडून दाखवलंत तर मला अधिक आवडेल.

कमल देसाई : हा ‘शक्तिनिविष्ट’ जो शब्द आहे, तो द. ग. गोडसे यांचा. तसंच ‘रससिद्धान्त’मध्ये तो आहे. भरताने ती अंतर्मुख असलेली शक्ती आहे, असंसुद्धा मानलं. म्हणजे नाटक सुरू झाल्यावर ते उमलत जातं. नाटक सुरू होण्याआधी पडदा उघडतो तेव्हा ती शक्ती अशी उमलू पाहण्यास उत्सुक अशा अवस्थेत आत असते. नाटक, नट आणि समोरचा श्रोतृवृंद हा नुसता ऐकत नाही, तर तो त्याच्यात भाग घेत असतो. त्यांचा संवाद सुरू झाला की मग ते खरं उलगडायला लागतं आणि मग ते खरं उत्फुल्ल होतं. अशा प्रकारचा तो जो खेळ असतो, तो उभयपक्षी असतो. तो लेखक-नाटककार, नट-दिग्दर्शक आणि श्रोतृवृंद या सगळ्यांच्या मधला, मिळून झालेला संघटित संवाद असतो आणि संघटित संवादात तुम्हाला कितीतरी गोष्टी मिळून जातात. त्या किती मिळाल्या, हे आपल्याला खूप उशिरा कळतं.

संजय : आणि कुठल्यातरी अनुभवातून पुन्हा ते आठवतं, ‘कनेक्ट’ होतं आणि दुसरं काहीतरी बघत असताना ते क्षण जागे होतात.

कमल देसाई : म्हणजे शक्तिनिविष्ट संवादामध्ये माध्यमं जिवंत असतात, असं मी का म्हणते? जेव्हा एखादा सूर येतो तेव्हा तो अत्यंत सजीव आणि शक्तिनिविष्ट असतो.

माध्यमं जिवंत असतात, असं बर्नाड बोझंकिट पण सांगतो. पण भरत त्याबद्दल जास्त बोलतो. मला भरताचं म्हणणं जास्त वैशिष्ट्यपूर्ण वाटतं. कारण माध्यमामुळे तिथे असलेली शक्ती जी सुप्त असते, ती प्रकट होते, असं त्याने म्हटलं आहे.

या आमच्या संवादाच्या मागे पार्श्वभूमीसारखी घटना घडली होती. कमलताई औरंगाबादला आल्या असताना त्यांचे पूर्वी विद्यार्थी असलेले डॉ. प्रकाश देशपांडे-केजकर यांच्याकडे एक-दोन दिवस राहण्यासाठी गेलेल्या असताना त्यांनी माझा एक लेख वाचला.

त्यात मी लिहिलं होतं : पाश्चिमात्यांच्या संवादसिद्धांचे मूळ जसं ॲरिस्टॉटलच्या ‘ऱ्हेटॉरिक’मध्ये आहे तसाच भारतीय संवादसिद्धा हा भरताच्या नाट्यशास्त्रावर आधारित आहे. भरताच्या नाट्यशास्त्रातही रंगभूमीद्वारे होणारे दुतर्फा संवाद आणि हा संवाद घडवून आणण्यासाठी आवश्यक घटकांमध्ये साधावयाची एकात्मता याचा विचार अभिप्रेत होता, असं कपिला वात्सायन यांनी दाखवून दिलं आहे. आपल्या ‘ट्रॅडिशनल इंडियन थिएटर’ या पुस्तकात त्या म्हणतात, ‘‘He (Bharat) conceived of theatrical spectacle as a total amalgam of media, gestures, mime, décor, costumes and finally inner state of being. He recognizes two levels of performance in concert of naturalistic (Lok, Real) and stylized convention (Natya) of the state.’’

हा लेख त्यांनी वाचला आणि मला लगेच फोन केला. म्हणाल्या, ‘‘संजू, मी तुझा लेख वाचला. त्याविषयी तुझ्याशी

मी घरी आले की बोलते, पण तुला भरताचं नाट्यशास्त्रही शिकवते.'' आणि खरोखरच घरी आल्यावर त्यांनी मला भरताचं नाट्यशास्त्र जवळ बसवून समजावून सांगितलं. त्यापूर्वी मी गोदावरी केतकरांचं भरताच्या नाट्यशास्त्रावरचं पुस्तक आणि अन्य काही इंग्रजीतून वाचलं होतं. पण कमलताईंचं शिकवणं म्हणजे फुलाची एकेक पाकळी मोकळी करून पुन्हा उमलतं फुल साकार करून दाखवणं!

वाचणाऱ्या माणसांचं पुस्तकांशी विलक्षण नातं असतं. पुस्तकांना माणसांसारखं वागवणाऱ्या कमलताईंनी आपला वेचक ग्रंथसंग्रह माझ्या स्वाधीन केला तेव्हा मला खूप सारी पारितोषिकं एकदम मिळाल्यासारखं वाटलं होतं. आता त्या गेल्यावर मी त्या पुस्तकांना स्पर्श करतो, तेव्हा पुस्तकांना झालेला त्यांचा स्पर्श मला आशीर्वाद देतोय, असं वाटत राहतं. ज्येष्ठ विचारवंत वसंत पळशीकर यांचं 'सत्याग्रही सॉक्रेटिसचं वीरमरण' हे पुस्तक त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात 'कमलताईंना स्नेहपूर्वक भेट -वसंत पळशीकर/१९-१०-९६' असं लिहून दिलं होतं. सॉक्रेटिस मला पूर्वीच अनेक पुस्तकांमधून भेटला होता, पण यात महात्मा गांधींशी पळशीकरांनी त्याचं जे साधर्म्य दाखवलं होतं, त्यातून गांधींबद्दलच्या माझ्याकडे असणाऱ्या अनेक पुस्तकांशी त्याची नाळ जुळली. त्यातून आणखी एक गोष्ट झाली. गांधींबद्दलचे चित्रपट, ध्वनिपुस्तिका या साऱ्यांशी या पुस्तकाचं एक नवं नातं जुळलं. ही सारी माध्यमं एकमेकांशी हातात हात घालून माझ्याशी बोलू लागली; आपल्या मैत्रीबद्दल सांगू लागली. जगातलं काहीही निर्जीव नाही. पुस्तकं तर आपल्याशी माणसांसारखं बोलत असतात, अशी त्यांची धारणा होती. एकदा आम्ही मुलाखतीचं काम करत असताना आकाशवाणीतली नोकरी आणि आमचं काम यात माझं पुस्तकांकडे दुर्लक्ष होत आहे, हे पाहून त्या मला रागावल्या अन् म्हणाल्या, ''काय रे सारखं काम काम! ती पुस्तकं बिचारी हिरमुसून गेलेयत. घे ना त्यांना जवळ.'' मी खरोखरच पुस्तकांजवळ गेलो आणि खूप वेळ त्यांना हळुवारपणे गोंजारत राहिलो. कमलताईंचं देणं, असं सजीवत्वाचा विस्तार करून साऱ्या विश्वाला कवेत घेणारं होतं.

***

प्रसंग ३ : २००५,

स्थळ : व्हाईसरॉय पार्क, १५, सी, टॉवर बी, कांदिवली, मुंबई.

कथा-कादंबरीकार, कवी, नाटककार, समीक्षक, अनुवादक विलास सारंग यांच्या प्रदीर्घ मुलाखतीसाठी सारंगांच्या घरी आलो होतो. सारंगांच्या घरी राहणं, त्यांची भेट होणं हे कॉलेजमध्ये असताना एखाद्या फँटसीसारखं वाटायचं, पण त्यांच्या घरी मुलाखतीसाठी मुक्कामाला गेलो तेव्हा ही फँटसी वास्तवाच्या पातळीवरही सार्थ ठरू शकते, असा अनुभव त्यांनी दिला. मुंबईत 'ठाकूर व्हिलेज'मध्ये राहणाऱ्या या कलावंताला मी भेटलो तेव्हा अनुभवला 'ग्लोबल व्हिलेज'मध्ये राहणारा एक वैश्विक नागरिक, ज्याच्या अंतर्मनात गजबजलं होतं एकलेपण. त्यांच्या व्यासंगी मिश्किलीने मी अनेकदा खळखळून हसलो होतो. त्यांच्या चेहऱ्यावर मात्र होतं, केवळ एक मंदसं स्मित.

सारंग एकमेकांना जोडलेल्या दोन फ्लॅट्समध्ये राहत होते. त्यांची अभ्यासिका, शयनकक्ष आणि त्यालाच जोडून पाहुण्यांसाठीची खोली आणि जोडलेल्या दुसऱ्या फ्लॅटमध्ये त्यांचे कुटुंबीय. सकाळी ८:३०ला त्यांच्या घरीच ब्रेकफास्ट आटोपून मी अभ्यासिकेमध्ये संवादसत्र सुरू करण्यासाठी प्रवेश करी तेव्हा सारंग सर्व दृष्टींनी तयार असत. 'स्ट्रोक'ने त्यांच्या वाणीवर विपरीत परिणाम झाला असला तरी त्यांची बुद्धी आणि सर्जनशीलता अजूनही तल्लख, नित्यनूतनशील होती.

सारंगांनी गांधींविषयी 'गांधीजींचं माकड' आणि 'महात्म्याचा मुलगा' अशी दोन नाटकं लिहिली आहेत. यांपैकी 'महात्म्याचा मुलगा' हे पुस्तकरूपाने अजून प्रकाशित व्हायचं आहे. मी गांधींविषयी बरंच वाचलं असलं, तरी सारंगांची ही नाटकं, 'पसरलेला हात : एक फिनॉमिनॉलॉजिकल निरीक्षण' हा लेख आणि या संदर्भात त्यांच्याशी झालेला संवाद यामुळे माझं गांधींविषयीचं आकलन अधिक विस्तारलं.

या संदर्भात आमच्यात झालेल्या संवादाचे हे काही अंश पाहा.

संजय : तुमचं 'गांधीजींचं माकड' हे नाटक गुदगुल्या करता करता एकदम गळा पकडतं आणि गांधीजींच्या माकडाला वेड लागलं आहे, असा त्याच्यावर आरोप करणं, हा त्यातला भाग कुठेतरी आत, खोलवर फार हलवून टाकणारा आहे. कदाचित परिस्थिती इतकी परकोटीची आहे की गांधीजींचं

जाऊ दे पण – त्यांच्या माकडाला – जे चांगुलपणाचं प्रतीक आहे, त्यांना खरोखरच वेड लागायची पाळी आली आहे किंवा जीवनमूल्य सांभाळत असल्यामुळे त्याला आजचं जग वेडा ठरवत आहे.


सारंग : आणि तिथे मी एक सिंपल ट्रिक केली आहे. गांधीजींची माकडं तीन आहेत. त्यातली मी दोन गाळली. तर मग काय होणार? तर ती तीनही कार्यं एकाच माकडाला करावी लागणार आणि हीच परिस्थिती बहुतेक माणसांची असते. म्हणजे तुमची आमची. अस्तित्ववादी लेखनाचा माझा अभ्यास तिथे कामी आला.

संजय : 'महात्म्याचा मुलगा' या नाटकात हरिलाल आणि शंकर, विष्णू, नारद यांच्यात तसंच नाटकाच्या शेवटी विष्णू, हरिलाल आणि बापू यांच्यात संवाद घडवून आणला आहे. स्वप्न, फँटसी आणि सार्वकालिक वाटणारी पुराणातली पात्रं कलाकृतीमध्ये वापरल्याने काळाच्या चौकटीतून सुटका होण्याचा मार्ग प्रशस्त होतो का?

सारंग : पण हे सगळं एकाच काळात घडतं आणि शास्त्रीयदृष्ट्या मला ते योग्यच वाटतं. हे महत्त्वाचं होतंच, पण इतर आणखीही काही दृष्टिकोण मला नाटकात विणून घेणं महत्त्वाचं वाटलं. पुन्हा ईश्वरी दृष्टी आणि मानवी दृष्टी यांचा प्रश्नात्मक संयोग घडून येतो. स्वप्नं, फँटसी वगैरेही मनोविश्वाचाच भाग आहे आणि हे चालूच असतं. ते काही भूतकाळात होतं असं नसतं. आजच्या वैज्ञानिक दृष्टीने वर्तमानकाळ, भूतकाळ आणि भविष्यकाळ हे एकच समजता येतात. त्यासाठी स्टीफन हॉकिंगचं 'ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाइम' एवढं वाचलं तरी पुरतं.

आमच्या संवादाच्या दरम्यान मी सारंगांना प्रश्न विचारला, ''गांधीजींविषयी हे नाटक लिहिण्यासाठी तुम्ही आणखी कोणत्या संदर्भ ग्रंथाचा अभ्यास केला?'' सारंगांनी मिथ्सबद्दल वेंडी डॉनिगर ओ फ्लाहेर्टी यांच्या 'द ओपरिजिन्स ऑफ एव्हिल इन हिंदू मायथॉलॉजी' या पुस्तकाचा आणि गांधींविषयी एरिक एरिकसनचं 'गांधीज् ट्रूथ : ऑन द ओरिजिन्स ऑफ मिलिटंट नॉन–व्हायलन्स' या पुस्तकाचा आवर्जून उल्लेख केला.

सारंगांचा 'पसरलेला हात' हा लेख एखाद्या दुथडी भरून वाहणाऱ्या नदीसारखा आहे. संश्लेषण–विश्लेषण, संस्कृतिभाष्य, जागतिक वाङ्मयीन परंपरांचा धांडोळा अशा अनेक वाटांनी जात हा लेख एका व्यक्तीच्या (कवी गुरूनाथ









धुरी) आठवणीपाशी संपतो आणि तरीही त्याचं आशयपात्र विशाल होतं. खरंतर अपार भविष्याकडे झेपावणारं! गांधी आणि सार्त्र यांच्या सूचक तुलनेतून सारंग पाश्चिमात्य आणि भारतीय परंपरा एक प्रकारच्या मिनिमॅलिझमधून उभी करतात. सार्त्रचा कृतीवरचा भर आणि गांधींचा सत्याग्रह आणि अहिंसा यातील गुप्त आत्मिक कृती याच्या तुलनेतून पसरलेल्या हाताभोवती प्रकाश उजळतो.

मी सारंगांना विचारतो : या लेखाचा आरंभबिंदू गवसला कसा? गांधींचा तिसरा व्यूह यातून कसा उमलत येतो? गांधींचं प्रज्ञावंतपण यातून कसं प्रस्थापित होतं?

सारंग सांगतात : भिकाऱ्याच्या पसरलेल्या हातातून मला हे सुचलं. भिकाऱ्याचा हात नजरेसमोर उभा राहिला, तदनंतर इतर हातांच्या आकृत्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या या सर्वांचा शोध घेण्यातून हा लेख उभा राहिला. गांधींचा 'तिसरा व्यूह' त्यांच्या ओरिजिनॅलिटीतून येतो. त्याचं मूळ बुद्धाच्या विचारप्रणालीत असलं तरी आजकालच्या जगाचा विचार करून गांधींनी त्याचं अधिक सर्जनशील उपयोजन केलं. गांधींच्या विचारप्रणालीमध्ये पौर्वात्य–पाश्चिमात्य या दोन्ही परंपरांचा काही भाग दिसतो. कदाचित दक्षिण आफ्रिकेतलं त्यांचं वास्तव्य, त्या काळात घडत गेलेलं त्यांचं व्यक्तिमत्त्व यामुळे असेल.

पुढे २०१८ साली महात्मा गांधींच्या दीडशेव्या जन्म दिनानिमित्ताने 'मी उमलते गांधी : मिथक आणि चित्रपट–माध्यम' असा एक दीर्घ लेख लिहिला किंवा 'युगवाणी'च्या २०२४ मधील नाटक विशेषांकात 'मराठी नाटकांतील गांधीदर्शन' हा लेख लिहिला. यामागे या लेखाचा आधार होता, संस्कार होता.

सारंगांची सर्व नाटकं, एकांकिका यांचं एकत्रित पुस्तक येणार होतं, त्यासाठी मी ब्लर्ब लिहावा, असं त्यांनी

सांगितलं. तेव्हा त्यांच्या हस्ते मला भलंथोरलं पारितोषिक मिळालंय, असं चित्र डोळ्यांसमोर तरळून गेलं. अर्थात पुढे तो प्रकल्प काही कारणांमुळे होऊ शकला नाही, पण माझे प्रकाशक मित्र अरुण जाखडे यांनी 'गांधींजींचं माकड' आणि 'पपई पिकल्या का?' ही त्यांची नाटकं प्रकाशित केली, पण त्यावरही सारंगांनी स्वतःचा मोबाइल नंबर देऊन पुढे लिहिलं होतं – ते न जमल्यास पुढील व्यक्तीशी संपर्क करावा :

श्री. संजय आर्वीकर, औरंगाबाद.

आम्ही प्रदीर्घ संवादाला सुरुवात केली त्यापूर्वी 'स्ट्रोक'ने सारंगांची अर्धी बाजू विकल झाली होती. त्यांच्या वाणीवरही परिणाम झालेला होता आणि तरीही ते सातत्याने काम करत होते.

आमच्या दुसऱ्या संवादसत्राच्या वेळी सारंगांच्या सहा-सात पुस्तकाचं काम सुरू होतं. त्याचा संदर्भ देऊन ''पण या सगळ्या लेखनासाठी कुठून येते ऊर्जा?'' असा प्रश्न मी विचारला. त्याला उत्तर देताना सारंगांनी अभ्यासासाठी आणखी एक नवं दालन उघडून दिलं. ते म्हणाले, ''हा सगळा इतका जटील आणि मोठा विषय आहे. शोपेनहॉवर आणि नित्शे कमालीचे निराशावादी आणि शून्यवादी होते. पण त्यांनी केवढं लेखन केलं. तेव्हा जीवन आणि लेखन यांत एक अनाकलनीय विरोधात्मता आढळते...तसंच माझ्याही बाबतीत झालं असावं...'स्ट्रोक'मुळे मेंदूत काही घडामोडी होतात. त्यातल्या काही सरळ सरळ अपंग बनविणाऱ्या असतात. पण प्रत्यक्ष मेंदूत काय घडलं ते कोणी सांगावं? न्यूरॉन्सचा अनोखा समन्वय होऊ शकेल. अर्थात लेखकापुरता जीवनाचा अर्थ लेखनातूनच निश्चित होतो, हे माझं पहिलं प्रमेय आहे.''

महेश एलकुंचवार, कमल देसाई, विलास सारंग यांच्या लेखनांतून मिळालेली मर्मदृष्टी आणि प्रत्यक्ष भेटीत त्यांच्याशी झालेल्या संवादातून, कृतीतून, त्यांनी दिलेल्या अनमोल पुस्तकांच्या भेटीतून ज्ञानाच्या विश्वांगणात विश्वासाने वावरण्याचं धैर्य मला दिलं. या तिघांनीही मला नकळतपणे एक धडा दिला होता : 'नाव कितीही मोठं असलं तरीही कुणाचीही गुणवत्ता गृहीत धरू नको. स्वतःच्या अभ्यासाच्या कसोटीवर पण व्यापक अवकाशात, त्या त्या कलाविष्काराची गुणवत्ता, आवाहकता जोखून घे.'

आता माझ्या डोळ्यांसमोर तारकोव्हस्कीच्या 'द सॅक्रिफाइस' या चित्रपटातील शेवटचं – लहान मुलगा झाडाला पाणी घालत असल्याचं – दृश्य येतं. मी त्याचं नेपथ्य बदलून घेतो. एक लहान मुलगा आपल्या शर्टाच्या बाहीच्या कडेने कपाळावरचा घाम पुसतोय. मोठ्या कष्टाने बादली उचलतोय. झाडाला पाणी घालतोय. तहानलेली पृथ्वी गटागटा पाणी पिते. मुलगा रिकामी बादली उचलून जिथे पूर्वी त्याचं घर उभं होतं, (जे आता नष्ट झालं आहे) त्या ठिकाणी जातो. त्याला माहीत नाही, ते झाड पुन्हा बहरून येण्यासाठी किती वेळा त्याला झाडाला पाणी घालावं लागेल. पण न चुकता रोज तो झाडाला ते झाड बहरेपर्यंत पाणी घालणार आहे. कारण त्याच्या वडिलांनी त्याला तसं सांगितलेलं आहे. त्या बादलीतील पाणी श्रद्धेचं, ज्ञानाचं, कारुण्याचं, निसर्गाशी संवादी नात्याचं आहे. हा मुलगा माझा सहोदर आहे.

ते बादलीतील मंतरलेलं पाणी मला माझा पैस विस्तारणाऱ्या या त्रयीने दिलेलं आहे.

**संदर्भसूची**

१. शोध एलकुंचवारांच्या नाट्यकृतींचा, संजय आर्वीकर, पद्मगंधा प्रकाशन.

२. बातचीत महेश एलकुंचवारांशी, आशिष राजाध्यक्ष, समिक बंडोपाध्याय, संजय आर्वीकर, राजहंस प्रकाशन.

३. पद्मगंधा दिवाळी अंक, २०११, संपादक : अरुण जाखडे

४. Kapila Vatsayan,Traditional Indian Theatre, Kapila Vatsayan, National Book Trust.

५. 'सोलेदाद'शी प्रदीर्घ संवाद, संजय आर्वीकर, वर्णमुद्रा प्रकाशन.

६. सर्जनशोध आणि लिहिता लेखक, विलास सारंग, मौज प्रकाशन.

❋ ❋ ❋

**संजय आर्वीकर, भ्रमणध्वनी :** **८२७५८२००४४,**
**ईमेल :** arvikarsanjay@gmail.com

# साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक




पृष्ठे : 584 (हार्डबाऊंड),
किंमत : 700 रुपये,
सवलतीत 500 रुपये
(टपाल खर्च 100 रुपये वेगळा)

## प्रवाहासाठी
## प्रवाहाविरुद्ध
### विनोद शिरसाठ

साधनातील शंभर संपादकीय लेख

२०१३ ते २०२३ या दहा वर्षांत मी साधना साप्ताहिकात चारशे संपादकीय लेख लिहिले, त्यातील सर्वोत्तम शंभर लेख या पुस्तकात घेतले आहेत. त्यामुळे, कोणते विषय आलेले नाहीत किंवा कोणत्या विषयावर आणखी लिहायला हवे होते, अशा प्रकारच्या अपेक्षा या पुस्तकातील लेख वाचून व्यक्त करणे योग्य ठरणार नाही. उर्वरित तीनशे लेखांमध्ये बरेच वेगवेगळे विषय येऊन गेलेले आहेत. या पुस्तकात निवडलेले लेख असे आहेत, जे परिपूर्णतेच्या जवळ जाणारे आहेत, जे आज-उद्याच्या वाचकांना वाचायला आवडतील आणि मुख्य म्हणजे त्या दशकात साधनाची राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक बाबतीत काय भूमिका होती हे दाखवू शकतील.

अनुभव व अभ्यास यातून आपला असा एक दृष्टीकोन तयार होत असतो. मग दृष्टीकोनच आपल्या अनुभवांचे अर्थ लावतो आणि कोणता अभ्यास करायचा वा करायचा नाही हे ठरवतो. साहजिकच, एका मर्यादेनंतर अभ्यासापेक्षा दृष्टीकोन महत्त्वाचा ठरतो आणि अंतिमतः दृष्टीकोनच आपल्या भूमिका ठरवत असतो. 'सम्यक सकारात्मक' हा माझा दृष्टीकोन आहे, त्यातून आकाराला आलेल्या भूमिकेला 'प्रवाहासाठी प्रवाहाविरुद्ध' असे म्हणता येईल. अर्थातच, एका प्रवाहासाठी दुसऱ्या प्रवाहाविरुद्ध आणि एका प्रवाहासाठी त्याच प्रवाहाविरुद्धही! इथे मला विरोधासाठी विरोध अपेक्षित नाही, रचनात्मक वाटचाल अभिप्रेत आहे...

या पुस्तकातील 100 संपादकीय लेख लिहिणाऱ्याचे मानस कळण्यासाठी उपयुक्त ठरतील असे पाच लेख परिशिष्ट म्हणून घेतले आहेत.


1. **मला प्रभावित करून गेलेला सिनेमा**
2. **मला प्रभावित करून गेलेले पुस्तक**
3. **दृष्टीकोन आकाराला येईपर्यंतचे वाचन**
4. **नास्तिक परिषदेत केलेले भाषण**
5. **वैचारिक नियतकालिकाचे संपादन करताना**

संपर्क **साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ३०
Ph. 020 24459635 /Mob.7499714591
sadhana.prakashan@gmail.com

शेजारील QR कोड स्कॅन करून रक्कम ट्रान्सफर करून, साधना प्रकाशनाची पुस्तके मागवता येतील.
sadhanaprakashan.in या वेबसाईटला भेट द्या.


also available at amazon.in
इ-बुक स्वरूपात kindle वर उपलब्ध

# माझे मौल्यवान ग्रंथवंत



टेकट्टे जगत

शब्दांकन: विकास नाईक



सुकेन मेहता




डी. शिवानंदन



हेमंत विसनजी



केकी घरडा



प्रतीक पै

**आधी स्ट्रँड आणि आता किताबखाना. माझ्या चार दशकांच्या ग्रंथविक्रीच्या कारकीर्दीत सर्वसामान्य ग्रंथप्रेमींपासून विविध क्षेत्रांतल्या वलयांकित व्यक्तींच्या मी संपर्कात येत राहिलो. प्रत्येकाची ग्रंथ वाचनाची आवडनिवड निराळी, प्रत्येकाचे व्यक्तिमत्व निराळे. यात असेही ज्ञानवंत भेटले, ज्यांनी माझ्या कारकीर्दीला आणि एकूणच आयुष्याला दिशा दिली. मला नवी दृष्टी दिली. अनेकांसाठी ग्रंथांच्या विश्वात रमणे हे स्वप्न असते, मी ते स्वप्न प्रत्यक्ष जगत आलो...**

मी १९८५ साली बी. कॉम. झाल्यानंतर मुंबईत आलो. शानबागसाहेब हे आमच्या परिचयाचे असल्याने मला त्यांनी त्यांच्या स्ट्रँड बुक स्टॉलमध्ये यायला सांगितले. बँकेची परीक्षा देऊन भावाप्रमाणेच नोकरी मिळवायची हेच माझं स्वप्न. तोपर्यंत काहीबाही काम करू असं ठरवून मी स्ट्रँडमध्ये जाऊ लागलो. रोज सकाळी दहा वाजता मी स्ट्रँडमध्ये पोहचत असे. हळूहळू मी स्ट्रँडमध्ये रुळू लागलो. याच काळात मला स्ट्रँड आणि शानबागसाहेबांची नवीन ओळख होत गेली. मुंबईतल्या विशिष्ट वाचत्या-लिहित्या वर्गामध्ये स्ट्रँडची भव्य प्रतिमा होती. त्या वर्गाचा दबदबा मुंबईतल्या अभिजन वर्गामध्ये होता. शासन, प्रशासन असो की कार्पोरेट वर्ल्ड शानबाग साहेबांचं आणि स्ट्रँडचं एक वेगळं वलय असल्याचं मला जाणवत होतं. स्ट्रँडमध्ये काम करत असल्यामुळे हे लोक मला नावाने ओळखत होते. सहज भेटत होते, बोलत होते. माझ्यावर त्यांच्या वागण्याचा-बोलण्याचा नकळतपणे संस्कार होत होता. त्यांच्या बरोबर बोलताना नवीन विषय, पुस्तकांची ओळख होत होती.

मला आठवते, दर दिवशी शानबाग साहेब आमच्याशी औनपचारिक गप्पा मारायचे. कधी स्ट्रँडमध्ये आलेल्या एखाद्या ग्रंथप्रेमी ग्राहकाबद्दल बोलायचे तर कधी एखाद्या नवीन पुस्तकाबाबतीत बोलायचे. त्यामुळे नवीन पुस्तकांची ओळख व्हायची. मध्येच आम्हाला एखादं पुस्तकंही वाचायला सांगायचे. शानबाग साहेब म्हणायचे की तुम्ही सर्व पदवीधर आहात, सहज एखाद्या बँकेत किंवा चांगल्या कंपनीत नोकरी मिळवू शकता, परंतु तिथे तुम्ही गर्दीतले एक व्हाल तुमची स्वतःची ओळख नसेल. आज तुम्हाला स्वतःची ओळख आहे. तुम्हाला प्रसिद्ध पत्रकार, संपादक, लेखक, मोठे अधिकारी ओळखतात. ही ओळख तुम्हाला इतर ठिकाणी मिळणार नाही.

माझ्या बाबतीत सांगायचे, तर शानबाग साहेब सांगत होते, ते मला स्वतःलाही प्रकर्षाने जाणवत होतं. पूर्वी माझं वाचन वर्तमानपत्रापुरतंच मर्यादित होतं. मात्र, स्ट्रँडमध्ये रुजल्यानंतर माझं वाचन व्यवस्थापन शास्त्र ते अभिजात साहित्य ते इतिहास असं चौफेर झालं. स्ट्रँड आणि शानबागसाहेब या दोहोंमध्ये मी गुंतत गेलो आणि एक दिवस अचानक स्ट्रँड बंद होत असल्याचं कळलं... खरे सांगतो, त्या बातमीने छातीत धस्स झालं. आपल्यातलं काहीतरी हरवतंय, हरवणार आहे, हे जाणवलं.

पण, योग असा त्याच काळात सोमय्या समूहाने 'किताबखाना'साठी विचारणा केली. आज पंधरा वर्षे झाली आहेत, किताबखानामध्ये अनेक नवीन नवीन ग्रंथप्रेमी ग्राहक जोडले गेले आहेत. तर गेल्या चाळीस वर्षात स्ट्रँड आणि किताबखाना अशा दोन्ही ठिकाणचा अनुभव जमेस धरता, टाइम्स समूहाचे नानपोरिया, शाम लाल, गिरीलाल जैन, खुशवंत सिंग, गोविंद तळवलकर, डॉ. अरुण टिकेकर, कुमार केतकर, अनिल धारकर ते नवीन पिढीतील जेरी पिंटो, रणजीत होस्कोटे, नरेश फर्नांडिस सारख्या नामवंत लेखक-पत्रकार विचारवंतांचा सहवास मला लाभला. त्यांच्याकडील ज्ञानाने मी स्वतः समृद्ध होत गेलो. त्यांच्या ग्रंथविषयक आवडीनिवडी मी जाणल्या. त्यातूनच यातल्या बहुतेक सगळ्यांशी माझे छान मैत्र जुळले. या सगळ्यांचा साधेपणा आणि आपलेपणा मला भावला.

अलीकडे किताबखानामध्ये बालदोस्तांपासून ते ज्येष्ठांपर्यंत आणि भारतीय अभ्यासकांपासून परदेशी पर्यटक अभ्यासक तसेच विविध देशांच्या वकिलातींपर्यंतच्या सगळ्यांना सामावून घेणारे उपक्रम राबवले जात आहेत. किताबखाना हे केवळ विक्री केंद्र न ठरता, ते परस्परसंवाद आणि सौहार्द जपणारे ग्रंथप्रेमींचे हक्काचे ठिकाण बनावे, हा उद्देश या मागे आहे. बहुदा याचमुळे सर्वकाळ ग्रंथप्रेमींचा किताबखानामध्ये राबता असतो. त्यात सर्वसामान्य वाचक तर असतातच, पण माजी धडाकेबाज क्रिकेटपटू आणि विद्यमान तृणमूल काँग्रेसचे खासदार युसुफ पठाणसारख्या वलयांकित व्यक्तीदेखील असतात. युसुफ पठाण पत्नी आणि मुलांबरोबर येतात. काही कादंबऱ्या, मुलांसाठी पुस्तके अशी ग्रंथखरेदी ते करतात. मुंबई मुक्कामी असले की, ऑस्ट्रेलियन अष्टपैलू क्रिकेटपटू शेन वॉटसनदेखील अनेकदा किताबखानामध्ये ग्रंथखरेदीसाठी आले आहेत. बुद्धिवंत अशी छाप पाडलेले कुमार संगकारा हे श्रीलंकन क्रिकेटपटू सोबत त्यांचे सहकारी असे अनेकदा आमच्याकडे येऊन ग्रंथांच्या जगात रमल्याचे मी पाहिले आहे. आयपीएलचा सीजन सुरु असतो, तेव्हा विविध संघांसोबतच्या चीअरलिडर्स किताबखानात पुस्तके चाळताना, विकत घेताना पाहायला मिळतात. असे असंख्य ग्रंथप्रेमी येतात, आपली छाप सोडून जातात. कोणी एकाचवेळी भरभरून पुस्तके खरेदी करून घेऊन जातात. डॉ. पटवर्धनांसारखा एखादा सहृदयी


वाचक एकाच पुस्तकांच्या दोन-दोन, तीन-तीन प्रती घेतात. कारण, लेखक, प्रकाशक तगला पाहिले, ही उदात्त भावना त्यांच्या मनात असते. असे जेव्हा ते करतात, तेव्हा त्यांनी मला काही तरी शिकवलेले असते. ज्ञान दिलेले असते. गेली चार दशके ज्ञानोपासकांच्या सहवासाने मी अक्षरशः समाधान पावलो आहे. कारकीर्दीच्या या टप्प्यावर काही लोकविलक्षण ग्रंथप्रेमी ज्ञानोपासक मला सतत आठवत राहतात. त्यातले एक आहेत, सुकेन मेहता.

**ग्रंथपारखी सुकेन मेहता**

सुकेन मेहता हे भारतातील एक प्रथितयश हिरे व्यापारी. कोट्यवधींची उलाढाल. मुंबईतील अंधेरी येथे कार्यालय आणि कारखाना. वाळकेश्वर येथे वास्तव्यास असलेले सुकेन मेहता दर आठवड्याला न चुकता स्ट्रँड बुक स्टॉलमध्ये येत असत. स्ट्रँड बंद झाल्यानंतर किताबखाना येथे येऊ लागले. लक्ष्मी पायाशी लोळण घेत असली तरीही मेहता मात्र सरस्वतीचे उपासक आहेत. शानबाग साहेब असताना स्ट्रँडमध्ये आले की शानबाग साहेबांना भेटायचे, नवीन पुस्तकांबद्दल चर्चा करायचे. सतत वाचत असलेल्या या दोन दादा माणसांची चर्चा ऐकणे आमच्यासारख्या नवख्यांसाठी एक पर्वणीच ठरे. कधी वाचलेल्या पुस्तकांचा अभिप्राय दिल्यानंतर माझ्याकडे मोर्चा वळायचा. मग मी त्यांच्या आवडीच्या विषयाची पुस्तकं काढून द्यायची हा सिलसिला गेली सुमारे पस्तीस वर्षे सुरु होता. कोईम्बतूर येथे जन्मलेल्या मेहता साहेबांना इतिहास, साहित्य या विषयात जास्त रस होता. सगळी पुस्तकं चाळून, मलपृष्ठावर असलेला ब्लर्ब वाचून कधीतरी आमच्याकडून पुस्तकाची माहिती घेऊन ते पुस्तकं निवडायचे आणि तासाभराने निरोप घ्यायचे. स्वतः टेक्नोसॅव्ही असलेले मेहता साहेब पुस्तकाबद्दलचा अभिप्राय लिहून काढायचे, याचा उपयोग आम्हाला इतर वाचकांना पुस्तक सुचविताना व्हायचा.

**हेमंत विसनजीः दिलदार ग्रंथोपासक**

महाराष्ट्रातील एका उद्योजक घराण्याशी संबंधित असलेले हेमंत विसनजी, त्यांच्या आजोबांनी १९६० साली स्थापन केलेल्या 'मुंबईतील सुप्रसिद्ध 'विसनजी अकॅडेमी' या शैक्षणिक संस्थेची धुरा सांभाळत होते. अत्यंत शिस्तबद्ध आणि चोखंदळ वाचक अशी त्यांची स्ट्रँड बुक स्टॉलमधल्या आम्हा सहकाऱ्यांमध्ये ओळख होती. विसनजी सर आले की आम्ही सर्व खूश असायचो. गंमत म्हणजे, अगदी कमीतकमी वेळेत चटकन खरेदी करून सर निघून जायचे. कारण विसनजी सरांकडे पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव आणि प्रकाशक असे व्यवस्थित लिहिलेली यादी असायची, त्यामुळे आम्हाला पुस्तक काढताना कधीच त्रास आणि वेळेचा खोळंबा व्हायचा नाही. बऱ्याच वेळेस तर आमच्यासारख्या अनेक वर्षे या व्यवसायात असलेल्याना देखील पुस्तकाची नावं माहीत नसायची. काही वेळेस तर ते पुस्तक भारतात विक्री करता आलेले देखील नसायचे. त्यामुळे विसानजी सर आमच्यासाठी एनसायक्लोपीडियाच होते. विसनजी सरांना अनेक विषयामध्ये उत्सुकता होती. त्यांची आवड देखील अनेक विषयामध्ये होती. सरांना संशोधनपर साहित्य, कथात्म साहित्य, व्यवस्थापन शास्त्र अगदी मार्शल आर्ट मधील टॉइकोन्दो या खेळामध्ये सुद्धा रुची होती. विसनजी सर आम्हाला नेहमी 'न्यू यॉर्कर' आणि 'रिच' या मासिकांची ओळख करून द्यायचे. त्याचा मला वैयक्तिक आयुष्यात खूप उपयोग झाला. विसनजी सरांना वाचनाची आवड कशी लागली, हे जरी त्यांच्या बोलण्यात आले नसली तरी त्यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी कायम नवीन पुस्तके खरेदी करत असत. वाचनातून मुलांवर संस्कार होतात आणि पुस्तकं हेच खरे मित्र आणि मार्गदर्शक आहेत असे मानणारे विसनजीसर २०१९ साली त्यांच्या पुस्तकरुपी मित्रांना सोडून निघून गेले.



प्रशस्त किताबखाना: विकास नाईक आणि टेकट्टे जगत

**केकी घरडाः जिंदादील ग्रंथप्रेमी**

घरडा केमिकल्सचे अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध समाजोपकारी केकी होरमुसजी घरडा म्हणजे एक जिंदादील व्यक्तिमत्व. अर्थात मी त्यांना आमच्या स्ट्रँड बुक स्टॉल किंवा किताब खानामध्ये प्रत्यक्ष पाहण्याचा योग फारसा आला नाही, तरी त्यांच्या वांद्रे येथील घरडा केमिकल्सच्या कार्यालयात आणि घरी जाण्याचा योग अनेक वेळा आला होता. आमचं त्यांच्याशी नातं तीन दशकाहून अधिक काळाचं होतं. हजारो कुटुंबांचा हा पोशिंदा असूनही गर्वाचा लवलेश नव्हता. चेहऱ्यावर कायम स्मित आणि मृदू बोलणे. पुस्तकाची यादी त्यांची सचिव किंवा कार्यालयीन कर्मचारी घेऊन यायचा. डॉ. घरडा यांना विज्ञान, रसायन शास्त्र या विषयांवर प्रचंड रस होता. अनेक वेळा त्यांचा फोन यायचा आणि सांगायचे, जगत यु नो बेटर, विच बुक्स आय वॉंट टु हॅव. घरडा सरांच्या घरी पुस्तकंच पुस्तकं... अगदी घरांना भिंती आहेत की नाही, असा प्रश्न पडावा... घराचा हॉल, लॉबीच्या जमिनीवर सुद्धा पुस्तकं नीटसपणे मांडलेली असायची. त्यांच्याकडे पाठविलेली पुस्तकं त्यांनी कधीच परत केली नाहीत. दरवर्षी लाखो रुपयांची पुस्तके खरेदी करणाऱ्या घरडांनी पुस्तकप्रेमींना पुस्तके भेट देण्यास खूप आवडायचे. असा सर्वसुखसंपन्न पण ग्रंथांच्या दुनियेत रमणारा ज्ञानोपासक विरळा.

**साहित्यदक्ष डी. शिवानंदन**

अत्यंत हाय प्रोफाइल पोलीस अधिकारी शिवानंदन स्ट्रँडमध्ये अनेक वेळा यायचे. मुंबई गुन्हे विभागात उपायुक्त असल्यापासून ते स्ट्रँडमध्ये येत असत मुंबईसारख्या सर्वच दृष्टीने अतिमहत्त्वाच्या मानल्या गेलेल्या शहराचे आयुक्त असतानाच्या काळातही ते किताबखानामध्ये अनेक वेळा आले आहेत. शिवानंदन हे स्वतः चोखंदळ वाचक तर आहेतच, पण अलीकडे त्यांनी द ब्रह्मास्त्र अनलिश्ड हे पुस्तक लिहून लेखकांच्या मांदियाळीत स्थान मिळवले आहे. योग असा त्यांच्या या पुस्तकावर स्वाक्षरी करण्यासाठी ते आनंदाने किताबखानामध्ये आले आणि हसतमुखाने वाचकांशी त्यांनी संवादही साधला. एकदा पुस्तकं चाळत असताना मी विचारलं, सर तुम्ही कसं काय पुस्तकं घ्यायला नि वाचायला वेळ काढता? सर म्हणाले, जगत, व्हेरी सिम्पल, वाचनाची आवड असेल तर हे सर्व सोप्पं आहे. ते पुढं म्हणाले जगत बुक्स आर माय फ्रेंड्स... दे मेक मी स्ट्रेस फ्री.

शिवानंदनसरांना इतिहास, व्यवस्थापन आणि आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयांवरील पुस्तकामध्ये अधिक रस आहे. महत्त्वाचं म्हणजे, सरांबरोबर बोलताना अनेक नवीन पुस्तकांची ओळख होते, आणि त्याचा उपयोग मला इतर ग्राहकांशी संवाद साधताना होतो. मला आठवतं आहे, शिवानंदनसरांनी ठाणे येथे आयुक्त असताना पोलीस आणि त्यांच्या मुलांसाठी एक वाचनालय सुरु केले होते, त्यासाठी स्ट्रँडमधून पुस्तकं विकत घेतली होती. पोलीस आणि त्यांच्या मुलांसाठी असेच एक वाचनालय त्यांनी मुंबईमध्ये दादर येथे सुरु केले होते. त्यासाठीसुद्धा त्यांनी स्ट्रँडमधूनच पुस्तकं विकत घेतली होती. असा पोलीस अधिकारी विरळा आणि त्याची वाचनाची, ग्रंथखरेदीची आवडही विरळा.

**प्रतीक पैः नव्या पिढीचा नवा शिलेदार**

हल्लीचे तरुण किंवा नवीन पिढी पुस्तके वाचत नाहीत. या पिढीला पुस्तकांव्यतिरिक्त अनेक नवीन पर्याय उपलब्ध असल्याने वाचन कमी झालं आहे. याला सन्मानीय अपवाद आहेत मुंबईतील प्रसिद्ध 'स्टेटस' रेस्टॉरंटचे मालक प्रतीक पै. पै हे नव्या पिढीचे वाचक, आमच्या किताबखानाचे महत्त्वाचे ज्ञानोपासक ग्राहक. मी स्ट्रँडमध्ये असल्यापासून जोडलेले. ते औरंगाबाद इथल्या हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटचे विद्यार्थी. ते शिकत असलेली संस्था आपल्या ग्रंथालयासाठी काही पुस्तके लंडनहून तर काही स्ट्रँडमधून मागवित असे. प्रतीक यांचे पुस्तकांशी नाते जुळले ते असे. ते स्ट्रँडमध्ये येऊ लागले. मी आणि माझे सहकारी संजीव यांच्याशी त्यांची छान ओळख झाली. रेव्हेन्यू मॅनेजमेंट हे रॉबर्ट क्रॉस यांचे आणि बाची करकारिया यांचे डेअर टु ड्रिमः द लाइफ एम. एस. ओबेरॉय ही त्यांची त्यावेळची स्ट्रँडमधली

**डॉ. पटवर्धनांसारखा एखादा सहृदयी वाचक एकाच पुस्तकांच्या दोन-दोन, तीन-तीन प्रती घेतो. कारण, लेखक, प्रकाशक तगला पाहिले, ही उदात्त भावना त्यांच्या मनात असते. असे जेव्हा ते करतात, तेव्हा त्यांनी मला काही तरी शिकवले असते. ज्ञान दिलेले असते...**

पहिली ग्रंथ खरेदी ठरली. त्यानंतर ते आधी स्ट्रँड आणि आता किताबखाना असे सातत्याने ग्रंथखरेदी येत राहिले. रेस्टॉरंटसारख्या प्रचंड वेळ आणि कष्ट लागणाऱ्या व्यवसायात असूनदेखील ते कायम पुस्तकाच्या दुनियेत असतात, खरं तर स्टेटस सारख्या ग्राहकांचा विश्वास संपादन केलेल्या रेस्टॉरंटचे व्यवस्थापन करताना प्रतीक पै यांना दिवस कमी पडतो. परंतु, दिवसभराचा शीण घालवण्याचा सर्वात उत्तम उपाय म्हणजे पुस्तक वाचणे असे पै सांगतात, तेव्हा मला त्यांचे खूप कौतुक वाटते. प्रतीक पै आजच्या पिढी प्रमाणे वाणिज्य, अर्थकारण आणि व्यवस्थापन  या विषयांच्या पुस्तकात अधिक रमतात. प्रतीक यांचा मित्र परिवारही ग्रंथांच्या दुनियेत रमणारा आहे. त्या पैकी एक आहेत, सुधीर सरनौबत. किंबहुना, सुधीर यांनी प्रतीक यांच्या वाचनाला व्यासंगाची जोड देण्यास खूप मदत केली आहे. सुधीर यांनी देवदत्त पटनायक यांचे जया हे पुस्तक प्रतीक यांना भेट दिले आणि त्यानंतर हा सिलसिला असाच सुरु राहिला. याचाच परिणाम म्हणून आता त्यांनी आपले वाचन विज्ञान, आंतरराष्ट्रीय राजकारण, इतिहास या विषयाच्या अनुषंगाने वाढवले आहे. पै यांनी होम स्कूलिंग करणाऱ्या आपल्या मुलांवर देखील जाणीवपूर्वक पुस्तक वाचनाचा संस्कार केला आहे. प्रतीक यांच्यासारखा ग्रंथप्रेमी ग्राहक लाभणे ही मोठीच समाधानाची गोष्ट आहे.


❋ ❋ ❋

**टेकट्टे जगत हे 'किताबखाना'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. संपर्क:** jagat@somaiya.com,

**तर मूळ निवेदनाचे शब्दांकन करणारे विकास नाईक हे सामाजिक–राजकीय विषयांचे अभ्यासक आणि समतावादी मुक्त संवाद पत्रिका मासिकाचे व्यवस्थापन सल्लागार आहेत. संपर्क:** vikas.naik@gmail.com



# गोफ दुहेरी विणलासे



प्रल्हाद जाधव



अरुण खोपकर

श्रीनिवास विनायक कुलकर्णी



**साहित्य आणि कलेच्या क्षेत्रातला प्रतिभावंत हा केवळ त्या मर्यादित वतुर्ळापुरता उरत नाही. तो असतो साहित्यिक नि कलावंत, पण त्याच्यातल्या ज्ञानवंताने समाज, विज्ञान, तत्त्वज्ञान, तंत्रज्ञान, मानसशास्त्र, निसर्ग–पर्यावरण अशी अनेक क्षेत्रेही कवेत घेतलेली असतात. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या सृजनात उमटलेले असते, जेव्हा अशा ज्ञानवंतांच्या प्रत्यक्ष सहवासाची लालसा पूर्णत्वास जाते, तेव्हा आत्मसमृद्धीच्या जाणिवेने मन सुखावून गेलेले असते. इतरांना ज्ञानाचे सुख मिळवून देणाऱ्या अरुण खोपकर आणि श्रीनिवास विनायक कुलकर्णी या दोन प्रज्ञावंतांच्या सहवासातून कोरल्या गेलेल्या अविस्मरणीय क्षणांचे हे शब्दचित्र...**

## एक : अरूण खोपकर

अरुण खोपकर यांचा मी चाहता. बऱ्याच वर्षांपूर्वी मुंबईत एका राष्ट्रीय चित्रपट महोत्सवात उद्घाटन प्रसंगी त्यांचे भाषण ऐकून मी त्यांच्या प्रेमात पडलो होतो. (नंतर ते भाषण मी त्यांच्याकडून मिळवले.) गेल्या पंचवीस-तीस वर्षांत दोन-चार कार्यक्रमांत त्यांची ओझरती भेट झालेली. त्यांची काही पुस्तके आणि स्फुट लेखन वाचलेले. सिनेमे-माहितीपट पाहिलेले. एकदा मंत्रालयात त्यांना माहिती खात्यातील अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित केले होते. कधी एखादा फोन, कधी एखादा 'हाय हॅलो'चा संदेश... चर्नी रोड येथील शासकीय मुद्रणालयातून एक जुना दुर्मीळ ग्रंथ मी त्यांना मिळवून दिला होता. संबंध काय तो एवढाच!

एकदा त्यांच्या घरी जाऊन भेटावे असे बरेच दिवस मनात होते. कोरोनानंतर त्या विचाराने उचल खाल्ली. त्या कारणाने मी अधूनमधून त्यांना विचारायचो. ते काही ना काही कामात असायचे. लेखन असायचे, दौरे असायचे. माझा पाठपुरावाही सुरू असायचा.

एकदा ते म्हणाले, 'आपण सप्टेंबरनंतर भेटू.' त्यानंतर लगेच एक-दोन दिवसांत त्यांचा फोन आला. त्यांचे टाइम-टेबल थोडे मागेपुढे झाले होते. ते म्हणाले, 'सप्टेंबरऐवजी आपण ऑगस्टमध्ये भेटू. येत्या शुक्रवारी किंवा शनिवारी!' मी खूश झालो आणि लगेच त्यांना हो म्हणून शनिवारची वेळ नक्की केली. साडेचारची वेळ ठरली. ६ ऑगस्ट २०२२ हा तो दिवस!

या भेटीसाठी पत्नीला (रेखा) सोबत घेऊन जावे असे डोक्यात आले. पण तिची बँक पाच वाजता सुटते. त्यामुळे वेळेचे गणित कसे सोडवावे, हा प्रश्न होता. सुदैवाने तो खोपकरांनीच सोडवला. ते म्हणाले, 'हरकत नाही. पाच वाजेपर्यंत आरामशीर आलात तरी चालेल.' मग मी रेखाला तशी कल्पना दिली. तिला म्हटले, 'तू सर्व काम आटपून तयारीत राहा. मी तुझ्या बँकेबाहेर टॅक्सी करून उभा राहतो.'

दरम्यान खोपकरांनी एकदा फोन करून आम्हाला खायला काय काय आवडते याची माहिती घेतली. 'ऑम्लेट चालेल का? केकमध्ये अंडे चालेल का? तुमचा 'श्रावण' आहे का? गव्हाची किंवा अन्य एखाद्या पदार्थाची ॲलर्जी आहे का?' अशा त्यांच्या अनपेक्षित प्रश्नांनी मी चकित झालो. त्यांना म्हटले, 'अहो मला फक्त अर्धा कप चहा मिळाला तरी मी खूश असतो.' त्यावर ते म्हणाले, 'तो तुमचा विषय नाही. फक्त मी विचारतो, त्या प्रश्नांची उत्तरे द्या!' ती विचारपूस झाल्यावर त्यांनी घराचा पत्ता पाठवला आणि कुठून कसे यायचे, तेही समजावून सांगितले.

ठरल्याप्रमाणे आम्ही साडेचारला माहीमला टॅक्सीत बसून परळला गांधी हॉस्पिटलसमोर पोहोचलो. 'कल्पतरू हॅबिटॅट'मध्ये जायचे होते. खोपकरांनी गेटवर सिक्युरिटीला तसेच त्यांच्या इमारतीखाली वॉचमनकडे आमची नावे देऊन ठेवली होती. त्यामुळे आम्ही कोणतीही अडचण न येता २१व्या मजल्यावर त्यांच्या घरी पोहोचलो. त्यांचे मदतनीस संजय पाश्टे यांनी दरवाजा उघडला आणि आम्हाला हॉलमधून थेट खोपकरांच्या अभ्यासिकेत नेले. तेथे ते कम्प्युटरसमोर बसून नेहमीच्या एकाग्रतेने काही काम करत बसले होते. गीताताई काही कामानिमित्त दक्षिण मुंबईत गेलेल्या होत्या.

औपचारिक 'हाय हॅलो' झाले. मी त्यांना रेखाची ओळख करून दिली. अगदी खरे सांगायचे तर पाच मिनिटांची भेट होईल असे डोक्यात होते, पण ती दोन तासांवर गेली. आमच्या गप्पा सुरू झाल्या. 'गप्पा' म्हणजे आम्ही काहीतरी बडबडण्यापेक्षा त्यांचे ऐकून घेणे हेच शहाणपणाचे होते. (हे अर्थात आमचे मत!)

मी साहित्याचा विद्यार्थी. थोडे लेखन-वाचन केलेले. काही माणसे जोडलेली. काही ठिकाणी फिरलेला आणि जीवनाविषयी थोडेबहुत कुतूहल असलेला माणूस! रेखा नेमस्त बँक कर्मचारी आणि गृहिणी. एवढ्याशा भांडवलावर आम्ही त्यांच्याशी दोन तास काय बोलणार होतो?

खेडोपाडी वाचनालये बंद होत आहेत; वाचक कमी होत आहेत असे मी बोलून गेलो. पण त्यांचा अनुभव उलटा होता. वाचनालये चांगली चालत आहेत; लोक खूप वाचत आहेत; प्रकाशन व्यवसायही नीट सुरू आहे, असा त्यांच्या बोलण्याचा सूर होता. मी रायगड जिल्ह्यातील पोलादपूरचा. तसा उल्लेख बोलण्यात आला. पोलादपूरशी त्यांचेही नाते आहे, हे ऐकून मला आश्चर्य वाटले; अभिमानही वाटला.

नवीन तंत्रज्ञानाविषयी थोडे बोलणे झाले. 'त्यातले मला फार काही कळत नाही' असे मी बोलून गेलो. ते म्हणाले, 'जुन्या पिढीतील माणसांनी टेक्नॉलॉजीशी फारकत घेतली आहे, याचे वाईट वाटते. नव्या तंत्रज्ञानाशी सगळ्यांनी कनेक्टेड असायला

पाहिजे.' नव्या पिढीविषयी मात्र ते खूपच आशावादी दिसले. मुले खूप हुशार आहेत आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून पुढे जात आहेत, याबाबत त्यांनी खुशी व्यक्त केली.

आजच्या एकूणच राक्षसी बाजारव्यवस्थेबाबत आणि त्यामुळे समाजात निर्माण झालेल्या गोंधळाबाबत मी काहीतरी बोलून गेलो. पण त्याच्याशी ते पूर्णपणे असहमत होते. हे असे अनादी काळापासून चालत आले आहे. त्यामुळे आपण हतबल होऊन जाणे योग्य नाही; असा त्यांच्या बोलण्याचा सूर होता.

आमच्या कॉमन आवडीचा विषय म्हणजे अरुण कोलटकर. त्यांच्याविषयी आणि 'कालकल्लोळ'मधील त्यांच्या प्रदीर्घ लेखाविषयी बोललो. मी त्यांच्या जुन्या-नव्या लेखनाचे कौतुक करत होतो, पण त्यांच्याविषयी मी काही स्तुतीपर बोलायला लागलो, की ते लगेच विषय बदलायचे.

काही वेळाने त्यांच्या अभ्यासिकेतून आम्ही हॉलमध्ये आलो. बाजूला भलेमोठे डायनिंग टेबल होते. आम्हाला त्यांनी तेथे अगदी आग्रहाने आणि प्रेमाने बसवले. मग एकेक खाद्यपदार्थ टेबलावर येऊ लागला. चटपटीत 'व्हेज कॅनोपी'ने सुरुवात झाली. तो पदार्थ प्रारंभी खायचा अशी पद्धत! मग छोटे समोसे, चीज सॅन्डविच, वेफर्स, तीन-चार प्रकारची मिठाई आणि शेवटी आइस्क्रीम! एकामागून एक पदार्थ येत होते. अगदी रेलचेल!

खोपकर आग्रह करत होते आणि आम्ही 'नको नको' म्हणत खात होतो. यात एक बारकावा होता तो असा की, तेही आमच्याबरोबर मस्तपैकी एन्जॉय करत खात होते. (त्यामुळे आमचाही धीर चेपला.) यजमान आणि पाहुण्यांनी एकाच पातळीवर येऊन भोजनाचा आनंद घेण्याचे असे प्रसंग माझ्या आठवणीत अगदी कमी! ते आग्रह करून करून वाढायचे. 'एक घ्या, एक घ्या' असे म्हणायचे. आम्हाला कल्पना नव्हती की पुढे खूप पदार्थ रांग लावून उभे आहेत! एखाद्या चित्रपटाचा शेवट जवळ आला आहे, असे वाटत असताना नवा क्लायमॅक्स पुढे यावा, तसे त्यांचे नवे नवे धक्के पुढे येत होते.

आमचे खाणे सुरू होते, तेव्हा मोगी हे त्यांचे मांजर बाजूच्या खोलीतून निषेधात्मक आवाज काढत दरवाजा ओरबाडत ओरडत होते. खोपकरांनी त्याला बंद करून ठेवले होते. आमचे आवरले तसे ते उठले आणि मोगीला छातीशी



बहुश्रुत अरुण खोपकरांसोबतची रम्य भेट

धरून त्याचे मुके घेत, पाठीवरून हात फिरवत त्याला बाहेर घेऊन आले. 'तू जेवणाच्या टेबलावर उडी मारतोस ना, म्हणून तुला बंद करून ठेवले होते,' असा खुलासा त्यांनी केल्यावर ते शांत झाले.

मोगी हे एक भटके मांजर. सोसायटीच्या आवारात एक दिवस एक पिल्लू त्यांना दिसले. त्या पिल्लाला भाऊही होता. सोसायटीतील काही मुलांनी ती पिल्ले खाली एक जागा करून तेथे सांभाळली होती. एक दिवशी त्यातील एक मांजर मेले. मग उरलेले पिल्लू घेऊन खोपकर वर त्यांच्या घरी आले आणि त्यांनी तेथे त्याचा सांभाळ सुरू केला. मुलांनी त्या मांजराचे नाव मोगॅम्बो असे ठेवले होते. ते खोपकरांकडे राहायला आल्यावर ती मुले आता अधून मधून 'अपॉइंटमेंट घेऊन' ठरावीक वेळी मोगॅम्बोला भेटायला वर जात असतात. खोपकर लाडाने त्याला 'मोगी मोगी' म्हणत कुरवाळत होते. आम्हाला गंमत वाटत होती. (खोपकरांचा 'कोश्का' हा त्यांच्या लाडक्या मांजरीवरील लेख त्यांच्या चाहत्यांना येथे नक्कीच आठवेल!)

खाणे-पिणे झाल्यावर अभ्यासिकेत पुन्हा गप्पा सुरू झाल्या. मी 'कालकल्लोळ' आणि 'चित्रव्यूह' ही दोन पुस्तके काढून त्यांच्यासमोर ठेवली. त्यांवर त्यांची स्वाक्षरी घेतली. पुस्तकावर ते सही करत असताना फोटो घेतला पाहिजे, असा विचार माझ्या डोक्यात आला. माझी चुळबूळ त्यांच्यातील दिग्दर्शकाने नेमकी ओळखली आणि त्यांनी संजयला बोलवून आमच्या मोबाइलवर फोटो काढून द्यायला लावले. मी एकदम खूश झालो. 'यातला एक फोटो मी पंचवीस वर्षांनी एक लाख

रुपयांना विकणार आहे' असे म्हणालो तेव्हा ते हसले आणि म्हणाले, 'काहीच हरकत नाही. कारण तेव्हा मी नसणार!'

आम्ही पुन्हा बाहेर आलो. २१व्या मजल्यावरून दक्षिण मुंबईचे विहंगम दर्शन घडत होते. श्रावणातील एक सर नुकतीच पडून गेल्यामुळे 'न्हालेल्या जणू गर्भवतीच्या सोज्वळ मोहकतेने बंदर' असे चित्र होते. खोपकरांनी आम्हाला वरून मेट्रो वगैरेचे रस्ते कुठून कुठे जातात ते दाखवले. मग एकीकडे हात दाखवत म्हणाले, 'ती जी सर्वात घाणेरडी इमारत दिसत आहे, ती इन्कमटॅक्सची!' पुढे ते म्हणाले, 'तुम्ही तेथून जात असाल तर तिथला कावळासुद्धा तिरकी नजर करून तुमच्याकडे बघतो.'

आधीच आम्ही जवळपास दोन तास अधूनमधून हसत होतो. आता त्या हसण्यावर कळस चढला!

तनमनात एक तृप्ती-समाधान घेऊन खाली उतरलो आणि एका धुंदीतच घरी परतलो. कोरोनाची छाया अजूनही मुंबईवर होती. आम्हीही आमच्या कौटुंबिक आणि व्यक्तिगत जीवनात अनेक आव्हानांचा सामना करत होतो. अशा भयग्रस्त आणि संवेदनाहीन वातावरणात एका मोठ्या ज्ञानवंत लेखकाची अशी भेट व्हावी आणि त्याने आमचे निर्मळ माहेरपण करावे हा अनुभव शब्दातीत होता!

मी तीस वर्षे जनसंपर्क विभागात नोकरी केली, पण आपल्याकडे येणाऱ्या पाहुण्यांना तुम्हाला काय आवडते किंवा कशाची ॲलर्जी आहे असा प्रश्न त्यांना आधीच विचारण्याचे मला कधी सुचले नव्हते! आपण एखाद्याला घरी जेवायला बोलावले तर यजमान आणि पाहुणे दोघांनीही एकत्र बसून पाहुणे अवघडणार नाहीत अशा पद्धतीने त्यांच्याशी गप्पागोष्टी करत स्वत:ही जेवणाचा आनंद घेतला पाहिजे, हा धडाही मिळाला.

घरी आल्यावर मी त्यांना आभाराचा एक संदेश पाठवला. त्यावर त्यांनी लगेच उत्तर देऊन त्यांच्यासोबत काढलेले फोटो ईमेलवर पाठवायला सांगितले. त्यांचा ईमेल आयडीसुद्धा दिला. त्या फोटोंचे महत्त्व फक्त आम्हालाच नाही, तर आपल्यालाही आहे हे दाखवण्याचा मोठेपणाही त्यांच्याकडे होता! तीन वेळा राष्ट्रीय पातळीवर सुवर्णकमळ मिळवणाऱ्या माणसासोबत झालेली ही भेट आमच्याही मनात एक कधीही न कोमेजणारे कमळ फुलवून गेली.

***

**दोन : श्रीनिवास विनायक कुलकर्णी**

श्रीनिवास विनायक कुलकर्णी अर्थात् माझ्यासाठी सर! सुप्रसिद्ध ललित लेखक, 'मौजे'चे संपादक आणि माझे एक आदरस्थान. त्यांना कराड येथे भेटायला जायचे ठरले. एम.ए.ला त्यांचे 'डोह' हे पुस्तक अभ्यासाला होते. ते अपूर्व स्वरूपाचे लेखन वाचून मी त्यांच्या प्रेमात पडलो. तेवढे पुस्तक वगळता त्यांच्याशी अन्य काही संबंध नव्हता. तशी काही गरजही नव्हती. कारण आपला आवडता लेखक त्याच्या लेखनातून आपल्याला नेहमी भेटत असतो.

'डोह'मधील त्यांच्या लेखनाचे मनावर गारूड होते, अजूनही आहे. विशेष म्हणजे आपल्यालाही असे काही लिहिता येईल, असा विश्वास ते पुस्तक वाचून मनात निर्माण झाला. 'पाण्यातले दिवस' (राजहंस प्रकाशन) हे माझे पुस्तक त्या विश्वासातूनच जन्माला आले. रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथील सावित्री नदीत डुंबण्यात आणि मासेमारी करण्यात माझे बालपण गेले; त्या आठवणी त्या पुस्तकात आल्या आहेत. (श्री. ग. माजगावकर यांनी ते लेखन जसेच्या तसे 'माणूस'च्या एका दिवाळी अंकात 'कव्हर स्टोरी' म्हणून छापले होते. दिलीप माजगावकरांनी 'पाण्यातले दिवस' या नावाने ते पुस्तकरूपाने प्रकाशित केले. १९९३ साली त्याला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट ललित गद्याचा पुरस्कारही मिळाला.)

पुढे कधीतरी सरांचा नंबर मिळवून दोन-चारदा त्यांच्याशी बोलल्याचे आठवते. वाचन-लेखनाविषयी बोलणे झाल्यावर प्रत्येक वेळी 'आशीर्वाद द्या' असे मी म्हणायचो तर, 'आशीर्वाद नाही आपण मित्र आहोत; माझ्या तुम्हाला शुभेच्छा' असे ते म्हणायचे. 'तांबट' पक्ष्याच्या निरीक्षणावर आधारित माझे 'तांबट' हे पुस्तक 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केले आहे. त्याचे हस्तलिखित मी सरांना पाठवले. त्यांनी ते तपासून आपल्या मौलिक सूचनांसह त्यांच्या सुंदर हस्ताक्षरातील एक पत्र मला पाठवले. ते मी अजून जपून ठेवले आहे.

साहित्य संस्कृती मंडळाच्या कामकाजाच्या अनुषंगाने ते कधीतरी मंत्रालयात येत, पण आमची भेट झाल्याचे आठवत नाही. फोनवर मात्र बोलणे व्हायचे. 'लोकराज्य'च्या 'वाचन विशेषांका'साठी त्यांच्या मागे लागून एक लेख मी लिहून घेतला होता. 'मौजे'च्या संपादकांना आपण 'लोकराज्य'शी

जोडू शकलो, याचा कोण आनंद तेव्हा मला झाला होता. अर्थातच अभिमानही वाटला होता. पुढे अधूनमधून फोन करून मी त्यांच्याशी बोलू लागलो. ते मोकळेपणाने आणि अगत्याने बोलायचे. त्यांचे बोलणे माझ्यासाठी एक संस्कार असायचा.

त्यांना एकदा समक्ष भेटावे असा विचार नेहमी मनात यायचा. तसे मी त्यांना बोलून दाखवायचो. मुंबई आणि कराड अशा दोन्ही ठिकाणी ते आलटून-पालटून राहायचे. 'नक्की भेटूया' असे ते म्हणायचे. मी 'हो हो' करायचो आणि तो विषय तिथेच थांबायचा. सरकारी नोकरीत महाराष्ट्रभर सतत फिरावे लागल्यामुळे माझ्या मित्र-आप्तेष्टांपासून नकळत दूर झालो होतो. लेखन-वाचनाचीही आबाळ झाली होती. मंत्रालयात बदली झाल्यावर थोडे स्थैर्य मिळाले आणि निवृत्तीनंतर पुरेसा वेळ मिळाल्यामुळे राहून गेलेल्या गोष्टी पूर्ण करण्याच्या प्रयत्नात असताना कराडचे पत्रकार मित्र, 'कृष्णा एक्सप्रेस'चे संपादक गोरख तावरे यांना एक दिवस कराड-भेटीविषयी विचारले. कुलकर्णी सरांना भेटायचे आहे, असे स्पष्ट केले तर ते आनंदून म्हणाले, 'त्यांचा मुलगा उदयन (मर्ढेकर स्मारकाचे आर्किटेक्ट) यांच्याशी माझी ओळख आहे; काही अडचण येणार नाही, जरूर या!'

अखेर तो दिवस उजाडला. १७ जुलै २०२५. दुपारी उशिरा मी आणि रेखा मुंबईहून एस.टी.ने कराडला पोहोचलो. दिवसभर पाऊस पडत होता. पिशव्या रेस्ट हाऊसवर टाकल्या. ताजेतवाने झालो. खाणेपिणे आवरले आणि गोरख यांच्यासोबत प्रथम कृष्णा-कोयना संगमावर गेलो. मग तेथून सरांना भेटण्यासाठी वाकाण परिसरातील सुशांतनगरमध्ये शिरलो. तोवर संध्याकाळ होत आली होती. एके ठिकाणी 'उदयन कुलकर्णी' अशी पाटी दिसली. तेथे थांबलो. ते आमची वाट पाहत होते.

फाटक ओलांडून आत शिरताच तेथील वेगळेपणाची जाणीव झाली. अंगणात फॅशनेबल फरशांऐवजी दगड बसवलेले होते. आजूबाजूला भरपूर झाडे लावलेली होती. घराच्या बांधकामात दगड, माती, लाकूड जास्त वापरलेले तर सिमेंट नावापुरते होते! उदयन यांनी आपल्या मनाप्रमाणे बांधलेल्या या घराने आमच्याशी जवळिकीचे नाते निर्माण केले. आत शिरतोय तोवर त्यांच्या कोकीने भुंकून भुंकून आपला निषेध नोंदवायला सुरुवात केली. (उदयन यांनी तिला



श्रीनिवास विनायक कुलकर्णी नामे समृद्ध 'डोहा'शी हितगूज

शांत केले. मग ती निमूट झाली आणि बाजूच्या बैठकीवर बसून आमच्या गप्पा ऐकू लागली.)

मुंबईतील घरांच्या तुलनेत प्रशस्त अशा बैठकीच्या खोलीत आम्ही आलो. तेथून डावीकडे एक पायरी खाली उतरून गेले की पडवीचा भास निर्माण करणारे आणि मधे भिंत नसलेले स्वयंपाकघर. दुसरीकडे पाच-दहा जणांना मांडी घालून बसता येईल, अशी बैठकव्यवस्था. बाजूला विराजमान हार्मोनियम. मधोमध दर्शनी भिंतीसमोर खुर्च्या, सोफासेट, कोपऱ्यात काटकोनातील टेबल-टीपॉय. नाटकाचा सेट पाहत आहोत, असे वाटले.

बाजूची खोली सरांची. आम्ही आल्याचा निरोप त्यांना गेला. उदयन, त्यांची पत्नी वर्षाताई, आई ललिताबाई साऱ्यांचा परिचय झाला. तपकिरी देखणा झब्बा आणि निळी जिन्स अशा रुबाबदार वेषात, काठी टेकत ते बाहेर आले. त्यांनी वयाची ९० वर्षे पूर्ण केली आहेत, यावर विश्वास बसत नव्हता. आम्ही एकमेकांना प्रथमच पाहत होतो. पण लगेच सूर जुळले आणि गप्पांचा सिलसिला सुरू झाला.

सरांना ऐकू येत नाही, पण ते व्यवस्थित बोलू शकतात! (त्यांना अलीकडे Trigeminal neuralgia झाल्याने त्यांचा चेहरा आणि मान दुखत असते.) उदयन यांनी पाटी-पेन्सिल आणून दिली. प्रश्न लिहून दिला की सर बोलायला सुरुवात करत. मग दुसरा प्रश्न, मग तिसरा; मग त्यांची तोंडी उत्तरे अशी मैफल सुरू झाली! अधूनमधून उदयन, वर्षाताई, ललिताबाई, गोरख यांच्या प्रतिक्रिया असायच्या. लेखन-वाचन, नाटक-सिनेमा, असे अनेक विषय होतेः

समकालीन साहित्य व्यवहाराविषयी त्यांचे स्मरण अगदी तल्लख होते. नावे, तारखा तोंडावर होत्या. वाणी स्वच्छ आणि

खणखणीत होती. आणि त्यांचा मिश्कील स्वभाव अगदी पूर्वीसारखाच त्यांच्या सोबत होता.

मी आमच्या गावी पोलादपूर येथे घर बांधत होतो, हे त्यांना माहीत होते. (ही २०१२ सालची गोष्ट.) 'घराचे कुठवर आले, तिकडची व्यवस्था कोण बघते,' असे त्यांनी विचारले. त्यांची ती स्मरणशक्ती बघून मी थक्क झालो.

'नदीवर मासेमारी करणाऱ्या एका छोट्या मुलावर मी चित्रपट लिहिला आहे', असे त्यांना सांगितले, तेव्हा ते खूश झाले. नदी हा त्यांच्याही आवडीचा विषय. 'त्या नदीचे नाव काय, चित्रपटाचे नाव काय', असे विचारत माझी उत्तरे ऐकून पसंतीची दाद देत राहिले. व्यावसायिक रंगभूमीवर माझे नवीन नाटक येत आहे हे सांगितल्यावर 'नाटकाचे नाव काय, प्रमुख भूमिका कोण करणार,' अशी माहिती त्यांनी विचारली आणि त्यावर आपल्या पसंतीची मोहोर उमटवत मला शुभेच्छा (आणि या वेळी) आशीर्वादही दिला.

मी त्यांची रुची जाणून असल्यामुळे काय बोलायचे याचे मला भान होते आणि त्यामुळे माझ्या प्रत्येक प्रश्नावर ते खूश होते, आणि छान स्मित करत सविस्तर उत्तर देत होते. त्यांनी तपासून दिलेले 'तांबट' हे पुस्तक ग्रंथालीने प्रसिद्ध केले आहे तसेच माझ्या हिमालयातील भ्रमंतीवर आधारित 'हिमाक्षरे' हे पुस्तकही प्रसिद्ध झाले आहे, हे मी त्यांना सांगितले. उदयन, वर्षाताई, ललिताबाई, रेखा आणि गोरख आमचा हा संवाद कौतुकाने ऐकत होते.

माझ्या प्रश्नाला त्यांचे काय उत्तर येणार, याची कधी कधी मला कल्पना असायची. तसे मी इतरांना आधीच सांगायचो आणि मग तसेच उत्तर आल्यावर आम्ही सर्व जण मोठ्याने हसायचो. अशा वेळी सर आमच्याकडे प्रश्नचिन्हांकित चेहऱ्याने पाहायचे. त्या गप्पाष्टकात म. द. हातकणंगलेकर, पाडगांवकर यांची आठवण निघाली. 'मौज' दिवाळी अंकाचा विषय निघाला, तेव्हा 'मोनिका गजेंद्रगडकर माझ्या मित्राची मुलगी' असे ते म्हणाले आणि मग अर्थातच विद्याधर पुंडलीक यांच्या जन्मशताब्दीचा विषय निघाला. आम्ही 'आवाजाच्या दुनियेत' आणि ते एका 'परम शांततेच्या विश्वात' असे दृश्य होते. गोंगाट आणि सन्नाटा यातील सुसंवादाच्या त्या अपूर्व वास्तवाने मी थरारून गेलो. तो अनुभव कथा, कविता, नाटक, सिनेमा अशा निर्मितीची अनेक बीजे माझ्या मनात टाकत गेला.

सरांच्या भेटीमुळे मी इतका उत्साहलो होतो की कोणताही प्रोटोकॉल न पाळता, काहीही टेन्शन न घेता अनौपचारिकपणे बोलत सुटलो होतो. त्यात कधी भाबडेपणा, कधी बालिशपणा, कधी गंभीरपणा तर कधी गमतीचा सूर असायचा. पाटीवर प्रश्न लिहून देताना आपले शुद्धलेखन चुकणार तर नाही ना याविषयी मी काळजीत असायचो. 'सर रागावणार तर नाहीत ना' असे म्हटले की सर्वांना हसू यायचे. आम्ही सगळेच कळत-नकळत मोकळेपणाच्या पातळीवर आल्याने प्रसंगनिष्ठ विनोदांनी वातावरण हलकेफुलके झाले होते.

मधेच वर्षाताई म्हणाल्या, 'अण्णांचे (सरांचे) मित्र म्हणजे ('सत्यकथा'-'मौजे'च्या संस्कारातील) गंभीर चेहरा करून बसणारे कोणीतरी येणार असे वाटले होते, पण तुमच्या या भेटीने तो गैरसमज दूर झाला.' ते ऐकून मी खूश झालो.

'घरी हे असेच (बडबडत) असतात का आणि तुम्ही अशाच (गप्प) असता का?' वर्षाताईंनी रेखाला विचारले. तेव्हा 'घरी हे शांत आणि मी बडबडत असते' असे ती म्हणाली. त्यावर हास्याचा फवारा उडाला. 'आमच्या घरीही असेच चालते,' अशी पुष्टी उदयन यांनी जोडली आणि हास्याचा आणखीन एक मजला चढला.

वर्षाताईंनी आग्रहाने आम्हाला दडपे पोहे खाऊ घातले. योगायोगाने दडपे पोहे हा माझा आवडता पदार्थ. त्यावर त्यांनी काकडी किसून घातली होती. तो बारकावा मी उघड करताच त्या संतोष पावल्या. आमच्यासाठी काय करावे, असा विचार करत असताना त्यांनी दडप्या पोह्यांची निवड केली होती. तो निर्णय योग्य ठरला याचे त्यांना समाधान झालेले दिसत होते. पोह्यांच्या पाठोपाठ त्यांनी बशीतून एकेक वडी आणून प्रत्येकाला दिली आणि ती कसली हे ओळखायला सांगितले. वडी जांभळाची होती! त्या नव्या पदार्थावर त्यांच्या मित्रमंडळींचे काही प्रयोग सुरू असून ती त्यांना यथावकाश बाजारात आणायची होती. ते झाल्यावर मस्त चहा आला. वर्षाताई कोकणातल्या. त्यांचे तिकडचे नाव हर्डीकर. त्यांची प्रत्येक गोष्ट शिस्तीत आणि नियोजनबद्ध. त्यांनी शिक्षणशास्त्रावरील विषयात डॉक्टरेट मिळवलेली आहे हे सरांनी कौतुकाने सांगितले. विवेक सावंत सर यांच्या 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ' (एमकेसीएल) या प्रसिद्ध संस्थेच्या शैक्षणिक सल्लागार म्हणून त्यांचे काम सुरू असते.

मी रेखाला म्हटले होते, 'आपण फक्त पाच मिनिटे जाऊन

**'नदीवर मासेमारी करणाऱ्या एका छोट्या मुलावर मी चित्रपट लिहिला आहे', असे त्यांना सांगितले, तेव्हा ते खूश झाले. नदी हा त्यांच्याही आवडीचा विषय. 'त्या नदीचे नाव काय, चित्रपटाचे नाव काय', असे विचारत माझी उत्तरे ऐकून पसंतीची दाद देत राहिले. व्यावसायिक रंगभूमीवर माझे नवीन नाटक येत आहे हे सांगितल्यावर 'नाटकाचे नाव काय, प्रमुख भूमिका कोण करणार,' अशी माहिती त्यांनी विचारली आणि त्यावर आपल्या पसंतीची मोहोर उमटवत मला शुभेच्छा (आणि या वेळी) आशीर्वादही दिला.**

सरांना पाहून येऊ.' पण तिथे गेल्यावर दीड-दोन तासांची मैफील रंगणार आहे, याची कल्पना नव्हती. 'बहुत सुकृताची जोडी म्हणुनी विठ्ठली आवडी!' मी उघडपणे तसे बोलून दाखवले. निघताना सर म्हणाले, 'तुमची भेट जरा आधी झाली असती तर मी तुम्हाला 'मौजे'त लिहायला लावले असते!' ते ऐकून मी भरून पावलो!

'डोह' पाठोपाठ 'सोन्याचा पिंपळ', 'पाण्याचे पंख' आणि 'कोरडी भिक्षा' ही सरांची ललित लेखनाची पुस्तके आली. पण त्यांना ओळख मिळाली ती 'डोह'कार म्हणून! प्रारंभी त्यांनी कविताही लिहिल्या. त्यातील काही खुद्द 'सत्यकथे'त छापून आल्या. एकदा श्री. पु. भागवत त्यांना म्हणाले, 'तुम्हाला जर वाटत असेल तर तुमच्या कविता 'मौजे'कडे संग्रहासाठी द्या!' 'तुम्हाला जर वाटत असेल' याचा अर्थ 'श्री.पुं.ना तसे वाटत नव्हते.' हे श्री. वि. कुलकर्णी यांच्या लक्षात आले नसते तरच नवल! अर्थात संग्रहाचा विचार त्यांनी कायमचा सोडून दिला. हा किस्सा सरांनी स्वतः एका मुलाखतीत सांगितला आहे. अशी माणसे विरळा! या ज्ञानवंत माणसांच्या काळात जगायला मिळावे, या जाणिवेने मला त्या क्षणी कृतकृत्य वाटत होते.

सर्वांनीच आम्हाला जेवणाचा आग्रह केला. 'जेवणाची वेळ झालीच आहे' असे वर्षाताई म्हणाल्या. पण पूर्वकल्पना न देता असे वागणे मनाला पटेना. आम्ही मुंबईहून जाताना एका ठिकाणीची बालुशाही सोबत नेली होती. तो खाऊ पाहून सरांना आपल्या चेहऱ्यावरचा आनंद लपवता आला नाही! वर्षाताईंनी त्यातील एक वाटीत दुधात भिजवून सरांना दिली. ती त्यांनी आमच्या समोरच खाल्ली. 'मला आवडली, पूर्ण खाल्ली!' असे सांगायलाही विसरले नाहीत. ही छोटीशी घटनाही माझ्या भावविश्वात खोल रुजली. (सरांना काहीतरी खायला न्यावे आणि त्यांनी ते आपल्यासमोर खावे, असे मनापासून वाटले होते.)


शेवटी गोरख यांनी फोटोची कल्पना काढली. मग आम्ही बसून, उभे राहून फोटो काढले. फोटोसाठी उभे राहताना सरांनी 'काठी नको' असे म्हणत ती बाजूला फेकून दिली. खोलीतून बाहेर येताना ते काठी टेकत आले होते आणि आता काठी फेकून देत होते. त्या दीड तासांच्या मैफिलीचा तो चमत्कार माझ्यातील लेखक-दिग्दर्शकाने टिपला. सरांना आपण कंटाळा दिला नाही, उलट वय विसरायला लावले हे लक्षात आले. खरेतर यात त्यांच्याच चैतन्याचा भाग अधिक होता, पण मी मात्र स्वतःची पाठ थोपटून घेत होतो.

रात्री ९ वाजता तेथून निघालो, तेव्हा सारे कुटुंब आम्हाला बाहेर सोडायला आले. सरही दरवाजात उभे राहून हात हलवत होते. आम्ही पुन्हा यावे, असा प्रत्येकाचा आग्रह होता... तोवर पाऊस उघडलेला होता. कराडवर निवांत रात्र उतरली होती. आधी कृष्णा-कोयनेच्या संगमावर जाऊन स्वतःला हरवून बसलो होतो आणि आता श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्यात आणि माझ्यात सुसंवादाचा एक नवा झुलता पूल बांधून तयार झाला होता. 'मृगजळातल्या यक्षघराला' घेऊन जाणारी पायवाट कदाचित तेथूनच फुटत असावी.

❋❋❋

**लेखक विविधांगी स्वरूपाचे ललित लेखन, नाटके, एकांकिका, कविता लिहितात. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागातून ते संचालक म्हणून निवृत्त झाले आहेत.**
**वेबसाइट** – www.pralhadjadhav.com
pralhadjadhav.two@gmail.com,
**संपर्क : ९९२०० ७७६२६**

# माझी रेषा,
# माझा गोतावळा!



प्रदीप म्हापसेकर



रेखाचित्रे : प्रदीप म्हापसेकर

**चित्रकार कसा घडत जातो, या प्रश्नाचं उत्तर अनेक टप्प्यांमध्ये आणि विविध पातळ्यांवर देता येईल. एक, चित्रकार म्हणजे फक्त चित्रं काढणारी व्यक्ती नसून तो एक संवेदनशील, निरीक्षणशील, सर्जनशील आणि सतत शिकणारा कलाकार असतो. चित्रकार घडण्यासाठी केवळ हातात कला असणे पुरेसे नसते. निसर्ग, माणसं, प्रकाश, छाया, रंगसंगती यांचं सूक्ष्म निरीक्षण हळूहळू एक कलाकार घडवू लागतं. तो केवळ बघत नाही, तर 'पाहू' लागतो. खोलात जाऊन. एखाद्या चित्रकाराचं वेगळेपण त्याच्या शैलीत, दृष्टिकोणात असतं. ही शैली सहज तयार होत नाही. ती अनुभव, प्रेरणा, आत्ममंथन आणि प्रयोगातून घडते. खूप कष्टाने ती शैली त्याला गवसते. कधी तो आपल्या गुरूपासून शिकतो, तर कधी वेळेच्या वादळात, भोवऱ्यात स्वत:ला शोधत असतो. तर कधी इतर मोठ्या व्यक्तींकडून आदर वाटणाऱ्या ज्ञानवंतांमध्ये तो शोधतो...**

हिरव्यागार कोकणात पार आतमध्ये झाडांच्या गर्दीत एक छोटसं लाल मातीचं घर दडलेलं आहे. घरात पाच-सहा लहान मुलं खेळत आहेत. कोण सहावीतला, कोण सातवीतला, कोण आठवीतला. एक मुलगा मात्र हातात खडू घेऊन दरवाजाच्या समोर उभा आहे आणि कसलातरी विचार करतोय. पाठीमागे मुलं खेळत आहेत. एकमेकांना धक्के देत आहेत. आरडाओरड करत आहेत, पण तो मुलगा मात्र शांतपणे घराच्या त्या दरवाजावर काहीतरी रेखाटतोय...

आता त्याने एक छानसा गणपती रेखाटलेला आहे. साधी आऊटलाइन. पांढरीशुभ्र काळपट असा राखाडी रंगातला तो सुंदर दरवाजा. त्याच्यावरच्या त्या खडूच्या रेषा मस्त उठून दिसत आहेत. तो चित्रात दंग झालाय आणि हळूहळू पाठीमागचा मुलांचा आवाज, चिवचिवाट हळूहळू कमी होत जातोय...

आता सगळेच जण पाठीमागे उभे राहून, तल्लीन होऊन त्याचं चित्र पाहताहेत. इतक्यात त्या मुलाची आजी आतून येते आणि चमकून त्या चित्राकडे पाहत बसते. ती मोठ्याने ओरडते, 'अरे देवा, हे काय केलंस तू? आता या दरवाजाचे विसर्जन करावे लागणार?' त्या काळी गावाकडे देवांची चित्रं अशी उघड्यावर वगैरे ठेवायची पद्धत नसायची. शिवाय देवाचं चित्र पुसणार कोण? मोठं पाप लागणार. आजीला त्याची काळजी होती. इतक्या लहान वयात त्याने काढलेलं गणपतीचं सुंदर चित्र पाहून सगळेच हबकले. कारण त्यांच्या घरात ना कोणी चित्रकार होता, ना कोणी या मुलाला चित्रं काढायला शिकवली होती.

मात्र आता या गणपतीमुळे त्या दरवाजाचं विसर्जन करावं लागणार. मग दरवाजाच्या जागी काय लावायचं? आजीला पडलेला हा मोठा प्रश्न. तर असा हा प्रसंग ठळकपणे आजही मला आठवतो. मी काढलेला तो गणपती आजही मला माझ्या डोळ्यांसमोर दिसतो...

***

चित्रकला म्हणजे काय असतं, हे त्या वयात मला काहीच ठाऊक नव्हतं. पण नकळत चांगलं चित्र काढत होतो. कशी ती देव जाणो. पुढे शाळेत मी चित्र चांगलं काढतो म्हणून फेमस झालो. याला चित्र काढून दे, त्याला चित्र काढून दे. याला दहीहंडी काढून दे, त्याला दिवाळीचं चित्र काढून दे, हे असे प्रकार पुढे शाळेत खूपच वाढू लागले. नंतर तर शाळेतले माझे वर्गमित्र संध्याकाळी, रात्री घरी येऊ लागले. आपापली ड्रॉइंग बुकं घेऊन. तेव्हा ही सगळी चित्रं मी कशी काढायचो, हा आजही मला पडलेला प्रश्न आहे.

पालिकेच्या शाळेतून पुढे दादरच्या छबिलदास शाळेत आमची रवानगी झाली. इथे मात्र कलेला एक वळण मिळालं. माझी चित्रकला पाहून चित्रकलेचे शिक्षक जाधव सरांनी खूपच स्वातंत्र्य दिलं. काही तासांना मला सुट्टी मिळायची. माझा हात चांगला आहे, हे समजल्यावर तळ मजल्यावरच्या ड्रॉइंग रूममध्ये मला जाधव सर काही ना काही काढायला सांगत. त्या वयात कळलं नाही, पण हे पुढे कळलं, जाधव सर हे माझे चित्रकलेतले पहिले गुरू होते. आज वाटतं, माझा हात या शाळेत थोडा मोकळा झाला. वळायला लागला. व्हॅन गॉग म्हणाला होता, 'जर तुमच्या आतला एखादा आवाज म्हणत असेल, 'तू चित्र काढू शकत नाहीस, तर चित्र काढ. मग तो आवाज शांत होईल.' कमालच आहे. कितीतरी जणांना आपला आतला आवाज ओळखता येत नाही. काहींना आवाज उशिरा ऐकू येतो. अन् हा म्हणतोय आवाजाविरुद्ध आवाज उठवा! पण व्हॅन गॉग ग्रेटच. हे असं लहानपणीच प्रत्येकाला कुणीतरी सांगायला हवं.

***

माझं फक्त ड्रॉइंग चांगलं होतं. बाकीच्या विषयात जेमतेम मार्क मिळायचे. मला आठवतं, माझ्या लहानपणापासून आमच्या घरी 'महाराष्ट्र टाइम्स' यायचा. 'म.टा.'च्या उजव्या कोपऱ्यात एक चित्र असे. आर. के. लक्ष्मण यांचं कार्टून. त्या काळी कार्टूनमधलं काही कळत नव्हतं. खालच्या ओळी कधी वाचायच्या फंदात पडलो नाही. पण चित्रातला तो कॉमन मॅन लक्ष वेधून घ्यायचा. मला नवल वाटायचं, हा धोतरवाला चौकडीचा शर्ट घातलेला रोज कसा इथे प्रत्येक चित्रात असतो. कधी तो मार्केटमध्ये असतो. कधी ऑफिसमध्ये फायली ठेवत असतो. कधी बसस्टॉपवर. तर कधी फूटपाथवरून जाताना दिसतो.

नंतर मी त्याला माझ्या वहीत रेखाटू लागलो. पुढे न बघता मी त्याचं चित्र माझ्या ड्रॉइंग बुकमध्ये काढू लागलो. याची मी वेगवेगळी इतकी चित्रं काढली की विचारू नका. तीसुद्धा वेगवेगळ्या अँगलने. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकत असताना हा कॉमन मॅन माझ्या शेजारी बसलेला असायचा. म्हणजे तसं कार्टून मी ड्रॉ करायचो. कधी तो हळूच मागून

पाहत असे, मी काय काढतोय ते. याच्यामुळे तर पुढे मी व्यंगचित्र काढायला लागलो. छोट्या-मोठ्या साप्ताहिक, मासिकात माझी व्यंगचित्रं छापून येऊ लागली. बहुधा चित्र बरी काढतो म्हणून कदाचित छापत असतील. तर हे सगळं जे.जे.मध्ये शिकत असतानाच सुरू होतं. त्या वेळी एक कार्टून केल्याचं मला आठवतं. मी ब्रश घेऊन कॉमन मॅनच्या मागे लागलो आहे. तो घाबरून पुढे पळत आहे आणि मी म्हणतोय, 'अरे तू पळून पळून कुठे पळणार? 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्येच ना? थांब तिथे मी येणारच आहे.'

खरंतर ही गंमत होती. कार्टूनच्या नावाने सगळी धमाल चालू होती. काहीही असो पण पुढे खूप ठिकाणी माझी व्यंगचित्रं प्रकाशित होऊ लागली. त्या वेळी 'इलस्ट्रेटेड विकली'मध्ये शेवटच्या पानावर देशभरातल्या व्यंगचित्रकारांची कार्टून्स छापली जायची. तिथे लक्ष्मणच्या शेजारी माझे कार्टून पाहून माझी छाती फुलायची. अगदी अलीकडे तुर्कस्तानमधल्या एका पेपरात माझं कोरोनावरील कार्टून प्रसिद्ध झालं होतं. फ्री प्रेसमध्ये असताना पहिल्या पानावरचं माझं व्यंगचित्र लंडनमधील एका संस्थेने मागवून घेतलं होतं. मला वाटतं हा लक्ष्मणचा कॉमन मॅन माझा चित्रकलेतला दुसरा गुरू असावा. अर्थात लक्ष्मण! पंचवीसएक वर्षं मी वेगवेगळ्या नावांनी खूप राजकीय व्यंगचित्रं रेखाटली.

***

आज व्यंगचित्र काढायचं म्हणजे जोखमीचं काम आहे. पण त्या वेळीही माझ्या काही व्यंगचित्रांमुळे वाद झाले होते. पण आजच्यासारखा सोशल मीडिया नव्हता. कमेंटमधून शिव्या घालणारे नव्हते. ट्रोल करणारे नव्हते. पण पेपरचा दरारा होता. १९९२-९३च्या सुमारास कपिल पाटील यांनी 'आज दिनांक' हे सायं दैनिक सुरू केलं होतं. तिथे माझी कला संपादक म्हणून नेमणूक केली होती. इतकं महत्त्व मला नाही वाटत, त्या काळी कुणा आर्टिस्टला मिळालं असेल. अर्थातच ही सगळी मेहरबानी कपिल पाटील यांची होती. तर इथे मी पेज लेआउट करताना पहिल्या पानासाठी रोज एक पॉकेट कार्टून करत होतो. गोविंदराव या टोपणनावाने ते कार्टून छापून येत असे. इथे सल्लागार म्हणून दोन मोठी माणसं काम करत होती. एक अंबरीश मिश्र आणि दुसरे अशोक शहाणे. अंबारीशजी माझ्या कार्टूनचं बऱ्याचदा कौतुक करत असत. एखादं कार्टून आवडलं की ते एक रुपयाचं नाणं मला बक्षीस देत असत. त्यांनी दिलेली बरीच नाणी मी जमा करून ठेवली होती. बऱ्याचदा ते माझ्या कार्टूनबद्दल बोलत आणि त्यामुळे मी रोज थोडा थोडा परिपक्व होत असे. जबाबदारीचं भानही मला त्यामुळे राहत होतं.

***

कार्टून या कलेबद्दल खूप आठवणी आहेत. या काही मंडळींमुळे दिल्लीतल्या काही व्यंगचित्रकारांची माहिती मला मिळाली. महाराष्ट्रात लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे यांना ओळखणारे खूप आहेत. हे मोठेच आहेत पण तिकडेही दिल्लीत, दक्षिणेत काही मातब्बर लोक होते. रविशंकर होता. सुधीर दार होता. प्रत्येकाची शैली वेगवेगळी होती. एकेकाची खतरनाक स्टाइल होती. पण त्यांचे पेपर इकडे पाहायला मिळत नसल्यामुळे त्या वेळी त्यांच्याबद्दल फार माहिती अशी कुणाला नव्हती. आणि आजच्यासारखे इंटरनेट, फेसबुक वा इंस्टाग्राम नव्हते. आज दोन मिनिटांत जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात काय चाललंय हे कळतं.

***

'आज दिनांक'मधील कार्टूनमुळेच माझी प्रख्यात कवी, लेखक नामदेव ढसाळ यांच्याशी ओळख झाली. मित्र अनिकेत जोशी यांनी ढसाळ यांचे 'सत्यता' नावाचे साप्ताहिक डिझाइन करायला लावले. ढसाळ म्हणजे एक जबरदस्त व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्यासोबत काम करताना मला धक्क्यावर धक्के बसत होते. त्यांचं भन्नाट वागणं-बोलणं बघून मी

**इतक्यात त्या मुलाची आजी आतून येते आणि चमकून त्या चित्राकडे पाहत बसते. ती मोठ्याने ओरडते, 'अरे देवा, हे काय केलंस तू? आता या दरवाजाचे विसर्जन करावे लागणार?' त्या काळी गावाकडे देवांची चित्रं अशी उघड्यावर वगैरे ठेवायची पद्धत नसायची. शिवाय देवाचं चित्र पुसणार कोण? मोठं पाप लागणार. आजीला त्याची काळजी होती. इतक्या लहान वयात त्याने काढलेलं गणपतीचं सुंदर चित्र पाहून सगळेच हबकले.**

अवाक झालो होतो. त्यांच्यामुळे मला एक माझं नवीनच आयुष्य गवसलं होतं. मला वाटतं, त्यांच्यामुळे माझ्या रेषांमध्येही एक धाडसीपणा आला. माझं एखादं कार्टून पाहून ते म्हणायचे, 'काढ  दणकून! मी आहे ना!' पण माझ्यात त्यांच्याइतका धाडसीपणा नव्हता. ढसाळ यांचं काम करत असताना त्यांना खूप लोक भेटायला यायचे. ढसाळ फक्त पांढऱ्या लुंगीवर त्यांच्याशी खणखणीत आवाजात बोलत बसायचे. मी काम अर्धवट टाकून मधेच ते पाहत बसायचो. फार क्वचित ते बाहेर कधी एकटे दिसायचे. पण बऱ्याचदा त्यांच्या अवतीभवती दहा-बारा माणसं असायची. ढसाळ एखाद्या सम्राटासारखे त्यांच्यामध्ये बसलेले असायचे.

ढसाळांसोबत मी खूप फिरलो आहे. मी राहणारा मुंबईतला, पण त्यांनी मला वेगळीच मुंबई दाखवली. कल्पनेच्याही पलीकडची. रात्री-अपरात्री त्यांच्याबरोबर फिरल्यामुळे मुंबईची दुसरी बाजूही पाहता आली. ते पाहून माझ्यातल्या कलाकाराला शॉक बसत. आज मला माझीच दया येते. त्या काळी त्यांच्यासारखं दोन टक्केही जीवन मला जगता आलं नाही. ढसाळ यांच्या सोबतच्या कितीतरी आठवणी आहेत. ते बॉम्बे हॉस्पिटलमध्ये असताना मी बऱ्याचदा त्यांना भेटायला जात असे. बेडवर असतानाही त्यांच्या गमतीजमती चालू असायच्या. बेडवर असतानाच त्यांचं एक स्केच मी केलं होतं. साध्या बॉलपेनने रेखाटलेलं. त्यांचं निधन झालं तेव्हा बॉम्बे हॉस्पिटलमध्ये सकाळी ७ वाजता पोहोचलेला पहिला मी होतो. अर्थात हा काही मोठेपणाचा भाग नाही. मी जवळ गिरगावात राहत होतो.

***

काही माणसं आपल्यावर इतका प्रभाव टाकतात पण त्या वेळी ते जाणवत नाही. पण नंतर ती माणसं नसतानाही तुमच्या मनात कायम राहतात. अशी काही माणसं तुमच्या आयुष्यात येतात आणि तुमचे विचार बदलतात. तुम्हाला हलवून जागी करतात. तुमचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण ही माणसं बदलून टाकतात. त्यात तुम्ही चित्रकार वगैरे असाल तर बघायलाच नको. मी ढसाळ यांच्याबरोबर असताना याची मला जाणीव झाली. कारण इथे मी त्यांच्यासोबत खूप वेगवेगळी माणसं पाहत होतो. त्यांच्याकडे खूप लोक आपापली दुःख मांडत होती. समस्या घेऊन येत होती. मला हे सगळं नवं होतं. हे सगळं पाहून मी विचारात पडायचो. ढसाळ साहित्यिक म्हणून खूपच मोठे होते. आमच्या साहित्यावर फार कमी गप्पा झाल्या. कला केवळ 'छान दिसणं' नाही, तर कला काही वेळा गूढ, विचित्र, खळबळजनक किंवा अस्वस्थ करणारीही असते. तिचं उद्दिष्ट नेहमी सौंदर्य दाखवणं नसून प्रेक्षकाला विचार करायला लावणं; भावनिक प्रतिक्रियेला चालना देणं; किंवा समाजावर भाष्य करणं असं असू शकतं.

त्यांच्या पत्नी मलिका अमर शेख यांच्या 'महानगर' नावाच्या कवितासंग्रहातल्या कवितांना मी चित्रकार असूनही चित्र न काढता एक वेगळाच प्रकार केला होता. पेपर-मासिकं यांच्यातील फोटो कापून, फाडून प्रत्येक कवितेला एकेक कोलाज केलं होतं. अर्थात ढसाळांची पाठीवर थाप होती म्हणून. पण तसा प्रकार पुढे कुठल्या पुस्तकात मला पाहायला मिळाला नाही. ढसाळ आता नाहीत, पण आजही ते माझ्या अवतीभवती कुठेतरी असतातच. मिश्कीलपणे ते हसत असल्याचा मला भास होतो.

सहा-सात वर्षांपूर्वी मी त्यांच्यावर एक मोठा लेख लिहिला होता. सोबत त्यांचं एक स्केचही केलं होतं. आजही ते स्केच अधूनमधून फेसबुकवर इथून तिथून कोणाकडून तरी फिरताना दिसतं. कुणाच्या कवितेत ते चित्र असतं, तर कुणाच्या लेखात असतं. मग चित्रातले ढसाळ आणि मी एकमेकांकडे पाहून हसतो.

***

माझ्या आयुष्याला स्पर्शून गेलेल्या ज्ञानवंतांचा जेव्हा मी विचार करतो, तेव्हा एक साधू पुरुष माझ्या आजही डोळ्यांसमोर स्पष्ट दिसतो. भगव्या कपड्यात तो त्या मंदिरात कमालीचा वेगळा, उठावदार दिसत असे. मुळात तो गोरापान, तेजस्वी होता. तो काळ असावा २०१०चा. 'लोकमत'च्या चिंचपोकळी ऑफिसात तेव्हा मी काम करत होतो. या ऑफिसच्या अगदी शेजारी एक साईबाबांचं मंदिर होतं. एकदा दुपारी ऑफिसच्या गेटमधून आत शिरणार तेव्हा अचानक हा साधू मला आडवा आला. कदाचित मीच त्याला आडवा गेलो असणार. मग कोणी बाजूला व्हायचं यावर तिथे गंभीर चर्चा झाली. थोडी गमतीने शाब्दिक झटापट झाली. तेव्हा त्या साधू पुरुषाने मला माझं नाव विचारलं. तर मीच त्यांना म्हणालो, 'तुम्ही चंद्रकांत खोत आहात ना!' खरंतर त्यांना कधी मी याआधी पाहिलंही नव्हतं. फक्त नाव ऐकलं होतं. पण मनातून वाटलं हे तेच असावेत. मग परत ते म्हणाले,

'तुम्ही कोण?' मग ओळखपाळख झाल्यावर ते म्हणाले, 'ऑफिसातून सुटल्यावर इथे खाली, या मंदिरात मला भेटायला या.' खोत तेव्हा त्या मंदिरातच दिवसभर एका जागेवर बसलेले असायचे. हे खोत तेच 'अबकडई' दिवाळी अंकवाले. 'बिंब-प्रतिबिंब' पुस्तकवाले. दोनेक वर्षं मी त्यांना रोज इथे मंदिरात भेटायचो. खूप गप्पा रंगायच्या. त्यांच्या आणि माझ्या वयात अंतर असतानाही नंतर ते अगदी जानी दोस्त झाले होते. ते त्यांच्या 'अबकडई' अंकाचे स्वतः लेआऊट करायचे. कमालीचा डिझाइन सेन्स होता त्यांना. प्रत्येक वर्षी भन्नाट कल्पना सुचायच्या त्यांना. सलग २१ अंक त्यांनी काढले. दरवर्षी वेगळा विषय असायचा. खूप लोकांच्या संग्रही अजूनही ते अंक असतील. त्याच्या 'अबकडई' अंकावर एकाने पीएचडी केली आहे. एकेक अंकाच्या आठवणी ते मला भरभरून सांगायचे. आणि मी म्हणायचो, 'बापरे काय म्हणता? अरे देवा!'


खोतांचा तो भगवा रंग मला खूप काही शिकवून गेला होता. ते कमी बोलत पण रोज काही अफलातून सांगून जात. त्यांच्या या अफलातून शब्दांनी माझ्या मेंदूत खूप काही चित्र तयार होतं. ते लेखक होते. कवी होते. पण मला त्याहीपेक्षा ते कुणी अधिक वेगळे वाटत होते. त्यांच्या भूतकाळातल्या एकेक घटना मला एकेक कॅनव्हासवरचं चित्र वाटत होतं. काय आयुष्य जगले होते ते. जगण्यात सतत वेगळेपणा, स्पष्टपणा. आम्ही बोलायचो एक पण कळत-नकळत आमच्या दोघांत काहीतरी दुसरीच अदृश्य देवाणघेवाण होत असे. म्हणजे बघा, ते मला मोठे कलाकारासारखे वाटायचे. पांढरीशुभ्र दाढी. हातात ब्रश असता तर? ते दोनेक वर्षं रोज दोन कलाकारांतला मौनातला संवाद असायचा. कुठलाही विषय आम्हाला व्यर्ज नसायचा. कुणी त्यांची मुलाखत घ्यायला आलं तर त्यांना ते उडवून लावत. मग कुणी मला फोन करायचं. म्हणायचं, 'मित्रा, प्लीज त्यांना राजी कर बाबा.' मी मग प्रेमाने त्यांच्यावर वैतागायचो. म्हणायचो, 'का यांना टाळता?' खोत म्हणायचे, 'याने माझं एकही पुस्तक वाचलेलं नाही.' मग मी त्यांना समजवायचो. तेव्हा कुठे तयार होत.

असा हा बाहेरून रागीट वाटणारा पण आतून कमालीचा प्रेमळ माणूस. माझ्या एका पुस्तकावर त्यांनी अभिप्राय द्यावा, अशी माझी इच्छा होती. तसं मी त्यांना सांगितलं तर ते मोठ्याने हातवारे करत म्हणाले, 'मी अभिप्राय वगैरे देत नाही' मी म्हटलं, 'ठीक आहे, तुमची मर्जी.' चारेक दिवसांनी मी ऑफिसात जात असताना त्यांनी मला मोठ्याने हाक दिली. 'ओ बावीस कप!' त्या काळी मी खूप चहा प्यायचो म्हणून बावीस कप. मी आत मंदिरात जाताच त्यांनी आपल्या डोक्याखालच्या मोठ्या बॅगेतून एक कागद माझ्या हातात दिला. म्हणाले, 'हा घ्या तुमच्या पुस्तकावरचा अभिप्राय.' कागदावर फक्त चार ओळी लिहिलेल्या होत्या. त्या चार ओळी माझ्यासाठी चारशे ओळी होत्या. 'माझ्या ठाण्यातल्या पेंटिंग प्रदर्शनाचं उद्घाटन त्यांनीच करावं,' असं मी त्यांना म्हणालो, पण मंदिर सोडून ते कधीच कुठे बाहेर गेले नाहीत. पण उद्घाटनाच्या दिवशी ते सकाळीच तिथे हजर होते आणि जोरदार भाषण करून गेले. त्यांच्या मंदिरासमोरच ज्यू लोकांची स्मशानभूमी होती. तिथे आत आम्ही दोघांनी जायचं ठरवलं होतं. पण ते राहूनच गेलं. कारण हा भगवा कलाकार जगातून अचानक निघून गेला. नव्हे, चटका लावून गेला.

***

कार्टूननंतर माझ्या आयुष्यातला दुसरा चॅप्टर सुरू झाला होता. तो म्हणजे पेंटिंग. ॲबस्ट्रॅक्ट पेंटिंग. हा प्रकार बरीच वर्षं माझ्या डोक्यात वादळासारखा फिरत होता. 'आज दिनांक'मध्ये असताना काही अमूर्त शैलीत चित्रं केली होती.

'अबकडई'कार मनस्वी चंद्रकांत खोत



पण नंतर लक्षात आलं, हे काम घाईगर्दीत होणारं नाही. हा मनाचा, मेंदूचा एक अदृश्य अनोखा खेळ आहे. त्या काळी मी मीडियात काम करत होतो. ते सोडता येणार नव्हतं. कारण आर्थिक मुद्दा महत्त्वाचा होता. तेव्हाच ठरवलं होत पेंटिंग्ज करायची पण नंतर. सगळ्या दगदगीपासून दूर गेल्यावर. ॲबस्ट्रॅक्ट पेंटिंगबद्दल काय बोलणार? ही कला काय आहे? ती केवळ रंगांची उधळण नाही. असं म्हणतात की तो एक कल्पनाशक्तीचा स्फोट आहे. ते खरं आहे. ती एक अशी जादू आहे, जी कधी कागदावर, कधी कॅनव्हासवर, तर कधी हृदयावर उमटते. कशी? त्याचं विश्लेषण करणं थोडं अवघड आहे.

चित्रकार हा केवळ रंगांचं कौशल्य असलेली व्यक्ती नसतो. एक द्रष्टा असतो. जो समाज, निसर्ग, भावना आणि कल्पना यांना आपल्या दृष्टिकोणातून पाहतो आणि त्या भावना, कल्पना रंगांतून व्यक्त करतो. चित्रकाराचं काम असतं बघणाऱ्याच्या मनात एक नवीन जागा निर्माण करणं; जिथे तो विचार करेल, अनुभवेल आणि आत्मपरीक्षण करेल. जॉर्जिया ओ'कीफ (Georgia O'Keeffe) म्हणतो, 'रंगांच्या लहरी आणि आकारांच्या भाषेत मी असे अनेक विचार मांडले; जे शब्दांमध्ये सांगणं अशक्य होतं.' तर लिओनार्डो दा विंची म्हणतो, 'चित्रकलेचा संबंध केवळ डोळ्यांशी नसतो. ती तर मनाची भाषा असते. कलाकार डोळ्यांनी पाहतो, पण मनाच्या विचारांनी रंग भरतो.' एडवर्ड हॉपर म्हणतो 'जर एखादी भावना शब्दांत अचूक उतरवता आली असती, तर ती चित्रात उतरवण्याची गरजच पडली नसती.' ही काही उदाहरणं मी मुद्दाम इथे दिली. कारण माझ्या आयुष्यातला हा दुसरा चॅप्टर किती गहन आहे; वेगळा आहे, याची कल्पना येईल.

***

फ्रांझ क्लाइन. ॲबस्ट्रॅक्ट एक्सप्रेशनिझमचा मास्टर. सर्वात प्रभावशाली अमेरिकन ॲबस्ट्रॅक्ट एक्सप्रेशनिस्ट चित्रकारांपैकी एक. ऊर्जा आणि गतिमानता टिपणाऱ्या त्यांच्या धाडसी, काळ्या आणि पांढऱ्या चित्रांसाठी प्रसिद्ध असलेला चित्रकार. यांचं पहिलं चित्र मी पाहिलं तेव्हा मी चक्रावून गेलो होतो. क्लाइन फक्त सात वर्षांचा असताना त्याच्या वडिलांनी आत्महत्या केली आणि नंतर त्याच्या आईने त्याला अनाथ मुलांसाठीच्या संस्थेत पाठवून दिलं. हा जीवनातला खडतर काळ विसरून त्याने कलाक्षेत्रात आपलं नाव अजरामर केलं. तो म्हणायचा, 'मी जे पाहतो ते मी रंगवत नाही तर त्या पाहण्याने माझ्यात निर्माण झालेल्या भावना रंगवतो.' त्याच्या या तत्त्वज्ञानामुळे त्याला काही जण ॲक्शन पेंटर म्हणत. मला याचं काम खूप आवडतं. कारण याची खूप चित्रं काळ्या-पांढऱ्या रंगांत रंगवलेली आहेत. माझ्या मनात हेच दोन रंग पुन्हा पुन्हा उमटत असतात. मी सुरुवातीची कागदावरची बरीचशी चित्रं काळ्या-पांढऱ्या रंगांत केली. या दोन रंगांत खेळायला मला खूप आवडत होतं. त्याआधी मी काही क्लाइनची चित्रं पहिली नव्हती. कालांतराने नेटवर एका काळ्या-पांढऱ्या रंगातल्या चित्राने माझं लक्ष वेधलं. ते कमालीचं आवडलं मला. मग मी त्या चित्रकाराचा शोध घेतला. तर हे क्लाइन महाशय सापडले. मग तर मी सुसाटपणे याच्या मागे लागलो. याची इतर चित्रं शोधू लागलो. महाशय मला पुढे धक्क्यावर धक्के देत गेले. त्यांच्या एकेक चित्राने मी हबकून गेलो. हेच ते हेच ते! काय तो फोर्स! काय तो कॅनव्हासवरचा वेग. अफलातून कॉम्बिनेशन. कितीतरी सोपं पण, तितकंच अवघड, अवजड!

कला आणि कलाकार यांच्यातला संवाद हा केवळ कलाकृतींच्या निर्मितीपुरता मर्यादित नसतो. तो एक सर्जनशील प्रवास असतो. अंतर्मनाच्या गाभ्यापासून जगाच्या

फ्रांज क्लाइनः काळ्या-पांढऱ्या दुनियेचा रंगवंत...



व्यापकतेपर्यंत. हा संवाद जितका खोल, तितकी कला प्रभावी. आणि तितकाच कलाकार अजरामर. ओऽऽ म्हापसेकर मधेच किती जड बोलता! असो.

तर क्लाइन मला खरंतर आतून उद्ध्वस्त करून गेला. मला उभा-आडवा नांगरून गेला. कधी कधी कलाकाराला वाटतं की, 'मी ही कला घडवत आहे', पण खरंतर त्याला घडवणारी ती कला असते. कलाकाराचं आयुष्य, त्याचे अनुभव, वेदना, आनंद या सर्वांचं सुंदर रूप म्हणजे कला. ती कलाकाराशी बोलते, 'मला पूर्ण कर, मला मुक्त कर.' आणि कलाकारही उत्तर देतो, 'मी तुझ्या रूपातून स्वतःला शोधतोय.' क्लाइनचे काळे-पांढरे रंग इतर सगळ्या रंगांना झाकोळून टाकतात. हीच ताकद असते कलाकाराची. १३ मे १९६२ रोजी वयाच्या ५२व्या वर्षी त्यांच्या कारकिर्दीच्या शिखरावर असताना फ्रांझ क्लाइन यांचं हृदयविकाराने निधन झालं.

***

चित्रकार कसा घडत जातो, या प्रश्नाचं उत्तर अनेक टप्प्यांमध्ये आणि विविध पातळ्यांवर देता येईल. एक, चित्रकार म्हणजे फक्त चित्रं काढणारी व्यक्ती नसून तो एक संवेदनशील, निरीक्षणशील, सर्जनशील आणि सतत शिकणारा कलाकार असतो. चित्रकार घडण्यासाठी केवळ हातात कला असणं पुरेसं नसतं. निसर्ग, माणसं, प्रकाश, छाया, रंगसंगती यांचं सूक्ष्म निरीक्षण हळूहळू एक कलाकार घडवू लागतं. तो केवळ बघत नाही, तर 'पाहू' लागतो. खोलात जाऊन. एखाद्या चित्रकाराचं वेगळेपण त्याच्या शैलीत, दृष्टिकोणात असतं. ही शैली सहज तयार होत नाही. ती अनुभव, प्रेरणा, आत्ममंथन आणि प्रयोगातून घडते. खूप कष्टाने ती शैली त्याला गवसते. कधी तो आपल्या गुरूपासून शिकतो, तर कधी वेळेच्या वादळात, भोवऱ्यात स्वतःला शोधत असतो. तर कधी इतर मोठ्या व्यक्तींकडून आदर वाटणाऱ्या ज्ञानवंतांमध्ये तो शोधतो.

आयुष्यातला तो एक महत्त्वाचा काळ असा मस्त बिझी होता. या काळात मी माझ्या कलेच्या कामामुळेच कितीतरी मोठमोठ्या लोकांच्या सहवासात आलो. माझ्या ऐन तरुण वयात ही प्रगल्भ, मोठ्या विचारांची माणसं मला गवसली. वेळ, काळ, सकाळ, दुपार, रात्र सगळं काही विसरायला होत असे या काळात. अशी कितीतरी माणसं आहेत. जागेअभावी प्रत्येकाबद्दल मला इथे सांगता येणार नाही. माझ्या हृदयातल्या कॅनव्हासवर ती कायमची रंगवली गेलेली आहेत. या लोकांनी कळत-नकळत माझ्यावर संस्कार केले. मला प्रगल्भ केलं. मला घडवलं.

***

लहानपणी गावातल्या दरवाजावर खडूने रेखाटलेल्या त्या रेषेने पुढे खूप मोठा प्रवास केला. ती रेषा आजपर्यंत तीच आहे. पण या सगळ्या मान्यवर, मोठ्या मंडळींमुळे या रेषेने कितीतरी नवनवीन रुबाबदार वळणं घेतली. लहानपणी हातात खडू घेतला होता. पुढे हातात पेन्सिल आली. स्केचपेन आलं. जे.जे.मध्ये असताना हातात ब्रश आला. आज हातात आयपॅड आहे. पण सगळीकडे रेषा तीच आहे. तिने फक्त कपडे बदलले आहेत. पण तिचा स्वर, आवाज, संवाद तोच आहे. या रेषेच्या अवतीभवती कितीतरी मोठी अदृश्य माणसं आहेत. यातल्या काहींना रेखाटून, त्यांच्या लेखांना, कवितांना चित्र काढून किंचितशी परतफेड केली आहे असं त्यांना वाटत असेल. पण मला नाही वाटत तसं. तसं वाटलं असतं तर या रेषेने माझा कधीच जीव घेतला असता.

***

असो. तर चित्रकार पॉल क्ली म्हणाला होता, 'रेखाटन म्हणजे एक रेषा फिरायला गेलेली आहे, इतकंच!'

मित्रांनो, आज माझी रेषा फिरून आली. आल्या आल्या तिने प्रवासातल्या गमतीजमती मला सांगितल्या. त्या फक्त मी तुमच्याशी शेअर केल्या इतकंच!

**प्रदीप म्हापसेकर हे प्रथितयश चित्रकार, व्यंगचित्रकार आहेत.**
**संपर्क : ९८२०० ७१९७५**

# दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

register no.: E13440(THn)


# मानव विकास ट्रस्ट ( महाराष्ट्र )





चला,

जेष्ठ नागरीक अनाथ मुले आणि निराधार मुलांचा आधार होऊ या ! त्यांना मदतीचा हात देऊ या ! जेष्ठ नागरीक काळजी केंद्र, अनाथ मुलांचे संगोपन आणि निराधार महिलांना आश्रय देणारा **''आनंदाश्रम''** **देशातील पहिला कौटुंबिक आश्रम** आमच्या या सेवा भावी कार्यात, आपणही सहभागी व्हा !


**आपले नम्र**

## मानव विकास ट्रस्ट


**Manav Vikas Trust**
Address : Village: Shiloshi, Post : Pali,
(One of Ashtvinayak)
Tal : Sudhagadh, District : Raigad,
Maharashtra,
Mob. 9821 301 345

**मानव विकास ट्रस्ट**
आनंदाश्रम
मु. शिलोशी, पो. पाली, (अष्टविनायक पैकी एक)
ता. सुधागड, जि. रायगड (महाराष्ट्र)
सर्व्हे नंबर ६५/३

**Bank Details**

NEFT DETAILS
NAME OF ACCOUNT : MANAV VIKAS TRUST
BANK NAME : THE DECCAN MERCHANT CO OPERATIVE BANK LTS
ADDRESS : SHOP NO 12-15, PREMISES RESIDENCY, SEC 11, KHARGHAR, NAVI MUMBAI
BRANCH : SERVICES
IFSC CODE : IBKL0501DMC
ACCOUNT NO. 0000121018001460


# मी एक दुवा



सुनील सुकथनकर







पुल, गौरी देशपांडे, अनिल अवचट...समृद्ध ज्ञानस्रोत

**वयाची साठी आली! बुद्धी नाठी होईल म्हटलं तर ती मुळातच कशी होती, हेही उमगलेलं नाही. पण नाही, नाही म्हटलं तरी 'मागे वळून पहायला' होतंच आणि मन भरून येतं. केवळ आठवणींच्या स्मरणरंजनाने नव्हे तर ऊर दाटून यावा अशा ऋणाच्या भावनेने. माझ्या जडणघडणीबद्दल काहीही लिहायला घ्यावं, बोलायला जावं म्हटलं की सुमित्रा भावे या व्यक्तिमत्त्वाच्या अविभाज्य संदर्भापासूनच सुरुवात होते. आम्ही तरुण मंडळींनी तिला तिच्याच आग्रहावरून 'अग सुमित्रा' म्हणायला सुरुवात केली आणि तिनेही हा मैत्रीपूर्ण बरोबरीचा धागा जागता ठेवला तरी आम्हा अनेकांच्या मनात तिचं ज्ञान, तिचा व्यासंग, विचक्षण चिकित्सक वृत्ती आणि संवेदनशील विश्लेषक दृष्टी यांबद्दल आदरच होता. अगदी जवळ जवळ चाळीस वर्षं तिचा साथीदार म्हणून काढल्यावर आमचं नातं तथाकथित 'गुरू-शिष्य' वगैरे कधीच नसलं तरीही माझ्या मनात ही ऋणाची भावना येतेच...**

तसा मी वाढलो एका प्रागतिक मध्यमवर्गीय कुटुंबात. वाचनाची आवड, नाटक आदी कलांवर प्रेम ही मूल्यं घरात होतीच. किंबहुना त्यामुळेच माझ्या आईने मला अभ्यासाबरोबरच नाटक, वक्तृत्व या गोष्टींमध्ये उत्तेजन दिलं. पण सुमित्राची मुलगी सती हिच्याशी मैत्री झाल्यावर त्यांच्या घरी ये-जा सुरू झाल्यावर सुमित्रा ही आम्हा तरुणांची हक्काची सल्लागार तर बनलीच, पण तिच्या रूपाने माझ्यासाठी एक नवं विश्वच उघडलं. आपलं छोटंसं घर निगुतीने केवळ नीटनेटकंच नव्हे, तर कलात्मक, देखणं ठेवणं; हस्ताक्षरापासून ते साडी नेसण्यापर्यंत प्रत्येक बाबींत रेखीवपणाचा आग्रह धरणं; स्वयंपाक ही विचारपूर्वक करण्याची, आनंद निर्माण करणारी बाब मानणं अशा रोजच्या जगण्यातल्या आनंद देणाऱ्या गोष्टी तर तिच्याकडून मिळत गेल्याच; पण त्याचबरोबर चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, साहित्य, नाट्य, बागकाम, दुर्मीळ दगड जमवणं अशा असंख्य कला-छंद क्षेत्रांतल्या स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय तपशिलांपर्यंत तिच्या नजरेतून आम्ही फेरफटका मारू लागलो. विशेषतः गुगल-पूर्व, खरंतर दूरदर्शनही बाल्यावस्थेत पाहिलेल्या आमच्या पिढीला अशी माणसं हीच ज्ञानाची प्रवेशद्वारं होती. सुमित्रा स्वतः तर होतीच, पण तिच्याकडे येणाऱ्या माणसांची जंत्रीही वाचणाऱ्याला माझा हेवा करायला भाग पाडतील! अर्थात ज्या माणसांविषयी मी बोलतोय त्यांचं महत्त्व जाणणाऱ्या लोकांनाच.

एके दिवशी सती आणि मी आमच्या नाट्यविषयक उचापती करत बसलो असताना एक शुभ्र पायजमा-सदरा धारण केलेले, अतिसौम्य मार्दव आपल्या सस्मित मुखावर बाळगणारे, तुळतुळीत टक्कलधारी गृहस्थ सुमित्राबरोबर प्रवेश करते झाले. मी तसा बरा वाचक असल्याने मी त्यांना तातडीने ओळखून आदराने उभा राहिलो. तरिही त्या सभ्य गृहस्थांनी 'नमस्कार, मी श्री. पु. भागवत' अशी स्वतःची ओळख करून दिली. त्यांच्या त्या विनयाने मी कोलमडलोच! माझ्यावरच्या श्रीपुंच्या प्रेमळ स्नेहाची ती सुरुवात होती. श्रीपु हे एक विनम्र पण परखड ज्ञानभांडार होते. चित्रपटाच्या कामासाठी मुंबईला अनेकदा जावं लागे तेव्हा आम्ही त्यांच्याकडे उतरत असू. ठाम आणि सडेतोड वाटणाऱ्या पण प्रेमळ विमलताई अगत्याने पाहुणचार करत. श्रीपु स्वतः अंथरूण घालून देत. मला कितीही संकोच वाटला तरी शेजारी बघत उभं राहावं लागे. त्याचं कारण एकही सुरकुती नसलेली चादर अंथरणं ही 'व्यामिश्र' प्रक्रिया फक्त त्यांनाच जमते, हा त्यांचा रास्त अभिमान होता. 'मौज प्रकाशना'ची एकाहून एक सरस आणि निर्दोष पुस्तकनिर्मिती कशी होत असेल हे त्या विना सुरकुती अंथरूण घालण्यातून कळत असे.

**ज्ञानसमृद्ध थांबे**

त्यांच्या डायनिंग टेबलवर असलेला पत्रव्यवहाराचा नीटनेटका ढीग, तिथेच मुक्कामाला असणाऱ्या श्रीनिवास विनायक कुलकर्णींशी त्यांच्या चाललेल्या 'अबोल' चर्चा, मधेच केव्हातरी जाड भिंगाचा विनोदी वाटणारा चश्मा घातलेले मंगेश पाडगांवकर गप्पाटप्पा करायला येऊन बसल्यावर चालणारा पाडगांवकरांचा दंगा आणि श्रीपुंचा त्यातही मंद स्मित करत असणारा सहभाग हे लोभस आणि भारावून टाकणारं तर होतंच, पण खूप शिकवणारंही होतं.

मुलाकडे परदेशी गेले की ते आंतरराष्ट्रीय चित्रपट पाहून येत आणि त्याबद्दल तासन्तास सांगत बसत. यात सुमित्राची लाडकी मैत्रीण गौरी देशपांडे सोबत असली की एक वेगळीच धमाल येई. श्रीपुंच्या गंभीर शांततेमुळे या दोघी खदाखदा हसू लागत. 'हास्य ही कशी निरागस गोष्ट आहे' असं गंभीरपणे म्हणून श्रीपु पुन्हा बोलत राहत आणि या दोघी डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसत राहत. श्रीपु स्वतःला कलावंत मानत नसत. पण चोखंदळ आणि गाढ्या रसिकाशिवाय कलावंत अपूर्णच असतो, हे तत्त्व त्यांच्याकडे पाहूनच उमजत असे. साहित्यव्यवहार किंबहुना एकूणच कलेच्या प्रांतातल्या घडामोडी ही किती गंभीरपणे घेण्याची गोष्ट आहे याची समज मला तिथे मिळाली. गंभीरपणे म्हणजे लांब चेहरा करून नव्हे, तर अपरंपार प्रामाणिकपणे. श्रीपु नेमके कोण होते, हे नव्या पिढीला सांगणं कठीण आहे. ते आधी उत्कृष्ट कला-आस्वादक होते आणि नंतर साक्षेपी संपादक होते. ते लेखकासमोर, त्याच्या-तिच्या प्रतिभेसमोर नम्र असत आणि तरीही आपल्या परखड मतांनी ती कलाकृती अधिक समृद्ध करण्याच्या असोशीने ते बेचैन होत. या त्यांच्या गुणातून त्यांनी अनेक लेखक त्यांच्या संपादनप्रक्रियेद्वारा घडवले असं म्हणता येईल. डॉ. लागू, तेंडुलकर, विजया मेहता आदी धुरीणांनी चालवलेल्या रंगायन नाट्य चळवळीचे ते अध्यक्ष होते. हा महत्त्वाचा काळ म्हणजे माझ्या जन्मापूर्वीचा इतिहास असला तरी या माणसांमुळे मला तो निदान जवळून परिचयाचा झाला.

सुमित्राकडेच दररोज येणारे म्हणजे डॉ. अनिल अवचट आणि डॉ. सुनंदा (अनिता) अवचट हे दाम्पत्य. पुढे ते माझ्यासाठी सुनंदामावशी आणि अनिलकाका झाले. सुनंदामावशी दिवसभर मनोरुग्णालयात काम करून शिवाय संध्याकाळी डॉ. बाबा आढाव यांच्या निवासस्थानी हमाल पंचायतीसाठी मोफत दवाखाना चालवत असे. तिला स्कूटरवर सोडून अनिलकाका सुमित्राकडे येऊन बसे. सुमित्रा आणि तो या दोघांची कित्येक वर्षं अव्याहत टिकलेली मैत्री हाही एक माझ्या अभ्यासाचा विषय आहे. अनिलकाका त्या काळात गर्दच्या विळख्याचा अभ्यास करत होता. तेव्हापासून ते पुढची तीस-पस्तीस वर्षं सुमित्रा त्याच्या नव्या लिखाणाची पहिली श्रोता होती आणि नंतर नंतर मी चांगलं वाचन करतो, हे कळल्यावर त्याचं नवं ताजं लेखन वाचून दाखवण्याचा सन्मानही मला मिळू लागला.


अनिलकाकाचं लिखाण हा संकुचित मध्यमवर्गाला त्याने दाखवलेला दुर्लक्षित जगाचा आरसा आहे, असं मला वाटतं. वेश्या, देवदासी, हमाल, बुवाबाजीचे बळी, डोअरकिपर, बिडी कामगार, दलित चळवळ, अनेक निरलस कार्यकर्ते आणि त्यांचं अफाट काम हे सगळं त्याच्याशिवाय कोण पोतडीत घालून आम्हा सुरक्षित लोकांपर्यंत आणून पोहोचवणार होतं? आज चंगळवाद हा आपला जन्मसिद्ध हक्क मानणारे आणि जगातल्या भयानक प्रश्नांनी जराही - विषण्ण तर सोडाच पण - विचलितही न होणारे महाभाग पाहिले की मला अनिलकाकाला मनोमन धन्यवाद द्यावेसे वाटतात. आज प्रत्येक दिवशी जाणवणारी सामाजिक बोच ही त्याने दिलेली देणगी आहे. आताच्या पिढीला ओरिगामी करणारा, बासरी वाजवणारा, अनेक कलांत निष्णात असा 'बाबा' म्हणून माहीत असणारा हा माणूस जीव धोक्यात घालून सत्याचा शोध घेणारा पत्रकार-लेखक, संघटक, कार्यकर्ता होता, हेही सांगायला हवं.

त्या काळात आम्ही एक 'मित्र-मैत्रिणींचा पार' असा गप्पांचा प्रकल्प सुरू केला होता. त्यात मी आणि सती यांनी अनिलकाका आणि सुनंदामावशीची मुलाखत घेतली होती. त्यांचं प्रेम, सहजीवन, मुलांचं संगोपन या विषयांवर ते दोघंही सुंदर बोलले. आम्हा तरुणांना आयुष्य जगण्याचं असं एक निराळं मॉडेल प्रत्यक्ष बघायला मिळणं ही दुर्लभ संधी होती. सुनंदामावशी म्हणजे सुमित्राच्या पाठोपाठ मी पाहिलेली दुसरी खणखणीत करिअरिस्ट बाई. तिची शिस्त, न श्रमता अखंड कामात राहण्याची वृत्ती आणि मानसिक आरोग्याबद्दल असणारी अनन्यसाधारण जाण हे सगळं स्तिमित करणारं होतं. अगदी तेव्हा सुमित्रा किंवा ती - दोघी - घालत असलेले सुरवार-कुर्ता वगैरे पोशाख, कापलेले केस आम्हा मुलांना दिपवून टाकणारे होते! नकळत आमच्या स्त्री-मुक्तीविषयक जाणिवा प्रगल्भ होत होत्या.

त्यात दणदणीत स्वरात भर टाकली ती गौरीने! तिची सुमित्राकडे झालेली माझी ओळख ही ओळख न राहता तिच्या आणि माझ्या एका 'प्रेमकहाणी'चीच सुरुवात होती. तिचा उंच बांधा, छोटे केस, जीन्स-टी शर्ट किंवा चुरगळलेली बंडी हा पोशाख, आगाऊ वाटेल असं पण अत्यंत योग्य असं भसाभस बोलणं, जगाला फाट्यावर मारणारी विनोदबुद्धी आणि सुमित्राशी असणारी अतिरेकी मैत्री सारंच थक्क करणारं होतं. तिला आम्ही अर्थातच गौरीमावशी म्हणत असू. पण तिने मला ते 'मावशी' संबोधन डिलिट करायला लावलं. पण केवळ हे म्हणजे गौरी नव्हती. विंचुरणीला तिच्याकडे न कळवतासुद्धा गेल्यावर तिच्या घरासमोर असणाऱ्या तळ्याच्या एका बाजूने ग्रामीण पद्धतीची हाळी दिल्यावर ती स्वतः होडी चालवत न्यायला यायची आणि मग दिवस-रात्र गप्पा रंगायच्या. तिला स्वतःच्या हाताने स्वयंपाक करून आम्हाला खाऊ-पिऊ घालायला अतिशय आवडायचं. तिच्या लोकप्रिय बंडखोर लेखिका प्रतिमेपेक्षा कुणाला ते निराळं वाटू शकणारं होतं. पण मला तो तिच्या अनेकरंगी व्यक्तिमत्त्वाचा एकसंध भागच वाटायचा.

ओल्ड मंकमध्ये लिंबू पिळून छान लागतं किंवा

प्रा. महेश एलकुंचवार आणि अनिल अवचट



कॉफीमध्येही रम चांगली लागते हे ज्ञानकणही मी तिथेच टिपले. ती परदेशाहून परत येऊन सुमित्राकडे एक टप्पा खाऊन मग विंचुरणीला जाई. खूप आधी मला तिचं पत्र येई आणि त्यात भरपूर बीअर आणून ठेवण्याचा आदेश असे. माझी बीअरशी ओळख आणि नंतर जडलेलं प्रेम ही तिच्यापासून झालेली सुरुवात आहे. तिच्या लिखाणातून आणि जगण्यातून, तिच्याशी मारलेल्या गप्पांमधून आणि पत्रांमधून एक निराळी मूल्यव्यवस्था मला उलगडत गेली; आवडत गेली. ज्याला व्यक्तिवादी म्हणता येईल असं निर्भय जगणं; त्यासाठी किंमत मोजायला तयार असणं; निर्णयांची जबाबदारी घेणं; जगाला न भिणं; असंख्य वेळा मनःपूर्वक अनेकांच्या प्रेमात पडणं; तरीही काही नाती हळुवारपणे जपणं; शारीरिकतेविषयी न संकोचता बोलणं; एकूणच रसिकतेने झोकून देऊन जगत राहणं आणि त्यातून आपलं साहित्य निर्माण करणं हे सारं तिच्याकडून मी शिकायचा प्रयत्न केला, असं मी मानतो. मराठी आणि इंग्लिश दोन्ही भाषांवर प्रेम आणि प्रभुत्व, खुशवंतसिंह, डॉ. गोरवाला अशा महान लोकांबरोबर काम करण्याचा अनुभव यांमुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाला आलेली झळाळी विसरता येणारी नाही. व्यायाम म्हणून दररोज पळायला जाणारी आणि सिगरेट कमी करण्यासाठी विणकाम हाती घेणारी गौरी हा एक नमुना होता. मोल्सवर्थची डिक्शनरी काढून कुठला तरी खुस्पटातला शब्द शोधत बसलेल्या गौरी आणि सुमित्रा यांनी माझं भाषा या गोष्टीवर मुळातच असणारं प्रेम निःसंशय दृढ केलं.

साहित्य आणि साहित्यिक हा माझा जिव्हाळ्याचा विषय होताच. आजोळी बेळगावला आई-आजीचं बोट धरून लहानपणी इंदिरा संतांच्या घरी गेल्याचं आठवतं. त्यांची पांढऱ्या नऊवारी लुगड्यातली शांत, तेजस्वी प्रतिमा मनात राहिली. माझं लहानपण कराडला गेलं. प्रकाश नारायण संत यांच्या पत्नी (म्हणजे लंपनची सुमीच की!) ही तर माझ्या आईची शाळेतली मैत्रीण. त्यामुळे संतही कराडला ओझरते भेटलेले आठवतात. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या पत्नीकडे माझा भाऊ शिकवणीला जात असे. त्यांच्या वाड्यात कधीतरी डोकावल्यावर दिसलेले घरगुती श्रीनिवास आठवतात. त्यांचं साहित्यिक मोठेपण आईला कळत होतं, पण माझं ते वय नव्हतं. श्रीनिवास यांचं गूढ नसलेलं पण अबोल असं हळूहळू आवडत जाणारं व्यक्तिमत्त्व नंतर परिचयाचं झालं. त्यांच्या लिखाणात आढळणारा साध्या गोष्टींमधल्या अज्ञाताचा शोध

**अभ्यासक स्त्री त्या दोघींना विचारते, 'तुम्ही कोणती तीन मूल्यं श्रेष्ठ मानता?' त्या तिला प्रतिप्रश्न करतात, 'तू काय मानतेस?' ती उत्तर देते, 'स्वातंत्र्य, समता आणि न्याय.' त्या उत्तरतात, 'प्रेम, सेवा आणि आत्मसन्मान'. मग त्यांच्यात चर्चा होते, 'कदाचित वेगळ्या प्रकारे आपण तेच म्हणतो आहोत का?' मला हा प्रसंग या अभ्यासात सापडलेल्या मूळ तत्त्वापर्यंत नेणारा वाटतो.**

मला अत्यंत आकर्षक वाटतो. पण तो उलगडून सांगत बसतील असा त्यांचा स्वभाव नाही. त्यांच्या सहज-साध्या बोलण्यातून आपणच त्याचा शोध लावायचा!

### इतिहासाचे शिल्पकार

मी माझं अर्धंमुर्धं लिखाण करू लागलो. ते सुमित्राकडे वाचून दाखवायला बसलो की दोन श्रोते नक्की समोर असत. सुमित्राचे आई-वडील. सांगलीजवळच्या वाळवा इथे तालेवार घरात जन्मलेल्या मोठ्या आई या खूप कमी शिकलेल्या,पण शास्त्रीय संगीत जाणणाऱ्या आणि घरात स्वतःची शरच्चंद्र चटर्जी यांच्या सर्व कादंबऱ्या असणारी लायब्ररी बाळगणाऱ्या. त्यांच्याशी झालेल्या गप्पांमध्ये पत्री सरकारच्या (प्रतीसरकार) रोमहर्षक इतिहासापासून ते भूमिगत असणारे साने गुरुजी स्वयंपाकघरात मदत करत येऊन बसल्याच्या कहाण्या उलगडत. महाराष्ट्राचा हा स्त्री-मुखातून येणारा इतिहास निराळाच वाटे. त्या इंजिनिअर किंवा लेखक किंवा दोन्ही नक्की झाल्या असत्या. खरंतर होत्याच!

नवऱ्याचं घर सोडून आलेल्या सुमित्राला त्यांनी स्वतःच्या गच्चीत छोटं घर स्वतः डिझाइन करून बांधून दिलं होतं. त्या स्त्री-मुक्तीचं एक वेगळं रूपच होत्या. सुमित्राचे वडील-भैय्यासाहेब उमराणी - बाबाआजोबा - हे धोतर, बंडी, सदरा, काळी टोपी घालणारे. दृष्टी अधू झाली तरी ८० वर्षं वयानंतरही चालत हौस म्हणून नोकरीला जाणारे, तंबाखू मळून खाणारे वरकरणी साधे वाटणारे होते. पण त्यांच्याकडे त्यांचे जे बालमित्र येत त्यांना या कविमनाच्या, अफाट वाचन करणाऱ्या व्यासंगी मित्राचा अभिमान होता. त्यांचे बालमित्र

होते – नानासाहेब गोरे, एस. एम. जोशी, जस्टिस तारकुंडे, शिरूभाऊ लिमये, गोपीनाथ तळवलकर. या साऱ्यांना मला जवळून पाहता आलं, त्यांच्या गप्पा ऐकता आल्या हा खूप आनंदाचा ठेवा आहे. समाजवादी विचारधारेचा महाराष्ट्रातला एक मोठा मोलाचा कालखंड – जो आज नव्या इतिहासलेखनात पुसून टाकला जातो आहे – तो मला साक्षात त्या इतिहासाच्या शिल्पकारांकडूनच ऐकता आला. आज प्रयत्न करूनही मला उथळ, बेजबाबदार किंवा एकांगी मूलतत्त्ववादी होताच येणार नाही! याचं श्रेय त्यांनाच जातं. सुमित्राचे हे साधे दिसणारे वडील बोरिस पास्तरनाक, दस्तेव्हस्की, काम्यू, सोल्झेनित्सिन, लॉरका, टॉलस्टॉय, झोला, शॉ, रिल्क, इलियट असे अगणित लेखक कोळून प्यायले असतील, असं वाटत नसे. अफाट वाचन आणि त्यातून मिळणारं ज्ञान माणसाला अहंकार विसर्जित करून शांत, विनम्र, उदार आणि सहिष्णू कसं बनवतं, याचा ते मूर्तिमंत आदर्श होते. आजही त्यांची आठवण मनातले अनेक कोलाहल शांत करते.

सुमित्रा ज्या 'स्त्री–वाणी' या संशोधन प्रकल्पात काम करत होती, तिथल्या प्रमुख फ्रान्सिस मारिया या बाई हा एक माझ्या आयुष्यात नवा अध्याय सुरू करणाऱ्या आहेत. लिथुवानियामधून विस्थापित होऊन अमेरिकेत गेलेल्या कुटुंबातल्या या ख्रिश्चन बाई. तीस देशांत यूएनओ तर्फे काम करून भारतातच शेवटचे दिवस घालवायला आलेल्या. त्यांचा गांधीविचार आणि समाजकार्य यावर प्रबंध होता. म्हणून त्या गांधींच्या देशात शेवटी आल्या. सुमित्राचा अभ्यासाचा विषय तोच असल्याने त्यांची गट्टी जमली. त्यांच्यासोबत सुमित्राने अनेक संशोधनं केली. त्यातल्याच दलित स्त्रियांच्या आत्मकथन प्रकल्पावर 'बाई' हा लघुपट बनवण्याची मुभा त्यांनी सुमित्राला दिली आणि चित्रपट कसा बनवतात हे जराही माहीत नसलेल्या आम्ही सर्वांनी चित्रपट क्षेत्रात पहिलं पाऊल टाकलं. त्यामुळेच पुढे मी फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये शिकायलाही गेलो. पण फ्रान्सिसबाईंचं तेवढं एकच ऋण नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असणारा येशू ख्रिस्त आणि गांधी यांच्या प्रेरणेतून आलेला करुणेचा झरा त्यांच्या वर्तनात परिवर्तित होताना दिसत असे.

'स्त्री–वाणी'मध्ये सुमित्राचा स्त्री–मुक्तीच्या भारतीय विचाराची मांडणी करण्याचा जो प्रयत्न चालू होता, त्याला त्यांचं खंबीर पाठबळ होतं. माझ्या फिल्म इन्स्टिट्यूटच्या प्रशिक्षणानंतर मी 'स्त्री–वाणी'च्या अनेक उपक्रमांत स्वयंसेवकगिरी करत होतो. तिथे अनुभवाला आलेलं वातावरण, कामाची उतरंड नसलेली फेमिनिस्ट पद्धत, सभोवतालच्या वस्तीतल्या लोकांशी फ्रान्सिसने तयार केलेले भावबंध हे सर्व नवी मूल्यं शिकवणारं होतं. फ्रान्सिस ज्याला मानसपुत्र किंवा खरंतर नातू मानत होती, असा एक वस्तीतला मुलगा HIV बाधित झाला. फ्रान्सिसला हा मोठाच धक्का होता. त्यातूनच तिने तिची पेन्शनची पुंजी आमच्या हवाली करून आम्हाला या विषयावर चित्रपट बनवायला सांगितला. 'दोघी'नंतर बनवलेली आमची दुसरी फीचर फिल्म 'ज़िन्दगी ज़िन्दाबाद'. या काळात फ्रान्सिसचं वेगळं स्वरूप बघायला मिळालं. ख्रिश्चन कर्मठपणा तर तसाही तिच्यात नव्हताच, पण या मुलाच्या माध्यमातून उलगडणारे लैंगिक साहस आणि अत्याचार यांचे थक्क करणारे अनुभव फ्रान्सिस तिचं वय विसरून शांत मनाने समजून घेत होती. कोणत्याही प्रकारे जजमेंटल न होता. मला वाटतं, तिच्यातूनच आम्हाला या प्रश्नाकडे बघण्याची व्यापक, प्रगल्भ दृष्टी मिळाली.

**स्त्री शक्तीचे देणे**

सुमित्राच्या या अभ्यासांपैकी एक होता – महिलांच्या

फ्रान्सिस मारिया, सुमित्रा भावे आणि सती...



मनावर पगडा असणाऱ्या मिथकांचा अभ्यास. हा करण्यासाठी ग्रामीण भागात अनेक महिलांचा गट जात असे. त्यात खांद्यावर व्हीडिओ कॅमेरा घेऊन मीही. हा सारा मोठ्या वयाच्या स्त्रियांचा जत्था जीपमधून जाताना गंभीर विश्लेषणापासून टवाळखोर फिरक्या घेत केलेल्या चिंतनापर्यंत जे काही करत असे ते ऐकत राहावंसं वाटे. त्यात विद्या बाळ, सरिता पदकी अशा अनेक जणी होत्या. एक नव-स्त्री-मुक्तीवादी तरुण म्हणून त्यांनी माझ्यावर कौतुकमिश्रित प्रेमही केलं. त्यापूर्वी काही वर्षं आधी विद्याताईंनी आमच्या 'अनुभव' या नाटकाच्या ग्रूपबद्दल आम्हा तरुणांचं मनोगत मला 'स्त्री' मासिकात लिहायला सांगितलं होतं. मला लेख लिहायला प्रथम प्रवृत्त करणाऱ्या संपादक विद्याताईच होत्या. या सगळ्या जणी आपापल्या व्यक्तिमत्त्वानुसार, वयानुसार, सांसारिक अनुभवानुसार, सामाजिक-साहित्यिक कामाच्या पार्श्वभूमीनुसार स्त्री-मुक्ती या संकल्पनेकडे पाहत असत. त्यांच्या रूपाने माझ्या स्त्री-मुक्तीविषयक समजुती आणि गोंधळ यांचा पडताळा मी घेत असे. आज मागे वळून पाहताना लक्षात येतं, माझ्यासाठी हा प्रवास म्हणजे एक विचारवर्गच होता. यात 'मंगळसूत्र हा केवळ आकर्षक दागिना की गुलामीचं प्रतीक' इथपासून ते 'तुमच्या कोकणात होणाऱ्या ओल्या खोबऱ्याच्या वापरापेक्षा आमचं दाण्याचं कूट अधिक श्रेष्ठ' इथपर्यंत वाद रंगत! त्यांत कानावर पडलेल्या ज्ञानाचा वापर केल्याशिवाय आजही माझा दिवस जात नाही!!

सुमित्राबरोबर मी लेखनिक-सहकारी म्हणून तिच्या गांधीविचाराच्या स्त्री-नेत्यांच्या अभ्यासातही अनेकांना भेटलो. वलसाडजवळ पिंडवळ या आदिवासी गावात राहून काम करणाऱ्या कांता आणि हरविलास शहा या दोन स्त्रिया. त्यांचे कांतीभाई आणि नवनीतभाई हे दोन पुरुष सहकारी. चौघेही अविवाहित. तरुण वयापासून एकत्र राहणारे. गांधींचा द्वेष करणाऱ्या वडिलांची मुलगी अकाली विधवा होऊन परत आलेली कांताबेन आणि जैन साध्वी होऊ पाहणारी हरविलासबेन अचानक भेटल्या आणि विनोबांच्या भाषेत 'एका आध्यात्मिक मैत्री'ची सुरुवात झाली. त्यांच्या आयुष्यावर - त्यांच्यासारख्या दोन गांधीविचाराच्या स्त्रिया आणि एक शहरी स्त्री-मुक्ती अभ्यासक यांच्यामधल्या - म्हटलं तर 'काल्पनिक' संवादावर - आम्ही 'संवाद' हा चित्रपट बनवला. विनोबांच्या प्रेरणेतून आदिवासी भागात सुरू केलेलं कार्य, सोबत राहतानाच्या अनुभवांतून आलेली समाजकेंद्री प्रगल्भता, स्त्रीशक्ती या संकल्पनेचा आध्यात्मिक शोध, आणीबाणीच्या काळात जयप्रकाश आंदोलनात घेतलेला सहभाग, तरीही विनोबांवर असीम प्रेम - श्रद्धा, कांताबेनची कॅन्सरशी लढाई - असं त्यांचं आयुष्य उलगडणारा चित्रपट करताना सुमित्राला त्यांच्यात जे स्त्रीशक्तीचं नवं मूल्य सापडलं, ते स्त्री-मुक्ती चळवळीला समृद्ध करणारं होतं.

पुरुषसापेक्षता सोडून देऊन आत्मनिर्भर होणं हा त्यातला एक भाग आणि 'विस्तारित मातृत्वाची संकल्पना' हा दुसरा भाग. मातृत्व जर गौरवस्पद असेल तर त्यासाठी शारीरिक मातृत्वाची काय गरज? स्त्री-पुरुष कोणीही 'माता' होऊ शकेल. तेही कुटुंब किंवा छोट्या संकुचित गटापुरतं मर्यादित नव्हे, तर मोठ्या समाजापर्यंत विस्तारलेलं मातृत्व. त्यांच्या आयुष्याकडे पाहताना सुमित्राने लिहिलेला 'संवाद'मधला एक प्रसंग. अभ्यासक स्त्री त्या दोघींना विचारते, 'तुम्ही कोणती तीन मूल्यं श्रेष्ठ मानता?' त्या तिला प्रतिप्रश्न करतात, 'तू काय मानतेस?' ती उत्तर देते, 'स्वातंत्र्य, समता आणि न्याय.' त्या उत्तरतात, 'प्रेम, सेवा आणि आत्मसन्मान'. मग त्यांच्यात चर्चा होते - 'कदाचित वेगळ्या प्रकारे आपण तेच म्हणतो आहोत का?' मला हा प्रसंग या अभ्यासात सापडलेल्या मूळ तत्त्वापर्यंत नेणारा वाटतो. स्वतंत्र असल्याशिवाय तुम्ही प्रेम करूच शकत नाही. प्रेम तुम्हाला समता शिकवतं आणि न्यायबुद्धीही जागृत ठेवतं. सेवा करताना आत्मसन्मान जागा नसेल, तर तुम्ही गुलामीच स्वीकारल्यासारखं होईल. समजायला म्हटलं तर हा सोपा विचार अंगीकार करता करता अधिकाधिक उमजू लागतो.

याच प्रकल्पात भेटलेलं एक अभूतपूर्व जोडपं म्हणजे कृष्णम्मा आणि जगन्नाथनजी. त्यांच्या प्रेमकहाणीवर मला कधीतरी तमिळ भाषेत फीचर फिल्म करायची आहे. घरातून पळून गेलेली दलित मुलगी सौंदरम रामचंद्रन या सधन बाईंना एका मिशनरी शाळेत सापडते आणि त्या तिला शिकवून मोठं करतात. अगदी गांधींच्या दक्षिण दौऱ्यात सेवेसाठी तिला नेमतात. त्या वेळी समोरच्या गर्दीत सधन जमीनदारी, घर सोडून आलेला ब्राह्मण तरुण कार्यकर्ता असतो - जगन्नाथन. घरच्या आग्रहाला बळी पडून हा तरुण लग्न करायचं ठरवतो, ते या दलित मुलीशी. विवाह न करण्याचा निश्चय केलेली





लढ्यांचे दस्तावेजीकरणः मेधा पाटकर आणि कांताबेन-कांतीभाई...

ही मुलगी अखेर होकार देते. देशाला स्वातंत्र्य मिळालं, तरच विवाह करायचा असा निश्चय ती दोघं करतात. देश स्वतंत्र होतो. नवऱ्या मुलाने कातलेलं सूत त्यांचा अमेरिकन मित्र त्या दोघांना गुंडाळतो आणि त्यांचा विवाह संपन्न होतो. भूदान चळवळीत झोकून दिलेल्या या दाम्पत्याला विनोबा ब्रह्मचर्य स्वीकारायला सांगतात. जगन्नाथन त्याला ठाम नकार देतात आणि वैवाहिक जीवन हा स्वतःचा अधिकार आहे, असं आपल्या गुरूला समजावतात. (८५ वर्षांचे जगन्नाथनजी डोळे मिचकावत ही कथा आम्हाला सांगतात.) सर्वांचा विरोध पत्करून नक्षलवादी आणि जमीनदार यांच्या संघर्षाने पेटलेल्या तंजावरमध्ये एकट्या जाऊन कृष्णम्मा शांतता प्रस्थापित करतात. देवस्थानांनी बळकवलेल्या जमिनी दलित महिलांच्या नावावर करतात. ही अभूतपूर्व कहाणी त्या सांबार ढवळत ढवळत इतक्या सहजतेने सांगत होत्या की वाटावं एखादी गृहिणी पोराबाळांच्या घरगुती गोष्टी सांगते आहे. त्यांचा निरोप घेऊन निघताना मी स्त्रीशक्तीचं मूर्तिमंत दर्शन घेतल्याच्या अवस्थेत येतो. या सगळ्यात त्या जोडप्याचा आगळावेगळा रोमान्स. त्यांच्याविषयी बोलू लागलो की आजही मी वाहवत जातो. एखाद्या 'समाजासाठी' काम नव्हे तर त्यांच्यात 'सामावून जाऊन' काम करणं; राजकारण आणि दहशत याला सहज-सुलभ अहिंसेने सामोरं जाणं, यांचा कृष्णम्माच्या व्यक्तिमत्त्वातून माझ्या मनावर उमटलेला ठसा कधीच न मिटणारा आहे.

थोडं मागे जातो. १९८३-८४. सुमित्राबरोबर नुकतीच काही काळ सहकारी म्हणून काम केलेली एक स्त्री आम्हाला रूपालीत भेटली. सुमित्रा मुंबईचं काम सोडून 'स्त्री-वाणी'मध्ये कामाला सुरुवात करत होती. त्या स्त्रीनेही ते मुंबईमधलं काम नुकतंच सोडलेलं होतं. सुमित्राने माझ्या वक्तृत्व स्पर्धा वगैरेबद्दल सांगितल्यावर ती म्हणाली, 'अरे, मी पण रानडे वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिक मिळवलं होतं एके काळी.' त्या स्त्रीलाही कदाचित सुमित्राबरोबर 'स्त्री-वाणी'मध्ये काम करायला आवडलं असतं, असं ती सुमित्राला सांगत होती. पण गुजरातमधल्या एक संस्थेबरोबर केलेल्या अभ्यासाने ती अस्वस्थ होती. त्या होत्या मेधाताई. मेधा पाटकर. त्यांना मोठं क्षितिज खुणावत होतं. नंतर गेली चाळीस वर्षं चालणारं नर्मदा बचाओ आंदोलन हा इतिहास तर सर्वश्रुतच आहे. पुढे १९९४ साली आम्ही नर्मदा घाटीत जाऊन 'लाहा' हा लघुपट बनवला. त्या वेळी दोन-तीनदा तिथे गेलो. एखाद्या देवीसारखं तळपणारं मेधाताईंचं रूप पाहिलं. अपार कष्ट, कुशाग्र बुद्धिमत्ता आणि अहिंसक क्रांतीवर असणारा गाढ विश्वास म्हणजे मेधाताई. संपूर्ण अंधारात समोर कृत्रिम फुगलेली नर्मदा आणि डोक्यावर आकाश अशा वातावरणात सुमित्रा आणि मेधाताई गप्पा मारत बसलेल्या शेजारी बसून अनुभवणं हा शब्दांत न मावणारा अनुभव आहे. आयुष्याच्या साध्या साध्या आठवणींपासून ते लढ्याची राजकीय वळणं आणि जागतिक संदर्भ इथपर्यंत चालणाऱ्या या गप्पा. आजही अनेक टप्प्यांवर मेधाताई भेटत राहतात. त्यांचा साधेपणा आणि प्रचंड आवाका असणारं प्रखर नेतृत्व बघून मी वारंवार अचंबित होत राहतो.

**ज्ञानसाधकांचे ऋण**

पुल आणि सुनीताबाई हे जोडपं महाराष्ट्राच्या मनोविश्वात किती मोलाचं स्थान मिळवून आहे हे सांगायला नको. आम्ही मुलं मी लिहिलेलं 'पळसाला पान पाच' हे नाटक करायचो. त्याच्या प्रयोगाला त्या दोघांनी यावं अशी आमची इच्छा होती. तो काळच साधा होता. आम्ही त्यांच्या निवासस्थानी थडकलो. पुलंनी प्रेमाने स्वागत केलं. पण त्यांचे मित्र जी. ए. कुलकर्णी यांच्या आजारपणामुळे येणं शक्य नाही, असं सांगितलं. दुर्दैवाने काही दिवसांत जीएंचं निधन झालं. पुढे पुलंनी आपणहून 'नाटकाला येतो आहे' असं कळवलं. त्यांना नाटक खूप आवडलं. पण आम्ही रंगमंचाच्या फुलं-नारळ वाहून केलेल्या पूजेबद्दल त्यांनी आमची चांगलीच कानउघडणी केली. आमच्या ग्रूपमध्ये आम्हा पाच लोकांपैकी आम्ही काही जण त्या पूजेच्या विरुद्ध होतो, हे त्यांना सांगत बसण्यात अर्थ नव्हता. पण त्यांचं ते बुद्धिप्रामाण्यवादी रूप मनात राहिलं. अनिलकाकाच्या 'गर्द' पुस्तकाचा परिणाम म्हणून पुल आणि सुनीताबाई यांनी 'मुक्तांगण' ही संस्था सुरू करण्यासाठी देणगी दिली. 'मुक्तांगण'च्या निर्मितीवर आम्ही एक स्लाइड शो केला. त्यासाठी पुल आणि सुनीताबाई यांच्या घरी त्यांचे जवळून फोटो काढता आले. त्यांचा वातावरण हलकं करणारा नर्म विनोद अनुभवता आला. पुढे आमच्या 'दोघी' चित्रपटाच्या स्पेशल शोला उभयता आले. मध्यंतरात 'छायाचित्रण जरा धूसर आहे' अशी तक्रार करून मग हळूच 'माझ्याच चश्म्यावर अश्रू जमत होते वाटतं,' अशी विनोदामागे दडलेली प्रेमळ प्रशंसाही त्यांनी केली. त्यांच्या लिखाणावर आज नवनवे आक्षेप येताहेत. कुणी त्यांना मध्यमवर्गीय म्हणून दूषण देतं. कुणी उजवीकडे ओढतं, तर कुणी डावीकडे. पण मला त्यांच्यामध्ये दिसलेला पुरोगामी, विचारी, मानवतावादी, उदार, बुद्धिमान विचारवंत माझ्या मनात ठाम वस्तीला आहे. त्यांच्या डोळ्यांतून मी – आम्ही अनेकांनी – जग पाहिलं; कला समजून घेतली; संस्कृतीचा अर्थ शोधला. गमतीने त्यांनी रंगवलेल्या गांधीवादी आचार्य किंवा अतिविशाल महिला, अनेक 'पुरुषी' विनोद यांपेक्षा मला हे तत्त्वचिंतक पुलं 'खरे' वाटतात.

आईसोबत सुमित्रा भावे, सुनील सुकथनकर आणि राधामावशी...



आमच्या तीन चित्रपटांत तीन थोर लेखकांनी अभिनय केला. 'वास्तुपुरुष'मध्ये महेश एलकुंचवार, 'नितळ'मध्ये विजय तेंडुलकर आणि 'एक कप च्या'मध्ये कमल देसाई. एलकुंचवार-महेशदा मला कायम 'हिरो' वाटायचे, वाटतात. त्यांचं दिसणं, रुबाब आणि बुद्धिमत्ता सर्वच. 'वास्तुपुरुष'च्या काळात त्यांना जवळून अनुभवता आलं. कुटुंब आणि नातेसंबंध यांची वीण त्यांनी जशी मांडली आहे, अशी क्वचितच कुणाला जमली असेल. बाईचं मन आतून कळणारा हळवा पुरुष लेखक म्हणून आणि एक चिंतनशील तत्त्वज्ञ म्हणून ते मला सतत काहीतरी देत राहतात. तेंडुलकर आठवले की त्यांचं शांत आश्वासक 'ऐकणं' आठवतं. नव्या तरुणांचं म्हणणं सकारात्मक ऊर्जेसहित ऐकणारा म्हणून मला 'तें' आठवतात. बदलत्या समाजव्यवस्थेला समजून घेणारा आणि न घाबरता प्रश्न विचारणारा, जुनाट मूल्यांवर हल्ला करणारा आणि नव्या मूल्यांना आग्रहाने प्रस्थापित करणारा असा द्रष्टा कलावंत माझ्यासमोर अभिनयातला नम्र विद्यार्थी म्हणून उभा राहत असे, यावर माझाच विश्वास बसत नाही. माझ्यासारख्या खूपच लहान वयाच्या दिग्दर्शकाला (चित्रीकरणाच्या दरम्यान माझा वाढदिवस आल्यामुळे) त्यांनी 'शहाणा होऊ नकोस रे, बाबा' असा आशीर्वाद दिला होता आणि कमलताई तर मनस्वी चक्रमपणाचा अर्कच. कोकणात आमच्या चित्रीकरणात नऊवारीतल्या आजीसारख्या वावरणाऱ्या त्या अचानक जड इंग्लिश शब्द वापरून साहित्य आणि सौंदर्यशास्त्रावर किशोर कदमशी बोलू लागत, तेव्हा भोवतालची साधी माणसं आश्चर्याने खाली पडायची बाकी राहत. सुमित्रा, विद्या बाळ आणि पुष्पा भावे यांना मी एकदा गाडीतून सांगलीला

कमलताईंकडे घेऊन गेलो होतो. त्यांच्या प्रदीर्घ गप्पा मी चित्रित केल्या. त्या चौघी जणी एकत्र पाहणं म्हणजे महाराष्ट्राच्या एका मोठ्या वारशाचं साक्षीदार असणं होतं माझ्यासाठी. विक्षिप्त वाटावं इतक्या बेधडक जगणाऱ्या, बोलणाऱ्या कमलताई मला माझ्या आजी वगैरे न वाटता एक तरुण तडफदार मैत्रीणच वाटायच्या.

सुमित्रा ज्यांच्याकडे नृत्य शिकत असे, त्या गुरू पंडिता रोहिणी भाटे – बेबीताई – यांच्या आठवणीशिवाय हा ज्ञानवंतांचा गोतावळा पूर्ण होणार नाही. पारंपरिक कर्मठ पुण्यात कथ्थक रुजवणाऱ्या, आपण स्वतः ठरवलेल्या नियमांनुसार आयुष्याचा खेळ खेळणाऱ्या बेबीताई. त्यांनी अनेक नृत्यांगना तर घडवल्याच पण त्यांना त्यांच्या विद्यार्थिनींशी बोलताना पाहून–ऐकून जाणवायचं की त्या त्यांना आयुष्य शिकवताहेत. कलाकार स्त्रीचा झगडा बहुपेडी असतो. तिच्यावरच्या पारंपरिक अपेक्षा तिला मागे खेचत असतात. अनेक कलावंत स्त्रिया यात कदाचित हरूनही जातात. पण आपल्या कलेला एका अमर्याद ध्यासाचं स्वरूप द्यायला बेबीताईंनी अनेक जणींना शिकवलं.

सुमित्राच्या एक ज्येष्ठ मैत्रीण उषाताई मोडक या अशाच एक मागच्या पिढीतल्या, स्वातंत्र्यपूर्व काळात स्कर्ट घालून बॅडमिंटन खेळणाऱ्या! त्यांनी आम्हाला भेट दिलेला प्रोजेक्टर वापरून आम्ही आमचे पहिले लघुपट गावोगावी दाखवले. आमचा 'चाकोरी' हा लघुपट त्यांच्याच देणगीतून तयार झाला. अनेक सामाजिक संस्थांना मदत करणाऱ्या उषाताई विपश्यना, ध्यानधारणेच्या आचार्य होत्या. गुरुजी सत्यनारायण गोएंकाजी यांच्या अनेक सेंटर्सवर चालणाऱ्या शिबिरांच्या त्या आचार्य होत्या. त्यांच्यामुळे आम्हीही विपश्यना शिकलो. जयपूरच्या सेंटरचे प्रमुख रामसिंहजी यांचं आमच्यावर प्रेम बसलं आणि विपश्यना या विषयावर आम्ही सेवा म्हणून अनेक चित्रीकरणं करायचं ठरलं. स्वतः गोएंका गुरुजींचा जवळून सहवास मिळाला. (अनेक वर्षं साधना करणारे साधक गुरुजींना भेटलेही नाहीत. पण आम्ही मात्र चक्क त्यांच्याबरोबर त्यांच्या पत्नींनी वाढलेले गरम गरम फुलके खाल्ले आहेत. हा एक पोरकट आनंद!) गुरुजी खरंच विपश्यना करून 'स्थिरावलेले' स्थितप्रज्ञ वाटत. पण सहज व्यवहारी गप्पाही मारत. त्यांना असणारी दिलीपकुमार या अभिनेत्याची आवड (त्यांच्या भाषणात अनेकदा 'दिलीपकुमार टोन' लागत असे, असं



ध्येयनिष्ठ निर्मितीचे भागीदार : सुमित्रा भावे आणि सुनील सुकथनकर

माझं मत!) विपश्यना हा शास्त्रीय मार्ग असल्याबद्दलची ठाम भूमिका, हा संन्याशाचा मार्ग नसून संसारात राहून साध्य करण्याचा रस्ता आहे, हे स्वतःच्या उदाहरणातून सांगणारे होते. त्यांच्या या सहज सहवासातून काहीतरी 'पारलौकिक पुण्य' मिळावं अशी अपेक्षा नव्हतीच. तेही तसा दावा करत नसत. त्यामुळे आयुष्य आनंदाने जगत जगत प्रत्येक संवेदनेकडे तटस्थपणे बघत राहणं हा त्यांनी दिलेला मूलमंत्र साधकाच्या चिकाटीने अंगीकारता आला नाही, तरी ती दृष्टी मनात ठेवून वाट चालण्याचा प्रयत्न चालू आहे.

आमच्या पिढीने अनेक मोठी माणसं पहिली. काहींच्या बाबतीत अधिक सहवासाची आस राहिली. मन भरलं नाही पण जे मिळालं त्यातून दिशा मिळत गेली. समीक्षा प्रांतातले ऋषितुल्य विद्वान अरुण खोपकर आमच्या 'बाई' लघुपटाच्या काळात पहिल्यांदा भेटले. नंतर अनेकदा भेटी होत राहिल्या. त्यांच्या मृदू सभ्य बोलण्यात मधूनच डोकावणारा 'आडदांड शिवराळपणा' त्यांच्या भाषाप्रभुत्वाचा तर भाग आहेच, पण टोकदार विनोदबुद्धीचाही. अनेक टप्प्यांवर ते भेटत राहिले. आजही कधीतरी फोनवर आमच्या प्रदीर्घ गप्पा रंगतात. त्यांचा अनेक भाषांमधून अविरत चालणारा अभ्यास आणि त्यातून निर्माण होणारं मातृभाषेतलं लेखन हा अनेक वर्षं पुरणारा खजिना आहे. मला माझ्याच गळक्या झोळीचं दुःख होतं. क्वचित होणाऱ्या भेटी–फोन–ई मेलमधून 'अनुशेष' भरून काढणं चालू राहतं.

ज्यांना मनातून गुरू मानवं असे गुलज़ारजी. 'ज़िन्दगी ज़िन्दाबाद' या आमच्या दुसऱ्याच चित्रपटासाठी त्यांनी गीते लिहिली. त्यांचं ते ऑफिस, सरकत्या दारावर असणारा चाळिशीमधल्या गुलज़ारजींचा देखणा मोठाला फोटो, त्यांच्या बैठकीमागे असणारं त्यांच्या लाडक्या मीनाकुमारी यांचं तैलचित्र, 'काला पानी पिलाता हूं', असं म्हणून त्यांनी पिलवलेला नमकीन काळा चहा, त्यांनी फारसी लिपीत लिहिलेलं गीत गंभीर आवाजात सांगणं आणि मी ते माझ्या वहीत लिहून घेणं हे शॉट बाय शॉट आठवत राहतं. अनेक वर्षांनी गुलज़ारजी एका कार्यक्रमात भेटले. म्हणाले, 'सुना है, अब तुम खुद ही गानें लिखने लगे हो! मेरी ज़रूरत नहीं पड़ती?' त्यांच्या त्या अनपेक्षित प्रेमळपणाला अजून उत्तर सापडलेलं नाही. उलट 'असं काय करू की उगीचच तुमचा अधिकाधिक सहवास मिळत राहील' असा बालिश प्रश्न मनात आलेला कसा विचारावा, कळत नाही.

नसीरजी हे माझे कॉलेज काळापासूनचे हिरो. फिल्म इन्स्टिट्यूटच्या स्टडी टूरवर असताना आम्ही काही जण त्यांच्याकडे जाऊन थडकलो होतो. 'आपल्या' संस्थेचे विद्यार्थी म्हणून त्यांनी आम्हाला घरातही घेतलं. थोड्या गप्पा मारून आम्ही निघताना कडेवर छोट्या बाळाला घेऊन उभ्या असणाऱ्या नसीरजींनी माझ्या पाठीवर सहज थाप मारली. ते मी बरेच दिवस मिरवत होतो. जवळ जवळ तीस वर्षांनी 'फिर ज़िन्दगी'मध्ये त्यांना दिग्दर्शित करताना मला हा प्रसंग आठवत होता. आज त्यांच्या नाट्यप्रयोगानंतर आत भेटायला गेल्यावर ते प्रेमाने जवळ घेतात तेव्हा समाधानाचं एक वतुर्ळ पूर्ण होतं. त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातल्या या ज्ञानवंतांनी खूप दिलं. सतत सहवास मिळाला असता तर हवाच होता. पण जे मिळालं त्याचा आधार घेत बाकी स्वतःहून चाचपडत राहायला मजा येतेच.

या आणि अशा अनेक ज्येष्ठ व्यक्तींच्या मांदियाळीची आठवण येते. डोळे पाणावतात. यातले अनेक जण आज नाहीत, ही भावना मनाला ग्रासते. वयाच्या अनेक टप्प्यांवर यांनी जे दिलं, ते आता पुढच्या पिढीला यथाशक्ती देत राहण्याची धडपड करत राहणं, एवढं तरी किंवा एवढंच आपल्या हातात आहे, हे लक्षात येतं. उतराई होण्याचा तोच एक मार्ग आहे. या सर्वांना पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करणारा, मी एक दुवा आहे, इतकंच!

❋ ❋ ❋

**सुनील सुकथनकर हे सामाजिक भान जपलेले पुरस्कारप्राप्त पटकथा लेखक, दिग्दर्शक आहेत.**

**संपर्क:** sunilsukthankar@gmail.com

## हलकं-फुलकं



एक कुत्रा रेल्वे रुळांच्या शेजारी बसला होता. रुळांवरून एक ट्रेन धडधडत आलेली त्याला कळली नाही, कळून त्याने उडी मारली तोवर ट्रेनने त्याच्या शेपटीचा छोटा तुकडा तोडला होता. शेपूट तुटलेल्या कुत्र्याने ट्रेनचा सूड घेण्याचा निर्धार केला. दुसऱ्या दिवशी तो त्या रुळांपाशी जाऊन सजगतेने बसला. ट्रेन धडधडत आली तसा त्याने तिचा पाठलाग करून तिचा चावा घेण्यासाठी तिच्यावर झेप मारली. ट्रेनच्या चाकांखाली त्याचं मुंडकं धडावेगळं झालं.

...लहानसहान गोष्टींसाठी डोकं गमावू नये, म्हणतात, ते खोटं नाही.

- मामुमियां

# उपोद्घात

स्वातंत्र्यदिनाआधी दोन दिवस मी आणि सुमती (जोशी) पार्कमध्ये चालायला गेलो होतो. तासभर रपेट केली. आजूबाजूला मोठ्या झाडांची दाटीवाटी आहे, विस्तीर्ण लॉन आहे. माणसे तुरळक. निसर्गाच्या कुशीत. एक तळे आहे. पाखरे काहीबाही वेचीत बागडत होती. उन्हे निसटू पाहत होती. दिवसभर पोहून थकलेली बदके किनारी येऊन विसावली होती. या मग्न तळ्याकाठी आम्ही दोघे बसलो होतो.

असे किती स्वातंत्र्यदिन येऊन गेले. भारताची स्थिती. जगाची परिस्थिती. नरसंहार. काहीसे उद्विग्न वाटले. पण क्षणभरच. गतकाळात गुंतलो. प्रजातींची निर्मिती आणि अस्त चालूच असतो. माणसाच्या ज्ञानधिष्ठित उपप्रजाती टिकल्या, तगल्या. बाकीच्या हळूहळू संपल्या. असे मला गतकालाकडे बघितले म्हणजे दिसते. प्रामाणिकपणा हा ज्ञानाचा महत्त्वाचा पैलू. अप्रामाणिक ज्ञान टिकत नाही. याचे उदाहरण म्हणजे हिरोशिमा, नागासकी. अणुऊर्जा अप्रामाणिक ठरली. त्यावर आपोआप नियंत्रण आले. प्रामाणिकपणा हा ज्ञानात अंगत म्हणजे अंगभूत रचनेत असतो. ज्ञानाधिष्ठित उपप्रजाती, समाज निर्माण करायला नेता लागत नाही. गॅलिलिओ म्हणाला होता, 'समाजात हिरो असणे ठिकाय, पण ज्या समाजाला हिरो लागतो, तो समाज मात्र दुर्दैवी.' त्याच्या या विधानाचा गाभा मला या तळ्याच्या मग्नतेत स्पष्ट होत होता.

प्रत्येक मनुष्यात (प्रामाणिक) ज्ञानाचे कमी-जास्त आकर्षण आणि ऊर्मी निसर्गत: असतेच. समाजातील परिस्थिती, पर्यावरणानुसार याला खतपाणी मिळणार की हे सुकून जाणार हे ठरते. समाजातील ज्ञानाकर्षित समूह अल्पसंख्य का बहुसंख्य यावर त्या समाजाची उत्क्रांती ठरते. म्हणजे हा समाज तगून राहणार का संपणार, हे ठरते. उत्क्रांतीतील नैसर्गिक निवड व्यक्तीवर तसेच समूहावर प्रभाव टाकत असते. समाजातील ज्ञानाकर्षित व्यक्ती निसर्गनिवडीने जीवनसंघर्षात तगून राहते. अशा ज्ञानाकर्षित व्यक्ती ज्या समाजात संख्येने जास्त असतील, त्या समाजाची निवड निसर्गात उत्क्रांतीने होत असते. तो समाज जीवनसंघर्षात तगून जातो. जैवविज्ञानाच्या परिभाषेत Individual Selection and Group Selection. गॅलिलिओ म्हणतो, 'ज्ञानाकर्षित मनुष्य हा समाजाचा एकक, हा महत्त्वाचा. म्हणून जो समाज 'हिरो'वर अवलंबून असतो, तो दुर्दैवी. कारण त्या समाजात ज्ञानाकर्षित व्यक्ती अल्पसंख्य असतात.' माणूस हा अनुकरण करणारा प्राणी आहे. तो हिरोचे अनुकरण करत नाही. तो फक्त हिरो वर्शिपिंग करतो. पण तो जवळच्या माणसाचे अनुकरण करण्याची शक्यता जास्त असते. म्हणून जवळची व्यक्ती ज्ञानाकर्षित असेल, तर अशा व्यक्तीचे अनुकरण दुसरा मनुष्य करण्याची शक्यता जास्त. ज्या समाजात ज्ञानाकर्षित व्यक्ती बहुसंख्य तो पुढे जाणार हे ओघाने आलेच. ज्ञानाकर्षित व्यक्ती एकमेकांना आकर्षित करत असतात. माझे असे हे विचार कदाचित भाबडे असतील, पण ते माझ्यातील विद्यार्थ्याला अभ्यास करायला उद्युक्त करतात, उभारी देतात.

**– डॉ. आनंद जोशी**
**१५ ऑगस्ट २०२५**
**न्यू कॅसल, इंग्लंड.**


# सर्वज्ञानसंपन्न अवलिया



डॉ. मोहन द्रविड

संवादोत्सव २०२५





डॉ. जे.बी.एस. हॉल्डेन

**नेहरू गेले. त्या पाठोपाठ हॉल्डेन. हॉल्डेन जन्माने ब्रिटिश, पण नेहरूंच्या आग्रहाखातर भारतात आले. इथलेच झाले. 'टाइम' साप्ताहिकात शेवटच्या चार पानांत जगात त्या आठवड्यात निवर्तलेल्यांना श्रद्धांजली वाहिलेली असे. ते पान मी उलटलं आणि एक चांगलाच धक्का बसला. तिथे फोटो होता डॉ. हॉल्डेन यांचा! मथळा होता, 'रशियाच्या जाळ्यात सापडलेला सर्वात मोठा मासा!' शास्त्रज्ञ हॉल्डेन? मी गोंधळून गेलो. ही मासिकं अमेरिकन. यात कर्तृत्वपर लेख अर्थात, ऑबिच्युअरी आली म्हणजे माणूस जगप्रसिद्ध असला पाहिजे. बरं, मग रशियाच्या जाळ्यात, ही काय भानगड आहे? हा माणूस आहे तरी कोण? गणिती की शास्त्रज्ञ? की दोन्ही शब्दांचा अर्थ एकच धरायचा?**

एकोणीसशे चौसष्ठ सालची गोष्ट. मी तेव्हा व्हीजेटीआयमध्ये बी.ई.च्या पहिल्या वर्षाला होतो. 'सकाळ'च्या दैनिक 'मराठा'मध्ये मोठ्या अक्षरात मथळा होता, 'सुप्रसिद्ध गणिती जे.बी.एस. हॉल्डेन यांचे निधन'. आमच्या घरचे सगळे आचार्य अत्रे आणि त्यांचं वर्तमानपत्र 'मराठा' यांचे चाहते होते. त्यांचा खमंग आणि खुसखुशीत अग्रलेख वाचल्याशिवाय आमचा दिवस चालू होत नसे. बातमीत पुढे लिहिले होते, 'डॉ. हॉल्डेन जन्माने ब्रिटिश होते. पण त्यांनी आपली मायभूमी सोडून भारताचं नागरिकत्व स्वीकारलं होतं.'

### तऱ्हेवाईक वैज्ञानिक

आतल्या पानावर त्यांचा पंडित नेहरूंबरोबर फोटो होता. मला नंतर कळलं की त्यांचे आणि नेहरूंचे इंग्लंडपासून घनिष्ठ संबंध होते. इतके की बहुधा ते नेहरूंच्या विनंतीला मान देऊनच आपली मातृभूमी सोडून भारतात आले होते. त्याच वर्षी (१९६४ साली) मे महिन्यात नेहरू गेले. त्यानंतर काही महिन्यांतच डॉ. हॉल्डेन यांचंही जाणं व्हावं, हा मला योगायोग वाटला. ते वयानेही साधारण नेहरूंइतकेच. नेहरू केंब्रिजला होते, तर हॉल्डेन ऑक्स्फर्डला. आमच्या आजूबाजूचे लोक 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स' ही वर्तमानपत्रं घेत असत. त्या वर्तमानपत्रांत काही ही बातमी आली नव्हती. मला वाटले, असेल कोणी तरी विक्षिप्त माणूस.

मी आमच्या कॉलेजच्या वाचनालयात दर शुक्रवारी संध्याकाळी 'टाइम' आणि 'न्यूजवीक' ही साप्ताहिकं वाचायला जात असे. (व्हीजेटीआयला शनिवारी सुटी असे.) इंग्लिश सुधारणेच्या मोहिमेत ही दोन साप्ताहिकं आणि 'रीडर्स डायजेस्ट' आम्ही व्रत घेतल्यासारखं वाचत असू. 'टाइम' साप्ताहिकात शेवटच्या चार पानांत जगात त्या आठवड्यात निवर्तलेल्यांना श्रद्धांजली वाहिलेली असे. ते पान मी उलटलं आणि एक चांगलाच धक्का बसला. तिथे फोटो होता, डॉ. हॉल्डेन यांचा! मथळा होता, 'रशियाच्या जाळ्यात सापडलेला सर्वात मोठा मासा!' शास्त्रज्ञ हॉल्डेन? मी गोंधळून गेलो. हा माणूस जन्माने ब्रिटिश. राहायचा भारतात. ही मासिकं अमेरिकन. यात कर्तृत्वपर लेख – ऑबिच्युअरी – आली म्हणजे माणूस जगप्रसिद्ध असला पाहिजे. बरं मग रशियाच्या जाळ्यात ही काय भानगड आहे? हा माणूस आहे तरी कोण? गणिती की शास्त्रज्ञ? की दोन्ही शब्दांचा अर्थ एकच धरायचा?

### खंदकात बसून शोधनिबंध

'न्यूजवीक' वाचायला घेतला. 'तैलबुद्धीचा पण तऱ्हेवाईक जीवशास्त्रज्ञ' हा मथळा होता. त्याच्याबद्दची त्यांच्यावरची मते आली होती. 'माझ्या माहितीतला सर्वात हुशार माणूस!' ब्रिटिश नोबेल पारितोषक विजेते शास्त्रज्ञ डॉ. पीटर मेडवार यांचे उद्गार. वॉट्सन-क्रिक या डीएनएची डबल हीलिक्स ही रचना शोधून काढणाऱ्या संशोधकांतल्या जेम्स वॉटसन यांनी हॉल्डेन यांचे वर्णन 'सर्वात हुशार आणि विक्षिप्त जीवशास्त्रज्ञ' असे केले आहे.

त्यांच्याकडे बी.एस्सी.च्या दोन पदव्या होत्या. एक जीवशास्त्रात आणि दुसरी संख्याशास्त्रात. दुसरी पदवी हातात पडते ना पडते, तोच पहिले महायुद्ध सुरू झाले आणि हॉल्डेन ब्रिटिश सैन्यात भरती झाले. तिथे त्यांनी खंदकात बसून एक शोधनिबंध लिहिला. फ्रान्स आणि मेसोपोटेमियात लढताना ते जखमी झाले. दुसऱ्या वेळी त्यांना उपचारासाठी सिमल्यातील आर्मी हॉस्पिटलमध्ये पाठवले. त्या वेळी त्यांना झालेल्या जखमा अधिक गंभीर असल्यामुळे ते नऊ महिने भारतात राहिले. त्या वेळी हॉस्पिटलच्या नोकरवर्गाबरोबर त्यांची चांगली गट्टी जमली. 'ज्या देशावर आपण राज्य करतो तिथल्या लोकांची आपल्याला मामुलीही ओळख नाही, याची मला खंत वाटली,' त्यांनी पुढे आपल्या आत्मचरित्रात लिहिलं. त्यांचे वेगळंपण या प्रसंगापासून कळतं. हॉस्पिटलच्या निरोप समारंभात ते म्हणाले, 'मी पुढच्या वेळेस भारतात येईन, तेव्हा तुमच्या पारतंत्र्याच्या बेड्या तुटलेल्या मला बघायच्या आहेत.'


हॉल्डेन इंग्लंडला परत आल्यानंतर काही महिन्यांत (नोव्हेंबर १९१८) युद्ध संपलं. पुढच्या वर्षाच्या मे महिन्यात आर्थर एडिंग्टन आणि वॉटसन-डायसन या दोन इंग्लिश शास्त्रज्ञांनी आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर एक प्रयोग करायचे योजले होते. ॲल्बर्ट आइन्स्टाइन (यांचे नाव अजून घरोघरी झाले नव्हते.) यांनी १९१९ साली एक क्रांतिकारी सिद्धान्त मांडला होता. तो सिद्ध झाला तर विज्ञानशाखेची इमारत कोसळून पडणार होती. तो बरोबर की चुकीचा आहे, याची एक कसोटी म्हणजे सूर्याच्या गुरुत्वाकर्षणाखाली प्रकाशकिरण किती वाकतो, हे निरीक्षण. तो प्रयोग करण्यासाठी अनेक गोष्टी जुळून याव्या लागतात. सूर्याच्या जवळ असलेले तारे सूर्यग्रहणाच्या वेळीच दिसतात. त्यांची जागा पूर्वी अनेक

वर्षं केलेल्या निरीक्षणांमुळे माहीत असते. त्या ताऱ्यांपासून पृथ्वीकडे येणारा प्रकाशकिरण सूर्याजवळून येतो. जर तो वाकला, तर त्याची जागा बदलेल. सुदैवाने आकाश निरभ्र होते आणि सूर्यग्रहण चांगले दोन मिनिटांचे होते. तो प्रयोग झाला. आइन्स्टाइन यांच्या सिद्धान्ताप्रमाणे प्रकाशकिरण वाकला आणि सिद्धान्त सिद्ध झाला. सर्व वर्तमानपत्रांत त्याचा गाजावाजा झाला. घराघरांत विज्ञानाची बातमी एवढ्या निनादाने जावी, असा तो एक दुर्लभ क्षण होता.

एवढा गाजावाजा झाला तरी तो सिद्धान्त लोकांना कळेना. असा एक विनोद आहे की एडिंग्टन एकदा आइन्स्टाइन यांना म्हणाले, ''असे म्हणतात की तुमचा सिद्धान्त जगातल्या फक्त तीन माणसांनाच कळला आहे.'' आइन्स्टाइन यांनी विचारलं, ''तिसरा कोण?'' सायन्स कितीही अवघड असले तरी ते सामान्यांना समजले पाहिजे हे हॉल्डेन यांचे मत त्यांच्या सहकाऱ्यांना माहीत असल्याने ते सहकारी हॉल्डेनना म्हणाले, ''आइन्स्टाइन यांचा सिद्धान्त वाचा आणि आम्हाला समजावून सांगा.'' हॉल्डेन म्हणाले, ''तुम्ही हायस्कूल पास झालेली दहा मुलं आणा. मी त्यांना शिकवतो. आपण एक प्रश्नपत्रिका तयार करूया आणि त्यांची कसोटी घेऊया.'' आइन्स्टाइन यांचा सिद्धान्त त्यांनी पुढे 'Daily Worker' या वृत्तपत्रात 'Relativity' आणि 'Fourth Dimension' या दोन निबंधांत स्पष्ट करून सांगितला.

विज्ञान कितीही कठीण असले तरी लोकांना ते समजले पाहिजे, या पंथाचे ब्रिटनमध्ये बरेच शास्त्रज्ञ होते. खुद्द एडिंग्टन त्या मताचे होते. त्यांच्याव्यतिरिक्त ज्युलियन हक्स्ली, बर्ट्रांड रसेल असे अनेक विचारवंत होते. अशी नामवंत मंडळी विज्ञानाचे शिक्षण द्यायला असणे म्हणजे त्या वेळचे सर्वसाधारण वाचक – विशेषतः विद्यार्थी – नशीबवान असले पाहिजेत. भारतातून परत गेल्यानंतर हॉल्डेन यांनी काही कोर्सेस केले. सिमल्यात असताना आणि नंतर त्यांनी अनेक शोधनिबंध लिहिले. त्यांच्या जोरावर उच्च पदवी नसतानाही (फक्त बी.एस्सी. असताना) त्यांना आधी ऑक्सफर्ड आणि नंतर केंब्रिज युनिव्हर्सिटीत लेक्चरर म्हणून नेमले गेले. पुढे तर त्यांनी अनेक पीएच.डी. विद्यार्थ्यांना गाइड केले. त्यात जयकर, द्रोणम राजू, सैगल असे अनेक भारतीय संशोधक होते. त्यांनी भारतात आणि परदेशात मोलाचे संशोधन केले.






जेबीएस यांच्या ग्रंथसंपदेची झलक...

### आंतरज्ञानशाखीय प्रज्ञावंत

जीवशास्त्रातल्या अनेक शाखांत हॉल्डेन यांनी काम केले. विशेषतः शरीरशास्त्र, आनुवंशिकता व उत्क्रांती यांचा परस्परसंबंध आणि जीवशास्त्रातील गणित (Mathematical Biology). डार्विनच्या अनेक सिद्धान्तांना त्यांनी गणिताचे बळ दिले. त्यांनी जनुकांचे नकाशे केले आणि हिमोफिलिया आणि रंगअंधत्व या व्याधी क्ष गुणसूत्रातील (X chromosome) दोषामुळे होतात हे दाखवले. रशियन राजपुत्र अलेक्सीचा हिमोफिलियाचा आजार इंग्लंडची महाराणी (म्हणजे अलेक्सीची आजी, आईची आई) व्हिक्टोरियाच्या क्ष गुणसूत्राशी जोडला. दोन वेगळ्या पण सारख्या प्राण्यांच्या (उदाहरणार्थ, घोडा आणि गाढव किंवा वाघ आणि सिंह) संकरातून होणाऱ्या संततीबद्दल त्यांनी नियम काढले. ते 'हॉल्डेनचे नियम' म्हणून ओळखले जातात. आफ्रिकेत सिकल सेल अनिमिया हा एक रक्तक्षयाचा आनुवंशिक रोग आहे. अशा लोकांना हिवताप (मलेरिया) होत नाही हे त्यांनी दाखवले. किंवा त्यांना मलेरियापासून अबाधिता (immunity) मिळते.

गर्भाशयाच्या बाहेर बशीमध्ये फलन (in vitro fertilization) करण्याची कल्पना त्यांची. क्लोन आणि क्लोनिंग हे शब्द त्यांचे. पृथ्वीवरील जीवसृष्टी ही निर्जीव अणूरेणूंपासून कशी झाली असेल, त्या रसायनाचे मॉडेल त्यांनी जीवरसायनशास्त्राच्या आधारावर तयार केले. त्या रसायनाला हॉल्डेन यांनी 'आदिप्रकृतीचे सार' असे नाव दिले. (अशा प्रकारचे स्वतंत्र संशोधन आठ वर्षे आधी सोव्हिएत शास्त्रज्ञ ओपॅरिन यांनी केले होते, पण हे नंतर कळले.) उत्क्रांती हा

त्यांचा दुसरा लाडका विषय होता. त्यावर त्यांनी लिहिलेले 'उत्क्रांतीची कारणं' हे पुस्तक त्या विषयातले मार्गदर्शक मानले जाते. 'मनुष्यातील आनुवंशिक बदलाचा वेग' हा त्यांचा शोधनिबंधही त्या विषयातील पहिला आहे.

**वैश्विक नि व्यापक दृष्टी**

हॉल्डेन यांना पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, आध्यात्म, तत्त्वज्ञान, भूगर्भशास्त्र, वास्तुशास्त्र, उत्क्रांती, प्राणांची वर्तणूक, ग्रीक, लॅटिन अशा विषयांत नुसती गतीच नव्हती, तर त्या विषयांवर त्यांचे लिखाण होते. पण त्यांचे संशोधन होते, ते जीवशास्त्र आणि संख्याशास्त्रात. विसाव्या शतकात दोन्ही शास्त्रांचा संगम होत होता. त्यात फिशर यांच्यासारखे संख्याशास्त्रातले गाढे अभ्यासक होते. फिशर हे हॉल्डेन यांचे समवयस्क होते आणि हॉल्डेनसारखाच त्यांचा अनेक विषयांचा अभ्यास होता. केंब्रिजमध्ये ते गणितात पहिले आले होते. त्यांना विसाव्या शतकातला सर्वात मोठा संख्याशास्त्रज्ञ (Statistician) मानले जाते. दुपारच्या जेवणाच्या वेळी होणारे त्या दोघांचे विविध विषयांवरील वाद ऐकायला विद्यार्थी आणि शिक्षकांची गर्दी होत असे.

एका विषयावरचा हॉल्डेन आणि फिशर यांच्यातील वाद फार रंगत असे. बिगरगोरे लोक गोऱ्या लोकांच्या तुलनेने

मानसिक आणि बौद्धिक क्षमतेत कमी आहेत का? फिशर यांचा दृष्टिकोण पारंपरिक होता, सनातनी होता. त्यांचे म्हणणे गोरे लोक सर्व परींनी बिगरगोऱ्यांपेक्षा श्रेष्ठ आहेत. आश्चर्य म्हणजे, त्यांच्या दोन सहकाऱ्यांपैकी एक भारतीय होता आणि एक घानाचा होता. दुसऱ्या महायुद्धासारखे संकट जगावर परत येऊ नये म्हणून १९५० साली युनेस्कोने 'समानता पत्रक' काढले होते आणि ते जगातील सर्व विचारवंतांकडे पाठवून त्यांना या पत्रकाला अनुमोदन देण्याची विनंती केली होती.

**एवढा गाजावाजा झाला तरी तो सिद्धान्त लोकांना कळेना. असा एक विनोद आहे की एडिंग्टन एकदा आइन्स्टाइन यांना म्हणाले, ''असे म्हणतात की तुमचा सिद्धान्त जगातल्या फक्त तीन माणसांनाच कळला आहे.'' आइन्स्टाइन यांनी विचारलं, ''तिसरा कोण?''**

त्यावर सही करायला फिशर यांनी नकार दिला. त्यांच्याबरोबर होणाऱ्या वादांमध्ये हॉल्डेन विरुद्ध भूमिका घेत. पहिल्या युद्धात भारत, इराक, इजिप्त यांसारख्या बिगरयुरोपीयन देशांत ते फिरून आले होते आणि त्यांचा दृष्टिकोण विस्तारला होता.

हॉल्डेन यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे बरेचसे धोकादायक प्रयोग ते स्वतःवर करत. (हे ते स्वतःच्या वडिलांकडून शिकले होते.) ब्रिटनच्या पाणबुडीला एकदा एक अपघात झाला. त्यात अनेक ब्रिटिश सैनिक मरण पावले. तेव्हा माणूस किती हवेच्या दाबापर्यंत राहू शकेल, हे ठरवण्याकरता त्यांनी स्वतःवर प्रयोग केला. अशाच एका अघोरी प्रयोगात त्यांच्या कानाच्या पडद्याला भोक पडले. ते काही दिवसांनी भरून आले. 'ते भरून आले नसते तर मला माझ्या पाइपचा धूर नाकासारखा कानातूनही काढता आला असता,'' ते म्हणाले. एकदा असाच प्रयोग करत असता त्यांच्या पाठीच्या कण्याला चीर पडली आणि तो त्रास त्यांना आयुष्यभर सोसावा लागला.

**कडवा समाजवादी**

१९३५ सालानंतर अशा दोन घटना घडल्या की त्यांच्या दृष्टिकोनात पालट झाला. पहिली घटना म्हणजे स्पेनमधील यादवी युद्ध. त्यानंतर आलेल्या दुसऱ्या महायुद्धामुळे ते युद्ध काहीसे झाकोळले गेले असले, तरी त्या काळात त्याने जगाला हादरे दिले होते. युरोप संपूर्णपणे डावा–उजवा, पुरोगामी–प्रतिगामी असा दुभंगला होता. स्पेनमध्ये निवडणुका झाल्या त्या डाव्या पक्षांनी जिंकल्या आणि राजाला काढून लोकशाही प्रजासत्ताक राज्य जाहीर केलं. विरुद्ध पक्ष कर्मठ कॅथलिक होता. त्याने लष्कराला बंड करायला उद्युक्त केले. लष्कर प्रमुख फ्रँको हा माथेफिरू खिश्चन होता. त्याला हिटलर आणि मुसोलिनीचा आर्थिक आणि लष्करी पाठिंबा होताच, पण ब्रिटनचाही होता. लष्कराला विरोध करायला जगभरचे लोकशाहीवादी लोक शस्त्रे घेऊन आले. अमेरिकेतल्या लोकांनी त्यांची 'लिंकन ब्रिगेड' पाठवली. कशाचाही परिणाम झाला नाही. फ्रँको टिकला एवढेच नाही तर त्याने आणखी ३६ वर्षे राज्य केले.

हॉल्डेन कडवे समाजवादी झाले. त्यांच्या आयुष्यातली दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे ते त्यांची मुलाखत घ्यायला आलेल्या वृत्तपत्रकाराच्या प्रेमात पडले. ती कम्युनिस्ट




समाजवादी विचारधारेचे पुरस्कर्ते हॉल्डेन स्वतःवर वैज्ञानिक प्रयोग करताना...

होती. त्या वेळी कम्युनिस्ट पक्ष 'डेली वर्कर' या नावाचे दैनिक प्रसिद्ध करत असे. ती त्यांना घेऊन त्या दैनिकाच्या ऑफिसमध्ये आली. त्यांना संपादकांनी दर आठवड्याला विज्ञानावर एक लेख लिहिण्याची विनंती केली. असे लेख लिहिण्यात त्यांचा हातखंडा होता आणि आवडही होती. १९५० साली ते दैनिक (आणि पक्ष) सोडेपर्यंत त्यांनी ४०० लेख लिहिले. त्या काळात त्यांनी सोव्हिएत युनियनला अनेक फेऱ्या मारल्या आणि तिथल्या शास्त्रज्ञांची आणि त्यांनी केलेल्या प्रयोगांची जगाला ओळख करून दिली. त्यांच्या दोन वर्षे आधी त्यांच्या पत्नीने पक्ष सोडला आणि त्यांनाही सोडले. इतके असूनही पती-पत्नींनी पक्षाबद्दल कटुता बाळगली नाही की पक्षातील त्यांच्या वास्तव्याचे भांडवल केले नाही. किंबहुना पुढील आयुष्यात त्यांनी आपले राजकारण बदलले नाही किंवा ब्रिटिश सरकारला त्याच्या साम्राज्यवादी धोरणाबद्दल झोडपायचे थांबवले नाही. जेव्हा सोव्हिएत युनियनने स्पुटनिक सोडला आणि जेव्हा अवकाशात जाणारा गागारिन हा पहिला मानव ठरला, तेव्हा त्यांनी सोव्हिएत युनियनचे तोंड भरून कौतुकच केले. अवकाशात मानवाच्या शरीरावर होणारे परिणाम याचा अभ्यास करण्याची संधी हुकल्याबद्दल मात्र ते हळहळले!

### जातिवंत लेखक नि निरीक्षक

१९५७ साली सुवेझ कालव्याबद्दल ब्रिटिश सरकारने घेतलेली भूमिका त्यांना आवडली नाही. म्हणून त्यांनी देश सोडायचे ठरवले. आपण पूर्वी दिलेल्या वचनाप्रमाणे त्यांनी भारतात जायचे ठरवले. 'भारतात इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शक नाहीत, साक्लोट्रॉन नाहीत. तिथे तुम्ही काय संशोधन करणार?' असे त्यांना जेव्हा विचारले तेव्हा त्यांनी उत्तर दिले, 'डार्विन, बेटसन यांनी इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाशिवाय संशोधन केले. मग मला का नाही जमणार?' त्यांच्या भारतीय सहकाऱ्यांनी कलकत्त्यात १९३० साली इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट स्थापन केली होती. ती भारत स्वतंत्र होईपर्यंत रडतखडत चालली होती. १९५० साली पंडित नेहरूंनी संस्थेला भरघोस अनुदान दिले. मग संस्था भरभराटीला यायला सुरुवात झाली. हॉल्डेन सुरुवातीस तिथे गेले आणि काही वर्षांनी त्यांनी भुवनेश्वर येथे स्वतःची संस्था स्थापली. भारतात कॉलेजात गेलेल्या मुलांना गणित किंवा जीवशास्त्र अशा दोन गटांपैकी निवड करावी लागते, याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला.

हॉल्डेन हे जातिवंत निरीक्षक आणि लेखक होते. त्यांना लिहायला मिळाले नाही तर ते अस्वस्थ होत. हे गुण त्यांच्या रक्तातच होते, असे म्हटले तर ती फार अतिशयोक्ती होणार नाही. त्यांची बहीण नेओमी हीसुद्धा एक गाजलेली लेखिका आणि त्यांच्यासारखीच आर्त लेखक होती. तिने वेगवेगळ्या प्रकारची शंभरच्या वर पुस्तके लिहिली आहेत. भारतात आल्यावर हॉल्डेन यांना लिहिण्यासाठी नवीन विषय मिळाले. भारतीय संस्कृतीचा त्यांनी अभ्यास केला. आपल्या वास्तव्यात त्यांनी 'हिंदू'मध्ये जे लेख लिहिले, त्यांची संख्या शंभरच्या आसपास जाईल. त्या लेखांवर भारताची छाप पडलेली दिसते. एका लेखाचे नाव आहे, 'भारतीय दृष्टिकोणातून डार्विन'.

मी अमेरिकेत असताना 'मॅथेमॅटिक्स' या ज्ञानकोशाचे चार

भाग विकत घेतले होते. त्यांत थेलिझ या जगातील पहिल्या ग्रीक गणितींपासून विसाव्या शतकापर्यंतच्या सर्व गणित्यांची चरित्रे होती. आपल्या रामानुजन यांचासुद्धा त्यात गौरव होता. पुढे सरकलो, तर हॉल्डेन यांच्याबद्दल माहिती दिसली. मी चमकलो. त्यांनी लिहिलेला एक लेख होता, 'On Being the Right Size'. त्यात गणित होते, जीवशास्त्र होते, थोडे अधिभौतिकशास्त्र-मेटाफिजिक्ससुद्धा होते. गलिव्हरची गोष्ट आपल्या सर्वांना माहीत आहे. एकदा त्याला अंगठ्याएवढी माणसे भेटतात, तर एकदा राक्षसांएवढी. हे शरीरशास्त्राच्या दृष्टीने अशक्य आहे. हॉल्डेन यांनी दाखवले की आकार वाढला की शरीररचनाच बदलते. कीटकाला केव्हाही हत्तीच्या आकाराइतकं बनता येत नाही. एक कारण म्हणजे कीटकाला हृदय, फुफ्फुस अशा अवयवांची गरज नसते, तर हत्ती त्याशिवाय जगूच शकत नाही.

हत्ती-घोड्यांसारख्या मोठ्या प्राण्यांची आणि लहान प्राण्यांची शरीररचनाच काय पण त्यांची जीवनशैलीही वेगळी असते. मोठ्या प्राण्यांना उंचीचं भय आहे; उंदीर सहाव्या मजल्यावरून पडला, तरी त्याला खरचटत नाही. हत्तीचे पाय निसर्गाने जाड केले असले तरी तो दोन पायऱ्यांवरून खाली पडला, तर त्याचे पाय तुटतात. याउलट लहान प्राण्यांना पाण्याचे भय आहे. भिजलेल्या किड्याचे वजन मूळ वजनाच्या अनेकपट होते आणि त्याची चलनशीलता शून्य होते. या सर्वाचा मथितार्थ असा आहे की क्वांटिटी बदलली की क्वालिटी बदललीच जाते!

शास्त्रीय विषयावर सरळ आणि समजण्यास सोपे तरीही बिनचूक आणि तंतोतंत अशा लेखनाचा हा उत्तम नमुना आहे. असे लेख कसे लिहावे यावरसुद्धा त्यांनी लेख लिहिलेला आहे. त्यातले काही मुद्दे लक्षात ठेवण्यासारखे आहेत. वाचकवर्ग कसा आहे आणि त्याची बौद्धिक पातळी काय, त्या प्रमाणात तांत्रिक शब्द यावेत. सुरुवात त्या काळातल्या ताज्या बातमीपासून करावी किंवा वाचकांना माहीत असलेल्या व्यक्तींपासून करावी. शक्यतो विज्ञानाच्या एका शाखेवर लिहीत असताना लेख दुसऱ्या शाखांशी जोडला गेला पाहिजे. तुमचे त्या विषयावरचे प्रावीण्य दिसले पाहिजे, पण वाचकावर दडपण येता कामा नये. इतर म्हणजे विज्ञानापेक्षा वेगळ्या विषयावर अभ्यासपूर्ण लेख लिहिताना हेच मानदंड ठेवले पाहिजेत, असे त्यांनी सुचवले.



दोन द्रष्टे : हॉल्डेन आणि पी महालनोबिस

**सर्वज्ञानसंपन्न**

हॉल्डेन यांनी लिहिलेले काही लेख असे : मी नास्तिक का आहे? माझ्या स्वतःबद्दच्या अपेक्षा काय आहेत? वेगवेगळ्या प्रकारची सरासरी, माणूस यंत्र आहे का? काही माणसं डावरी का असतात? श्वासोच्छ्वास, मधमाशांची भाषा, उत्क्रांतीचे गणित, सप्तर्षी. सर्व विषयांची परिपूर्ण माहिती असलेला जगात कोणी आहे का? या प्रश्नाचे उत्तर मी बिनदिक्कत डॉ. हॉल्डेन देईन असे उत्तर त्यांच्या एका विद्यार्थ्याने दिले होते. त्यांनी लिहिलेले शोधनिबंध, पुस्तके, लोकप्रिय लेख यांच्यावर नजर टाकली तर त्यात जराही अतिशयोक्ती नाही हे कळून चुकेल.

'माझी जीवनापासून काय अपेक्षा आहे,' हा लेख त्यांनी शेवटी शेवटी लिहिला. त्यापूर्वी त्यांनी उपनिषदे वाचायला सुरुवात केली होती. 'जीवनाचं रहस्य' या ग्रंथात तरी बघू, असं ते म्हणायचे. 'मी जडवादी असलो तरी आपले विचार म्हणजे केवळ मेंदूतील अणू-रेणू यांच्याच प्रक्रिया आहेत हे मला पटत नाही. चैतन्य नावाची वेगळी शक्ती आहे का याच्यावर मी विचार करतो.' या त्यांच्या उद्गारांवरून साच्याच्या बाहेर जाऊन विचार करायची त्यांची ऊर्मी कळून चुकते. त्यांना अखेरीस मोठ्या आतड्याचा कॅन्सर झाला

होता. त्यांनी त्यावर कविता लिहिली. 'कॅन्सर ही एक मजेशीर चीज आहे!' त्या कवितेत त्यांचा जीवनाबद्दलचा दृष्टिकोण दिसून येतो.

कलकत्त्यात एका महामार्गाला डॉ. हॉल्डेन यांचे नाव दिले आहे. हा माणसाच्या मनात सर्वज्ञानसंपन्नतेची लालसा जागवणारा महामार्ग आहे...

❋ ❋ ❋


**डॉ. द्रविड हे फिजिक्समधील पीएच.डी. असून राजकारण, विज्ञान, इतिहास या विषयांवरील त्यांचे लिखाण वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध होते. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत असून 'मुक्काम पोस्ट अमेरिका' हे अमेरिकेचे सर्वांगीण दर्शन देणारे पुस्तक रोहन प्रकाशनने प्रसिद्ध केले आहे.**

**संपर्क :** ९८२०५ ६३१३०

**ईमेल :** mohan.drawid@gmail.com



# डॉ. पूर्णानंद अवस्थी :
# एक क्रांतिकारक जीवन-सर्जन



डॉ.विवेक कोरडे







**त्या महिलेचा चेहरा रागाने एकदम लाल झाला. त्या रागात जगातली सारी तुच्छता त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटलेली मला दिसत होती. एखाददुसरा क्षण त्या थांबल्या. त्यांच्यावर कोणी असे ओरडले नसावे वा कदाचित कसे रिॲक्ट व्हावे, यासाठी त्या थांबल्या असाव्यात. पण लगेचच त्यांचा स्वर एकदम टिपेला पोहोचला आणि त्या ओरडून म्हणाल्या, ''तू? तू मुझे हकाल देगा? तू कौन है रे मेरी छुट्टी करनेवाला? मैं ब्रिटिश की बंदुकों से नही डरी, तो क्या तुझसे डरुंगी? तू मुझे क्या समझता है? आज यहाँ डॉ. अवस्थी होता, तो मेरा ये हाल नही होता और तुझे भी मुझपर चिल्लाने की हिम्मत नही होती.'' डॉ. अवस्थी कोण होते, हे मला पूर्णपणे ठाऊक होते, पण त्यांचा इतिहास?...**

काही प्रसंग मनात कुठेतरी खोलवर दडलेले असतात. काहीतरी घडलेले असते, पण जेव्हा ते घडते, तेव्हा त्याचे महत्त्व फारसे लक्षात आलेले नसते. पण त्याचे महत्त्व कधी ना कधी लक्षात येते किंवा ते यावे म्हणूनच ते प्रसंग मनात दडी मारून बसून राहतात.

'उनका अच्छे से खयाल रखना.' डॉ. अवस्थी सरांचे हे वाक्य माझ्या स्मरणात आजही जणू आत्ताच उच्चारले गेले असल्यासारखे त्या प्रसंगासह लक्षात आहे. १९८३-८४ साली मी मुंबईच्या पोदार मेडिकल कॉलेजमधून (आयुर्वेद) बी.ए.एम.एस. वैद्यकीय पदवी प्राप्त झाल्यानंतर निवासी डॉक्टर म्हणून चिकित्सा (मेडिसिन) विभागात कार्यरत होतो. त्या दिवशी सोमवार असल्याचे मला आजही स्मरते. पोदार रुग्णालयामध्ये सर्जिकल आणि मेडिकल या विभागांचा फीमेल वार्ड एकत्र होता. म्हणजे काही खाटा मेडिसिन विभागासाठी राखून ठेवल्या होत्या. सर्जिकलचे रुग्ण आणि मेडिकलचे रुग्ण यांच्यात एक मुख्य फरक असायचा. तो म्हणजे सर्जिकलचे रुग्ण आठवडाभरात बरे होऊन निघून जायचे. चिकित्सा विभागाची गोष्ट बऱ्याचदा अगदीच उलटी असायची. चिकित्सा विभागात बहुतेक रुग्ण क्रॉनिक (जुनाट) आजाराचे असायचे. अर्थात त्यांचा मुक्कामही अधिक काळ असायचा. एखाद्दुसरी खाट रिकामीही असायची. त्या सोमवारी सकाळी जसा मी वॉर्डमध्ये आलो, तसा सर्जिकलचा निवासी डॉक्टर मला म्हणाला की, ''एक वृद्ध रुग्ण आहे. पाच-सहा दिवस झालेत दाखल होऊन. कोणताही सर्जिकल प्रॉब्लेम नाही. आमची एक खाट अडून राहते, तू मेडिसिनला घेतोस का? शिवाय त्या बाई सर्वांना त्रास देतात. डॉक्टर, नर्स वॉर्डबॉय सर्वांना हैराण करतात. त्यांना तूच बरोबर सांभाळशील.'' (माझ्या कडक की रागीटपणासाठी मी तेव्हापासून प्रसिद्ध वा कुप्रसिद्ध आहे.)

माझी काहीच हरकत नव्हती. मी रुग्णाला न तपासताच माझ्या वॉर्डला ट्रान्सफर करून घेतले. ओपीडी संपल्यावर पाहू, असे ठरवून ओपीडीला निघून गेलो. ओपीडीत माझ्या वरिष्ठांना असे केल्याचेही सांगितले. त्यांचीही काही हरकत दिसली नाही.


त्या दिवशी दुपारी जेव्हा मी त्या नव्या रुग्णासह अन्य रुग्णांना पाहण्यासाठी फिमेल वॉर्डात आलो, तेव्हा वार्डात शिरण्याआधीच मला जोरजोरात ओरडण्याचा आवाज ऐकू आला. मी आत येऊन बघितले, तर सकाळी दाखल करून घेतलेली ती महिला रुग्ण कशावरून तरी नर्सच्या अंगावर जोरजोरात ओरडत होती. सारे रुग्ण हैराण होऊन त्या महिलेकडे पाहत होते.

हे सर्व पाहून मलाही खूप संताप आला. वॉर्डची मुख्य नर्सही त्या रुग्णाबाबत माझ्याकडे तक्रार करू लागली. मी त्या रुग्णाच्या खाटेजवळ गेलो आणि ओरडलो, ''क्या तमाशा लगाया है? एकदम चूप रहो. नही तो यहाँ से छुट्टी कर दुंगा.'' मी इतके बोलताच त्या महिलेचा चेहरा रागाने एकदम लाल झाला. त्या रागात जगातली सारी तुच्छता त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटलेली मला दिसत होती. एखाद्दुसरा क्षण त्या थांबल्या. त्यांच्यावर कोणी असे ओरडले नसावे वा कदाचित कसे रिॲक्ट व्हावे, यासाठी त्या थांबल्या असाव्यात. पण लगेचच त्यांचा स्वर एकदम टिपेला पोहोचला आणि त्या ओरडून म्हणाल्या, ''तू? तू मुझे हकाल देगा? तू कौन है रे मेरी छुट्टी करनेवाला? मै ब्रिटिश की बंदुकों से नही डरी, तो क्या तुझसे डरुंगी? तू मुझे क्या समझता है? आज यहाँ डॉ. अवस्थी होता, तो मेरा ये हाल नही होता और तुझे भी मुझपर चिल्लाने की हिम्मत नही होती.''

ब्रिटिशांच्या बंदुकांचा संदर्भ दिल्याने आणि डॉ. अवस्थी सरांचे नाव घेतल्याने मी एकदम सावध झालो. डॉ. अवस्थी सुमारे वर्षभरापूर्वी निवृत्त झाले होते. त्यांनी क्रांतिकारी आंदोलनात भाग घेतल्याचे व ब्रिटिश पोलिसांनी केलेला छळ सोसल्याचे मला थोडेफार ज्ञात होते. मी कसेबसे त्या महिलेला शांत केले. ऑफिसमध्ये जाऊन पहिल्यांदा डॉ. अवस्थींना फोन करून सारी हकिगत सांगितली. त्यावर 'मी सकाळी येतो' एवढे एकच वाक्य सरांनी उच्चारले नि फोन ठेवला.

म्हटल्याप्रमाणे सर दुसऱ्या दिवशी आले. खरेतर तो सरांचाच वॉर्ड होता. सरांचे महिला रुग्णही त्याच वार्डमध्ये ठेवले जात असत. सर त्या रागीट रुग्णाबरोबर सुमारे तासभर बोलत बसले होते. मी माझ्या जागेवर बसून पाहत होतो. ऐकू येण्याचा प्रश्न नव्हता. सर नेहमीच हळू आवाजात व धिमेपणाने बोलत. त्या महिलाही प्रसन्नपणे सरांशी बोलत होत्या. त्यांचे बोलणे संपल्यावर जाताना 'उनका अच्छे से खयाल रखना,' हे एकच वाक्य बोलून सर निघून गेले.

'अच्छे से खयाल' ठेवायचा म्हणजे नेमके काय करायचे,




डॉ. अवस्थीच्या संघटनकौशल्यांचे ठळक उदाहरण...

हेच मला कळत नव्हते. त्याच वेळी पोदार हॉस्पिटलमध्ये स्पेशल वॉर्ड वा स्पेशल रूम हा प्रकारच नव्हता. त्या रुग्णाला कंबरदुखी, सांधेदुखी, रक्ताल्पतेमुळे अशक्तपणा याखेरीज काही खास व्याधीही नव्हत्या. जे उपचार करता येणे शक्य होते ते केले जात होते. ज्या तपासण्या करणे आवश्यक होते त्या केल्या होत्या. त्यामुळे खास काळजी घेण्यासारखे काहीच नव्हते. पण त्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारी आंदोलनात सामील होत्या, ही गोष्ट मात्र मला नव्याने कळली होती. त्यांच्यावर ओरडल्याबद्दल मी खजील झालो. मी त्यांच्याकडे जाऊन त्यांना नमस्कार केला. त्यांची क्षमा मागितली.

वॉर्डमधील सर्वांना मी त्यांच्याकडे विशेष लक्ष द्यायला सांगितले. पण तेवढ्याने माझे समाधान होणार नव्हते. पोदार हॉस्पिटलमध्ये मी त्यांच्यासाठी विशेष सुविधा देऊ शकणार नव्हतो. त्यांना उत्तम रुग्णालयात आणि खरेतर नर्सिंग होममध्ये दाखल करायला हवे होते. त्या काळी मी विद्यार्थी आंदोलनांमध्ये नेता म्हणून सक्रिय होतो. काही पत्रकार परिचयाचे होते. त्यात एक अगदी तरुण पत्रकार 'डेली' नावाच्या इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये पत्रकारिता करत होता. मी त्या पत्रकाराला फोन केला. त्याच दिवशी तो पत्रकार त्याच्या फोटोग्राफरला सोबत घेऊन आला. त्याने महिला रुग्णाशी बातचीत केली. फोटो काढले आणि दुसऱ्या दिवशीच्या आवृत्तीत त्या स्वातंत्र्यसैनिक महिलेची कहाणी फोटोसह प्रसिद्ध झाली.

त्या काळी वर्तमानपत्रातल्या बातम्यांना किंमत होती. प्रशासकीय अधिकारी संवेदनशील होते. दुसऱ्या दिवशी रुग्णवाहिकेसह अधिकाऱ्यांच्या दोन गाड्या पोदार रुग्णालयात आल्या. आमच्या डीनना (अधिष्ठाता) या रुग्णाबाबत काहीच कल्पना नव्हती. मीही काही सांगितले नव्हते. त्यामुळे त्यांना खूप राग आला होता. पण मी अगदी समाधानी होतो. स्वातंत्र्यसैनिक रुग्णाला त्या अधिकाऱ्यांनी ॲम्बुलन्सने नेऊन प्रख्यात बॉम्बे हॉस्पिटलच्या स्पेशल रूममध्ये ॲडमिट केले. त्यानंतर मी त्यांना फक्त एकदाच बॉम्बे हॉस्पिटलला भेटायला गेलो होतो. मला पाहून 'तू बहादूर लडका हैं,' असे त्या म्हणाल्याचे मला आठवतेय. पुढे त्यांचे काय झाले? त्या कुठे गेल्या? त्यांची कहाणी काय होती? त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात नेमके काय केले होते? यातील कोणतीच माहिती मिळवण्याची उत्सुकता व गरज त्या वेळी मला वाटली नाही आणि त्यांना यातले काही न विचारल्याची खंतही तेव्हा वाटली नाही. त्यांना काही सुविधा मिळवून देण्यास कारणीभूत ठरल्याचे समाधान मला पुरेसे होते. मी डॉ. अवस्थी सरांना ही गोष्ट फोनने कळवली. त्यांनीही 'ठीक किया' असे म्हटले. नंतर ही गोष्ट मी विसरूनही गेलो. पण ती गोष्ट मला पुन्हा आठवणार होती. अधिक माहिती न घेतल्याची खंतही वाटणार होती.

ही खंत प्रकर्षाने जाणवली, भगतसिंगांवर लिहिण्यासाठी अभ्यास करताना. हा अभ्यास सुरू असताना 'युगद्रष्टा भगत सिंह और उनके मृत्युंजय पुरखे' (हे पुस्तक वीरेंद्र सिंधू यांनी लिहिले असून नात्याने त्या भगतसिंह यांच्या भाची आहेत.) हे पुस्तक वाचताना आलेल्या एका संदर्भाने. वीरेंद्र सिंधू यांनी सुप्रसिद्ध क्रांतिकारक शचिंद्रनाथ संन्यालांचे भगतसिंगांबाबतचे एक वाक्य पुस्तकात लिहिले होते. ''माझ्या सांगण्याने ते कानपूरला गेले. सुरुवातीला कानपूरमध्ये मन्नीलालजी अवस्थी यांच्या घरात त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली होती.'' अवस्थी सरांचे मूळ गाव कानपूर आहे हे मला माहीत होते.

कानपूरमधील काही मित्रांकडून मन्नीलाल अवस्थी यांच्याबद्दल माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यातून

फारसे काही साध्य झाले नाही. ही गोष्ट साधारण २०१७-१८ची. त्यानंतरचा काळ काही लिहिण्यात आणि शहीद भगतसिंगांवरच्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी प्रकाशक शोधण्यात आणि पुस्तक हातात येण्याची वाट पाहण्यात गेला. शेवटी ते पुस्तक मी स्वतःच प्रकाशित केले. मी विनंती करताच मित्रपरिवाराने त्या पुस्तकाच्या साऱ्या प्रती पुस्तक छापले जाण्याआधीच खरेदी केल्या. त्यामुळे हे पुस्तक पुन्हा प्रकाशित करावं, अशी विनंती मी सकाळ प्रकाशनाला केली. सकाळ प्रकाशनने हे पुस्तक २०२० साली प्रकाशित केले. नंतरच्या काळात भगतसिंग यांच्या फाशीनंतर, म्हणजे १९३१ नंतर, भारतीय क्रांतिकारी आंदोलनाची स्थिती काय होती, हा विचार मनात येत राहिला. पुन्हा अवस्थी सरांचे स्मरण अनिवार्य होते.

सर १९८१ साली शासकीय सेवेतून म्हणजे पोदार हॉस्पिटलमधून निवृत्त झाले होते. म्हणजे त्यांचा जन्म साधारणपणे १९२३च्या आसपासचा असावा, ही गोष्ट स्पष्ट होती. शहीद भगतसिंग यांच्या फाशीच्या वेळी त्यांचे वय सात-आठ वर्षांचे असणार. या वयात कुणी क्रांतिकारी आंदोलनात भाग घेतला असण्याची शक्यता नसते. याचाच अर्थ भगतसिंगानंतरही क्रांतिकारी आंदोलन सक्रिय होते. सरांचे चिरंजीव मुंबईत राहतात हे माहीत होते. पण त्यांना नेमके शोधायचे कसे, हा प्रश्न होता. खरेतर ही गोष्ट फार अवघड नव्हती. परंतु माझ्याकडेच सातत्य नव्हते आणि एक दिवस अचानक पोदार कॉलेजमधील एका कार्यक्रमात माझे मित्र डॉ. एच. बी. सिंग यांनी सरांच्या चिरंजीवांशी, श्री. आनंद अवस्थी यांच्याशी माझी गाठ घालून दिली. त्यांच्याशी झालेल्या दोन-तीन भेटींमध्ये डॉ. अवस्थी सरांबाबतच्या काही अज्ञात गोष्टी समोर आल्या.

**क्रांतीची वाट**

आनंद अवस्थी आपल्या वडिलांचा उल्लेख करताना आवर्जून 'पिताजी' हाच शब्द वापरतात. त्यांच्या प्रत्येक शब्दातून त्यांना आपल्या वडिलांविषयी वाटणारा आदर व्यक्त होतो. हा लेख मी लिहितोय, पण याचे सारे श्रेय श्री. आनंद यांचे आहे. मला सरांच्या क्रांतिकारी जीवनाबद्दल उत्सुकता होती, त्यामुळे मी अर्थातच याच विषयावर माझे बोलणे मर्यादित ठेवायचा प्रयत्न करत राहिलो. सर उत्तम सर्जन होतेच, पण ते उत्तम कवी, संस्कृत पंडित आणि उत्तम संघटकही होते, ही गोष्ट मला आनंद यांनीच सप्रमाण सांगितली.

माझा पहिला मुख्य प्रश्न सरांना २१ महिने तुरुंगवासाची शिक्षा कशासाठी भोगावी लागली हा होता. त्यावर त्यांना डाका घालण्याच्या आरोपावरून शिक्षा झाल्याचे आनंद अवस्थी यांनी सांगितले. कदाचित काही वाचकांना या गोष्टीचे आश्चर्य वाटेल. तथापि त्यांनी काही तथ्ये लक्षात घेतली पाहिजेत. क्रांतिकारी आंदोलने नेहमीच गुप्त स्वरूपाची असतात. प्रत्यक्ष कार्यात सहभागी असणाऱ्या क्रांतिकारकांना स्वतःच्या उपजीविकेसाठी, तसेच बंदुका-पिस्तुलं आदी गोष्टी खरेदी करण्यासाठी पैशांची गरज असायची. म्हणून क्रांतिकारकांनी आपल्या उद्देशांच्या पूर्तीसाठी आणि क्रांतिकारी कार्यक्रम चालवण्यासाठी डाके घालण्याचा मार्ग स्वीकारला. बिरेन्द्र कुमार घोष यांच्या नेतृत्वाखाली १९०८ साली झालेला बर्रा दरोडा एक अशीच घटना होती. त्याचा उद्देश क्रांतिकार्यासाठी धन जमा करण्याचा होता. काकोरी ट्रेन घटनादेखील याच स्वरूपाची होती. या घटनेमुळेच रामप्रसाद बिस्मिल, अश्फाक उल्ला खान आणि ठाकूर रोशन सिंह यांच्यासारख्या क्रांतिकारकांनी फाशी जाऊन बलिदान दिले. चंद्रशेखर आजाद, भगतसिंग यांनीदेखील अनेक डाके घातले होते. या डाक्यांचा उद्देश जसा धन जमा करणे हा होता, तसाच तो ब्रिटिश सरकारला आव्हान देण्याचादेखील होता. भगतसिंगांनी लाला लजपत राय यांच्यावर लाठीहल्ला करणाऱ्या सँडर्सची हत्या केल्यानंतर क्रांतिकारी आंदोलनाला जनतेची सहानभूती प्राप्त झाल्याने लोकांकडून मदत मिळू लागली होती. त्यामुळे असे डाके घालण्याचे प्रमाण कमी झाले होते. तरीही नाइलाजाने बऱ्याच प्रसंगी डाके घालणे भाग पडत होते. भगतसिंगांच्या फाशीनंतर क्रांतिकारी आंदोलनाची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झाली होती. अर्थात दरोडे घालण्याखेरीस दुसरा पर्याय क्रांतिकारकांकडे नव्हता. क्रांतिकारकांच्या या कार्याकडे त्या वेळेच्या संदर्भामधून पाहिले जाते म्हणून त्यांच्या या कारवायांनाही स्वातंत्र्यसंग्रामातील एक भाग म्हणून गणले जाते.

डॉ. अवस्थी हे शहीद भगतसिंग यांनी स्थापन केलेल्या हिंदुस्थान सोशालिस्ट रिव्होल्युशनरी पार्टीचे सदस्य होते. या पक्षाला जनतेमध्ये मान्यता मिळवून देण्यासाठी नौजवान भारत सभाही कार्यरत होती. या नौजवान भारत सभेचा वरकरणी उद्देश



डॉ. अवस्थींकडे माणसे जोडण्याची, जपण्याची कला होती...

समाजातील कुप्रथांना विरोध करणे आहे, असा सांगितला जात असला तरी ही सभा क्रांतिकारी विचारांचा प्रचार करणे, निधी गोळा करणे व नवे क्रांतिकारक भरती करणे हे कार्य गुप्तपणे करत होती. आनंद अवस्थी सांगतात, ''सर दोन प्रकारचे कार्य मुख्यत्वे करायचे. क्रांतिकारी कारवायांमध्ये प्रत्यक्ष भाग घेणे आणि डाके घालण्यात सामील होणे.'' यावर अधिक चर्चा करण्यापूर्वी डॉ. अवस्थी व कानपूर शहराची पार्श्वभूमी थोडक्यात पाहूया.

**कानपूरचे माहात्म्य**

डॉ. पूर्णानंद अवस्थी यांचा जन्म ६ मार्च १९२३चा. जन्मस्थान कानपूर. कानपूर हे शहर त्या काळात एक महत्त्वाचे औद्योगिक आणि सांस्कृतिक केंद्र होते. तसेच ब्रिटिशांचे लष्करी केंद्रही कानपूरमध्ये होते. या शहराला 'पूर्वेचे मँचेस्टर' संबोधले जायचे. या शहरात सैन्यसामग्रीचेही उत्पादन केले जात होते. शिवाय कानपूरमध्ये चकेरी एअर फोर्स स्टेशन होते. त्यामुळे हे शहर एक महत्त्वाचा सैनिकी अड्डा होता. म्हणूनच क्रांतिकारकांसाठीही कानपूर हे महत्त्वाचे शहर होते. सरांच्या जन्मानंतर नऊ महिन्यांतच त्यांच्या मातेचे निधन झाले. वडील भारतीय रेल्वेत नेहमी फिरती करावी लागणाऱ्या पदावर कार्यरत असल्याने पूर्णानंदांचे पालनपोषण त्यांच्या आजी-आजोबांनी केले. त्यांचे आजोबा व्यास माधव रामजी अवस्थी एक नावाजलेले संस्कृतचे शास्त्री आणि पुरोहित होते. महाभारताचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. त्यामुळेच त्यांना व्यास म्हणजे महाभारताचे सखोल ज्ञानी ही पदवी मिळाली होती. पूर्णानंदांचे प्रारंभिक अध्ययन संस्कृतमध्ये झाले होते. त्यांनी शास्त्री ही पदवी बनारस हिंदू विद्यापीठातून प्राप्त केली होती. तरुणपणात ते एक उत्तम कुस्तीपटू होते आणि पोहण्यातही तरबेज होते. एकावेळी ते हजार बैठका (सीटप्स) मारायचे. नंतरच्या दैनंदिन जीवनातही हजार बैठका मारण्याचा हा सिलसिला चालू राहिला, असेही आनंद सांगतात.

क्राइस्ट चर्च कॉलेज, कानपूर येथे शिकत असतानाच त्यांच्यातील देशभक्ती उफाळून आली. त्यांनी क्रांतिकारी जीवनाचा स्वीकार केला. त्या काळात कुस्तीचे आखाडे तरुणांना क्रांतिकार्याला प्रवृत्त करत असत. डॉ. अवस्थींना कदाचित ही प्रेरणा आखाड्यातूनही मिळाली असावी. मात्र त्यांच्या चिरंजीवांना ही प्रेरणा धर्मातून मिळाली असावी, असे वाटते. कारण धर्मशास्त्राप्रमाणे 'आधी देश, मग धर्म आणि मग आपण,' असे पिताजी नेहमी म्हणत असत असं ते सांगतात.

**भगतसिंगांचा प्रभाव**

क्रांतिकारी आंदोलनात सामील होण्यासाठी शहीद भगतसिंग १९२४ साली कानपूरला येऊन त्यांच्या कानपूरमधील सुरुवातीच्या दिवसात मन्नीलाल अवस्थी यांचे घरी राहिले होते. हे मन्नीलाल डॉ. अवस्थींच्या घराण्यातील असण्याची शक्यता अधिक संभवते. मन्नीलाल यांच्या संदर्भात फारशी माहिती अद्यापही उपलब्ध होऊ शकली नाही. आनंद अवस्थी यांनी अवस्थी घराण्याच्या वंशावळीचा एक तक्ता मला पाठवला होता. त्या तक्त्यात मन्नी हे नाव

दिसते. भगतसिंग कानपूरला ज्यांच्या घरी राहिले होते, ते हेच मन्नीलाल अवस्थी असण्याची शक्यता जास्त आहे. तसेच ते क्रांतिकारी आंदोलनांना साहायक भूमिका बजावत असण्याची शक्यता आहे. ही गोष्ट बरोबर असेल तर डॉ. अवस्थींना घरातूनच क्रांतिकारी कार्यात सहभागी होण्यासाठीची प्रेरणा मिळाली असण्याची शक्यता जास्त दिसते. असो.

या काळात डॉ. अवस्थींनी अनेक धाडसी क्रांतिकारी कृत्यांमध्ये भाग घेतल्याचे त्यांच्या स्मृत्यर्थ प्रकाशित करण्यात आलेल्या 'जीवनोत्सव' या पुस्तिकेत नमूद करण्यात आले आहे. याविषयी बोलताना आनंद अवस्थी म्हणतात की, ''या काळात क्रांतिकार्यासाठी सरांनी घरातील धन, भांडीकुंडी सर्व काही वापरले. ते संपल्यावर आजोबांच्या ग्रंथसंग्रहालयातील तसेच आजोबांनी लिहिलेली पुस्तकेही विकून ती रक्कम क्रांतिकार्यासाठी वापरली.''

आधी उल्लेख केल्यामुळे त्या काळात क्रांतिकारकांना त्यांच्या उपजीविकेसाठी आणि क्रांतिकारी कार्यांसाठी पिस्तुले, बॉम्ब इत्यादी शस्त्रास्त्रे मिळवण्यासाठी लागणारा पैसा मुख्यत्वे डाके घालून मिळवावा लागत असे. हे डाके जसे सरकारी खजिन्यावर घातले जात, तसेच ते खाजगी संपत्तीवर घातले जात असत. ३० ऑगस्ट १९४३ रोजी रात्री ९ वाजता एकदा खुद्द कानपूरमध्ये डाका घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. दुर्दैवाने तो प्रयत्न अयशस्वी ठरला. एका फर्मचे ३८ हजार ५०० रुपये लुटण्याचा प्रयत्न क्रांतिकारकांनी केला होता. सारे आरोपी कानपूरचे असल्याने त्यांना ओळखणारी अनेक माणसे तेथे उपस्थित होती. त्यामुळे पोलिसांना आरोपी पकडण्यात फारसा वेळ लागला नाही. अन्य आरोपींना अटक केल्यानंतर सर्वात शेवटी म्हणजे २९ सप्टेंबरला डॉ. अवस्थींना अटक करण्यात आली. कानपूर सत्र न्यायालयात चालवण्यात आलेल्या या खटल्याचे आणि अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेले अपील अशी दोन्ही निकालपत्रे सुदैवाने आजही उपलब्ध आहेत. त्या काळातील पोलीस आरोपींकडून कबुली मिळवण्यासाठी तसेच त्यांच्या साथींची नावे मिळवण्यासाठी अटक केलेल्या आरोपींवर अत्याचार करण्यात वाकबगार होते. कैद्यांचा विशेष करून क्रांतिकारक कैद्यांचा छळ करण्यात धन्यता मानणारे होते. कदाचित त्यावरच त्यांचे प्रमोशन अवलंबून असावे. सरांना जरी सर्वात शेवटी अटक करण्यात आली असली, तरी त्यांचा सर्वात जास्त छळ झाल्याचे दिसते. त्यांना उलटे टांगून मारहाण करण्यात आली. हा छळ त्यांच्याकडून अन्य क्रांतिकारकांची नावे आणि घटनांची माहिती मिळवण्यासाठी करण्यात येत होता. त्या अत्याचारांनी त्यांच्या मनगटाला गंभीर इजा झाली. एक बरगडीही तुटली. त्या काळात कैद्यांना मारहाणीमुळे झालेल्या गंभीर दुखापतींवर क्वचितच इलाज केला जात असे. त्यामुळे उपस्थित सहकैदीच आपल्या साथींचा उपचार करत असत. सरांचे साथीही त्यांना माहीत असलेल्या पद्धतीने त्यांच्यावर उपचार करत होते. तुरुंगात सरांचा छळ झाला ही गोष्ट अपिलाचा निर्णय देणाऱ्या न्यायाधीशांनीही मान्य करून तसे आपल्या निकालपत्रात स्पष्टपणे नोंदविले आहे.

**प्राण घेतले हाती...**

उपरोक्त डाक्याच्या खटल्यात रामदत्त, पूर्णानंद आणि बब्बू हे तीन आरोपी होते. या तिघांनाही सत्र न्यायालयाने दोषी ठरवले. त्यातील रामदत्त यांचा हा दुसरा गुन्हा असल्याने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली, तर पूर्णानंद अवस्थी आणि बब्बू यांना त्यांचा हा पहिलाच गुन्हा असल्याने सात वर्षांची सतक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली.

सक्तमजुरीची शिक्षा भोगत असताना तुरुंगात त्यांना अत्यंत कष्टाची कामे करावी लागत असत. त्यांना झालेल्या मारहाणीमुळे त्या साऱ्याचा त्यांना जो त्रास व्हायचा, त्यावर पक्षाचे सदस्य असलेले सहकारी उपचार करत. तुरुंगात असताना बुद्धीला गंज चढू नये, म्हणून सर या काळात उर्दू भाषा शिकले. या शिक्षेविरोधात डॉ. अवस्थींच्या वडिलांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात अपील दाखल केले. अपिलात न्यायाधीशांनी तिन्ही आरोपींचा विचार वेगवेगळा करत डॉ. अवस्थी यांना अटक करण्यात झालेल्या विलंबाबाबत

**माझा पहिला मुख्य प्रश्न सरांना २१ महिने तुरुंगवासाची शिक्षा कशासाठी भोगावी लागली हा होता. त्यावर त्यांना डाका घालण्याच्या आरोपावरून शिक्षा झाल्याचे आनंद अवस्थी यांनी सांगितले. कदाचित काही वाचकांना या गोष्टीचे आश्चर्य वाटेल. तथापि त्यांनी काही तथ्ये लक्षात घेतली पाहिजेत...**

फिर्यादी पक्षाने दिलेली स्पष्टिकरणे ग्राह्य धरता येत नाहीत, असे म्हटले. त्याचबरोबर पोलीस कोठडीत डॉ. अवस्थींचा अत्यंत क्रूरपणे छळ करण्यात आला याबद्दलही न्यायालयाची खात्री झाली होती, असे म्हटले. न्यायालयाने निकालपत्रात नमूद केले आहे की, ‘अपीलकर्त्याचा छळ करून त्याच्याकडून कबुलीजबाब मिळवण्याचा पोलिसांचा प्रयत्न निष्फळ झाल्यावर पोलिसांकडे त्याच्या विरोधात आणखीन पुरावा तयार करण्यासाठी कारण होते. म्हणूनच त्याची ओळख परेड केली गेली असावी. त्या वेळी आरोपी पोलिसांनी त्याला केलेल्या छळाबद्दल दाद मागेल असेही म्हटले असल्याचे रेकॉर्डवर आले आहे. जर आरोपीची आरोपातून सुटका झाली तर सुटका झाल्यावर तो पोलिसांविरोधात त्याच्या छळाबद्दल दाद मागेल अशी भीती पोलिसांना वाटत असल्यानेच त्याच्या विरोधात ओळख परेडने अधिक पुरावा निर्माण केला गेला असावा. सारे साक्षीदार पोलीस ठाण्यापासून जवळच राहत होते त्यामुळे ते सहज उपलब्ध होते. अपीलकर्ता २८ सप्टेंबरच्या दुपारी ४:३० पासून २९ सप्टेंबरच्या दुपारपर्यंत पोलीस कस्टडीत होता. त्यामुळे साक्षीदारांना पोलीस ठाण्यात आणून त्यांना अपीलकर्त्याला दाखवण्यासाठी पोलिसांना पुरेसा वेळ होता. त्यामुळेच अकरापैकी दहा साक्षीदारांनी अपीलकर्त्याला कसे ओळखले, याचे स्पष्टीकरण मिळू शकते. शिवाय सरकारी पक्षाचे अनेक साक्षीदार अपीलकर्त्याला आधीपासून ओळखत होते, असे स्पष्टपणे पुढे आले आहे. म्हणूनच या साक्षीदारांपैकी कोणीही गुन्ह्याच्या दुसऱ्या दिवशी पोलीस स्टेशनमध्ये झालेल्या तपासात अपीलकर्त्याचे नाव का घेतले नाही किंवा त्यांनी कोणत्याही प्रकारे अपीलकर्त्याचा सूचक उल्लेख केला नाही, हे अनाकलनीय आहे. या सर्व गोष्टींना विचारात घेतल्याने आमच्या मनात शंका निर्माण होतात आणि त्याचा फायदा अपीलकर्त्याला द्यायला हवा.’

उच्च न्यायालयाने डॉ. अवस्थी यांची मुक्तता केली. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या या निकालपत्राची तारीख ११ एप्रिल १९४५ ही आहे. तेव्हा ब्रिटिश प्रशासनाने न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांची सुटका केली. परंतु त्यांना उत्तरप्रदेश बाहेर हद्दपार करून पुन्हा उत्तरप्रदेशात पाय न ठेवण्याची ताकीद दिली. सरांच्या आयुष्यातला एक अध्याय संपला होता.



स्वातंत्र्यासाठी झटलेला सर्जक

**शांततेआडचे भारदस्त गूढ**

पोदार महाविद्यालयातील त्यांच्या निवृत्तीनंतर त्यांच्याविषयी गौरवपर बोलताना त्यांचे शिक्षक सहकारी डॉ. किंजवडेकर यांनी त्यांच्या क्रांतिकारी कार्याचा उल्लेख केला होता. आपल्या उत्तराच्या भाषणात अवस्थी सरांनी याबाबत ‘वह अध्याय अब खत्म हो चुका है’ हे एकच वाक्य उच्चारले. त्यांच्या देशसेवेबद्दल सरांनी पोदार महाविद्यालयात जाहीरपणे केलेले हे एकच वक्तव्य असावे. डॉ. अवस्थी सरांच्या चेहऱ्यावर नेहमीच एक विलक्षण शांती दिसायची. सरांची शरीरयष्टी उंच आणि सडपातळ होती. चालताना ते कधीही इकडे तिकडे पाहत नसत. कुणाशी उगीचच गप्पा मारत बसायचा त्यांचा स्वभाव नव्हता. चेहऱ्यावरल्या विलक्षण शांतपणातच काहीतरी गूढ दडल्याचा भास त्यांच्याकडे पाहिल्यावर व्हायचा. कदाचित गतायुष्यातील गुप्त कारवाया आणि जपलेली गुपिते आणि त्यासाठी सोसलेल्या शारीरिक यातना हे याचे कारण असावे. चिरंजीव आनंद सांगतात की, ‘‘मी कधीही, कुणालाही वडिलांशी सलगीने वागताना, त्यांच्याबरोबर खिदळताना किंवा त्यांच्या खांद्यावर हात टाकून बोलताना पाहिलेले नाही.’’ सरांचे व्यक्तिमत्त्व भारदस्त आणि कुणालाही पाहताक्षणी आदरणीय वाटावे, दरारा वाटावा असे होते.

मला मिळालेल्या कागदपत्रांमध्ये १९८८ सालचे कानपूर कलेक्टर व जिल्हा मॅजिस्ट्रेट यांची मुद्रा असलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत आहे. त्यात भारतीय स्वातंत्र्य सेनानी

समितीद्वारे त्यांना देण्यात आलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे ते २९ सप्टेंबर १९४३ ते २० जून १९४४ या काळात तुरुंगात असल्याचे उल्लेखित करून त्यांचे नाव स्वतंत्रता संग्राम सेनानी म्हणून घोषित केले आहे. महाराष्ट्र शासनानेही १९९१ साली त्यांना तत्कालीन मुख्यमंत्री माननीय शरद पवार यांच्या सहीने सन्मानपत्रात देऊन त्यांना स्वातंत्र्यसैनिक म्हणून गौरवले आहे.

**क्रांतीच्या ज्वाळांतून नव्या जीवनोत्सवाकडे...**

कानपूरच्या जेलमधून सुटका झाल्यावर उत्तरप्रदेशातून हद्दपार केले असल्याने ते त्यांच्या वडिलांबरोबर मुंबईला आले. त्या वेळी त्यांच्या वडिलांचे पोस्टिंग मुंबईला झाले होते. ते वडाळ्याच्या पंच उद्यानजवळील रेल्वे कॉलनीत राहत. त्या वेळी सरांचे इंग्रजीचे ज्ञान जुजबी होते. परंतु बुद्धी कुशाग्र असल्याने इंग्रजीचे स्वयंअध्ययन करून इंग्रजी इंटरमिजिएट परीक्षा पातळीचे ज्ञान आत्मसात करण्यास त्यांना फारसा वेळ लागला नाही. मुंबईच्या पोदार मेडिकल कॉलेजमध्ये इंटिग्रेटेड मेडिसिनच्या D.A.S.F. या अभ्यासक्रमासाठी त्यांना प्रवेश मिळाला. संस्कृतचे उत्तम ज्ञान असल्याने त्यांना आयुर्वेदाचे प्राचीन संस्कृत ग्रंथ अभ्यासताना अडचण आली नाही. १९४९ साली त्यांनी वैद्यकीय पदवी प्राप्त केली. परीक्षेत ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. 'जीवनोत्सव' या पुस्तिकेत १९५२ साली त्यांचा विवाह प्रेममाया दीक्षित यांच्याशी झाल्याचा उल्लेख आहे. विवाहानंतर त्यांनी स्वतंत्र संसार थाटला. हे गृहस्थाश्रमी जीवन त्यांनी माहीममधील एका छोट्याशा सदनिकेत एक स्टोव्ह आणि एक भांडे घेऊन सुरू केल्याचे या पुस्तिकेत आवर्जून नमूद केले आहे.

पोदार रुग्णालयात त्यांनी सर्जरी विभागात हाऊसमन, रजिस्ट्रार, अध्यापक आणि मानद सर्जन अशी पदे भूषविली. कोणत्याही क्षेत्रात उतरायचे, ते त्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवूनच हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे एक उत्तम सर्जन म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांचा शांतपणा प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करत असतानाही सहसा ढळायचा नाही. काही सर्जन करतात, तसा आरडाओरडा करणे त्यांच्या स्वभावात नव्हते. अत्यंत शांतचित्ताने ते शस्त्रक्रिया करत. स्वातंत्र्यलढ्यात मनगटाला इजा झाल्याने एक हात काही काळ लुळा पडला असतानाही शस्त्रक्रिया करताना त्यांचा हात स्थिर असायचा. त्यांच्या शस्त्रक्रियेत रुग्णाचे कमीतकमी रक्त वाहायचे. अत्यंत स्वच्छ शस्त्रक्रिया करणारा सर्जन म्हणून त्यांची ख्याती होती. अन्य कॉलेजचे विद्यार्थीही त्यांच्या शस्त्रक्रिया पाहण्यासाठी येत असत.

**कविमनाचा निष्णात शल्यविशारद**

पोदार रुग्णालयात त्यांनी हजारो शस्त्रक्रिया केल्या. सर्वदूर भागातून त्यांच्याकडे रुग्ण यायचे. दादरमधील सैतान चौकी आणि अन्य एका ठिकाणी त्यांनी स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. 'जीवनोत्सवा'त त्यांचा गौरव करणारा पुढील परिच्छेद आहे. ''डॉ. अवस्थींनी आपले जीवनध्येय रुग्णांची प्रेमाने चिकित्सा करण्यात आणि त्यांच्या दुःखाचे निवारण करण्यात पाहिले. दिवसात १४ ते १६ तास काम करणे, हे त्यांच्यासाठी रोजचेच घटित होते. कुणीही घेणार नाही अशी काळजी त्यांनी गरिबातल्या गरीब आणि विस्थापित होऊन आलेल्या रुग्णांची घेतली. त्यांच्या अति परिश्रमांनी ते पोदार रुग्णालयाचे मुख्य सर्जन आणि सर्जरी विभागाचे मुख्य बनले. अध्यापनाची त्यांना विशेष आवड होती. या बाबतीत त्यांच्याकडून शिकलेले शेकडो चिकित्सक ग्वाही देऊ शकतात. त्यांनी पोदार हॉस्पिटलमध्ये आणि पोदार वैद्यकीय महाविद्यालयात निःस्वार्थ आणि अथकपणे ऑनररी सर्जन म्हणूनही अत्यंत कमी मोबदला घेऊन सेवा केली. सेवानिवृत्तीच्या वेळी त्यांचे वेतन ३०० रुपयांहून थोडे अधिक होते.''

त्यांच्या खाजगी जीवनात ते एक प्रतिभावान कवी म्हणून ओळखले जात. त्यांचे मित्र बऱ्याचदा त्यांचा उल्लेख 'बादशहा' म्हणून करत. हिंदी आणि उर्दू भाषांत त्यांनी शेकडो कविता लिहिल्या. त्यांचा ग्रंथसंग्रहही मोठा होता. त्यात फिलॉसॉफी, क्वॉंटम फिजिक्स, सोशॉलॉजीपासून न्यूक्लिअर मेडिसिनपर्यंतच्या अनेक विषयांचा समावेश होता. संस्कृतचे विद्वान असल्याने इस्कॉनचे प्रभुपाद स्वामी, महर्षी योगी यांच्यासारख्या अनेक मान्यवरांशी त्यांच्या भेटीगाठी व्हायच्या. वर्तमानपत्रांचे संपादकही त्यांचा सल्ला घेत असत. पहिला संस्कृत चित्रपट १९८३ साली प्रदर्शित झाला. जी. व्ही. अय्यर हे त्या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. या चित्रपटाच्या निर्मितिप्रक्रियेत डॉ. अवस्थी सहभागी होते. या चित्रपटाबाबतच्या चर्चा अनेकदा त्यांच्या घरात झाल्याचे आनंद अवस्थी यांना आठवते.

**मिश्र चिकित्सापद्धतीचे पुरस्कर्ते**

या साऱ्याबरोबरच अवस्थी सरांच्या मिश्र चिकित्सा पद्धतीच्या (Integrated Medical System) विचाराबद्दल आणि त्या विचाराच्या प्रसारासाठी त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल लिहिल्याशिवाय हा लेख पूर्ण होणार नाही. आजारपण आणि रोगांबाबत असलेल्या पाश्चात्त्य (Allopathy) चिकित्सा पद्धतीच्या संकीर्ण विचाराबाबत त्यांना दुःख होत असे. ॲलोपॅथी डॉक्टरांची रोगाच्या लक्षणांवर इलाज करण्याची कृती त्यांना न पटणारी होती. चिकित्सा करताना प्रत्येक रुग्णाचा स्वतंत्रपणे विचार करायला हवा, असे त्यांचे मत होते. असे असले तरी आधुनिक वैद्यकाने सर्जरी, निदान पद्धती आणि शास्त्रीय संशोधन यात केलेल्या प्रगतीचे ते प्रशंसक होते. या साऱ्याचा समावेश त्यांनी स्वतःच्या वैद्यकीय व्यवसायात केला होता. भारताच्या दृष्टीने अशी मिश्र चिकित्सा व्यवस्था एक आदर्श आणि परिपूर्ण चिकित्सा व्यवस्था होऊ शकेल, याची त्यांना खात्री झाली होती आणि भारतीय आरोग्यवस्था या मिश्र पद्धतीवर आधारित असावी; भारतीय चिकित्सकाला प्राचीन आयुर्वेद आणि आधुनिक ॲलोपॅथी यांचे परिपूर्ण ज्ञान असावे, या विचाराने त्यांच्या मनात ठाण मांडले होते. म्हणूनच त्यांनी मिश्र चिकित्सा पद्धतीचा प्रचार आणि शासनमान्यता याला आपल्या जीवनाचे एक उद्दिष्ट ठरवून त्याप्रमाणे या विषयाची सखोल मांडणी केली. केवळ मांडणी केली नाही, तर या विषयावर कार्य करण्यासाठी संघटना स्थापन केली आणि त्यांच्यातील संघटनकौशल्याची चुणूक दाखवून दिली.

डॉ. अवस्थींनी 'महाराष्ट्र स्टेट इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन'ची (MSIMA) स्थापना केली. पुढे १९६९ साली या संघटनेचे रूपांतर 'नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन'मध्ये (NIMA) झाले. आज या संघटनेच्या भारतभर शेकडो शाखा आणि हजारो सदस्य आहेत. हैदराबाद, दिल्ली यांसारख्या शहरांमध्ये 'निमा भवन' उभारण्यात आले आहे. मुंबईतही या संघटनेचे स्वतःच्या मालकीचे कार्यालय असून या संघटनेच्या वतीने नियमितपणे सी.एम.इ., परिसंवाद आणि परिषदांचे आयोजन करण्यात येते.

आज इंटिग्रेशनची म्हणजे मिश्र चिकित्सेची कल्पना एक चळवळ म्हणून क्षीण झाली असली तरी या चळवळीचे हेतू लक्षात घेता भारताला डॉ. अवस्थींनी एक तत्त्व म्हणून मांडलेल्या मिश्र चिकित्सा पद्धतीचा अंगीकार आज ना उद्या करावाच लागेल.

एक क्रांतिकारक, सर्जन, शिक्षक, कवी, संघटक, एक संसारी गृहस्थ अशा अनेक क्षितिजांवर डॉ. अवस्थींनी त्यांच्या भूमिका यशस्वीपणे बजावल्या. आयुष्याच्या अखेरपर्यंत ते कार्यरत राहिले. १ ऑक्टोबर २०१० रोजी वयाच्या ८७व्या वर्षी त्यांचे निधन झाले. डॉ. अवस्थी यांनी ब्रिटिश राजवटीतल्या तुरुंगातून सुटका झाल्यावर उर्वरित आयुष्यात मिळवलेल्या लौकिक यशामुळे एक क्रांतिकारक म्हणून त्यांचे नाव आणि कार्य निदान माझ्या-तुमच्यापर्यंत येऊ शकले. परंतु असे शेकडो क्रांतिकारक असतील की ज्यांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी आयुष्याच्या मशाली पेटवल्या, पण त्यांची नावेही आज आपल्याला कदाचित ज्ञात नाहीत. अशा प्रसंगी जगदंबा प्रसाद मिश्र हितैशी यांच्या काव्यपंक्ती मला आठवतात.

शहीदों की चिताओं पर लगेंगे हर बरस मेले
वतन पर मरनेवालों का यही बाकी निशां होगा...

म्हणूनच स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाची होळी पेटवणाऱ्या शेकडो अज्ञात क्रांतिकारकांचे काय, हा प्रश्न मला सतावत राहतो. या साऱ्या अज्ञात क्रांतिकारकांची नावे त्यांच्या कार्यासह लोकांसमोर यायला हवीत. त्यांचा यथोचित गौरव व्हायला हवा. हाच हा लेख लिहिण्यामागचा उद्देश आहे. हे काम चिकाटीचे, किचकट, वेळखाऊ व कठीण आहे. तसेच खर्चिकही आहे. परंतु हे काम व्हायला हवे. हे करण्यासाठी कुणी ना कुणी, कधी ना कधी प्रवृत्त होईल; त्याला संसाधनांची कमी पडणार नाही, अशी आशा आणि विश्वास व्यक्त करून हा लेख संपवतो.

❋ ❋ ❋

**डॉ. विवेक कोरडे यांची 'जातीयवादी राजकारणाचा अन्वयार्थ', 'गांधीची दुसरी हत्या', 'शहीद भगतसिंग', 'वैचारिक बंदुकांचे शेत', 'गांधीहत्येचे राजकारण', 'आरएसएस आणि नथुराम गोडसे', 'भगतसिंग, गांधी आणि सावरकर : अपप्रचारामागचे वास्तव' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. ई मेल :** drvivekkordeg@mail.com



# UMANG
## special school
For autistic and slow learners

### Locations

1 **Kandivali**
umang intervention centre, bandar pakhadi road, kandivali west, mumbai-400067.
contact: +91 89762 87060

2 **Bhayander**
bungalow number 8, indralok phase III, gopal patil road, bhayander east, mumbai- 401105
contact: 7506002345


3 **Vasai**
samiranand, next to mary vila, besides ribbons and balloons cake shop, vasai road, vasai
contact: 9921580294
7506048663

### Facilities

- Remedial education
- Functional and skills training
- NIOS & OBE board education
- Speech & Language therapy
- Occupational therapy
- Social skills training
- Psycho -Educational assessment
- Guidance & Counselling
- Sports training
- Pre - vocational & vocational training

umang-trust.org umangtrust2000@gmail.com

# चित्रपट संस्कृतीचे जतन आणि संवर्धन ही एक कलाच




डॉ. संतोष पाठारे

– शिवेंद्र सिंग डुंगरपूर

संवादोत्सव २०२५






**आपल्या आसपास गडगंज अनेक असतात; साधनसामग्रीची कमतरता नसलेलेही अनेक असतात; व्यवस्थेवर प्रभाव असलेले, एका इशाऱ्यावर व्यवस्थेला झुकायला लावणारेही अनेक असतात पण कलेचे भान, कलेच्या जतन–संवर्धनाचे भान असलेले शिवेंद्र सिंग डुंगरपूर यांच्यासारखे मोजकेच असतात. जाहिरात क्षेत्रातले एक नावाजलेले व्यक्तिमत्व असलेले, ‘सेल्युलॉइड मॅन’ हा राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या माहितीपटाची निर्मिती केलेले शिवेंद्र सिंग ‘फिल्म हेरिटेज फाउंडेशन’च्या माध्यमातून चित्रपट जतन–सवर्धनाचे अत्यंत मोलाचे काम करताहेत. त्यांच्या या उत्कटतेने व्यापलेल्या कार्यावर प्रकाशझोत टाकणारी ही खास दिवाळी विशेष मुलाखत...**

चित्रपट माध्यमाकडे आपण दोन घटका करमणूक या नजरेने पाहत असलो तरीही ते संस्कृती जतन करण्याचे एक सशक्त माध्यम आहे, याची आपल्याला जाणीव असतेच असे नाही. वस्तुतः चित्रपटांमध्ये काळाच्या दस्तऐवजीकरणाची एक जबरदस्त क्षमता आहे. लघुपट, कथात्म चित्रपट आणि माहितीपट, या सर्वांतून त्या त्या काळातील समाजजीवनाचे जिवंत दर्शन घडत असते. चित्रपटातील कथानके आणि पात्रे काल्पनिक असली तरीही त्या पात्रांचे पोशाख, पात्रे वापरत असलेली उपकरणे, साधने, खाद्यपदार्थ या सगळ्यांत कथानकाच्या काळाचे प्रतिबिंब पडलेले असते.


अवघा एकशे तीस वर्षांचा इतिहास असलेला रुपेरी चित्रपट चित्रित करण्याची साधने काळानुसार बदलली असली तरीही त्याची रुपेरी पडद्यावरील प्रतिमा प्रेक्षकांना कायम आकर्षित करत आलेली आहे. कॅमेऱ्यामधील ८ मिमी, १६ मिमी, ३५ मिमी आणि सिनेमास्कोप रिळांवर चित्रित होणारा चित्रपट आता गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून डिजिटल कॅमेऱ्यातून चित्रित होऊ लागला आहे. चित्रपटक्षेत्रात दररोज नवनवीन तंत्रज्ञान रुजू होत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून दिग्दर्शक आणि त्याचा गोतावळा लक्षणीय कलाकृती निर्माण करत आहेत. या कलाकृती ज्या चित्रफितींवर चित्रित झाल्या आहेत त्या चित्रफिती, त्यांचे रंग, त्यांचे जतन आणि संवर्धन योग्य पद्धतीने झाले नाही, तर त्या कालौघात खराब किंवा नष्ट होऊ शकतात. दिग्दर्शकांनी ज्या कलात्मक दृष्टीने चित्रपटाची निर्मिती केली आहे, ती चित्रफितीच्या नाशामुळे कायमची हरवून जाऊ शकते, या कारणास्तव त्या चित्रफितींचे मूळ स्वरूपात जतन करून ठेवण्याच्या कामाला अतीव महत्त्व प्राप्त झाले आहे. हे काम एक प्रकारे संस्कृती-संवर्धनाचेच काम आहे. त्याचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक मूल्य फार मोठे आहे.

भारतात सरकारी पातळीवर चित्रपटांचे संग्रहालय करण्याची योजना १९६०च्या दशकात अमलात आणली गेली. पुण्याच्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात जागतिक दर्जाच्या चित्रपटांचे, त्या संदर्भातील पुस्तकांचे, पोस्टर्सचे संवर्धन करण्याची प्रक्रिया सुरू झाली. पी. के. नायर यांच्यासारख्या द्रष्ट्या चित्रपट अभ्यासक, रसिकाचे अपार कष्ट या क्लिष्ट आणि वेळखाऊ प्रक्रियेत जोडले गेले. परंतु कालांतराने सरकारी पातळीवर सुरू असलेले हे प्रयत्न काहीसे अधुरे ठरले. काळाचा रेटा पाहता या कामाला सुस्पष्ट स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी 'फिल्म हेरिटेज फाउंडेशन'ने पुढाकार घेतला. २०१४ साली 'फिल्म हेरिटेज फाउंडेशन' स्थापन करणारे शिवेंद्र सिंग डुंगरपूर हे मूळचे जाहिरात आणि चित्रपटक्षेत्रात काम करणारे सर्जनशील कलावंत. मात्र एका विशिष्ट क्षणी त्यांना चित्रपट जतन, संवर्धन यासंबंधी जी आस्था निर्माण झाली त्यातून गेल्या दहा वर्षांच्या काळात त्यांनी 'फिल्म हेरिटेज फाउंडेशन'च्या माध्यमातून एक चळवळ उभी केली. चित्रपट माध्यमावर नितान्त निष्ठा असल्याशिवाय हे कार्य यशस्वीपणे पूर्ण करणे शक्य नव्हते.

शिवेंद्रना मी सर्वप्रथम भेटलो होतो २०१३च्या आशियाई चित्रपट महोत्सवात. याच वर्षी भारतीय चित्रपटसृष्टीला शंभर वर्षे पूर्ण झाली होती. त्यांनी दिग्दर्शित केलेला 'सेल्युलॉइड मॅन' हा राष्ट्रीय पुरस्कार विजेता माहितीपट महोत्सवाचा सेंटरपीस होता. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे माजी संचालक पी. के. नायर यांच्या कार्यावरील हा माहितीपट निर्माण करण्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट प्रत्येक दृश्यातून दिसत होते. त्या माहितीपटानंतर शिवेंद्र यांचे 'फिल्म हेरिटेज फाउंडेशन'चे काम सुरू झाले. या कामाची व्याप्ती प्रचंड वाढत गेली. दरम्यानच्या काळात 'फिल्म हेरिटेज फाउंडेशन'तर्फे घेण्यात येणाऱ्या कार्यशाळांबद्दल माहिती मिळत होती. या कार्यशाळेत सहभागी झालेल्या आणि या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या काही तरुणांसोबत संवाद साधता आला होता. दोन वर्षांपूर्वी शिवेंद्र यांनी 'मामि' महोत्सवाचे संचालक म्हणून सूत्र हाती घेतली. महोत्सवात त्यांची भेट झाली, पण त्यांच्या

रिस्टोरेशनचे काम मोलाचे





सेल्युलॉइड मॅन : पी. के. नायर

कामाविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी स्वतंत्रपणे भेट घेणे आवश्यक होते. शिवेंद्र यांच्या व्यग्र वेळापत्रकात अशी भेट मिळेल की नाही, याबद्दल मी साशंक होतो. आशियाई चित्रपट महोत्सवाचे आयोजन करत असताना एका मीटिंग दरम्यान किरण व्ही. शांताराम यांनी शिवेंद्रना फोन लावला. ती संधी साधून मी शिवेंद्र यांच्याशी त्याच कॉलवर बोललो. शिवेंद्रनी तत्काळ भेटीची तारीख ठरवली. जुलै २०२५मधील मुंबईच्या पावसाने या भेटीत दोन वेळा अडथळा आणला. पण अखेरीस शिवेंद्र यांच्या ताडदेवच्या ऑफिसमध्ये भेटीचा योग आलाच. मी 'फिल्म हेरिटेज फाउंडेशन'च्या ऑफिसमध्ये पोहोचलो तेव्हा बाहेर धुवाधार पाऊस पडत होता. शिवेंद्र त्यांच्या कामात व्यग्र होते. 'फिल्म हेरिटेज फाउंडेशन'चे ऑफिस नावाप्रमाणेच चित्रपटांच्या इतिहासाची साक्ष देणारे! भिंतीवर जगभरातील अभिजात चित्रपटांची पोस्टर्स, शिवेंद्र यांची यिरी मेंझल, पी. के. नायर यांच्या सोबतची छायाचित्रे आणि एका काचेच्या कपाटात ठेवलेला वेगवेगळ्या ब्रँडचा कॅमेरा!

थोड्याच वेळात प्रिंटेड निळा झब्बा आणि पायजमा परिधान केलेले शिवेंद्र त्यांची एक ऑनलाइन मीटिंग संपवून माझ्यासमोरील लाकडी खुर्चीत येऊन बसले आणि आमच्या गप्पांचा सिलसिला सुरू झाला. चित्रपटप्रेम त्यांच्या मनात लहानपणापासून कसे रुजले त्याबद्दल शिवेंद्र सांगू लागले,

***

''बिहारमधील डुमराव गावचे राजे महाराज कमलसिंग आणि महाराणी उषा हे माझ्या आईचे आई-वडील! त्या दोघांना चित्रपट पाहण्याचा विलक्षण छंद होता. त्यांच्यामुळे मला सिनेमा पाहण्याची आवड निर्माण झाली. त्या काळात लोकांसाठी चित्रपट हे मनोरंजनाचे एकमेव माध्यम होते. मी जेव्हा आजोळी जात असे, मला आजी-आजोबांसोबत हॉलीवुडचे, चार्ली चॅप्लीनचे अनेक चित्रपट पाहायला मिळत. माझ्या आजोबांची सिनेमा पाहण्याची एक खास खोली होती; ज्याला आम्ही 'थंडा रूम' म्हणत असू. त्या भव्य वास्तूत ती एकमेव खोली वातानुकूलित होती. या खोलीमध्ये असलेला प्रोजेक्टर चंडी मिस्त्री नावाचे गृहस्थ ऑपरेट करायचे. जेव्हा चित्रपट दाखवला जायचा, तेव्हा मी त्याच्यासोबत असायचो. का कोण जाणे, पण सिनेमाची रीळ डब्यातून बाहेर काढून त्याचा वास घेणे मला खूप आवडायचे. चंडी मिस्त्री फिल्म्सची रीळ प्रोजेक्टरवर कशी लोड करतात, सिनेमाचे प्रोजेक्शन कसे होते, याचे मी बारकाईने निरीक्षण करायचो. यामुळेच माझ्या मनात सिनेमा माध्यमाविषयी कुतूहल निर्माण झाले.

''आमच्या घरी माझ्या बाबांनादेखील चित्रपट पाहायला आवडायचे. ते स्वतः त्यांच्या ८ मी.मी.च्या कॅमेरातून घरात होणाऱ्या समारभांचे चित्रीकरण करायचे. माझ्या बालपणीच्या अनेक घटना त्यांनी चित्रबद्ध केल्या आहेत. त्यांना पाहून मी सेल्युलॉइडकडे आकर्षित झालो. गंमत म्हणजे लहानपणी माझ्या वडिलांनी मला हिंसाचाराने व्यापलेला 'शोले' पाहण्यास मनाई केली होती. आज त्याच बहुचर्चित 'शोले'ची प्रिंट मी रीस्टोर केली आहे; जी लवकरच सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.''

''पुढे मी डून स्कूलला शिकायला गेल्यानंतर तिथे जवळच असलेल्या चित्रपटगृहात मला अनेक देशी-विदेशी चित्रपट पाहायला मिळाले. चित्रपटांची तिकिटे, पोस्टर जमा करण्याचा




टोरंटो फिल्म फेस्टिवलमधला सहभाग



'दो बिघा जमीन'चे वारसदार प्रेक्षकांसमोर येतात तेव्हा...

छंदही मी या काळात जोपासला. माझ्याकडे असलेल्या छोट्याशा डायरीत मी पाहिलेल्या चित्रपटाच्या नोंदी करत असे. मी विज्ञान शाखेची पदवी घेतल्यानंतर चित्रपटावरील प्रेमापोटी चित्रपटक्षेत्रात काम करण्याच्या उद्देशाने मुंबईत आलो. 'लेकिन' आणि 'लिबास' या चित्रपटांसाठी मी गुलज़ार यांचा सहायक म्हणून काम केले. गुलज़ार यांनी मला एफ.टी.आय.आय.मध्ये जाण्याचा सल्ला दिला. स्वतः गुलज़ार यांनी फिल्म मेकिंगचं कोणतंच औपचारिक प्रशिक्षण घेतलेले नाही, पण ते एकेकाळचे दिग्गज असलेल्या बिमल रॉय यांच्या तालमीत तयार झाले होते. मी मात्र एफ.टी.आय.आय.मधून प्रशिक्षण घ्यावे, असा त्यांचा आग्रह होता. मी फॉर्म भरला आणि प्रवेशपरीक्षा दिली. माझा इंटरव्ह्यू खुद्द श्याम बेनेगल यांनी घेतला. म्हणूनही मी म्हणत असतो, 'गुलज़ार आणि श्याम बेनेगल या दोघांचे माझ्या कारकिर्दीत महत्त्वाचे स्थान आहे. एफ.टी.आय.आय.मध्ये मी दिग्दर्शन आणि पटकथा लेखनाचे धडे घेतले.''

**जतनाचा नाद जडला**

एफ.टी.आय.आय.मधून बाहेर पडल्यानंतर शिवेंद्र यांनी चित्रपट दिग्दर्शनास सुरुवात केली. 'बजाज अलायन्स'सारख्या अर्थगर्भ जाहिरातीमुळे जाहिरात क्षेत्रात त्यांचं नाव गाजलं. त्यांनी पंधराशेहून अधिक जाहिराती दिग्दर्शित केल्या. मात्र अशी यशस्वी कारकीर्द सुरू असताना फिल्म रिस्टोरेशन आणि प्रिझर्वेशन सारख्या अनवट मार्गावर ते कसे वळले, याची माहिती देताना शिवेंद्र सांगतात,

''मी हॉलीवुडचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक मार्टिन स्कोर्सेसी यांची एक मुलाखत वाचली. त्यात त्यांनी बोलोग्ना(इटली)मधील एका चित्रपट महोत्सवाचा उल्लेख केला होता. जिथे रिस्टोअर्ड केलेल्या चित्रपटांचे प्रदर्शन केले जाते. मार्टिन स्कोर्सेसी हे स्वतः फिल्म रिस्टोरेशन आणि प्रिझर्वेशनच्या कार्यात व्यग्र असतात. पंडित रवी शंकर यांनी त्यांच्या बंधूंनी म्हणजेच उदय शंकर यांनी दिग्दर्शित केलेल्या 'कल्पना' या चित्रपटाची चित्रफित रिस्टोअर्ड करण्याची विनंती मार्टिन स्कोर्सेसी यांना केली होती. दुर्दैवाने ती मूळ चित्रफित मिळवणे त्यांना शक्य होत नव्हते. मी मार्टिन स्कोर्सेसी यांची भेट घेतली आणि त्यांना या संदर्भात मदत करण्याचे आश्वासन दिले. भारतात आल्यानंतर मी आणि माझे एफ.टी.आय.आय.चे काही मित्र या संदर्भात चर्चा करण्यासाठी पुण्याला पी. के. नायर सरांना भेटायला गेलो. त्या वेळी नायर सर राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयातून निवृत्त झाले होते. ते संग्रहालयाच्या समोर 'चतुर' बंगल्यात राहत होते. गंमत म्हणजे आमच्या एफ.टी.आय.आय.च्या वास्तव्यात आम्ही नायर सरांना वचकून असायचो. ते फार कोणाशी बोलायचे नाहीत. स्वत:च्या कामात गुंग असायचे. चित्रपट पाहताना हातात छोटा टॉर्च आणि एक डायरी त्यांच्याकडे असायची. त्या डायरीत ते चित्रपट सुरू असताना नोंदी करायचे. आम्ही सर्व विद्यार्थी त्यांच्याकडे फक्त चित्रपटातील होळीची गाणी मिळवण्यासाठी आणि विशिष्ट चित्रपट दाखवण्याची विनंती करण्यासाठी जात असू. या वेळी मात्र आमचा त्यांच्याकडे जाण्याचा हेतू वेगळा

**ज्याप्रमाणे चित्रपट निर्माण करणे ही कला आहे, त्याचप्रमाणे तो ज्या स्वरूपात निर्माण केला गेलाय त्याच स्वरूपात कायम टिकवून ठेवण्यासाठी काम करणे हीदेखील एक कलाच आहे.** ‘Film Restoration is an art!’ **आपल्याकडे ‘रिस्टोरेशन’ आणि ‘प्रिझर्वेशन’ या संकल्पनाच अजून लोकांना माहीत नाहीत. अर्थात त्यामुळे त्याचे महत्त्वही कोणाच्या लक्षात येत नाही.**

होता. आम्ही त्यांना फिल्म रिस्टोरेशनबद्दल विचारले तेव्हा ते काहीसे अस्वस्थ झाले. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या तत्कालीन व्यवस्थेवर ते नाराज होते. त्यांनी आम्हाला तिथे नेले. तिथली अवस्था पाहून आम्हाला धक्का बसला. ‘बॅटलशिप पोटेमकिन’, ‘वाइल्ड स्ट्रॅाबरीज’ अशी अभिजात चित्रपटांची नावे लिहिलेल्या रिळांच्या डब्यांवर बसून काही विद्यार्थी वाचन करत होते. ही मुले जिथे राहतात तिथले दिवे जातात म्हणून त्यांना इथे बसण्याची परवानगी देण्यात आल्याचे आम्हाला सांगण्यात आले. जागतिक चित्रपटांचे जतन-संवर्धन करणाऱ्या संस्थेची अशी दुरवस्था पाहून आम्ही देखील व्यथित झालो.

**नि:शब्द नायकांचा शोध**

‘‘फिल्म रिस्टोरेशनच्या संदर्भातील पी. के. नायर सरांचे विचार चित्रित करून ते एनडीटीव्हीसारख्या वाहिनीवरून प्रसारित करावेत, जेणे करून प्रशासकीय पातळीवर या विषयाची चर्चा होऊन त्यावर काही उपाय योजले जातील, या उद्देशांनी मी चित्रीकरण करण्याचा विचार केला. पी. के. नायर सर त्यांचे विचार मांडणार असल्याने हे चित्रीकरण सेल्युलॉइडवर करण्याचा निर्णय मी घेतला. माझा प्रकाशचित्रणकार मित्र संतोष थुंडीयिल सर्वप्रथम माझ्या मदतीला आला. यातूनच ‘सेल्युलॉइड मॅन’ या माहितीपटाची निर्मिती झाली. आवर्जून सांगायचे म्हणजे पी. के नायर सर स्वतःबद्दल काही बोलायला उत्सुक नव्हते. त्यांनी चित्रपट माध्यमाच्या क्षमता, भारतीय चित्रपटांची वैशिष्ट्ये, चित्रपटसंस्कृतीचे जतन आणि संवर्धन याबद्दलचे त्यांचे मौलिक विचार मात्र खुलेपणाने मांडले. मी त्यांना ही फिल्म तुमच्याबद्दल नाही, असे खोट बोलत चित्रीकरण करत राहिलो. एफ.टी.आय.आय.मधून प्रशिक्षण घेऊन चित्रपटक्षेत्रात नामवंत झालेल्या अनेक कलाकारांनी नायर सरांबद्दलच्या आठवणी सांगितल्या. भारतात अनेक ठिकाणी आम्ही चित्रीकरण केले. तब्बल अकरा प्रकाशचित्रणकारांनी या फिल्मचे प्रकाशचित्रण केले. भारतीय चित्रपटाच्या इतिहासाचा खूप मोठा दस्तऐवज या फिल्मच्या निमित्ताने तयार झाला. २०१३चा राष्ट्रीय पुरस्कार या चित्रपटाला मिळाला. त्यातूनच पुढे माझ्या फिल्म रिस्टोरेशन आणि प्रिझर्वेशनच्या कामाला दिशा मिळाली. भारतात विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून हजारो चित्रपटांची निर्मिती केली गेली आहे. या चित्रपटांच्या चित्रफिती कुठे असतील; कोणत्या अवस्थेत असतील हे जाणून घेण्याची इच्छा माझ्या मनात निर्माण झाली.’’

‘‘माझा जन्म राजस्थानमधील राजघराण्यातला. आमच्या परिवाराला हजार वर्षांचा इतिहास आहे. मला माझ्या पूर्वजांचा हा इतिहास माहीत आहे. प्रिझर्वेशनची वृत्ती माझ्या रक्तात वंशपरंपरेने आली आहे. संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्यासाठी सतत प्रयत्न करणाऱ्या माझ्या वडिलांचा प्रभाव माझ्यावर आहे.’’

‘‘पी. के नायर सरांवरील फिल्म करून थांबणे माझ्या शोधक वृत्तीला मानवणारे नव्हते. तुमच्या चित्रपटाने तुम्हाला कृतिशील बनवायला हवे. ‘सेल्युलॉइड मॅन’ने मला ती संधी उपलब्ध करून दिली. मी आणि माझ्या पत्नीने ‘फिल्म हेरिटेज फाउंडेशन’ची स्थापना केली. याच दरम्यान मी जागतिक दर्जाचे चेक दिग्दर्शक यिरी मेंझल यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा

मुलाखतकार डॉ. संतोष पाठारे आणि शिवेंद्र सिंग डुंगरपूर








पुनरुज्जीवित 'दो बिघा जमीन' आणि 'शोले'चे खास खेळ...

घेणारा 'चेकमेट : इन सर्च ऑफ यिरी मेंझल' हा माहितीपट केला. फिल्म फेस्टिव्हलला हजेरी लावणाऱ्या रसिकांना यिरी मेंझल यांचे 'क्लोजली गार्डेड ट्रेन', 'आय सर्व्हड् द किंग ऑफ इंग्लंड'सारखे अभिजात चित्रपट स्मरणात असतील. त्या वेळी यिरी मेंझल काही कारणामुळे मीडियावर नाराज होते. मी प्रागला गेलो होतो तेव्हा त्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. सुरुवातीस त्यांनी मला योग्य तो प्रतिसाद दिला नाही, पण 'नंतर मात्र हा कोण भारतीय मुलगा आहे; ज्याला माझ्याशी बोलण्याची उत्सुकता आहे?' असा विचार करून ते मला भेटले. माहितीपटासाठी सहकार्य करण्याची त्यांनी तयारी दाखवली. या माहितीपटाच्या निमित्ताने मी जगभरात फिरलो. केन लोच, ख्रिस्तोफ जानुस्की, इस्तवान झाबो, आंद्रे वायदा या जगविख्यात दिग्दर्शकांना भेटलो. आपल्या आवडत्या दिग्दर्शकांना भेटणे; त्यांची दिग्दर्शनाची प्रक्रिया जाणून घेणे यातून मी अधिक समृद्ध होत गेलो. या भेटीतून माझ्या फिल्म रिस्टोरेशनच्या कामाबद्दलच्या धारणा दृढ होत गेल्या.''

**जतन-संवर्धनाचे मोल अनमोल**

फिल्म रिस्टोरेशन आणि प्रिझर्वेशन म्हणजे नेमके काय? त्याची काय आवश्यकता आहे? या प्रश्नांची उत्तरे शिवेंद्र फार नेमकेपणाने देतात.

''ज्याप्रमाणे चित्रपट निर्माण करणे ही कला आहे, त्याचप्रमाणे तो ज्या स्वरूपात निर्माण केला गेलाय त्याच स्वरूपात कायम टिकवून ठेवण्यासाठी काम करणे हीदेखील एक कलाच आहे. 'Film Restoration is an art!' आपल्याकडे 'रिस्टोरेशन' आणि 'प्रिझर्वेशन' या संकल्पनाच अजून लोकांना माहीत नाहीत. अर्थात त्यामुळे त्याचे महत्त्वही कोणाच्या लक्षात येत नाही. या बाबतीत एक किस्सा मी तुम्हाला सांगतो. मायावती उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री असतानाच्या काळात ताजमहालाच्या एका भागाचा संगमरवरी दगड निखळला. त्याच्या जागी दुसरा उच्च प्रतीचा दगड लावून डागडुजी करण्यात आली. पण त्यावर युनेस्कोने आणि इतर तज्ज्ञांनी आक्षेप घेतला. बदली केलेला दगड उच्च प्रतीचा असला तरीही तो ताजमहालच्या इतर दगडांसारखा नव्हता. त्याच्यामुळे ताजमहालच्या सौंदर्याला बाधा येत होती. या आक्षेपानंतर शहाजहानने ज्या खाणीतून ताजमहालासाठी संगमरवरी दगड आणले होते तिथून दगड मागवून पुन्हा डागडुजी करण्यात आली. फिल्म रिस्टोरेशनचे काम नेमके हेच आहे. ज्या फॉरमॅटमध्ये फिल्म शूट केली आहे, त्याच स्वरूपात ती पुन्हा आणणे म्हणजे रिस्टोरेशन करणे. पूर्वी सेल्युलॉइडच्या चित्रफिती चित्रीकरणासाठी वापरात येत. कालांतराने या चित्रफिती खराब होतात. त्यावरील रंग फिके होऊन जातात. डिजिटल तंत्रज्ञान येण्याआधी जगभरातील सगळेच चित्रपट सेल्युलॉइडवर चित्रित झाले आहेत. हे चित्रपट डिजिटल माध्यमात रूपांतरित करता येत असले तरीही त्यांचे मूळ स्वरूप जतन केले तर ते चित्रपट मोठ्या पडद्यावर पाहण्याचा आस्वाद प्रेक्षकांना घेता येईल. आम्ही 'फिल्म हेरिटेज फाउंडेशन'तर्फे अभिजात चित्रपटांचे रिस्टोरेशन करायला सुरुवात केली. त्या मालिकेत गिरीश कासारवल्ली यांचा 'घटश्राद्ध' (कन्नड), श्याम बेनेगलांचा 'मंथन', अरिबम

शाम शर्मा यांचा 'ईशानू' (मणिपुरी), अरविंदन गोविंदन यांचा 'थंप' (मल्याळम) हे चित्रपट आम्ही रिस्टोअर केले. चित्रपटांच्या बरोबरीने चित्रपटांशी संबंधित साहित्य, पोशाख, पुस्तक, पोस्टर्स यांचेही रिस्टोरेशन आम्ही करत आहोत.

''या कामासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता आहे. या लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी परदेशातील तज्ज्ञ मार्गदर्शकांना बोलावून कार्यशाळा आयोजित करतो. या कार्यशाळा आयोजित करण्यासाठी आम्हाला 'इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फिल्म आर्काइव्ह' या संघटनेचे सातत्याने सहकार्य मिळत आहे. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या कर्मचाऱ्यांनादेखील आम्ही या कार्यशाळेत सहभागी करून घेतले आहे. देशातील वेगवेगळ्या भागांत या कार्यशाळा आयोजित केल्यामुळे प्रादेशिक चित्रपटांचे रिस्टोरेशन होण्याच्या प्रक्रियेला वेग मिळालाय. चित्रपट माध्यमाचा अभ्यास करणाऱ्या आणि त्यावर प्रेम करणाऱ्या अभ्यासू रसिकांसाठी हे एक नवीन दालन खुले झाले आहे.

''आम्ही चित्रपटांच्या इतिहासाचे आणि सुखद आठवणींचे जतन करण्याचे काम करत आहोत. या कामाचा आवाका खूप मोठा आहे. अभिजात चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित करून ते प्रेक्षकांनी पाहावेत, यासाठी आम्ही जे प्रयत्न केले त्याला आता यश येत आहे. सध्या दक्षिण मुंबईतल्या रिगल चित्रपटगृहात आम्ही दर आठवड्याला एका रिस्टोअर्ड चित्रपटाचे विनाशुल्क प्रदर्शन करतो. क्रिस्टोफर नोलान, कुब्रिक, अल्फ्रेड हिचकॉक या दिग्दर्शकांचे चित्रपट आम्ही आजवर प्रदर्शित केले आहेत. काही चित्रपटांच्या दिग्दर्शकांनाही आम्ही प्रदर्शनाच्या वेळी आमंत्रित करून त्यांच्याशी संवाद साधतो. या उपक्रमाला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळते आहे.''

'फिल्म हेरिटेज फाउंडेशन'ची पुढची वाटचाल कशी होणार त्याबद्दल सांगताना शिवेंद्र म्हणतात,

''इतिहासाचे जतन करण्याच्या या कार्याला उज्ज्वल भविष्य आहे. ज्या चित्रपटांचे रिस्टोरेशन करणे कठीण आहे, अशा चित्रपटांवर आम्ही काम करत आहोत. पुढच्या पिढीला हे चित्रपट मूळ स्वरूपात पाहता यायला हवेत, या दृष्टीने आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.''

''माझी सगळी कारकीर्द महाराष्ट्रात घडलेली असल्यामुळे मला मराठी चित्रपटांविषयी विशेष आस्था आहे. सुमित्रा भावे, सुनील सुकथनकर यांनी त्यांचे काही चित्रपट



मला दिले आहेत. ज्या निर्मात्यांना त्यांचे चित्रपट सुस्थितीत जतन करायचे असतील त्यांना 'फिल्म हेरिटेज फाउंडेशन'चे सहकार्य नेहमीच मिळेल, हेही मला आपल्यातल्या या संवादाच्या निमित्ताने आवर्जून सांगायचे आहे. चित्रपट संवर्धनाबरोबरच आम्ही चित्रपट आणि चित्रपटकर्ते यांच्यावरील साहित्यसुद्धा निर्माण करत आहोत. दादासाहेब फाळके हे भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक असले तरीही बाबूराव पेंटर यांनी चित्रपटांना कलेचा दर्जा मिळवून दिला. त्यांच्या कारकिर्दीवर आधारित एक पुस्तक राजेश देवराज लिहीत आहेत. 'अमृत मंथन', 'अमर ज्योती'सारखे चित्रपट निर्माण करणारे व्ही. शांताराम या चित्रपटांमध्ये आपल्या दर्जेदार अभिनयाचे दर्शन घडवणाऱ्या दुर्गा खोटे, शांता आपटे यांच्यावरील संशोधनाचे कामही आम्ही हाती घेणार आहोत. एकूणच मराठी चित्रपटसृष्टीला माझ्यातर्फे योगदान देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

''माझे गुरू पी. के. नायर सर म्हणायचे, 'अन्न आणि निवाऱ्याच्या तुलनेत संस्कृतीला प्राधान्य नसले तरीही माणूस केवळ अन्नावर जगत नाही. त्यांच्या मनालादेखील पोषणमूल्ये लागतात.' विसाव्या शतकात चित्रपट आणि दूरदर्शन हे दोन महत्त्वाचे सांस्कृतिक स्रोत माणसाने निर्माण केले आहेत. अशा वेळी भावी पिढीसाठी चित्रपटसंस्कृतीचे संवर्धन करणे, ही आपली नैतिक जबाबदारी आणि कर्तव्य आहे. हे कर्तव्य गांभीर्यपूर्वक पार पाडू शकलो नाही, तर आपण या कार्यात अपयशी ठरू. या कार्याला तसा थोडा उशीर झालाय, पण निदान आता सुरुवात तर चांगली झालीय, ही माझ्या दृष्टीने अतीव आनंदाची गोष्ट आहे.''

***

शिवेंद्र सिंग डुंगरपूर यांनी या क्षेत्रातले अध्वर्यू पी. के. नायर यांचा वारसा पुढे नेत स्वप्रयत्नांनी चित्रपट जतन आणि संवर्धनाचे एक नवे दालन खुले केले आहे. ते केवळ चित्रपटकलेचेच नव्हे, तर या कलेतल्या माइल स्टोन ठरलेल्या ऐतिहासिक क्षणांचेही जतन करत आहेत. या त्यांच्या उत्कटता राखून असलेल्या चित्रपटसंस्कृतीच्या जतन-संवर्धनात या ना त्या रूपाने आपण सर्वांनीच म्हणजेच वाचक-प्रेक्षकांनी, संशोधक-अभ्यासकांनी आपापला वाटा उचलला, तर भारतीय चित्रपटांचा अभिमानास्पद वारसा पुढच्या कितीतरी पिढ्यांना समृद्ध करत राहील.

❋ ❋ ❋

**डॉ. संतोष पाठारे हे अध्यापन, लेखन, माहितीपटांचे दिग्दर्शन, चित्रपट महोत्सवांचे आयोजन, रसग्रहणात्मक कार्यशाळा आदिंमध्ये व्यग्र असलेले मैत्रीपूर्ण व्यक्तिमत्व आहे. संपर्क: ९८२०३ ७४०९३**


KITABKHANA,
MUMBAI

Located in a 150-year old heritage building in Fort, Kitab Khana is a bookstore with a soul. With an old world charm, the bookshop houses a beautifully curated collection of books from modern fiction, classics, children's books to titles in regional languages like Hindi, Marathi, Gujarati and more. KitabKhana offers a 10-15% discount all year round and also regularly hosts author events, bookclubs and workshops. Readers can unwind at the in-house cafe. A literary haven for bibliophiles.



Somaiya Bhavan 45/47 MG Road, Fort +91 22 61702276/77/78
Whatsapp: +91 88795 40538 / 10:30 am - 7:30 pm, Open all days

kitabkhanabooks

# पर्दा है पर्दा...



हृषिकेश आर्वीकर

अनुवाद : सोनाली नवांगुळ

संवादोत्सव २०२५



संशोधन यात्रा







**सतत नव्याचा शोध आणि संशोधनाची ऊर्मी नि यासाठी परिस्थितीशी दोन हात करण्याची हिंमत यातून काही अकादमिक, व्यावसायिक टप्पे यशस्वीपणे पार होतातच. परंतु याही पलीकडे जाऊन जगाकडे पाहण्याची दृष्टी विस्तारते; आपले अनुभवविश्व श्रीमंत होत जाते आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे एक माणूस म्हणून आपण हरघडी कणाकणाने समृद्ध होत जातो. 'प्रभात ट्रॅजेक्टरी ऑफ सिनेमा इन बॉम्बे प्रेसिडेंसी १९२०–१९५०: इम्पिरिअलिझम, इन्फ्रास्ट्रक्चर, इन्स्टिट्यूशन्स अँड इंडस्ट्री' असा सिनेमा आणि समाजाचा अन्योन्य संबंध तपासणारे, ऑस्ट्रेलियातल्या क्वीन्सलँड विद्यापीठातून पीएच.डी. संशोधन करणाऱ्या हृषीकेश आर्वीकर यांच्या संदर्भानेही असेच घडले. त्यांच्या समृद्धीचा प्रवास उलगडणारा हा लेख...**

सिनेमा!

मला कधीपासून इतका रस वाटायला लागला सिनेमात ते आठवायला जातो, तेव्हा लहानपण जागे होते. माझे वडील सरकारी नोकरी करायचे. ते फिल्ड पब्लिसिटी ऑफिसर होते. खेडोपाड्यांतील जनतेपर्यंत सिनेमा, पोस्टर्स, आरोग्य मोहिमा, लसीकरण शिबिरे यांच्या माध्यमातून संदेश पोहोचवणे हा या नोकरीचा भाग होता. तेव्हा इतर कशाहीपेक्षा मुख्यत: जास्त प्रमाणात लोक गोळा व्हायचे ते सिनेमासाठी.

ही तर झाली सुरुवात, पण सिनेमा आणि संस्कृतीच्या प्रवासात मला अनेक शिक्षक लाभले. प्रत्येकाकडून काही वेगळा दृष्टिकोण लाभला. माझे सिनेमाचे गुरू समर नखाते यांनी मला केवळ सिनेमा व त्याच्या समाजविषयक भूमिकेची ओळख करून दिली इतकेच नाही तर चिकित्सक विचार कसा करायचा; प्रश्न कसे विचारायचे; शिकणे, शिकलेले विसरणे, पुन्हा नव्याने शिकणे याचेही धडे दिले. मी मॉडर्न लॉ कॉलेजमध्ये कायद्याचे शिक्षण घेत होतो. सोबत 'आलियान्स फ्रॉन्सेस दी पूना' इथे फ्रेंच भाषा शिकत होतो. त्या काळात मी नखातेंचा हौशी विद्यार्थी होतो. इतर अनेक शिक्षकांप्रमाणे त्यांनी आम्हाला शिकवले, विचार करायला उद्युक्त केले. तेव्हा आम्ही केवळ कलेचा आस्वाद घेतला नाही, तर आपल्याला काही गोष्टी का आवडतात; काही शैलींविषयी तिटकारा का वाटतो; काही कलाकार विशेष का आवडतात; विशिष्ट प्रकारच्या संगीताकडे मन का ओढले जाते; एखाद्या गोष्टीविषयी आस्था का वाटते व जीवनाच्या काही पैलूंकडे आपले दुर्लक्ष का होते, हे सगळे आम्ही त्यांच्याकडून समजून घेतले. मागे वळून बघताना वाटते, स्वत:ची तपासणी करत राहणे व मूल्यनिर्धारण करणे हेच माझ्या व्यक्तिगत विकासातले महत्त्वाचे धडे होते.

कायद्याची पदवी मिळवल्यानंतर मी मुंबईतील नामांकित 'झेव्हियर्स इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन' इथे दहा महिन्यांसाठी चित्रपटनिर्मिती प्रशिक्षण घ्यायला जात होतो. त्या वेळी वडिलांचे नोकरीतील सोबती व मित्र महेश अय्यंगार मला म्हणाले, 'तुला मुंबईत शिकायचंय न, जरूर शीक, पण लक्षात ठेव मुंबईत दोन प्रकारचे लोक टिकून राहू शकतात. एक, ज्यांना सगळं काही ठाऊक असतं आणि दुसरे, ज्यांना काही माहिती नसते, पण ते विचारायला हयगय करत नाहीत.' हे शहाणपण शिदोरीसारखे मी जपलेले आहे. आज माझ्या विद्यार्थ्यांना शिकवताना मी हे उदाहरण देतो व सांगतो की जगाकडे कुतूहलाने बघत प्रश्न विचारत राहाल तर शिक्षण कधीच थांबणार नाही.

**सर्जनाच्या शोधातली मुशाफिरी**

फिल्म मेकिंग कोर्स संपल्यानंतर नाटककार महेश एलकुंचवार यांच्या साहित्यावर आधारित एका सिनेमात मी सहदिग्दर्शक म्हणून काम करत होतो. त्याच वेळी माझा मित्र श्रीकांत आगवणे याने सांगितलं, 'दिग्दर्शक कमल स्वरूप (ज्यांना मॅव्हेरिक अर्थात कलंदर दिग्दर्शक म्हटले जात असे. कमल यांनी 'ओम दर-ब-दार' (१९८८) ही भारतातली पहिली पोस्ट मॉर्डन - उत्तर आधुनिक - फिल्म बनवली आहे.) यांना १९२० साली दादासाहेब फाळके यांनी लिहिलेल्या एका नाटकासाठी मराठीतून हिंदी भाषेत भाषांतर करणाऱ्या अनुवादकाची गरज आहे.' फाळकेंनी त्या वेळी चित्रपटसृष्टीचा निरोप घेतला होता आणि एका वृत्तपत्रात 'फाळके इज डेड!' अशी मोठी आणि खोटी बातमी देऊन टाकली होती. वस्तुस्थिती अशी की ते संपूर्ण कुटुंबासह बनारसला गेले होते आणि तिथे त्यांनी फिरत्या रंगमंचावर नाटक करण्याचा विचार केला होता. ते नाटक त्यांनी नारायण हरी आपटे यांना प्रतिक्रियेसाठी वाचायला दिले. त्याची चिकित्सा करायला सांगितली. पण आपटेंनी दिलेल्या सूचनांकडे सपशेल दुर्लक्ष केले. स्वरूप यांनी ही पूर्वपीठिका मला सांगितली व अनुवादासाठी विचारणा केली. मी आनंदाने होकार दिला.

भारतीय सिनेसृष्टीच्या निर्माणातील एका 'उस्तादा'ने लिहिलेला तो मजकूर होता. इतिहासाने दडपून टाकलेला किंवा दुर्लक्षित ठेवलेला. तो मी वाचणार होतो. वाचताना मला जाणवले, फाळके स्वत:बद्दल उच्च कोटीचा अभिमान बाळगत होते आणि स्वत:च्या नवनवीन कल्पनांचे वारेमाप कौतुक करत होते. इतकंच नाही, तर त्या सगळ्याचे 'उचित' असे श्रेय त्यांचेच आहे, असे एकूण म्हणत होते. ते स्वत:ला सांस्कृतिक निर्मितीचे - विशेषत: सिनेमानिर्मितीचे - ब्रह्म म्हणवून घेत होते. त्यांनी रचलेल्या या कहाणीवर अनेकांनी विश्वास ठेवला. उरलीसुरली कागदपत्रे आणि सिनेमे यांनी हे मिथक आणखी पक्के होत गेले.

दरम्यान मी फाळकेंच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशी

निगडित संग्रहातील साहित्य वाचून काढले. त्याच वेळी वडिलांच्या शिफारशीवरून पॉल जॉन्सनचे 'इंटलेक्च्युअल्स' हे पुस्तकदेखील वाचलं. त्या काळात माझे मन एकानंतर एक चरित्र वाचण्यात गुरफटून गेले होते आणि काटेकोर संशोधनातून सर्जनशील काम कसे घडत जाते याचे प्रत्यंतर मला येत होते.

एलकुंचवारांच्या साहित्यावर आधारलेली 'मौनराग' ही वैभव आबनावे दिग्दर्शित फिल्म डॉक्यु-फिक्शनच्या वाटेने पुढे सरकली. या फिल्ममध्ये एलकुंचवारांच्या आध्यात्मिक रूप घेत जाणाऱ्या पात्रांचे पुनर्निर्माण करण्यात आले होते. ही सारी काल आणि अवकाशाने जोडलेली, विलग झालेली अनंताच्या शोधात असलेली जीवन, मृत्यू, परस्पर संवाद, दुःख, वेदना या साऱ्याचा अर्थ लावू पाहणारी पात्रे आहेत. त्यात एक अबोल मूलही होते, जे चारही भागांतून फिरत होते, जणू काही नाटककाराचे शब्द पात्रांच्या माध्यमातून एकमेकांशी गुजगोष्टी करत असावेत. जक्स्टॅपोइड स्टॅकॅटो! हे सगळं संभाषण कुठेही न जाणारे, तरीही सगळे काही व्यापून असलेले असे होते!

या फिल्मवर काम करत असताना मी कम्युनिकेशन स्टडीजमध्ये मास्टर्स पूर्ण केले. व्हिडिओ प्रॉडक्शन हा माझा खास विषय होता. तिथे नखाते माझे अधिकृत शिक्षक होते. त्यांची शिकवण्याची पद्धत विद्यार्थ्यांसाठी थोडी आव्हानात्मक म्हणावी अशी होती, पण संवादातून अधिकाधिक विचार बाहेर काढण्याची त्यांची ती रीत होती. सॉक्रेटिस मेथड हे नंतर सगळ्यांच्या लक्षात आले.

सिनेमावर काम करताना वैभव सहजपणाने मला म्हणाला, 'तू जेएनयूमध्ये सिनेमा स्टडीजसाठी अर्ज करायला हवास.' मी तसे केले. 'मौनराग'चा रफ कट बघताना निधीसाठी काही आवश्यक अटी पूर्ण करण्याच्या कामात असताना मी निकालाकडे एक डोळा ठेवून होतो. मला प्रवेश मिळाला नसल्याची खिन्न करणारी बातमी कळली. मी घरच्यांना सांगितले तेव्हा वडील म्हणाले, 'काही हरकत नाही. तू तिथे शिकवायला गेलास, तर तो खरा विजय ठरेल!' त्यांच्या या आशावादामुळे मला निराशा आली नाही. वैभव म्हणाला, 'मला वाटतंय, दुसरी यादीही निघेल.' मी त्याचे हे म्हणणे ऐकून न ऐकल्यासारखे केले आणि नव्या कामाला लागलो. स्वतःची कथा/कल्पना दिग्दर्शक आणि निर्मिती संस्थांना देण्याचा माझा विचार सुरू झाला.

**जेनएनयूच्या जगातले पालनपोषण**

एक दिवस मी गल्लीतील सलूनमध्ये दाढी करून घेत होतो. तितक्यात बाबांचा फोन आला. मला विजय राजचे बीएसएनलच्या जाहिरातीतले (तो दाढी करताना फोन उचलतो तेव्हाचे) वाक्य आठवलं, 'मीटिंगमध्ये आहे!' मी गालात हसत फोन उचलला, तर बाबा आनंदाने उड्या मारत होते, 'ऋषी, तुझं 'जेएनयू'च्या यादीत नाव आलंय.' मी घरातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी जेएनयूची वेबसाइट पाहिली होती. घरी आल्यावर त्यांनी मला आनंदाने पोटाशी धरले. मी लगोलग तयारीला लागलो. प्रवेश घेतेवेळी नोकरशाहीच्या डावपेचांशिवाय इतरही काही अडचणीही आल्या, पण त्या

अमर ज्योति आणि कुंकू : समाजसन्मुख चित्रनिर्मितीची प्रभात...









प्रभातच्या यशामागचे हात...

पार पडल्या. दर आठवड्याला आमचे आठ तासांचे दोन वर्ग असायचे. प्रत्येक सत्रात दोन विषय. प्रत्येकाला एकूण लेखाचा एक सारांश तयार करायचा असायचा आणि वर्गातील सगळ्यांना वाचून दाखवायचा असायचा. लेखात काय म्हटलंय, हे केवळ पाच वाक्यांत सांगायचे, असे आम्हाला सांगण्यात यायचे. प्राच्यवादापासून वसाहतवादापर्यंत, लिंगसंवेदनशीलतेपासून पुरुषत्वापर्यंत, 'क्वीअर' या शब्दाच्या अर्थापासून क्वीअरनेसच्या विस्तृत स्पेक्ट्रमपर्यंत, उपेक्षित आवाजांपासून हुकूमशाहीपर्यंत, इटालियन नव-वास्तववादापासून ते शरीराचा थरकाप उडवणाऱ्या भयापर्यंत म्हणजे सूर्यप्रकाशाच्या अखत्यारित येणारा प्रत्येक विषय जेएनयूच्या 'स्कूल ऑफ आर्ट्स अँड ॲस्थेटिक्स'मध्ये शिकवला जात होता.

नाटककार धर्मकीर्ती सुमंतने त्याचा जेएनयूबद्दलचा अभिप्राय नेमक्या शब्दांत नोंदवला होता, 'हृष्या, इथली कचऱ्याची कोंडाळीही रोमँटिक आहेत रे!' ही एकच नोंद त्या सुंदर कॅम्पसमध्ये चहाच्या घोटाघोटासोबत झडलेल्या चर्चांचा पुरावा म्हणून पुरेशी आहे.

जेएनयूत असताना इरा भास्कर यांच्या मार्गदर्शनाखाली मी लेखनकौशल्ये शिकलो. आजही मी त्यांच्या शिकवण्यातून झालेले संपादकीय संस्कार पुनःपुन्हा गिरवतो आहे. कौशिक भौमिक यांच्यासोबत रात्ररात्र तावातावाने चर्चा चालायच्या. क्वचित प्रसंगी शिवीगाळही व्हायची. उजाडल्यावर आम्ही हसतखेळत चहा प्यायला जायचो नि आमच्या चर्चेला विराम द्यायचो तेव्हा आम्हाला ओळखणारे लोक 'हे यांचं नेहमीचंच!' अशा अर्थाने आमच्याकडे हसत बघायचे, हे आता आठवते.

पहिले वर्ष असे संपले. मी माझा विषय पुढे नेण्यासाठी उत्सुक होतो. 'राम गोपाल वर्मा आणि नव्वदच्या दशकातील हिंसा!' ही हिंसा अंडरवर्ल्डशी संबंध असणाऱ्या अराजकातून उद्भवली होती. या पार्श्वभूमीवर नव-उदारमतवादातून उगवलेल्या कॉर्पोरेट संस्कृतीचा चेहरा लेवून बॉम्बेचे रूप पालटत तिचे मुंबईत रूपांतर होत होते. पण त्याचदरम्यान मी माझ्या माहेरी म्हणजे 'नॅशनल फिल्म अर्काइव्ह ऑफ इंडिया'मध्ये आलो तेव्हा निराळे वळण लाभले.

मला स्पष्ट आठवतेय, काही वर्षांपूर्वी इथल्या मुख्य थिएटरसमोर उभ असलेले समर नखाते सर तिथे जमलेल्या विद्यार्थी आणि प्रेक्षकांवर अक्षरशः खवळले होते. कारण 'वन फ्ल्यू ओव्हर द कक्कूज नेस्ट' या सिनेमावर लोकांनी नाराजी व्यक्त केली होती. पुढची पंचेचाळीस मिनिटे त्यांनी त्या सिनेमाचा सखोल अर्थ सगळ्यांना समजावून सांगितला. नेटिव्ह अमेरिकन्सचे मौन आणि कथानायक रँडल पी. मॅकमर्फी याचा वेडेपणाच्या चौकटीत बसण्यास दिलेला जोरदार नकार या कंगोऱ्यातून त्यांनी उलगडलेला सिनेमाचा पट मला आजही आठवतो. पुढे जेव्हा मी पीएच.डी.साठी विषय निवडला आणि वैयक्तिक आणि संस्थात्मक पातळीवर असंख्य अडथळे ओलांडत इतरांच्या नजरेतल्या वेडेपणाच्या चौकटीत बसण्यास नकार देत एकाच वेळी विषयाला आणि परिस्थितीला भिडत गेलो, तेव्हा मला नखाते सरांचे ते तप्त बोल हटकून आठवत गेले.

इथेच अर्काइव्हच्या थिएटरमध्ये मी पहिल्यांदा इंगमार

बर्गमन वारल्यानंतर त्याचे सिनेमे बघितले. मायकेलेंजेलो अँटोनिओनीचेही. अँटोनिओनीच्या वाट्याला भांडवलशाही चौकटीतले एकटेपण आले होते, तर बर्गमन रोजच्या जगण्यातल्या व्यामिश्रतेत काही चिरंतनाचा स्पर्श असलेले सवाल करू पाहत होता. (या दोघांचेही मृत्यू काही तासांच्या अंतरात झाले होते.) एनएफएआयमध्ये बऱ्याच लोकांशी माझी मैत्री जुळली. पण संग्रहालयात जाऊन त्यांचे काम बघण्यासाठी मात्र २०१४ साल उजाडले. अशाच एका दुपारी हॉटेल स्वरूपमध्ये बसलो असताना इरा भास्कर मला म्हणाल्या, 'तू खरंतर राम गोपाल वर्मांऐवजी 'प्रभात स्टुडियो'वर संशोधन करायला हवंस!' माझा ठरलेला विषय मी सोडणार नाही, हाच माझा हेका होता. मला बळजबरीने 'मराठी' विषयात ढकलायचा हा प्रयत्न आहे, अशी माझी तेव्हा भावना होती. आजवर मी संकुचित मराठीपणापासून कायम फटकून राहिलेला होतो. जेएनयूमध्ये एखादा सण साजरा करण्यासाठी मला बोलावले जायचे, तेव्हाही मी नाही म्हणायचो. पण एकीकडे कमल स्वरूप यांच्यासारखा एक ध्यास घेऊन तपशील, माहिती गोळा करणाऱ्या माणसांच्या हाती केवढं अद्भुत लागतं, हेही मी वाचत होतो. 'रंगभूमी'सारखे (फाळकेंचे आत्मचरित्रात्मक नाटक) काम मराठी संस्कृतीचा उपहासाच्या वळणाने समाचार घेणारी कृती होती. या सगळ्याबद्दल मला खऱ्या अर्थाने हलवून जागे केले, ते इरा भास्कर यांनी! त्या म्हणाल्या, 'हृषी, तू जर हे हातात घेतलं नाहीस तर पुढे लवकर काही होण्याची चिन्हं नाहीयेत.'

माझे एम.फिल.चे परीक्षक रवी वासुदेवन यांचाही हाच सूर होता. ते म्हणाले, '१९८०चं दशक संपताना आणि १९९०च्या दशकाच्या प्रारंभी 'प्रभात फिल्म कंपनी'च्या कामासंदर्भातला एक प्रकल्प प्रस्तावित होता, पण पुष्कळ कारणांमुळे तो प्रत्यक्षात येऊ शकला नाही. तू इतकं दणदणीत म्हणावं असं काम केलं आहेस हे बघून मला आनंद वाटतोय.'

**'प्रभात' पर्वाला भिडताना...**

माझी पार्श्वभूमी प्रॉडक्शन अर्थात निर्मितीची होती. त्यामुळे असा प्रकल्प आकारास आणताना लागणारे बजेट, सिनेमाच्या सेटच्या अवतीभवती चालणारी बेताल किस्सेबाजी आणि सिनेमाशी निगडित परिवारांमधून वाहणारी जनुकीय आंतरपाठ्यता (Genetic interetextuality म्हणजेच पुढच्या पिढीपर्यंत पोहोचणारी माहिती, किस्से, गोष्टी, राजकारण आणि या साऱ्याचं सिनेमाच्या आशयामध्ये होणारे रूपांतर) यांचे परिणाम मला सहजपणाने कळत होते. मी प्रॉडक्शन स्टडीज या उपशाखेकडे मोर्चा वळवायचा निर्णय घेतला. पण त्याच वेळी सिनेमा चिकित्सक नि विश्लेषणात्मक दृष्टीने वाचता यायला हवा, अशीही तीव्र ओढ होती. म्हणून मी दोन्ही गोष्टींचा मध्य साधला. त्यातून माझी पद्धत विकसित झाली. तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय उलथापालथींसंदर्भात अर्थनिर्मिती (Meaning) आणि निर्मिती (Making) यांची वाटचाल कशी होते, यावर एकाग्र होणे.

माझ्या एम.फिल.च्या प्रबंधाचे, सूक्ष्म पातळीवर जाऊन अर्थ लावण्याच्या पद्धतीचे कौतुक झाले. तरीही त्या काळातल्या सामाजिक-राजकीय परिस्थितीचा शोध घेऊन आणखी तथ्ये हाती यायला हवीत असे मला वाटत होते. या निश्चयामुळेच मी भरपूर प्रवास केला. बाबूराव पेंटर, भालजी पेंढारकर, व्ही. शांताराम, दादासाहेब तोरणे, लीला चिटणीस, शांता आपटे, हंसा वाडकर यांच्यासारख्या त्या काळाचं प्रतिनिधित्व केलेल्या कलावंतांची संग्रहित माहिती पोतडीत जमा करत गेलो. पाच वर्षांत सुमारे पंधरा हजार पाने इतके साहित्य मी गोळा केले. यापैकी काही माहिती व्ही. जी. दामले (प्रभात फिल्म कंपनीचे भागीदार) यांच्या वंशजांकडून मला मिळाली.

मी या विषयाचा आणखी पाठलाग केला. आणखी पुस्तके, वर्तमानपत्रांची कात्रणे, सिनेमाची पोस्टर्स, ग्रामोफोन



बुकलेट्स इत्यादी साहित्य मिळाले. जिथे काही धागा मिळेल असे वाटले तिथे तिथे मी पोहोचलो. डिजिटल स्टोअरेज स्पेससारख्या सोयींमुळे सगळी कागदपत्रे आणि साहित्य बॅकअपरूपात सुरक्षित ठेवता येत होते.

मी 'प्रभात फिल्म कंपनी'बद्दल आधीच इतके लिहून ठेवलेले होते की पीएच.डी.चा अभ्यास त्याच सूत्राचा नैसर्गिक विस्तार असल्यासारखा भासत होता. या दरम्यान २०१८ च्या अखेरीस जेएनयू सोडून 'एमआयटी स्कूल ऑफ फिल्म अँड टेलिव्हिजन'मध्ये शिक्षक म्हणून दाखल झालो. सुरुवातीला काही चाचणी सत्रे घेतली नि मग सिनेमा अभ्यास व सिनेमा इतिहास या विषयांच्या सहायक प्राध्यापक पदासाठी रीतसर अर्ज केला. अखेर मला नोकरी मिळाली.

मी तिथे दिग्दर्शन व पटकथा लेखनासारखे व्यवहार्य विषय शिकवले. आता मी नखाते सरांसोबत काम करत होतो. तरीही नेहमीप्रमाणे त्यांचा विद्यार्थीच होतो आणि अर्थात सहकर्मीही. माझा इरादा स्पष्ट होता : अमेरिका, ब्रिटन, जर्मनी किंवा ऑस्ट्रेलिया अर्थात परदेशात अर्ज करता येईल इतपत पैसे नोकरीतून कमवून घ्यायचे. जेएनयूमध्ये असतानाही मी असा प्रयत्न केला होता, पण चाकोरी सोडण्यास राजी नसणाऱ्या तिथल्या संकुचित वृत्तीच्या प्रशासनामुळे तो मार्ग बंद झाला होता. मिशिगन विद्यापीठात माझी निवड झाल्यात जमा होती, पण शेवटी मी ऑस्ट्रेलिया इथल्या 'क्वीन्सलँड विद्यापीठा'त दाखल झालो. तिथे ॲड्रियन ॲथिक माझे मार्गदर्शक होते. ते सिनेमा अभ्यासाची पार्श्वभूमी असणारे माध्यमतज्ज्ञ होते. माझ्या मनात आले, सिनेमा अभ्यासाचा मार्ग त्यांनी का बरं सोडून दिला असेल?

### संशोधनप्रक्रियेतले डुंबणे

ब्रिस्बेनमध्ये राहायला आलो व त्यांच्यासोबत काम सुरू झाले, तेव्हा मला कारण समजले. माझ्या मते, सिनेमा अभ्यासासारखी शाखा स्वत:च तयार केलेल्या डबक्यात कैद होऊन काम करत होती. एकमेकांना ओळखणारी तीच तीच माणसे सभासंमेलनांमध्ये आपले संशोधन मांडत होती आणि एकमेकांचे कौतुक करण्यात रमली होती. तिथे कंपूबाजी होती. अर्थात अशी गटबाजी सगळीकडेच असते. तरीही डिजिटल आणि सोशल मीडियाच्या जगाबद्दल मला ज्या गोष्टी शिकायला मिळत होत्या त्याने माझं उपरेपण जास्तच वाढत होतं. हेच ते जग होतं, ज्याबद्दल माझ्या मनात काहीशी दूरस्थ भावना होती. कारण डिजिटल बदलांबद्दल मी तसा फारसा काळजीत नव्हतो. पण त्याच वेळी मला हेसुद्धा जाणवत नव्हते, की जे काही बदल घडणार आहेत, त्यामुळे आपले ठोकताळे बांधणे, गोष्टी रचणे आणि माहिती-ज्ञान समजून घेणे यात आमूलाग्र बदल घडून येणार आहेत. एरवी, जेएनयूमध्ये असताना माझ्या संशोधनकार्यात मी इतका खोल बुडालो होतो की सोशल मीडियाचा वापर करणे मला वेळकाढूपणाचे व अर्थहीन वाटत असे.

तथापि ॲड्रियन आणि अशा शिक्षकांमुळे माझ्या भ्रमाचा भोपळा फुटला. डिजिटल/सोशल मीडिया संस्कृतीवर प्रचंड प्रमाणात साहित्य लिहिले गेले आहे. डेटाचे विलेषण, प्रक्रिया वगैरे समजून त्याचा अर्क व्यापारी पातळीवर वापरला जातो व हे अत्यंत गंभीर क्षेत्र आहे, हे मला चांगलेच कळले.

फेब्रुवारी २०२२ मध्ये आकस्मिकपणे मला जाणवले, वर्षानुवर्षे माझ्या विषयासंबंधीची संग्रहित (अर्कायव्हल मटेरिअल) केलेली सामग्री काळाच्या ओघात जीर्ण होऊन नष्ट होऊ शकते. दरम्यान ब्रिस्बेनमधला सेंट लुसिया हा परिसर पूरग्रस्त झाल्यामुळे वीज गेली. भारतात आपल्याला लोडशेडिंगची सवय असते, ते गृहीत धरून आपण आपले आयुष्य आखलेले असते, पण इथे तसे नव्हते. पूरस्थितीमुळे माझे जमा केलेल्या वस्तुरूपातल्या संपूर्ण संशोधन साहित्यावरच संक्रात येऊ घातली होती. इतकी वर्षे सर्व तऱ्हेचे श्रम घेऊन साठवलेल्या मौल्यवान साहित्याला धोका निर्माण होणे हे संकट मोठे होते. ते ओळखून पुढच्या

शांता हुबळीकरांची छाप...






पौराणिक पटांचा प्रभाव...

पाच दिवसांत मी आणखी काही धागे मिळताहेत, का याचा कसून शोध घेतला.

इकडे भारतीय संग्रहांच्या डिजिटायझेशनच्या दिशेने झालेल्या सकारात्मक हालचालीमुळे गोखले इन्स्टिट्यूट (पुणे), इंडियन कल्चर आणि अभिलेखागार यांच्या वेबसाइटवर विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आर्थिक अशा अनेक पैलूंवरचे अभ्यास साहित्य उपलब्ध झाले होते. त्याच वेळी मला 'बॉम्बे, कलकत्ता आणि मद्रास येथील सिनेमा संस्कृतीमध्ये गुंतलेल्या कामगारवर्गाच्या अवस्थेसंबंधी एक तुलनात्मक विलेषण' करणारे आणि आर्थिक मुद्द्यावर प्रकाश टाकणारे, बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड विद्यापीठातले अर्थशास्त्रविषयक संशोधक डी. जे. नांदेडकर यांच्या (गाइड : व्ही. वाय. कोल्हटकर, १९६८) मौलिक प्रबंधाची आठवण झाली. त्यांनी 'बी. जी. खेर अधिकृत भाषा समिती'त त्यांनी काम केले असल्यामुळे सिनेमाविषयक प्रबंध आणि प्रदर्शन क्षेत्रातील परिस्थितीवर भाष्य करणाऱ्या १९६६ सालच्या एका सरकारी अहवालाची माहिती मला त्यांच्याकडून मिळाली.

मला आठवतेय, २०२१ साली 'एनएफआय'ने सिनेमा उद्योगाच्या प्रारंभिक टप्प्यातल्या बऱ्याच प्रणेत्यांच्या मुलाखती, विशेषत: कामगारवर्गातील बेदखल आवाजांचे ऑडिओ रेकॉर्डिंग डिजिटाइझ करून त्याचे लिप्यंतर (ट्रान्सक्रिप्शन) केले होते. पी. जी. भोसलेंसारखा हँडिमॅन आणि धोबी असणारा 'प्रभात स्टुडिओ'चा पहिला कर्मचारी, दादासाहेब फाळकेंचा मेकअप मॅन आणि त्यांची मुलगी मंदाकिनी अशांचे आवाज व म्हणणे पोहोचत होते. या नावांखेरीजही ही सगळी अशी माणसे होती; जी संगीतकार, छायाचित्रणकार, प्रसिद्धीप्रमुख अशा जबाबदाऱ्या पार पाडत होती. पण यांनाही सिनेकर्त्यांना जसे त्यांची वैशिष्ट्यपूर्ण छाप (auteur) असलेले अस्तित्व लाभते, तशा रीतीने लेखककेंद्रित किंवा 'स्टार' केंद्रित इतिहासात नाव मिळाले नव्हते. नवल म्हणजे गंभीर सिनेमा संशोधन-अभ्यासातही अशांच्या भूमिकेचा अथवा श्रम-योगदानाचा फारसा विचार झालेला नव्हता. म्हणूनच मी निवडलेले काम - दुर्लक्षित आवाज लक्ष देऊन ऐकणे व ते पुढे आणणे हे होते. त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकणे हेही होते. मी या अदृश्यमान प्रक्रियेला नाव दिले, 'अंडररायटिंग'. म्हणजेच, इतिहासाच्या व्यापक पटावर जे दुर्लक्षित राहिले, पुसले गेले किंवा ज्यांना अपूर्ण प्रतिनिधित्व मिळाले, त्यांचे पुनर्लेखन.

या प्रक्रियेत माझ्याकडे जितके संशोधन साहित्य गोळा झाले होते, त्याआधारे माझ्याजवळ नेटवर्क, सिनेमा उद्योग आणि याकडे पाहण्याचा सरकारी दृष्टिकोण याबद्दल ठोस माहिती होती, हे स्पष्ट होते. त्याच वेळी माझ्या हाताला 'ॲडम मॅथ्यू डिजिटल' या वेबसाइटवरचे १९२१-२९ या काळाविषयी माहिती देणारे खंड लागले. या खंडात भारतात सेन्सॉरशिप स्थापन करण्याविषयी पार पडलेल्या प्रक्रिया, त्यात कालपरत्वे होत गेलेले बदल आणि ब्रिटिश सरकारने भारतीय सिनेमाच्या निर्मितीवर नियंत्रण ठेवण्याचे केलेले प्रयत्न याबद्दल साद्यंत माहिती होती.

**संशोधनाकडून आत्मसमृद्धीकडे...**

हे साहित्य मला उपलब्ध होऊ शकले कारण मी २०२३च्या जागतिक क्रमवारीत चाळिसावा क्रमांक पटकावलेल्या ऑस्ट्रेलियाच्या क्वीन्सलँड विद्यापीठात होतो. शिवाय अर्काइव्ह डॉट ओआरजी या वेबसाइटवरून उपलब्ध करून दिलेल्या विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या मराठी ज्ञानकोशातूनही सदर संस्कृतीविषयी पुष्कळ काही हाती लागले. थोडा आणखी मागोवा घेतल्यावर माझ्या लक्षात आले की 'कलावंतांच्या सहवासात' हे पुस्तक लिहिणारे धनंजय दुसरे तिसरे कोणी नव्हते, तर संगीतकार वसंत देसाई होते. याच मालेतले त्यांचे दुसरे पुस्तक होते 'मखमली पडदा'.

या सगळ्यांतून मला बराच काळ विस्मरणात गेलेल्या पु. श्री. काळेंच्या 'रंगभूमीवरील नेपथ्य' या पुस्तकाची आठवण झाली. या पुस्तकात त्यांनी रंगमंचाची प्रोसेनिअम आर्कपासून आधुनिकतेकडे वाटचाल म्हणजे जंगल, राजवाडा (फँटसी सेट्स) यांच्यापासून पुण्यातल्या चौकाच्या देखाव्यापर्यंत प्रवासाचे विश्लेषण केले होते.

वरिष्ठ सिनेमा अभ्यासक आशिष राजाध्यक्ष यांनी फाळकेंच्या सिनेमातील सपाटपण (पृष्ठीय रचना), रंगमंचीय शैलीप्रमाणे प्रेक्षकांना थेट संबोधित केले जाण्याची रचना अधोरेखित केली होती. मी माझे मत नोंदवताना बरोबर याच्या उलट बाबूराव पेंटर यांनी या चौकटीत एक 'खोली' (डेप्थ) आणली, असा युक्तिवाद केला. ही खोली पेंटरांना १९१०-१८ दरम्यान नाटकांसाठी नेपथ्याचे पडदे रंगवण्यातून साधली होती. काळेंच्या पुस्तकात याचे पुरावे फोटोंच्या माध्यमातून मिळत होते. एवढेच नाही तर त्यात काही युक्त्याही नोंदवल्या होत्या. उदा. रस्ता चित्रित करायचा असेल तर तो कॅमेऱ्यापासून ५ फूट अंतरावर लावावा किंवा तो तिरप्या कोनातून दाखवला तर खऱ्यासारखा वाटतो, इत्यादी.

प्रत्येक कडी दुसरीशी जोडली जात होती; प्रत्येक पत्ता पुढच्या पत्त्याकडे घेऊन जात होता; प्रत्येक नाव कोणत्या ना कोणत्या असामान्य नावापर्यंत घेऊन जात होते. हा सगळा अनुभव इतका जोरदार होता की इतके सगळे हाताळणे, संगती लावणे आणि लिहिणे फारच अंगावर आले. त्या पाच दिवसांत आणि नंतर काही आठवडे राबून मी आणखी ८५,००० पानांचे साहित्य जमवले. पुनरावृत्ती जमेस धरून जवळपास एक लाख पानांची सामग्री जमली, असे म्हणता येईल.

**इकडे भारतीय संग्रहांच्या डिजिटायझेशनच्या दिशेने झालेल्या सकारात्मक हालचालीमुळे गोखले इन्स्टिट्यूट (पुणे), इंडियन कल्चर आणि अभिलेखागार यांच्या वेबसाइटवर विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आर्थिक अशा अनेक पैलूंवरचे अभ्यास साहित्य उपलब्ध झाले होते.**

सिनेमा अभ्यासकांची एक नेहमीची तक्रार असते की भारतीय सिनेमांच्या सुरुवातीच्या, स्टुडिओ काळाविषयी फार कमी माहिती उपलब्ध आहे. माझी अडचण याउलट होती, माझ्याकडे खूपच साहित्य होते.

याच कारणास्तव मी प्रामुख्याने 'प्रभात' स्टुडिओला केंद्र राखून सगळ्यांत महत्त्वाच्या गोष्टी, माणसं आणि स्थळं यांच्याकडे परतायचा निर्णय घेतला. माझं एम.फिल. आणि पीएच.डी. संशोधन 'प्रभात' स्टुडिओपासून सुरू झाल्यामुळे हा निर्णय साहजिक होता. पण आता मी 'प्रभात'चा केवळ डोलकाठीसारखा उपयोग करू पाहत होतो. त्यातून मी राजघराण्यांचा प्रभाव न ओसरलेल्या वसाहतकालीन भारतातील सिनेमा उद्योगाच्या परिस्थितीची चिकित्सा करत होतो.

संशोधन साहित्य पुष्कळच असल्यामुळे त्याची छाननी-पडताळणी करण्यासाठी मला काहीएक मार्ग ठरवणे जरुरीचे होते. त्यातला एक मार्ग होता, पुनरावृत्ती असणारे साहित्य वगळणे, योग्य ते धागे नि पोत जुळवणे आणि सरतेशेवटी त्याची सत्यासत्यतादेखील तपासणं गरजेचं होतं. म्हणून मी सुसंगती-विसंगती ('कोरोबरेशन-काँट्राडिक्शन') ही चाचणी घेतली. त्यामुळे मला वैयक्तिक अनुभव खरे आहेत अथवा नाहीत; विरोधाभास नेमका कुठे दिसतो आहे, हे तपासता आले. सिनेमा निर्माते आणि सिनेमाकर्मी हे गोष्टीवेल्हाळ असतात. ते अनेकदा समोरच्याला रस वाटावा अशा हेतूने गोष्टी रंगवून सांगतात. पण ती गोष्ट आकर्षक वाटली तरी सत्य असतेच असे नाही.

**संशोधनाचे अन्वयार्थ**

उदाहरणार्थ, प्रभात स्टुडिओच्या पतनाची अनेक कारणे होती. युद्धकालीन महागाईमुळे करांमध्ये झालेली वाढ, भागीदारांमधील अंतर्गत संघर्ष, हिंदी सिनेमा केंद्रित (मुंबईस्थित) कलाकारांच्या उदयामुळे कलात्मक व सर्जनशील आशयात झालेला बदल, देशाचे स्वातंत्र्य व फाळणीविषयक चळवळी, स्वतंत्र व कंत्राटी पातळीवरच्या कामाचे वाढते स्वरूप, स्टारडममधील वाढ, संपूर्ण भारतीय उपखंडातील स्टुडिओ युनिट्सचे पतन, कामगारांच्या हक्कांविषयी हळूहळू जागृती वाढणे, आधी ब्रिटिशांकडून व नंतर भारतीय सरकारची 'सिनेकर्मी' (सिनेमॅटिक लेबर) या संकल्पनेची व्याख्या अस्पष्ट राहणे व त्यामुळे कायदे करण्याबद्दलची असमर्थता दिसणे शिवाय स्टुडिओमधील काही काम कारखाना कायद्याअंतर्गत येणे काही औद्योगिक विवाद कायद्यांतर्गत, तर काही कंपनी कायद्याच्या छत्रीखाली येणे, त्याचप्रमाणे या उद्योगातील काही लोक थेट कर्मचारी मानले जाणे, काही फ्रीलान्सर अर्थात मुक्त कामगार आणि काहींना मजूर म्हणून गणले जाणे इत्यादी, इत्यादी.

१९८१ साली विशेष कायदा येईपर्यंत सिनेमा कामगारांची स्पष्ट व्याख्या उपलब्ध नव्हती. याचप्रमाणे सिनेमा प्रदर्शनासारख्या गोष्टींवर भाडेकर, शुल्क, जकात, पोस्टर/प्रसिद्धी जाहिरात यांसारखे विविध कर लावले गेले.

वर सांगितल्याप्रमाणे सिनेमा व त्याच्याशी निगडित जगाच्या विविधरंगीपणात कायद्याचाही एक कंगोरा आहे. म्हणूनच निर्मितीच्या वैशिष्ट्यपूर्ण कहाण्या, निर्मिती, वितरण, प्रदर्शन आणि सेन्सरशिप आणि स्वीकार या सिनेमाशी जोडल्या जाणाऱ्या व सतत बदलत राहणाऱ्या अर्थावर लक्ष एकाग्र करणे मला आवश्यक वाटत होते.

माझा प्रबंध पूर्ण केल्यावर व सादर केल्यानंतरही मला जाणवतेय, अजून बराच पल्ला गाठायचा आहे. पडद्याचा प्रत्येक पदर, प्रत्येक चक्राकार दरवाजा (टर्नस्टाइल), प्रत्येक तिकीट खिडकी, प्रत्येक प्रेक्षक, प्रत्येक कलावंत, प्रत्येक गायक, सर्व प्रकारचे कलाकार सिनेमा निर्माणाच्या घटनेला आपली आपली वीट जोडतात. या सगळ्याचा व्याप लक्षात घेऊनच एक शिक्षक म्हणाले होते, 'सिनेमा इज ॲन अनफिनिश्ड बिझनेस!' म्हणजेच सिनेमा ही न संपणारी प्रक्रिया आहे, या त्यांच्या म्हणण्यात मी माझी भर घालून म्हणतो की, 'संपूर्ण संस्कृती हीच मुळी न संपणारी गोष्ट आहे. ती विकसित होत राहील; अर्थांच्या नव्या दिशा उमलत राहतील. प्रश्न इतकाच आहे की या बदलासोबत टिकून राहण्याइतका आपल्यात संयम आहे का? झालेले बदल आपण समजून घेतो की त्याकडे दुर्लक्ष करतो?'

मला अजून आठवतेय, २०१२च्या एका 'मास्टर क्लास'मध्ये 'पर्दा है, पर्दा है...' हे गाणे आम्हाला दाखवले गेले. आधी सगळे गाण्यावर, त्यातून निर्माण होणाऱ्या अर्थावर, त्यातल्या कोरिओग्राफीवर थट्टेने हसायला लागले. मग नखाते सरांनी पडद्याचे पापुद्रे उलगडायला सुरुवात केली.

नखाते सर म्हणाले, 'हा पडदा आहे, म्हणजे स्क्रीन... आणि त्यावर तुम्हाला 'ती' पर्दानशीं दिसते. आता अकबर तिला बेपर्दा करण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणजे काहीतरी कामुक कृत्य करतोय. तसेच त्याचा दुसरा अर्थ, सत्य उलगडणे असाही आहे. पर्दा है पर्दा! तर सिनेमा पडद्याच्या असंख्य अस्तर व थरांकडे आपले लक्ष वेधू पाहतोय. डोळे उघडे ठेऊन जागतेपणी नीट बघा, असे खुणावतोय.

मागच्या दशभरात झालेले माझे संशोधन म्हणजे नेमका याच दिशेचा जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न आहे. संशोधक या नात्याने असे पडदे उघडणं हेच माझे काम आहे. त्या अर्थाने, संशोधनाच्या निमित्ताने 'प्रभात' काळाचा झालेला अभ्यास पडदा उघडण्यामागची माझी प्रेरणा ठरला आहे.

❋❋❋


**लेखक हृषीकेश आर्वीकर ऑस्ट्रेलियामधल्या युनिव्हर्सिटी ऑफ क्वीन्सलँड येथे फिल्म स्टडीज या विषयाचे अध्यापन करतात. संपर्क** : arvikarrishi@gmail.com

# रामाने वालीची शिकार केली; सुग्रीव किश्किंधेचा राजा झाला




राजा पटवर्धन





ऋष्यमुख पर्वताच्या शिखरावर जाऊन सुग्रीवाची भेट घ्यायची, हे पहिल्या हनुमान राम भेटीत ठरले. हनुमानाने अयोध्या पुत्रांना आपल्या खांद्यांवर बसवले. हा जणू पालखीचा मान होता. सुग्रीवाच्या पर्वतावरील निवासस्थानी राम लक्ष्मणाला बसवून हनुमान त्याक्षणी सुग्रीव ज्या मलय पर्वत शिखरावर होता, तिथे गेला. पाहुन्नण्यांची भेट घडवली. राम लक्ष्मणाची ओळख सांगितली. औपचारिक स्वागत– ओळख पार पडल्यावर मैत्री करार करायचा होता. तत्पूर्वी सुग्रीव म्हणाला, ''महाराज आपण मानव आहात. मी वानर आहे. आपण माझ्याशी मैत्री करार करु इच्छिता हा माझा सन्मानच आहे.'' प्रथम रामाने आपला हेतू स्पष्ट केला. ''रावणाने सीतेला पळवून नेलेले आहे, याबद्दल शंका नाही. हा रावण कुठे राहतो, सीता जिवंत आहे की नाही? याचा, सुग्रीवा तू पत्ता लाव'' हा रामाचा प्रस्ताव...

अखेरीस सुग्रीवाने आपली मागणी पुढे ठेवली. ''रामा, मला राज्यातून बंधू वालीने हाकलून दिले आहे. माझी पत्नी रुमा त्याने आपल्याजवळ बळजबरीने ठेवली आहे. तू वालीचा वध कर.'' इथे, दोघांचेही हेतू स्पष्ट झाले असले, तरी प्रथा अशी होती की शपथपूर्वक एकमेकांना वचन द्यायचे. हे वचन अग्नीच्या साक्षीनेच द्यायचे. अयोध्येतही अग्नी निर्माण करायला सुरक्षित आगपेटी (मॅचबॉक्स, ५० वर्षांहून अधिक काळ केलेल्या अथक प्रयत्नानंतर १८४४ साली शोध लागला.) किंवा अन्य आधुनिक साधने नव्हती. सर्वज्ञ वसिष्ठ ऋषींनी किंवा विश्वामित्र आणि वाल्मिकी ऋषींनीही अग्निउत्पन्न करण्याचा मंत्र कुणी कुणाला शिकवल्याचा उल्लेख नाही. आजच्या भारतात कुणीही पुरोहित असा अग्नी सर्वांसमक्ष निर्माण करू शकत नाहीत. तर मग अशी साधने वानरांजवळ कुठून असणार? सुग्रीवाची सूचना न बोलताच हनुमानाला समजली. त्याने दोन विशिष्ठ काष्ठे(लाकडे) एकमेकांवर घासून ठिणगी पाडली. सुक्या लाकडांनी पेट घेतल्यावर अग्नीची पूजा केली. राम सुग्रीव यांची अग्नी प्रदक्षिणा पार पडली. मैत्री कराराचा पवित्र अग्निसाक्षीने पुनरुच्चार झाला.

हस्तांदोलन झाले! गळाभेटही झाली. (ही प्रथा भारतीयांना चांगलीच परिचित आहे.) सालवृक्ष आणि चंदनाच्या फांद्यांवर राम लक्ष्मण बसले. रामाने सुग्रीवाला अभय देऊन वालीपासून रक्षण करायचे. राम म्हणाला, तुझे रक्षण तर होईलच. तुझी भार्या पळविणाऱ्या वालीला मी ठार करीन. माझ्या बाणात इंद्राच्या वज्राची ताकद आहे. ''हे रामा! जटायूला मारुन राक्षसाने सीतेला पळवून नेले हे आम्ही पाहिले आहे. तुझी भार्या मी शोधून काढून तुला आणून देईन. ती स्त्री ''हे रामा, हे लक्ष्मणा!'' अशा किंकाळ्या मारीत होती. आम्ही पर्वत शिखरावर असताना तिने आपल्या वस्त्रात गुंडाळून अनेक दागिने खाली टाकले. ते आम्ही जपून ठेवले आहेत. ते दागिने पाहून रामाने हुंदके दिले, त्याला उभे राहवेना, लक्ष्मणा! सीतेचे दागिने पहा.'' त्यावर लक्ष्मण म्हणाला ''रामा, मी सीतेचे फक्त पैंजणच पाहिलेत. कुंडले आणि बाजूबंद मी ओळखू शकणार नाही.'' रामाने स्वत:ला सावरले. ''सुग्रीवा, तो राक्षस सीतेला घेऊन कोणत्या दिशेला गेला, जो राक्षस मरणाच्या दारात उभा आहे तो राक्षस कुठे रहातो, ते मला सांग.'' त्या पापी राक्षसाचे निवासस्थान, वंश बल आणि पराक्रम मला आत्ता माहीत नाही. सुग्रीवाने कबूल केले.

**सुग्रीवाचे सांत्वन**

रामा, तू शोक करू नकोस, मी रावणाचा वध करीन, सीता तुला परत मिळेल. तू महापुरुष आहेस. फक्त तुझा पराक्रम आठव. ''मलाही पत्नी विरह आहे, मी साधारण वानर असूनही कधी रडलो नाही. रामा, अश्रूपात आवर.'' ''सुग्रीवा, तू मित्राला शोभेल असेच बोललास. मी वालीचा वध करीन, हे जे बोललो ते सत्य समज. मी आजपर्यंत कधी खोटे बाललो नाही. या पुढेही बोलणार नाही.'' रामाच्या बोलण्याने सुग्रीव मनोमनी सुखावला. ''रामा! मी तुमच्या पराक्रमावर शंका घेतोय, असा गैरसमज करुन घेऊ नका. पण मला तुमचा धनुर्धारी म्हणून पराक्रम बघायची इच्छा आहे. हा समोर एक प्रचंड मोठा साल वृक्ष आहे तो एका बाणात तोडून दाखववा.'' रामाने योग्य जागा निवडली. एका रांगेत सात प्रचंड वृक्ष होते. बघता बघता रामाने ते सर्व सातही वृक्ष एका बाणात तोडून आडवे पाडले. सुग्रीवाने आकाशात उंचचउंच उडी मारून आपला आनंद व्यक्त केला. आता वाली वधाचा मुहूर्त ठरवण्यापूर्वी हे खास अद्भुत पराक्रमी वानर प्रजात म्हणून जन्माला कसे आले? हे पाहूया

**संकर कामयज्ञाची कथा**

आजच्या अत्याधुनिक सर्व जगाला कृत्रिम गर्भधारणा किंवा अपत्यप्राप्तीचे नियोजन इ.चे ज्ञान उपलब्ध आहे. मानव आणि अन्य प्राण्यांवरही असे प्रयोग करुन इच्छित परिणाम साधले जातात. नर की मादी आणि पुत्र की पुत्री(मुलगी) अशी अवघड असलेली निवडही करता येते. असे काही जाणकार मला म्हणाले. काहींनी याची खात्री देता येत नाही असा अभिप्राय दिला. असे प्रयोग करून अपत्यप्राप्ती करून घ्या, अशा जाहिराती सुरु असतात. हे प्रयोग करताना जर चूक झाली तर? गोऱ्या युरोपीयवंशीय जोडप्याला आफ्रिकी काळ्या त्वचेचे मूल झाल्याची घटना घडलेली आहे. स्त्री किंवा पुरुषाच्या शरीरात जन्मत: अंड-बीज निर्मितीची क्षमता निसर्गाने दिलेलीच नसेल तर? केवळ अशी जोडी कायदेशीर विवाहबद्ध आहे एवढ्यावरून वंश सातत्य शक्य होणार नाही. सक्षम स्त्रीचे बीजांड आणि सक्षम पुरुषाचे शुक्राणूच हे घडवू शकतात. हे सांगण्याचे कारण, असे की अयोध्येच्या दशरथ राजाजवळ सर्व भौतिक सुखांची रेलचेल होती. तीन विवाहित पत्नींसह अंत:पुरात शेकडो स्त्रिया सर्व सेवांसाठी

सदोदित सज्ज असूनही त्याला औरस वारस पुत्र नव्हता. म्हणून पुत्रकामेष्टीचा (पुत्रकामेष्टी यज्ञ हा 'दशरथ काला'तला पहिला यज्ञ.) अद्‌भुत सरंजाम आयोजित केला गेला. हा मूलत: अश्वमेध यज्ञ असला तरी 'पुत्रप्राप्ती' हा एकच मुख्य हेतू होता. त्याचे पौरोहित्य केले, ते ऋष्यश्रृंग(श्रृंगी) ऋषींनी. अंगदेशचा राजा रोमपाद हा दशरथ राजाचा दोस्त होता (शांता ही दशरथ कौसल्येची जेष्ठ मुलगी ती रोमपादाला दत्तक दिली अशी एक कथा सांगितली जाते. वाल्मिकी रामायणात तसा स्पष्ट उल्लेख नाही) हा पुत्रकामेष्टी यज्ञ पृथ्वीवरील पहिलाच असल्याने स्वर्गातही त्याची प्रचंड उत्सुकता होती. खुद्द ब्रह्मदेवानेच त्याची दखल घेतली. ''माझ्याबरोबर तुम्हा सर्वांना यजुर्वेदाच्या सर्व ऋचा ऐकण्याची संधी प्राप्त झाली आहे. अस्खलित वेद पठण कसे असते, ते देवांनो! तुम्हीही ऐका ''समस्त देवांनी (३३ कोटी–१३ आदित्य, ११ रुद्र, ८ वसू, २ जुळे बंधू अश्विनी कुमार) अयोध्येत जायचे आहे.'' ब्रह्मदेवाने विष्णूसही खास विनंती केली. इंद्राकडून यमालाही बोलवून घेतले. ऋष्यश्रृंगांचा यज्ञ संपन्न होणार, आपण त्याचे प्रत्यक्ष साक्षीदार होणार म्हणून सर्व देव उत्सुक होते. यज्ञ पाहायला सर्व देवांना घेऊन ब्रह्मदेवच आलेले पाहून अयोध्येत आनंदी आनंद झाला. गंभीर शांततेत मंत्रपठण सुरु होते. सर्व देवांनी हात जोडलेले होते. ऋष्यश्रृंगानी अखेरची आहुती दिली. यज्ञ संपन्न होताच तेजस्वी यज्ञपुरुष अग्नीतून वर आला. यज्ञपुरुषाने दशरथाला प्रसाद म्हणून मोठ्ठा चरु हाती दिला. ''हा प्रसाद(खीर) तुझ्या राण्यांना दे. हमखास पुत्र प्राप्ती होईल.'' यज्ञ पुरुष अंतर्धान पावला. त्याच क्षणी ब्रह्मदेवाने विष्णूला विनंती केली, ''दशरथाच्या तीन राण्यांच्या पोटी अंश रुपाने चार पुत्र निर्माण करा'' (हेच ते राम – लक्ष्मण – भरत – शत्रुघ्न, अवतारी देव पुत्र) होकार देऊन विष्णूही अंतर्धान पावले.

ब्रह्मदेव समक्ष हजर असताना देवांनी ब्रह्मदेवाला विनंती केली. ''तुमच्या वरदानाने लंकापती रावण अत्यंत उन्मत्त झाला आहे. तो स्वर्गावर वारंवार स्वाऱ्या करतो. आमचा पराभव करतो. आम्हाला जगणेच मुश्कील झाले आहे. इंद्राने वज्राघात केला तरी त्याला जेमतेमच खरचटते.'' त्यावर ब्रह्मदेव म्हणाले, ''मी उपाय योजला आहे.'' ब्रम्हदेवांनी इंद्राला सर्व अन्य देवगणांसह आज्ञा दिली. म्हणाले, ''तुम्ही सर्वांनी म्हणजे समस्त स्वर्गनिवासी, विश्वकर्म्यासह, समस्त



द्वंद्वात अडकवून वालीचा वध केला...

यक्ष, किन्नर, गंधर्वांनी पृथ्वीवरील(आसेतूहिमालय) सर्व अस्वले आणि वानरांच्या पोटी अंश रूपाने प्रजा निर्माण करा. याला कोणताही देव, देवगण अपवाद नाही. ''यात सूर्य आणि इंद्रही आले. ब्रह्मदेवाचा मानस पुत्र जांबुवंत (अस्वल राजा) ही आला.'' चला त्वरा करा. रावणाचा वध करायला अशा नवीन प्रजातीचीच गरज आहे. ही प्रजाती खास वैशिष्ट्य पूर्ण असेल. दोन पायांचे अरण्यनिवासी, पुच्छधारी वानर आणि ऋक्ष (अस्वल) या प्रजातीतील प्रमुख, राक्षसांसारखे आकाश मार्गी उड्डाण करू शकणारे इच्छा रुपधारी असतील. थोडक्यात, हजारो लाखो ट्रिलियन वानर निर्माण करा. दशरथापोटी जो विष्णूचा जेष्ठ पुत्र(राम) जन्माला येईल त्याला अशा बलाढ्य बलशाली अगणित वानर सेनेची साथ मिळेल. त्यानंतर हा रावण त्याच्या लक्ष लक्ष कोटींच्या राक्षस सेनेसह मारला जाईल.''

देवांना आता दुसरा अन्य विचार करायलाही सवड उरली नव्हती. अस्वले आणि वानरांची अगणित प्रजा जन्माला घालून तयार करण्याच्या कामाला सुरुवात करायची होती. ध्येय होते, रावणाचा वध! थोडक्यात, हा पहिलाच संकर कामयज्ञ होता. ब्रह्मदेवाने विष्णूवरही कामगिरी सोपवली होती, तीन राण्यांकडून चार बंधू जन्माला घालायचे. म्हणजे एकीला जुळे अपरिहार्य ठरते. त्यासाठी सुमित्रेची निवड ठरली.(लक्ष्मण–शत्रुघ्न) वैज्ञानिकदृष्ट्या विचार करायचा तर कुणाही स्त्रीला खीर पिऊन अपत्य प्राप्ती शक्य नाही. मग गर्भधारणा नेमकी कशी झाली? एक तर थोतांड म्हणायचे किंवा हा कृत्रिम

गर्भधारणा प्रयोग होता, असे म्हणायचे तरीही पुरुष बीजाचे शुक्राणू कोणत्या पुरुषाचे? हा प्रश्न उरतोच. विष्णूने हा प्रश्न कसा सोडवला याचा तपशील वाल्मिकी रामायणात नाही. (कृत्रिम गर्भधारणेने संपूर्ण उत्तर मिळत नाही. डीएनए चाचणीही होती का?) तेही असो.

**आले ब्रह्माजीच्या मना...**

देव असेही म्हणतील, की ब्रह्मदेवाने वानर सेना निर्मितीचा हा न भूतो अवघड प्रयोग स्वतःच करून दाखवायला हवा होता. ब्रह्मदेवाची योजना त्याआधीच तयार होती. ब्रह्मदेव चिंतन करीत बसले असताना अचानक डोळ्यात अश्रू आला. एका बोटाने तो झटकला. तो अश्रू पृथ्वीवर पडताच तिथे मोठे सुंदर सरोवर तयार झाले. दस्तुरखुद्द ब्रह्मदेव पृथ्वीवर आले. एका ऋक्षराजाला (अस्वल राजा) त्या सरोवराच्या संरक्षणाची जबाबदारी संपवली. त्या अस्वल राजाला त्या सुंदर सरोवरात पोहण्याची अचानक सुरसुरी आली. तो मनसोक्त पोहत होता. काठावर येताच त्याला आपल्या शरीरात उलथापालथ होत असल्याची जाणीव झाली. त्याचे एका सुस्वरूप मोहक मानवी स्त्री रुपात परिवर्तन झाले. (सेक्स चेंज) हा लिंग बदल कमालीचा बेमालूम होता. इतकी सुंदर स्त्री दिसताच देवेंद्र घाईघाईने येऊन पोहोचला. त्याचवेळी सूर्यही आला. आता झाली का पंचाईत? एक स्त्री आणि दोन कामातूर देव. व्यभिचाराशिवाय तिला दुसरा पर्यायच उरला नाही. त्या सुंदरीचा सूर्य आणि इंद्र यापैकी एकाशीही अग्निसाक्षीने विवाह झालेला नाही. अशा परिस्थितीत नैतिकदृष्ट्या याला व्यभिचार म्हणायचे की नाही? विवाहापूर्वीचा स्वैराचार.

तिने दोघांच्याही भावनांची कदर केली. तिला दोघेही तेजस्वी पुरुष पसंत पडले असावेत. वाली आणि सुग्रीव हे जुळे बंधू असे जन्माला आले. याला 'एकसम' जुळे म्हणणे भाग आहे. (आयडेंटिकल ट्विन्स) दोघांपैकी इंद्राचा कोणता आणि सूर्याचा कोणता याचा निर्णय मातेने कोणत्या कसोटीवर ठरवला? नकळे बा! त्यांच्या हुबेहूब दिसण्यामुळेच (ते दोघे मातृमुखीच असणार) दोन वानरांपैकी वाली कोण आणि सुग्रीव कोणता हे रामालाही ओळखता आले नव्हते. प्रश्न असा तयार होतो, की या दोन पायांच्या वानरांना जी शेपटी होती अशी वर्णने आहेत, त्या शेपटीची देणगी नक्की आली कुणाकडून? सूर्य आणि इंद्र या देवांना तर शेपटी नव्हतीच नव्हती.

ऋक्षराजाची जी सुंदरी झाली, तिच्याकडून हे आनुवंशिक गुणसूत्र आले असे समजण्याशिवाय दुसरा पर्यायच दिसत नाही! आणखी असाही एक तर्क शक्य आहे, की त्या ऋक्षराजाला एक पत्नी होती, तिचे रूपच तिचा शत्रू (भार्या रुपवती शत्रु: हे एक सुभाषितच आहे.) ठरले. आणखी एक तर्क असा केला जातो की शेपटी हा एक प्रकारचा पेहराव असावा. नर वानरप्राण्यांनी कमरेला बांधायचा एक प्रकारचा पट्टा. ही जन्मजात शेपटी नाही. उंच आणि लांब उडी मारायला मदत व्हावी हाही हेतू असावा. एक नक्की, रामायणातील वानरसेना ही चार पायवाली माकडे वा अस्वले यांची सेना नाही. दोन पाय हे त्या सैनिकांचे व्यवच्छेदक लक्षण आहे. त्याशिवाय ते मानवांशी मानवांच्या भाषेत बोलतात. अरण्यात राहणाऱ्या एका सामर्थ्यवान प्रजातीची खास निर्मिती करण्यात आली हे अद्भुत मान्य करुन (आले ब्रम्हदेवाच्या मना!) ही रामकथा समजून घेणे भाग आहे. माकड किंवा अस्वलाचा तोंडावळा असलेल्या वानरांची त्वचा विविध रंगांची होती. दात आणि नखे अंगावरचे केसही वेगळे होते. हवेत उडण्याचे, मनाप्रमाणे रूप घेण्याचे राक्षसांसारखे खास वैशिष्ट्य मान्य केल्याशिवाय ही महाकाव्यरुपी कथा समजून घेता येणारी नाही. या कथेतले हे तपशील ऐतिहासिक दस्तावेज किंवा दाखले ठरवायचे का? आजच्या शिक्षण व्यवस्थेत तसे शिकवायचे ठरवले तर डोके गहाणच ठेवावे लागेल. जसे आहे तसेच्या तसे स्वीकारायचे आणि गप्प बसायचे. आले वाल्मिकींच्या मनी!

**हनुमानाची जन्मकथा**

हनुमानाची जन्मकथाही अशीच भन्नाट आहे. ब्रह्मदेवाने स्वत:च युक्ती करून वाली सुग्रीव जन्माला घातले. मग महादेवालाही राक्षस संहारात सहभागी व्हावे असे वाटल्यास काय नवल? शंकराच्या मनात विचार येताच स्वर्ग ढगांच्या प्रचंड कडकडाटाने दणाणून गेला. पळापळ सुरु झाली. घबराट पसरली. पुंजिकस्थला नावाची एक अप्सरा जीव मुठीत धरुन धावली. धापा टाकून दमून गेली. प्रचंड विजांचा लोळ पाहून आणि गडगडाट ऐकून ती भेदरुन गेली. घाबरली. योगायोगाने समोर तिला महादेव दिसले. तिने त्यांनाच घट्ट मिठी मारली. तिची भीती एकदम गायब झाली. गडगडाटही संपला. विजाही चमकायच्या थांबल्या. पुंजिकास्थलेची मिठी सैलच होईना! पार्वती जोरात ओरडली. ''ए बये! आता सर्व शांत झाले

असताना तुझा चावटपणा अजून सुरुच? ''तुला शापच देते.'' पृथ्वीवर तुला वानरीचा जन्म प्राप्त होईल.'' हीच मारुतीची माता अंजनी! (भारतात अनेक राज्यात अंजनी गुहा आणि टेकड्या प्रसिद्ध आहेत.)

महादेवाला हा शाप फारच कठोर वाटला. त्याने उ:शाप दिला. ''अंजनीच्या पोटी, भीमरुपी महारुद्र, जन्माला येईल'' याच अंजनीने नंतर केसरी नावाच्या वानराशी विवाह केला. एके दिवशी ती वनात हिंडत असता अचानक जोराचा वारा आला. तिचे वस्त्रे उडून गेले. ''मला कोण मिठी मारतोय? मी केसरीची पत्नी आहे.'' अंजनीने दरडावले. ''मी प्राणदाता, मरुत्- पवन आहे. तुझ्या पोटी केसरीचा पुत्र जन्म घेईल तो मारुती या नावानेही ओळखला जाईल. तुझे शरीर भ्रष्ट झालेले नाही. मी केवळ मनाने तुझ्याशी एकरुप झालो होतो'' यानंतर अंजनीचा तो औरस पवनपुत्र जन्मला. जन्मल्या क्षणी उगवते सूर्यबिंब पकडायला गेला. इंद्राने त्याच्यावर वज्र फेकल्यामुळे माघारी परतला. हनुवटीवर वज्रखूण उमटली. अंजनीचा सुत 'हनुमान' झाला तो असा. याचा अर्थ असा, की ब्रह्मा- विष्णू- महेशासह समस्त देवांनी रावणाशी लढायला वानर सेनेला आपापल्या परीने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे योगदान दिले.(ब्रह्मा-वाली सुग्रीव. विष्णू-दशरथपुत्र. शंकर-हनुमान)

**सुग्रीवाची हृद्य कथा**

इकडे, एका बाणात सात वृक्षतोड प्रत्यक्ष पाहिल्यानंतर सुग्रीवाला आपले राज्य परत मिळणारच याची खात्री पटली. सुग्रीवाने आपले बंधू वाली राजावर कसे प्रेम होते, राजाचा शब्द तो कसा झेलत असे इ.चे वर्णन केले. सुग्रीवाने थोडा पूर्वेतिहास सांगितला. मयासूर हा राक्षसांचा शिल्पकार होता (जसा देवांचा विश्वकर्मा) त्यांची पुत्री मंदोदरीचा रावणाशी विवाह झाला. याच मयासुराला मायावी, दुंदुभी असे दोन पुत्र होते. मायावीने एकदा वालीला युद्धासाठी ललकारले. वालीबरोबर सुग्रीवही निघाला. मयासूराने खूप दूरवर त्यांना पळवले आणि एका गुहेत शिरला. वालीही गुहेत शिरला. सुग्रीव गुहेच्या तोंडाशी राखणदारा सारखा उभा राहिला. हे गुहायुद्ध खूपच लांबले. वर्षभराने सुग्रीवाला गुहेतून येणारा रक्तप्रवाह दिसला. कधीही ज्याची दमछाक होत नाही असा वाली मारला गेला, असा सुग्रीवाचा ग्रह झाल्याने, गुहेचे दार मोठ्या शिळेने बंद करुन किश्किंधेत परतला. वाली जिवंत नाही ही सर्वांची समजूत झाली. सुग्रीवाला रुमा नावाची पत्नी असूनही वानरप्रथेला धरुन वालीच्या पत्नी ताराने (अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी पैकी तारा) दीर असलेल्या सुग्रीवाचा पती म्हणून स्वीकार केला. काही काळाने मायावी राक्षसाला मारून वाली चक्क परत आला. सुग्रीव किश्किंधापती झाल्याचे वालीला समजले. त्याचा संताप अनावर झाला. सुग्रीव गयावया करुन त्याच्या पाया पडून सांगत होता. त्याच्या पायावर मुकूट ठेवला, तूच राजा आहेस असेही सांगत होता. वालीने सुग्रीवाचे बोलणेही ऐकून न घेता त्याला हाकलून लावले. सुग्रीवाच्या पत्नीला ताब्यात ठेवली. वालीचे रौद्र रुप पाहून सुग्रीव जीव मुठीत धरुन पळू लागला. वालीने त्याचा पिच्छा सोडला नाही. या अष्टदिशांच्या पळापळीत सुग्रीवाची पृथ्वी भ्रमंती पार पडली. सुग्रीव नकाशाधारी, भूगोल ज्ञानी झाला तो असा! हा सर्व वृत्तांत राम लक्ष्मण लक्ष देऊन ऐकत होते.

रामाने विचारले, ''मग या ऋष्यमुख पर्वतावर तुला वालीने कसे राहू दिले? सुग्रीवाचे कथाकथन पुढे सुरु झाले. ''मायावी राक्षसाच्या वधानंतर त्याचा बंधू (नात्याबद्दल वाद आहे) दुंदुभी बदला घेण्यासाठी मोठा शिंगधारी रेडा बनून वालीच्या राजद्वारासमोर उभा ठाकला. दुंदुभीने वालीची दुर्बळ, दारुडा म्हणून निंदा केली. अरे दुंदुभे! ''मी तुला ओळखतो. दारु पिऊन मी बेभान झालेला नसून माझा उत्साह वाढवला आहे. वालीने स्त्रियांना दूर सारले. इंद्राने दिलेली विजयदायिनी सुवर्ण माळा गळ्यात घातलेलीच होती. द्वंद्वयुद्ध जुंपले. वालीने, रेड्यावर हातापायाने जोरदार प्रहार केले. रेड्याच्या तोंडून रक्त बाहेर आले. रेड्याची दोन शिंगे पकडून वालीने त्याला गरगर फिरवून दूरवर फेकून दिले. तो रेडा ऋष्यमुख पर्वताच्या परिसरात पडताना मतंग ऋषींच्या आश्रमात रक्ताचे थेंब पडले. ''हा रेडा ज्या कुणी फेकला आहे, तो या ऋष्यमुखाच्या पायथ्यापाशी कधी आला तरी तो या रेड्यासारखा मरुन पडेल.'' मतंगांची शापवाणी दुमदुमली.

**वाली वधाची योजना**

वालीने मतंग ऋषींची क्षमा मागूनही काही उपयोग झाला नाही. ''रामा! मतंग ऋषींच्या कृपेनेच हनुमानासह आम्ही मोजके वानर इथे या शिखरावर सुखरूप आहोत. माझ्या पत्नीला या वालीने बळजबरीने ठेऊन घेतली आहे.

तुमच्या हातून अशा अधर्मी वालीचा वध झालेला आता मी पहाणारच आहे.'' त्यानंतर वाली वधाची योजना ठरली. वालीला मल्ल युद्धाचे आव्हान देऊन इच्छित स्थळी आणायचे. एका वडाच्या झाडामागे रामाने स्वत: लपून राहून योग्यवेळी वालीला बाणाने ठार करायचे.

ठरल्याप्रमाणे जेव्हा सुग्रीवाने वालीला आव्हान दिले, तेव्हा वाली चवताळून उठला. पत्नी ताराने वालीला अडवले. हे आव्हान तुम्ही स्वीकारु नका, असा तिने हट्ट धरला. आव्हान न स्वीकारणे वालीला शक्यच नव्हते. अडवण्याचा तिने व्यर्थ प्रयत्न केला. या दोघा वानरांचे (द्वंद्व) मल्लयुद्ध सुरू झाले. तो पर्यंत रामाने वालीला पाहिलेलेही नव्हते. हे दोघे अश्विनी कुमारांसारखे 'एकसम'जुळे बंधू असल्यामुळे यातला वाली कोण ते ओळखणे महाकर्म कठीण होते. (अशी एकसम जुळी मुले जन्मदात्या मातेलाही ओळखणे सुरुवातीला जड जाते.) वाली सुग्रीव जुळे बंधू आहेत, हे काय रामाला माहिती नव्हते का? तरीही त्याने ती शंका अगोदर का व्यक्त केली नाही? अशा परिस्थितीत रामाने बाण चालवणे जीवघेणी जोखीम होती. सगळेच मुसळ केरात जायला नको, म्हणून रामाने केवळ बघ्याची भूमिका घेतली. कदाचित रामाला सुग्रीवाचे पाणी जोखायचे असावे. त्याने प्रेक्षकाची भूमिका स्वीकारली. वालीला ब्रह्मदेवाचा वर होता की द्वंद्व युद्धात वालीच्या प्रतिस्पर्ध्यांचे सामर्थ्य निम्मे होईल. त्याचीही प्रचिती रामाला पहायची असावी. आणि झाले तसेच. सुग्रीवाचा दम फार काळ टिकला नाही. सुग्रीव खट्टू होऊन हार पत्करून परतला. ऋष्यमुख पर्वतावर पळून जीव वाचवला इतकेच. रामाने एकसम जुळ्याचे कारण देऊन कोण वाली कोण सुग्रीव, हे समजणेच मुश्कील झाल्याचे सांगितले. पुढच्या वेळेस सुग्रीवाच्या गळ्यात खुणेसाठी गजपुष्पीची माळ बांधायचे ठरले. पुन्हा एकदा आव्हान द्यायचेही ठरले. तोही दिवस उगवला. यावेळी वालीला पत्नी ताराने चक्क अडवले. पाया पडली. ''सुग्रीवाला राज्य देऊन टाका'' म्हणाली. तो तुमचा भाऊ सद्‌गुणी आहे. कौसल्येचा राम इंद्रासारखाच पराक्रमी आहे. कोणती पतिव्रता, नवऱ्याने वहिनीला जबरदस्तीने ठेऊन घेतली तर सहन करील? ताराने कधी त्याबद्दल चकारशब्दही काढलेला नाही. ती स्वत: सुग्रीव राजा असताना राणी म्हणून मिरवत होतीच. मग आत्ता हीच तारा वालीला का अडवीत होती? त्याला कारण आहे. तिचा पुत्र अंगद तरुण होता.

**रामा, तुमचा धर्म, नीती, न्याय कुठेच दिसला नाही. अधर्म आणि पापी व्यवहार दिसला. हा साधूचा वेष तुम्हाला शोभत नाही. धर्मयुद्धात मला आव्हान न देता अचानक आडून बाण मारुन अरण्यात फळे मुळे खाणाऱ्या मला का मारले? हे क्रौर्य नव्हे? आम्ही वननिवासी पशू आणि तुम्ही मानव? भूमी, सुवर्ण, चांदी इ. संपत्तीसाठी सत्तेसाठी राजे भांडतात. युद्धे करतात.**

त्याला हेरांकडून बातमी लागली होती की सुग्रीव आणि राम दोघांची गट्टी झाली आहे. सर्वांनाच रामाचा जनस्थानातला पराक्रम माहीत होता. रामाच्या विरोधात जाऊन कुणी जिवंत राहू शकणार नाही, हेही सर्वांना उमजले होते. वाली तरीही सुग्रीवाच्या आव्हानाला सामोरा जातोय यातला धोका ताराला दिसत होता, तो वालीला का दिसत नव्हता? वालीला असे वाटले की मी रामाशी कधीच वैर धरलेले नाही, त्यांची आगळीक केलेली नाही, तर रामाने माझ्या वाटेला का जावे? तो तसे करणार नाही असे वालीचे मत होते. का? तर वालीच्या मते, राम अन्याय करणार नाही. वानरांची संस्कृती मानवांपेक्षा भिन्न असते, हे राम जाणतो. वालीला हाही अहंकार होता की समोरासमोर त्याच्याशी लढायला कोणता वीर सज्ज होईल? समजा, झालाच तर तो यमाचा पाहुणा होईल! वालीचा गर्व या पराकोटीचा होता. वालीने ताराचा सल्ला झिडकारला. ''मी सुग्रीवाला ठार मारणार नाही, असे वचन देतो. तारे तू अंत:पुरात जा.''

मात्र, दुसऱ्या सुग्रीव-वाली युद्धात रामाने त्याची शिकार पार पाडली. समोरासमोर न येता. वडाच्या झाडामागे लपून! वाली तडफडत काही काळ जिवंत राहिला. वाली शेवटच्या घटका मोजतोय ही बातमी पत्नी ताराला कळण्यापूर्वी राम आणि वालीचा संवाद झाला. 'रामा, तुझी पत्नी परत आणायची तू जर मला विनंती केली असतीस, तर रावणाच्या गळ्यात दोरखंड बांधून त्याला फरफटवीत आणला असता. रामा, मला एक सांग, मला असे लपून मारण्यात कोणता पुरुषार्थ? सज्जनांसमोर तू या भ्याड कृत्याचे कसे समर्थन करशील? इंद्रिय निग्रह, संयम, क्षमा, धर्मपालन इ. राजाचे जे गुण सांगितले जातात, ते सर्व तुझ्याकडे असतील असे मानून

मी पत्नी अडवीत असूनही सुग्रीवाचे आव्हान स्वीकारले.

**वालीचा सवाल**

रामा, तुमचा धर्म, नीती, न्याय कुठेच दिसला नाही. अधर्म आणि पापी व्यवहार दिसला. हा साधूचा वेष तुम्हाला शोभत नाही. धर्मयुद्धात मला आव्हान न देता अचानक आडून बाण मारुन अरण्यात फळे मुळे खाणाऱ्या मला का मारले? हे क्रौर्य नव्हे? आम्ही वननिवासी पशू आणि तुम्ही मानव? भूमी, सुवर्ण, चांदी इ. संपत्तीसाठी सत्तेसाठी राजे भांडतात. युद्धे करतात. (अमेरिकेचे अध्यक्ष ट्रंप आठ युद्धांचा वारंवार उल्लेख करतात) तुमचे कृत्य केवळ स्वार्थी आहे. माझ्या हातून राजहत्या, गोहत्या, घडलेली नाही, आम्ही पाच नखेवाले असूनही आम्हा वानरांच्या मृत शरीराच्या आणि कोणत्याही भागाचा, मांसाहारी कुणीही मानव उपयोग करुन घेत नाही, तरीही तुम्ही मला का बरे मारलेत? पुन्हा विचारतो, दशरथ राजाने तुमच्यासारख्या पापी मुलाला का जन्माला घातले? सत्पुरुषासमोर तुम्ही उजळ माथ्याने कसे वावरणार? मी मेल्यावर सुग्रीवाला राज्य मिळणे हाच न्याय आहे. मरणापूर्वी मला तुम्ही का मारले तेवढे विचारपूर्व सांगा (वा.रा.किश्किंधा कांड.सर्ग-१७)

**राम वदला...**

''अरे वानरा, धर्म अर्थ, काम, लौकिक व्यवहार इ.बद्दल तुला काही कळते का? या साऱ्या पृथ्वीवरील संपत्ती सर्व सजीवांसह इक्ष्वाकु वंशातील राजांची आहे. या राज्यात धर्म भ्रष्ट लोकांना राजा दंड करतो. तू धर्माने वागला नाहीस. राजाची कर्तव्ये केली नाहीस. धाकटा भाऊ, पुत्र, गुणी शिष्य हे पुत्र समानच मानले जातात. तू चंचल मनाचा आणि तशाच चंचलांच्या समवेत राहतोस. सुग्रीवाची पत्नी रुमा तुला सुनेसारखी आहे. तिच्याशी तू पत्नी म्हणून संबंध ठेवलास. हे धर्म भ्रष्ट स्वैराचारी वर्तन आहे. धाकट्या भावाच्या पत्नीला बळजबरीने जवळ ठेवलेस म्हणून मी तुला शिक्षा केली. मी क्षत्रिय आहे. जो पुरुष आपली कन्या, भगिनी, धाकटी वहिनी यांच्या बाबतीत वासना बाळगतो, अशा काम विषयक अपराधास वध हीच शिक्षा आवश्यक आहे. सुग्रीवाशी मी मैत्री करार केल्याने तो मला लक्ष्मणासारखाच आहे. सुग्रीवाची स्त्री त्याच्या राज्यासह त्याला मिळवून देण्याची माझी प्रतिज्ञा



एकमेकाविरोधात एकसम जुळे...

आहे. ती मी पूर्ण करणारच! राजाने गुन्हेगारास शासन केले नाही तर गुन्हेगाराचे पाप राजास लागते. शेवटी तू एक वानर फांदीवर राहणारा पशूच आहेस. पशूंची शिकार केली तर मांसाहारी माणसांना कुठलेही पाप लागत नाही.''

वालीने आपले वागणे भ्रष्ट होते हे मान्य केले. वाली म्हणाला, 'रामा मी तुला शरण आलो आहे. मी जे बोललो तो माझा अपराधच समज. आमचा एकुलता एक पुत्र अंगद फार लाडका आहे. त्याचे रक्षण कर. माझ्या अपराधात पत्नी ताराचा कोणताच दोष नाही. तू मला क्षमा कर. मरणासन्न वालीला पाहायला तारा अंगदासह आल्यावर सुग्रीव राम आणि लक्ष्मण दूर गेले. तारा शोकमग्न होऊन आक्रोश करु लागली. धाराशाही पडलेला वाली अल्पावधीतच तिला सोडून जाईल हे तिला समजले होते. तिने शोक आवरता घेतला. ती अजूनही किश्किंधेची राणी होती. ''तू सुग्रीवाच्या पत्नीला पळवलेस. सुग्रीवाला किश्किंधेबाहेर पिटाळलेस. त्याचेच हे फळ तुला मिळाले आहे. मी तुला अडवले पण तू मला न जुमानता माझी निंदाच केलीस. काळच तुला सुग्रीवाच्या हस्ते वश करीत आहे. काकुस्थ्य रामाने, दुसऱ्या विराशी लढत असता तुला मारले हे फार 'अनुचित' कर्म केले आहे. ''सुग्रीवा आता तुझे मनोरथ पूर्ण झाले आहे. तुझा शत्रू वाली आता तुला अडवणार

नाही. तू निष्कंटक राज्य कर.'' तारा वालीच्या मृत देहाजवळ बसली. तिने वालीमागोमाग जाण्यासाठी उपोषणाचा निर्धार जाहीर केला. हनुमानाने तिला अंगदाला तुझ्या आशीर्वादाची गरज आहे असे सुचवले. ताराने हनुमानाला सांगितले, की अंगद नव्हे सुग्रीवालाच राजा होऊदे. वालीच्या शरीरात रामाचा बाण होता, तो नल वानराने काढला. अंत्ययात्रेची तयारी सुरु झाली. तारा वानराने शिबिका(शवपेटी) आणली. तारा सती जाण्याची भाषा करू लागली. त्यावेळी रामाने वाली उच्चलोकात गेला आहे, असे ताराला सांगितले. तुंगभद्रेच्या काठी अंत्य अग्निसंस्कार झाला, तेव्हा वालीच्या सर्व स्त्रिया उपस्थित होत्या. त्यानंतर रामाने सुग्रीवाला किश्किंधेचा राज्याभिषेक आणि अंगदाला युवराज्याभिषेक करण्याची पुन्हा इच्छा प्रकट केली.

''सुग्रीवा आम्ही राजमहाली येणार नाही. आम्ही पर्वतावर पुन्हा जातो. पावसाळा संपला की तुझे वचन तू पूर्ण कर...

❋❋❋

**ही लेखमाला मूळ वाल्मिकी रामायणावरून बेतली आहे. रामायणातल्या घटना-प्रसंगांचा अर्थ-अन्वयार्थ लावताना, सादरीकरणात खेळकरपणा आणण्यासाठी आधुनिक प्रतीके/प्रतिमा/घटना/कृतींची जोड देण्यात आली आहे. हेतू हा की, रामायणकालीन घटनांचा आजच्या संदर्भाने वाचकांना सुलभपणे अर्थ लागावा.**

**- संपादक**

**---**

**राजा पटवर्धन हे विज्ञान, समाज, अर्थशास्त्र आणि संस्कृतीचे अभ्यासक आहेत. कोकणातील विकास प्रकल्पांवर यांनी सातत्यपूर्ण लेखन केले आहे. यांचे 'पुनर्शोध महाभारताचा' हे पुस्तक प्रकाशित आहे.**

**संपर्क : ९८२००७१९७५**

## हलकं-फुलकं




एडमंड बर्कला कुणीतरी विचारलं, तू जराही परमेश्वराचं स्मरण करत नाहीस, चर्चमध्ये जात नाहीस, कसलंही धार्मिक कृत्य करत नाहीस, तर तू स्वर्गात कसा जाशील?

बर्क म्हणाला, स्वर्ग जर चांगल्या माणसांसाठी असेल, तर मृत्यूनंतर मी नक्कीच तिथे जाईन. स्वर्ग जर वाईट माणसांनी व्यापला असेल, तर तिथे जाण्यात मला शून्य रस आहे. जिथे चार चांगली माणसं एकत्र येतील, तो नरक असला तरी फार काळ नरक राहू शकणार नाही, त्याचा स्वर्ग बनेलच. जिथे वाईट माणसं एकत्र आलेली असतील, तो स्वर्ग असला तरी फार काळ स्वर्ग राहू शकणार नाही. मला फक्त चांगल्या माणसांसोबत राहायचं आहे, त्यासाठी मी चांगला असलो तरी पुष्कळ आहे; धार्मिक असण्याची गरज नाही.

- मामुमियां

# वैदिक आणि चार्वाक विचारसरणीतील द्वंद्व



जगदीश काबरे





**काही जातींना अस्पृश्य समजून त्यांचा छळ करावा ही इच्छा आस्तिकाच्या मनात आधी उत्पन्न होईल की नास्तिकाच्या? अस्पृश्यता ईश्वरप्रणीत आहे, अशी ज्याची श्रद्धा आहे त्याच्या मनात मानवी प्रेम वसत असले, तरी अस्पृश्यांच्या छळामुळे त्यांचे मन द्रवणार नाही. विधवांनी सती जावे अशी ईश्वराची आज्ञा आहे अशी ज्याची श्रद्धा नाही त्या नास्तिकालाच अग्नीमध्ये जळत असताना विधवेने फोडलेल्या किंकाळ्या आधी ऐकू येतील की रूढिप्रिय आस्तिकाला त्या किंकाळ्यामुळे पाझर फुटेल? या जगात कोणत्याही दुष्ट रूढीला ईश्वराचा पाठिंबा मिळू शकतो, असा इतिहास आहे. त्यामुळे आस्तिकाला दुष्ट रूढींविरुद्ध बंड करणे कठीण जाते. नास्तिकाच्या मनावर ईश्वराज्ञेचे दडपण नसल्यामुळे रूढींची दुष्टता त्याला चटकन जाणवू शकते. नाही का?**

गेल्या दहा वर्षांपासून भारतीयांमध्ये आपण आणि ते अशी उभी फूट पडलेली आपणास दिसत आहे. आमच्या मित्रांच्या कंपूमध्येही काही मित्र पुरोगामी तर काही मित्र भक्तगणातील होते. अर्थातच त्यांची देवाधर्मावर ठार आंधळी श्रद्धा होती. त्यामुळे त्यांच्याबरोबर बऱ्याचदा आस्तिकता-नास्तिकता या विषयावर चर्चा धूमधडाक्यात व्हायची. अशाच एका चर्चे दरम्यान एक वैदिकवादी भक्त माझे चार्वकवादी विचार ऐकून म्हणाला, ''तू जर सॉक्रेटिसच्या काळात ग्रीसमध्ये जन्माला आला असतास तर सॉक्रेटिसने 'देवबिव सगळे झूट आहे,' असे सांगितले म्हणून ईश्वरनिंदा केल्याबद्दल त्याला देहान्त प्रायश्चित्त भोगावे लागले तसे तुला भोगावे लागले असते.''

त्यावर मी त्याला म्हटले, ''भारतात पुरातन काळापासून विचारस्वातंत्र्याला गुन्हा समजला जात नाही आणि शिक्षाही दिली जात नाही. आज ग्रीक लोकांनाही सॉक्रेटिसला देहान्ताची शिक्षा दिल्याबद्दल दुःख होत आहेच, पण पश्चात्तापही होत आहे. खरेतर चार्वाकाच्या निरीश्वरवादी शिकवणुकीमुळे समाजात अनाचार माजेल ही भीतीच मुळात चुकीची आहे.''

''मग ईश्वर प्रत्यक्ष दिसू शकत नाही म्हणून तो नाहीच, हे तू खात्रीशीररीत्या कसे काय म्हणू शकतोस? मी अमेरिका पाहिली नाही म्हणून अमेरिकाच अस्तित्वात नाही असे म्हणण्यासारखे ते हास्यास्पद होत नाही काय?''

''असा प्रश्न मला अनेकांनी विचारलेला आहे. प्रत्यक्ष प्रमाणाशिवाय ज्ञान संभवत नाही, असे मी जेव्हा म्हणतो, त्याचा अर्थ मी जरी अमेरिका पाहिलेली नसली तरी तू पाहिलेली आहेस ना. मग तुझे म्हणणे जर खरे असेल तर अमेरिका अस्तित्वात आहे, हे सिद्ध होतेच की. इथे मी अनुमान हे प्रमाण म्हणून स्वीकारतो.''

''असे जर आहे, तर 'आम्ही ईश्वर प्रत्यक्ष पाहिला' असे अनेक सिद्ध पुरुष सांगतात त्यांच्या अनुमानावर तू विश्वास का ठेवत नाहीस?''

''कारण अमेरिका आणि ईश्वर यात फरक आहे. मी तो देश पाहिला नसला तरी इतर देश पाहिले आहेत आणि अमेरिका हा देश कधीतरी पाहू शकतोच ना? त्यामुळे आत्ता जरी मी तो देश पाहिलेला नसला तरी अमेरिका नावाचाही देश या पृथ्वीच्या पाठीवर आहे हे मी समजू शकतो. कारण ते भौगोलिक सत्य आहे. पण जो 'मी ईश्वर पाहिला,' असे म्हणतो त्याला आपण जे पाहिले आहे ते म्हणजे ईश्वरच आहे हे कसे ओळखू येते? ईश्वर हा जगाचा निर्माता आहे असे आपण म्हणतो. मग 'आम्ही ईश्वर पाहिला,' असे जे म्हणतात त्यांनी ईश्वराला जग निर्माण करताना पाहिले आहे काय? जर पाहिले असेल तर ते स्वतः ईश्वराने जग निर्माण करण्यापूर्वीच अस्तित्वात होते, असे त्यांना कबूल करावे लागेल. ज्यांनी ईश्वराला प्रत्यक्ष पाहिले आहे, ते ईश्वराने निर्माण केलेले जग निर्माण होण्यापूर्वीच अस्तित्वात होते असे मानायला तू तयार आहेस काय?''

हा प्रश्न ऐकून माझा मित्र गोंधळला. पण धर्मतत्त्वचिकित्सेत मुरलेली त्याची बुद्धी इतक्या सहजासहजी हतबल होण्यासारखी नव्हती. थोडा विचार करून तो म्हणाला, ''ईश्वराला जग निर्माण करताना पाहणे कुणालाही शक्य नाही व जगनिर्मितीनंतर पाहिलेला ईश्वर हा खरोखरच ईश्वर आहे हे ओळखता येणार नाही, हे मी कबूल करतो. पण जग निर्मिणारा पुरुष म्हणजे ईश्वर अशीच ईश्वराची व्याख्या केली पाहिजे असे कुठे आहे? ईश्वर म्हणजे सत्य असे काही तत्त्वज्ञ समजतात. परिपूर्ण नैतिक आदर्श म्हणजेच ईश्वर असे काही विचारवंत मानतात. मग ईश्वराने जग निर्माण केले असे मानले नाही तरी निरीश्वरवाद कसा सिद्ध होतो?''

''तुझे म्हणणे खरे आहे. शब्दाचे रूढ अर्थ बदलले तर काहीही सिद्ध करता येते. पण ईश्वराचा निरीश्वरवादी अर्थ करायचा आणि मग स्वतःला ईश्वरवादी म्हणवायचे, हा अप्रमाणिकपणा नाही का? मला असे सांग की, 'ईश्वर म्हणजे सत्य' असा अर्थ तुला कोणत्या कोशात सापडला? २ + २ = ४ हे विधान सत्य आहे, याचा अर्थ हे विधान ईश्वर आहे असा होतो काय? 'मी ईश्वराला स्मरून सत्य सांगेन, पूर्ण सत्य सांगेन. सत्याशिवाय काही सांगणार नाही,' अशी जेव्हा एखादा माणूस न्यायालयात शपथ घेतो, तेव्हा सत्याच्या जागी ईश्वर शब्द घालून 'मी ईश्वराला स्मरून ईश्वर सांगेन, पूर्ण ईश्वर सांगेन व ईश्वराशिवाय काहीही सांगणार नाही', असा त्याच्या शपथेचा अर्थ निघणार नाही काय? त्याचप्रमाणे भक्ताच्या हाकेसरशी ईश्वर धावून येतो असे ईश्वरवादी समजतात. म्हणजे सत्य धावून येते असे समजायचे काय? मग असत्य बोलणारा माणूस ईश्वराला मानतो म्हणून तो सत्य बोलतो, असे समजायचे काय? ईश्वर शब्दाचा अर्थ नैतिक आदर्श असा केला तर भक्ताच्या हाकेबरोबर नैतिक आदर्श धावून येतो असा या समजुतीचा अर्थ होईल. ईश्वर कधीकाळी जगाचा

संहार करणार आहे, असे काही ईश्वरवादी म्हणतात. म्हणजे नैतिक आदर्शामुळे कधीतरी जगाचा संहार होणार आहे असे त्यांना म्हणायचे असते काय? तुझ्या बोलण्यावरून ईश्वर हा शब्द आदराने वापरल्याने त्यांचे समाधान होते, असे दिसते. पण मला वाटते, ईश्वरवाद्यांचे ईश्वरापेक्षा 'ईश्वर' या शब्दावर अधिक प्रेम आहे. तसे तर बायकोवरही त्याचे प्रेम असते. मग 'माझी ईश्वरावर भक्ती आहे,' याचा अर्थ 'माझी माझ्या बायकोवर भक्ती आहे,' असा केला तरी चालेल. नाही का?''

''म्हणजे जग निर्मिणाऱ्या शक्तीशिवाय इतर कुणालाही वा कशालाही ईश्वर हा शब्द लावायला तुझी हरकत आहे असे दिसतेय.''

''नाही. केवळ एवढ्यानेच भागणार नाही. एखादा ईश्वरवादी साधू तत्त्वज्ञ पाण्यातून जग निर्माण झाले असे म्हणतो. हे खरे मानले तरी पाण्याला ईश्वर म्हणता येणार नाही. प्राचीन काळी परमाणूपासून जग निर्माण झाले, असे मत कणाद महर्षींनी प्रसृत केले आहेच. पण परमाणू म्हणजेच ईश्वर असे काही त्यांनी म्हटले नाही हे लक्षात घे. ईश्वर हा केवळ जगाचा निर्माता आहे एवढीच काही ईश्वरवाद्यांची कल्पना नाही. तो जगाचा निर्माता आहे, एवढेच नव्हे तर सज्जनांचा पाठीराखा आणि दुर्जनांचा शत्रू आहे. चांगल्याचा पोशिंदा आहे, तर वाइटाचा द्वेष्टा आहे. भक्तांनी प्रार्थना केली म्हणजे तो त्यांना पावतो, त्यांच्या कल्याणासाठी आपले सामर्थ्य वापरतो. ज्या ईश्वराला त्यांनी कधी पाहिले नाही, त्याची प्रचिती म्हणा की अनुभव म्हणा असा कधी घेतला नाही, तरीही ईश्वर या शब्दाचा एवढा सर्व अर्थ ते कसा काय अभिप्रेत धरू शकतात? जर ईश्वर सज्जनांचा पाठीराखा आणि वाइटाचा द्वेष्टा असेल, तर जगात नेमके त्याच्या विपरीत का दिसते? या जगात वाईट लोक, भ्रष्टाचारी लोक आनंदात जगताना दिसतात आणि सज्जनांचा मात्र छळ होतो. असे का?''

''आम्ही ईश्वर या शब्दाचा सर्वशक्तिमान असाच अर्थ करतो. असा ईश्वर अस्तित्वात आहे हे आम्ही सिद्ध करू शकत नाही, हेही मी कबूल करतो. पण तो अस्तित्वात नाही असे तू तरी सिद्ध करू शकतोस काय?''

''तुझ्या दहाव्या पूर्वजाला दोन हजार हात नव्हतेच हे तू सिद्ध करू शकतोस काय? नसशील तर त्याला दोन हजार हात होते यावर तू विश्वास का ठेवत नाहीस?''

''म्हणजे, ज्या वस्तूच्या अस्तित्वाबद्दल प्रमाण सापडत नाही त्या वस्तूच्या अस्तित्वावर विश्वास ठेवू नये. मग ती अस्तित्वात नाही असे सिद्ध न करता आले तरी चालेल, असे तुझे म्हणणे आहे काय?''

''अगदी बरोबर.''

''मग कोणत्या तऱ्हेचे प्रमाण मी दाखवल्याने तुझा ईश्वरावर विश्वास बसेल ते सांग. म्हणजे त्या तऱ्हेचे प्रमाण देण्याचा मी प्रयत्न करतो.''

''ईश्वराने जग निर्माण केले याबद्दल प्रमाण देणे शक्य आहे असे मला वाटत नाही. पण ईश्वरावाद्यांचे म्हणणे खरे असेल तर आणखी काही प्रमाणे देणे शक्य आहे. उदाहराणार्थ, प्रार्थना केल्याने ईश्वर पावतो, हे खरे असेल तर त्याचा पुरावा देणे सहज शक्य आहे. 'हे ईश्वरा, आम्हाला आरोग्य व संपत्ती दे,' अशी मनोभावे ईश्वराची प्रार्थना करणारे लोक मुळीच प्रार्थना न करणाऱ्या लोकांपेक्षा जास्त आरोग्यशील व संपत्तीवान असतात, असे तू दाखवून देऊ शकशील काय? नदीला पूर आला म्हणजे प्रार्थना करणाऱ्यांची घरे वाहून जात नाहीत; नास्तिकांची घरे मात्र जमीनदोस्त होतात असे तू दाखवून देऊ शकशील काय? भूकंपामध्ये भूमीच्या उदरामध्ये गडप होणाऱ्या लोकांमध्ये आस्तिकांपेक्षा नास्तिकांचे प्रमाण जास्त असते असे तुला आढळले आहे काय?''

''नुसती प्रार्थना केल्याने ईश्वर पावत नाही. त्या प्रार्थनेमागे असलेली भक्ती कितपत खरी व सर्वात्मक आहे, यावर ईश्वराचा अनुग्रह अवलंबून असतो.''

''आज या जगात कोट्यवधी लोक राहतात. या सर्व



लोकांत एखादा तरी ईश्वरावर खरी भक्ती असणारा एक तरी भक्त असेलच की. तो जिथे असेल तिथे जाऊन त्याला भेटायला मी तयार आहे. त्याने ईश्वराची प्रार्थना करून नद्यांचे ओघ बदलवून दाखवावे; रोगाच्या साथी बंद करून दाखवाव्या; मेलेला माणूस जिवंत करून दाखवावा आणि हो, हे सर्व नुसत्या प्रार्थनेने झाले पाहिजे. त्याने त्यासाठी आणखी कोणतीही खटपट करता कामा नये. तो असे करून दाखवील तर प्रार्थनेने पावणारी एखादी शक्ती या जगात आहे यावर माझा विश्वास बसेल.''

''मग तू तुझा निरीश्वरवाद सोडून देशील?''

''नाही. कारण प्रार्थनेने पावणारी एखादी शक्ती जगात असली तरी त्या शक्तीला ईश्वर म्हणता येणार नाही. कारण याच शक्तीने जग निर्माण केले असे म्हणता येणार नाही. शिवाय ती शक्ती प्रसन्न होण्यासाठी प्रार्थना करणे म्हणजेच स्वतःची हाजीहाजी करणाऱ्या लोकांचे लाड पुरवण्यासाठी स्वतःचे कायदे बदलणाऱ्या लहरी राजाप्रमाणे ही शक्ती आहे असे समजावे लागेल. ती न्याय-अन्यायाचा निःपक्षपातीपणे निवाडा करणारी शक्ती नाही, असेदेखील त्यावरून सिद्ध होईल. अशा शक्तीला ईश्वर हा शब्द लावायला मला कसेसेच वाटेल. मग त्या शक्तीत आणि स्वार्थी वृत्तीच्या माणसात फरक तो काय?''

''जगकर्ता, न्यायी व जगच्चालक असा ईश्वर प्रमाणांनी सिद्ध करता येत नसला तरी त्यावर श्रद्धा ठेवणे समाजव्यवस्थेच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने आवश्यक नाही काय? ईश्वरावरची श्रद्धा उडाल्यामुळे समाजात दुराचार पसरणार नाहीत काय?''

''हा आणखी एक वेगळाच प्रश्न झाला. पण तू म्हणतोस तसे होणार नाही. कारण कोणते आचरण चांगले व कोणते वाईट हे आपण ईश्वराला विचारून ठरवीत नाही. चोरी करणे वाईट, खून करणे वाईट अशी आपली धारणा असल्यामुळे या गोष्टी ईश्वरालादेखील नापसंत आहेत, असे आपण मानतो. चोरी करणे वाईट असे आपल्याला वाटत नसते, तर ईश्वरालादेखील चोरी करणे आवडते असे आपण मानले असते. चोरांच्या जमातीतदेखील एक आराध्य देवता असते. या देवतेला चोरी करणे आवडते एवढेच नव्हे, तर चोरी करणे हेच तुमचे कर्तव्य आहे अशी या देवतेची आपल्या भक्तांना आज्ञा असते. अर्थात माणसाची नीतिमत्ता त्याच्या आराध्य देवतेवर अवलंबून नसून त्याच्या आराध्य देवतेचे स्वरूप त्याच्या नीतिमत्तेवर अवलंबून असते. चोरांचा देवही चोरच असतो. आपला देश मोठा विचित्र आहे. येथे कुणीही बेकायदा मंदिरे बांधू शकतात. मशिदी बांधू शकतात. सार्वजनिक ठिकाणीही बांधकामे केली जातात आणि कायद्यातील पळवाटा काढून ती नियमितही करण्याची मुभाही आहे. मात्र प्रश्न पडतो की, देव नीतिमान आहे, तर मुळात अशा बांधकामांमध्ये देव राहतो तरी कसा? जर मला देव भेटला किंवा माझ्यापुढे तो उभा राहिला तर मी त्याला 'हे सगळे तुला चालते तरी कसे? अशा बेकायदा बांधकामांमध्ये तू राहतोस तरी कसा?' असे प्रश्न जरूर विचारणार. आस्तिकांच्या राज्यातील अनधिकृत बांधकामांना मूकपणे साथ देणारा देवही अस्तिकांसारखाच दगड्या डोक्याचाच असला पाहिजे, असे म्हटले तर चूक ठरेल काय? जर हा देवच बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांना साहाय्य करत असेल तर त्याला मानणारे आस्तिक ढोंगी निपजल्यास नवल ते काय!

देवाच्या इच्छेशिवाय येथील एक पानही हलत नाही असे म्हणणाऱ्या आस्तिकांना अनधिकृत देऊळ वा मशीद बांधणे ही देवाचीच इच्छा आहे असे वाटते काय? पण हा तथाकथित सर्वज्ञ देव बेकायदेशीर कृत्ये करणाऱ्याला ज्या अर्थी कोपिष्ट होऊन त्याचे भस्म करत नाही, त्या अर्थी या देवालाही ही बेकायदेशीर कृत्ये आवडत असावीत, हेच सिद्ध होत नाही काय? आणि म्हणे, देव नीतिमत्तेची शिकवण देतो! देवाधर्मामुळेच माणसे नीतीमान राहतात!! थोडक्यात काय तर, ईश्वर हा नीतीचा जनक नसून नीती हीच ईश्वराची जननी आहे. देवाप्रमाणे भाव उत्पन्न होत नसून जसा भाव तसाच देव असतो. म्हणून ईश्वर पदच्युत झाल्यामुळे नीतीदेखील पदच्युत होईल, ही भीति व्यर्थ आहे.''

''आपल्या नीतिकल्पनांना एखाद्या विश्वात्मक शक्तीचे पाठबळ असावे म्हणून मानवाने ईश्वराची कल्पना केली असेल हे शक्य आहे. पण नीतिकल्पना टिकून राहण्यासाठी उल्लंघन करणाऱ्यांना ईश्वर शासन करील व त्यांचे पालन करणाऱ्यांना बक्षीस देईल ही श्रद्धा आवश्यक नाही काय?''

''नाही. याचे प्रत्यंतर प्रत्यक्ष प्रमाणानेच मिळेल. चोरी करणाऱ्या लोकांमध्ये तुला किती नास्तिक आढळले? त्याचप्रमाणे निरीश्वरवादाचा प्रचार करणाऱ्या माझ्यासाख्या एखाद्याने तरी चोरी किंवा खून केल्याचे तुला दाखवून देता येईल काय? जैन तत्त्ववेत्ते ईश्वराला मानत नाहीत. त्यांची

नीतिमत्ता आस्तिकांपेक्षा कोणत्या रीतीने कमी दर्जाची असते? गौतम बुद्धाला त्याच्या अनुयायांना सदाचरणाची शिकवणूक देताना ईश्वराची गरज भासली नाही. कपिलमुनींना सृष्टीचे व्याकरण सांगताना ईश्वर अनावश्यक वाटला. असे असूनदेखील आस्तिकांनी त्यांच्यापासून सदाचरणाचे धडे घ्यावे असे त्यांचे आचरण नव्हते काय?''

''मूलतःच सत्प्रवृत्त असलेल्या काही महान व्यक्तींना सदाचरणी राहण्यासाठी ईश्वराची जरूर वाटत नसेल, त्याचप्रमाणे मूलतःच दुराचारी असणाऱ्या लोकांच्या दुराचरणाला ईश्वराच्या भीतीमुळे आळा बसत नसेल. पण सर्वसाधारण लोकांना कह्यात ठेवण्यासाठीदेखील ईश्वरी शिक्षेची भीती आवश्यक नाही असे तू कसे म्हणू शकतोस?''

''कारण सर्वसाधारण माणूस शिक्षेच्या भीतीमुळे सत्प्रवृत्त होतो ही कल्पना मानवाला अपमानास्पद आहे. ईश्वरी शिक्षेचा प्रश्न तूर्त बाजूला राहू दे. चोरी वा खून या गुन्ह्यांबद्दल इहलोकीचे न्यायाधीश शिक्षा देतात. बहुसंख्य लोक केवळ या शिक्षेच्या भीतीमुळे चोरी वा खून करत नाहीत असे तुला वाटते काय? बहुसंख्य लोकांची प्रवृत्ती चोरी करण्याचीच असती तर चोरांना शिक्षा देणेच शक्य झाले नसते. कारण असा सगळा समाज चोर बनलेला असतो. पण बहुसंख्य लोक चोर नसतात. म्हणूनच अल्पसंख्य चोरांना तुरुंगात डांबू शकतात. ज्या समाजात बहुसंख्य लोक चोर आहेत त्या समाजात चोरांना शिक्षाच होऊ शकणार नाही. आजच्या राजकारण्यांबद्दल हे तंतोतंत लागू नाही काय?''

''बहुसंख्य लोक चोर नाहीत याचे कारण त्यांना ईश्वरी कोपाची भीती वाटते, असे म्हणायला काय हरकत आहे?''

''हा प्रश्न सहज सुटण्यासारखा आहे. सर्वसाधारण सभ्य माणसाला तुम्ही विचारा की, 'लोकांच्या घरी गेल्यावर उघड्यावर पैसे ठेवलेले आढळले म्हणजे त्यांना काय वाटते? ते पैसे चोरण्याची एकदम इच्छा होते व मग 'नको, चोरी केल्याचा पत्ता लागला तर मेल्यावर ईश्वर नरकात टाकेल', असा विचार मनात येऊन ते चोरी करायची इच्छा दाबून टाकतात?' त्यांच्याकडून असे उत्तर तुला खासच मिळणार नाही. कारण बहुसंख्य लोकांच्या मनात चोरी करायची इच्छा बहुधा उत्पन्न होतच नाही, असेच तुला आढळून येईल. इहलोकी कायद्याने ठरवलेल्या शिक्षेच्या भीतीमुळे पुष्कळांची चोरीची इच्छा एकवेळ दाबली जात असेल, पण ईश्वरी शिक्षेच्या भीतीमुळे चोरीची इच्छा दाबली जाण्याचा संभव फारच कमी आहे. कारण ईश्वर शिक्षा देतो ती पुढच्या जन्मी! आज-उद्या नव्हे. शिक्षेची भीती परिणामकारक व्हायला दुराचरण व त्याबद्दलची शिक्षा यांच्यात फार काळ लोटता उपयोगी नाही. आजच्या दुष्कृत्याबद्दल आजच्या आज शिक्षा होणार असेल, तर त्या शिक्षेच्या भीतीमुळे आज दुष्कृत्य घडणार नाही. पण आजच्या दुष्कृत्याबद्दल जर शंभर वर्षांनी शिक्षा मिळणार असेल, तर त्या शिक्षेच्या भीतीमुळे आजच्या आचरणावर परिणाम होण्याचा संभव फारच कमी असतो. आज चोरी केल्यास पन्नास वर्षांनी तुला तुरुंग दाखवू अशी एखाद्या चोराला धमकी दाखवली तर तो या धमकीचा उपहासच करेल.

दुसरे असे की, ईश्वरावाद्यांच्या कल्पनेप्रमाणे ईश्वर अपराधाबद्दल नेहमी शिक्षा देतोच असे नाही. कितीही पाप केले आणि ईश्वराची मनोभावे करुणा भाकली, त्याला शरण गेले की तो क्षमा करतो, असा भक्तांचा समज असल्यामुळे ते आयुष्यभर पाप करत राहतात. मग कुंभमेळ्याची पर्वणी साधत गंगेत डुबकी लावून पाप धुवायचा प्रयत्न करत नाहीत काय? नुसतेच शेंगदाणे खाऊन पित्त होते, पण त्याबरोबर गूळ खाल्ला तर ते शांत होते. म्हणून शेंगदाण्याचे शौकिन शेंगदाणे खाणे सोडत नाहीत, तर त्याबरोबर गूळही खातात. त्याचप्रमाणे प्रार्थनेवर विश्वास असणारा आस्तिक पाप करणे सोडणार नाही, तर एक तास पाप केल्यावर दोन तास प्रार्थना



आस्तिक-नास्तिकः एक विचारद्वंद्व

करेल. या दृष्टीने आस्तिकाची बुद्धी ही सदाचरणाला पोषक नसून दुराचरणाला सरळ उत्तेजन देणारीच आहे.''

''मला वाटते, तू स्वमताच्या अभिनिवेशाने अतिशयोक्ती करत आहेस. आस्तिकाच्या बुद्धीमुळे सदाचरणाची जोपासना होत नसेल, पण तिच्यामुळे दुराचरणाला उत्तेजन मिळते, असे म्हणायला तुझ्याजवळ काय पुरावा आहे?''

''पुष्कळ पुरावा आहे. काही जातींना अस्पृश्य समजून त्यांचा छळ करावा ही इच्छा आस्तिकाच्या मनात आधी उत्पन्न होईल की नास्तिकाच्या? अस्पृश्यता ईश्वरप्रणित आहे अशी ज्याची श्रद्धा आहे त्याच्या मनात मानवी प्रेम वसत असले तरी अस्पृश्यांच्या छळामुळे त्यांचे मन द्रवणार नाही. विधवांनी सती जावे, ही ईश्वराची आज्ञा आहे अशी ज्याची श्रद्धा नाही, त्या नास्तिकालाच अग्नीमध्ये जळत असताना विधवेने फोडलेल्या किंकाळ्या आधी ऐकू येतील की रूढिप्रिय आस्तिकाला त्या किंकाळ्यामुळे पाझर फुटेल? या जगात कोणत्याही दुष्ट रूढीला ईश्वराचा पाठिंबा मिळू शकतो, असा इतिहास आहे. त्यामुळे आस्तिकाला दुष्ट रूढींविरुद्ध बंड करणे कठीण जाते. नास्तिकाच्या मनावर ईश्वराज्ञेचे दडपण नसल्यामुळे रूढींची दुष्टता त्याला चटकन जाणवू शकते. नाही का?''

''नास्तिकाला रूढींचे बंधन लवकर झुगारता येते, हे तुझे म्हणणे मी मान्य करतो. पण नास्तिक दुष्ट रूढींचे बंधन झुगारून देईल तसेच चांगल्या रूढींचे बंधनदेखील मानणार नाही. समाजातल्या बहुतेक रूढी वाईटच आहेत, असे मानल्याशिवाय रूढी न मानण्याची नास्तिकाची प्रवृत्ती समाजविघातक ठरल्याशिवाय कशी राहील?''

''केवळ ईश्वरावर विश्वास नाही म्हणून नास्तिकाला सर्वच रूढी त्याज्य वाटतील, असे म्हणणे चूक आहे. रूढींचा विचार करताना रूढी समाजधारणेला उपयोगी आहे की नाही याचाच फक्त तो विचार करील. रूढीपासून परलोकी गेल्यावर काय फायदा होतो, याचा विचार करणार नाही एवढेच. एका जातीच्या मुलाने दुसऱ्या जातीच्या मुलीशी लग्न करावे की नाही? असा प्रश्न नास्तिकाला विचारला, तर त्या लग्नामुळे ते जोडपे सुखी होईल की नाही, हा विचार त्याच्या मनात प्रथम येईल. तसेच आंतरजातीय विवाह अनेक लोक करू लागले, तर त्या त्यापासून समाजात संघर्ष उत्पन्न होतील की सलोखा उत्पन्न होईल, वगैरे मुद्द्यांचाच तो विचार करील. आंतरजातीय विवाह ईश्वराला पसंत आहेत की नाहीत, अशा विवाहापासून इहलोकी सुख व समाधान मिळाले तरी त्यापासून परलोकी दुःख होण्याचा संभव आहे की काय, या प्रश्नांचा काथ्याकूट तो करत बसणार नाही. इहलोकीचे जीवन हे परलोकीच्या सुखाचे साधन आहे असे तो मानत नाही. इहलोकीच्या जीवनातच शक्य तितके सुख व समाधान आणून सोडणे हे तो आपले कर्तव्य समजतो. हाच तो चार्वाकवादी विचार आहे.''

''पण स्वार्थ सोडून दुसऱ्याच्या सुखासाठी झटण्याचे नास्तिकाला काय कारण?''

''दुसऱ्याच्या सुखासाठी झटण्याचे नास्तिकाला काय कारण असे तू विचारतोस, तर मला सांग, मुलाच्या सुखासाठी झटण्याचे आईबापांना काय कारण? मुलाचे संगोपन केले नाही, तर ईश्वर आपल्याला नरकात टाकील या भीतीने ते मारून मुटकून मुलासाठी खस्ता खातात काय? दुसऱ्याच्या दुःखाबद्दल सहानुभूती नसेल, तर केवळ ईश्वरावर श्रद्धा असल्यामुळे दुसऱ्याच्या सुखासाठी कुणीही झटणार नाही. गुलामांच्या कत्तली पाहण्यात आनंद मानणाऱ्या साम्राज्यवाद्यांचा काय ईश्वरावर विश्वास नव्हता? उलट जीवमात्राचे दुःख नाहीसे व्हावे म्हणून ज्याने आपले आयुष्य वेचले त्या भगवान बुद्धाचा ईश्वरावर विश्वास नव्हता असे म्हणायला पुष्कळ जागा आहे. एवंच नरकाची भीती व स्वर्गाचा हव्यास या भावना सदाचरणाच्या प्रेरकशक्ती नव्हेत. सहानुभूती, प्रेम इत्यादी भावनांच्या ठायीच सदाचरणाचा म्हणजे परोपकाराचा जन्म होतो. असा विचार नास्तिक करतो म्हणूनच निःस्वार्थीपणे जगणे, त्याचा अंगभूत गुणधर्म झालेला असतो.''

**'आपल्या सुखदुःखाची चिंता वाहणारे आईबाप आपल्या पाठीशी आहेत, या कल्पनेने मुलाला किती समाधान वाटते! असे समाधान त्याला मिळाले नसते तर परकेपणाने भरलेले हे जग त्याला किती भकास वाटले असते? यावरून भावनांची भूक भागवायला ईश्वराची गरज नाही हे लक्षात घे.'**

‘‘समाजव्यवस्था सुरळीत राहावी म्हणून ईश्वरावर श्रद्धा असणे आवश्यक आहे, असे म्हणणे कदाचित चूक असेल. पण ईश्वर श्रद्धेशिवाय मानवाच्या भावनांची भूक भागू शकेल काय?’’


‘‘आपल्या सुखदुःखाची चिंता वाहणारे आईबाप आपल्या पाठीशी आहेत, या कल्पनेने मुलाला किती समाधान वाटते! असे समाधान त्याला मिळाले नसते तर परकेपणाने भरलेले हे जग त्याला किती भकास वाटले असते? यावरून भावनांची भूक भागवायला ईश्वराची गरज नाही हे लक्षात घे.’’

‘‘आपण आता लहान नसलो तरी सृष्टीच्या लेखी आपण लहान मुलासारखेच आहोत. आपल्या सुखदुःखाची काळजी वाहणारा पितृतुल्य ईश्वर आपल्या पाठीशी आहे, ही श्रद्धाच तू नाहीशी केलीस तर बहुसंख्य लोकांना जगणे असह्य होईल. मानवी मनाची ही भूक निरीश्वरवाद्यांनी लक्षात घेतली पाहिजे असे मला वाटते.’’

‘‘तू म्हणतोस त्याप्रमाणे मुळात मानवी मनाची ही भूक आहे असे मला वाटत नाही. लहानपणापासून ईश्वरावर श्रद्धा ठेवा; त्याची प्रार्थना करा; त्याच्या अस्तित्वाबद्दल शंका घेणे पाप आहे, अशी शिकवणूक जर दिली गेली नाही तर मानवी मनात ही भूक निर्माण होईल असे मला वाटत नाही. शिवाय ईश्वर जर मी म्हणतो, त्याप्रमाणे खरोखरच अस्तित्वात नसेल तर तो अस्तित्वात आहे या कल्पनेने होणारे समाधान हे केवळ स्वप्नरंजन ठरेल. यालाच ‘भित्यापाठी ब्रह्मराक्षस’ म्हणतात. सदैव स्वप्नात डुंबत राहणाऱ्या माणसाला आपण सुबुद्ध समजत नाही. सत्य कितीही कटू असले तरी ते सत्य आहे, हे न विसरता जो संतुलित विचाराने वागू शकतो त्यालाच आपण सुबुद्ध समजतो.’’

‘‘पण ईश्वरश्रद्धेपासून मानवाला मिळणारे समाधान स्वप्नरंजनासारखे क्षणिक नसते. ते शाश्वत असते.’’

‘‘बहुसंख्य लोकांना ईश्वरश्रद्धेपासून समाधान मिळते हेच मला पटत नाही. कारण बहुसंख्य लोक ईश्वराबद्दल मनापासून विचारच करत नाहीत. ते प्रार्थना करतात तेव्हासुद्धा त्यांच्या भावनांशी त्या प्रार्थनेचा काहीएक संबंध नसतो. लोकाचार म्हणून प्रार्थना करतात. थोड्याफार लोकांना ईश्वरश्रद्धेची जी भावनात्मक गरज वाटत असेल, ती लहानपणापासूनच्या शिकवणुकीमुळे असे मी मघाशीच सांगितले आहे. लहान मुलाला आईबापावाचून जीवन असह्य वाटणे, हे साहजिक



योग्य शब्दांत प्रतिवाद महत्त्वाचा...

आहे. कारण तो अगदीच पंगू असतो. त्याला स्वतःचे रक्षण आणि पोषण करता येत नाही. पण प्रौढ मानवांना एकमेकांच्या सहाकार्याने आपल्या बुद्धीचा उपयोग करून स्वतःचे रक्षण आणि पोषण करता येते. त्यांना ईश्वरावाचून जग असह्य वाटण्याचे काय कारण? ‘जग हे एक शिशुसंगोपन गृह आहे व मानव हे असहाय बालक आहेत’ ही कल्पना मानवी बुद्धीला व सामर्थ्याला अपमानास्पद आहे, असे नाही तुला वाटत?’’

‘‘तुझ्याजवळ माझ्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर आहे हे कबूल केले पाहिजे. पण तुझी सगळीच उत्तरे मला पटली असे नाही. तरीही तुझे विचार दुर्लक्षिण्यासारखे नाहीत. उलट जगातल्या सर्व ईश्वरवाद्यांना ते एक आव्हान आहे.’’

‘‘तुला माझे सगळेच विचार पटणार नाहीत हे मान्य. पण त्या मागेही कारण आहे. कारण लहानपणापासून तुझ्या डोक्यावर ईश्वर नावाची संकल्पना लादली गेलेली आहे.

त्यामुळे ती अशी झटकन काढून टाकणे तुला कठीण जात आहे. जोपर्यंत तू स्वतःशीच आणि स्वतःच्या बुरसटलेल्या विचारांशी झगडून बदलणार नाहीस, तोपर्यंत तुला हे पटणे

कठीण! पण निदान तू कुठलाही आक्रस्ताळेपणा न करता माझे विचार शांतपणे ऐकून घेतलेस. त्यावर थोडाफार का होईना, पण विचार करायला लागलास, हेही नसे थोडके.''

या मुद्द्यावर आमची चर्चा थांबली. वेळही बराच झाला होता. तेव्हा आम्ही मग आपापल्या घरी पांगलो. पण जाताना माझ्या मनात एकच विचार होता की, या माझ्या आस्तिक मित्रासारखे काही प्रमाणात का होईना, पण विचार करणारे किती आस्तिक असतील? अशांची संख्या वाढणे ही आज समाजाची खरी गरज आहे. नाहीतर नास्तिकांच्या नावाने बोटे मोडणारे आणि त्यांना शिव्याशाप देणारेच जास्त. कारण त्यांना योग्य शब्दांत प्रतिवाद करता न आल्यामुळे त्यांचा चडफडाट होतो. ते भावना दुखावल्याचा कांगावा करू लागतात.

खरेतर त्यांच्या भावना दुखावलेल्या नसतात, तर त्यांचा अहंकार दुखावलेला असतो.

काय? बरोबर ना?

❋ ❋ ❋

**जगदीश काबरे हे विज्ञानप्रसार आणि सामाजिक उन्नयनाशी निगडित कार्यकर्ते, ज्येष्ठ लेखक आणि आस्वादक आहेत. संपर्क : ९९२०१९७६८०**
**ई मेल :** jetjagdish@gmail.com

## हलकं-फुलकं



एका राजाने एका सूफी फकिराला एक सुवर्णपात्र भेट दिलं. त्या सुवर्णपात्रात एक मूल्यवान शोभेचा मासा पोहत होता.

फकिराला तो मासा पाहून दया आली. पात्र सुवर्णाचं असलं म्हणून काय झालं. त्यातही मासा बंदिवानच होता. तलावाची, नदीची, समुद्राची मुक्तता त्या पात्रात नव्हती.

फकिराने माशाला स्वतंत्र करण्याचा निर्धार केला. तो ते पात्र घेऊन तलावाकाठी गेला. त्या माशाला तलावात सोडून दिलं. मग त्याने त्या पात्राकडे पाहिलं. सोन्याचं पात्र आता माशाचा तुरुंग उरलं नसलं तरी त्याच्या मूल्यामुळे आपल्यासाठी आसक्तीचा तुरुंग बनेल, हे ओळखून त्याने ते पात्रही त्या तलावात भिरकावून दिलं.

दुसऱ्या दिवशी आपण स्वतंत्र केलेला चमचमता मासा त्या स्वातंत्र्याचा कसा उपभोग घेतो आहे, हे पाहायला फकीर तलावाकाठी गेला. मासा तलावात फेकलेल्या त्या सुवर्णपात्रात पुन्हा जाऊन बसला होता. त्यातच मुक्त विहरत होता.

- मामुमियां

# गिग अर्थव्यवस्थेचं राजकीय अर्थशास्त्र



हितेश पोतदार








**आजतागायत काम व कामाची ठिकाणे भौगोलिकदृष्ट्या जागेशी घट्ट बांधलेली होती. म्हणजेच आपण काहीएक चार भिंतीत, कुंपणात, एका विशिष्ट जागेत काम करायचो, अजूनही करतो. उत्पादनाच्या इतर घटकांच्या तुलनेत श्रमशक्ती ही सर्वात अधिक भौगोलिकरीत्या स्थानिक आहे. कारण त्या चार भिंतींतील काम संपवून प्रत्येकाने अखेरीस घरी परतायलाच हवे. म्हणूनच श्रम हे केवळ आर्थिक नाही, तर भौगोलिक प्रक्रियेचेही रूप आहे असे आपण म्हणू शकतो. परंतु गिग अर्थव्यवस्था ह्याचे स्वरूप पूर्णपणे बदलते... या व्यवस्थेत श्रमशक्तीचे अवमूल्यन, डेटाचे व्यापारीकरण आणि कर्जाधारित उपजीविका हे सर्व एकत्र येऊन कामगारांसाठी अस्थिरता वाढवतात. अशा रीतीने गिग अर्थव्यवस्था ही नव्या स्वरूपाची मक्तेदारी व्यवस्था बनते. ज्यात तंत्रज्ञान फक्त एक मुखवटा आहे आणि आत खोलवर भांडवलशाहीचे जुनेच तत्त्व म्हणजे, सततचे शोषण नव्या साधनांनी राबवले जाते...**

पवईतील एक झोमॅटो रायडर रात्रीच्या वेळी ऑर्डर डिलिव्हर करायला निघते. वरकरणी ती व तिचे काम स्वतंत्र वाटते. ज्या प्रकारे त्यांना इंडिपेंडेंट कॉंट्रॅक्टर्स किंवा पार्टनर्स म्हटले जाते. ती हवे तेव्हा काम सुरू करते. हवे तेव्हा बंद करते. पण कंपनीने तयार केलेले नकाशे – जीपीएस, रेटिंग्स आणि प्रोत्साहन–शिक्षा (Reward-Penalty System) यंत्रणा तिची प्रत्येक हालचाल ठरवतात. ग्राहकाला वेळेत डिलिव्हरी न केल्यास तिच्या कमाईत कपात होते. ती बोनस गमावते.

येथे केवळ पिझ्झा पोचवण्याचा प्रश्न नाही. इथे श्रम शक्ती कशा प्रकारे सूक्ष्म–तासांमध्ये आणि सूक्ष्म–जागांमध्ये विभागली जाते, त्यातून कशा प्रकारे जास्तीतजास्त मूल्य/नफा काढले जातात, हे बघणे महत्त्वाचे आहे. प्लॅटफॉर्म कंपनी स्वतः उत्पादनात भाग घेत नाही, पण ती श्रमशक्तीला मालमत्ता बनवते आणि ग्राहक व कामगार यांच्यामधली वित्तीय गुंतवणूकदारांची भांडवलवादी मध्यस्थ म्हणून नफा उचलते.

ही प्रक्रिया नवी नाही. पूर्वीही फेरीवाले होतेच. पण त्यात भांडवलाची सरळ मध्यस्थी नव्हती. बरीच कामे लोकांच्या घरूनसुद्धा केली जात आणि जातात. जशी स्वयंरोजगार घरआधारित काम (self-employed home-based work), कंत्राटी/पीस–रेट घरकामगार, उपजीविकेसाठी/सर्व्हावलिस्ट घर आधारित काम आणि ह्या सर्वांचे मिश्रण असणारी इतर अनेक कामे. पण तीच जुने कंत्राटीकरण आणि कॅज्युअलायझेशन आता डिजिटल रूपात आले आहे. त्यात फरक असा की, आता कामगारांचा प्रत्येक क्षण आणि प्रत्येक पाऊल, त्यांची हालचाल डेटामध्ये रूपांतरित होते. जे पुढे भांडवल संचिताच्या प्रक्रियेत आता थेट वापरले जाते. यालाच आपण असे म्हणू शकतो की गिग अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून भांडवलशाहीने संचिताच्या प्रक्रियेचे नवे (तंत्रज्ञानाधारित) विकल्प शोधले आहेत.

**बिनपगारी वेळेची गोष्ट**

गिग अर्थव्यवस्थेत श्रमाचे रूपांतर आणि शोषण समजून घेण्यासाठी आपल्याला तीन धागे एकत्रित पकडावे लागतात. पहिला, बिनपगारी श्रमवेळेचा कब्जा आणि श्रमाचे अदृश्यीकरण (invisibilization of labour). दुसरा, टेलरिझम (Taylorism) आणि ॲल्गोरिदमिक व्यवस्थापन (Algorithmic Management) यांवर आधारलेली नवी नियंत्रणव्यवस्था. तिसरा, अस्थैर्याला पोसणाऱ्या सामाजिक श्रेणी व विषमता, जसे लिंग, जात, वंश, स्थलांतर यांचे अधिक खोलवर रुजत जाणारे परिणाम. या चौकटीत प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्था ही श्रमशक्तीचे अधिग्रहण करणारी म्हणजेच श्रम शक्ती व्यवस्थेत सामावून घेऊन तिचे आपल्या सोयीप्रमाणे रूपांतरण करणारी व त्यातून मूल्यवृद्धी (valorization) साधणारी एक विशिष्ट उत्पादनपद्धती (mode of production) म्हणून उलगडते.

या उत्पादनपद्धतीतील सर्वाधिक निर्णायक प्रक्रिया म्हणजे श्रमाचे अदृश्यीकरण (invisibilization of labour). ॲल्गोरिदमद्वारे चालणाऱ्या नियंत्रणाखाली कामाची रचना बदलताना बिनपगारी श्रमाच्या वेळेत (unremunerated labour-time) सतत वाढ होते. कामगाराला मोबदला मिळणाऱ्या टास्कपर्यंत पोहोचण्यासाठी जे काही करावे लागते म्हणजेच ऑर्डरची वाट पाहणे; पुढील काम शोधणे; ऑर्डर्सच्या मधले अंतर पार करणे; ग्राहकांच्या तक्रारी व त्यांतील तंटे सोडवणे; आपली प्रतिमा उभी करणे, हे सर्वसाधारणतः ह्या अर्थव्यवस्थेत काम म्हणून बघितले जात नाही.

परंतु प्लॅटफॉर्मच्या नजरेत हे सगळे मूल्यनिर्मितीचाच भाग असते. यातून एक मधल्या स्वरूपाचा धूसर पट्टा उगवतो, ज्याला आपण ग्रे झोन म्हणूया. इथे बिनपगारी श्रमवेळ पगारी श्रमाचे प्रवेशद्वार बनते. मार्क्सने शोषण मोजण्यासाठी S/V हे सूत्र दिले होते. इथे 'S' म्हणजे सरप्लस–मूल्य (किंवा नफा) आणि 'V' म्हणजे कामगाराला दिलेली पगारी वेळ म्हणजेच necessary labour time. साध्या भाषेत सांगायचे तर कामगाराने जेवढे काम स्वतःच्या जगण्यासाठी करायला हवे (V) त्यापेक्षा जेवढे जास्त काम तो भांडवलदारासाठी करतो ते 'S'. पण गिग अर्थव्यवस्थेत या चित्रात तिसरा घटक जोडला जातो, V′. हे आहे बिनपगारी पण आवश्यक श्रमवेळ (unpaid yet necessary labour-time). ऑर्डरची वाट पाहणे, ॲप स्क्रोल करणे; रेटिंग्स राखणे हा सगळा वेळ कामगारासाठी नॉन–वर्क आहे, पण प्लॅटफॉर्मच्या नजरेत तो उत्पादनक्षम ठरतो.

त्यामुळे आता शोषणाचे समीकरण S/V′ असे बदलते. कारण पगारी वेळ (V) कमी होत जाते आणि बिनपगारी वेळ (V′) वाढत जाते. त शून्याच्या जवळ गेली की शोषणाचा दर

अमर्याद (+∞) होतो असे म्हणता येईल. याचा अर्थ असा की प्लॅटफॉर्म व्यवस्था अशी आखलेली आहे की कामगाराच्या प्रत्येक क्षणातून तो पगारी असो वा नसो भांडवलासाठी मूल्य काढून घेतले जाते.

या अदृश्यीकरणाला अॅल्गोरिदमिक व्यवस्थापन प्राणवायू पुरवते. व्यवस्थापकाची कामे जसे, कामगारांची निवड, शेड्युलिंग, मूल्यमापन, बक्षीस-दंड, मोबदला यांचा मोठा भाग सॉफ्टवेअर अॅल्गोरिदमकडे सोपवला जातो. हे नेमके कसे घडते? दिसायला कामगार स्वतंत्र कंत्राटदार आहे. कधी लॉग-इन करायचे हे तो ठरवतो. पण कोणती ऑर्डर कोणाला द्यायची, किती वेळात, किती कामे नाकारता येऊ शकतात, शहराच्या कुठल्या जागेतील कामे घ्यायची या सगळ्याचे सूक्ष्म निर्णय अॅल्गोरिदम घेत असतो.

टेलरिझमची जुनी सूत्रे म्हणजेच कामाचे तुकडीकरण (division of labour, deskilling) आणि त्या विशिष्ट कामाविषयीचा कामगाराचा विचार (conception) व अंमलबजावणी (execution) यांची होणारी विभागणी डिजिटल वेगाने पुन्हा कार्यान्वित होते. कामगाराच्या कौशल्याची किंमत कमी करत त्यांच्याकडे सूचनांचे पालन करणारे मशीन म्हणून बघितले जाते. तर श्रमप्रक्रियेतला निर्णयाधिकार डेटावर चालणाऱ्या इंटरफेसकडे सरकतो. लवचिकता आणि स्वायत्तता यांची बाजारू भाषा इथे केवळ पांघरूण ठरते. कारण प्रत्यक्षात ही संपूर्ण नियंत्रणाची रचना असते.

या नियंत्रणाची एक महत्त्वाची अवकाशीय बाजू आहे. प्लॅटफॉर्म मुख्यतः कल्पित अवकाशावर (conceived space) अवलंबून असतो. म्हणजेच डेटावर उभ्या राहिलेल्या तांत्रिक वास्तवावर. त्या गणिती नकाशात मुसळधार पाऊस, वाहतूककोंडी, गेटेड सोसायटीतील क्लिष्ट सुरक्षाप्रक्रिया, ग्राहकांशी भावनिक संवाद हे 'जगलेले अवकाश' (lived space) दिसत नाही. यामुळे संस्थेच्या समजुतीत एक ज्ञान-अंतर (epistemological gap) तयार होते.

**कामगार म्हणजे ग्राहकाकडे सरकणारा बिंदू**

अॅपला फक्त टास्क यशस्वी/अयशस्वी अशी दुहेरी (binary) भाषाच फक्त कळते. काम का पूर्ण होऊ शकले नाही, त्या ठिकाणी प्रत्यक्ष काय घडले, हे अदृश्यच राहते.




अर्थव्यवस्थेतले अधांतरी...

याच वेळी कामगाराच्या शरीराचेसुद्धा डेटाचाच दुसरा भाग (data double) म्हणून रूपांतर होते. कामगार एक व्यक्ती म्हणून आपले अस्तित्व गमावतात. ते GPS वरील फक्त एक सतत ग्राहकाकडे सरकणारा बिंदू बनतात. म्हणजे देहधारित व्यक्तीऐवजी कामगार फक्त विखुरलेल्या डिजिटलीकृत चिन्हांचे संकलन बनून राहतात. या अपूर्ण, मात्र निर्णायक डेटावरूनच मोबदला, रेटिंग ही पुढची कामे ठरवली जातात.

सध्या घरकामगारांसाठीच्या मागणीसाठीसुद्धा अॅप आहेत. त्यातील अस्थैर्य (precarity) आणि स्त्रीकरण (feminisation of labour) या प्रक्रियांमुळे शोषण अधिक तीव्र होते. ऐतिहासिकदृष्ट्या स्त्रियांवर आणि वंचित समुदायांवर लादलेल्या स्वच्छता, काळजी आणि घराशी निगडित कामे प्लॅटफॉर्मवर क्षणात उपलब्ध (Just-In-Time), मागणीनुसार स्केलेबल सेवांमध्ये बदलतात. लवचिकतेच्या नावाखाली महिलांना कमाई आणि कुटुंब-जबाबदाऱ्या यांचा दुहेरी भार पेलावा लागतो. प्रत्यक्षातील अस्थैर्य मात्र कायम राहते.

एकाच गिगवर संसार चालत नसल्याने लोक दुसरी-तिसरी नोकरी करतात. नातेसंबंध व शेजारधर्माच्या जाळ्यांवर (social reproduction) जास्तीतजास्त अवलंबून राहतात. म्हणजेच श्रमशक्तीच्या पुनरुत्पादनाचा खर्च लोकांवर, त्यांच्या घरांवर, कामापलीकडच्या समाजावर ढकलला जातो. सेवाक्षेत्रात प्लॅटफॉर्म हा मालक-कामगार या जुन्या थेट नात्याऐवजी संपूर्ण बाजारव्यवस्थेचे नियम, रँकिंग-रेटिंग्स आणि त्याविरुद्ध अपील ना करता येण्यासाठीची प्रणाली व नियमावली उभारतात. यालाच रचनात्मक आधिपत्य

(structural domination) आपण म्हणू शकतो.

या शोषणात वर्क-ऑन-डिमांड (work on demand) आणि क्राउडवर्क (crowd work) या दोन्ही प्रकारांत बिनपगारी क्षणांमधूनही नफा कमावला जातो. डिलिव्हरीत वाट पाहणे, ऑर्डर्समधील प्रवास, ग्राहकांच्या तक्रारी हे सर्व ॲपच्या नियमांनी अनुत्पादक ठरते. मात्र नफानिर्मितीत उत्पादक असते. क्राउड वर्कमध्ये तासन्तास टास्क शोधणे; ग्राहकांना पटवणे, नमुने मोफत देणे; आपले ऑनलाइन प्रोफाइल तयार करणे ही सारी गुंतवणूक पुढे पगारी टास्क मिळवण्याची पूर्वअट बनते. स्पर्धा इतकी तीव्र असते की अनेक वेळा कामगार आपलीच किंमत कमी करतात व स्वतःच स्वतःचे कठोर शोषण (self-super-exploitation) करण्यासाठी व्यवस्थेद्वारे तयार केले जातात.

तरीही ॲल्गोरिदमिक दृष्टिक्षेपाची (algorithmic gaze) झेप एवढी नाही. कल्पित आणि जगलेल्या अवकाशातील दुभंगाचा फायदा घेत कामगार प्रतिकाराची लहान-मोठी तंत्रे वापरतो. डेटा धूसर करणे (data obfuscation), ॲपच्या सेटिंग्ज बदलून टास्क-फ्लोला आपल्या सोयीनुसार वळवणे; ठरावीक दिवशी सामूहिक लॉग-आऊट, संप आणि निदर्शने. काही वेळा ही तंत्रे वैयक्तिक हित जपतात पण इतर कामगारांवर उलट परिणाम करतात. तरीही सामूहिक पातळीवर हक्क, औपचारिक नाते, किमान वेतन आणि सामाजिक संरक्षणासाठी उभे राहणारे लढे हळूहळू आकार घेतात. कोविडसारख्या महामारी संकटांनी नियंत्रण आणि शोषण वाढल्याने वर्गजाणिवेची (class consciousness) ठिणगी अधिकच भडकते.

या सर्वाचे सार असे की, गिग अर्थव्यवस्था ही तंत्रज्ञानाची केवळ बाह्य चमक नसून बिनपगारी श्रम वेळेचे सूत्रबद्ध अधिग्रहण (labour subsumption), टेलरिझमचा डिजिटल पुनर्जन्म आणि असमान सामाजिक रचनांवर उभारलेली नियंत्रणव्यवस्था आहे. प्लॅटफॉर्मचे यश डेटा या नव्या कच्च्या मालावर, अदृश्य केलेल्या श्रमावर आणि नियमांच्या अशा जाळ्यावर अवलंबून असते, जिथे कामगार पूर्ण व्यक्ती म्हणून नव्हे, तर मोजमापयोग्य बिंदू म्हणूनच दिसतात.

### नव-वेठबिगारीला आमंत्रण

गिग इकॉनॉमी केवळ तंत्रज्ञानावर आधारलेली नाही, तर तिचा खरा पाया वित्तीयकरणाच्या (Financialisation) प्रक्रियेत आहे. प्लॅटफॉर्म कंपन्या टिकून राहण्यासाठी, वाढण्यासाठी आणि बाजारावर वर्चस्व मिळवण्यासाठी भांडवलशाहीच्या या नव्या यंत्रणांचा वापर करतात. वित्तीयकरणामुळे प्लॅटफॉर्मचे जगणे आणि हायपर ग्रोथ (hyper growth) पूर्णपणे VCवर अवलंबून असते. हे गुंतवणूकदार केवळ पैसा देत नाहीत, तर संरचनात्मक सत्ता (structural power) गाजवतात. कंपनीच्या बोर्डवर जागा, विशेष शेअरहोल्डर हक्क किंवा अटींच्या आधारे नियंत्रण ठेवतात. या नात्याला अनेक अभ्यासक access-for-control bargain म्हणतात. म्हणजेच भांडवलाला त्या देशात, तिच्या अर्थव्यवस्थेत व अर्थव्यवस्थेतील त्या क्षेत्रात प्रवेश मि ळवण्यासाठी कंपनीला आपला ताबा सोडावा लागतो.

गिग प्लॅटफॉर्मचे जगणे हे मुख्यतः व्हेंचर कॅपिटल (VC) सारख्या वित्तीय स्रोतांवर अवलंबून असते. कामगारांकडून नफा निघत नसतानाही या कंपन्या अब्जावधींची गुंतवणूक अशा प्लॅटफॉर्म्समध्ये करत असतात. यामुळे त्या सेवांचे दर कृत्रिमरित्या कमी ठेवतात. यालाच व्हेंचर प्रिडेशन (Venture Predation) म्हणतात. या प्रक्रियेत ग्राहक आणि कामगार दोघांनाही सुरुवातीला आकर्षित केले जाते.

या प्रक्रियेतून पुढे व्हेंचर प्रिडेशन आकार घेते. यामुळे सुरुवातीला ग्राहक आणि कामगार दोघेही आकृष्ट होतात; पण नंतर गुंतवणूकदार एक्झिट घेतल्यानंतर खर्च परत मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर दरवाढ, वेतनकपात, कामगारांवर नवीन शिस्तीची बंधने लादली जातात.

बऱ्याचदा प्रतिस्पर्धी प्लॅटफॉर्म्समध्ये एकच गुंतवणूकदार असतात. कुठले प्लॅटफॉर्म कामगारांचे अधिक शोषण करून नफा मिळवून देऊ शकते, म्हणून त्यांच्यात स्पर्धा लावली जाते. कुठलातरी एक प्लॅटफॉर्म टिकतो, बाकी मरतात आणि त टेकओव्हर करून पूर्ण मालकी मिळवतात. पण गुंतवणूकदारांनी मरणाला टेकलेल्या प्लॅटफॉर्म्समधून बाहेर पडल्यावर (exit) वेतनकपात, दरवाढ आणि कामगारांवरील नवी बंधने वाढतात.

या सर्व प्रक्रियेच्यापाठीमागे जास्तीच्या भांडवलाचा (surplus capital) संदर्भ आहे. २००८च्या आर्थिक संकटानंतर कमी व्याजदरांमुळे पारंपरिक गुंतवणुकींवरील परतावा घसरला. त्यामुळे गुंतवणूकदारांनी धोके पत्करून गिग





गिग अर्थव्यवस्थेचे धोकादायक थांबे...

प्लॅटफॉर्ममध्ये पैसा ओतला. म्हणजेच प्लॅटफॉर्म इकॉनॉमी हा काही भविष्याचा नवउदय वगैरे नाही, तर केवळ वित्तीय भांडवलाच्या जास्तीच्या ओघाचा एक मार्ग आहे.

या सर्व प्रक्रियेमुळे प्लॅटफॉर्म कंपन्यांचा व्यवसाय हा उत्पादनावर नव्हे, तर भांडवलाच्या ओघावर चालतो. म्हणजेच नोकरी किती टिकाऊ आहे; वेतन किती आहे यापेक्षा गुंतवणूकदारांचा पैसा आणि त्यांचा परतावा हा मूळ प्रश्न बनतो.

कामगारांनाही या वित्तीयकरण प्रक्रियेचा फटका बसतोच. अस्थिर आणि घसरत्या उत्पन्नामुळे त्यांना कर्ज, ॲप्समार्फत मिळणारे कॅश-ॲडव्हान्स, बाय नाऊ पे लेटर योजना यावर अवलंबून राहावे लागते. अनेक प्लॅटफॉर्म आता एम्बेडेड फायनान्स (embedded finance) देतात. अनेकदा प्लॅटफॉर्म स्वतः कामगारांना कर्जसेवा पुरवतात आणि त्यासाठी त्यांच्या कामगिरीवरील डेटा (ratings) वापरून व्याजदर ठरवतात. हे कर्ज सहजपणे कर्जफासात (debt trap) बदलते.

इतकेच नाही तर कामगार रोजच्या जगण्यात टिकून राहण्यासाठी आपली मालमत्ता, बचत, अगदी भविष्यातील श्रमही गहाण ठेवतात. भारतातील वस्त्रोद्योगात जसे कंप-ऑफ पद्धतीने कामगारांचे भावी तास अतिरिक्त कामासाठी गहाण ठेवले जातात, तशीच परिस्थिति प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्थेत तयार होत आहे. याला निओ-बॉण्डेज (Neo-bondage) नव-वेठबिगारी म्हणता येईल.

वित्तीयकरण केवळ पैशापुरते मर्यादित नाही. प्लॅटफॉर्म कंपन्या आपले नफे आणि भांडवल सुरक्षित ठेवण्यासाठी कायदेशीर कोडिंग करतात. यात Intellectual Property Rights, Terms of Service agreements आणि जागतिक करचुकवेगिरीसाठी केलेले उपकंपन्यांचे जाळे यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, उबरने जगभरात १३५ हून अधिक उपकंपन्या स्थापन करून कर कमी करण्याचे मार्ग शोधले.

एकूणच, वित्तीयकरणामुळे गिग इकॉनॉमी ही उत्पादनावर आधारित न राहता पैशाच्या प्रवाहावर आधारित अर्थव्यवस्था बनते. यात कंपन्या गुंतवणुकीच्या आधारावर जगतात, तर कामगार कर्जाच्या आधारावर. परिणामी, कामगारांच्या श्रम शक्तीवर दुहेरी दडपण येते. एकीकडे अस्थिर उत्पन्न आणि दुसरीकडे सतत वाढणारा कर्जफास.

**गिग अर्थव्यवस्थेतून नफाखोरीचे यंत्र कसे विकसित होते?**

डेटा हा आता नव्या प्रकारचा कच्चा माल झाला आहे. प्लॅटफॉर्म हे एक प्रकारचे नफाखोरीचे उत्खनन यंत्र (extractive apparatus) आहे, जे प्रचंड प्रमाणात डेटा गोळा करते आणि त्यावरून नवा नफा निर्माण करते. ॲल्गोरिदमला प्रशिक्षण देणे; कामगारांचे नियोजन करणे; सेवा-प्रक्रियांमध्ये सुधार करणे हे सर्व डेटा वापरूनच घडते. म्हणूनच प्लॅटफॉर्म सतत डेटा गोळा करण्याच्या विस्तारवादी प्रवृत्तीत असतात. स्मार्ट डिव्हाइसेस, IoT, होम असिस्टंट्स ह्यांचा वापर करून ते मानवी जीवनाच्या अधिकाधिक कोपऱ्यात शिरकाव करतात.

याशिवाय, कायदेशीर चौकटीतून प्लॅटफॉर्म आपली मक्तेदारी सुरक्षित करतात. Intellectual Property Rights

(IPRs), Terms of Service (ToS) अशा साधनांनी डेटा औपचारिक मालमत्तेत बदलणे कठीण असले तरी प्रत्यक्षात कामगार आणि ग्राहकांवर नियंत्रण ठेवता येते. या मार्गाने प्लॅटफॉर्म मक्तेदारी भाडे (monopoly rents) वसूल करतात.

याला पुढे अनेक प्रकारांमध्ये विभागले जाते.

१. क्लाऊड प्लॅटफॉर्म्स (Cloud Platforms) : AWS सारखे, जे आपली पायाभूत सुविधा भाड्याने देतात. ज्यातून आपलीच माहिती कुठेतरी स्टोर करण्यासाठी आपल्याचकडून पैसे घेतले जातात.

२. प्रॉडक्ट प्लॅटफॉर्म्स (Product Platforms) : स्पॉटिफाय, नेटफ्लिक्ससारखे जे वस्तूंचे रूपांतर सेवेत करून सबस्क्रिप्शन फी किंवा भाडे वसूल करतात. जसे घरकाम गारांसाठीचे असणारे प्लॅटफॉर्म्स कामगार व क्लायंट्स दोघांकडून फी घेतात.

३. भविष्यवेधी सवलती व पॅकेजेस : जाहिरातीतून मिळणारा नफा व महसूल अस्थिर असल्यामुळे अधिकाधिक प्लॅटफॉर्म्स थेट क्लायंट्सकडून पैसे घेणाऱ्या मॉडेलकडे वळतात. जसे स्विगी, झोमॅटो, उबर आपल्याला सदस्यत्व, सबस्क्रिप्शन प्रिमियम पॅकेज, गोल्ड मेंबरशिप अशा वलयांकित नावाखाली विकतात. असेच पॅकेज ते डेलिवरी रायडर्स आणि वाहनचालकांनाही विकतात आणि थेट नफा कमवतात.

**काय दिसते आणि काय करावे?**

यातून शेवटी हे स्पष्ट होते की प्लॅटफॉर्म कंपन्यांची नफाखोरी केवळ डेटावर अवलंबून नाही, तर त्या सेवेला भाड्याच्या स्वरूपात रूपांतरित करून ग्राहक आणि कामगार दोघांनाही अखंड भरणाऱ्या पेमेंटच्या चक्रात अडकवतात. या प्रक्रियेला भाडे-आधारित भांडवलशाही (rent-based capitalism) म्हणता येईल, जिथे थेट उत्पादनावरून नव्हे तर सततचे हक्क, मालकी आणि प्रवेश नियंत्रित करून नफा काढला जातो.

**वित्तीयकरणामुळे गिग इकॉनॉमी ही उत्पादनावर आधारित न राहता पैशाच्या प्रवाहावर आधारित अर्थव्यवस्था बनते. यात कंपन्या गुंतवणुकीच्या आधारावर जगतात, तर कामगार कर्जाच्या आधारावर. परिणामी, कामगारांच्या श्रमशक्तीवर दुहेरी दडपण येते. एकीकडे अस्थिर उत्पन्न आणि दुसरीकडे सतत वाढणारा कर्जफास...**

या व्यवस्थेत श्रमशक्तीचे अवमूल्यन, डेटाचे व्यापारीकरण आणि कर्जाधारित उपजीविका हे सर्व एकत्र येऊन कामगारांसाठी अस्थिरता वाढवतात. अशा रीतीने गिग अर्थव्यवस्था ही नव्या स्वरूपाची मक्तेदारी व्यवस्था बनते. ज्यात तंत्रज्ञान फक्त एक मुखवटा आहे आणि आत खोलवर भांडवलशाहीचे जुनेच तत्त्व म्हणजे सततचे शोषण नव्या साधनांनी राबवले जाते.

भौगोलिक जागेशी बांधलेले श्रम आज ॲल्गोरिदमिक नकाशांमध्ये, रेटिंग्समध्ये आणि भांडवलाच्या ओघात पुन्हा रेखाटले जात आहे. चार भिंतींच्या कारखान्यातून बाहेर पडलेले काम आता मोबाइलच्या स्क्रीनवर स्थलांतरित झालं आहे. पण श्रमाची बेडी तुटलेली नाही. ती फक्त डेटा, कॉंट्रॅक्ट आणि वित्तीयकरणाच्या सूक्ष्म धाग्यांनी विणलेली नवीन जाळी बनली आहे.

या जाळ्यात श्रमाचे अदृश्यीकरण, डिजिटल टेलरिझम आणि रचनात्मक आधिपत्य (structural domination) मिळून एक असे अनुशासन निर्माण करतात की कामगार व्यक्ती म्हणून नाही, तर डेटा-डबल (data double) किंवा मशीन म्हणूनच दिसू लागतात. वरकरणी स्वायत्ततेचा मुखवटा असला तरी आतून ही व्यवस्था रेंट-आधारित भांडवलशाहीकडे ढकलते.

याचा अर्थ असा की गिग व्यवस्था ही केवळ टेक प्लॅटफॉर्म नसून मूल्य, वेळ आणि अवकाशावर नियंत्रण ठेवणारी व्यापक राजकीय अर्थव्यवस्था आहे. बिनपगारी वेळ पगारी वेळेचे प्रवेशद्वार बनते. ॲल्गोरिदम कामाची विभागणी, वेग आणि शिस्त ठरवतो आणि वित्तीयकरण कामगाराला कर्ज, ॲडव्हान्स आणि सबस्क्रिप्शन अखंड चक्रात बांधून ठेवतो. घरकाम असो, डिलिव्हरी असो किंवा क्राउडवर्क सर्वत्र सामाजिक विषमता (लिंग/जात/वर्ग/स्थलांतर) ही नियंत्रणाची पोत वाढवते आणि अस्थैर्याला धक्का न लावता उलट तेच भांडवल संचयाचे इंधन बनवते.

म्हणूनच पुढची लढाई फक्त वेतनवाढीची नाही. ती वेळ, डेटा आणि अवकाश परत मिळवण्याची आहे. बिनपगारी श्रमवेळेची मान्यता, किमान हमी-उत्पन्न आणि सामाजिक संरक्षण, डेटा-अधिकार व ॲल्गोरिदमिक पारदर्शकता आणि औपचारिक रोजगार नात्याची मान्यता ही चार बुरुजे समांतर उभी राहिली, तरच हा खेळ थांबेल. याचबरोबर कामगारांची सामूहिक संघटना, प्लॅटफॉर्म-कोऑपरेटिव्हिझम, आणि शहरी पायाभूत सुविधांत कामगाराच्या जगलेल्या अवकाशाची (lived space) किमया ओळखणारी सार्वजनिक धोरणे, हे पर्याय आज केवळ आदर्श नाहीत, तर वास्तवात बदल घडवण्याची किमान अट आहेत.

शेवटी, प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही. कुणाच्या हक्कावर, कुणाच्या वेळेवर आणि कुणाच्या जीवनावर हे तंत्रज्ञान उभे आहे, याचा आहे. जर श्रमाचा सन्मान हा लोकशाहीचा कणा असेल, तर गिग अर्थव्यवस्थेत तो कणा परत सरळ करण्याची वेळ आली आहे. कामगाराला परत डेटा-बिंदू नव्हे, तर पूर्ण व्यक्ती म्हणून पाहण्याची गरज आहे. त्या नजरेत बदल झाला, की प्लॅटफॉर्महीसमाजासाठी काम करू शकतील. केवळ भांडवलासाठी नव्हे.

❋ ❋ ❋

**हितेश पोतदार हे किंग्स कॉलेज, लंडनमधील इंटरनॅशनल डेवलपमेंट आणि जियोग्राफी विभागात पीएच.डी. अभ्यासक आहेत. त्यांचे संशोधन मुख्यतः कामगार (श्रम), तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वित्त यांच्या अर्थराजकीय व्यवस्थेवर केंद्रित आहे. संपर्क : ९६५७७९९९८६**

**ईमेल :** hiteshdpotdar@gmail.com

## हलकं-फुलकं




एक माणूस गौतम बुद्धाकडे आला आणि म्हणाला, मला खूप क्रोध येतो. ते वाईट आहे हे मला कळतं. तुम्ही मला अशी काहीतरी साधना द्या, जी करू लागल्यावर मी हळूहळू, टप्प्याटप्प्याने, हलकेहलके क्रोधवृत्तीच्या बाहेर पडेन.

बुद्ध म्हणाले, तुझी स्थिती एखाद्या आग लागलेल्या घराच्या मालकासारखी झाली आहे. असा माणूस कोणाला हे विचारायला जाईल का, की आग लागलेल्या घरातून मी हळुहळू, टप्प्याटप्प्याने, हलकेहलके बाहेर कसा पडू? खरोखरचा चटका बसला की झटक्यात बाहेर पडशील. हळुहळू बाहेर पडण्याचा मार्ग नाही.


- मामुमियां


# ग्रंथ संसार... संसार



गणेश मनोहर कुलकर्णी







**लेखक–कवी–समीक्षक हा ग्रंथसंसारातला केवळ एक घटक. त्याला विचक्षण संपादक, खमका प्रकाशक तितकाच खमका विक्रेता आणि ग्रंथांवर जीव ओवाळून टाकण्यास तत्पर वाचक लाभत नाही, तोवर या संसाराचा गाडा सुखेनैव चालत नाही. या संसारात जो अडकतो, रमतो त्यांचा आनंद त्यालाच ठाऊक असतो. परिस्थिती कितीही प्रतिकूल असू दे, विपरीत असू दे हा संसार सुखाने चालावा, टिकून राहावा, असंच त्याला वाटत राहतं. त्यासाठी तो पुस्तकांच्या शोधात आपल्या आसपास, जवळच्या प्रांतात, देशोदेशी वणवण भटकतो; पुस्तकांची हेळसांड होऊ नये म्हणून धडपडतो; हवी ती पुस्तकं दिसली नाही की सैरभैर होतो; पुस्तकांवर लादलेलं पोरकेपण बघून प्रसंगी दिङ्मूही होतो. त्याचं वाटणं आणि प्रत्यक्ष वास्तव यात विसंगती दिसली की कमालीचा अस्वस्थ होतो. त्या अस्वस्थतेचा हा उद्गार...**

पुस्तकांचा सहवास आनंददायी असतो, हे कळायला बरीच वर्षं गेली. अरुण टिकेकरांच्या 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी' या पुस्तकात उल्लेख केलेल्या बरोडा, अहमदाबादमधली ठिकाणं नोकरीनिमित्ताने पालथी घालण्याची संधी मिळाली, पण पुस्तकं मात्र मिळाली नाहीत. गुजरातमध्ये तसाही निदान मला तरी महाराष्ट्रासारखा ग्रंथव्यवहार काही दृष्टीस पडला नाही. मी जेव्हा जेव्हा या ठिकाणी पुस्तकं शोधायला बाहेर पडलो, तेव्हा तेव्हा शालेय पुस्तकांच्या बाजारातच भिरभिरत राहिलो.

आपल्या उत्तर आयुष्यात श्री. बा. जोशी बरोड्यात त्यांच्या मेव्हण्याच्या निमित्ताने म्हणजे, माधव आचवलांमुळे येऊन राहिले. त्यांना संतती नव्हती. मग त्यांनी पुस्तकांवरच अपत्यासारखं प्रेम केलं. यावर कुणीतरी पेपरमध्ये बातमी दिली. त्यातला अपत्य नसल्याचा उल्लेख लेखात झाला म्हणून त्यांनी संपूर्ण बरोड्यातील साहित्यिकांशीच अबोला धरला, त्यातून ते आणखीनच एकटे पडत गेले. खरंतर कलकत्त्याला प्रचंड मोठं ग्रंथालय सांभाळण्याचा अनुभव, पुस्तकांचा प्रचंड व्यासंग हे असूनही बरोड्यात त्यांची म्हणावी तशी दखल घेतली गेली नाही. त्यांच्याकडे जुनी पेपरमधली कात्रणं, पुस्तकं असं बरंच काही आहे, हे कळलं होतं. ते वारले तेव्हा त्यांचा पत्ता शोधण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला, पण जराही फट सापडली नाही. आता त्या ग्रंथसंग्रहाचं काय झालं हे कुणालाच माहीती नाही.

**ग्रंथ हाच श्वास**

कुंवर नारायण सिंह नावाचे हिंदीतील मातब्बर कवी वयाच्या ८८व्या वर्षी इस्पितळात भरती होते. मेंदूच्या शस्त्रक्रियेमुळे त्यांना दिसणं बंद झालेलं आणि ऐकायलाही कमी येत होतं. त्यांना कवी-मित्र पंकज चतुर्वेदींनी विचारलं, ''तुम्ही कधी कसलं व्यसन केलं होतं का?'' ते म्हणाले, ''फक्त वाचनाचं.'' पंकजजी म्हणाले, ''मला पान, तंबाखू, दारू या संदर्भाने विचारायचं होतं.' कुंवरजी म्हणाले, ''प्रयत्न केला, पण मन काही त्यात रमलं नाही.'' पुढे असंही म्हणाले, ''एकदा रशियाहून आलेल्या एका महिलेला मी कुठलंच व्यसन करत नाही हे ऐकून आश्चर्य वाटलं, ती म्हणाली, 'मग तू जगतोस तरी कशाला?''' कुंवरजी म्हणतात, ''सिर्फ कविताके लिए!''

कविता जब आती है मैं उससे कहता हूँ
जब तुम नहीं थीं जीवन असह्य था।

पंकज चतुर्वेदींनी एकदा मंगलेश डबराल या मातब्बर हिंदीतील कवीला आपल्या भोपालच्या घरी बोलावलं होतं. भर दुपारच्या उन्हात कवी महाशय त्यांच्या घरी पोहोचले. त्यांना प्रचंड धाप लागलेली. पंकजजींनी त्यांचं स्वागत केलं. हाताला धरून आत बसवलं. म्हणाले, ''डॉक्टरांना बोलवायचं का?'' ते म्हणाले, ''नको, तुझ्याकडे पुस्तकांचं कपाट वगैरे आहे का?'' यांना काही कळेचना की हा प्रश्न कशाला विचारताहेत. त्यावर पंकजजी म्हणाले, ''हो, आहे ना.'' हे म्हणाले, ''मला तिथे घेऊन चल.'' मग पंकजजींनी पुस्तकांची कपाटं जिथे होती तिथे मंगलेश डबरालांना नेऊन बसवलं. त्यांनी चौफेर नजर फिरवली. आपण पुस्तकांच्या सान्निध्यात आहोत, याची खात्री पटताक्षणी त्यांचा श्वास हळूहळू स्थिर होऊ लागला. म्हणाले, ''बहोत देरसे किताबे देखी नहीं, तो कुछ खोया खोया लगने लगा था. ऐसे लगा कुछ छुट रहा है. अभी मुझे ठीक लगा रहा है.''

चिंचवडला एक मोठे शास्त्री होते. त्यांचा संस्कृतचा गाढा अभ्यास होता. कुठून कुठून त्यांनी या विषयावरचे ग्रंथ जमा केले. आयुष्यभर याच व्यापात राहिले. पोटाला खार लावली. कसलीही हौसमौज केली नाही. जुन्या काळातील माणसं अशीच ध्येयनिष्ठ वगैरे होती. घरातलेही यांना सहन करायचे. छोट्याशा घरात पुस्तके आणि त्यांचा संसार सुरू होता. यांना पॅरालिसिस झाला. मग त्यांनी मुलाला एका कॉटवर झोपवायला सांगितलं. ''समोर पुस्तकांची कपाटं दिसू देत'', म्हणाले. दिवसभर त्यांची नजर पुस्तकांवर भिरभिरत राहायची. एकेक पुस्तक कसं मिळवलं त्याची आठवण मनात जागी व्हायची. असं त्यांनी त्यांच्या अंतापर्यंत केलं.

पुस्तकातला माणूस पुस्तकातच विलीन होण्याची इच्छा धरून असतो. आमचीही वाटचाल याच दिशेनं सुरू आहे की काय, अशी शंका अधूनमधून मनात येत राहते. तरीही पुस्तकं घेणं, वाचणं, समजणं ही प्रक्रिया सातत्याने सुरूच असते. पुस्तकं वेगवेगळ्या दिशेंनी आपल्यापर्यंत येतच असतात.

मुंबईत फिरताना पुस्तकांचे ठरलेले अड्डे भटकंती करून शेवटच्या टप्प्यात आमच्या ओळखीचा पुस्तकविक्रेता महावीरजवळ जेव्हा बसतो, तेव्हा नव्याने काहीतरी जाणवत राहतं. तोही नेहमीच्या दिवसांप्रमाणे त्याच्याकडे नुकत्याच

आलेल्या नव्या-जुन्या पुस्तकांची छाननी करत बसलेला असतो. गेली कित्येक वर्षं तो आम्हाला आणि आम्ही त्यांना ओळखतो. आम्हाला काही हवं-नको, बघत असतो. एक दिवस तो म्हणत होता, ''करोडो रुपयांचा माल सध्या पडून आहे. तुमच्यासारखी वाचक माणसं आजकाल येतच नाहीत.''

खरंच आहे महावीरचं म्हणणं. मी भोवताली मोबाइलमध्ये अखंड डोकं खुपसून राहणाऱ्या लोकांना बघतो. एखादा कुणी पेपर किंवा मासिक विकत घेऊन वाचतोय, हे दृश्यच काही केल्या नजरेला पडत नाही. या अस्वस्थतेतून आमच्याच सोसायटीत एक कल्पना सुचवली. माझ्याकडे अनेक मासिकं येत असतात. ती वाचून झाल्यावर सोसायटीच्या खाली जिथे लोक बसतात, तिथे जर एखादं छोटंसं कपाट वगैरे बनवून घेतलं, तर मी काही मासिकं ठेवत जाईन; ज्यांना वाचायची असतील ती मंडळी वाचतील. कुणीच या कल्पनेत स्वारस्य दाखवायला तयार नाही. त्याऐवजी नव्याने एका महाराजांचा फोटो मात्र खाली सोसायटीच्या आवारात लावला गेलाय. माझा आक्षेप त्या फोटोला नाही, पण पुस्तकाबद्दलची अनास्था आणि त्या वृत्तीवर आहे.

अर्थात ही आजची नाही, नेहमीचीच परिस्थिती आहे. पेशवाईत जसे साडेतीन टक्केच शहाणे होते, असं म्हणतात तसे कुठल्याही काळात वाचकांची संख्या साडेतीन टक्क्याच्या आसपासच राहिलेली आहे. 'ग्रंथसखा'चे शाम जोशीदेखील नेहमी म्हणत असतात, ''आजकाल लोकांना वाचनाची, पुस्तकांची तहानच लागत नाही. हे फार भीषण आहे. रामचंद्र गुहांनी याबाबत एक मौलिक निरीक्षण मांडलं आहे. आता एक झालंय, पुस्तकांची विक्री अगोदरपेक्षा खूपच अधिक वाढली आहे, पण ती वाचण्यासाठी न घेता घर सजवण्यासाठीच जास्त करून वापरली जातात. सोलापूरचे विचक्षण वाचक, ध्येयवादी संपादक आणि समीक्षक अशी ख्याती असलेले नीतिन वैद्य सांगत होते, ''वाचनाने तुमच्यात बदल घडत नसेल तर वाचन व्यर्थ आहे.'' माहिती, ज्ञान, साहित्याचा आनंद वगैरे किरकोळ तदनुषंगिक बाबी आहेत वाचनातल्या. माणूसपणाकडे रेसभर सरकणे हेच गंतव्य. पुस्तकांची विल्हेवाट आपल्यामागे कशी असेल, हा छळणारा प्रश्न आहे, पण तोही आपल्यात पुस्तकांबद्दल वस्तू म्हणून असलेला पझेसिव्हनेस जागा आहे याची खूण म्हणावी. मुळात आपल्यामागे काय याचा विचारच नको.



जुन्या पुस्तकांची, रद्दीची दुकानं ग्रंथपारखींसाठी खाण ठरते.

मला याबाबत लेखक आणि 'अक्षरनामा'चे संपादक राम जगताप यांनी मांडलेला विचार योग्य वाटतो. शेवटाला एका वळणावर आपला संग्रह रद्दीत द्यावा, असे त्यांनी सुचवले होते. त्यातूनच तो योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचण्याची शक्यता निर्माण होते. 'मौजे'च्या राम पटवर्धनांनीदेखील पुस्तकं रद्दीत टाकल्यानेच योग्य माणसाजवळ पोहोचण्याची शक्यता असते हे अधोरेखित केले होते.

कर्जतजवळ जोशी नावाचे ग्रंथसंग्राहक होते. अमाप ग्रंथ आयुष्यभर गोळा केले आणि मग उत्तर आयुष्यात त्यांची सोय कशी लावायची याच संभ्रमात राहिले. मग त्यांनी वाईच्या पाठशाळेत विचारले. विनोबांच्या आश्रमाला विचारले. अनेक जणांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. कुणीही संग्रह घ्यायला तयार होईना. हे तिरीमिरीला आले आणि आपल्या शास्त्रात सांगितलं आहे, ना की देवत्व प्राप्त झालेल्या वस्तू वाहत्या पाण्यात विसर्जित कराव्यात. अगदी त्याच श्रद्धेने यांनी आपले सगळे ग्रंथ नदीत विसर्जन करून टाकले.

या पार्श्वभूमीवर न. र. फाटकांचा किस्सा खूपच बोलका आहे. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे चरित्र लिहिण्यासाठी रमाबाईंनी अनेकांना विचारलं. सगळीकडून नकार आल्यावर बाईंनी तरुण वयाच्या न. र. फाटकांना विनंती केली. म्हणजे अगदी गळच घातली. रमाबाई पण थकलेल्या. त्यांच्यासमोर आपल्या पतीचं चरित्र प्रकाशित व्हावं, ही त्यांची माफक अपेक्षा होती. न. र. फाटकांनी झोकून देऊन कामाला सुरुवात केली. उपलब्ध कागदपत्रांची उजळणी करताना त्यांच्या लक्षात आलं, न्यायमूर्तींचे काही संस्थानिकांबरोबरही जिव्हाळ्याचे संबंध होते. कुठल्या तरी कार्यासाठी या संस्थानिकांनीही मदत केली असावी. म्हणून ते त्यातल्या त्यात जवळच्या संस्थानिकांना विनंती करू लागले, ''न्यायमूर्तींच्या संदर्भात दप्तरात काही कागदपत्रे असतील तर मला अभ्यासायला द्या.'' पण त्यांनी बिलकूलच दाद लागू दिली नाही. खूप विनंती करूनही त्यांनी काहीच दिलं नाही. तेव्हा चिडून हे त्या संस्थानिकांना म्हणाले, ''तुम्ही मेल्यावर तुमची विधवा जेव्हा हे सगळं रद्दीत टाकेल ना तेव्हा मीच ते शोधून हस्तगत करेन.'' अखेरीस रमाबाई अगदी अंथरुणावर असताना त्यांना चरित्राची प्रुफं दाखविल्याचं समाधान फाटकांना लाभलं. न. र. फाटकांनी या पुस्तकापासून चरित्रलेखनाचा एक वेगळाच मापदंड मराठी साहित्यात दृढ केला.

एरवी पुस्तक लिहिणारे लेखक आणि रद्दीवाले यांचं एक जिव्हाळ्याचं नातं असतं. विद्याधर गोखलेंचा नेहमीचा रद्दीवाला त्यांच्यासाठी लागणारी दुर्मीळ पुस्तकं आठवणीने बाजूला काढून ठेवायचा. एकदा त्यांना थांबवून म्हणाला, ''एक सांगू का?'' गोखले ''बोला'' म्हणाले. तो म्हणाला, ''कधी कधी तुमचीही पुस्तकं माझ्याकडे रद्दीत येतात.'' दिलदार मनाचे गोखले म्हणाले, ''अरे, तीही मला देत जा की! काहीच हरकत नाही.''

दिल की बात लबों पर ला कर अब तक हम दुख सहते हैं
हम ने सुना था इस बस्ती में दिलवाले भी रहते हैं...

याचा प्रत्यय अशी माणसं देऊन जातात.

प्रत्येक वाचकाचे स्वतःचे रद्दीवाले बांधलेले असतात. रद्दीत पुस्तकं विकणारे भलेही साहित्याचे जाणकार वाचक नसतील. पण त्यांच्याकडे अनुभवाने आलेलं ज्ञान अफाट असतं. कुणासमोर कुठलं पुस्तक पुढे करायचं; कुणा लेखकाचा दुसरा आवडता लेखक कोण; नियतकालिकांची किंमत असलेला वाचक कोण; कोणत्या नियतकालिकाचं मूल्य मोठं हे सारं यांना ठाऊक असतं. त्यामुळे वर्षानुवर्षं लेखक-वाचक बांधलेले राहतात. त्या बांधलेल्या लेखक-वाचकाला जे पाहिजे, ते आकाशपाताळ एक करून आणून देण्याची विलक्षण किमया ते साधतात. र. धों. कर्वेंच्या 'समाजस्वास्थ्य'चे अंक वरची पानं फाडून विक्रीला ठेवण्याची आयडिया यांचीच. त्यात लैंगिक विषयावर गंभीरपणे लिहिलेले लेख असायचे. पुस्तकाच्या मुखपृष्ठावरून कुणी यलो बुक वाल्याने ते नेऊ नये, हीच त्यांची अपेक्षा असायची.

**ग्रंथांचे भागधेय**

आपल्यासारख्या पुस्तकं जपणाऱ्या बहुतेकांना दालन वगैरे करून आपला ग्रंथसंग्रह एखाद्या विद्यापीठाने वा अगदीच न जमले तर एखाद्या लायब्ररीने सांभाळावा असे वाटते. पण त्याची हालत क्वचितच प्रदर्शनात मांडल्यासारखी - बहुतेकदा तेवढेही होत नाही - होते. कुणीही ती पुस्तकं शोधायला वगैरे जात नाही.

सोलापूरचे प्रसिद्ध लेखक त्र्यं. वि. सरदेशमुखांनी त्यांच्या संग्रहातली अगदी काहीच - जी शेवटापर्यंत जवळ असावीत असे वाटते अशी - पुस्तके वगळून बहुतांश पुस्तकं सोलापूरच्या एका दैनिकाच्या लायब्ररीत दिली. संदर्भासाठी लागलंच एखादं तर त्यासाठी यादी वगैरे करून. संपादक सरदेशमुखांचे स्नेही, मुख्य म्हणजे साहित्यप्रेमी होते. समारंभही केला त्यांनी छान. पण पुढे ते बदलून गेले. आता कशाचाही आढळ होत नाही, एवढेच नव्हे तर असे घडले होते हेही कुणाला तिथे माहीत नाही. सरांची बहुतेक पुस्तकं समास-टिपणांनी भरलेली, काहींना तर शेवटी एक-दोन कोरी पानं जोडून टिपणे लिहून ठेवलेली, अशी होती. या अशा प्रसंगांतून भावनिकदृष्ट्या सुटे होता आले पाहिजे वेळेवर, हा धडा मनावर कोरला जातो. एवढे तरी पुस्तकांनी आपल्याला शिकविलेले असतेच.

संशोधनपर लेखनात रमलेले रामचंद्र गुहा बंगलोरच्या प्रिमियर बुक शॉपचे टी. एस. शानबागांबद्दल बोलताना थकत नाहीत. म्हणतात, ''ते स्वभावाने मितभाषी असल्याने इतकं अचूक आणि नेमकं बोलतात की समोरच्याला चटकन जाणवतं की या माणसाला प्रचंड ज्ञान आहे.'' रामचंद्र गुहा आपली या दुकानातील एक हळवी आठवण नोंदवतात.

त्यांची मैत्रीण आणि ते पुढच्या शिक्षणासाठी एकमेकांपासून दूर जाताना (नंतर त्यांचे लग्न झाले.) या दुकानात शिरले. मैत्रिणीने त्यांच्यासाठी इसाया बर्लिनने लिहिलेल्या मार्क्सच्या चरित्राची निवड केली आणि त्यांच्या हातात देताना त्यांच्या गालाचं हलकंसं चुंबन घेतलं. जे आजच्या काळाच्या हिशेबात कोणाच्या खिजगणतीतही नसेल, पण शानबागांच्या नजरेतून ते काही सुटलं नाही. यामुळे मैत्रीण एवढी लाजली की विचारता सोय नाही. तेव्हापासून दोघंही अगदी ठरवून वेगवेगळ्या वेळी दुकानात जायचे. गिरीश कार्नाड, अनंतमूर्ती या दुकानातूनच पुस्तकं विकत घ्यायचे. कार्नाडांची पत्नी म्हणायची म्हणे, ''आमच्या घराला शानबागांच्या दुकानाची कळा आलेली आहे. कारण घरभर सोडा, खिडक्यांच्या कोपऱ्यात आणि जिन्यातही नुसती पुस्तकंच पसरलेली असतात.''

अर्थात, बेंगलोरचे प्रिमियर बुक शॉप नव्वदीच्या दशकातच बंद झाले आहे. याबाबत हळहळ व्यक्त करताना रामचंद्र गुहा म्हणतात, ''जोपर्यंत टी. एस. शानबाग पुस्तकाच्या दुकानात सक्रिय होते, तोपर्यंत बेंगलोरमधला कुठल्याही सामान्य माणसाला जॉन स्टाइनबेक, इवान तुर्गनेव, इवेलिन वारा तसेच आर. के. नारायण, शिवराम कारंथ यांसारख्या भारतीय लेखकांची माहिती नसणं अशक्यच होतं. गुहांच्या मते, संपूर्ण भारतात प्रिमियम बुक शॉपबरोबर स्पर्धा करणारे एकमेव दुकान म्हणजे लखनऊच्या हजरत गंजमधील राम अडवाणी बुक सेलर्स. हे राम अडवाणी फाळणीच्या काळात लखनौमध्ये स्थिर झाले. यांना गोल्फ आणि पश्चिमेतील शास्त्रीय संगीतात रस होता. त्यांच्या दुकानात मोत्सर्टची सिंफनी ऐकत पुस्तकाच्या खरेदीचा आनंद घेता यायचा. परंतु, लखनौचं राम अडवाणी बुक सेलर्स हे शानदार दुकानही २०१६ साली राम अडवाणींच्या मृत्यूनंतर कायमचंच बंद झालं आहे.

आधी उल्लेखलेले टी. एस. शानबाग म्हणजे आपल्या स्ट्रँड बुक स्टॉलच्या पद्मश्री टी. एन शानबागांचे पुतणे. मला एकदा अरुण टिकेकरांबरोबर स्ट्रँड बुक स्टॉलला जाण्याची संधी मिळाली होती. शानबागांचं ते सरांसाठी आत्मीयतेने स्वागत करणं बघून मी दंगच झालो होतो. सरांच्या आवडीची पुस्तकं समोर पसरण्यात आली, तेव्हा सरांचं पुस्तक चाळणंही इतकं हळुवार असायचं की ते बघायलाही गंमत यायची. ही जुनी दुकानं कधीच काळाच्या आड निघून गेली आहेत.

**प्रत्येक वाचकाचे स्वतःचे रद्दीवाले बांधलेले असतात. रद्दीत पुस्तकं विकणारे भलेही साहित्याचे जाणकार वाचक नसतील. पण त्यांच्याकडे अनुभवाने आलेलं ज्ञान अफाट असतं. कुणासमोर कुठलं पुस्तक पुढे करायचं; कुणा लेखकाचा दुसरा आवडता लेखक कोण; नियतकालिकांची किंमत असलेला वाचक कोण; कोणत्या नियतकालिकाचं मूल्य मोठं हे सारं यांना ठाऊक असतं.**


आता मुंबईत किताबखानासारखं दुसरं निव्वळ पुस्तकांचं स्वागतोत्सुक दुकानच नाही.

**ग्रंथ संसाराचे सांभाळकर्ते**

बंगालचे भद्रलोक आपल्यापेक्षाही अधिक चांगले वाचक असतात. असं म्हणतात की बंगाली लोक बाजारात गेले की येताना मच्छीबरोबर एखादं पुस्तक नक्कीच घेऊन येतात. बंगालीतले प्रसिद्ध लेखक सुनील गंगोपाध्याय यांचं 'अधुरा सफर' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक रामशंकर द्विवेदी यांनी हिंदीत अनुवादित केलं आहे. बंगालीतल्या या प्रसिद्ध लेखकाच्या आत्मचरित्राच्या अनुवादाच्या निमित्ताने रामशंकर त्यांना भेटायला निघाले होते. ज्या भागात ते गेले, तिथले अनेक बंगले सारखेच दिसत होते. म्हणून त्यांनी सकाळीच बाजार आटोपून घरी परतणाऱ्या एका गृहस्थांना विचारले, ''सुनील गंगोपाध्याय कुठे राहतात, ते तुम्ही मला सांगू शकाल का?'' त्या गृहस्थांनी थांबून अत्यंत जिव्हाळ्याने पत्ता समजावून दिला. रामशंकरना राहवलं नाही. ते त्या गृहस्थांना म्हणाले, ''तुम्ही त्यांना ओळखता का?'' ते म्हणाले, ''मी काही प्रत्यक्ष ओळखत नाही, पण माझ्या भाषेत लिहिणाऱ्या लेखकांची मला माहिती असायलाच हवी ना?'' ही मार्मिकता, भाषेबाबतची आस्था थोरच म्हणायची.

याच कलकत्त्यात जागतिक पातळीवरील रूपा पब्लिकेशनचा पसारा उमललेला आहे. डी. मेहरा हे गृहस्थ सुरुवातीला होजिअरी विकण्याचा व्यवसाय करायचे. एका इंग्रजी माणसाने म्हणजे के. जॅक्सन मार्शल या इंग्रजाने यांचं विक्री कसब बघून हॉटेलवर भेटायला बोलावलं. हा के.






बंगळुरू आणि कॉलेज स्ट्रीट कोलकाता... पसारा नव्हे, पिसारा पुस्तकांचा!

मार्शल स्कॉटिश पुस्तकांचा भारतातला विक्री प्रतिनिधी होता. यांनी मेहरांना पुस्तक विकण्याचा प्रस्ताव दिला. तोपर्यंत डी. मेहरांना पुस्तके अशी विकली जातात, याबद्दल जराही कल्पना नव्हती. तो ब्रिटिश काळ होता. भारतीयांना उच्चभ्रू हॉटेलात सहज प्रवेश नव्हता. मात्र स्वतः मार्शल मेहरांना खालपर्यंत घ्यायला आला होता. के. मार्शल यांनी स्वतः १७ ऑगस्ट १९३६ रोजी 'The Collins English Gem Dictionary', 'Chambers Dictionary' and 'Pears Encyclopaedia' ही तीन पुस्तकं डी. मेहरा यांना विक्रीसाठी दिली. पुस्तकं विकली गेल्यानंतरच पैसे द्यायचे होते. घरच्यांनी या प्रस्तावाला बराच विरोध केला. त्यांच्या मते, होजिअरीचा स्थिरस्थावर झालेला धंदा सोडून इतर धंदा करण्याची गरजच काय वगैरे? पण आई मात्र ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी राहिली. दुसऱ्या दिवशी आईला नमस्कार करून निघताना आई सहज म्हणून गेली, ''जर तुझं पहिलं गिऱ्हाईक मुसलमान असेल, तर तुझ्या धंद्याला तो मिळालेला शुभशकुन समज. तू या व्यवसायात मोठ्ठं नाव कमावशील.'' पुस्तकं कॉलेज स्ट्रीटवर विकली जाणार होती. त्यांनी कलकत्त्यातील प्रेसिडेन्सी कॉलेजच्या समोरच्या रस्त्यावरच कडेला एक स्वच्छ धोतर पसरलं. त्यावर ही तीन पुस्तकं ठेवून आपल्या गिऱ्हाइकाची वाट बघायला लागले. दुपारी एक गृहस्थ हातात पाइप वगैरे शिलगावत ही पुस्तकं चाळायला लागले. त्यांनी 'The Collins English Gem Dictionary' उचलली आणि चेकने पैसे द्यायला लागले. मेहरांनी तोपर्यंत कधी चेकचा व्यवहार केलाच नव्हता. ते म्हणाले, ''मला रोकडच हवी.'' त्या सभ्य गृहस्थाने यांचा नवखेपणा ओळखला. म्हणाले, ''मी संध्याकाळपर्यंत कॅश घेऊन नक्की येतो, पण तोपर्यंत तू कुणालाही हे पुस्तक देऊ नकोस.'' थोड्या वेळाने ते रोख रक्कम घेऊन आले आणि पुस्तक घेऊन निघताना स्वतःची ओळख करून देत म्हणाले, 'मी प्रोफेसर हुमायून कबीर.'' हे प्रोफेसर नंतर जवाहरलाल नेहरूंच्या मंत्रिमंडळात शिक्षणमंत्री होते आणि यांचा पुतण्या अल्तमास कबीर म्हणजे भारताचे चिफ जस्टिस ऑफ इंडिया. या प्रोफेसरांची डी. मेहरांबरोबर अशी तार जुळली की त्यांच्या मृत्यू पर्यंत (१९६९) ते यांच्याच दुकानातून पुस्तकं घेत राहिले. या पुस्तकविक्रीनंतर मेहरांनी मागे वळून बघितलंच नाही आणि स्वतःचं रूपा पब्लिकेशन सुरू केलं.

या ग्रंथपसाऱ्यात म्हणा वा संसारात म्हणा, दर्जा टिकवणारं भारतातलं अग्रगण्य प्रकाशन म्हणजे OUP-Oxford University Press. रवी दयाल नावाचा हुशार माणूस याच्या संपादकपदावर बसला. त्यांनी सुरुवातीला अनेक स्क्रिप्ट्स नाकारली. कुणी विचारायला आलं तर तसा मौलिक सल्लाही दिला. हे रवी दयाल दिल्लीतील लोधी गार्डनपासून अगदी हाकेच्या अंतरावर राहायचे. एकदा एका पत्रकाराने त्यांना विचारलं, ''तुम्ही तुमच्या अंगणातच का फिरताय? लोधी गार्डन जवळच आहे. तिथे का जात नाही?'' ते नम्रपणे म्हणाले, ''मी तिथे न जाण्याचं कारण एवढंच आहे की मी नाकारलेल्या अनेक संहिता! या संहितांचे लेखक रोजच त्या बागेत येत असतात आणि त्यांच्याबरोबर तू तू-मैं मैं करण्याची माझी आजिबात इच्छा नाही.''

एकदा एक कलकत्ताचे नामचीन गृहस्थ वाराणसीला

गेले. तिथलं दर्शन करून ते गंगेच्या घाटावर फिरायला गेले. अचानक पाय घसरला. ते पाण्यात बुडू लागले. एका तरुण मुलाने जीवाची पर्वा न करता त्यांना वाचवले. वाचवलेले गृहस्थ कलकत्त्याला एका इन हाऊसमध्ये संपादक म्हणून काम करत होते. त्यांनी आपलं कार्ड मुलाच्या हातात ठेवलं. म्हणाले, ''काही लागलं तर ये कलकत्त्याला.'' वाचवणारा तरुण मनातून खूश झाला होता. कारण तो स्वतः कवी होता. दोनेक महिन्यांनी तो पोहोचला कलकत्त्याला त्यांच्या ऑफिसमध्ये. ओळख वगैरे करून दिल्यावर संपादकाने सगळ्या स्टाफसमोर त्याची महती गायली. म्हणाले, ''याने वाचवलं नसतं तर मी आज जिवंतच राहिलो नसतो.'' कवी पण खूश. बोलता बोलता कवीने यांच्याकडे कवितेचं बाड सोपवलं. संपादक म्हणाले, ''सगळं ठेवून जा, बघतो आणि उद्या कळवतो.'' कवीमहाशय रात्रभर जागे राहिले. सकाळी सकाळी वेळेअगोदरच संपादकांच्या खोलीत हजर. संपादक अगदी निर्विकारपणे म्हणाले, ''अरे वाटलं तर मला परत नेऊन गंगेत बुडव, चालेल. पण तुझ्या कविता काही आम्ही छापू शकत नाही.''

भारतात पुस्तकांचा संसार अशा अनेक खमक्या संपादकांमुळे आणि विचक्षण विक्रेते नि वाचकांमुळेच टिकून आहे हे खरंच. कधीकाळी दिल्लीतील दरियागंज परिसरात पुस्तकांचा संसार मांडलेली अशीच दुकानं होती. दिल्ली महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने ही सगळी दुकानं जेव्हा तोडण्याचं ठरवलं, तेव्हा खुशवंत सिंगांसारखा उमदा माणूस या दुकानदारांच्या बाजूने उभा राहिला आणि स्वत:चं वजन वापरून ही दुकानं वाचवली. अलीकडेच दोन महिन्यांपूर्वी तिथे जाण्याचा योग आला, अर्थात पुस्तकांसाठीच, तर यातली अनेक दुकानं शालेय पुस्तकंच विकताना दिसली. ते पाहून हिंदीतील प्रसिद्ध लेखक यशपाल यांच्या 'दुख का अधिकार' या कथेतलं एक वाक्य आठवलं. त्यात ते म्हणतात, ''कि कहन में दुःख का बखान बड़ा दूभर है!'' म्हणजे पुस्तकांच्या दुनियेतला साहित्याचा वजा होत चाललेला संसार पाहून दुःख व्यक्त करणंही आताशा खूप कठीण होऊ लागलं आहे.

❋ ❋ ❋

**गणेश मनोहर कुलकर्णी प्रसिद्ध ललितलेखक, कला आस्वादक आहेत. त्यांच्या 'रूळानुबंध' या लेख संग्रहाला अलीकडेच राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे.**

**संपर्क** : ९८१९९५७८५२

## हलकं-फुलकं



गुंडोपंतांच्या खिडकीवर एक अनोळखी पक्षी येऊन बसला. फारच वेगळा पक्षी होता. लांब चोच होती, लांब पाय होते, डोक्यावर डौलदार तुरा होता. झुबकेदार शेपूट होतं. मोठमोठे पंख होते. तो सुरेल ताना घेत होता. गुंडोपंतांनी आयुष्यात फक्त कबूतर पाहिलेलं होतं. त्यांच्या नजरेला हा पक्षी रूचला नाही, तो किती बेढब आणि असुंदर आहे, असं वाटलं त्यांना. त्यांच्या मनात अपार करुणा दाटून आली.

त्यांनी त्याला पकडून प्रेमाने कवेत घेतलं आणि त्याचा तुरा, शेपूट छाटून टाकली. चोच लहान केली. पाय कापून मापात आणले, पंख कातरून लहान केले. थोडा रंग आणून पंखांना लावला आणि जमिनीवर त्याला ठेवत म्हणाले, हं, आता कसा छान कबुतरांत आलास! तुटक्या पायांवर उभ्या न राहू शकणाऱ्या, कातरलेल्या पंखांनी उडण्याची क्षमता गमावलेल्या, करुण चीत्कारणाऱ्या त्या पक्ष्याला गुंडोपंत शिकवू लागले, हं, बोल आता, गुटर्र घूं, गुटर्र घूं.

- मामुमियां

# गाझाच्या कविता

संवादोत्सव २०२५



**भावानुवाद :** लक्ष्मी यादव

## प्रश्नचिन्ह

जमिनीच्या त्या तुकड्यावर
जिथं फुलपाखरंसुद्धा
लहान मुलांपेक्षा जास्त जगतात
मी तुझ्यासाठी
नेमकी कसली कविता लिहू?

**– अहमद आरीफ**

## गाझामधील बदमाश मुलांनो!

गाझामधील बदमाश मुलांनो,
तुम्ही जे नेहमी माझ्या खिडकीच्या खाली येऊन
तुमच्या किंचाळण्याने मला त्रास देत होता
तुमच्या घाई गडबड गोंधळानं
रोजच्या सकाळची सुरुवात होत होती
तुम्ही माझी फुलदाणी तोडली
आणि माझ्या बाल्कनीमधलं एकुलतं एक फूल चोरून नेलं
परतून या
तुम्हाला जेवढ्या जोरात ओरडायचं आहे, तेवढं ओरडा
माझ्या सगळ्या फुलदाण्या तोडा
माझी सगळी फुलं चोरून न्या
परतून या
तुम्ही फक्त परतून या!

**– खालिद जुमा**

## तीन कविता

**१. भाकरीला नाव आहे**

भाकरीला नाव आहे–
आणि ती टेबलावर पोहोचली,
ती रक्ताने भिजलेली आहे.
आमच्या डोक्यावर छत नाही–
फक्त नायलॉनचा फडफडणारा श्वास,
जिथे वारा दुःख लिहितो तरंगांमध्ये.

आई गरम पाणी ढवळते,
स्मृती आणि धूळ यांनी चव घातलेलं.
भांडं रिकामं आहे,
पण ती मुलांना सांगते,
‘थांबा’ते जवळजवळ तयार आहे–

एक मुलगा तंबूच्या भिंतीवर
सफरचंद काढतो,
त्यापैकी एक त्याच्या बहिणीला देतो,
जी आकाश कोसळल्यापासून बोलली नाही.

जगाला सांगा–
आम्ही उपाशी नाही आहोत,
आम्हाला उपाशी ठेवलं जात आहे.

**२. जर मला नाहीसे व्हावे लागले**

जर मला नाहीसे व्हावे लागले–
ते शांततेत नसावे,
ढिगाऱ्याखाली नसावे,
पडद्यावरच्या आकड्यांमागे
जे चमचमतात आणि नष्ट होतात.

मी एक नाव व्हावे
एक आवाज
एक मुलाच्या प्रार्थनेत अडकलेला श्वास
विद्रोहाची अंगाई
रिकाम्या ताटांवर गुणगुणलेली
तुटलेल्या आकाशाखाली.

जर मला नाहीसे व्हावे लागले,

माझी कथा अनवाणी चालावी
रस्त्यांवरून जे आठवतात
थायमचा सुगंध
आणि हास्याचा आवाज
सायरनने भल्या पहाटेपर्यंत.

माझे हात, धरून थकलेले,
सांगावेत कसे मी स्वप्ने सांभाळली
जरी जमीन फुलायला विसरली–
कसे मी माझ्या मुलाला आकांक्षेने भरवले
जेव्हा जगाने आम्हाला काहीच दिले नाही.

जर मला नाहीसे व्हावे लागले,
ती एक ठिणगी असावी
एखाद्या अनोळखी मनात
जी विसरण्यास नकार देते
जी माझी आठवण
पतंगात
कवितेत
आक्रोशात बदलते
जी प्रत्येक सीमेवर भटकते
मला मिटवण्यासाठी उभारलेल्या.
ते म्हणोत–
ती नाहीशी झाली नाही.
ती बनली
एक कथा
एक सत्य
एक मशाल.

### ३ . ऑक्टोबर माझ्यासमोर उभा आहे

ऑक्टोबर माझ्यासमोर उभा आहे,
मी आनंद व्यक्त करावा का,
कारण राष्ट्रांनी माझे नाव उच्चारले,
माझ्या मातृभूमीला त्यांच्या नकाशांवर स्थान मिळाले?

मी थरथरावे का,
कारण ऑक्टोबरला त्याच्या जखमा आठवतात,
त्याचे आकाश अग्नीने जखडलेले,
त्याची पृथ्वी दुःखाने चिन्हांकित?

आशा आणि भय यांच्यामध्ये
मी उभा आहे,
एक कवी फाटलेला,
विचारतो:
ऑक्टोबर हे पहाटेचे वचन आहे,
की युद्धाच्या परतण्याचा प्रतिध्वनी?

❋ ❋ ❋

## गाझात राहणाऱ्या मुली

गाझात राहणाऱ्या मुली
काय करत असतील पाळी आल्यावर
कसं थांबवत असतील
भळभळणाऱ्या रक्ताला सिमेंटच्या ढिगाऱ्यात
कापडाचा एक एक तुकडा शोधत असतील का

कसं वाचवत असतील त्या नराधमांपासून
योनी आणि स्तनांना
की अन्नपाण्याच्या बदल्यात
तेही ओरबाडू देत असतील

आईची कुशी आणि बापाचा मायेचा हात आठवून
उसासे टाकणाऱ्या लेकरांना कोण सावरत असेल
पडत असतील का स्वप्नं या मुलांना
पोटभर जेवल्याची
मेलेली आई परत आल्याची



भीतीनं गारठून झोपेतच आई बापांना
बिलगत असतील का मुलं
कुठं भटकत असतील लेकरं
आई बाप मारलेली

एवढ्याशा बाळांवर बाँब पडत असताना
फुटत नसेल का पान्हा
अंगावरल्या मळाचं लेकरू बनवलेल्या पार्वतीला
कृष्णाला जोजवणाऱ्या यशोदेला
वासुदेव आपल्या परडीत का वाचवत नाही लहानग्या पिलांना
येशू कधी येणार आहे
सांगेल का कुणी
अल्लाह कधी रक्षा करणार
बोलेल का कुणी
जगाचा तारणहार राम
आपल्या लेकरांना मरताना पाहून
का अवतार घेत नाही

जगाचा निर्माता कुठं आहे?

याची उत्तरं कुणी का देत नाही?

❋ ❋ ❋

**(लक्ष्मी यादव यांची स्वतंत्र कविता)**



**भावानुवाद :** भरत यादव

## युद्धाच्या वाळवंटातील प्रेम

गाझातल्या त्या रणरणत्या वाळवंटात
फुलत असेल का एखादं कोवळं प्रेम
तो तिला भेट द्यायचं वचन देत असेल का
धान्याचं पोतं
किंवा पोटभर प्यायला मिळेल एवढं पाणी

ती त्याच्यासाठी काय करेल
म्हणून आणाभाका देत असेल
आकाशातून पडणारा बॉम्ब
स्वतःवर झेलण्याचा विश्वास
की सैन्यानं त्याच्यासाठी ठरवलेली गोळी
स्वतःच्या छातीत पेरून घेण्याची हमी

दोघं मिळून विचार करत असतील का
स्वप्नातील एक घर बांधण्याचा
हजारो मृतदेह बाजूला सारून
तुटलेल्या घरांच्या राखेतून उभं राहणारं

तो देत असेल का तिला
रक्तानं माखलेली फुलं
डोळ्यांच्या अश्रूंनी धुवून
नजर चुकवून खायला घालत असेल का ती त्याला
जीवांच्या आकांतानं मिळवलेली रोटी
गोळ्यांची दारू झटकून

हातात हात घेऊन उद्ध्वस्त गल्ल्यांमधून फिरताना
ती दोघं स्वतःच्या संसाराचं भविष्य काय पाहत असतील?
त्यांच्या स्वप्नांमध्ये असतील का दुडूदुडू धावणारी बाळं
आनंदानं हसणारी माणसं
भयमुक्त

या उमलत्या प्रेमानं
गाझातील वाळवंटात फुलेल का
शांतीची बाग
फुलपाखरू बनून फिरतील का जीव घ्यायला आलेले सैनिक
त्यांच्या द्वेषानं भरलेल्या देशात
नेतील का या बागेतून प्रेमाचा थोडासा सुगंध

स्वतःच्या घरातून तुटकी फुटकी भांडीकुंडी
घेऊन हृदयावर दगड ठेवून घर सोडणाऱ्या
त्या दोघांना मिळेल का एक छत

ज्यातून त्यांना कधीच कुणी बाहेर काढणार नाही?

कधीकाळी
परततील का ती दोघं आपल्या मायभूमीत
दाखवतील का ती जागा आपल्या पिल्लांना
जिथं त्यांनी एकत्रित म्हातारपण घालवण्याचं स्वप्न
डोळे भरून पाहिलं होतंः.

**– हनीन घनाना**
**साभार** : गाझा पोएटस् सोसायटी

✵✵✵


गीताश्री मगर

## मी तुमची गाझा बोलतेय...!

आठवतंय मला,
माझ्या नेहमी सोबत असलेले निळे-शुभ्र आभाळ
माझ्या पोटातून खळाळत वाहणारा समुद्र
आलीव्हाच्या, खजुराच्या बियांचं
माझ्या पोटात रुजणं अंकुरणं आणि झाड होणं
आठवतात त्या झाडांवर
बुलबुल पक्ष्यांनी बांधलेली घरटी
त्यांची मुक्त गाणी
आठवतात ते दिवस जेव्हा माणसे
माझ्या अंगा-खांद्यावर बागडत होती
त्यांच्या मुक्ततेवर हुकमत नव्हती कुण्या धर्माची
ना सरहद्दी ठरवणाऱ्या कुण्या झेंड्याची

आणि हा आजचा दिवस

माझ्या अंगावर डागले जात आहेत आगीचे गोळे
आभाळ भेसूर धुरांनी, आगीच्या ज्वाळांनी भरून गेले आहे.
माझ्या पोटातील समुद्र वेदनेनं उफाळतो आहे
झाडं घरटी यांची आता राख झाली आहे
प्राणी पक्ष्यांचे स्वर राखेत विरून गेले आहेत
माणसानं मोठ्या आशेनं उभे केलेले इमलेही
आता जमिनदोस्त झाले आहेत
आणि कित्येक आक्रोश मूकपणे त्या ढिगाऱ्यांखाली दबून गेले आहेत

युद्ध पुकारणाऱ्या जगातील माणसांनो लक्षात घ्या

सरहद्दीच्या लालसा धार्मिक द्वेष
सत्तेचा अहंकार शांत झालाय का कधी?
युद्ध तुम्हा-आम्हाला आजन्म आतून-बाहेरुन होरपळणाऱ्या जखमा देतात
कुटुंब घर अंगण माती आभाळ भविष्याची स्वप्नं हिरावून घेतात

जरी युध्द जिंकलो तरी
बदल्यात मिळतो
आपली माणसे दगावल्याचा न संपणारा विरह
उद्याच्या जगण्यावरचा जिवंत राहण्यावरचा अविश्वास
सावलीसारखी पाठलाग करणारी भीती
फाटक्या कपड्याखाली अंगभर मुरलेली थरथर
आणि पोटात उसळणारी अन्नाची धगधगती भूक

पण अजूनही माझ्या अंत:करणात आशा टिकून आहे,
रात्रीच्या काळोखानंतर उगवणाऱ्या सूर्यकिरणांसारखी

बस मला गरज आहे
एका माणुसकीच्या हाकेची
मदतीच्या हातांची प्रेमाच्या पावसाची
जी द्वेषाच्या आगीने धुमसत असलेल्या जमिनीवर शांती पेरू शकेल
मानवतेच्या प्रवासातील हे माणसांनो
पुढे याः हे थांबवा
इथे जन्मलेल्या जन्माला येणाऱ्या मुलांसाठी

मला द्यायचं आहे एक शांतिपूर्ण जग
जिथे ते विश्वासाने वाढू शकतील
त्यांच्या भेदरलेल्या डोळ्यात मला हसू पाहायचं आहे
तरुणांच्या स्वप्नांना पंख द्यायचे आहेत
प्रौढांना आश्वस्त करायचं आहे की
तुम्ही इथे सुरक्षित आहात !

प्राणी, पशु सगळ्यांना पुन्हा आनंदाने बागडताना बघायचं आहे
माझ्या पोटात बियांना पुन्हा रुजवून
झाडांना वेलींना वाढताना फुलताना पाहायचं आहे
पक्षांचे मुक्त गाणे पुन्हा ऐकायचे आहे !
मला पुन्हा उगवायचं आहे नव्या उमेदीनं
द्याल न सोबतीची खात्री?

मी तुमची गाझा बोलतेय...!

❋ ❋ ❋



**भावानुवाद :** प्रशांत बर्गे

**संख्या**

''तुम्हाला संख्या हवी आहे का?
मी ती तुम्हाला देणार नाही
संख्या मानवतेला अमानवीय बनवतात
ते मृत्यूंना पचवणं सोपं करतात.
त्याऐवजी, मी तुम्हाला हे देतो:
धुळीमध्ये त्रास होत असताना मुलानं घेतलेल्या श्वासांचा आवाज
एका परिचारिकेच्या डोळ्यातील भाव जेव्हा तिला जाणवतं
की तिच्याकडं सेवा करण्यासाठी आता काहीच उरलेलं नाही
शिस्तबद्धपणे, कोणताही देखावा न करता मरायला धाडल्या
गेलेल्या लोकांची शांत, असह्य अशी प्रतिष्ठा.
ही विनंती नाही.
हा आरोप आहे.''

**– डॉ. एज्जीदीन शेहाब**

**आपल्याला अधिक चांगला मृत्यू मिळायला हवाय!**

आपली शरीरं विद्रूप व वाकडी झाली आहेत
गोळ्या व स्फोटकांच्या तुकड्यांनी ती शिवली गेली आहेत

आपली नावं रेडिओ आणि टीव्हीवर चुकीची उच्चारली गेली आहेत

आपले फोटो जे आपल्याच इमारतींच्या भिंतींवर लावलेले आहेत,
ते आता फिके आणि पांढरेसर झाले आहेत

आपल्या समाधीवरील शिलालेख, पक्षी आणि सरपटणाऱ्या प्राण्यांच्या विष्ठेनं झाकले गेले आहेत

कोणीही आपल्या थडग्यांना सावली देणाऱ्या झाडांना पाणी घालत नाहीये

आपल्या कुजत चाललेल्या शरीरांना तप्त उन्हानं ग्रासलं आहे!

❋ ❋ ❋

**– मोसाब अबू तोहा**



# नसिमी म्हणतो, अहम् ब्रह्मास्मि!



शेखर देशमुख



संवादोत्सव २०२५

**आत्मज्ञान आणि आत्मशोधाच्या प्रवासाला निघणे हे कुणा एका धर्म वा संस्कृतीतले घटित नाही. माणुसकी, करुणा, प्रेम ही सर्वोच्च मूल्ये सोबत घेऊन आपला मार्ग चालणारे सर्व धर्म आणि संस्कृतीत जन्मले. त्यासाठी अनेकांनी जिवाचे बलिदानही दिले. अशांपैकीच होता, आपल्या अझरबैजानी काव्यातून तत्त्वचिंतन मांडणारा कवी. नव्हे, आजच्या पर्यटकप्रिय अझरबैजानने गौरवलेला हा राष्ट्रीय कवी. त्याच्याच प्रतिभेचा काळाच्या संदर्भाने माग काढणारे हे टिपण...**

जगाला तुलना करण्याचा फार सोस. मात्र गौतम बुद्धांच्या शब्दांत मांडायचे तर हे जग अनित्य आहे. त्यामुळे सरलेला क्षण वर्तमानासारखा नसतो. काळ, व्यक्ती आणि समूहांनाही हाच नियम लागू होतो. अशा वेळी हेच श्रेयस्कर की कोणतीही तुलना न करता त्या त्या काळाची उत्पत्ती समजून घेत निर्मितीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा. कारण प्रत्येक काळाचा म्हणून एक रेटा असतो, त्या रेट्यातून निर्मितीची बीजे अंकुरत राहतात. काळच अपत्य जन्माला घालतो नि त्याचे पालनपोषण करतो.

अशाच एका काळाचे हे अपत्य. त्याचे नाव इमादुद्दीन नसिमी. देश अझरबैजान. बाकू या पर्यटकप्रिय शहरामुळे सध्या चर्चेत असलेला अझरबैजान हा पूर्वीच्या सोव्हिएत रशियाचा एक तेलसमृद्ध प्रांत. याच प्रांतातल्या तेलविहिरींमुळे नोबेल बंधूंचे तेलसम्राज्य भरभराटीला आले. या भरभराटीतून कमावलेल्या पैशांतून पुढे जगभरातल्या संशोधकांचा नोबेल पुरस्कार देऊन सन्मानही होऊ लागला. हा प्रांत स्वतःची अशी संस्कृती-परंपरा जपलेला. पण जसे सोव्हिएत रशियाचे विघटन झाले, तसे इतर काही प्रांतांप्रमाणे अझरबैजानही मुक्त, स्वतंत्र झाला.

या प्रांतावर छाप पाश्चात्त्य आणि पौर्वात्य, खरेतर अरबी-फारसी अशा मिश्र संस्कृतीची. त्यामुळे पुढारलेपणाच्या, प्रागतिकेच्या खुणा जागोजागी उमटलेल्या. आजही पर्यटक विशेषतः - भारतीय पर्यटक - एक मुस्लीम देश समजून अझरबैजान-बाकू आणि आसपासच्या स्थळांना जातात, आश्चर्याचा सुखद धक्का खाऊन परत येतात. कारण इस्लामी राष्ट्र म्हणजे बुरसटलेले, कर्मठ, कट्टरपंथीय, विघातक, आत्मघातकी वगैरे वगैरे गैरसमज त्यांच्या डोक्यात ठोकून ठोकून पक्के केलेले असतात.

अर्थात, प्रागतिकतेच्या साऱ्या खुणा अझरबैजानमध्ये आजही दिसत असल्या तरीही सध्याचा शासक हा मिलिट्रीवाला आहे. रोजची वर्तमानपत्रे, टीव्ही चॅनेल्स, सोशल मीडिया या शासकाच्या लष्करी गणवेशातल्या छबीने व्यापलेली असतात. याचा एक अर्थ कम्युनिस्ट राजवटीनंतर इतर देशांप्रमाणे याही देशाचा प्रवास लष्करशाहीकडे झालेला आहे. पण विसंगती, विरोधाभास हा की लष्करी शासनकर्त्यांनी धर्म आणि शासन व्यवस्थेविरोधात एकेकाळी एल्गार पुकारलेल्या, तत्त्वचिंतनात्मक काव्य लिहिणाऱ्या इतिहासपुरुषाचा म्हणजेच इमादुद्दीन नसिमीचा राष्ट्रीय कवी म्हणून सांभाळ केला आहे.

**नसिमीचा एल्गार**

१३६९ ते १४१७ हा नसिमीचा जीवनकाळ. अझरबैजानी भाषेतल्या तत्त्वचिंतनात्मक काव्याचा हा प्रणेता. तो अशा काळात जन्मला, जेव्हा मंगोल आक्रमकांनी त्याच्या मायदेशाचा ताबा घेतला होता. रूढिवादी, कर्मठांचा सर्वत्र वरचश्मा होता. पण पूर्वेकडेच कशाला, पश्चिमेकडेही, जो कोणी मानवतावादाचा पुरस्कार करेल, सरंजामशाहीने लादलेल्या शोषणाला विरोध करेल किंवा जो कोणी इतर कोणावर नव्हे तर स्वतःवर, स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवण्याचे आवाहन करेल त्याला त्या काळी देहदंड किंवा कारावासाची शिक्षा दिली जात असे. प्रागतिक विचारांचे साहित्य नष्ट करण्यात येत असे.

या सगळ्या आव्हानांना पुरून उरला होता, नसिमी. तो हुरुफिझमचा (सुफी चळवळीप्रमाणेच आकारास आलेली हुरुफिया चळवळ) खंदा पुरस्कर्ता होता. हा असा पंथ होता, जो मानवाच्या चेहऱ्यात परमेश्वराला पाहत होता. म्हणूनही नसिमी आपल्या अनुयायांना सांगत असे की परम-ईश्वर हा मानवतेचाच पुत्र आहे, पण इस्लामचा तर असा दावा होता की इतर कोणीही नाही, केवळ आपला पैगंबरच देव आहे. यावर व्यक्त होताना, किंबहुना या श्रद्धानिष्ठ, प्रमाणनिष्ठ मतावर व्यक्त होताना नसिमी म्हणे,


**जगात देव नाही कोणी, आहोत आपण फक्त... विनाशंका कळून येते हे, जेव्हा, हटवतो बुरखा चेहऱ्यावरचा आपण...**

दैववाद्यांशी उभा दावा मांडलेला नसिमी हुरुफिझमचा

**'तू तर म्हणतोस की, तू स्वतः देव आहेस. मग मरणाला सामोरे जाताना तू पांढराफटक का पडला आहेस?' नसिमीचा छळ करणारा धर्मांध त्याला म्हणाला. त्यावर नसिमी उत्तरला, 'मी अनंताच्या क्षितिजावरचा प्रेमाचा सूर्य आहे. सूर्यास्तासमयी सूर्य नेहमीच निस्तेज होत जातो. याचे आश्चर्य कसले वाटून घेतोस, मित्रा...'**

प्रणेता फैजुल्लाह नईमीला देहदंड दिल्याच्या घटनेनंतर म्हणजेच १९९४ साली बाकू सोडून तुर्कीला गेला. तिथे गेल्यावरही हुरुफिझमचा प्रचार-प्रसार करतो म्हणून नसिमीवर खटला चालवला गेला; त्याला तुरुंगात डांबण्यात आले. तरीही तो हिंमत हरला नाही. म्हणत राहिला, **नजर हवी अशी, मला ओळखण्यासाठी, जी जाणते खऱ्या परमेश्वराला...नजर जी दूषित आहे, अधू आहे, कशी पाहू नि ओळखू शकते, परमेश्वराला?**

नसिमीचा हा विचार कर्णोपकर्णी झाला. धर्मांध शासनकर्त्यांनी एका तरुणाला अटक केली. कवीचे नाव जाहीर करण्याची आज्ञा दिली. तो तरुण म्हणाला, 'ही कविता माझी आहे.' लगोलग त्या तरुणास देहदंडाची शिक्षा फर्मावण्यात आली. ही हकिगत एक दिवस नसिमीच्या कानी आली. तो तडक देहदंड दिला जाणार, त्या जागी पोहोचला. म्हणाला, 'चूक त्या तरुणाची नाही. कविता या तरुणाची नाही. ती माझी आहे, सबब तरुणाची त्वरित सुटका व्हावी.' त्या वेळी तिथला जो कोणी कारकून होता, त्याने नसिमीला देहदंड दिला जावा, यावर शिक्कामोर्तब केले. त्यानंतर, अत्यंत धीरोदात्तपणे नसिमी मरणाला सामोरा गेला.




**ऐहिकतेचा पुरस्कर्ता**

'तू तर म्हणतोस की, तू स्वतः देव आहेस. मग मरणाला सामोरे जाताना तू पांढराफटक का पडला आहेस?' नसिमीचा छळ करणारा धर्मांध त्याला म्हणाला. त्यावर नसिमी उत्तरला, 'मी अनंताच्या क्षितिजावरचा प्रेमाचा सूर्य आहे. सूर्यास्तासमयी सूर्य नेहमीच निस्तेज होत जातो. याचे आश्चर्य कसले वाटून घेतोस, मित्रा...'

जिवंतपणी नसिमीने माणसाच्या सत्यवादीपणाचा, उदात्त आचारविचारांचा, माणसाच्या मन आणि आत्म्याच्या सौंदर्याचा आपल्या कवितेद्वारे गौरव केला. आपला मार्ग अनुसरण्याचे धाडस दाखवणाऱ्या अनुयायांसाठी, न्यायाच्या जयासाठी आयुष्य झोकून दिले.

तो आपल्या कवितेतून पुकारा करताना म्हणे,

**अंश देवाचा माणसातच आहे... जो ज्ञानवंत आहे, ज्याने ज्ञानप्राप्त करण्यात प्रावीण्य मिळवले आहे, तोच खरा सामर्थ्यशाली आहे.**

**मी अनादी आहे, मी अनंत आहे, मीच या विश्वाचा निर्माता आहे आणि मीच या विश्वाचे अपत्यही आहे...**

**मीच देव, माझ्यातच देव**

इथे हे आवर्जून नमूद करायला हवे, की नसिमी जेव्हा माणसातच देव आहे म्हणतो, तेव्हा अद्वैत वेदांताच्या संदर्भाने बोलायचे झाल्यास, अहम् ब्रह्मास्मि - मीच ब्रह्म, मीच सत्य असाच पुकारा तो करत असतो. पण तेव्हा तो माणसाला देवाचे स्थान देत नाही वा माणसाला आराध्यही मानत नाही. त्याला तो स्वर्गातले अलौकिक स्थानही देत नाही. उलट परमेश्वराला माणसात स्थापून तो त्याच्या भौतिक उत्पत्तीवर जाणीवपूर्वक भर देतो. अलौकिक स्वर्गस्थ सुखाची नव्हे, ऐहिक सुखाची भलामण करतो.

नसिमी रूढिबद्ध धर्मवाद्यांना - विशेषतः कर्मठ इस्लामी धर्मप्रचारकांना - उघडे पाडण्यासाठी व्यक्त होताना म्हणतो,

**तुम्ही म्हणत नाही का, देव सर्वत्र आहे? मग तुम्ही मशीद आणि मद्यालयात फरक का करता?**

मशिदीची मद्यालयाशी तुलना करणारे नसिमीचे हे काव्यात्म विधान काळाच्या संदर्भाने सर्वार्थाने धाडसाचे होते. असे हे विधान करणे म्हणजे, देहदंडाच्या शिक्षेवर स्वतःच स्वाक्षरी करण्यासारखे होते.

**अन हल–अकचा नारा**

त्याआधी पर्शियन कवी हल्लाज मन्सूर याला अन हल–अक अर्थात मीच ब्रह्म आहे, मीच सत्य आहे (विसाव्या शतकाच्या सातव्या दशकात झिया उल हकच्या धर्मवादी हुकूमशाही सत्तेविरोधात फ़ैज़ अहमद फ़ैज़ने असाच नारा 'हम देखेंगे' या कवितेमधून दिला होता.) असा पुकारा केल्यामुळे फाशी दिले गेले होते. नसिमीला मन्सूरचा करुण शेवट ठाऊक होता. म्हणून आत्यंतिक आदराने तो मन्सूरचा उल्लेख करत राही.

नसिमीची कविता मानवी जीवनाचा गौरव करी. उणापुऱ्या एका आयुष्यात सर्व सुखांचा आनंद उपभोगण्याचा आग्रह धरी.

तो म्हणे,

**थडग्या पलीकडच्या जगात सुखाची आणि तुमच्या प्रेमाची अपेक्षा धरू नका, गड्यांनो...**

**प्रवचनकारा, मला उद्याची भीती दाखवण्याचा प्रयत्न नको करूस उगा. मी एक क्षणस्थ. क्षणस्थासाठी उद्या उगवतो आजच. म्हणूनच असतो तो भीतिविहीन...**

हा कवी ज्या जगात राहतो, ज्या जगात त्याची कविता जिवंत आहे, त्या ऐहिक जगाच्या तो आकंठ प्रेमात आहे. या जगाच्या बदल्यात कल्पनेतल्या स्वर्गात जाण्याचा सौदा करण्याची त्याची जराही इच्छा नाही.

तो एका कवितेत म्हणतो,

माझा हितशत्रू म्हणतो, 'मला आजचे प्रेम दे. बदल्यात उद्या तुझ्यासाठी ठेव.' माझ्या प्रेमासोबत घालवलेला एक तास सबंध आयुष्याला व्यापून आहे.

फुकाच्या आश्वासनांवर अजिबात विश्वास ठेवू नका, असे म्हणून नसिमी आपल्या आसपासच्या लोकांना क्षणस्थ होण्याचे कळकळीचे आवाहन करतो. म्हणतो,

**माझ्या मना, नकार दे वायफळ आश्वासनांना, क्षण**

**रुबाई १**

देव माझ्या आत आहे, हे सत्य मी तुम्हाला सांगतो आहे
कोणतेही आढेवेढे न घेता हे गुपित मी तुम्हा पुढ्यात उघड करतो आहे
माझ्या मार्गाशी सत्यनिष्ठ राहून, 'खरे बोला' हे शब्द मी उच्चारतो आहे.
मी मन्सूर आहे. 'मी'च देव आहे, हेच मी सांगत राहणार आहे...

मीच परमेश्वर आहे असा पुकारा करणारा पर्शियन कवी, हल्लाज मन्सूर. ज्याला असा पुकारा केल्यामुळे देहदंडाची शिक्षा दिली गेली.

**

**रुबाई २**

मला देवाचे सत्य गवसले आहे, 'मीच देव आहे', हे माझे विधान आहे.
मी देव आहे, माझ्यात देव आहे, हे सत्य मी वदतो आहे.
किती स्पष्टपणे मी हे गुपित फोडले आहे...
माझे शब्द सत्यनिष्ठ आहेत...जे मी मोकळेपणाने उच्चारले आहेत...




**

**रुबाई ३**

पूर्व आणि पश्चिम दिशा देवाचा संदेश ऐकते आहे.
पण, तो प्रियकर कुठे आहे, जो देव होण्याची आकांक्षा बाळगून आहे?
तो दैत्य आहे, जो देवाविषयीच्या सत्याबद्दल अनभिज्ञ आहे,
आणि तोही दैत्य आहे, जो माणूस हाच देव जाणत नाही...

**आनंदाने घालव हा. मागे पडला काल आहे. शाश्वती नाही उद्याची... क्षण आताचा हेच खरे समाधान...**

नसिमी ज्या उत्कटतेने आत्मबळ आणि प्रेमाचा पुकारा करतो, तितक्याच उत्कटतेने आसपासच्या परिस्थितीवर व्यक्त होताना प्रश्न विचारतो. म्हणतो,

**माणसे जगातली बनलीत विंचू आणि साप**
**पसरला जगभर दुष्टावा आहे,**
**शोधावा कुठे मित्र शुद्ध अंतःकरणाचा?**
**गेला कुठे जाणीवसमृद्ध आणि न्यायप्रिय माणूस?**

अर्थातच जो कवी अहम् ब्रह्मास्मिचा नारा देतो, त्याचे शब्द, त्याचे काव्य आशावादी असल्याशिवाय राहत नाहीत. एका कवितेत तो म्हणतो,

**अरे, बुलबुल मित्रा, गुलाबापासून दूर जाण्याचे दुःख करावे कसले?**
**धीर धर जरा म्हणतो मी...**
**सरेल शिशिर...फुलांची बाग पुन्हा डवरेल, वसंताचा पुन्हा येईल बहर...**

आपण कोण आहोत? परमेश्वर असण्याचा अर्थ काय? या संबंधाने आपल्या कवितेतून धाडसी विचार मांडणारा इमादुद्दीन नसिमी हा अझरबैजानी राष्ट्रीय कवी आपल्या चाहत्यांना, अनुयायांना उद्देशून शेवटी म्हणतो,

**अविनाशी आयुष्य असलेला माणूस मी... हीच माझी ओळख,**
**अविनाशी माझ्यातला मी... अनंत काळापर्यंत जगणारा मी...**

❋❋❋

**२०२४ च्या जूनमध्ये स्वाती शिवलकर-देशमुख पर्यटक म्हणून अझरबैजानला गेल्या. येताना अझरबैजानचा राष्ट्रीय कवी असलेल्या इमादुद्दीन नसिमीच्या कविता सोबत घेऊन आल्या. त्यांचे आभार.**




---

**शेखर देशमुख तीन दशकांपासून पत्रकारितेत कार्यरत आहेत. त्यांची 'पॉझिटिव्ह माणसं', 'उपरे विश्व', 'कर्कविज्ञानाची गोष्ट'-(सहलेखन) आदी स्वतंत्रपणे लिहिलेली तसेच 'शिरच्छेद, फाशी आणि अल्बेर काम्यूचा चिंतननामा', 'कलेची पुनर्घडण', 'मी हिंदू स्त्री का नाही- माझा लढा, माझी कहाणी', 'लव्ह अँड रेव्होल्युशनः फ़ैज़ अहमद फ़ैज़' आदी अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**
**संपर्क**-deshmukhshekhar101@gmail.com

# सिद्धी




सुमती जोशी

मूळ बंगाली कथा : शतदल मित्र

अनुवाद

संवादोत्सव २०२५



शेवटी खूप विचार करून डॉक्टर पांडा यांनी त्यावर एक छानसा उपाय शोधून काढला. माणसासाठी असाध्य असं काहीही नसतं. गोल्डीवर डायलिसिस करायचं, पण ते गरीब एचआयव्हीच्या पेशंटसाठी राखून ठेवलेल्या मशीनवर! त्यामुळे सापही मरेल आणि काठीही तुटणार नाही. इन्फेक्शन झालंच तर ते एड्सच्या पेशंटना होईल. जबरदस्त इन्फेक्शन झालेल्या या पेशंट्सना आणखी नवीन इन्फेक्शन झालं तरी ते कोणाच्या लक्षातही येणार नाही. शिवाय तसं बघायला गेलं तर हे पेशंट मरणारच आहेत. दोन दिवस आधी काय आणि नंतर काय!

झोपून उठल्यावर रमेशना अगदी ताजंतवानं वाटू लागलं. रात्रभर गाढ झोप लागल्याचं लक्षण होतं ते! बऱ्याच दिवसांनी मनाला तृप्ती आणि शांती देणारी गाढ झोप लागल्यामुळे खूश होतच त्यांनी डोळे उघडायचा प्रयत्न केला, पण ते चपापले. कारण पाय ताठ करायचा प्रयत्न केला, तेव्हा चादरीखाली असलेले पाय ताठ करता येत नाहीत, असं त्यांना जाणवलं. साहजिकच रमेश गोंधळून गेले. मनात येऊ लागलं, आपण स्वप्न तर बघत नव्हतो ना! शेवटी डोळे उघडले तरी बंद खोलीतल्या फिक्कट उजेडात त्यांना काहीच उमजेना. आता दिवस आहे की रात्र, हेही त्यांच्या लक्षात येईना. तरीही ए.सी. मशीन एकाच विन विन सुरात लक्ष केंद्रित करून गारठा निर्माण करतंय, हे मात्र त्यांना स्पष्टपणे समजत होतं. तीच जाणीव रमेश यांच्या मनात 'ते जागे आहेत' हा निरोप पाठवत होती. ही भावना इतकी ताजी होती, की त्यांनी ताडकन उठून बसायचा प्रयत्न केला, पण ते बसू शकले नाहीत. ते पुन्हा एकदा बिछान्यावर आडवे पडले. प्रथम ते चपापले असले तरी दुसऱ्याच क्षणी चादर बाजूला सरकवून त्यांनी स्वत:ला डोक्यापासून पायापर्यंत न्याहाळलं. मग मात्र ते अतिशय उल्हसित झाले. एक प्रकारच्या परितृप्तीची, सिद्धीची आणि परमानंदाची भावना त्यांच्या मनात जागृत झाली. आनंदाच्या भरात ते उद्गारले, 'जय प्रभू!'

***

गेल्या काही दिवसांपासून रमेश यांना काळजीमुळे झोप लागत नव्हती. काही करता न येण्याची, असहाय झाल्याची भावना त्यांच्या मनाला कुरतडत होती. ही समस्या होती, जीवनमरणाची. डॉक्टरी पेशा पत्करला की पेशंटच्या मृत्यूचं दु:ख सोसायची सवय होते. तरी काही झालं तरी ते माणूसच होते ना! या बाबतीत कातर झालेल्या पेशंटची निरव, करुण, व्याकूळता पाहून ते अस्वस्थ झाले होते. ते स्वत: – डॉक्टर पांडा, शहरातले उत्तम नेफ्रॉलॉजिस्ट – त्या वेदना पाहून हादरून गेले होते. विशेषत: पेशंटच्या पालकांच्या व्याकूळ होऊन केलेल्या विनवण्या त्यांना बघवेनाशा झाल्या होत्या. इतका मोठा माणूस, इतकी क्षमता असूनही किती असहाय झाला होता! पुन:पुन्हा तेच शब्द कानी येत होते, ''डॉक्टर, आमच्या गोल्डीला वाचवा! कृपा करून काहीतरी करा!''

असेना का सामान्य कुत्री. परंतु आपल्या प्राणप्रिय गोल्डीचा जीव वाचावा म्हणून युवराजांनी त्यांचे हात हातात घट्ट धरले, तेव्हा आपल्या व्यावसायिक नि:स्पृहतेला दूर सारत त्यांचं हृदय पिळवटून निघालं होतं. नकळत त्यांच्या व्यावसायिक मनाने वेगळे हिशेब केलेही असतील कदाचित! युवराजांच्या प्रिय श्वानासाठी जर काही करता आलं, तर भरभराट त्यांच्या रूममध्ये भराभर पावलं टाकत अवतरली असती, अशा मूक हिशेबाची शक्यताही विचारात घ्यावी लागली असती. नकळत राज्यातल्या या सर्वात उत्कृष्ट हॉस्पिटलचं प्रमुखपद भूषवता आल्याचं चित्र कदाचित त्यांच्या मनात तरळलं असेल. ते एक निष्णात व्यावसायिक होते. क्षणार्धात आपल्या चेहऱ्यावरचे आशादायक भाव पुसून टाकत काळजीयुक्त स्वरात ते म्हणाले, ''घाबरता कशाला? मी आहे ना! त्या उपर परमेश्वरी इच्छा!''

एवढं बोलून झाल्यावर डॉक्टर पांडा युवराजांच्या दु:खात सहभागी होत अतिशय प्रेमाने युवराजांच्या मांडीवर मान टाकून बसलेल्या अबला जीवाच्या सोनेरी केसांमधून हात फिरवत राहिले.

***


युवराजांनी पाळलेल्या गोल्डीची किडनी नीटशी काम करत नव्हती. त्यामुळे डायलिसिस करावं लागणार होतं. सध्या या देशात प्राण्यांच्या डायलिसिसची व्यवस्था होईल, असं एकही हॉस्पिटल नव्हतं. त्यामुळे नाइलाजाने युवराज गोल्डीला घेऊन तीनदा परदेशी जाऊन आले. पण इतक्या मोठ्या राज्याचे युवराज होते ते. त्यांच्यापाशी सवड कशी असणार? इतर कोणाबरोबर तिला दूरदेशी पाठवायचं नव्हतं त्यांना. शिवाय गोल्डी इतकी विकल झाली होती की जबरदस्ती करून तिला इतर कोणाकडे सोपवलं की ती केविलवाणा चेहरा करून त्यांच्याकडे बघत राही. त्यामुळे युवराजांना तिच्याविषयी विलक्षण आत्मीयता वाटू लागली. अर्थात त्यांच्याकडे पैशाची चणचण कधीच नव्हती. नोटांची बंडलं घेऊन नेते–मंत्री हात जोडून तयार होते. तरीही आज युवराज असहाय झाले होते.

महाराणीसुद्धा असहाय झाल्या होत्या. गोल्डी युवराजांची लाडकी असल्यामुळे त्यांनाही ती तितकीच प्रिय होती. गोल्डीची ती दीनवाणी अवस्था पाहून महाराणींचं डोकं फिरायची वेळ आली होती. त्या स्वत:ला क्षमा करू शकत

नव्हत्या. गोल्डीच्या आजारापेक्षा स्वत:च्या नाकर्तेपणाची त्यांना लाज वाटू लागली होती. इतक्या महत्त्वाच्या विषयाकडे त्यांचं दुर्लक्ष झालं होतं म्हणून! दिवसातल्या चोवीस तासांपैकी अठरा तास त्या कामात व्यग्र असत. पाच वर्षांतली कामं त्या पाच महिन्यांत उरकतात, अशी त्यांची ख्याती होती. त्यामुळे आज त्या साऱ्या जगावरच रागावल्या होत्या. जिथे त्या लक्ष देऊ शकत नसत, त्या सर्व गोष्टी अशाच दुर्लक्षित राहत असत. शेवटी त्यांनी एक उसासा टाकला. या देशात त्यांच्या राजवटीत पशुपक्ष्यांच्या डायलिसिसची कोणतीही सोय नव्हती. प्रत्येक जिल्ह्यातल्या पशुवैद्यक हॉस्पिटलमध्ये डायलिसिस मशीन बसवायची ऑर्डर त्यांनी नुकतीच पास केली होती. जिथे पशुवैद्यक हॉस्पिटल नाही, तिथे ते सुरू करायचे आदेशही त्यांनी दिले होते. अर्थात ते सारं कालसापेक्ष होतं. आता काय करता येईल? विचार करून करून त्या थकल्या होत्या. तितक्यात त्यांच्या ऑफिसच्या साऊंड सिस्टिममधून रवींद्रसंगीताचे सूर कानी आले : 'त्या दिनी दोघं डोलत होती वनी, फुलांच्या झुल्यावर.'

त्यांनी भुवया उंचावल्या. हातातला पेपरवेट त्या साऊंड सिस्टिमवर फेकून मारला. बाहेरच्या पोलीस ऑफिसरनी आत डोकावून पाहिलं, परंतु त्यांना आत शिरायची भीती वाटू लागली. हातांनी माशी झटकून टाकावी, तितक्या सहजतेने त्यांनी पोलीस ऑफिसरला घालवून दिलं.

त्या पावसाळी संध्याकाळी महाराणी त्यांच्या ऑफिसला लागून असलेल्या बगिच्यात भराभर पावलं टाकत चालू लागल्या. अधूनमधून पंधराव्या मजल्यावरच्या गच्चीकडे तर कधी राजधानीच्या आकाशरेखेवर, तर कधी खालच्या रस्त्याकडे विशेष काही दिसत नसलं, तरी त्या नजर टाकत होत्या. हिरवळीचा गारवा, हवेतली शीतलता, संध्याकाळचं रंगीबेरंगी आकाश त्यांच्या मनाला हळूहळू शांतवू लागलं. जणू काही आत्ता त्यांना खाली बघायची सवड मिळाली होती. नेमक्या त्याच वेळी निळ्या दिव्याचा प्रकाश पसरवत हॉर्न वाजवत एक ॲम्ब्युलन्स तिथून वेगाने निघून गेली. त्या आवाजाने आणि प्रकाशाने त्यांचं डोकं भिरभिरून गेलं. भराभर पावलं टाकत त्या त्यांच्या ऑफिसमध्ये शिरल्या. मनातल्या मनात त्या 'युरेका' म्हणत होत्या की नाही, ते मात्र समजलं नाही.



इतक्या दिवसात हा सोपा उपाय आपल्या कसा लक्षात आला नाही, हा विचार मनात आल्यावर त्या स्वत:वर चिडल्या. त्यांच्या मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये माणसांवर डायलिसिस करायची सोय होती. मग त्या ठिकाणी कुत्र्यावर डायलिसिस का करता येणार नाही? त्यात कसली आलीय गैरसोय? समस्या सोडवण्यासाठीच तर इतका पगार देऊन स्पेशालिस्ट डॉक्टर ठेवले होते ना! हे करावंच लागेल. सर्व सजीवांत त्याच परमेश्वराचा निवास. उत्तेजित झाल्यामुळे हेल्थ मिनिस्टरऐवजी त्यांनी चुकून फिशरीज मिनिस्टरला फोन लावला. 'अरे बाप रे!' म्हणत जीभ चावून त्यांनी पुन्हा बटणं दाबली आणि डॉक्टर पांडा यांना बोलावून घेतलं. परमेश्वरी इच्छेनुसार हे घडतंय, असं वाटल्यामुळे डॉक्टर पांडा यांनी एक नि:श्वास टाकला. तरीसुद्धा अस्वस्थपणाचा एक काटा त्यांना सतत टोचत राहिला. त्यांना वाटू लागलं, आपण इतके

कसे मूर्ख? हा मूर्खपणा क्षमा करण्यासारखा नाही. स्वत:च्या गालफटात एक लगावून द्यावी, असाही एक विचार मनात तरळून गेला. इतका सोपा, सरळ उपाय त्यांना का बरं सुचला नाही! सुचला असता तर त्यांच्या स्वप्नातलं ते प्रमोशन! रमेश डॉक्टरांनी एक उसासा टाकला. बेटर लेट दॅन नेव्हर असं म्हणत त्यांनी मनाची समजूत घातली.

साधा, सोपा आणि निर्धोक उपाय. यातला निर्धोक हा शब्द मात्र घोटाळ्याचा होता, त्या डॉक्टरांसाठी. त्यांनी सौम्य शब्दांत त्यातली अडचण सांगितली. माणसावर डायलिसिस करायच्या यंत्रावर पशूचं डायलिसिस केलं तर माणसांचं काही नुकसान होणार नाही ना! कोणत्यातरी प्रकारचं नवीन इन्फेक्शन! मूर्ख डॉक्टरचं हे पराकोटीचं मूर्ख विधान ऐकल्यावर रमेश डॉक्टर मूक झाले. युवराजांची प्राणप्रिय गोल्डी! तिला पशू म्हणता येईल का? आणि गरीब पुन्हा 'माणूस' कधी झाले? ते तर मरायसाठीच सरकारी हॉस्पिटलमध्ये येतात!

शेवटी खूप विचार करून डॉक्टर पांडा यांनी त्यावर एक छानसा उपाय शोधून काढला. माणसासाठी असाध्य असं काहीही नसतं. गोल्डीवर डायलिसिस करायचं, पण ते गरीब एचआयव्हीच्या पेशंटसाठी राखून ठेवलेल्या मशीनवर!

त्यामुळे सापही मरेल आणि काठीही तुटणार नाही. इन्फेक्शन झालंच तर ते एड्सच्या पेशंटना होईल. जबरदस्त इन्फेक्शन झालेल्या या पेशंट्सना आणखी नवीन इन्फेक्शन झालं, तरी ते कोणाच्या लक्षातही येणार नाही. शिवाय तसं बघायला गेलं तर हे पेशंट मरणारच आहेत. दोन दिवस आधी काय आणि नंतर काय!

शेवटी शहरातले सुप्रसिद्ध नेफ्रॉलॉजिस्ट डॉक्टर पांडा शहरातल्या सगळ्या माणसांसाठी असलेल्या या हॉस्पिटलमध्ये त्या व्हीआयपी कुत्र्यावर डायलिसिस करावं, अशी ऑर्डर काढून अतिशय निश्चिंत मनाने घराच्या दिशेने जाऊ लागले. त्या निश्चिंततेत एक प्रकारची उच्चतम भावना होती.

त्यामुळेच रस्त्याच्या कडेला गाडी थांबवून एका चहाच्या टपरीवर शुगरचा विचार न करता अतिशय तृप्त मनाने ते फुलपाखरांच्या आकाराची बिस्किटं आणि एक मोठं मडकंभर चहा प्यायले. त्या तृप्तीमुळे त्यांचे डोळे मिटू लागले होते. तृप्तीची ती भावना त्यांच्या शरीराला आणि मनाला इतकी व्यापून राहिली होती की त्या रात्री त्यांना तृप्तीची भावना

**''त्यामुळे सापही मरेल आणि काठीही तुटणार नाही. इन्फेक्शन झालंच तर ते एड्सच्या पेशंटना होईल. जबरदस्त इन्फेक्शन झालेल्या या पेशंट्सना आणखी नवीन इन्फेक्शन झालं, तरी ते कोणाच्या लक्षातही येणार नाही. शिवाय तसं बघायला गेलं तर हे पेशंट मरणारच आहेत. दोन दिवस आधी काय आणि नंतर काय!''**

देणारी गाढ झोप लागली.


***

गाढ झोपेतून जाग आल्यावर स्वत: केलेल्या ईश्वराच्या गुणगानाने डॉक्टर पांडा यांची सकाळ अतिशय पवित्र झाली. परितृप्ती, सिद्धी आणि परमानंद अशा मिश्र भावना त्यांच्या मनात गर्दी करू लागल्या. त्याच आनंदात ते बिछान्यावरून ताडकन खाली उतरले. कसाबसा तोल सावरत ते पुन्हा एकदा म्हणाले, 'जय प्रभू!' प्रभूला शरण जात खोलीतून बाहेर पडून ते तडक रस्त्यावर येऊन चालू लागले. शक्य तितक्या लवकर त्यांना हॉस्पिटलला पोहोचायचं होतं. त्यांच्या कर्मतीर्थापाशी! होय, कर्मतीर्थच म्हणायला हवं. कारण त्याच पवित्र ठिकाणी साधना करत राहिल्यामुळेच आज ही सिद्धी प्राप्त झाली होती.

नेफ्रॉलॉजिस्ट म्हणून शहरात प्रसिद्धी मिळाल्यामुळे धन्यता मानणारे डॉक्टर पांडा इकडे तिकडे न बघता थेट नाकासमोर चालत राहिले. रस्त्यावरचे लोक त्यांना पाहून चकित झाले होते का? ते त्यांना माहीत नव्हतं. कारण त्यांचं कुठेही लक्ष नव्हतं. आता लवकरात लवकर हॉस्पिटलला पोहोचायला हवं, एवढंच त्यांना ठाऊक होतं. सध्या ते फक्त विभाग प्रमुख होते. त्यांच्या अधिकाराला मर्यादा होत्या. या मर्यादेची सीमारेषा होती सुपर पदापर्यंतच! युवराजांच्या कृपेमुळे त्यांच्याशी फोनवरून बोलता आलं असतं. परंतु या पवित्र सकाळी त्यांच्या साधनासिद्धीचा जो प्रकाश होता, तो फोनवर बोलून समजावून सांगता आला नसता. त्यामुळे आता त्यांना त्यांच्या वरच्या अधिकाऱ्यांची भेट घेणं अत्यावश्यक झालं होतं. त्यांनी सर्टिफाय केलं तरच त्यांच्या प्रस्तावाला मान्यता मिळणार होती. त्यानंतर सुपर स्वास्थ्यमंत्री. मगच

त्यांनी शोधलेला हा नामी उपाय युवराजांच्या कानावर घातला जाणार होता. सरकारी नियम अतिशय कडक असतात आणि ते पाळावेच लागतात.

होय, युवराजांपाशी ही फाइल लवकरात लवकर पोहोचावी म्हणून हे सारं अत्यावश्यक होतं आणि ते करायची क्षमता त्यांच्यात होती. म्हणून तर ते उठल्या उठल्या तडक हॉस्पिटलच्या दिशेने धावत सुटले होते. आता फक्त एक काम शिल्लक होतं. गोल्डीचं डायलिसिस सुरू करणं. त्यानंतर योग्य वेळ पाहून युवराजांसमोर हजर होणं. हा अलौकिक पर्याय शोधल्याबद्दल युवराज स्वत: आपल्याला बोलावून घेतील, असा त्यांना विश्वास वाटत होता. इतकंच नाही तर ईश्वराची इच्छा असली तर युवराज स्वत: आपल्याला महाराणींकडे घेऊन जातील. त्यानंतर सुपरपोस्ट तर मिळेलच, त्याशिवाय पुढच्या निवडणुकीत तिकीट, मग मंत्रिपद... नाही, आणखी



विचार करू शकत नव्हते, डॉक्टर पांडा!

लगबगीने चालता चालता डॉक्टर पांडा हॉस्पिटलचं गेट ओलांडून आत शिरले. तिथून लांब लांब टांगा टाकत सुपरपाशी पोहोचले. त्यांच्या चेंबरमध्ये जाऊन आनंदाने म्हणाले, 'जय प्रभू!' पण त्यांच्या या उच्चाराला ब्रह्मरूप प्राप्त झालं नाही. ते शब्द जणू त्यांच्या गळ्यापाशीच अडकले! टेबलाच्या पलीकडच्या बाजूच्या खुर्चीवर बसलेले सुपर, डॉक्टर पांडा यांच्यासारख्या सिनिअर डॉक्टरचं हे धावणं पाहून अवाक झाले आणि आपलं आश्चर्य व्यक्त करत म्हणाले, 'भूभू!'

हे शब्द ऐकल्यावर इतका वेळ स्वत:च्या नादात असलेले डॉक्टर पांडा भानावर आले आणि वास्तवाच्या कठोर जमिनीवर उतरले. अपेक्षाभंग झाल्याच्या दु:खामुळे मागच्या दोन पायांवर शेपूट टेकवून ते जणू काही ओरडले, 'कूकू'. त्यांच्या डोळ्यांतून मूक अश्रू वाहू लागले. त्यांच्या अश्रूभरल्या धूसर नजरेसमोर एक चित्र तरळलं – सुपर यांच्यासह हॉस्पिटलचे सारे डॉक्टर्स, कर्मचारी, दलाल या सगळ्यांना त्यांच्या आधीच किंवा कदाचित त्यांच्याबरोबरच सिद्धीलाभ झालाय!

काळजीत पडले नसते, तर घरातून बाहेर पडल्याबरोबर डॉक्टर पांडा यांना दिसलं असतं, परमेश्वराची कृपादृष्टी असलेल्या या देशात महाराणींनी मिळवलेल्या पुण्यामुळे सगळ्या मनुपुत्रांनी रातोरात परिस्थितीशी जुळवून घेतलं होतं. या पवित्र सकाळी सारी कुत्र्यांची पिल्लं ठाकठीक झाली होती. अर्थात, या सन्माननीय सारखेपणामुळे डॉक्टर पांडा खूश झाले नाहीत. त्यामुळे त्यांनी नव्याने प्रतिज्ञा केली – मंत्र्यांचं साधन किंवा शरीरपतन.

खरं पाहता त्यांना कणाहीन निर्लज्ज माणूसच व्हायचं होतं!

❋ ❋ ❋

**शतदल मित्र यांच्या 'निवडक तीस' या पुस्तकातल्या कथेचा भावानुवाद. अनुवादिका सुमती जोशी या राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखिका आहेत. त्यांची उत्क्रांती, बंगरंग, दैत्याचा बगीचा, मंत्र आदी स्वतंत्र तसेच अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**

**ई मेल :** sumatijoshi154@gmail.com

**सर्व रेखाचित्रे : सागर शिंदे**

# मेंदूची घडण आणि निर्मितीची जडण




डॉ. आनंद जोशी





अँसेल ॲडम



मार्क ट्वेन

ज्ञान-विज्ञान



माल्कम ॲलेक्झांडर



ॲगाथा ख्रिस्ती



वॉल्ट डिस्ने



लिओनार्डो दा विन्ची

**घडण या शब्दाचा अर्थ रचना आणि जडण म्हणजे पोत. मेंदूच्या रचनेत म्हणजे घडणीत झालेला बदल थेट निर्मितीच्या पोताशी म्हणजे जडणीशी तीर साधतो. म्हणून हा मथळा. घडणीतून जडणीकडे आणि जडणीतून घडणीकडे येरझारा घालाव्या लागतात. म्हणजे विषयाचा उलगडा होण्यास मदत होते. हे शब्दार्थ भाषातज्ज्ञ डॉ. अशोक केळकर (१९२९-२०१४) यांनी त्यांच्या 'रुजुवात' या पुस्तकात सांगितलेले आहेत. हे अर्थवाही शब्द मला भावले म्हणून ते 'श्रीकारात' उपयोजले...**

'विकृतीचे नी आधारे प्रकृती पाविजे निर्धारे' असा जणू मेंदू विज्ञानातील नियम दिसतो. कार्ल वोन रोकितान्स्की (१८०४-१८७८) हा ऑस्ट्रियन मेंदूतज्ज्ञ आणि तत्त्वज्ञ म्हणाला होता, 'विकृती म्हणजे निसर्गाचे फसलेले प्रयोग, पण त्याचा अभ्यास केला म्हणजे नॉर्मल जैविक प्रक्रियांचा उलगडा होतो.'


मेंदूच्या विकृती मेंदूतील क्रिया कशा विस्कळीत करतात, याचा अभ्यास मेंदूविज्ञान त्या काळापासून करत आले आहे. यामुळे यथास्थित मेंदूबाबत एक विलक्षण अंतर्दृष्टी मेंदूविज्ञानाला मिळाली आहे. त्याच वाटेवरून संशोधनप्रवास आजही चालू आहे. हा प्रवास आश्चर्यकारक आहे. मेंदूचा विकास होत असताना कधी कधी काहीतरी जैविक गडबड गोंधळ होतो. त्याला 'डेव्हलपमेंटल डिसऑर्डर्स' – 'विकासातील विकृती' – असे म्हणतात. यातील काही विकृतीमध्ये निर्मितिक्षमतेचा मेंदूतील अव्यक्त साठा उघडा होतो. एखादे 'विशिष्ट टॅलेंट' – 'गुणश्रीमंती' – उघडकीस येते. या सगळ्याचा शोधाभ्यास नॉर्मल मेंदूची निर्मितीची शक्ती कशी काम करत असावी, हे समजण्यासाठी पूरक ठरतो.

**चित्रक्रिया आणि वाचा**

डिस्लेक्सियाचे वाचनअक्षमता, लेखनअक्षमता, गणितीअक्षमता असे काही प्रकार सांगितले आहेत. याची गोळाबेरीज अर्थभाषेची अक्षमता – 'लँग्वेज डिसअॅबिलिटीज्' – असा आहे. डोक्यात विचार आहेत, पण ते भाषेतून म्हणजे बोलण्यातून, लिहिण्यातून दुसऱ्याला सांगणे; अभिव्यक्त करणे डिस्लेक्सिक व्यक्तीला कठीण जाते. त्यात अडथळे निर्माण होतात. याचे स्पष्टीकरण देण्यास मेंदूविज्ञानाला मानवी उत्क्रांतीचा आधार घ्यावा लागला. दृश्यकला-चित्रक्रिया तसेच 'भाषा' या दोन्ही प्रतीकांचा, चिन्हांचा वापर करून दुसऱ्याशी संपर्क-संवाद साधणाऱ्या 'सिम्बॉलिक कम्युनिकेशन' कला. चित्रक्रिया ही भाषेच्या उत्क्रांतीच्या आधी लाखो वर्षे मेंदूत उत्क्रांत झाली आणि विकसित होत गेली. चित्रक्रिया ही सीनियर आणि भाषाक्रिया ही तशी ज्यूनियर कला आहे. याचे मेंदूच्या रचनेवर परिणाम झाले आहेत. मेंदूतील भाषाक्रियेचे आणि चित्रक्रियेचे मार्ग- न्युरॉनल कनेक्शन्स – निराळे आहेत.

सबंध जगभर पसरलेल्या होमो सेपियन्सना ही चित्रभाषा येत होती. या चित्रक्रियेचे अवशेष गुहाचित्रात जगभर सापडतात. त्यानंतर आलेली भाषासुद्धा सर्वदूर पसरलेल्या होमो सेपियन्समध्ये व्यापकतेने निर्माण झाली होती. या बोली तसेच लिखित भाषेने चित्रभाषेची जागा घेतली. ही भाषा जणू जगभर व्हायरल झाली. कारण ही भाषा सुटसुटीत सुलभ होती. त्याला सर्व प्रकारच्या लेखनसामग्रीच्या वेगाने विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाची जोड मिळाली. त्यामुळे चित्रक्रियेची क्षमता निर्मितिक्षम माणसांच्या उपसमूहात प्रतिबंधित झाली. त्यात ज्या माणसात भाषिक अक्षमता आहे, अशा लोकांचा समावेश होतो.

२००२ साली युलरिका वुल्फ आणि इंग्वार लुंडबर्ग या दोन संशोधकांनी स्वीडनमध्ये शोधाभ्यास केला. उत्कृष्ट स्वीडिश विद्यापीठातील दर्जेदार आर्ट स्कूलमध्ये हे संशोधन झाले. आर्ट स्कूलमधील विद्यार्थ्यांत डिस्लेक्सिक मुलांचे प्रमाण इतर विद्याशाखेतील विद्यार्थ्यांच्या तुलनेने जास्त होते. डिस्लेक्सिक मुलांच्यात चित्रकलेच्या प्रवृत्ती जास्त प्रमाणात आढळतात, असे जगभरच्या वृत्तान्तातही दिसून आले आहे. अमेरिकेच्या येल विद्यापीठातील 'चाइल्ड स्टडी सेंटर' येथे सॅली आणि बेनेट शेवित्झ हे डिस्लेक्सिया तज्ज्ञ पतीपत्नी अनेक वर्षे संशोधन करत आहेत. त्यांनी भाषाअक्षमता असलेल्या मुलांच्या मेंदूचे स्कॅनिंग केले. अशा मुलांच्या मेंदूतील डाव्या अर्धगोलातील भाषेची केंद्रे अविकसित होती, असे त्यांना आढळून आले. पण त्यांच्या उजव्या अर्धगोलातील आलेखन आणि चित्रनिर्मितीची, अमूर्त विचाराची केंद्रे जास्त विकसित झाली असल्याची चिन्हे दिसली. यात आणखी बरेच संशोधन सुरू आहे. एरिक कँडेल या नोबेल विजेत्या मेंदूतज्ज्ञांनी 'अनेक मोठी मंडळी डिस्लेक्सिक असावीत,' असे नमूद केले आहे. 'जगप्रसिद्ध फोटोग्राफर अँसेल अॅडम, शिल्पकार माल्कम अलेक्झांडर आणि लिओनार्डो दा विन्चीसुद्धा डिस्लेक्सिक होते. हेन्री फोर्ड, विन्स्टन चर्चिल, जॉन लेनन, रॉकफेलर, वॉल्ट डिस्ने, अॅगाथा ख्रिस्ती, मार्क ट्वेन, कवी यीट्स ही सगळी डिस्लेक्सिया असलेली निर्मितिक्षम माणसे असावीत,' असे एरिक कँडेल यांनी लिहिले आहे. ते पुढे म्हणतात, 'त्याचा आशय यांच्या यशाबद्दल तसे आश्चर्य वाटायला नको. ग्रेट लेखन, कविता या कलावंताचे 'शब्द' माणसांवर कसा प्रभाव पाडतात, याच्या आकलनावर अवलंबून असतात. नुसत्या यांत्रिक कौशल्यावर म्हणजे कारागिरीवर नव्हे. असे आकलन या सगळ्या निर्मितिक्षम माणसांना होते.'





स्वमग्न नादियाची चित्रे आणि गुहाचित्रे...

एरिक कँडेल हे नुसते प्रख्यात मेंदूतज्ज्ञ नसून सखोल विचारवंत आहेत. त्यांच्या वरील विधानांचा मथितार्थ महत्त्वाचा आहे. भाषाअक्षमता हा रोग वा आजार नाही.

मेंदूच्या रचनेत काही कारणामुळे बदल होतात, डिस्लेक्सियाचा एक पट तयार होतो. त्यामुळे भाषाअक्षमता असलेली प्रत्येक व्यक्ती वेगळी असते. योग्य परिस्थिती, पर्यावरण मिळाल्यास त्या व्यक्तीतील निर्मितिक्षमता फुलून येते. शब्दाचा तर्कशुद्ध अर्थ लावण्यासाठी डावा मेंदू काम करतो, पण शब्दाचा कलात्मक उपयोग करण्याकरता उजवा मेंदू सक्षम असावा लागतो. कँडेल यांच्या विधानांचा अर्थ आता स्पष्ट होईल. डिस्लेक्सियाचे एक किंवा दोन जनुक नसतात, तर जनुकसमूह असतो. हे जनुक विविध परिस्थितीत, पर्यावरणात एक्स्प्रेस – अभिव्यक्त– होतात. या गुंतागुंतीच्या प्रक्रियेवर संशोधन सुरू आहे. डिस्लेक्सियाचा पट का असतो, हे समजण्यास मदत होत आहे. निर्मिकही या पटात असतो. तसेच दर्शक, वाचकही या पटात असतात. ही एक दुहेरी वाहतूक आहे. काहींना चित्रकला भावते, तर काहींना शिल्पकला, काहींना कविता समजते, आवडते तर काहींना इतर ललितकृती साद घालतात, असे का याचे उत्तर यात दडलेले असावे, असे विज्ञानवंतांचे म्हणणे आहे. या संशोधनाचा उपयोग बहुविध ज्ञान तसेच कलाशाखा यांच्या शिक्षणाकरता होत आहे. शिक्षण–प्रशिक्षणासाठी व्यापक इकोसिस्टिम – परिसंस्था – असेल तर त्याचा उपयोग बहुसंख्य लोकांना होऊ शकेल. प्रत्येक सामान्यामध्ये असामान्यत्वाचा अंश असतो. त्याला खतपाणी मिळाले पाहिजे; त्याची बूज राखली पाहिजे. असाही विचार स्पर्शून गेला.

**वादळ आणि तणाव**

हे सगळे टंकत होतो तेव्हा माझ्या स्मृतीचे दोर मला कोठेतरी मागे खेचत होते. आणि 'गोएट – लाइफ ॲज अ वर्क ऑफ आर्ट' या सुंदर चरित्राची आठव आली. मराठीत 'गटे–जीवन जशी एक कलाकृती.' नोंदी धुंडाळल्या. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात जर्मनीत Strum und Dreng - Storm and Stress – वादळ आणि तणाव – ही कलेची चळवळ होती. गटे (१७८९–१८३२) शिलर (१७५९–१८०५), हर्डर (१७४४–१८०३) हे नाटककार, कवी, तत्त्वज्ञ या चळवळीतील बिनीचे शिलेदार होते. या चळवळीचा साहित्य, संगीत, चित्रकला यांवर प्रभाव पडला होता. 'फक्त कलावंत जीनियस असतो,' असे या चळवळीचे म्हणणे होते. निर्मितीच्या वादळात ताणतणाव निर्माण होतात. तेथे तर्कबुद्धीला जागा नसते. तर्कबुद्धिवादाला विरोध, व्यक्तिवादाचे महत्त्व, सामाजिक कडक चौकटींपासून स्वातंत्र्य हे या चळवळीचे महत्त्वाचे पैलू होते. जीवन हे संदिग्ध, अनेकार्थी आणि गूढ असते, याची अभिव्यक्ती करण्यासाठी हर्डर नव्या भाषेच्या शोधात होता. 'तर्कबुद्धी ही मागून येणारी बुद्धी असते' असे हर्डर म्हणत असे.

आउल ऑफ मिनर्व्हा – मिनर्वाचे घुबड – हे ज्ञान आणि शहाणपणाचे प्रतीक समजले जाते. जॉर्ज हेगेल (१७७०–१८३१) या जर्मन तत्त्वज्ञाने या मिनर्वाच्या घुबडाबाबत स्वयंसिद्ध विधान केले आहे. 'पण हे मिनर्वाचे घुबड तिन्हीसांजा होऊन गेल्या, काळोख पडू लागला, म्हणजे पंख पसरून उडू लागते' याचा गर्भितार्थ 'दिवसाच्या घटना घडून गेल्या म्हणजे मग शहाणपण सुचते.'

मी हे टंकत असताना नुकताच सूर्य उगवत होता.

गतकाळातील विचार ही समाजमनात पेरलेली बीजे असतात. ती पुन्हा केव्हा कोठेतरी उगवतात. डिस्लेक्सियाच्या संशोधन विचाराला समांतर जाणारे काही धागे मला हळूहळू या चळवळीच्या विचारात दिसले. डाव्या आणि उजव्या मेंदूची कार्ये वेगवेगळी असतात. अशा वैचारिक चळवळी त्याचेच आविष्कार असतात. डाव्या आणि उजव्या मेंदूतील कार्यात कधी संघर्ष असतो, पण बरेच वेळा ती परस्परपूरक असतात. त्यामुळे संतुलन साधले जाते. हे सगळे मला हा इतिहास धुंडाळल्यानंतर स्पष्ट झाले. ते वाचकांपुढे मांडत आहे.

### ऑटिस्टिक सॅवंट

स्वमग्नता – ऑटिझम – ही अक्षमता मेंदूचा विकास होत असताना झालेल्या गडबडीमुळे होते. स्वमग्नतेचा एक पट असतो. त्यातील १० ते ३० टक्के व्यक्ती स्वमग्न – सॅवंट – या वर्गात मोडतात. सॅवंट हा शब्द मूळ लॅटिनमधून फ्रेंचमध्ये आला. इंग्लिशने तो तसाच उचलला. तेव्हा सॅवंट हा शब्द मराठीने आपलासा करायला हरकत नाही. सॅवंट एखाद्या विशिष्ट क्षेत्रात विलक्षण टॅलेंटेड – प्रतिभावान – असतो, पण इतर सर्व क्षेत्रांत, व्यवहारात त्याची कामगिरी अतिशय सुमार असते. सॅवंट त्याच्या क्षेत्रातील कामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करतो, त्याची/तिची ही क्षमता अलौकिक असते. स्वमग्न सॅवंटचे संवेदी कार्य 'सेन्सरी फंक्शन' अतिशय वाढलेले असते. स्मृतिक्षमता अफाट असते. सराव करण्याची कुवत प्रचंड असते. नॉर्मल प्रतिभावान, प्रज्ञावान माणसातही हे तीन गुणधर्म असतात पण त्यांची कर्तबगारी बहुविध क्षेत्रांत दिसू शकते.

**मेंदूच्या रचनेत काही कारणामुळे बदल होतात, डिस्लेक्सियाचा एक पट तयार होतो. त्यामुळे भाषाअक्षमता असलेली प्रत्येक व्यक्ती वेगळी असते. योग्य परिस्थिती, पर्यावरण मिळाल्यास त्या व्यक्तीतील निर्मितिक्षमता फुलून येते. शब्दाचा तर्कशुद्ध अर्थ लावण्यासाठी डावा मेंदू काम करतो, पण शब्दाचा कलात्मक उपयोग करण्याकरता उजवा मेंदू सक्षम असावा लागतो...**

स्वमग्न सॅवंटची क्षमता फक्त चार क्षेत्रांत दिसते, असे मेंदूविज्ञानाला आढळून आले आहे. ती चार क्षेत्रे : संगीत (पियानो वाजवणे), कला (चित्रकला-पेंटिंग, रेखाटने, शिल्पकला), वेगवान गणिती आकडेमोड वगैरे, मेकॅनिकल, किंवा स्पॅशिअल कौशल्ये. ही चार कौशल्ये डाव्या मेंदूचे उजव्या वरचे नियंत्रण मेंदूच्या विकासात खूप कमी झाल्यामुळे घडतात. स्वमग्नतेच्या जनुकांचाही शोध लागून उलगडा होत आहे. स्वमग्नतेचा पट का असतो, हे त्यामुळे समजत आहे.


### नादियाची नादिष्ट गोष्ट

नादिया (१९६७-२०१५) ही स्वमग्न मुलगी चित्रकलेतील सॅवंट. हिचा जन्म इंग्लंडमधील नॉटिंगहॅम येथे झाला. 'अ लाँजिट्युडिनल स्टडी ऑफ ॲन ऑटिस्टिक सॅवंट' लेखिका लोर्ना सेल्फे ही मनोवैज्ञानिक तिने नादियाचा दीर्घकालिक अभ्यास करून काही पुस्तके लिहिली आहेत. त्यातील हे एक. नादिया अडीच वर्षाची असताना अचानक चित्रे काढू लागली. पहिल्यांदा घोडे, मग इतर फार्म ॲनिमल्स. तिच्याच वयाच्या इतर मुलांच्या चित्रापेक्षा नादियाची चित्रे आमूलाग्र वेगळी होती. हे अशक्य आहे, असे त्या वेळी मनोवैज्ञानिकांना वाटले होते. नादिया विविध कोनांतून चित्रे रेखाटू लागली. या चित्रांना खोली होती, घोड्यांना गती होती. घोडा आता कागदाबाहेर उडी घेईल, असे दर्शकाला वाटायचे.

नादियाला ४८ वर्षांचे आयुष्य लाभले. अगदी सुरुवातीपासून तिच्या चित्रांचा, तिच्या जीवनाचा, मनोवैज्ञानिक, मेंदूतज्ज्ञ, चित्रकार, उत्क्रांतीवादी तज्ज्ञ, कलासमीक्षक, कलेचे इतिहासकार अशा मंडळींनी अभ्यास केला. हा ज्ञानोत्पादक अभ्यास अजून चालू आहे. नादियाचे जीवन अजून वाहत आहे. या धारेत मी वाहत गेलो.

### ज्ञानधारेचा अकुंठित ओघ

धान्य उफणताना उंचावर उभे राहून टोपलीतून धान्य एकसारखे धारेने खाली ओततात. वाऱ्याने हलके धान्य, फोलपटे राशीच्या पलीकडे जाऊन पडते. सोन्यावाणी दाण्याची रास हाती येते. ज्ञानाचे पण असेच काहीसे असावे. पिकासो म्हणाला होता, 'चित्रकलेत कोणी प्रॉडिजी – prodigy – बाळ बृहस्पती नसतात.' पिकासो स्वत: वयाच्या दहाव्या



स्टीफन विल्टशायर यांचा कॅनव्हासवरचा शहराविष्कार...

वर्षी विलक्षण आरेखनकार झाला  होता. पण तो तीन वर्षांचा असताना घोडा रेखाटू शकत नव्हता. सात वर्षांचा असताना त्याला कॅथेड्रल काढता येत नव्हते. नादियाने हे दोन विक्रम सहजतेने केले होते. बाळ बृहस्पतीचेसुद्धा प्रकार असतात, हे पिकासोला कोठे ठाऊक होते?

नादियाच्या घोड्यांच्या चित्रांचा परिणाम उत्क्रांतीवादी विचारावर झाला. ३० हजार वर्षांपूर्वी आदमीने युरोपमधील गुहेत घोड्यांचे कळप काढले होते. ती चित्रे आणि नादियाने काढलेले घोड्याच्या कळपाचे चित्र बाजूबाजूला ठेवून इंग्लंड येथील केंब्रिज विद्यापीठातील मेंदूतज्ज्ञ निकोलस हम्फ्रे (जन्म १९४३) यांनी जे विचार मांडले, त्याचा सारांश  : नादियाचे चित्र आणि गुहाचित्र याच्यात लक्षणीय निसर्गवादी साम्ये आहेत. नादियाच्या चित्रात माणसे दिसत नाहीत. चित्रे प्राण्यांची आहेत. ३० हजार वर्षांपूर्वीच्या गुहाचित्रातसुद्धा माणसे दिसत नाहीत. त्यानंतरच्या १४ हजार वर्षांपूर्वीच्या गुहाचित्रात ओबडधोबड माणसांच्या आकृती दिसतात. ३० हजार वर्षांपूर्वी माणसाची भाषीयक्षमता विकसित झाली नव्हती. जशी तीन वर्षांच्या स्वमग्न नादियाचीही झाली नव्हती. नादियाची चित्रे जणू सांगत आहेत. चित्र काढण्याकरता भाषिक क्षमतेची जरूर असतेच असे नाही. ती क्षमता ३० हजार वर्षांपूर्वीच्या आदमीमध्येही नव्हती. असे जरी असले तरी ही साम्यस्थळे अपघाताने सापडली आहेत. पण यावरून विज्ञानात ठोस निष्कर्ष काढता येत नाहीत.


नादिया पुढे भाषा शिकू लागली, पण तिची चित्रक्रिया अचानक लुप्त झाली! असे सगळ्या स्वमग्न सॅवंटच्या बाबतीत घडते का? सुप्रसिद्ध अमेरिकी मेंदूतज्ज्ञ व्ही. एस. रामचंद्रन (जन्म : १९५१) यांनी नादियाने काढलेले घोड्याचे चित्र लिओनार्डो दा विन्चीने त्याच्या कारकिर्दीमधील उच्च क्षणी काढलेले घोड्याचे चित्र आणि यथास्थित आठ वर्षांच्या मुलाने काढलेले चित्र, तसेच तिच्या इतर चित्रांचा अभ्यास करून लिहिले आहे, ‘स्वमग्नतेमुळे नादियाच्या मेंदूतील काही जागा नादुरुस्त झाल्या होत्या, पण तिच्या उजव्या मेंदूतील निर्मितीची काही बेटे सक्षम होती. ती चित्रे काढू लागली, म्हणजे तिचा मेंदू असलेली सर्व साधनसामग्री वापरून या बेटांवर पूर्ण लक्ष केंद्रित करत असे आणि चित्रे कागदावर उमटत.’

स्टीफन विल्टशायर हे  (जन्म : १९७४) हे कृष्णवर्णीय स्वमग्न सॅवंट कलावंत आहेत. लहानपणी भाषा शिकू लागल्यानंतरसुद्धा त्यांची कलाक्षमता टिकून राहिली. (नादियासारखे झाले नाही.) आज ते एक महत्त्वाचे ब्रिटिश आर्किटेक्चरल आर्टिस्ट आहेत. शालेय जीवनात स्टीफनला भाषेची अक्षमता होती, इतर मुलांबरोबर खेळण्यात, मिसळण्यात समस्या होत्या. पण त्याचा शहरचित्रे – सिटी स्केप्स – काढण्यात हातखंडा होता. लंडनमधील कितीतरी इमारतींची चित्रे त्याने काढली होती. एकदा एखादी इमारत त्याने बघितली म्हणजे, तो ती इमारत हुबेहूब, काही कमी नाही की जास्त नाही, घरी गेल्यानंतर त्याच्या स्मृतीतून काढत

असे. तो इमारतीसमोर उभे राहून नोंदी करत नसे, रेखाटने करत नसे. बालपणापासून त्याला फोटोग्राफिक मेमरी होती. वयाच्या सातव्या वर्षी त्याच्यावर पहिली कामगिरी सोपविण्यात आली. ब्रिटिश पंतप्रधान एडवर्ड हिथ यांच्याकरता सॅलिस्बरी कॅथेड्रलचे चित्र काढणे. ती कामगिरी त्याने उत्तमरीतीने पूर्ण केली. १९९८ साली स्टीफन लंडन आर्ट स्कूलमधून पदवी घेऊन बाहेर पडला. पंधरा-वीस मिनिटांच्या हेलिकॉप्टरचा फेरफटका करून स्टीफनने लंडन, न्यूयॉर्कची अप्रतिम सिटी स्केप्स केली आहेत. त्याचा हा चित्रप्रवास त्याने लिहिलेल्या पुस्तकातून पाहायला, वाचायला मिळतो.

ऑलिव्हर सॅक्स (१९३३-२०१५) हे ब्रिटिश मेंदूतज्ज्ञ-लेखक यांनी स्टीफनबरोबर बरीच वर्षे काम केले होते. त्यांनी स्टीफनबाबत काही निरीक्षणे नोंदवली आहेत. त्याचा सारांश: चित्रप्रतिभेची देणगी मिळालेल्या या कलावंतात भावनेच्या आणि बुद्धीच्या अनेक त्रुटी होत्या. भवताल जाणण्याची, आकलनाची - परसेप्चुअल - कौशल्ये त्याच्यापाशी होती, पण असे असूनसुद्धा त्याच्याकडे Empathy ही भावना नव्हती. म्हणजे ही कौशल्ये असूनसुद्धा कल्पनेने दुसऱ्याच्या अंतरंगात शिरून त्याच्या भावना जाणण्याची कुवत स्टीफनजवळ नव्हती. म्हणजे तो माणूसघाणा होता असा अर्थ नाही. त्याच्या मेंदूने ही क्षमता त्याला दिली नव्हती. तो एकल होता. सॅवंटमध्ये त्याचे टॅलेंट आरंभापासून विकसित झालेले असते. हे टॅलेंट पुढे प्रयत्नाने फार वाढत नाही. त्यांचे कलेचे उत्पादन खूप असते, पण त्याच्यात नवनिर्मिती, नवा दृष्टिकोण, नवीन प्रयोग केलेले दिसत नाहीत.

सारभूततेने म्हणायचे, तर कला म्हणजे वैयक्तिक व्हिजन, स्वची अभिव्यक्ती नव्हे काय? स्वविरहित कलावंत असू शकतो? मला वाटते, या प्रश्नातच उत्तर दडलेले आहे. कलेचे दोन घटक - पर्सेप्चुअल आणि एम्पथिक - जणू काही त्याच्या मेंदूत विलग झाले होते, असे ऑलिव्हर सॅक्स यांनी नमूद केले आहे. या विलगीकरणाच्या आधाराकरता फ्रेंच रंगभास्कर क्लॉड मनेचे विचार त्यांनी सांगितले आहेत. त्याचा सारांश : तुम्ही चित्र काढण्याकरता बाहेर पडता त्या वेळी तुमच्यासमोर घर आहे, का झाड, का शेत हे विसरण्याचा प्रयत्न करा. फक्त विचार करा, समोर निळा ठिपका आहे, लंबगोलीय गुलाबी, का पिवळी शलाका आहे. जे तुम्हाला दिसते, तो रंग, तो आकार ते रंगवा. त्या चित्रात तुमच्या मनावर उमटलेला साधा सरळ ठसाच उतरेल.



चित्रक्रियेचा सिद्धांतकार पीट मॉंड्रियन

ऑलिव्हर सॅक्सनी याचे आणखी स्पष्टीकरण दिले आहे. असे जे विभाजन यथास्थित कलाकाराला करावे लागते, तसे विभाजन स्वमग्न सॅवंटला मुद्दाम करावे लागत नाही. ते त्याच्या मेंदूत झालेले असते. म्हणून तर तो स्वमग्न असतो. डिस्लेक्सिया आणि ऑटिझम यांतील फरक मेंदूवैज्ञानिकांनी स्पष्ट केला आहे. डिस्लेक्सिक माणसांना एम्पथी - सहअनुभूती - असते. ते दुसऱ्याचे मन सखोलतेने ओळखण्याचा, जाणण्याचा, प्रयत्न करतात. डिस्लेक्सिक प्रकारच्या माणसांत सॅवंट नसतात, तरीही ही माणसे निर्मितिक्षम असतात.

**बुद्धिमत्तेचे प्रकार**

मागच्या संशोधकांच्या खांद्यावर उभे राहून पुढचा संशोधक ज्ञान उफणताना आणखी नवीन ज्ञानाचे दाणे पडत असतात. विज्ञानाची ही खुबिलिटी आहे. म्हणून मेंदूविज्ञान निरंतर विकसित होत असते. डिस्लेक्सिया तसेच ऑटिझम याचा चिंतनशील अभ्यास अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठातील सुप्रसिद्ध मनोवैज्ञानिक होवार्ड गार्डनर (जन्म : १९४३) यांनी केला. त्यांनी यथास्थित बुद्धिमत्तेच्या - इंटेलिजन्सेसच्या - प्रकाराची थिअरी मांडली. थिअरीचा सारांश असा : या गृहीतकानुसार व्हिज्युअल - दृष्टिगोचर - म्युझिकल - सांगीतिक - लेक्सिकल - शब्दगत - असे बुद्धिमत्तेचे प्रकार आहेत. त्या प्रत्येकाचे नियम आहेत आणि त्याच्या मेंदूत वेगळ्या जागा आहेत. या गृहीतकावर मेंदूविज्ञानाचे अधिकचे संशोधन सुरू आहे.

**दिव्य भावी काल**

'बुद्धिमत्ता म्हणजे त्रास भोगण्याची कुवत' अशी एक विलक्षण व्याख्या एका विचारवंताने केली आहे. भाषा-अक्षमता असलेली माणसे, स्वमग्न व्यक्ती अशी माणसे नकळत त्रास भोगत असतात, पण संशोधकांनी त्यांच्यातील बुद्धिमतेची शलाका शोधून काढली. यामुळे नवीन ज्ञानदालने तर उघडलीच आणि बुद्धिमत्ता ही कोणाची मक्तेदारी नसते, हेसुद्धा दाखवून दिले. ती कोठे दडली आहे हे शोधणे महत्त्वाचे. मेंदू हे निर्मितीचे जैविक यंत्र आहे. त्यात चित्रकलेची कौशल्ये आहेत, तशीच इतरही अनेक कौशल्ये आहेत. म्हणून तर ज्ञानाला सीमारेषा नसतात. चित्रकलेबाबत मेंदूवैज्ञानिक विचार करतात, तसेच चित्रकारही विचार करतात. विविध अनुभवांचा काढलेला अर्क म्हणजे कला. या अनुभवांचा संदिग्ध गोंधळ भवतालात उडालेला असतो. ज्याला आपण वास्तव म्हणतो. यातून आकृतिबंध - पॅटर्न - शोधून काढण्याचे काम कला तसेच विज्ञान करत असते.

पीट मॉँड्रियन (१८७२-१९४४) हा डच पेंटर चित्रकलेतील बापमाणूस. हा चित्रकार होता, पण तो चित्रक्रियेचा सिद्धान्तकारही होता. या चित्रवंताने नमूद केले आहे, 'सत्य वास्तवात दडलेले असते, हे वास्तव अनाकलनीय आहे, असे सुरुवातीला वाटते, पण पुढे विज्ञानच नाही, तर कलासुद्धा त्यातील संबंधाचे धागेदोरे उलगडत ते आपल्याकरता आकलनीय करून देते.'

विज्ञान असो वा कला, प्रत्येक संस्कृतीत मागची पिढी पुढच्या पिढीकडे संशोधनाचे तसेच पुढील प्रश्नाचे बॅटन देते आणि नवीन ज्ञानाच्या निर्मितीच्या टप्प्याची शर्यत चालू राहते. म्हणून तर कवी विनायक (विनायक जनार्दन करंदीकर) (१८७२-१९०९) यांच्या काव्यपंक्ती सार्थ ठरतात.

पूर्व दिव्य ज्यांचे, त्यांना रम्य भावी काळ बोध हा इतिहासाचा सदा सर्वकाळ...

❋ ❋ ❋

**व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असलेले डॉ. आनंद जोशी हे मराठीतले नामवंत विज्ञानलेखक, ललितलेखक आहेत. 'बोलकी हाडे', 'मेंदूतला माणूस', 'कर्कविज्ञानाची गोष्ट' (सहलेखक शेखर देशमुख), 'अक्षर पाविजे निधरि', 'व्यूहचक्र', 'आपले वर्तन, आपला मेंदू' (सहलेखक सुबोध जावडेकर) ही त्यांची अलीकडच्या काळात प्रकाशित झालेली पुस्तके आहेत. ई मेल :** drjoshianand628@gmail.com

## हलकं-फुलकं



एका धनिकाने एकदा सेंगाई या झेन गुरूला विनंती केली, माझ्या अनेकानेक पिढ्या सुखी राहतील, असा एक शुभसंदेश तुम्ही मला लिहून द्या.

सेंगाईने शुभसंदेश लिहून दिला. तो वाचल्यावर धनिकाचा पारा चढला. सेंगाईने लिहिलं होतं, आजोबा मरो, बाप मरो, मग मुलगा मरो, मग नातू मरो.

धनिक म्हणाला, हे काय अभद्र लिहून दिलंत मला? यात काय शुभ आहे?

सेंगाई म्हणाला, हा जीवनक्रम आहे. हा असाच राहो, असं लिहिलंय. विचार कर, तू जिवंत असताना तुझा मुलगा किंवा नातू मरण पावला तर तुझं कुटुंब सुखी किंवा आनंदी राहील का? उत्तम प्रकारे आयुष्य व्यतीत करून तुम्ही जीवनक्रमानुसार मरण पावू शकलात, तर त्यापेक्षा शुभ काय असेल?

- मामुमियां

# युध्द विरोधी कलाः एक कलात्मक प्रतिरोध



मंगेश नारायणराव काळे







**चित्रकलेतील, दृश्यकलेतील 'प्रतिरोध' जरी युद्धविरोधी अनुषंगाने असला तरी युद्धविरोधी कलारूपे, जी आधुनिक काळात समोर आली आहेत; ती केवळ एक कलात्मक सर्जन न राहता सर्जक कलावंताच्या नैतिक प्रतिकाराची भाषा म्हणूनही पाहता येतात. इथे त्या युद्धाला केवळ दृश्यरूप देणे हा हेतू नसतो, तर त्या युद्धातले कौर्य, हिंसा, मानवी मूल्यांचे हनन प्रेक्षक-दर्शकांसमोर आणणे हासुद्धा असतो. यातून मानवी दुःख, विस्थापन आणि मृत्यूचे भयावह वास्तव जसे समोर येते तसेच प्रतिरोधाचे एक ठळक स्वरूपही. शिवाय युद्धविषयीचा जो एक रोमँटिसिझम कल्पनेतून उभा केला जात असतो त्याचाही निरास इथे अनुस्यूत असतो.**

मानवी उत्क्रांतीत निसर्ग, ज्ञान, विज्ञान, दर्शन, कला आणि तत्कालीन काळात घडलेल्या घटितांचा महत्त्वाचा हस्तक्षेप राहिला आहे. तर दुसऱ्या बाजूने सत्ता, धर्म, आस्था, महत्त्वाकांक्षा यातून निर्माण होणारा संघर्ष, हिंसा यांतून जसे मानवी जीवन वेळोवेळी प्रभावित झाले तसेच ज्ञान, विज्ञान, कला, साहित्यही.

निसर्गकोप, अरिष्ट याप्रमाणेच युद्ध हेसुद्धा मानवी इतिहासातील सगळ्यात जुने आणि भीषण संकट आहे. त्याचा खोलवर परिणाम जसा मानवी जीवनावर झाला तसाच तो कलांवरही झाला. कधी हा परिणाम केवळ दृश्यचित्रणापर्यंत मर्यादित राहिला तर कधी विजय, शौर्य, सत्ता-प्रतीकांचा उद्घोष म्हणून झाला तर कधी वेदना, विध्वंस, मानवी मूल्यांची हानी दर्शवण्यासाठीही झाला. एक 'प्रतिरोध' म्हणूनही त्याकडे पाहिले गेले. अर्थात हा 'प्रतिरोध' कलेतून होत असल्याने 'कलात्मक प्रतिरोध' म्हणून याकडे पाहता येते.

### नैतिक प्रतिकाराची चित्रभाषा

चित्रकलेतील, दृश्यकलेतील 'प्रतिरोध' जरी युद्धविरोधी अनुषंगाने असला तरी युद्धविरोधी कलारूपे, जी आधुनिक काळात समोर आली आहेत; ती केवळ एक कलात्मक सर्जन न राहता सर्जक कलावंताच्या नैतिक प्रतिकाराची भाषा म्हणूनही पाहता येतात. इथे त्या युद्धाला केवळ दृश्यरूप देणे हा हेतू नसतो, तर त्या युद्धातले कौर्य, हिंसा, मानवी मूल्यांचे हनन प्रेक्षक-दर्शकांसमोर आणणे हासुद्धा असतो. यातून मानवी दुःख, विस्थापन आणि मृत्यूचे भयावह वास्तव जसे समोर येते तसेच प्रतिरोधाचे एक ठळक स्वरूपही. शिवाय युद्धविषयीचा जो एक रोमँटिसिझम कल्पनेतून उभा केला जातो त्याचाही निरास इथे अनुस्यूत असतो.

मात्र कलेतून साकारला जाणारा 'प्रतिरोध' हा एखाद्या विशिष्ट काळात थेटपणे समोर आलेला नाही; त्याची अनेक स्थित्यंतरे पाहता येतात. किंवा असे म्हणता येईल की युद्धचित्रण ही संकल्पना वेगवेगळ्या काळांत आकारत गेली. मध्ययुगीन युरोपातील भित्तिचित्रणांमध्ये जे युद्धचित्रण दिसते, ते विजेत्यांचे गौरवीकरण या हेतूने आलेले दिसते. तर भारतीय कलांमध्ये - विशेषतः लघुचित्रांमध्ये - आलेले चित्रण एक ऐतिहासिक नोंद म्हणून किंवा आश्रयदात्या राजाच्या पराक्रमाचे 'गौरवीकरण' म्हणून. अर्थात दोन्हींकडे 'गौरवीकरण' हेच सूत्र दिसते.

आधुनिकपूर्व काळातील अठरा व एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत जो युद्धविरोधी दृष्टिकोण दिसतो. तो अर्थातच विसाव्या शतकातील दृश्यकलेइतका उघड स्वरूपाचा नव्हता. कारण तोपर्यंत 'युद्धविरोध' ही संकल्पना पुरती आकारली गेली नव्हती. मात्र ही 'बीजे' तत्कालीन काळात काही चित्रकारांच्या चित्रातून दिसू लागली होती. या अनुषंगाने पिटर पॉल रुबन्स या चित्रकाराच्या 'The consequences of war', या चित्राचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या चित्रामागे युरोपातल्या तीन दशकांच्या युद्धाचा संदर्भ आहे. या युद्धातून उद्ध्वस्त झालेले मानवीजीवन, भग्न वास्तू, मृतदेह, पीडित स्त्रिया हे या चित्रावकाशात केंद्र आहे. बरोक शैलीत रंगवल्या गेलेल्या या चित्रात गतिमान आकृती रेखांकनातून युद्धाचा देव मार्स याला व्हीनस थांबवण्याचा प्रयत्न करते, याचे चित्रण आलेले आहे. कोणतेही युद्ध हे मानवी संस्कृतीचा विध्वंस करणारे असते हे दर्शवणे हा हेतू इथे दिसतो.

दुसरे एक चित्र, ज्याला आधुनिक युद्धविरोधी चित्रांचे पूर्वसूरी म्हणता येईल, ते म्हणजे फ्रान्सिको गोया या चित्रकाराचे 'The Disaster's of war'. ही ८२ इंचिंग चित्रांची एक चित्रमालिका असून १८१०-२० दरम्यान ही चित्रे निर्माण झाली. गोयाने ही चित्रमालिका खाजगीच ठेवली होती. ती अधिकृतपणे १८६३ नंतर प्रकाशित झाली. (ती तत्कालीन सत्ताधाऱ्यांच्या विरोधात असल्याने धोकादायक मानली गेली असती असे त्याला वाटत असावे.) स्पेनवरील नेपोलियनच्या हल्ल्याचा ऐतिहासिक संदर्भ इथे आहे. यथार्थ तरीही क्रूर चित्रण (युद्धातील मृतदेह, छळ, बलात्कार) असलेल्या या मालिकेत पहिला भाग हत्या, छळ, बलात्काराचे चित्रण असलेला, दुसरा भाग युद्धाने त्रस्त झालेली, उपासमारीने हैराण झालेली जनता तर तिसऱ्या भागात राजकीय व सामाजिक उपहासाचे चित्रण आलेले दिसते.

### कला आणि सत्याचा मिलाफ

रोमँटिसिझम आणि रिॲलिझमचा मिलाफ असलेली ही कलाकृती युद्धाची दृश्यात्मक साक्ष मानली जाते. नैतिकता विरुद्ध क्रौर्य दर्शवणाऱ्या या चित्रांबद्दल इतिहासकारांनी कला आणि सत्य यांचा मिलाफ अशी नोंद केली आहे. एकार्थाने

'मानवतेवरचे आरोपपत्र' ठरलेली ही चित्रमालिका पुढच्या शतकातील युद्धविरोधी कलेची पायाभरणी करणारी होती, असेही म्हणता येईल.

अजून एका पूर्वसूरी चित्राचा इथे उल्लेख करता येईल. युद्ध हे नेहमीच निरपराधांचे बळी घेते, याचे सूचन करणारे जाक-लुई डेव्हिड याचे 'The death of Joseph Bara (१७९४) हे ते चित्र. फ्रेंच क्रांतीतील जोसेफ बारा या लहान मुलाच्या मृत्यूचा संदर्भ या चित्रामागे आहे. ज्याचा वापर या क्रांतीच्या प्रचारासाठी केला गेला. निओ-क्लासिकल शैलीतील हे चित्र युद्धाच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे होते. या चित्राच्या अनुषंगाने आधुनिकपूर्व काळातील युद्धविरोधी कलेच्या वैशिष्ट्याचाही इथे विचार करता येईल. इथे 'विनाश' ही संकल्पना केंद्र असून त्याचे उपरोधिक दृष्टिकोणातून नाट्यपूर्ण पद्धतीने चित्रण केलेले दिसते. अर्थातच थेट युद्धविरोधी भाषा इथे नाही. आहे तो दृश्यामधून मानवतेचा संदेश पोहोचवणे हा हेतू. मात्र ही युद्धविरोधी संयत भाषा आधुनिक काळात हळूहळू बदलत गेली.

### निर्थकता आणि अराजकतेचे पर्व

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात औद्योगिक क्रांती, वसाहतवाद आणि जागतिक युद्धाच्या पार्श्वभूमीवर युद्धाच्या भीषणतेचे, वसाहतीचे चित्रण वाढत गेलेले दिसते. पहिले महायुद्ध (१९१४-१८) आणि दुसरे महायुद्ध (१९३९-१९४५) या दोन्ही घटना मानवी जीवन, कला आणि साहित्याला आमूलाग्र बदलवून टाकणाऱ्या ठरल्या. त्यांचा समाजरचना, विचारसरणी, कलाविश्व आणि मानवी मूल्यांवर खोलवर परिणाम झाला. युद्धप्रभावामुळे विवेक हरवून निरर्थकता व अराजकाने कलेत शिरकाव केला. 'दादा'सारख्या चळवळीचा यातूनच जन्म झाला. मानवी वेदना, मानसिक ताणतणाव यांचे तीव्र व विखंडित चित्रण होऊ लागले. (Expressionism) किंवा युद्धानंतरचे अवचेतन, भीती, मृत्यू यांचे कलामाध्यमातून अतिवास्तववादी चित्रण येऊ लागले (surrealism) तर दुसरीकडे अस्तित्ववादी (Existentialism) विचार ज्यॉ-पॉल सार्त्र, अल्बेर काम्यू यांच्या लेखनातून माणूस निरर्थक जगात स्वतःचे अर्थ निर्माण करतो, ही जाणीव ठळक होत गेली. समाजवादी व कम्युनिस्ट चळवळींना जोर आला. चांगले-वाईट या संकल्पना संदिग्ध होत गेल्या. युद्धोत्तर समाजातील विषमता आणि दुःखाला वाट मिळाली. या संक्रमणावस्थेतील काही महत्त्वाच्या चित्रकृतींचा इथे विचार करता येईल.

ओटो डीक्स (Otto Dix) या जर्मन चित्रकाराची 'The War' ही चित्रमालिका युद्धातील भयावह दृश्यांना अधोरेखित करणारी होती. स्वतः ओटो डिक्स या महायुद्धात एक सैनिक म्हणून लढला असल्याने त्याने युद्धातील संहाराचा प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. त्यामुळे त्याचे चित्रण प्रत्यक्षदर्शी स्वरूपाचे होते. इथे कुठेही युद्धाचे गौरवीकरण हा हेतू नव्हता.

या चित्रमालिकेची विषयवस्तू तीन टप्प्यांवर पाहता येते. युद्धपूर्व व युद्धाच्या सुरुवातीचे दृश्य आणि एक प्रकारच्या अनिष्ट छायेखालचा सैनिकी मार्च; उत्साह. युद्धकाळातील भयावहता दर्शवणारी अनेक दृश्य, गॅसमास्क घातलेले सैनिक, कुजणारे मानवी देह, जखमी व अपंग देह, चिखल, रक्त, पावसाने व्यापलेली युद्धभूमी, विध्वंस झालेली शहरे, हतबल, असहाय विखुरलेला समाज.

### निर्भीड वास्तववादाचे पोत

इथे एक प्रकारचा निर्भीड असा वास्तववाद आहे; जो युद्धातील कुरूप, अगतिक तपशील ठळक करतो. इथे जसे वेदनेचे चित्रण आहे तसाच युद्धाच्या निरर्थकतेचा उपहासही आहे. युद्धानंतर मागे राहिलेले हाडामांसाचे सापळे, मृत्यूची गडद छाया हे सगळेच (गडद रेखांकनातून आणि छाया-प्रकाशाचा वापर करून) त्यातली परिणामकारकता वाढवणारे आहे.

आजही युद्धविरोधी दृश्यकलेतील सर्वात प्रभावी अभिव्यक्ती

विद्ध्वंसाचे फटकारे



म्हणून या चित्रकृतीकडे पाहिले जाते. नाझी काळात ह्या मालिकेवर डिजनरेट आर्ट (Degenerate art) म्हणून बंदी घालण्यास आली होती. दुसरे एक उदाहरण थेट युद्धाचे चित्रण नसले, तरी इथे युद्धोत्तर जगाकडे यांत्रिक दृष्टीतून कसे पाहिले जाऊ शकते याचा प्रत्यय देणारे आहे. जोसेफ फर्नांड हेन्री लेगर या चित्रकाराने त्याच्या 'द सिटी' या चित्रातून हे केले आहे. लेगर स्वतःही पहिल्या महायुद्धात फ्रेंच सेनेकडून लढत होता आणि युद्धोत्तर जगाकडे त्याने 'यांत्रिक' दृष्टीतून पाहिले. लेगरने इथे शहराचे संपूर्ण दृश्य न दाखवता तुकड्यातुकड्यांतून आपला अनुभव साकारला आहे. या चित्राकडे युद्धोत्तर आधुनिक शहरी जीवनाचे पहिले मोठे 'दृश्यात्मक घोषणापत्र' म्हणून पाहिले जाते. ही कलाकृती थेट युद्धविरोधी नसली तरी पहिल्या महायुद्धानंतरच्या जीवनाची नवी दिशा, विध्वंस, वाताहतीऐवजी एक नवे 'निर्माण' दर्शवणारी आहे.

युद्धविरोधी प्रतिरोधाचे एक उदाहरण म्हणून जॉन हार्टफिल्ड (John Heartfield) यांच्या कलाकृतीचा उल्लेख करता येईल. फोटोकोलाज या माध्यमाचा वापर करून त्यांनी युद्धविरोधी, नाझीविरोधी, हिटलरविरोधी आणि फॅसिस्टविरोधी राजकीय अभिव्यक्ती आपल्या या चित्रांमधून उभी केली. जॉन हार्टफिल्ड तत्कालीन 'दादा' चळवळीशी संबंधित होते. त्यांच्या या कलाकृतींनी १९२०-३० या दशकात प्रचंड प्रभाव टाकला. त्यांच्या 'The meaning of the Hitler salute' (१९३२) आणि 'Hurrah, the Butter is all gone' (१९३५) या चित्रांमधून नाझी, हिटलर, शस्त्रास्त्र उद्योग, युद्धसमर्थक, भांडवलदार यांच्यावर केलेला थेट प्रहार पाहता येतो.

### युद्धविषयक चित्रप्रवाह

या पार्श्वभूमीवर भारतीय दृश्यकलेचा विचार करताना थेट युद्धचित्रण किंवा युद्धविरोधी चित्रण दिसत नाही. कारण हे युद्ध भारतीय भूमीवर घडलेले नव्हते, तर ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग असल्याने या युद्धात भारतीय सैनिकांचा सहभाग होता. यात असंख्य भारतीय सैनिकांचा मृत्यूही झाला. त्याचा थेट परिणाम मात्र तत्कालीन काळातील भारतीय चित्रकलेत दिसत नाही. दुसऱ्या महायुद्धोत्तर काळात युद्धाच्या अनुभवाने आणि त्याच्या विनाशकारी परिणामांनी कलेच्या, साहित्याच्या क्षेत्रांवर दुरगामी परिणाम केला. १९४५नंतर जागतिक कलेच्या पार्श्वभूमीवर दोन युद्धविषयक प्रमुख प्रवाह पाहता येतात.



युद्धातून उगवलेले अमानवी क्षण...

पहिला प्रवाह हा युद्धप्रसंगाचे वास्तव चित्रण किंवा युद्धाला गौरवणारा (pro-war) चित्रणाचा म्हणता येईल. ही चित्रनिर्मिती अर्थातच जनतेच्या मनात देशप्रेम आणि राष्ट्रवादाची भावना वाढवण्यासाठी, तसेच प्रतिद्वंदी देशाविषयी जनतेच्या मनात द्वेषभावना निर्माण करण्यासाठीही होती. या चित्रांच्या प्रभावातून, प्रेरणेतून सामान्य जनतेला लष्करसेवेसाठी उद्युक्त करणे हा हेतूही इथे दिसतो. विशेषतः इंग्लंडमध्ये युद्धाच्या दरम्यान कॉलेज विद्यार्थी, शिक्षक, शेतमजूर, शेतकरी यांसारखा वर्गही लष्करात तात्पुरत्या स्वरूपात जोडून घेतला जात होता. या अनुषंगाने प्रत्यक्ष युद्धभूमीवर सहभागी झालेल्या चित्रकारांचे इथे एक वेगळे उदाहरण पाहता येते. ते म्हणजे १८५९ मध्ये आर्टिस्टिक रायफल नावाची कलावंताची तुकडी जी प्रत्यक्ष युद्धात सामील झाली होती. त्यात चित्रकार, रंगकर्मी, संगीतकार अशा कलावंतांचा सहभाग होता. पहिल्या विश्वयुद्धातसुद्धा ही लष्करी तुकडी सक्रिय होती. त्या आर्टिस्टिक रायफल तुकडीत ८० सैनिक होते. ज्यात बहुतांश चित्रकार होते. जे पुरेसे प्रशिक्षितही नव्हते. दुर्दैवाने ६८ सैनिकांचा यात मृत्यू झाला. यातून वाचलेल्या जॉन नाश (John Nash, १८९३-१९७७) या ब्रिटिश चित्रकाराचे 'Over the Top' हे चित्र युद्धाभिसरण आणि मानवतेचा संघर्ष याचे एक संवेदनशील व ऐतिहासिक प्रतीक म्हणून पाहिले गेले. लंडन येथील 'इम्परिअल वॉर म्यूझियम'मध्ये हे चित्र संग्रहित केले आहे.

दुसरा प्रवाह युद्धविरोधी (Anti-war) कलाकृतींचा,

विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर झालेली. अर्थात याआधी स्पॅनिश गृहयुद्धात गुएर्निका या शहराची वाताहत झाल्यानंतर याच शीर्षकाच्या पिकासोच्या 'गुएर्निका' या चित्राचा उल्लेख करावा लागेल. हे चित्र तोवर कलाजगात युद्धविरोधी प्रतीक म्हणून ठळक झालेले होते. पिकासोने हे चित्र पॅरिस वर्ल्ड फेअरच्या (१९३७) स्पॅनिश पॅव्हेलियनसाठी रंगवले होते.

युद्धाची भयावहता, मानवी जीवितहानी, मानसिक आणि शारीरिक जखमा यांवर या युद्धविरोधी चित्रांमधून भर देण्यात येत होता. उदाहरणार्थ, इरी मरूकी आणि तोशी मरूकी (Iri Maruki, १९०१-१९९५ & Toshi Maruki (१९१२-२०००) या जपानी चित्रकार दांम्पत्याने रंगवलेल्या 'हिरोशिमा पॅनेल्स' या चित्राचा इथे उल्लेख करता येईल. १५ मोठ्या पॅनेल्समधून हे चित्र तयार झाले होते. अमेरिकेने हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब टाकला आणि ते शहर बेचिराख होऊन लाखो लोक मारले गेले, याचा ऐतिहासिक संदर्भ यामागे होता. अण्वस्त्रांचे भयावह परिणाम कलेतून समोर आणणे हा हेतू इथे दिसतो. ही वाताहत या दांम्पत्याने प्रत्यक्ष पाहिलेली होती. काळ्या आणि पांढऱ्या रंगांतून उसर्जित झालेल्या विखंडित मानवी आकृत्यांनी व्यापलेला चित्रावकाश या नरसंहाराची भीषणता दर्शवणारा होता.

स्वतः पिकासोनेही या काळात (१९५१) कोरियन युद्धातील नागरिकांचे हत्याकांड त्याच्या पूर्वीच्या 'गुएर्निका' शैलीत आपल्या चित्रातून उभे केले होते. अर्थात जितकी प्रसिद्धी पिकासोच्या 'गुएर्निका' या चित्राला मिळाली तितकी त्याच्या नंतरच्या युद्धविरोधी चित्रांना मिळाली नाही.

इथे अजून एका प्रसिद्ध युद्धविरोधी चित्राचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तो म्हणजे 'नापाम गर्ल' (१९७२) हे छायाचित्र. व्हिएतनामी-अमेरिकन छायाचित्रकार निक उट (Nik Ut) याने नऊ वर्षाची मुलगी फान थी किम फुक (Phan Thi Kim Phuc) जी नग्नावस्थेत बॉम्बहल्ल्यामुळे रस्त्यावर जीवाच्या आकांताने धावत होती तिचे काढलेले हे छायाचित्र (८ जून १९७२). व्हिएतनाम युद्धादरम्यान दक्षिण व्हिएतनामी विमानांनी चुकून स्वतःच्याच गावावर (नांग बांग) नापाम बॉम्ब टाकले. (नापाम हा अत्यंत ज्वलनशील रासायनिक पदार्थ होता; जो मानवी त्वचेवर पडल्यावर लगेचच वितळतो. आणि भयानक जखमा करतो.) गावकरी ओरडत धावत असताना निक उट याने हा क्षण आपल्या कॅमेऱ्यात कैद केला. हे छायाचित्र प्रश्न विचारते की, 'हे युद्ध मानवतेसाठी आहे की तिच्या नाशासाठी?' रस्त्यावर धावणारी मुले, स्त्रिया, माणसे, मागे प्रचंड धुरांचे लोट, उद्ध्वस्त झालेले गाव आणि किम फुक ही मुलगी नग्नावस्थेत, जखमी अवस्थेत भीती आणि वेदना घेऊन रडत धावत आहे. हे छायाचित्र असोसिएटेड प्रेसने जगभर प्रसारित केल्यावर पाश्चात्त्य समाजात, विशेषतः अमेरिकेत, व्हिएतनाम युद्धाविरोधी जनमत मोठ्या प्रमाणावर तयार झाले. युद्ध छायाचित्रणातील सर्वाधिक प्रभावी युद्धविरोधी प्रतिमा म्हणून हे चित्र आजही ओळखले जाते किंवा 'प्रोटेस्ट आर्ट'चे एक दृक् प्रभावी उदाहरण म्हणूनही विसाव्या शतकातील युद्धाच्या अमानुषतेचे सर्वात भेदक 'प्रतीक' म्हणूनही या चित्राकडे पाहिले गेले. नंतरच्या काळात अशी अनेक युद्धविरोधी चित्रे अभिव्यक्तीवादी मूर्त, अमूर्त शैलीत निर्माण झाली.

**गुएर्निकाचे पडसाद**

साल्वोदार दाली या जगविख्यात चित्रकाराच्या 'Face of war' (१९४०) या चित्राचाही इथे आवर्जून उल्लेख करता येईल. त्याचे सररिॲलिस्ट शैलीत रंगवलेले हे चित्र दुसऱ्या महायुद्धाची आणि स्पॅनिश गृहयुद्धाच्या परिणामांच्या ऐतिहासिक पृष्ठभूमीवर आले आहे. कारण दाली त्या काळात अमेरिकेत निर्वासित अवस्थेत होता. या स्पॅनिश गृहयुद्धाच्या व युरोपातील वाढत्या हिंसाचाराचा मोठा प्रभाव त्याच्यावर पडला होता. तीव्र भय, मृत्यूची अटळता आणि हिंसेचे अंतहीन चक्र म्हणूनही त्याच्या या चित्राकडे पाहता येते. दालीने स्वतःच्या या चित्राला मानसिक यातनांचे स्वयंप्रतिबिंब (Self Portrait of the Mind during war) म्हटले आहे. या चित्राच्या अवकाशात एक प्रचंड, कोरड्या वाळवंटाच्या पार्श्वभूमीवर तरंगणारा मानवी कवटीसदृश चेहरा केंद्रस्थानी आहे. कवटीच्या डोळ्यांच्या खोबणीत आणि तोंडात असंख्य लहान कवट्या त्याने इथे चित्रित केल्या आहेत. कवटीभोवती सरपटणारे साप हे सगळेच भय, मृत्यू, विश्वासघाताचे सूचन करणारे आहे. दालीने इथे त्याच्या सररिॲलिस्ट तंत्राने भयावह वास्तवाला स्वप्नासारखे चित्रित केलेले दिसते. प्रतिमांची पुनरावृत्ती आणि अशक्यप्राय दृश्यांमधून ही कलाकृती साकारली गेली आहे. अनेक अभ्यासकांनी या चित्राकडे वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यातून पाहिले आहे. पुनरावृत्त कवट्या म्हणजे युद्धाचे अखंड पुनरावर्तन,

पिढ्यान्पिढ्यातील हिंसेचा वारसा, किंवा वाळवंट आणि मानवी कवटीचे संयोजन; म्हणजे संपूर्ण विनाशानंतरची मानवी सभ्यता; जी बेचिराख झाली आहे. शुष्क, कोरडी वाळवंट झाली आहे. तिथे कुठेच ओल नाही; आहे ती केवळ शुष्कता किंवा मृत्यूची अनंत प्रतिबिंबे.

या अनुषंगाने अनेक चित्रकारांनी आपला प्रतिरोध कलात्मक अभिव्यक्तीतून उभा केला असला तरी सगळ्यात जास्त चर्चा झाली ती मात्र पिकासोच्या 'गुएर्निका' या चित्राची. ११ फूट x २५.६ फूट विशालकाय आकाराच्या या चित्राचे सर्जन काहीसे 'धनवादी' प्रभावातून झालेले असले तरी इथे भावनिक आवेग जास्त आहे. रंगमंचीय दृश्याचा आभास देणारे हे एक भित्तिचित्रात्मक कॅनव्हास पेंटिंग आहे. इथे पिकासोने काळा, पांढरा, राखाडी रंगाचा वापर केला आहे. घोडा, बैल, तुटलेली तलवार, दुःखी पीडित स्त्री प्रतिमा, विखंडित आकार यातून पिकासोने युद्धातील वेदना आणि हिंसेला मुखर केले आहे. जॉन बर्जरसारख्या अभ्यासकाने या चित्राकडे मानवी सभ्यतेच्या अंतर्बाह्य ढासळण्याचे प्रतीक म्हणून पाहिले, तर इतर अभ्यासकांनी नैतिक निषेध, एक आर्त किंचाळी, एक प्रतीकात्मक अभिव्यक्ती म्हणून पाहिले. युद्धविरोधाचे प्रतीक म्हणून जितकी मान्यता या चित्राला मिळाली तितकी मान्यता कलेच्या इतिहासात अन्य कोणत्याही चित्राला मिळाली नाही.

**भारतीय कलेतला निषेध रंग**

या पार्श्वभूमीवर भारतीय आधुनिक कलेचाही विचार करता येईल. भारतीय आधुनिक कलेत युद्धविरोधी अभिव्यक्ती पाश्चात्त्य कलेच्या तुलनेत अभावानेच आलेली आहे. जे चित्रण दिसते ते अप्रत्यक्ष युद्ध म्हणजे मानवी संघर्ष, विभाजन, जातीय दंगे, आणीबाणी इत्यादी संदर्भाने आलेले दिसते. त्यांचा इथे परामर्श घेता येईल. भारत-पाक युद्ध, बांगलादेश मुक्तिसंग्रामाच्या पार्श्वभूमीवर चित्रित झालेले मकबूल फिदा हुसेन यांचे 'हॉर्स सिरीज'मधील हे चित्र. त्यांनी आपल्या वेगवान ब्रश स्ट्रोक्समधून, धावणाऱ्या घोड्यांच्या प्रतिमांमधून युद्धाच्या उग्र ऊर्जेचे, हिंसेचे प्रत्ययकारी चित्रण गडद लाल, काळ्या प्रतिमांमधून आणि विखंडित रेखांकनातून उत्कटतेने केलेले आहे.

तैयब मेहता यांच्या 'डायगोनल सिरिज'मधल्या Falling Figure (१९६०-१९७०) या चित्रांमागे १९४७च्या फाळणीचा अनुभव आहे. या चित्रातील एकाकी मानवी आकृती - जी कोसळण्याच्या अवस्थेत आहे - हिंसा आणि अगतिकता दर्शवणारी ही 'स्थिती' मेहता यांनी तीव्र विरोधी रंग आणि विखंडित रेषांमधून अतिशय प्रत्ययकारी स्वरूपात चित्रित केली आहे.

सोमनाथ होरे यांच्या Wound Series मधल्या चित्रांचाही इथे उल्लेख करता येईल. या चित्रांमागे बंगालमधल्या दुष्काळाची पार्श्वभूमीही आहे. इथे थेट हिंसेचे चित्रण नसले तरी तिचा परिणाम दर्शवण्याचा प्रयत्न होरे यांनी कोरीव व पेपरपल्प माध्यमातून केला आहे.

इथे एका युद्धसदृश्य घटिताचा (भारतीय दृश्यकलेच्या अनुषंगाने) आवर्जून उल्लेख करावा लागेल आणि ते घटित म्हणजे १९४३च्या बंगालमधल्या दुष्काळामुळे बाधित

मानवी क्रौर्याची आणि क्रौर्यातून उद्‌भवणाऱ्या विनाशाची चित्रमालिका...



झालेले मानवी जीवन. हा दुष्काळ केवळ अन्नटंचाई म्हणून नव्हता तर त्यामागे ब्रिटिशांचे वसाहतवादी धोरण होते. या दुष्काळात लाखो लोक मृत्युमुखी पडले. उपासमारीमुळे मलेरिया, कॉलरा, क्षयरोग यांसारख्या रोगांनी मृत्यूचे भयावह तांडव निर्माण केले. रस्त्यावर सांगाड्यासारखे मुलांचे, स्त्रियांचे मृतदेह आणि हजारो लोक स्थलांतरित झाले त्याचे करुण चित्रण हे सगळेच दुसरे महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर घडलेले आहे. कारण ब्रिटिशांनी भारतातील अन्नधान्य युद्धासाठी वापरले. त्यातून मोठी अन्नटंचाई निर्माण झाली. या सगळ्याचा मानवी जीवनाप्रमाणे कला व साहित्य यांवरही परिणाम झाला. चित्तोप्रसाद, झैबुल आबेदिन या चित्रकारांनी या युद्धसदृश्य परिस्थितीचे चित्रण आपल्या चित्रातून केले. चित्तोप्रसाद यांच्या Famine Sketches (१९४३) ह्या रेखाटन मालिकेतून या दुष्काळाचे केलेले चित्रण इतके प्रत्ययकारी होते की ब्रिटिश सरकारने ही चित्रे जप्त केली. कारण ती तत्कालीन काळात राजकीय हत्यार बनली होती. उपाशी मुलांचे सांगाडे, अन्नासाठी भांडणारे लोक, भिकाऱ्यांची रांग हे चित्रण असेल किंवा झैबुल आबेदिन यांच्या Famine Series (१९४३-४४) मधील काळ्या शाईतील रेखाटने, ज्यातून सांगाड्यासारखी शरीरे, उपासमारीने विझलेले चेहरे हे सगळेच चित्रांकन भारतीय आधुनिक कलेतील 'सोशल रिॲलिझम' म्हणून पाहिले जाते.

रामकिंकर बैज यांच्या चित्र आणि शिल्पांमधूनही दुष्काळामुळे झालेले स्थलांतर, दारिद्र्य, कामगारांचे हाल याचे प्रभावी चित्रण आले आहे. या चित्रातून जसा यथार्थवादी शैलीचा उदय भारतीय कलेत झाला तसाच ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध प्रतिरोधही. भारतीय आधुनिक कलेत आलेली सामाजिक जबाबदारीची जाणीव, मानवी दुःखाचा प्रवेश, म्हणूनही याकडे पाहता येते. एकार्थाने ही प्रतिरोधाची कलाच (Protest Art) होती. बंगाल दुष्काळ या घटनेमुळे भारतीय आधुनिक कलेला सामाजिकता, युद्धविरोधी भूमिका, आणि मानवी मूल्यांची दृष्टी मिळाली. झैबुल आबेदिन आणि चित्तोप्रसाद यांच्या या काळातल्या कलाकृती मानवी वेदनांचे शाश्वत दस्ताऐवज म्हणून पाहिल्या गेल्या. शिवाय भारतीय, समाज, कला, साहित्य आणि स्वातंत्र्य चळवळीलाही नवी दिशा मिळाली. यानंतरच्या कालखंडात भारतात घडलेल्या अनेक घटनांचा परिणामही चित्रकलेवर झालेला दिसतो. यात



गुएर्निका : पिकासोचे निषेध चित्र

इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर दिल्लीत उसळलेल्या दंगली, (१९९४) शीख समुदायाचे झालेले शिरकाण, बाबरीच्या पतनानंतर मुंबईत उसळलेल्या दंगली (१९९२-९३) बॉम्बस्फोट अशा अनेक अमानुष घटनांचा इथे संदर्भ देता येईल.

मनजीत बावा या चित्रकाराचे 'कौन मरा?' हे चित्र 'प्रोटेस्ट आर्ट'चे एक महत्त्वाचे उदाहरण. शीखविरोधी दंगलीत हजारो शिखांची निघृण हत्या झाली; त्यांची घरे जाळली गेली. मनजीत बावा स्वतः शीख समुदायातले होते. या हिंसक घटनेचा त्यांना मोठा धक्का बसला. यातूनच हे चित्र आकाराला आले. एक कलात्मक प्रतिरोध म्हणून त्यांचे हे चित्र एक प्रकारे हत्याकांडातील निर्दोष जीवांचे शोकगीत म्हणून पाहता येते. फक्त मानवी शरीरच मेले नाही तर मानवी मूल्ये, माणुसकी, सहजीवन आणि न्यायसुद्धा मेला आहे, या आशयाचे हे चित्र आहे. ज्याकडे एक 'स्मृतिचिन्ह' म्हणून पाहिले जाते.

दुसरे एक चित्र मकबूल फिदा हुसेन यांचे 'The Tale of 89'. १९८९ साली रंगकर्मी व लोकनाट्य चळवळीतले कार्यकर्ते सफदर हाशमी यांची निर्दयपणे हत्या करण्यात आली होती. ही घटना भारतीय सांस्कृतिक क्षेत्रासाठी एक मोठा धक्का होती. हुसेन यांनी या हत्येच्या निषेधार्थ हे एक मोठे चित्र काढले. हे चित्र केवळ सफदर हाशमी यांची वैयक्तिक आठवण नव्हती, तर कलावंत, लोकशाही, आणि स्वातंत्र्याचा गळा आवळला जातो, तेव्हा संपूर्ण समाज जखमी होतो, हे सांगण्याचा एक प्रयत्न होता. हे चित्र आजही भारतीय आधुनिक कलेतील हिंसेविरोधी व अभिव्यक्तीच्या अधिकाराचे प्रतीक मानले जाते.

मुंबई दंगलीनंतरचे 'The Riot' Lower Parel' या चित्रातून सुधीर पटवर्धन यांच्या चित्रांकडे पाहता येईल. या मालिकेत पटवर्धनांनी शहरातील हिंसेने ग्रस्त, असुरक्षित,

विखंडित जीवन चित्रित केले आहे. तेही अत्यंत संयत शैलीत.

इथे दुसरे एक उदाहरण अतुल डोडिया यांच्या 'Broken Mirror', 'The Bombay Buccaneer' या मालिका चित्रांचे देता येईल. या चित्रातही मुंबईच्या दंगलीवर थेट भाष्य आलेले दिसते. डोडिया यांनी उपरोधिक पद्धतीने हिंसा आणि राजकीय भ्रष्टाचारावर ताशेरे ओढले आहेत.

चित्रांप्रमाणेच नव्या कलाप्रकारातून म्हणजे इन्स्टॉलेशन किंवा 'शॅडो प्ले'सारख्या नव्या कलाप्रकारातूनही हा प्रतिरोध पाहता येतो. नलिनी मालानी यांनी 'Remembering Toba Tek Sing' या कृतीतून सांप्रदायिक विभाजन आणि जातीय दंगलीचा प्रतिरोध उभा केला आणि हिंसा, दंगल, निर्वासित याकडे लक्ष वेधले.

चित्रकारांप्रमाणेच भारतीय छायाचित्रकारांचाही एक महत्त्वाचा हस्तक्षेपही इथे दिसतो. तो म्हणजे प्रसिद्ध छायाचित्रकार रघु राय यांच्या जातीय दंगलीवरील छायाचित्रांतून. ही छायाचित्रे आज या भयावह इतिहासाचा एक दृश्य दस्तऐवज म्हणून पाहिली जातात. अशा अनेक सर्जनातून भारतीय आधुनिक कलेत 'प्रोटेस्ट आर्ट' ही संकल्पना रुजली. वर्तमानकाळात विशेषतः समकालीन कलेत तर हा स्वर अधिक सजग झालेला दिसतो.

**युद्धविषयक चित्रांचा पट**


दुसऱ्या बाजूने केवळ युद्धविषयक चित्रांचाही इथे विचार करता येईल. पाश्चात्त्य कलाइतिहासात 'युद्ध' हा विषय केवळ वास्तव चित्रण, गौरवीकरण, तर कधी शोकांतिकेच्या स्वरूपातही आला. इथे अर्थातच 'प्रतिरोध' हा हेतू नाही; तरीही या चित्रणात युद्धविषय हाताळण्याच्या पद्धती, प्रेरणा आणि स्वरूप यातही क्रमाक्रमाने बदल होत गेलेला दिसतो.

प्राचीन ग्रीक-रोमन काळात जे युद्धाचे चित्रण दिसते; ते भित्तिचित्रे आणि मोझेकमधून (Mosaics). उदाहरणार्थ, अलेक्झांडर आणि दारियस यांचा संघर्ष हे चित्रण. या चित्रांमागची प्रेरणा अर्थातच शौर्य आणि साम्राज्याचा विस्तार यांचे उत्सवमूलक चित्रण ही होती. तर मध्ययुगीन व पुनरुज्जीवनवादी काळातल्या युद्धचित्रणामागे राजसत्तेचा गौरव, धर्मसंरक्षण, धर्माचा प्रसार ही प्रेरणा दिसते. उदाहरण म्हणून पाऊलो उचलोचे (Paolo Uccello) 'The Battle of San Ramono' हे चित्र पाहता येईल. हे चित्र १४३२ मधील फ्लोरेन्स आणि सिएना यांच्या युद्धावर आधारलेले आहे. तीन मोठ्या पॅनेल्समधून हे चित्र (प्रत्येक युद्ध स्वतंत्रपणे) आकारले गेले आहे.

सतराव्या व अठराव्या शतकातील बहुतांश युद्धचित्रे बरोक आणि निओक्लासिकल शैलीत चित्रित झालेली असून भव्य युद्ध दृश्ये, गतिशील रचना, शौर्यपूर्णता यांचे चित्रण इथे दिसते. या पार्श्वभूमीवर तत्कालीन भारतीय काळात युद्धचित्रे नाहीत. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जैन आणि बौद्धकला. ही कला प्राधान्याने अहिंसाप्रधान होती. त्यामुळे इथे चित्रण येते ते युद्धाच्या आयुष्यातील घटना, जातककथा, बोधीवृक्ष, धम्मचक्रप्रवर्तन, धर्मप्रसार यांवर केंद्रित किंवा जैन तीर्थंकरांचे जीवन, तपश्चर्या, ध्यान, संयम या मूलभूत संकल्पनांवर भारतात पार्शियन प्रभावातून लघुचित्र शैलीचा उदय झाल्यावर मुघल व राजपूत लघुचित्रांमध्ये युद्धचित्रे पाहता येतात. Akbar's Campaigns किंवा Battle of Panpiat सारख्या चित्रमालिकांमधून झालेले युद्धाचे चित्रण अतिशय सूक्ष्मपणे, तपशिलासह आलेले दिसते. अर्थात इथेही राजसत्तेचे गौरवीकरण हाच हेतू दिसतो.

त्यानंतरच्या काळात 'कंपनी स्कूल' आणि 'ॲकेडेमिक' रिॲलिझमच्या प्रभावातून आलेले युद्धचित्रण पाहता येते. इथे हेतू मुख्यतः दस्तऐवजीकरणाचा दिसतो. विशेषतः ब्रिटिश लष्करी मोहिमा, युद्धदृश्याचे थेट चित्रण. इथे युद्धविरोधी अभिव्यक्ती आणि नंतरच्या आधुनिक कलेतील 'प्रोटेस्ट आर्ट' याचाही तुलनात्मक विचार करता येईल. कारण दोन्ही ठिकाणी दृश्यकलेच्या माध्यमातून उभा केला गेलेला 'प्रतिरोध' आहे.

**दृश्यकलेतील युद्धविरोधी स्वर किंवा कलेतील प्रतिरोधाचे अजून एक वैशिष्ट्य इथे पाहता येईल. ते म्हणजे हा प्रतिरोध केवळ वैयक्तिक अभिव्यक्तीपुरता मर्यादित राहिला नाही. 'प्रतिरोधा'साठी म्हणूनच काही कलासंप्रदाय आधुनिक कलेत निर्माण झाले. एक सामूहिक प्रतिरोध, एक प्रतिरोधाची चळवळ किंवा शैलीत, विचारात, अभिव्यक्तीच्या स्वरूपात, माध्यमातही यातून बदल होत गेला. याचे आद्य श्रेय जाते ते 'दादा' (DADA) संप्रदायाला.**








फॅसिझमची चित्र-नोंद

सुरुवातीच्या 'प्रोटेस्ट आर्ट'मधील 'युद्धाची' जागा नंतरच्या काळात सामाजिक, वैयक्तिक अन्याय, मानवी आपदा, दुष्काळ, दंगे इत्यादींनी घेतली. इथेही अर्थातच हिंसा, दमन, शोषण हेच केंद्र आहे.

**हक्क-अधिकार आणि जागृतीचे फटकारे**

१९६०च्या दशकात अमेरिकेत सिव्हिल राइट्स मूव्हमेंट, 'व्हिएतनाम वॉर प्रोटेस्ट'सारख्या घटितांचा पोस्टर आर्ट, भित्तिचित्रे, (सार्वजनिक स्थळी) पॉप आर्ट शैलीतील राजकीय व्यंग, उपरोध दर्शवणारे दृश्य संदेश यांनी प्रतिरोधाची (protest) जागा घेतली, तर १९७०-८०च्या दशकात फेमिनिस्ट आर्ट, एल.जी.बी.टी. क्यू राइट्स, पर्यावरणीय आंदोलनातून दृश्यकलेच्या क्षेत्रात इन्स्टॉलेशन किंवा संकल्पन कला, परफॉर्मन्स आर्टच्या स्वरूपात हा 'प्रोटेस्ट' आलेला दिसतो.

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर येईपर्यंत हा प्रोटेस्ट 'अँटि ग्लोबलायझेशन', 'क्लायमेट क्रायसेस'च्या अनुषंगाने आलेला दिसतो. ग्राफिटी आर्ट, डिजिटल आर्टच्या स्वरूपात ही अभिव्यक्ती प्रामुख्याने पुढे आली.

दृश्यकलेतील युद्धविरोधी स्वर किंवा कलेतील प्रतिरोधाचे अजून एक वैशिष्ट्य इथे पाहता येईल. ते म्हणजे हा प्रतिरोध केवळ वैयक्तिक अभिव्यक्तीपुरता मर्यादित राहिला नाही. 'प्रतिरोधा'साठी म्हणूनच काही कलासंप्रदाय आधुनिक कलेत निर्माण झाले. एक सामूहिक प्रतिरोध, एक प्रतिरोधाची चळवळ किंवा शैलीत, विचारात, अभिव्यक्तीच्या स्वरूपात, माध्यमातही यातून बदल होत गेला. याचे आद्य श्रेय जाते ते 'दादा' (DADA) संप्रदायाला. या चळवळीचा विशेष म्हणजे पहिल्या महायुद्धाच्या विनाशानंतर (१९१६-१९२४) या काळात ही कलाचळवळ कलेच्या तत्कालीन स्वरूपाला, त्यातल्या स्थापित मूल्यांना, त्यातल्या दृश्य संकल्पनांना आणि माध्यमांनाही नकार देणारी ठरली. तिने शेकडो वर्षांचे कलेतले स्थापित सौंदर्यमूल्यच नाकारले. दृश्य कलेतली सत्यम् शिवम् सुंदरम् ही संकल्पनाच मोडीत काढली आणि त्याऐवजी अराजकतेचे नवे सौंदर्यशास्त्र उभे केले. सौंदर्याच्या सगळ्याच व्याख्यांची उलटापालट केली. जे कलेचे घटक कधीच नव्हते; अशा रेडिमेड व टाकाऊ वस्तूंना कलेत स्थानापन्न केले. अगदी प्रत्यक्ष सर्जनाला नकार देऊन एका 'रेडिमेड' वस्तूलासुद्धा कलारूप म्हणून पाहता येते हे ठामपणे सांगितले; कलामूल्यांचे विडंबन केले. ॲब्सर्ड, कोलाज, फोटो मोंटाजमधून नवे दृश्यरूप उभे केले. किंवा यानंतरची सोशल रिॲलिझम ही (१९३०-५०) चळवळ तर एका सामाजिक ध्येयातून म्हणजे भांडवलशाहीला आणि श्रमिकांच्या शोषणाला विरोध म्हणूनच उभी राहिली.

१९७० ते ८०च्या दशकात उभ्या राहिलेल्या दोन महत्त्वाच्या चळवळींचा इथे उल्लेख करता येईल. ज्यांचे प्रयोजन 'प्रतिरोध' हेच होते. यातली स्त्रीवाद आणि लिंगसमानतेच्या उद्दिष्टाने उभी राहिलेली 'फेमिनिस्ट मूव्हमेंट' पुढच्या काळातही तितकीच प्रभावी राहिली. यातून केवळ कलाच बदलली नाही तर कला, साहित्य, ज्ञान, विज्ञान, समाज अशा सगळ्याच क्षेत्रांत या चळवळीने क्रांती घडवून



भारतीय चित्रवंतांचे निषेध रंग...

आणली. प्रत्येक ज्ञानक्षेत्रात व कलेत स्त्रियांचा टक्का पुरुषांच्या तुलनेत सतत वाढता राहिला. आजच्या समकालीन कलेत हे अतिशय प्रभावीपणे जसे पाहता येते तसे मानवी जीवनाशी निगडित इतर क्षेत्रांतही.

या चळवळीचा प्रभाव विशेषतः दृश्यकलेतही खोलवर पडला. इन्स्टॉलेशन, परफॉर्मन्स आर्ट, मल्टिमीडिया अशा उत्तराधुनिक कलासंप्रदायाच्या माध्यमातून स्त्री-कलावंताची प्रखर भागीदारी यातून दिसू लागली. कलेच्या, साहित्य, संगीत, नृत्य, शिल्प अशा सगळ्यांच क्षेत्रात ह्या चळवळीने बळ पुरवले.

दुसरी कला चळवळ म्हणून 'स्ट्रीट आर्ट', 'ग्राफिटी' यांसारख्या कलासंप्रदायांचा विचार करता येईल. १९८०च्या दशकात सुरू झालेली ही चळवळ आजही समकालीन कलेच्या परिप्रेक्ष्यात पाहता येते. इथे समान धागा एकच आहे आणि तो म्हणजे 'प्रतिरोध' (Protest). त्यामुळे युद्धविरोध म्हणून सुरू झालेली 'प्रोटेस्ट आर्ट' ही संकल्पना समाजजीवनाच्या विभिन्न क्षेत्रांत आज स्थिरावलेली दिसते. ती केवळ सौंदर्याची अभिव्यक्ती राहिली नसून संघर्ष, प्रतिकार आणि परिवर्तनाचे माध्यम बनली आहे. अशी प्रतिरोधी कला केवळ कलेची वेगवेगळी रूपेच निर्माण करत नाही, तर कलेच्या माध्यमातून समाजातील विषमतेवर, दमनावर, अन्यायावर प्रहार करते; त्याविषयी 'ब्र' उच्चारते. नव्या अत्याधुनिक तंत्रामुळे तर हा प्रोटेस्ट अधिक सजग, समर्पक आणि बहुआयामीही होत चालला आहे. कलेत सौंदर्याबरोबरच 'विचार'ही तितकाच महत्त्वाचा ठरला आहे. आणि यातून घडणारा हा 'संवाद' जास्तीतजास्त 'वैश्विक'ही होऊ लागला आहे.

❋ ❋ ❋

**मंगेश नारायणराव काळे हे नव्वदोत्तर पिढीतील महत्त्वाचे कवी, चित्रकार, कलासमीक्षक, 'खेळ' या साहित्य, कलाविषयक नियतकालिकाचे गेल्या दोन दशकांपासून संपादक. 'चित्रसंहिता' हे कलासमीक्षेचे पुस्तक प्रकाशित.**

# मॅड (सखारामचे) दिवस!



मंगेश सातपुते









**'मॅड सखाराम' माझ्या आयुष्यातला मोठा टर्निंग पॉइंट ठरेल, याची मला पुसटशीही कल्पना नव्हती. माझ्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे प्रामाणिकपणे नाटक करायला घेतलं आणि बघता बघता आज 'मॅड'ने ६० प्रयोगांचा टप्पा गाठलाय... हा लेख छापून येईल तेव्हा कदाचित ६५–७० प्रयोग झालेले असतील. आजच्या काळात एखाद्या प्रायोगिक नाटकाचे एवढे प्रयोग होणं, हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. हा चमत्कार मी अनुभवला आहे. वर्तमानाला थेट भिडणारं हे नाटक उपहास, उपरोधाचा अचूक वापर करत अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य घेऊ पाहणाऱ्यांना दिलासा तर देतच; परंत, कधी टपल्या, कधी कोपरखळ्या तर कधी निखळ विनोदाचा आधार घेत प्रस्थापित व्यवस्थेलाही फटकारे देतं. या नाटकाला हात घालणं म्हणजे माझ्यासाठी हवाहवासा मॅडनेस अनुभवणं होतं...**

दोन हजार अठरा हे पु. ल. देशपांडेंचं जन्मशताब्दी वर्ष होतं. त्या वर्षी मला असं वाटलं की पुलंच्या एखाद्या अस्पर्शित साहित्यकृतीवर आधारित नाटक बसवावं. म्हणून सुनील कर्णिक सरांना फोन केला. (सुनील कर्णिक सर हे पत्रकारितेतलं खूप मोठं नाव. माझ्यासाठी प्रचंड वाचन असलेलं आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व.) त्यांनी लगेच 'मराठी वाङ्मयाचा गाळीव इतिहास' हे पुस्तक सुचवलं. मी ताबडतोब ते वाचून काढलं. पुढे त्याचं नाट्यरूपांतर माझे पत्रकार मित्र 'मार्मिक'चे कार्यकारी संपादक मुकेश माचकर यांनी करून दिलं आणि पुलंच्या जन्मशताब्दी वर्षात 'मराठी वाङ्मयाचा घोळीव इतिहास' या नावाने ते रंगमंचावर दाखल झालं. त्याचे प्रयोग अजूनही सुरू आहेत. कारण एकच. ते पुलंच्या पुस्तकावर आधारित आहे!

२०१९ साली 'जे जे होईल ते ते पहावे' हे नाटक केलं. त्यानंतर २०२०-२१ ही कोविडची दोन वर्षं अशीच भाकड गेली. २०२२ साली पुन्हा एकदा नवीन नाटकासाठी शोधाशोध सुरू केली. पण कुणीच नाटक लिहून देईना. अगदी माझ्याकडचे विषय देऊनसुद्धा! मग पुन्हा एकदा पुस्तकांकडे, पर्यायाने साहित्याकडे वळलो. पुलंनीच लिहिलेलं 'आम्ही लटिके ना बोलू' हे नाटक शोधत असताना हाती लागलं. पुलंनीच लिहिलेलं, 'भगवान श्री सखाराम बाइंडर!'

### सखाराम नव्याने गावला

'भगवान श्री सखाराम बाइंडर' हे पुस्तक विकत घेऊन घरी आलो. नाटक वाचलं आणि वाचत असताना एकटाच खदाखदा हसत होतो. अक्षरशः लोळत होतो! कारण त्यातली भाषा आणि त्यातले विनोद हे वेगळ्याच दर्जाचे होते. त्याचं कारण असं की तेंडुलकरांचं 'सखाराम बाइंडर' मी यूट्यूबवर बघितलं होतं आणि वाचलंही होतं. तेंडुलकरांची दोन नाटकं मला कॉलेजला असताना अभ्यासाला होती. एक होतं 'कन्यादान' आणि दुसरं होतं, 'घाशीराम कोतवाल'. या दोन्ही नाटकांवर प्रोजेक्ट केले होते कॉलेजमध्ये असताना. कारण मी साहित्याचा विद्यार्थी, बी.ए. आणि एम.ए. दोन्ही मराठी साहित्यात केलं.

तर सांगायचं असं, की तेंडुलकरांच्या नाटकांचा तर मी फॅन होतोच, पण 'सखाराम बाइंडर'वर जो गदारोळ उठला, १९७२ साली, त्या वादंगावर प्रतिक्रिया म्हणून पुलंनी हे नाटक लिहिलं, हे लगेच लक्षात आलं. त्यातली दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी लक्षात आली, ही नाटिका (दीर्घांक) पुलंनी विजय तेंडुलकरांच्या समर्थनार्थ लिहिलेली आहे. म्हणजे त्यांच्या बाजूने उभं राहण्यासाठी लिहिलेली आहे! तुम्ही नाटककाराचं अभिव्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेऊ शकत नाही. त्याला जे म्हणायचं आहे, ते त्याला म्हणू द्या, हे पुलंना त्यातून अधोरेखित करायचं आहे. कारण पुलंनी इतर जी विडंबनं लिहिली, ती टिंगलटवाळी करण्याच्या हेतूने किंवा थट्टामस्करी करण्याच्या हेतूने लिहिली. त्यांनी तसं नमूद केलेलं आहे सुरुवातीलाच. हा एक वेगळा मुद्दा लक्षात आल्यानंतर प्रचंड भारावून गेलो आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, 'भगवान श्री सखाराम बाइंडर'च्या पहिल्या पानावर श्रेयनामावलीच नव्हती. म्हणजे ते नाटक कधी झालं? कुठल्या साली त्याचा पहिला प्रयोग झाला? कोणी दिग्दर्शित केलं? कुठल्या संस्थेने केलं? कुठल्या नाट्यगृहात त्याचा पहिला प्रयोग झाला? हेही त्या पुस्तकात नव्हतं लिहिलेलं. मनात म्हटलं, 'हे भारी आहे. हे भन्नाट आहे. आपण असंच तर काहीतरी शोधत होतो, जे अत्यंत नावीन्यपूर्ण असेल आणि आजच्या काळाशी सुसंगत असेल. आजच्या काळातही लागू होणारे असेल, अगदी चपखल.

खरं सांगायचं तर आपण अशा प्रकारची साहित्यकृती शोधत होतो, त्याच्या मागची प्रेरणा कुठेतरी मागे कॉलेजमध्ये आहे! हेही नंतर जाणवलं. कारण जेव्हा कॉलेजला होतो आणि एकांकिका स्पर्धांमध्ये आम्ही भाग घेत होतो कॉलेजतर्फे, तेव्हा आम्हाला अकरावी, बारावीला प्राध्यापक विजय तापस सर होते आणि ते आमच्या 'नाट्यवलय'चे इन्चार्ज होते. त्या वेळी त्यांनी 'संगीत मूकनायक' नावाची छोटीशी नाटिका जी राम गणेश गडकरी यांनी लिहिली होती, ती शोधून काढली होती. 'संपूर्ण गडकरी' या पुस्तकातून.

### पात्रांची घडण

'सखारामा'च्या भूमिकेत माझा मित्र सुनील जाधवच दिसत होता. त्याला कारण त्याची देहयष्टी. त्याचं उंच, धिप्पाड व्यक्तिमत्त्व. कारण पुलंच्या नाटकातला जो सखाराम आहे, तो पूर्णपणे वेगळा आणि संतपदाला पोहोचलेला किंवा तसा आव आणणारा असा सखाराम पुलंनी रेखाटला होता. म्हणून मला त्याचं व्यक्तिमत्त्व अगदी उलट हवं होतं, जे मला




डबल मॅडनेसः महाराष्ट्राची हास्य जत्रा आणि मॅड सखाराम...

सुनीलमध्ये सापडलं. त्याला नाटक वाचून दाखवल्यानंतर त्यालाही ते आवडलं आणि तो लगेच ते करायला तयार झाला. कारण त्याच्यासाठी अशा पद्धतीची भूमिका ही त्याने आजवर केलेल्या भूमिकांपेक्षा वेगळी आणि खूप आव्हानात्मक होती, म्हणून ही त्याने लगेच होकार दिला. त्यानंतर लक्ष्मी (किरण प्रधान), चंपा (अलका परब), लेखक (श्रेयस वैद्य) आणि दाऊद (विशाल मोरे) या भूमिकांसाठी योग्य अभिनेते-अभिनेत्री शोधणं, ते तसे मला सापडणं हेही सगळंच खूप नाट्यमय होतं. कारण हे सगळे माझ्या आसपासच होते. माझ्यासोबत डबिंगच्या क्षेत्रात काम करत होते.

सुनील काय किंवा किरण श्रेयस, विशाल, अलका काय हे सगळे माझ्यासोबत डबिंग करतात म्हणून ते नाटकात नाहीत, तर ते उत्तम नट आहेत. त्या प्रत्येकाकडे त्यांचा असा एक सेन्स ऑफ ह्युमर आहे; ज्याला आपण पिंड म्हणतो, विनोदाचा. विनोदाची जाण आहे, अभिनयाची जाण आहे, म्हणून ते नाटकात काम करतायत आज. माझा दिग्दर्शक म्हणून विनोदाकडे बघण्याचा एक दृष्टिकोण आहे. कारण विनोदामध्येसुद्धा खूप प्रकार असतात. असो.

तर, अशी सगळी टीम जमा केल्यानंतर साधारण ऑक्टोबरमध्ये आम्ही तालमीला सुरुवात केली. जवळ जवळ दोन महिने तालमी केल्यानंतर १८ डिसेंबर २०२३ या दिवशी या नाटकाचा पहिला प्रयोग प्रबोधनकार ठाकरे, बोरीवली मिनी थिएटरमध्ये झाला. तालमीत खूप मजा आली. कारण मला प्रयोगापेक्षा नाटक बसतानाच्या प्रक्रियेची मजा घ्यायला जास्त आवडतं. अर्थातच, माझ्यासाठी हे नाटक खूप आव्हानात्मक होतं. कारण लेखक पु. ल. देशपांडे. ज्यांचं बरंच लिखाण अवघ्या महाराष्ट्राने वाचलेलं आहे. त्यातून पुन्हा त्यांच्या दोन-तीन पुस्तकांवर व्यावसायिक रंगभूमीवर नामांकित दिग्दर्शकांनी नाटकं दिग्दर्शित केली आहेत आणि ती धो धो चाललीसुद्धा आहेत. प्रचंड पैसा कमावलाय त्या नाटकांनी. त्यात खेळिया पुलंचं अष्टपैलू व्यक्तिमत्त्व.

हे सगळं डोक्यात सुरू असताना मी मात्र माझ्या दिग्दर्शनाच्या बाबतीत ठाम होतो. त्यात माझा आत्मविश्वास वाढवला डॉ. अनिल बांदिवडेकर सरांनी. त्यांना स्क्रिप्ट वाचून दाखवलं तेव्हा ते प्रचंड खूश झाले. खरं सांगायचं, तर जयंत पवार सर हे माझे आधीचे मेंटॉर होते. ज्यांना मी माझं कुठलंही (माझ्या लेखकाने लिहिलेलं) नाटक दिग्दर्शित करण्यापूर्वी स्क्रिप्ट वाचायला द्यायचो. त्यांचं मत घ्यायचो आणि

त्याप्रमाणे माझ्या नाटकांमध्ये बदल करायचो आणि मगच तालमीला सुरुवात करायचो. पण जयंत सर गेल्यानंतर अनिल सरांनी ती जागा भरून काढली. त्यांच्यासमोर झालेल्या वाचनानंतर ते ठामपणे पाठीशी उभे राहिले. म्हणाले, ''मंगेश तू जा पुढे. मी आहे सोबत तुझ्या! तू करशील ते चांगलंच करशील. स्क्रिप्टही मुळात तगडं आहे; भन्नाट आहे.'' डॉक्टरांच्या या शब्दांनी माझा आत्मविश्वास द्विगुणित झाला. आजही ते पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.

**रंगल्या तालिमी ऐशा...**

आम्ही संध्याकाळी तालीम करायचो. आपापली पोटापाण्याची कामं आटपून संध्याकाळी ६ ते रात्री १० अशी तालमीची वेळ असायची आमची. दोन महिने तालमीमध्ये खूप मजा आली. प्रत्येकाला तसं त्याचं त्याचं कॅरेक्टर सापडणं, हे थोडसं सुरुवातीला जड गेलं. कारण पुलंनी पन्नास वर्षांपूर्वी लिहिलेला विनोद आजच्या वनलाइनर्सच्या जमान्यात नटांना पचनी पडणं तसं अवघड होतं. प्रेक्षकांसमोर तर ते आल्यानंतर कळणार होतं, की ते कसं पोहोचतंय. पोहोचतंय किंवा पोहोचत नाही. पण तालमीत असं लक्षात आलं की पुलंनी त्यातला जो विनोद आहे; त्या विनोदाचं उपरोध, उपहास, अतिशयोक्ती, वक्रोक्ती असे विविधालंकार वापरून एक अजब रसायन तयार करून ठेवलं आहे, तो अजबगजब विनोद आपल्याला प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा आहे.

पंधरा दिवसानंतर कंबर कसली आणि दिग्दर्शकाच्या भूमिकेत शिरून नटांना (सहकाऱ्यांना) ते वेगवेगळ्या पद्धतींनी समजावून सांगण्याचा प्रयत्न सुरू केला. तत्पूर्वी न कळलेले विनोद आणि संदर्भ माझे सर चंद्रशेखर पाटील यांच्याकडून समजून घेतले. साधारण महिनाभर वाचन केल्यानंतर प्रत्येकाला आपापल्या वाक्यांवर कमांड आल्यानंतर खरी गंमत, खरी रंगत यायला लागली. त्यांच्यात ते कुठेतरी झिरपायला लागलं होतं, मी सांगितलेलं. पुलंची विनोदाची शैली, कुठल्या वाक्यात नेमका कुठला विनोद आहे, हे सगळं हळूहळू त्यांना कळायला लागलं होतं आणि त्यानंतर ते आपसूकच पात्रांच्या दिशेने यशस्वी प्रवास करू लागले होते. साधारण दीड महिना आम्ही फक्त वाचन करत होतो. माझ्या कामाची पद्धतच अशी आहे, की मी वाचिक अभिनयावर जास्त भर देतो. कारण मला वाक्यांमध्ये दडलेल्या गमतीजमती बाहेर काढायला खूप आवडतं. स्क्रिप्टवर काम करायला खूप आवडतं. अर्थातच त्यामुळे तुमचा नाटकाचा पाया भक्कम होतो आणि जर पाया भक्कम असेल तर मग पुढे इमारत बांधायला, इंटिरियर करायलाही खूप मजा येते.

**संकटांची नाटकं**

नाटकाची निर्मिती मी आणि सुनीलने मिळून करायची असं ठरलं असल्यामुळे पैशाचा प्रश्न सुटला होता; जो सगळ्यात महत्त्वाचा असतो. पण माझा अनुभव असा होता, नाटक किंवा इतर कामं करायला घेतली की संकटं माझ्यावर अक्षरशः चालून येतात. सगळं सुरळीत चाललेलं असताना. तशात मला एक कल्पना सुचली. पुलंनी 'भगवान श्री सखाराम बाइंडर' लिहिताना अगदी सुरुवातीपासून निवेदन म्हणून जे लिहिलं होतं आणि मधे मधे असंख्य रंगसूचना लिहून ठेवल्या होत्या – ज्या खरंतर त्यांच्या एक्सपर्ट कॉमेंट्स आहेत, वेगवेगळ्या विषयांवरच्या. म्हणजे सेन्सॉर बोर्डावर कॉमेंट होती किंवा लेखकावर कॉमेंट होती; तथाकथित संस्कृतिरक्षकांवर कॉमेंट होती. आणि अचानक कल्पना सुचली की ह्या रंगसूचना आपण कोणाच्यातरी आवाजात रेकॉर्ड करण्याऐवजी, आपल्याकडे एक चांगला नट आहे श्रेयस वैद्य, जो दाऊदचा रोल करतोय, त्याला जर आपण लेखक म्हणून किंवा लेखकाचं पात्र म्हणून स्टेजवर आणलं तर? आणि संकटाला सुरुवात झाली.

खरंतर त्याला तर संकट नाही म्हणता येणार. ही एक अतिशय उत्तम कल्पना होती, की पुलंनी लिहिलेल्या रंगसूचना (कंसातील वाक्ये) प्रत्यक्ष नटाच्या तोंडी द्यायच्या. पण गंमत अशी झाली की आता श्रेयस जर लेखकाचा रोल करणार

**''मी काल जे नाटक पाहिलं, त्याची किंमत २०० रुपये नसून ही रक्कम आहे; जी मी तुला आत्ता पाठवली.'' तत्काळ तिला फोन लावला. तिचे आभार मानले. तिला म्हटलं की, ''खरंतर आम्हाला पैसे नकोत, पण तुझं नाव दिलंस किंवा तू आमचं नाटक प्रेझेंट केलंस, प्रस्तुतकर्ता म्हणून तुझं नाव दिलं, तर आम्हाला खूप आवडेल. त्याने आमच्या नाटकाची प्रेक्षकसंख्या वाढायला मदत होईल.''**





सोनाली कुलकर्णींचा आधार मिळाला आणि 'मॅड सखाराम'चं नशीब पालटलं...

किंवा निवेदकाचा रोल करणार किंवा सूत्रधाराचा रोल करणार, तर मग दाऊदचा रोल कोण करणार? आणि माझ्या डोक्यात पुन्हा एकदा लक्ख प्रकाश पडला. विशाल मोरे. तो माझाच सहकारी. रुईया कॉलेजचा आणि तो परफेक्ट जाणार होता दाऊदच्या कास्टिंगला. त्यामुळे मी विशालला अक्षरशः शेवटचे पंधरा दिवस असताना तालमीला बोलावून घेतलं. तोही पंधरा दिवसांत टेचात उभा राहिला. आज श्रेयस आणि विशाल या दोघांनाही सुनील, किरण, अलकाच्या तोडीनेच चांगल्या प्रतिक्रिया मिळतात. शाबासकी मिळते.

**मॅडनेसचा शुभ प्रारंभ**

शुभारंभाच्या प्रयोगाला चिन्मय सुमित, डॉ. अनिल बांदिवडेकर, प्रदीप कबरे, गोट्या सावंत ही सगळी मंडळी माझ्या विनंतीला मान देऊन आली होती. प्रयोग अतिशय सुंदर झाला. त्याला कारण आमची दोन महिन्यांची मेहनत. उपस्थित सर्व प्रेक्षकांनी प्रयोग प्रचंड एन्जॉय केला. नाटक संपल्यानंतर जेव्हा डॉक्टर भेटायला आले बॅकस्टेजला, तेव्हा त्यांनी एका वाक्यात प्रतिक्रिया दिली. ''एक श्रीमंत प्रायोगिक नाटक केलंस तू मंग्या.'' आणि मला कळून चुकलं की आपण जे धाडस केलंय, ते यशस्वी झालंय.

सगळ्यांनीच कौतुक केल्यामुळे आम्हा सगळ्यांचाच जीव एकदाचा भांड्यात पडला आणि पुढील वाटचाल सुरू झाली. पण एक साधारण जानेवारी-फेब्रुवारी या दोन महिन्यांमध्येच माझी आर्थिक परिस्थिती थोडी डळमळीत झाली.

त्यामुळे मी सुनीलला म्हटलं की, ''अरे, मला यापुढे आर्थिक हातभार नाही लावता येणार, तर तू तुझा एखादा मित्र बघ. जो नाटकवेडा असेल आणि तो आपल्याला आर्थिक मदत करायला तयार होईल.'' तर त्याने क्षणभरही विचार न करता नाव घेतलं. सुरेश जाधव. ''सुरेश आपल्याला नक्की मदत करेल. सुरेश आपल्यासारखाच नाटकवेडा आहे. तो आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील.'' मी मनात हुश्श म्हटलं आणि सुरेशच्या होकाराची वाट पाहत असतानाच सुरेशने कसलाही विचार न करता होकार दिला. त्या क्षणापासून तो पाठीशी उभा राहिला. आजतागायत तो आमच्या पाठीशी उभा आहे.

**बॅकस्टेजचा डोलारा**

नाटक उभं करताना सगळ्यात जास्त मदत झाली, ती तंत्रज्ञ मंडळींची. नेपथ्य केलं आमचाच मित्र, आजचा आघाडीचा नेपथ्यकार संदेश बेंद्रे याने. त्याने खरंतर खूप मोलाची मदत केली. कारण सखारामच्या एवढा मोठा सेट (रिअलिस्टिक घर) तयार करणं, त्यासाठी लागणारा आर्थिक खर्च हा काही आम्हाला झेपण्यासारखा नव्हता. नेपथ्याची जबाबदारी संदेशने घेतली. त्याने ती पार पाडली. त्यानंतर या नाटकाचं संगीत मंदार कमलापूरकर या माझ्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या साऊंड डिझायनर मित्राने केलं. जेव्हा मी त्याला स्क्रिप्ट ऐकवलं,

तेव्हा त्याला ते इतकं आवडलं की तो लगेच तयार झाला. त्याने अप्रतिम बॅकग्राऊंड म्युझिक केलं नाटकाचं. त्यानंतर आजचा आघाडीचा प्रकाश योजनाकार आमचा अमोघ फडके त्यानेसुद्धा खूप छान प्रकाशयोजना केली नाटकाची. त्यानंतर राष्ट्रीय पुरस्कार विजेता वेषभूषाकार महेश शेरला हा आणखी एक मित्र. त्यानेही अप्रतिम वेषभूषा केली.

या सगळ्यांचीच खूप मदत झाली. त्यांच्याशिवाय मॅड सखाराम अपूर्ण आहे; अपूर्ण होता आणि आणि अपूर्ण राहील. मी सतत मदत हा शब्द वापरतोय त्याला कारण प्रायोगिक नाटकात मानधन नसतं, हे माहीत असूनसुद्धा केवळ नाटकाच्या प्रेमापोटी आपलं काम चोख करायचं हे सोपं नाही.

**'सो कुल' पाठिंबा**

मला आजही तो दिवस लख्ख आठवतो. १२ एप्रिल २०२४ या दिवशी आमचा प्रयोग होता शिवाजी मंदिरला आणि त्या दिवशी सोनाली कुलकर्णी प्रयोग बघायला आवर्जून आली होती. प्रयोग संपल्यानंतर ती खूप खूश दिसत होती आणि अस्वस्थही. ती सगळ्यांना भेटली. प्रत्येकाचं कौतुक केलं. दुसऱ्या दिवशी ती फोनवर माझ्याशी पंधरा मिनिटं बोलली. अर्थातच ती माझं आणि माझ्या टीमचं कौतुक करत होती आणि पुलंविषयी, पुलंच्या ग्रेटनेसविषयी बोलत होती. एका समकालीन लेखकाच्या पाठीशी दुसऱ्या लेखकाने उभं राहणं ही किती मोठी गोष्ट आहे आणि हीच महाराष्ट्राची संस्कृती आहे; हाच खरा महाराष्ट्र आहे, असं तिच्या बोलण्याचं सार होतं.

फोन ठेवल्यानंतर तिने एक रक्कम मला ट्रान्सफर केली. म्हणाली, ''मी काल जे नाटक पाहिलं, त्याची किंमत २०० रुपये नसून ही रक्कम आहे; जी मी तुला आत्ता पाठवली.'' तत्काळ तिला फोन लावला. तिचे आभार मानले. तिला म्हटलं की, ''खरंतर आम्हाला पैसे नकोत, पण तुझं नाव दिलंस किंवा तू आमचं नाटक प्रेझेंट केलंस, प्रस्तुतकर्ता म्हणून तुझं नाव दिलं, तर आम्हाला खूप आवडेल. त्याने आमच्या नाटकाची प्रेक्षकसंख्या वाढायला मदत होईल.'' तर ती म्हणाली, ''मी नुसतं नाव देणार नाही मंगेश, मी त्यातला खर्चाचा जो वाटा आहे, तोही उचलणार.'' मी तिला खूप विनवून पाहिलं, ''पैशांची काही गरज नाही. पैशाने नाती बिघडतात. व्यवहार आला की मैत्री तुटते. त्यापेक्षा तू फक्त तुझं नाव दे.'' पण ती तिच्या मतावर ठाम होती. तिने तिच्या नकळत पुलंच्या पावलावर पाऊल ठेवलं होतं. एका दर्जेदार कलाकृतीच्या पाठीशी ती खंबीरपणे उभी राहिली होती, जसे पुलं विजय तेंडुलकरांच्या पाठीशी उभे राहिले होते. ही बातमी 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये छापून आली आणि त्यानंतर आमच्या नाटकाचं नशीबच पालटलं.

**अपनी तो चल पडी मामू!**

'मॅड सखाराम'ने त्यानंतर आजतागायत मागे वळून पाहिलं नाही. प्रेक्षकसंख्या तर वाढलीच, पण प्रसारमाध्यमांनी आमची चांगली दखल घेतली. नाटक पुलंचं आहे, त्याचबरोबर ते पन्नास वर्षांत कोणी केलं नाही आणि सोनाली कुलकर्णी या नाटकाच्या पाठीशी उभी आहे, असा अपूर्व योग जुळून आला. नाटकाची घोडदौड सुरू झाली. त्यानंतर आम्ही महाराष्ट्रभर प्रयोग केले. माणगाव (डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती दिन), जळगाव (मैत्र महोत्सव, आयोजक शंभू पाटील) भुसावळ (खानदेश महोत्सव, अनिल कोष्टी), कुडाळ (बाबा वर्दम नारायण महोत्सव) कणकवली (वामन पंडित) इथल्या नाट्य महोत्सवांमध्ये आग्रहाने बोलावणं आलं. त्याचबरोबर नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर (NMACC) तसेच एनसीपीए या नामांकित संस्थांनीसुद्धा आम्हाला प्रयोग करण्याची संधी दिली, ती केवळ सोनालीमुळेच! १८ डिसेंबर २०२३ रोजी सुरू झालेला प्रवास आधी रौप्य महोत्सवी, सुवर्ण महोत्सवी प्रयोगाचा टप्पा गाठू शकला. हे केवळ पुलंची पुण्याई आणि सोनालीचा खंबीर पाठिंबा या दोन गोष्टींमुळेच शक्य झालं. मला खात्री आहे की शतक महोत्सवी प्रयोगाचा टप्पादेखील आम्ही सारे नक्कीच गाठू! कारण आम्ही सारे मॅडच आहोत की!

**थँक्यू सखाराम!**

आज 'मॅड सखाराम' या नाटकाने मला काय दिलं असा माझ्या मनात प्रश्न येतो तेव्हा जाणवतं, की या नाटकाने मला सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे जगण्याचं बळ दिलं. कारण माझ्या आयुष्यातून नाटक वजा केलं, तर काहीच उरत नाही हे माझ्या तेव्हाच लक्षात आलं होतं, जेव्हा मी व्यावसायिक नाटकांमध्ये थोडंसं अपयश पचवूनसुद्धा पुन्हा प्रायोगिक रंगभूमीकडे वळलो. मला असं जाणवलं की आपल्याला

जे करायचं असतं, ते इथेच खऱ्या अर्थाने करायला मिळतं किंवा प्रयोग करायला मिळतोय. आपल्या कल्पना प्रत्यक्षात मांडण्याचं पूर्ण स्वातंत्र्य प्रायोगिक रंगभूमीवरच मिळतंय. याच जाणिवेतूनच मी 'मराठी वाङ्मयाचा घोळीव इतिहास', त्यानंतर 'जे जे होईल ते ते पहावे' आणि त्यानंतर 'मॅड सखाराम' ही सलग तीन प्रायोगिक नाटकं रंगभूमीवर सादर करू शकलो.

दरम्यानच्या काळात वैयक्तिक आयुष्यात खूप पडझड झाली होती. त्यामुळे मानसिक खच्चीकरण तर झालंच होतं, पण जगण्याची उमेद कुठेतरी हरवून बसलो होतो. अशा काळात मला पुस्तकांनी जगण्याची उमेद दिली. लॉकडाऊननंतर अक्षरशः मला वाचनाचं वेड लागलं. त्यामुळे पुलंनी लिहिलेलं 'भगवान श्री सखाराम बाइंडर' या वाचनवेडापायी माझ्या हाती लागलं. या नाटकाने माझं पूर्ण आयुष्यच बदलून टाकलं. एक दिग्दर्शक म्हणून मला प्रेक्षकांपर्यंत पोहोचवलं. नाटक, सिनेसृष्टीतल्या दिग्गजांपर्यंत पोहोचवलं.

'हे नाटक तुला कुठे सापडलं? आम्ही कसं वाचलं नाही आजपर्यंत? तू हे नेमकं कसं शोधलंस? व्हॉट्सॲपवर फोटो पाठव त्या पुस्तकाचा, पहिल्या पानाचा. प्रकाशन कुणाचं आहे, त्या पानाचा फोटो पाठव', असे असंख्य फोन आले. हे सगळं फार रंजक होतं माझ्यासाठी आणि माझ्या टीमसाठी. पण मी शांत होतो. कारण सेन्सॉर सर्टिफिकेट माझ्या नावावर होतं.

तेंडुलकरांनी 'सखाराम बाइंडर' या नाटकातून लग्नसंस्थेला प्रश्न विचारला होता आणि पुलंनी त्यांच्या 'सखाराम'मधून त्यांच्या मॅड शैलीत बुवाबाजीवर भाष्य केलं होतं. मला आणि माझ्या टीमला ते उमगल्यामुळेच आम्ही यशस्वी झालो होतो. तालमीच्या दरम्यान म्हणजे, रोज रात्री तालीम संपवून मी घरी आल्यानंतर कमलाकर सारंग यांचं 'बाइंडरचे दिवस' हे



चित्रा पालेकर आणि मकरंद अनासपुरेंची दाद

पुस्तकदेखील वाचत होतो. त्यांना कधी भेटलो नाही, पण आज त्यांची प्रकर्षाने आठवण येते. तेव्हाच्या तथाकथित संस्कृतिरक्षकांनी त्यांच्या बाइंडरवर आक्षेप घेतल्यानंतर प्रयोग व्हावेत म्हणून त्यांनी दिलेला लढा आणि केलेला संघर्ष यापुढे मला माझ्या जगण्याचा संघर्षसुद्धा थिटा वाटतो. खरंच, विजय तेंडुलकर, पु. ल. देशपांडे, कमलाकर सारंग ही खूप मोठी माणसं होती. आपल्या समकालीन लेखकाच्या पाठीशी उभं राहणं ही साधी गोष्ट नाही. पण ती पुलंनी करून दाखवली. अगदी त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत सोनाली कुलकर्णी 'मॅड'च्या पाठीशी उभी राहिली, हीसुद्धा ऐतिहासिक गोष्टच म्हणावी लागेल. हीच महाराष्ट्राची 'खरी' संस्कृती!

❋❋❋

**सामाजिक जाणिवा जपत रंगभूमीवर कारकीर्द घडवणाऱ्या दिग्गजांचा वारसा पुढे नेणारे अशी मंगेश सातपुते यांची ओळख आहे.**

**संपर्क:** ९९३०५ ५३३१८

# रखमत उझबेकिस्तान!

(पृष्ठ क्र. १४ वरून पुढे सुरू)

**खुसखुशीत कारखाना**

वर तंदूरमध्ये नान भाजण्याचा कारखाना असा उल्लेख मी केला. कार म्हणजे काम. जिथे काम चालतं, कोणत्या ना कोणत्या उत्पादनाचं काम चालतं, तो कारखाना. वर्कशॉप. इथे वस्तू तयार होतात आणि विक्रीलाही ठेवल्या जातात. चोरसु बाजारात विशिष्ट आकारातले गोल, खेळातल्या रिंगसारखे पण मधे भरीव नान भाजण्याची प्रक्रिया बघणं हा एक मजेदार अनुभव असतो. मजेदार दुरून पाहणाऱ्याला. पेटलेल्या तंदूरच्या भयंकर जाळात काठीने नान सारून तंदूरच्या तापलेल्या भिंतीला चिकटवण्याचं आणि भाजलेला नान काठीनेच तिथून काढण्याचं काम करणाऱ्या पुरुषासाठी हे प्रचंड मेहनतीचं काम. नुकुसच्या रेस्टॉरंटमध्ये शिरताच हॉलच्या डाव्या बाजूला काचेच्या दारातून पलीकडच्या खोलीत तंदूरमध्ये नान भाजणारा कामगार दिसला. जोर लावून तो टेबलावर नान लाटत होता. लाटलेला नान तंदूरमध्ये भाजत होता. खमंग भाजून निघालेल्या नानचे सुरीने त्रिकोणी तुकडे करत होता. ह्या रेस्टॉरंटमध्ये हे आपल्याकडे मिळतात त्या आकाराचे नान मिळाले. मसाला आणि कांद्याची पात घालून चविष्ट केलेले खुसखुशीत नान. (आपल्याकडे खाता खाता गार झाले की वातड होतात आणि दातांची परीक्षा पाहतात.)

रिंगच्या आकाराचे मोठे गोल नान टोपलीत मांडून विकायला नेणारी उझबेक तरुणी जाहिरातीच्या होर्डिंगवरही हसत असते.

समरकंदमध्ये पेपरमॅश आणि त्याच्या वस्तूंचा कारखाना पाहिला. विशिष्ट झाडाच्या थोड्या जाड काटक्यांची साल सोलून ती पाण्यात भिजवली जात होती. गरम पाण्यात शिजवली जात होती. मग त्या लगद्याचं रूपांतर कागदामध्ये केलं जात होतं. कारखान्याचा परिसर म्हणजे एक प्रसन्न बागच होती. बागेतून धावणारा कालवा, त्या कालव्याच्या पाण्यावर विहिरीवरच्या पायरहाटासारख्या लाकडी उपकरणाच्या साहाय्याने आतल्या बाजूला पेटवलेली शेगडी. कालव्यावर छोटे छोटे लाकडी पूल. एका दालनात पेपरमॅशच्या विविध वस्तू विकायला ठेवलेल्या. त्यात सिल्कचा आभास देणारा कागद, त्यावरची चित्रं, नकाशे, फॅन्सी बॅग्ज, पर्सेस, पेनहोल्डरसारख्या वस्तूंबरोबरच पेपरमॅशचे कपडेही होते.

पॉटरीच्या वर्कशॉपमध्ये चिनीमातीच्या भांड्यावर नक्षी रंगवण्याचं काम चालू होतं. ही भांडी – लहान मोठी बोल्स, किटल्या, सुरया, फ्लॉवरपॉट्स – मशीनच्या मोल्डमध्ये आणि कुंभाराच्या फिरत्या चाकावर हाताने अशा दोन्ही प्रकारे केली जात होती आणि त्यावर चित्रांचं आरेखन करून ब्रशने रंग भरण्याचं बारीक काम एकाग्र होऊन करणारे कामगार होते. एका मोठ्या वाड्यातच हा एका पारंपरिक भांडी बनवणाऱ्या कुटुंबाच्या मालकीचा कारखाना होता. कारखान्याच्या संस्थापकाची तरुण नात आम्हाला कारखाना दाखवत होती; सगळ्या प्रक्रिया समजावून सांगत होती. वाड्याच्या मधोमध खुल्या चौकात झाडं–फुलझाडं होती, पण मुख्य म्हणजे गुरांच्या शेणाचे ढीग आणि थापलेल्या गोवऱ्या होत्या. एकीकडे गोठ्यात म्हशी होत्या. ह्या गोवऱ्यांवरच ही भांडी भट्टीत भाजली जातात आणि वाड्याच्या ओसरीत सुकवली जातात.

ह्या कुटुंबाचं कापडावरच्या भरतकामाचंही वर्कशॉप शेजारच्याच दालनात सुरू होतं. तिथे कारागीर स्त्रिया हातमागासारख्या चौकटीवर ताणून उभ्या केलेल्या कापडावर बारीक भरतकाम करत होत्या. समोर डिझाइनचा कागद. ही डिझाइन्स वर्कशॉप दाखवणारी, कारखान्याच्या मालकाचीच

**नुकुसच्या रेस्टॉरंटमध्ये शिरताच हॉलच्या डाव्या बाजूला काचेच्या दारातून पलीकडच्या खोलीत तंदूरमध्ये नान भाजणारा कामगार दिसला. जोर लावून तो टेबलावर नान लाटत होता. लाटलेला नान तंदूरमध्ये भाजत होता. खमंग भाजून निघालेल्या नानचे सुरीने त्रिकोणी तुकडे करत होता. ह्या रेस्टॉरंटमध्ये आपल्याकडे मिळतात त्या आकाराचे नान मिळाले. मसाला आणि कांद्याची पात घालून चविष्ट केलेले खुसखुशीत नान.**

तरुण नात स्वतः कागदावर काढून देत असते. मालकाचं कुटुंब स्वतः कारागिरीत सामील असतं. असं एकूण जिथे तिथे पाहायला मिळालं.

शाखरूख ह्या आमच्या ड्रायव्हरच्या शिफारशीवरून पाहायला मिळालेल्या गालिच्यांच्या वर्कशॉपचीही तीच कथा. तिथल्या संस्थापकांची मध्यमवयीन मुलगी वर्कशॉप दाखवत, विणकामाच्या शैलींची, कामाच्या स्वरूपाची माहिती देत फिरू लागली. इथले वैशिष्ट्य भिंतीभिंतींवरून चकित करत होतं. रेशमाने भरलेली पोर्ट्रेट्स, भव्य लँडस्केप्स पाहून पेंटिंग्जचा आभास होत होता. ऐश्वर्या रायसारख्या फिल्म स्टार्सपेक्षाही लक्ष खिळवून ठेवत होती ती काही वर्षांपूर्वी अफगाणिस्तान उद्ध्वस्त होत असतानाच्या काळात त्या उद्ध्वस्त, अत्याचारग्रस्त अफगाणिस्तानचंच प्रतीक ठरलेल्या, जणू अवघ्या जगाला प्रश्न विचारणाऱ्या, धारदार, तिखट नजरेच्या अफगाणी तरुणीचं रेशमात रेखलेलं चित्र. कारखान्याच्या संस्थापकांचंही एक पोर्ट्रेट मुलीने अभिमानाने दाखवलं. तरुणपणी कफल्लक अवस्थेत अफगाणिस्तानातून येऊन इथे ही कला बायकोकडून शिकून हा व्यवसाय उभा करण्याच्या जिद्दीचं ते चित्र होतं. आज मोठ्या प्रमाणावर इथे रेशमाचे, लोकरीचे तऱ्हेतऱ्हेच्या डिझाइनचे गालिचे हातमागावर विणले जातात, विकले जातात. कुणा रसिकाला स्वतःचं पोर्ट्रेटही गालिच्यात विणून मिळू शकतं. हातमागावर विणणाऱ्या कारागीर महिलेच्या पायावर चित्रकाराने आपल्या हातातला ब्रश ठेवावा, असे व्यक्तिचित्रांमधले, लँडस्केप्समधले, फ्रीहँड डिझाइन्समधले बारकावे, जिवंत भावप्रकटन, रंगसंगती...

बुखाराच्या बाजारात मिनिएचर पेंटिंग्जचं मोठ्ठं दुकान होतं. दुकानाच्या बाहेर ओट्यावर एक तरुण मुलगा एकाग्रपणे चित्र काढत होता. फूटपट्टीने कागदावर नेमकी बारीक मोजमापं जोखून बघत होता. एकदाही ह्या मुलाने वर मान करून इकडे तिकडे पाहिलं नाही. दुकान म्हणजे मिनिएचर पेंटिंग्जची आर्ट गॅलरीच होती. त्यात वाळवंटातल्या पूर्वापारच्या जीवनाची चित्रं होती. बारकाव्यांसहित, रंगछटांसहित. जगण्याच्या वाळवंटी रखरखाटातही कलेचा ओलावा निर्माण करणाऱ्या जीवनातल्या कवितेची, संगीताची, प्रेमाची चित्रं. त्यात उमर खय्याम आपल्या सुरा सुंदरीसह रुबाया जगत होता. मार्को पोलो, अल बेरुनी, इब्न बतूता आणि कितीतरी धाडसी प्रवासी प्रवासाला निघाले होते. सुलतानाच्या राजेशाही ऐशोआरामाची चित्रं होती आणि वाळूच्या तुफानात गुडघ्यात डोकं खुपसून बसलेला, ज्यामुळे ज्याच्या डोक्यावरचा भलामोठा साफाच काय तो दिसतो आहे असा दरवेश होता. भारतीय अकबराने आपल्या तसवीरखान्यात रामायण–महाभारताला सन्मानाने पाचारण करून मिनिएचर शैलीत मानवाकृतींना वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळवून दिलं. तो तर होताच भारतीय संस्कृतीच्या रंगात रंगलेला कलारसिक. पण ह्या मिनिएचर चित्रशैलीनेसुद्धा कुठून कुठून प्रवास करत धर्माच्या हट्टाग्रहांवरही मात करत केवढी क्रांती केली आहे, याचं प्रत्यंतर बुखारातलं हे मिनिएचर पेंटिंग्जचं वर्कशॉप बघताना मनात येत राहिलं. तेवढ्यात दुकानात बारीक ब्रशने चित्रात रंग भरत असलेला एक तरुण उठून आला आणि मग त्याने प्रत्येक चित्रावर काही ना काही सांगायला सुरुवात केली. स्वतःचे ब्रश दाखवले, रंग दाखवले, रंग कसे तयार केले जातात त्याचं वर्णन केलं. पण तो रंगवत असलेल्या चित्रातले चेहरे कोरे होते. फक्त त्वचेच्या रंगाने रंगलेले, पण नाक, डोळे गायब. असं का विचारल्यावर म्हणाला, 'डोळे रंगवायचं काम खुद्द उस्ताद करतात. ते काम करायला मला अजून पाच वर्षं तरी लागतील.'

ही वर्कशॉप्स म्हणजे नव्या होतकरू कारागिरांना त्या त्या कलेचं प्रशिक्षण देणारे मदरसेच होते. पर्यटकांच्या जिज्ञासा शमवणारी पर्यटन–फ्रेंडली केंद्रं होती. कलाकौशल्याच्या वस्तू खरेदी करण्याची दुकानेही होती.

बुखारातल्याच एका शोभिवंत मदरशाच्या इमारतीत कपड्यांची, चित्रांची, लाकडी वस्तूंची अशी दुकाने पाहत हिंडलो, तर तिथे संध्याकाळच्या फॅशन शोच्या आयोजनाची तयारीही चालू होती. मधला प्रशस्त चौक पाण्याने धुतला जात होता. तिकीट विक्री चालू होती. संध्याकाळच्या शोचं तिकीट काढलं. संध्याकाळी ७ वाजता चौकात उत्सवी वातावरण होतं. परफॉर्मर्ससाठी मधली जागा मोकळी ठेवून भोवतालची टेबलं–खुर्च्या मांडून टेबलांवर चहाची व्यवस्था केलेली होती. तिकीट पाहून टेबलांकडे नेणाऱ्या आयोजकांची लगबग चालू होती. बहुतेक प्रेक्षक हे युरोप–अमेरिकेतून आलेले पर्यटक. आम्ही तीन भारतीय सोडलो तर! शो सुरू झाला. उजव्या बाजूला उभ्या केलेल्या पार्टिशनमागून मॉडेल तरुणी कॅटवॉक करत आणि आपल्या अंगावरचे उझबेक गाऊन – कलाक – फलकारत मधल्या मोकळ्या जागेत येत होत्या. दगडी चेहऱ्याने टॉप आणि पँट्सच्या रंगीबेरंगी मखमली








चॉय मॉय टॉय...आणि नान बाजार

पोशाखावर परिधान केलेल्या कलाकांचं प्रदर्शन करून पार्टिशनआड परतत होत्या, तोवर दुसऱ्या दोघी-तिघी आणखी नव्या रंगांचे गाऊन फलकारत प्रवेश करत होत्या. फॅशन शोच्या दर एक राऊंडनंतर डाव्या बाजूच्या पार्टिशनआडून पारंपरिक वेषातल्या मुली लोकनृत्याचे पदन्यास करत पुढे येत. सादरीकरण करून पार्टिशनआड परत जात. शोच्या पुढच्या राऊंडला जागा करून देत. दगडी चेहऱ्याच्या मॉडेल्सच्या फॅशन शोच्या मुख्य कार्यक्रमापेक्षा लोकनृत्यातल्या जोशपूर्ण जिवंतपणाने, मधोमध हसऱ्या चेहऱ्याने नृत्याचा खरा आनंद घेत नाचणाऱ्या लाल पोशाखातल्या तेरा-चौदा वर्षांच्या चिमुरडीने कार्यक्रमात जान आणली होती. प्रेक्षकही तेवढ्यापुरते समोरच्या किटलीतून चहाचा बोल भरायला थांबत असावेत. बाकी चहापान, मधून मधून मनुका, बदाम तोंडात टाकणं हा कार्यक्रमाचा भाग होताच. फॅशन शोमधल्या मॉडेल्सना हसण्याची परवानगी का नसते, हा एरवीही पडणारा प्रश्न भोवतालच्या निळ्या नक्षीने सदैव हसणाऱ्या भिंती, कमानींच्या नेपथ्यात जरा जास्तच टोचत राहिला. पण ऐतिहासिक स्थळांच्या विविध प्रकारे वेगवेगळ्या व्यावसायिक हेतूंसाठी केल्या जात असलेल्या वर्तमान वापराचं कौतुक वाटल्याशिवाय राहिलं नाही हे खरंच. इथेच येऊ घातलेल्या एका कॉमेडी शोचीही जाहिरात एका बाजूला एकाच ठिकाणी बाहेर झळकत होती. मुल्ला नसरुद्दीनच्या कथांवर आधारित कार्यक्रम होता. ह्याच मदरशाच्या समोर बागेत मुल्ला नसरुद्दीन ह्या अमर कथानायकाचा गर्दभारूढ पुतळा आहे.

खिवामध्येच एके रात्री एक मास्टर क्लास अटेंड करायचा होता. हे आमचं वर्कशॉप! डम्पलिंग बनवण्याचं. मुराद आम्हाला एका घरात घेऊन गेला. घराची मालकीणच आम्हाला तिच्या स्वयंपाकघरात डम्पलिंग करायला शिकवणार होती. ती आणि तिची टीनएजर मुलगी दोघींना उझबेक भाषेशिवाय इतर कोणती भाषा येत नव्हती. पण काही अडलं नाही. बाईंनी अंडं घातलेला मैदा आधीच भिजवून ठेवला होता. सुलक्षणाला टेबलावर लाटायला सांगण्यात आलं. सुलक्षणा अंगातला सगळा जोर लावून लाटू लागली. दमली तेव्हा बाईंनीच टेबलभर चपाती लाटली. एकीकडे त्यांनी सांगितल्यानुसार मी दोन अंड्यांचं बॅटर मीठ आणि तेल घालून करून ठेवलं. लाटलेल्या चपातीची एक घडी घालून वाटीने गोल चकत्या पाडण्यात आल्या. आता डम्पलिंगसाठी करंजी चिकटवावी तशा एकेक चकतीच्या कडा चिकटवून मधल्या मोकळ्या जागेतून अंड्याचं बॅटर चमच्याने घातलं. करंजी करून उकळत्या पाण्यात सोडली. ती उकडून डम्पलिंग तयार! अरेच्चा, एवढा वेळ अंगमेहनतीचा डोंगर पोखरून, कलाकुसर करून हाती आला तो डम्पलिंगचा उंदीर! तेवढ्या वेळातही एकदा सुलक्षणाने आणि एकदा मी असं दोन वेळा आम्ही बॅटरच्या चिमुकल्या भांड्याला धक्का मारून बॅटर सांडून बाईंचं काम वाढवून ठेवलं. आमच्या शिक्षिका बाईंचा

संयम वाखाणण्यासारखा. काही न बोलता टेबल आणि फरशी पुसून घेतली. ह्या सगळ्या खेळादरम्यान तिसरा भिडू सुनील हा फक्त निरीक्षकाच्या भूमिकेत होता. त्याच घरी डिनरचा बेत होता. म्हणजे आता आपणच केलेले डम्पलिंग आपणच खायचे होते. सुदैवाने डम्पलिंगवरच गुजराण करायची वेळ आली नाही. प्लाव, चिकन, सॅलड्स, स्वीट्स अशी सुग्रास मेजवानी होती. अर्थातच चहाही.

**चायखाना**

जपानच्या टी सेरेमनीविषयी आपण वाचलेलं-ऐकलेलं असतं. काहींनी तो अनुभवलेलाही असतो. चीनचा तर चहा या प्रकरणावर पहिला हक्क. उझबेकिस्तानच्या संहितेतही चाय हे मुख्य पात्रांपैकी एक आहे. चाय कधीही, चहाच्या वेळी, चहाची वेळ नसलेल्या वेळी, जेवण्यापूर्वी, जेवल्यानंतर, कार्यक्रम बघताना, गप्पा मारताना, थकल्यावर, ताजंतवानं असताना... थोडक्यात चहा सर्वसंचारी. हा चहा सतत भेटतो. निळ्या, काळ्या सोनेरी नक्षीच्या पारदर्शी किटलीतून. चहातल्या सगळ्या खड्या मसाल्यांचं राजस दर्शन घडवत. कितीही वेळा प्यायचा हा चहा ग्रीन टीच्या जवळचा आणि वेगवेगळ्या रंगांच्या छटा ल्यालेला.

'चायखाना' हे रेस्टॉरंटचं उझबेक नाव. कारण रेस्टॉरंटमधला हिरो चायच असतो. बाकी सगळे खाद्यपदार्थ, जेवणातले पदार्थ दुय्यम भूमिकेत. तेव्हा 'चायखाना'सारखं दुसरं समर्पक नाव याला नाही.

खिवामध्ये सामान्य माणसांच्या क्रियाकलापांचे सुंदर पुतळे चौकांतल्या प्रशस्त ओट्यांवर उभारलेले असतात. ओट्यावर एखाद्या छोट्याच झाडाखाली पुतळ्यांशी गप्पा मारत बसावं खुशाल. त्यातला एकेक पुतळा म्हणजे सामान्य जीवनातला एकेक निवांत प्रसंग. खिवामधला असा एक प्रसंग आहे, दोन वृद्धांच्या चहा आणि गप्पा-हास्य-विनोदाच्या मैफिलीचा. मधे चहाची किटली, चहा प्यायचे बोल, दोघांच्या हातात बोल आणि एक जण दुसऱ्याच्या विनोदावर दिलखुलास हसतोय. हे चाय आणि चायखान्याचं उझबेक जीवनातलं महत्त्व अधोरेखित करणारं दृश्य.

खिवामधल्याच एका दोनमजली लाकडी गच्चीच्या चायखान्यात मेन्यू आला. त्यात अनेक प्रकारचे चहा होते. त्यातला पोमेग्रॅनेट टी निवडला. पारदर्शी किटलीत चहा आला. त्यात बरीच फळं, फुलं, पानं पाण्याच्या तळाशी बसलेली. डाळिंब तर होतंच, सफरचंद, लिंबू, संत्रं, वेगवेगळ्या प्रकारची फुलं - बटण शेवंती, गडद राणी रंगाची सुपारीची फुलं, मोगऱ्याच्या सुकवलेल्या कळ्या, आणि विविध रानफुलांच्या जातीची लहान लहान फुलं. बोलमध्ये चहा ओतला. चहाची चव डाळिंबाशी नातं सांगत होती. मग जिथे तिथे असे वेगवेगळे चहा घेतच फिरलो. चहाबरोबर मनुका आणि कवचासहित भाजलेल्या बदामांची बशी हमखास.

एखाद्या वर्कशॉपमध्ये गेलो तरी तिथे सगळं बघून झाल्यावर हा चहा पिण्याचा कार्यक्रम होतोच. समरकंदमधल्या आमच्या गोष्टीवेल्हाळ गाइड व्हॅलेंटिनाने पेपरमॅशच्या कारखान्यात अशाच टी सेरेमनीमध्ये या समारंभपूर्वक चहा पिण्यातली आणखी एक गंमत प्रात्यक्षिकासह सांगितली. एकतर पाहुण्याने चहाला नकार द्यायचा नसतो. नकार दिला तर यजमानाचा अपमान होतो. यजमान किटलीतून चहा ओतत असताना पाहुण्याने म्हणायचं, 'चॉय'. एक बोल पिऊन झाला की दुसरा बोल. तो ओतला जात असताना त्याने म्हणायचं 'मॉय'. आणि तिसरा बोल ओतून होता होता म्हणायचं 'टॉय'. तेव्हा कुठे पाहुण्याची सरबराई मनाजोगती केल्याचं समाधान मिळतं.

ताश्कंदच्या चोरसु बाजारात आणि समरकंदच्या अफरोसियॉब बाजारात मसाल्याच्या नावावर पोत्यात फुलं, बिया, पानं आणखीही काही काही वनस्पती मांडलेल्या होत्या. त्या पोत्यांचं रहस्य असं जागोजागी उलगडत गेलं. एवढं रोमँटिक चहापान याआधी कधी केलं नव्हतं.

**एकेक पुतळा म्हणजे सामान्य जीवनातला एकेक निवांत प्रसंग. खिवामधला असा एक प्रसंग आहे, दोन वृद्धांच्या चहा आणि गप्पा-हास्य-विनोदाच्या मैफिलीचा. मधे चहाची किटली, चहा प्यायचे बोल, दोघांच्या हातात बोल आणि एक जण दुसऱ्याच्या विनोदावर दिलखुलास हसतोय. हे चाय आणि चायखान्याचं उझबेक जीवनातलं महत्त्व अधोरेखित करणारं दृश्य.**




ताश्कंदमधला शास्त्री मार्ग आणि शास्त्रीजींचा पुतळा

**दस्तरख्वान**

तंदूरमध्ये भाजलेले नान आणि बीफ किंवा मटण किंवा चिकन – मुख्यतः बीफ – हे उझबेकिस्तानी माणसाचं रोजचं जेवण. आठवड्यातून एखाददुसऱ्या दिवशी आणि सणा–समारंभांत हटकून खाल्ला जाणारा 'प्लाव'. (पुलाव किंवा पिलाव) मित्रमंडळींबरोबर रेस्टॉरंटमध्ये जेवायला जायचं तर प्लावची ऑर्डरच द्यायची. तो वेगवेगळ्या भाज्या, सलाड, मनुका, जरदाळू आणि बीफ, चिकनने नटलेला. स्नॅक्सचा सर्वात लोकप्रिय प्रकार म्हणजे 'सम्सा'. हा सम्साच भारतात समोसा बनून आला. आकार वेगळा. गोल आकाराला दोन्हीकडून टोकं काढावीत तसा उझबेकी सम्सा बीफ, चिकन किंवा मग पालक वा चक्क लाल भोपळा घालून बेक केलेला. भारतातला समोसा त्रिकोणी आणि तेलात पोहून बाहेर पडणारा, पोटात मुख्यतः बटाटा वागवणारा आणि क्वचितच खिमा बाळगणारा. त्यामुळे पालक वा लाल भोपळ्याच्या सम्श्यापेक्षा नक्कीच चविष्ट असतो. सलाडवर कोथिंबिरीबरोबर शेपूची पानंही भुरभुरवलेली आढळली. फ्लॉवर–कोबी वगैरे भाज्यांचं दर्शन मात्र झालं नाही. उझबेकिस्तानात लाल भोपळा पिच्छा पुरवील असं कधी वाटलं नव्हतं. सम्श्यात लाल भोपळा, सलाडमध्ये लाल भोपळा, प्लावमध्ये लाल भोपळा. स्वीट डीश मागवली ती शोभिवंत केशरी रंग आणि वर पांढऱ्या थरावर तोऱ्यात उभा पुदिन्याच्या पानांचा तुरा, अशा थाटात. बहुधा चीज केकचा प्रकार असावा असं वाटलं. निघाला उकडून मॅश केलेला लाल भोपळा! नकोशा पाहुण्यांसाठी करायला फारच सोप्पी डीश. कल्पना सुचवल्याबद्दल रखमत – थँक्यू – उझबेकिस्तान!

तेवढा एक लाल भोपळा सोडला तर जेवण म्हणजे छोटीशी मेजवानीच. त्यातून जेवताना येणारे मजेदार अनुभव. बुखारातल्या एका रेस्टॉरंटमध्ये भेटली एक उत्साही, हसरी–गाणारी वेट्रेस दुर्दाना. तिने काय मागवावं याची शिफारस तर केलीच. पण आपण आईबरोबर यूट्यूबवर हिंदी सिनेमा बघतो; शाहरूख आपल्याला किती आवडतो त्याचंही रिपोर्टिंग केलं. एकापाठोपाठ सुखद धक्के देत होती ही चिमुरडी. रामायण–महाभारत तिने रंगून जाऊन पाहिलंय छोट्या पडद्यावर. एका स्त्रीला पाच नवरे असू शकतात याची अफाट गंमत तिला वाटत होती, पण कणव पण वाटलेली दिसली द्रौपदीविषयी. आणि मग एकदम म्हणाली, 'रीझन वॉज द मदर. आफ्टर ऑल दे वेअर इन लव्ह विथ ईचअदर अँड हाऊ कॅन मदर से, मॅरी ऑल द फाइव्ह? धिस वॉज नॉट फेअर.' थोड्या वेळाने चहाची किटली घेऊन आली आणि म्हणाली, 'दुर्योधन वॉज अ बॅड मॅन.' शेवटी एक छानसं उझबेकी गाणंही म्हणून दाखवलं.

ताश्कंदच्या हॉटेल क्राऊन प्लाझामधला बेल बॉय नवा नवा आला होता. त्या वेळच्या चळवळ्या, उत्साही शाहरूख

खानसारखाच. पाहता क्षणी मोठ्ठा आ वासून हसणारा. सेवेला तत्पर. पहिल्या दिवशी चेक इन केल्यानंतर संध्याकाळी जरा फिरून यावं म्हणून त्याला विचारलं, 'जवळपास काय पाहता येईल?' त्याने लहान मुलाच्या उत्साहाने सांगितलं, 'मॅजिक लँड, मॅजिक लँड'. सांगताना मनाने तोच पोहोचला होता मॅजिक लँडमध्ये. मॅजिक लँड म्हणजे एका सरोवराभोवती मांडलेली, लायटिंग, संगीत, खाण्यपिण्याची चंगळ आणि आई-बाबांबरोबर येऊन मनसोक्त बागडणाऱ्या बाळ-गोपाळांची अम्युजमेंट पार्कच होती. एका कोपऱ्यातून मुलांच्या चीत्कारण्याचे सुरात आरोह-अवरोह ऐकू येत होते. तिथे जाऊन पाहिलं तर ध्वनीच्या आरोह-अवरोहांनुसार वर उसळून परत खाली येणाऱ्या कारंज्याचं नृत्य रंगीत प्रकाशात रंगलं होतं. समोर मुलं सुरात चीत्कारून त्याचं दिग्दर्शन करत होती. हा खेळ इतका रंगात आला होता की मोठी माणसंसुद्धा लहान होऊन चीत्कारण्यात आणि कारंजं उडवण्यात रंगली होती. कोलाहलाचा फायदा घेऊन किंचित काळ आम्हीही!

ताश्कंदच्या रेस्टॉरंटमध्ये अब्दुल्लाच्या गप्पादेखील कमी उद्‌बोधक नव्हत्या. त्यातून आजच्या उझबेकींची जीवनशैली कळत होती. ते कसा विचार करतात त्याची झलक मिळत होती. 'माझं इंग्रजी मोडकंतोडकं आहे' अशी दिलगिरी व्यक्त करत 'आपण इंग्रजी शिकतो आहोत. कारण आपल्या व्यवसायात ते आवश्यकच आहे,' असं तो म्हणाला. तो आमचा ताशकंदमधला ड्रायव्हर. मग घराविषयी, कुटुंबाविषयी मोकळेपणाने बोलला. त्याचं घर आजोबांपासूनचं आहे. त्यामुळे ती चिंता नाही. बायको मुलींना सांभाळणं, स्वयंपाकपाणी, बागेची निगा ही सगळी कामं करते आणि फावल्या वेळात कपडे शिवून थोडे पैसे मिळवते. वृद्ध आई पेन्शनर आहे. तिचे पैसे तिच्यापुरते होतात. अब्दुल्ला एकटा कमवणारा. 'माझ्या घरात पाच फुलझाडं आहेत आणि मी त्यांचा माळी आहे' असं तो मुलींविषयी, बायको-आईविषयी अभिमानाने, प्रेमाने सांगतो. मुलींचे फोटो दाखवतो, धाकटीच्या बाळलीलांचं वर्णन करतो. मुलगा नसल्याचं दरिद्री वैषम्य त्याच्या गावीही नसतं. खूप कौतुक वाटतं या माणसाचं. 'परदेशात कधी प्रवास कधी केला आहेस का?' या प्रश्नाला त्याचं उत्तर असतं, 'आधी मला घराचं नूतनीकरण करायचं आहे. त्यानंतर मी बायको-मुलींना घेऊन एखादी परदेशवारी करणार आहे.'

**मेहमॉनखाना**

हॉटेल म्हणजे मेहमॉनखाना. उझबेकिस्तान सफरीला कारणीभूत झाला तो एक रंजक घटक - एक मेहमॉनखाना! माझी मैत्रीण प्रसिद्ध आर्किटेक्ट आणि नगर-रचनाकार सुलक्षणा महाजन ही १९८७ सालात रशियातल्या समरकंद ह्या शहरात बांधण्यात येणाऱ्या एका पंचतारांकित हॉटेलसाठी भारतातल्या लार्सन अँड टुब्रो कंपनीच्या वतीने अंतर्गत सजावटीचं डिझाइन करत होती. डिझाइन्स केली, उझबेक

बोलकी शिल्पे : टरबूज खाण्यात दंग मित्र...चहा पिता पिता गजाली करणारे उजबेकी







पुरातन वास्तूंमध्ये नवतेचा आविष्कार





शैलीची सामग्रीदेखील तिने बरंच संशोधन करून, भटकंती करून जमा केली. रशियाला जाण्यासाठी पासपोर्ट बनवला. लवकरच ती तिच्या ह्या पहिल्या परदेशप्रवासाला निघणार होती. एवढ्यात १९८९ साली सोव्हिएत रशियाचं विघटन झालं. मध्य आशियातले देश फुटून स्वतंत्र होऊ लागले. सुलक्षणाच्या रशिया प्रवासाचा बेत, समरकंद हॉटेलचं पुढचं काम सगळंच बारगळलं. अनेक वर्षं तिने ही डिझाइन्स जपून ठेवली होती. नंतर कधीतरी आता काय उपयोग म्हणून काढून टाकली. पण समरकंद मनात घर करून राहिलं होतं. म्हणून मग उझबेकिस्तानची सफर. कारण आता सम रकंद रशियातलं शहर नव्हतं. १९९१ साली उझबेकिस्तान स्वतंत्र झाला होता. समरकंदमध्ये फिरताना तिची नजर समरकंद हॉटेलचा शोध घेत होती. व्हॅलेंटिना चांगली माहीतगार गाइड होती. तिच्याजवळ चौकशी केली. त्या वेळी आम्ही नेमकं अमीर तिमूरच्या मकबऱ्याच्या परिसरात होतो आणि व्हॅलेंटिनाने समोरच बोट दाखवलं. हॉटेलचं नूतनीकरण चालू होतं. चारी बाजूंनी ते बुरख्यात बंद होतं. तेच ते एकेकाळी तयार झालेलं समरकंद हॉटेल. काम चालू होतं तिथे हॉटेलच्या भोवताली रेंगाळत कुठून आत जाता येतं का हे आम्ही बघू लागलो. तेवढ्यात तिथे विसावलेले चौघे कामगार पुढे झाले. ते भारतीय होते. हिंदी बोलायला मिळालं म्हणून आनंदले होते. भारतीय माणसं भेटल्यावर घरचं कुणीतरी भेटल्याचा आनंद त्यांना झाला. ते उत्साहाने हॉटेलच्या आवारात साइटच्या ऑफिसमध्ये घेऊन गेले. तिथला ओव्हरसियर अफगाणी होता. तो त्यांचा बॉस. त्याला भारतीय पाहुणे आलेत कळताच त्यानेही उत्साहाने स्वागत केलं. अफगाणींना भारतीय आपलेसे वाटतात. त्याने – मन्सूर त्याचं नाव – ऑफिसमधल्या इतरांशी ओळख करून दिली. चहा–सरबताचा आग्रह करू लागला. कुणीतरी सरदार नावाच्या उझबेक इंजिनिअरला बोलावून आणलं. सुलक्षणाने १९८७ साली हॉटेलचं अंतर्गत डिझाइन केल्याचं कळताच तो आतल्या खोलीतून त्या वेळचे आराखडे घेऊन आला. टेबलावर पसरले. आणि सुलक्षणाला लार्सन अँड टुब्रोचं नाव दिसलं. तिला रशियन भाषेत लिहिलेले शब्द दिसले. साहजिकच खूप रोमांचकारी अनुभव होता तो. १९८७ साली सुलक्षणाने ते काम केलं होतं हे ऐकून मन्सूर आणि सरदार दोघांना खूप गंमत वाटली. मन्सूर म्हणाला, 'मैं तो पैदा भी नहीं हुआ था.' एव्हाना कुणीतरी वयस्कर सिक्युरिटी गार्डला बोलावून आणलं. तो त्या वेळीही इथल्या नोकरीत होता. उझबेक होता. उझबेकशिवाय इतर कुठली भाषा त्याला येत नव्हती, पण काहीतरी ओळखीची खूण सापडल्याचा भाव त्याच्या गंभीर चेहऱ्यावरही लपून राहत नव्हता. मग तो उझबेकमधून आपल्या सहकाऱ्यांकरवी चौकशी करू लागला, नैनीकुमारची. हा त्याचा त्या काळचा भारतीय सहकारी आणि मित्र. पुन्हा पुन्हा नैनीकुमारविषयी तो चौकशी करत

होता. सुलक्षणा त्या वेळी स्वतः काही समरकंदला जाऊ शकली नव्हती. त्यामुळे ती नैनीकुमारला ओळखत नव्हती. नैनीकुमारच्या मित्राला निराश करावं लागलं. पण जे रोमांच सुलक्षणाने अनुभवलेले पाहिले तेच हॉटेलच्या साइट ऑफिसमधल्या आजच्या सर्व कर्मचाऱ्यांमध्येही पाहता आले. भारलेले क्षण घेऊनच आम्ही त्यांचा निरोप घेतला. तरी नैनीकुमारच्या आठवणीने तो धिप्पाड शरीरयष्टीचा उझबेक सिक्युरिटी गार्ड हळवा हळवा होऊन गेला होता. आता ह्या हॉटेलचं नाव 'हॉटेल अफरोसियॉब' असं आहे. अफरोसियॉब हे समरकंदचंच एक प्राचीन नाव.

**रखमत!**

उझबेक भाषेचं मूळ तुर्किक असलं तरी तीत असंख्य फारसी शब्द ठायी ठायी आढळतात आणि भाषिक जवळीक वाटू लागते. रेस्टॉरंटला 'चायखाना' म्हणणं हेच मुळी मला खूप रोमँटिक वाटलं. तसेच आणखी काही शब्द - हॉटेल म्हणजे 'मेहमॉनखाना'. उझबेकमध्ये 'मेखमॉनखाना'. कारण उझबेकमध्ये 'ह'चा उच्चार 'ख' असा होतो. त्यामुळे आमचा ड्रायव्हर हा 'शाखरूख' (शाहरूख) होता. स्टेशनवर तक्रार निवारण खिडकीवर 'तरक़ीब' असा शब्द बघितला. बरोब्बर! 'बाजार' हा तुर्की शब्द तर जगभर कॉमन. हेअर कटिंग सलूनला असलेला 'सरतराशखाना' हा शब्द म्हणजे थेट वर्णनच. जिथे डोकं तासलं जाते ते ठिकाण! थँक्यू म्हणायचं असलं, की उझबेकी माणूस हृदयावर उजवा हात ठेवून म्हणतो. 'रखमत'. 'रखमत' म्हणजे फारसीत 'रहमत' - कृपा, दया. आपली कृपा झाली.

गालिच्यात विणलेली भेदक नजरेची अफगाणी स्त्री आणि मोनालिसा



हॉटेललाच फक्त मेहमॉनखाना म्हणून उझबेक संस्कृती थांबत नाही. ज्या आस्थेने भारतीय पर्यटकांची मेहमाननवाज़ी होते ते पाहून भारावून जावं. चश्म अयूबच्या भोवतीच्या बागेत एक वृद्ध गृहस्थ जुनी पुस्तकं विकत होते. भारतीय माणसं येताना पाहून ते उत्साहात चौकशी करू लागले. मग त्यांच्या तोंडून जुन्या आठवणी निघाल्या. त्यात होते पं. नेहरू, राज कपूर आणि लालबहादूर शास्त्री. ही नावं ह्या उझबेक माणसांशी किती पटकन जवळीक साधतात. ते गृहस्थ इतिहासाचे निवृत्त प्राध्यापक होते. जाकिद ह्या ताश्कंदमधल्या आमच्या गाइडनेदेखील ताश्कंद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आणि त्यातल्या राज कपूरच्या सहभागाच्या आठवणी जागवल्या. लालबहादूर शास्त्रींविषयीचा आदर जसा जाकिदमध्ये पाहिला, तसाच तरुण ड्रायव्हरमध्येही जाणवला.

'पर्यटन हा मुख्य व्यवसाय आहे ना उझबेकिस्तानचा?' मी दिलफुझाला विचारलं होतं. ती म्हणाली 'नाही. शिक्षण हा इथला पहिल्या क्रमांकाचा व्यवसाय.' हे सांगताना तिच्या स्वरात रास्त अभिमानही होता. दिलफुझा स्वतः बुखारा विद्यापीठात भाषांतर विषयाची प्राध्यापिका आहे. तिची सतरा वर्षांची मुलगी उच्च शिक्षणासाठी परदेशी जायला धडपडते आहे. आज उझबेक स्त्रिया शिकताहेत; स्वतःचे स्वतंत्र व्यवसाय करताहेत, पण ह्याचा अर्थ सरसकट असा लावता येणार नाही की समाज पुरुषप्रधान राहिलेला नाही. तो अजूनही आहेच. दिलफुझाच्या व्यक्तिगत अनुभवांतून त्याची झलक मिळाली. दिलफुझा एकटीच दोन मुलींना वाढवते आहे. तिचा स्वाभिमान तिला अमेरिकावासी झालेल्या पतीकडून मदत मागू देत नाही. पण शिक्षणासाठी परदेशी जायला धडपडणाऱ्या मुलीला त्यासाठी वडिलांच्या परवानगीची गरज पडणार आहे. आणि ती सहजासहजी मिळणार नाही.

पण उझबेकिस्तानात शिकायला येणाऱ्या मध्य आणि दक्षिण आशियाई विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. मुख्यतः मेडिकल कॉलेजसाठी भारतातूनही विद्यार्थी इथे येतात, भारतातलं महागडं शिक्षण सामान्य कुटुंबातल्या विद्यार्थ्यांना परवडत नाही. ही मुलं उझबेकिस्तानात शिकताहेत. युक्रेनमधून परतलेले असंख्य विद्यार्थी आता उझबेकिस्तानात शिकताहेत. स्वस्त शिक्षण, राहण्याची व्यवस्था. अभ्यासातून जमेल तेव्हा तास-दोन तास एखाद्या रेस्टॉरंटमध्ये वेटर म्हणून

काम करून थोडे पैसे मिळवणं हे ही मुलं-मुली करतात. ताश्कंदच्या 'इंडियन किचन' ह्या रेस्टॉरंटमध्ये केरळी वेटर भेटला. तो ह्या विद्यार्थ्यांचा प्रतिनिधीच म्हणावा असा. त्याचे अनेक सहाध्यायी, मित्र रेस्टॉरंटमध्ये काम करतात. 'इंडियन किचन'मध्ये असे केरळी विद्यार्थी होतेच. शेजारीच दोन दुकानं सोडून पंजाबी रेस्टॉरंट होतं. तिथेही असणार.

ज़किद, मुराद, 'माझ्या घरी पाच फुलझाडं आहेत', मी त्यांचा माळी असं कौतुकाने सांगणारा अब्दुल्ला, बारीकसारीक कुतूहलं पुरवणारा शाखरूख, दिलखुलास दिलफुझा, कोडी घालणारी गोष्टीवेल्हाळ व्हॅलेंटिना, जुनी पुस्तकं विकणारे प्राध्यापक, खिवाहून बुखाराला जाताना वाटेत भेटलेल्या कोकंदच्या तिघी रहिवासी, बुखारातल्या रेस्टॉरंटमधली शाहरूखची चाहती, यूट्यूबवर महाभारत मालिका बघणारी दुर्दाना, ताश्कंद हॉटेलमधला शाहरूखचा चाहता गमत्या, उत्साही, 'हाऊ टू मेक लड्डू' विचारणारा आणि 'डिपेंडस अपॉन विच टाइप ऑफ लड्डू यू वाँट टू मेक' असं उत्तर दिल्यावर आश्चर्याने आ वासून 'ओ..., देअर आर सो मेनी टाइप्स ऑफ लड्डूज' म्हणणारा, मॅजिक लँड बघा म्हणून आग्रह करणारा कर्मचारी... उझबेकिस्तानच्या ऐतिहासिक आणि कलाकौशल्याच्या वैभवाबरोबरच ह्या भेटलेल्या माणसांनाही हृदयावर हात ठेवून म्हणावंसं वाटतं, 'रखमत उझबेकिस्तान!'



गर्दभारुढ मुल्ला नसरुद्दीन आणि लेखिका

❋ ❋ ❋

**रेखा देशपांडे या प्रसिद्ध लेखिका, अनुवादक आहेत.**
**संपर्क : ९८२१२ ८६४५०**

## आ वा ह न

समतावादी मुक्त-संवाद पत्रिका

सप्रेम नमस्कार,

तुमच्या पाठबळाच्या जोरावर '**समतावादी मुक्त-संवाद पत्रिके**'ने (पूर्वाश्रमीचे 'मुक्त-संवाद') सहाव्या वर्षांत पदार्पण केले आहे. पुढची वाटचाल अशीच सुकर होण्यासाठी आपल्या मदतनिधीची आम्हाला आशा आहे. मदतनिधी जमा करण्यासाठी बँक खात्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**खातेदार संस्थेचे नाव :** SAMATAWADI MUKTSANVAD PATRIKA

**बँक, शाखा :** SARASWAT BANK, MAHIM

**खाते क्रमांक :** 610000000035417


**आयएफएससी क्रमांक :** SRCB0000007

---

**'समतावादी मुक्त-संवाद पत्रिके'चा अंक मर्यादित संख्येने छापील आणि पीडीएफ अशा दोन प्रकाराने प्रकाशित होतो. हा अंक वाचकांसाठी विनामूल्य असून, अंकाच्या पीडीएफसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा अथवा व्हॉट्सअॅपद्वारे संदेश पाठवावा. संपर्क : ९६१९८२३६७२/८५५१८५०४६२**

MGMU Mahatma Gandhi Mission University

Chhatrapati Sambhajinagar




MGM University, MGM Campus, N-6, CIDCO,
Chhatrapati Sambhajinagar

mgmu.ac.in

Samatawadi MuktSanvad Patrika
Monthly Magazine- Publishing date- 1st of every month
RNI Regd No. MAHMAR/2023/86554




PRICE DROP
by
10%
PLUS
Monginis products are now an **Affordable Luxury!**
We are pleased to inform our Customers that prices of all Monginis Products are **reduced by 10% plus** with effect from **22nd September 2025**, thanks to GST rate rationalisation.
You can now enjoy world-class Monginis products with easy-on-the-pocket prices.
Go ahead....celebrate!
monginis
magic every time
@monginis.goa

अभिजात मराठी

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास



मराठी भाषा विभाग

# राज्य मराठी विकास संस्था

भिलार — भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव

पुस्तकांचं गाव योजना विस्तार
पोंभुर्ले ★ मालगुंड

कवितांचं गाव
उभादांडा ★ शिरवाडे

आंतरराष्ट्रीय मराठी मंच
युरोप, अमेरिका, आशिया खंडांतील
२७ देशांत कार्यरत...
लवकरच जगभरात विस्तार

दृक्‌श्राव्य — प्रकाशनसूची — श्राव्यपुस्तके — ग्रंथसंपदा

## सुरू असलेले काही महत्त्वाचे प्रकल्प

* विश्व मराठी संमेलन
* बृहन्महाराष्ट्रातील संस्थांना अनुदान
* सीमावर्ती संस्थांना अनुदान
* मराठी संशोधन संस्थांना अनुदान
* मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धा
* मराठी युवक मंडळांना अनुदान
* अरबी-तुर्की-मराठी व्युत्पत्तिकोश
* वस्त्रनिर्मिती माहितीकोश
* मध्यवर्ती ग्रंथालय, बदलापूर
* देवनागरी टंकविषयक पुस्तक
* मराठी ग्रंथसूचिमाला (१९८६ ते २०००)

**संस्थेच्या संकेतस्थळावरून उतरवून घ्या.......**

* श्राव्य पुस्तके - ज्ञानेश्वरी, दासबोध, कृष्णाकाठ, कविता कुसुमाग्रजांची, कविता विंदांची
* अनेक दुर्मीळ पुस्तके, नियतकालिके व संस्थेची निवडक इ-पुस्तके
* युनिकोड आधारित देवनागरी टंक
* माय मराठी - अभ्यास/पाठ्य सामग्री उतरवून घ्या
* दासोपंतकृत गीतार्णव शब्दार्थ संदर्भकोश
* वऱ्हाडी बोलींचा शब्दकोश
* मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण - सामग्रीसाठी https://sdml.ac.in/mr

## संस्थेची निवडक प्रकाशने

घराघरात ठेवण्यासाठी, शालेय मुलांसाठी, उत्तमोत्तम ज्ञानासाठी, वाचनासाठी...




सर्व प्रकाशने सवलतीत उपलब्ध...प्रकाशनसूची मागवा
अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्या...


राज्य मराठी विकास संस्था (नोंदणी क्र. १६०५४ (मुंबई))
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी: (०२२)२२६३१३२५, संकेतस्थळ: http://rmvs.marathi.gov.in, इ-पत्ता: rmvs_mumbai@yahoo.com



# दीपदानोत्सवाच्या

बार्टीतर्फे हार्दिक मंगल कामना !



**घनसारप्पदित्तेन दीपेन तमधंसिना ।**
**तिलोकदीपं सम्बुद्धं पूजयामि तमोनुदं ।।**

**"मानवी जीवनाला प्रगतीशील आणि समृद्ध बनविण्याचे एकमात्र साधन आहे शिक्षण ।"**

**- डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

## बार्टी अंतर्गत कार्यरत विभाग

०१ **प्रशासन विभाग**
आस्थापना, विधी विभाग, संगणक विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग, निविदा कक्ष

०२ **प्रशिक्षण व कौशल्य विकास विभाग**

०३ **योजना विभाग**
एम.पी.एस.सी. यु.पी.एस.सी. आय.बी.पी.एस, पोलीस भरती, जेईई/नीट, अधिछात्रवृत्ती व इतर स्पर्धा परिक्षा विभाग)

०४ **संशोधन व मूल्यमापन विभाग**

०५ **विस्तार व सेवा विभाग**
प्रकाशन व प्रसिद्धी विभाग, समतादूत प्रकल्प

०६ **लेखा विभाग**

०७ **जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी**

०८ **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड**

०९ **सफाई कामगारांचा मुला-मुलींची निवासी शाळा, येरवडा संकुल**

barti
Pursuit for social Equality

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

Scan the QR Code

अधिक माहितीसाठी संपर्क :- ०२०-२६३३३३३९/२६३३३३३०/२६३३३५९६
Website: http://barti.maharashtra.gov.in | www.barti.in. | http://bartievalidity.maharashtra.gov.in
BARTI Online | BARTI UPSC Online | BARTIConnect | BARTIConnect | barti_pune

Scan the QR Code




समतावादी मुक्त संवाद पत्रिका मासिकाच्या
वाचकांना आणि हितचिंतकांना

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

**KHEDKAR STRATEGIC LINKS**
**(OPC) PRIVATE LIMITED**

CIN No - U82199MH2025OPC457047

ADDRESS: SHOP NO-17, SHIV RESIDENCY, PLOT NO-36, SECTOR-3,
KARANJADE, PANVEL, RAIGARH(MH), MAHARASHTRA, INDIA-410206
Email Id: ksl.opcpl@gmail.com